मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५३/अपील क्र.६२७६/२०१०

सौ.वनिता रविंद्र निकम **अपीलार्थी**
३५६/११, चेंबूर इलेव्हन हेवन को.ऑ.सोसायटी,
सहकार नगर ३, आदर्श विद्यालयाचे समोर,
चेंबूर पूर्व, मुंबई ७१

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त परिमंडळ-३
बावला कपाऊंड, भायखळा, मुंबई ३३

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई.

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.११.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्याकडे अर्जदार व त्यांचे पती श्री.रविंद्र आबाजी निकम यांना धारावी पोलिस ठाणे गु.नो.क्र.३४२/१० या गुन्हयात दि.२९.७.२०१० रोजी अटक करण्यांत आली होती. त्यांना अटक करण्यांत आल्यापासून जामिनावर मुक्त होईपर्यत धारावी पोलिस ठाणेकडून त्यांचे लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन, मुंबई येथे करण्यांत आलेल्या वैद्यकिय तपासणीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती व्यक्तिश:घेणार असे नमूद करुन मागितल्याचे दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.३.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक धारावी पोलिस ठाणे यांनी सहाय्यक माहिती अधिकारी यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यासोबत कागदपत्र सुध्दा उपलब्ध करुन दिलेले असल्याचे दिसून येत असले तरी दि.२.८.२०१० रोजी सायन रुग्णालयामध्ये वैद्यकिय तपासणी केलेल्या तपासणीचे कागदपत्र मिळाले म्हणून प्रथम अपिल दाखल केलेले असल्याचे दिसून येते. परंतू प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, धारावी पोलिस ठाणे यांचेकडे दि.११.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र दिले होते व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यावर अपिलकर्ता यांना दि.३.९.२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली होती. परंतू दि.२.८.२०१० रोजीचा वैद्यकिय तपासणी अहवाल प्राप्त झाला नव्हता व त्यामुळे तो उपलब्ध करुन देता आलेला नव्हता. प्रथम अपिलाच्या संदर्भात दि.११.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यांत आली व त्याचा निर्णय दि.१२.१०.२०१० रोजी देण्यांत आला व दि.१९.१०.२०१० रोजी युपीसी पोस्टाने अर्जदाराच्या निवासस्थानी माहिती पाठविण्यांत आलेली होती. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे आयोगापुढे सांगितले.

४. वरील प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळेच सुनावणीच्या दिवशी ते हजर राहिले नाहीत असे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.१/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२१८/अपील क्र.६२१६/२०१०

श्री.विशाल वासुदेव परब **अपीलार्थी**
४७/अ, ३ रा मजला, बोटावाला बिलिडंग नं.२
प्रभादेवी, मुंबई ४०००२५

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त परिमंडळ-३
बावला कपाऊंड, भायखळा, मुंबई ३३

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई.

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलार्थी यांनी दि.२५.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्याकडे दि.१०.१२.२००७ रोजी दादर पोलिस ठाणे येथे आरोपी श्री.विराज सावंत, मनसे उपशाखा, अध्यक्ष यांचे विरोधात एफ.आय.आर.४१८ अंतर्गत केस दाखल करण्यांत आली. सदर केसबाबत ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरील माहिती स्वतः घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांना चारही मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याचे दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने दि.१७.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचे आदेश दि.३०.७.२०१० रोजी देण्यात आले असून वरिष्ठ पोलिस निरिक्षक, दादर पोलिस ठाणे यांच्याकडून जा.क्र.७९८०/१० दि.२९.७.२०१० अन्वये प्राप्त झाली असल्याने त्यांनी सांगितले. प्राप्त माहिती सदरच्या अंतिम आदेश पत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत युपिसी पोष्टामार्फत अपिलार्थीस पाठवून देण्याबाबत आदेशित करुन अपिल निकाली काढण्यांत आले असल्याचे दिसून येते. परंतू त्यामुळेही समाधान झाल्यामुळे अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना दि.२५.६.२०१० रोजी जी माहिती प्राप्त झाली त्यामध्ये जामिनदाराचा नाव व पत्ता दिलेला नाही तसेच आरोपीचा पत्ता चुकीचा दिलेला आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आरोपी श्री.विराज सावंत यांनी रु.५०००/- रोख रक्कमेचा जामिन दिलेला आहे. त्यामुळे जामिनदाराचे नाव देण्याचे कारण नाही. तसेच अभिलेख्यावर जो पत्ता दिलेलाआहे तोच पत्ता उपलब्ध करुन दिलेला आहे. यावरुन अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

२. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.१/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५२/अपील क्र.६२७४/२०१०

श्री.राजेश कृष्णा घडशी **अपीलार्थी**
विजय कर्पे चाळ नं.३ बी रुम नं.१०
न्यू निम्म बाग कल्याण, तिसगांव रोड,
कल्याण पूर्व, ठाणे

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वास्तुशास्त्रज्ञ मुंबई मंडळ,
म्हाडा, बांद्रा पूर्व, मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार **उत्तरवादी**
म्हाडा, बांद्रा पूर्व, मुंबई ५१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.
अपीलार्थी अनुपस्थित. अपिलीय अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी उशिरा उपस्थित.

२. अपिलार्थी यांनी दि.१३.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार यांचेकडे ईस्टर्न एकस्प्रेस हायवेलगतअसलेल्या विक्रोळी (पू) व कांजूरमार्ग (पू) च्या सिमेवरील जमिन कोणाच्या मालकीची आहे त्याबाबतचा तपशिल मागितलेला दिसून येतो. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय सुध्दा झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जन माहती अधिकारी यांनी असे सौंगितले की, सदरील माहिती ही त्यांच्या कार्यालयातील नसलयामुळे त्यांचा अर्ज हा सहाय्यक भुव्यवस्थापक, कुर्ला मुंबई मंडळ यांच्याकडे दि.३.७.२०१० रोजी हस्तांतर केलेला होता. परंतू त्यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेले नाही. मात्रअपिलकता र्यांनी दिलेल्या नकाशाच्या आधारे भुमापन क्रमांक दिलेला नसल्यामुळे जमिनीचा मालकी हक्काबाबत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे अपिलार्थी यांना दि.३१.१.२०११ रोजी कळविण्यांत आलेले आहे. पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचा अर्ज ज्यावेळी प्राप्त झाला त्यावेळी सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ हे रजेवर होते व त्यामुळे सदरचा अर्ज हा विलंबाने हस्तांतरीत झालेला आहे.परंतू अर्ज हस्तांतर झाल्यावर सहा.भुव्यवस्थापक, कुर्ला मुंबई मंडळ तथा माहिती अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व राज्य माहिती आयोगाकडे अपिल सुनावणी असल्याने सुनावणीच्या आदल्या दिवशी म्हणजे दि.३१.१.२०११ रोजी अपिलकर्ता यांना पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही व त्याकरिता नव्याने अर्ज सादर करावा अशा प्रकारे कळविलेले आहे.

४. माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम ६(३)प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध नसेल तर त्यांनी तो अर्ज हा संबंधित जन माहती अधिकारी यांचेकडे सुरुवातीच्या ५ दिवसांत हस्तांतरीत करणे आवयक असते. परंतू या प्रकरणामध्ये हस्तांतरण सुध्दा ३ महिन्यानी केलेले असल्याचे दिसून येते व त्यानंतर सुध्दा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना जन माहिती अधिकारी हे २० दिवसाचे अर्जित रजेवर

होते व त्या संदर्भातील रजा मंजूरीचे आदेश सोबत जोडलेले आहे तसेच वास्तुशास्त्रज्ञ,मुबई मंडळ विभागात म्हाडाच्या वसाहतीच्या जुन्या इमारतीची पुनर्विकासासंबंधी संवेदनशिल प्रकरणे प्राधान्याने हाताळावी लागतात. तसेच या संबंधी संवेदनशिल तक्रारीचा, न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा प्राधान्याने करावा लागत असतो.यामुळे कामाचा आवाका जास्त आहे. याकरिता या विभागात कर्मचा-यांची संख्या अगदीच कमी असल्यामुळे अर्जदाराच्या अर्जावर विहित मुदतीत कारवाई करणे अनावधानाने राहून केले असे असले तरी अर्ज हस्तांतरीत केल्यानंतर सुध्दा तत्कालीन सहमुख्य अधिकारी, कुर्ला मुंबई मंडळ यांनी हस्तांतर केल्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम २० चे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत.

५. आयोगाकडे अपिल सुनावणी ज्या दिवशी आहे त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे दि.३१.१.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. अन्यथा ती सुध्दा संबधितांना उपलब्ध करुन दिली नस्ती अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.भुव्यवस्थापक कुर्ला मुंबई मंडळ यांच्या विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

३. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.भुव्यवस्थापक मुंबई मंडळ यांच्या विरुध्द अधिनियमाच्या कलम २० (१)अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यांत येते. सदरच्या शिस्तभंगाची कारवाई ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य अधिकारी. मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन,मुंबई यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५१/अपील क्र.६२७५/२०१०

श्री.राजेश कृष्णा घडशी **अपीलार्थी**
विजय कर्पे चाळ नं.३ बी रुम नं.१०
न्यू निम्म बाग कल्याण, तिसगांव रोड,
कल्याण पूर्व, ठाणे

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक पणन
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, बांद्रा पूर्व मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक **उत्तरवादी**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, बांद्रा पूर्व मुंबई ५१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.
अपीलार्थी,अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलार्थी यांनी दि.१२.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,उपसंचालक पणन, मुंबई, क्षेत्रविकास यांच्याकडे जानेवारी २००९ मधील सदनिका विक्रिसाठी काढलेल्या जाहिरातीस अनुसरुन करण्यांत आलेले गाळेवाटप संदर्भामध्ये ३मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भात दि.२५.६.२०१० रोजी मागितलेली माहिती संकेत क्र. २०१ मधील कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती तयार असून त्याची एकूण ३ पृष्ठे असून त्याची एकूण रक्कम रु.६ मंडळाच्या खाती जमा केल्यानंतरच सदर माहिती देण्यांत येईल तसेच संकेत क्र.२०७ मधील नस्त्याची पाहणी करुन आपणांस हवी असलेली माहिती आपण घेऊ शकता तेव्हा सदर नस्त्या निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यांत येतील असे कळविले असल्याचे दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांना माहिती विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे दि.२६.७.२०१० रोजी संचालक, पणन मंडळ यांनी कळविलेले दिसून येते व त्यानंतर पुन्हा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी व्दितीय अपीलामध्ये अपील करण्याचे कारण स्पष्टपणे दिलेले आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे उपस्थित नव्हते व त्यांनी कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. आयोगाने कार्यालयातून दि.१.१.२०११ रोजी सुनावणीची नोटीस काढलेली असून सुध्दा जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे उपस्थित राहिलेले नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी उपसंचालक, पणन हे दोषी आढळून येतात. दि.२७.६.२०१० रोजी पत्र दिलेले असले तरी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यास ती अधिनियामाच्या कलम ७ (३) अन्वये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद असताना सुध्दा अपिलकर्ता यांचेकडून २ महिन्यानंतर माहितीच्या अधिकारात खर्चाची मागणी केली जाते व यावरुन जन माहिती अधिकारी

यांना अधिनियमाच्या तरतूदीची काहीही माहिती आहे असे दिसून येते नाही व त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत. परंतू शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरील अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१२.४.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी तस न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे दि.१२.४.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमांच्या कलम २०(१)अन्वये रुपये १००००/- एवढी शास्ती का लादण्यांत येऊन नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत आयोगापुढे समक्ष येऊन करावा अन्यथा रु.१००००/-ची शास्ती कायम करण्यांत येईल याची नोंद घ्यावी

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५०/अपील क्र.६२७७/२०१०
क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१४९/अपील क्र.६२७८/२०१०
क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१४७/अपील क्र.६२८०/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव **अपीलार्थी**
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोमस्तर, कांदिवली पूर्व मुंबई १०१

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय
बृहन्मुंबई महानगरपालिका सं.व प. तरण तलावाजवळ
महात्मा बांधी छेद क्र.२ कांदिवली पश्चिम मुंबई ६७

२. जन माहिती अधिकारी तथा आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय **उत्तरवादी**
बृहन्मुंबई महानगरपालिका सं.व प. तरण तलावाजवळ
महात्मा बांधी छेद क्र.२ कांदिवली पश्चिम मुंबई ६७

---निर्णय---

व्दितीय तिन्ही अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.

अपीलार्थी अनुपस्थित. तिन्ही अपिलामध्ये अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित

वरील तिन्ही अपिलांमध्ये अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याबाबतचे पत्र सादर केलेले असल्याने वरील तिन्ही अपीले निकाली काढण्यांत आलेली आहेत.

मुंबई
दि.१/२/२०११ **(विलास पाटील)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२३१//अपील क्र.६२९८/२०१०

श्री.शिवरामन वासुदेवन मुदलियार **अपीलार्थी**
१८९/५२६२, सन्मती को.हौ.सोायटी,
पंतनगर, घाटकोपर पूर्व, मुंबई ४०००७५

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वास्तुविशारद,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, ३ रा मजला,
गृहनिर्माण भवन, म्हाडा, बांद्रा पूर्व, मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा वास्तुशास्त्रज्ञ कार्यालय **उत्तरवादी**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, ३ रा मजला,
गृहनिर्माण भवन, म्हाडा, बांद्रा पूर्व, मुंबई ५१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित

२. अपिलकर्ता यांनी दि.२.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी म्हाडा यांचेकडे दि.३.९.२००५ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये अतिरिक्त एफ.एस.आय.च्या संदर्भामध्ये काय निर्णय झाला, अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. सदरील माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी संबंधित नस्तीची पाहणी करुन त्यातून आवश्यकत्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यांत आलेल्या आहेत. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१५.४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. सदरच्या अपिलाच्या संदर्भामध्ये दि.१२.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी आवश्यकता असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली होती. परंतू त्यानंतरही समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, दि.३.९.२००५ च्या अर्जाचा व आगाऊ भरणा केलेल्या खर्चाच्या संदर्भामध्ये अतिरिक्त एफ.एस.आय मिळण्याच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती त्यांनी मागितलेली होती. परंतु त्या संदर्भामध्ये त्यांनी देकार पत्राच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतू पुढे त्याबाबत कोणती कार्यवाही झाली व ती विलंबाने कां होत आहे, याबद्दल काहीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या दि.३.९.२००५ च्या अर्जाच्या

संदर्भामध्ये नस्तीमध्ये जे कागदपत्र उपलब्ध होते ते सर्व कागदपत्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. परंतू अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे त्याबाबत कोणतेही आदेश उपलब्ध नाहीत. यावरुन त्यामध्ये अंतिम निर्णय झालेला नाही, असा निष्कर्ष काढता येतो. परंतू तरी सुध्दा **अपिलकर्ता यांचे म्हणणे आहे की, निर्णय झालेला नसेल तर ते स्पष्टपणे कळविणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी निर्णय संबंधितांस स्पष्टपणे कळविण्यास कोणतीही अडचण नाही**, असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे अंशत मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. **अपिलकर्ता यांचे अपील अशंत: मंजूर करण्यांत येत असून हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांनी दि.३.९.२००५च्या आगाऊ भरणाच्या संदर्भामध्ये व अतिरिक्त एफ.एस.आय.च्या संदर्भामध्ये अंतिम निर्णय दिलेला आहे किंवा नाही ही बाब अपिलकर्ता यांना स्पष्टपणे पोस्टाने कळविण्यांत यावे.**

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२१९//अपील क्र.६२९६/२०१०

श्री.नरेंद्र भिकाजी सावंत **अपीलार्थी**
११/३४५,सहकार नगर-३
चेंबूर, मुंबई ४०००७१

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त, परिमंडळ-६
नविन प्रशासकिय इमारत. आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई ७१

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,
चेंबूर, मुंबई ४०००७१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त यांचेकडे दि.६.१०.२००७ रोजी अपिलकर्ता यांनी त्यांच्यावर व त्यांचे मित्रावर नेहरुनगर पोलिस ठाणे कुर्ला सी.आर.नं.३९१/०७ येथे अंतर्गत गुन्हा नोंदविण्यांत आलेला आहे. तसेच दि.२०.११.२००६ व २८.११.२००६ रोजी अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यांत आलेला आहे. त्या संदर्भामध्ये एकूण ३ मुद्यांमध्ये त्यांनी माहिती मागितलेली असल्याचे दिसून येते. तसेच पोलिस अधिका-यांचे डयुटी आदेश बुकची प्रत पोलिस डायरीच्या प्रमाणित प्रती इत्यादि मागितलेले दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२५.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. परंतू त्यामध्ये दि.२०.११.२००६ व दि.२८.११.२००६ रोजीच्या पोलिस अधिका-याच्या डयुटी आदेश बुक अभिलेख्यावर स्वतंत्रपणे मिळून येत नाही असेही अपिलार्थीस कळविलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.३१.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये आदेश बुकची ठाणे दैनंदिनीची प्रत प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देण्यांबाबत दि.२९.९.२०१० रोजी आदेश देण्यांत आलेले आहेत व त्याप्रमाणे दि.१३.१०.२०१० अन्वये दि.६.१०.२००७ व दि.७.१०.२००६ रोजीच्या पोलिस ठाणे गुन्हे दैनंदिनी नोंद असलेल्या प्राप्त झालेल्या प्रती तसेच दि.२८.११.२००६ रोजीच्या आदेश बुकाची पोलिस ठाणे अभिलेखावर पुनश्च शोध घेतला असता सदरचे बुक मिळून आलेले नाही असा अहवाल प्राप्त

झाल्याने त्याप्रमाणे अपिलार्थीस दि.१५.१०.२०१० रोजी कळविण्यांत आलेले आहे व त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे असे सांगितले की, दि.२७.१.२०११ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पोलिस ठाणेमधील स्टोअर्स मध्ये लेखन सामुग्रीची तपासणी केली असता काही लेखन सामुग्री, रजिस्टर्स वाळवीने खाऊन नष्ट झाले असल्याचे निदर्शनास आले असल्याबाबत दोन पंचासमोर पंचनामा करण्यांत आला व ठाणे दैनंदिनीत नोंद करण्यांत आलेली आहे. त्यात २००६-२००७ चे आदेश बुक वाळवीने खाऊन नष्ट झालेले आहेत. त्यामुळे दि.२८.११.२००६चे आदेश बुक अभिलेख्यावर उपलब्ध नाहीत असा अहवाल प्राप्त झाल्याने अपिलार्थीस दि.२८.१.२०११ रोजी कळविण्यांत आलेआहे. परंतू त्यानंतर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे समाधान झालेले आहे त्यामुळे सदरचे अपिली निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

४. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र-मुमाआ/२०११/२९२७/तक्रार क्र.२९/२०१०

श्री.नरेंद्र भिकाजी सावंत **अपीलार्थी**
११/३४५,सहकार नगर-३
चेंबूर, मुंबई ४०००७१

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस आयुक्त,
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष, चेंबूर, मुंबई ४०००७१

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,चेंबूर, मुंबई ४०००७१

---निर्णय---

तक्रारीचा दिनांक २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे क्र.मुमाआ/२००८/४७४५६/अपिल क्र.५८५२/०२ दि.५.७.२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम १८(१)प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जी माहिती प्राप्त झाली त्यामध्ये सदरची लेखनसामुग्री कक्षाचे बाहेर नाला असल्याने त्यात पावसाचे पाणी आंत शिरुन लेखनसामुग्री पाण्याच्या ओलाव्यामुळे नष्ट झालेली आहे असे उत्तर दिले. मात्र त्यांनी दाखल केलेल्या गुन्हया संदर्भातील माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू तक्रारदार यांनी पोलिस ठाण्यामधून जन माहिती अधिकारी यांचेकडे जो अहवाल आलेला आहे त्या अहवालाची प्रत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार अशंत: मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत तक्रारदार यांचे तक्रारीच्या संदर्भात पोलिस ठाणे यांचेकडून जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्या अहवालाची प्रत विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत यावी.

२ . तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११ **(विलास पाटील)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२३०//अपील क्र.६२९७/२०१०

श्रीमती सकिना तैयबजी ढोलकावाला **अपीलार्थी**
१०४,पुष्पांजली को.हौ.सो.एस.व्ही.रोड,
बावरी समोर, सांताक्रुझ पश्चिम मुंबई ४०००५४

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त, परिमंडळ-९
हिलरोड, बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड, बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, सहाय्यक पोलिस आयुक्त यांचेकडे दि.२४.५.२०१० रोजी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१६.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये ७ दिवसांत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, सांताक्रुझ पोलिस ठाणे यांनी माहिती द्यावी असे आदेश दिलेले आहेत असे दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.२९.१०.२०१० रोजीच्या पत्रानुसार दि.२.११.२०१० रोजी माहिती पोष्टाने पाठविण्यांत आली. तत्पूर्वी अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले होते.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असेही सांगितले की, त्यांनी दि.२४.५.२०१० रोजी जे पत्र दिले होते त्या पत्राच्या संदर्भामध्ये सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्याकडे दि.१७.६.२०१० रोजी पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आले होते. परंतू त्या पत्राच्या संदर्भामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पत्राच्या संदर्भामध्ये अदखलपात्र गुन्हा दाखल केलेला होता व त्याबाबत पुढील कार्यवाही झालेली नाही व याबाबत अपिलार्थीसही कळविण्यांत आलेले होते. अपिलकर्ता यांनी पुढे युक्तीवाद करताना पोलिस कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नाहीत अशा प्रकारची तक्रार आयोगापुढे केली. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध होते परंतू एखाद्या प्रकारणामध्ये गुणवत्तेबाबत कार्यवाही झाली किंवा नाही याबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी करण्याची तरतूद अधिनियमात नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या तक्रारीबाबत आयोगास कोणत्याही प्रकारचा निर्णय देता येणार नाही

मात्र जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये महानगरपालिकेकडे चौकशी करण्यांत आली होती व त्याबाबतचे कागदपत्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्यामुळे जे कागदपत्र अपिलकर्ता यांना उपलब्ध झालेले आहेत त्यावरुन त्यांनी योग्यत्या प्राधिकरणाकडे तक्रार करणे आवश्यक राहिल. माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९८५७//अपील क्र.६२९४/२०१०

श्री.विद्याभुषण मानिक **अपीलार्थी**
२४, बारावे रोड, बेतुरकर पाडा,काला तलाव,
कल्याण पश्चिम जिल्हा ठाणा

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभाग कार्यालय,
७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मुंबई ४००००२

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इवका) **उत्तरवादी**
बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभाग कार्यालय,
७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मुंबई ४००००२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक निरंक
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.३१.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, महानगरपालिका मुख्यालय,मुंबई यांचेकडे दि.१जानेवारी २००८ ते ३१ मार्च २०१० पर्यत अवैध उपक्रमाच्या संदर्भामध्ये एकूण १० मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे कार्यालयीन दिवशी (शनिवार)सोडून दुपारी ३.३० ते ५.०० वाजेपर्यत हे पत्र मिळाल्यापासून ७ दिवसाचे आत माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले असल्याचे दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१०रोजी काही मुद्यामध्ये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.३.५.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२३.६.२०१० रोजी देण्यांत आला असून अर्जदाराच्या मुद्या क्र.५ बाबतच्या माहितीच्या छायांकित प्रतीसाठी लागणा-या शुल्काबाबत अपिलकर्ता यांना सदर आदेश मिळाल्यानंतर दोन दिवसांत शुल्क भरण्याबाबत कळविण्यांत आलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी सुरुवातीला युक्तीवाद करताना असे सांगितले की, अद्यापपर्यत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती मागितली म्हणून

माहिती घेऊन जावे असे कळविले त्याप्रमाणे त्यांना दि.३.५.२०१० रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतू त्यांच्या मुद्या क्र.५ हा मुळातच मोघम असल्यामुळे त्याबाबत त्यांना तसे कळविण्यांत आले होते. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर मात्र मुद्या क्र.५ च्या संदर्भामध्ये त्यांना माहिती द्यावी असा निर्णय दिलेला होता. त्यावर पुन्हा त्या संदर्भात सर्व कागदपत्रांच्या प्रती अपिलकर्ता यांना दि.२.३.२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना त्या संदर्भातील छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत तसे असल्यास अपिलकर्ता यांना महानगरपालिकेने कलम ३५१ प्रमाणे ज्या नोटीस दिलेल्या आहेत त्या संदर्भातील छायांकित प्रती कलम ३५१ व ३५४(अ)अन्वये पाठविण्यांत आलेल्या छायांकित प्रतीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे व त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

२. अपिलकर्ता यांचे अपील अशंत: मंजूर करण्यांत येत असून प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.१ जानेवारी २३००८ ते ३१ जानेवारी २०१० या कालावधीतील महापालिकेकडे मागितलेल्या कलम ३५१ अन्वये व ३५४ (अ)अन्वयग बजावण्यांत आलेल्या १० नोटीसाच्या संदर्भामध्ये प्रती पेज रुपये २/- प्रमाणे भरणा करुन त्याच्या छायांकित प्रती व्यक्तिश: उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. त्याकरिता अपिलकर्ता यांनी व्यक्शि: जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन घ्याव्यात.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९८९०/अपील क्र.६२९५/२०१०

श्रीमती लता विठ्ठल सुकाळे, **अपीलार्थी**
गोरखनाथ पांडे चाळ, ५ वा रोड,
गोळीबार, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०००५५

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,
हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी आचार्य दोंदे मार्ग,
परळ, मुंबई ४०००१२

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकिय अधिकारी **उत्तरवादी**
हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी आचार्य दोंदे मार्ग,
परळ, मुंबई ४०००१२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २३.९.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, हाफकिन प्रशिक्षण संस्था यांचेकडे **लॅब अटेंडंट पद लेखी परिक्षा निकाला संदर्भात कोणत्या निकषांवर ७ उमेदवारांची नियुक्ती करण्यांत आली व कोणत्या निकषांवर त्यांना डावलण्यांत आले या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते.**

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३०.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.६.९.२०१० रोजी देण्यांत आला असून **अपिलकर्ता यांनी विचारलेल्या मुद्यांबाबत अपिलीय अधिकारी यांचेसमोर माहिती देण्यांत आली आणि त्यांना संबंधित कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यांत आले. दिलेल्या माहितीने आणि कागदपत्रांच्या अवलोकनानंतर त्यांचे समाधान झाले, अशा प्रकारचा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येतो**. परंतू त्यामुळेही समाधान झाले नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये त्यांना कोणत्या आधारावर गुण दिलेले आहेत, याबद्दलची

माहिती त्यांना दिलेली नाही. तसेच इतर उमेदवाराच्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. **त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असे सांगितले की, उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती त्यांना मिळू शकतील परंतू इतर उमेदवारांच्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती या त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्यांना उपलब्ध होऊ शकणार नाही**. तसेच तोंडी मुलाखतीमध्ये प्रत्येक उमेवारांस प्रत्येक अधिका-याने कोणते गुण दिलेले आहेत त्याबद्दलची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असली तरी परिक्षेच्या संदर्भामध्ये जर निकष तयार केलेले असतील तर ते निकष वाचून त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतू **अपिलकर्ता यांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे त्यांना गुणपत्रिका देणे योग्य वाटते**.

५. **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (त्र)प्रमाणे माहितीचा अधिकार या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये त्यांचे नियंत्रण असलेले कागदपत्र,दस्तऐवज, अभिलेखे यांचे निरिक्षण करुन त्यांच्या छायाकित प्रती घेणे अशी तरतूद आहे व ' माहिती ' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सुध्दा कागदपत्रांचा समावेश होतो, अशी तरतूद आहे** व त्यामुळे कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेबाबत चौकशी करुन निर्णय देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना निकषाच्या संदर्भात हव्या असलेल्या नियमाच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास हरकत नाही.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून, जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यात पुन्हा परिक्षेच्या सदंर्भातील निकष असतील तर त्या निकषांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००५३/अपील क्र.६२८९/२०१०

श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले, अपीलार्थी
सिध्दीविनायक प्रसाद,डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली पूर्व ४२१ २०१, ता.कल्याण जि.ठाणे

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव(का-६)
सामान्य प्रशासन विभाग मंत्रालयासमोर,मुंबई ३२

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (का-६) उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग मंत्रालयासमोर,मुंबई ३२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक २/२/२०११.
अपीलार्थी अनपुस्थित. अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग कार्यासन -६ यांचेकडे दि.१०.७.२०१० रोजीच्या अर्जान्वये **मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या नियुक्तीच्या धारिकेच्या प्रती व एकूण ३ मुद्यांबाबत माहिती मागितलेली दिसून येते**. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३१.७.२०१० रोजी मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या संदर्भातील नस्तीच्या छायांकित प्रती या कार्यासनाकडे उपलब्ध आहेत मात्र त्यातील कागदपत्रांची संख्या जास्त असल्याने विहित कालावधीत त्यांच्या छायांकित प्रती आपणांस पुरविणे शक्य नाही. मात्र निम्न स्वाक्षरीतास क्र.२२०४९५४३ या दूरध्वनीवर आगाऊ सूचना देऊन भेट दिल्यास आपणांस संबंधित धारिकेतील कागदपत्रांच्या निरिक्षणांची संधी देण्यांत येईल व अशा निरिक्षणाअंती आपणांस आवश्यक असणा-या कागदपत्रांच्या प्रती संख्या कमी असल्यास पुरविण्याचा प्रयतन करण्यांत येईल असे कळविलेले असल्याचे दिसून येते. प्रथम अपिलाची सुनावणी दि.६.९.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेली होती परंतू अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे निर्णय दिलेले नाही. परंतू त्याने समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दि.१०.८.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता हे व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अनुपस्थित होते. **जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, राज्य माहिती आयोगावर नियुक्ती मिळण्यासाठी त्यांच्याकडे शेकडो अर्ज दाखल होतात व त्यामध्ये या सर्व अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे सर्वस्वी अशक्य आहे.** त्याकरिता अपिलकर्ता यांनी सुध्दा निरिक्षण करावे व त्यांना हवी असलेली माहिती त्यांनी उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले होते. परंतू त्यानंतर अपिलकर्ता हे त्यांचे कार्यालयात निरिक्षणासाठी उपस्थित राहिलेले नाहीत. तसेच प्रथम अपिलाच्या

सुनावणीसही ते उपस्थित राहिलेले नाहीत व त्यामुळे त्यांना निरिक्षणाची संधी देऊनही त्यांनी ती माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१.अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.३/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००५९/अपील क्र.६२९३/२०१०

श्री.दत्ताराम कृष्णा पेडामकर **अपीलार्थी**
मरी अम्मा नगर, रुम नं.एम-२२३
नेहरु सेंटर मागे, डॉ.एस.बी.रोड, वरळी,
मुंबई ४०००१८

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी
मुंबई शहर जिल्हा यांचे कार्यालय, जुने जकात घर शहीद भगतसिंग मार्ग,
फोट, मुंबई ४०० ००१

२. जन माहिती अधिकारी तथा **उत्तरवादी**
मुंबई शहर जिल्हा यांचे कार्यालय, जुने जकात घर शहीद भगतसिंग मार्ग,
फोट, मुंबई ४०० ००१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक २/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनपुस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.६.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालयात मरी अम्मा नगर/भैय्यासाहेब आंबेडकर नगर परिसरात ६९९४ रोजी आगीत बेघर झाल्याने अनुदान वाटप करण्यांत आले त्यांच्या प्रती. तसेच किती झोपडीधारकांना अनुदान वाटप करण्यांत आले त्यांची यादी इ. माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दि.१५.७.२००९ रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता उपलब्ध कागदपत्राच्या शुल्काच्या खर्चाबाबत कळविण्यांत आलेले होते. परंतू त्या खर्चाचा भरणा न केल्यामुळे त्यांना दि.२४.७.२०१० रोजी माहिती उपलबध करुन दिलेली होती. तरी सुध्दा त्यांनी दि.९.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या दि.१०.८.२०१० रोजीच्या निर्णय आदेशाने अपिलार्थीस विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. तरी सुध्दा त्यांने समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. परंतू दि.२८.१.२००११ रोजी अपिलकर्ता यांनी दि.२.२.२०११ च्या अपिलाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यांत यावे असे आयोगास लेखी कळविलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१.अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.
२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००४४/अपील क्र.६३१४/२०१०

श्री.प्रकाश गोविंद नवाथे, **अपीलार्थी**
२०४, राजबाग, दलुचंद को.हौ.सो.लि.
२७१, सर भालचंद्र मार्ग, माटूंगा, मुंबई १९

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, इमारत प्रस्ताव शहर ई विभाग महापालिका कार्यालय, ३ रा मजला, शेख हाफीझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ४०००८

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव शहर ई विभाग महापालिका कार्यालय, ३ रा मजला, शेख हाफीझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ४०००८ **उत्तरवादी**

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ८/२/२०११.

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित..

अपिलकर्ता यांनी दि.४.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, इमारत व प्रस्ताव शहर, ई विभाग, भायखळा यांचेकडे राजबागसाठी देण्यांत आलेले दि.१६.९.२००४ चे बी.सी.सी आणि दि.१४.७.२००५ चे २७० चे प्रमाणपत्र. त्या संदर्भामध्ये बेकायदेशीर असताना इमारत प्रस्ताव शहर विभागाने दिलेल्या इमारतीना बी.सी.सी व्हॅलिड आहे किंवा कसे याबाबतची माहिती देण्यांत यावी.

१. अर्जाच्या अनुषंगाने दि.९.८.२०१० रोजी मुंबई महानगरपालिका कायदा कलम २७० 'अ ' अन्वये दिलेले प्रमाणपत्र कायदेशीर आहेत किंवा कसे ही बाब जलअभियंता यांच्या अखत्यारित येत असल्याने अपिल अर्ज योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यांत येत आहे असे कळविलेले असल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे दि.१३.९.२०१० रोजी बी.सी.सी. व्हॅलिड आहे किंवा नाही याबाबत विचारलेली माहिती जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव शहर-२ यांचेकडून उपलब्ध होईल, असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू तत्पूर्वी अपिलकर्ता यांनी दि.१८.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले होते. प्रथम अपिलाचा निर्णय दि.९.८.२०१० रोजी देण्यांत आला असून, कोणत्याही प्रमाणपत्रांची कायदेशीर आहे किंवा कसे याबाबतची माहिती ही संबंधित विभागाच्या अंतर्गत येत नसल्यामुळे जलअभियंता, महानगरपालिका मुख्यालय फोर्ट,मुंबई यांचेकडे संपर्क साधावा असे कळवून सदरचे अपील निकाली काढण्यांत आले. त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलार्थी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, बी.सी.सी. व्हॅलिड आहे किंवा कसे याबाबतची माहिती त्यांनी हवी होती. परंतू अद्यापपर्यत ती माहिती देण्यांत आलेली नाही

व या विभागाकडून त्या विभागाकडे ती हस्तांतरीत करण्यापलिकडे आतापर्यत काहीही पत्रव्यवहार झालेला नाही किंवा प्रथम अपिलामध्ये सुध्दा त्याबाबत कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी त्या संदर्भात पूर्वी माहिती उपलब्ध करुन दिलेले होती असे असले तरी अपिलकर्ता यांचे दि.४.८.२०१० च्या अर्जाप्रमाणे प्रथम अपिलाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कारणमीमांसा देऊन उत्तर व प्रथम अपिलाचा निर्णय देणे आवश्यक होते. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलामध्ये तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. यावरुन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार २००५ च्या तरतूदीबाबत काही माहिती आहे असे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च)(ञ) मध्ये माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे व त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपलब्ध असलेले कागदपत्रे,अभिलेखे,दस्तऐवज,परिपत्रके, संविदा शासन निर्णय इत्यादिंच्या छायाकिंत प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांचे प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेबाबतचे अभिप्राय मागितलेले आहेत. परंतू जन माहिती अधिकारी हयांना माहिती कागदपत्राच्या स्वरुपात जशी आहे तशी उपलब्ध करुन देण्याचा अधिकार आहे परंतू कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्याबाबत अभिप्राय अपेक्षित नसल्यामुळे त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना उत्तर देणे आवश्यक होते. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदीची माहिती करुन घेऊन त्याप्रमाणे प्रथम अपिलाचा निर्णय देणे आवश्यक असते. परंतू या विभागाकडून त्या विभागाकडे कोणत्याही प्रकारची विचारलेल्या माहितीचे आकलन करुन न घेता हस्तांतर करीत राहणे म्हणजे कालापव्यय करणे असा अर्थ होतो.

५. यापुढे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमांच्या तरतूदीप्रमाणे अर्जावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही वर विवेचन केल्याप्रमणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे सदरील अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१.अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००४९/अपील क्र.६३१५/२०१०

श्री.प्रकाश गोविंद नवाथे, **अपीलार्थी**
२०४, राजबाग, दलुचंद को.हौ.सो.लि.
२७१, सर भालचंद्र मार्ग, माटूंगा, मुंबई १९

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता,
मनपा एफ/उत्तर विभाग ९६ भाऊदाजी मार्ग, माटूंगा, मुंबई-१९

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) **उत्तरवादी**
मनपा एफ/उत्तर विभाग ९६ भाऊदाजी मार्ग, माटूंगा, मुंबई-१९

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ४/२/२०११.
अपीलार्थी,अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.२५.६.२०१० व दि.१५.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे ते राजबागच्या ग्राऊंड फ्लोअरवर पंप रुमच्या बाजुला, अंडरग्राऊंड पाण्याच्या टाकीजवळ जीचे मॅनहोल टॉयलेटच्या दारापुढे एक फुट अंतरावर आहे. असा २००३ मध्ये बांधलेला टॉयलेट जा.ता.२९.४.२००२ च्या सॅक्शंड प्लॅनमध्ये नाही आणि ता.१६.९.२००४ च्या कम्प्लिशन प्लॅनध्येही नाही असा आज अस्तित्वात असलेला टॉयलेट कायदेशीर आहे किंवा कसे याची माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.७.७.२०१० रोजी विचारलेली माहिती सहा.अभियंता इमारत व कारखाने,एफ/उत्तर विभागाशी संबंधित असून अपिल अर्जाच्या छायांकित प्रती सदर विभागाकडे पुढील कार्यवाही करिता पाठविण्यांत आलेले आहेत, असेही कळविले असल्याचे दिसून येते व त्यानंतर दि.१०.८.२०१० नुसार विचारलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ च्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे विचारलेली माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले आहे. त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.११.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.३.९.२०१० रोजी देण्यांत आला असून, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इवका)एफ/उत्तर यांनी बांधकामाच्या अनधिकृतपणाबद्दल माहिती गोळा करुन कारवाई करणे उचित ठरले असते. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता इवका,एफ/उत्तर, महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे कार्यवाही करुन कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या प्रती अपिलकर्ता यांना विनामूल्य पुरविण्यांत याव्यात असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळेच अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना, या कार्यालयाकडून एम.आर.टी.पी.खाली कलम ५३ (१)अन्वये नोटीस बजावण्यांत आली असून त्यावर पक्षकाराने न्यायालयातून स्थगिती आणलेली दिसून येते. त्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

५. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये प्रकरणांत निर्णय प्रक्रियेसाठी कारवाई केली नाही म्हणून कारवाई किंवा कार्यवाही करुन अधिका-याने करुन माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. माहिती ही उपलब्ध कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध होते. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेबाबत संबंधित अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे सक्षम अधिकरी यांचेकडे तक्रार करुन योग्यतो न्याय मिळवून घेत येतो. सदरच्या प्रकरणी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ . अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००३८/अपील क्र.६३१६/२०१०

श्री.मो.हसीम शेख **अपीलार्थी**
६६, शौकत मंझिल, ३३ रोड,
खार पश्चिम,मुंबई ४०० ०५२

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, प.ऊ-१
एमसीसीएप, एच आणि के वॉर्ड, आर.के.पाटकार मार्ग,
वांद्रा पश्चिम, मुंबई ४०००५०

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता **उत्तरवादी**
एमसीसीएप, एच आणि के वॉर्ड, आर.के.पाटकार मार्ग,
वांद्रा पश्चिम, मुंबई ४०००५०

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ४/२/२०११.
अपीलार्थी, व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.२२.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकड **Demarcation** of the plot bearing CTS no.F/1508 1510 **TPS-३ village Bandra, s.v.road Khar west** व इतर Tikka sheets ३० ते ७५ च्या संदर्भामध्ये निरिक्षण घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे मागितलेली दिसून येते. परंतू माहिती अधिकारी यांनी दि.१७.५.२०१० रोजी **survey deptt. च्या CE** 2458 WS/AH & CE 2468/WS/AH च्या नस्ती निरिक्षण करुन माहिती चा भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२४.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.१७.६.२०१० रोजी देण्यांत आला असून, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे. तसेच सर्व्हे डिपार्टमेंटकडे निरिक्षणाकरिता दि.१५.६.२०१० रोजी ३.०० वाजता उपस्थित राहून कागदपत्र उपलब्ध करुन घ्यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतू त्यामुळेही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.३०.७.२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे एक पत्र दिलेले असल्याचे दिसून येते व त्यांनी काय माहिती मागितलेली आहे याबद्दल त्यामध्ये विश्लेषण केलेले आहे. तसेच आदेशाप्रमाणे निरिक्षणाकरिता उपस्थित झाल्यानंतर त्यांना टिक्का शिट नं. ३० ते ६० च्या कापडी शिट्स उपलब्ध करुन दिल्या. सदरच्या शिट्स हया खराब झालेल्या व फाटलेल्या आहेत अशा प्रकारच्या तक्रारी त्यांनी केलेल्या आहेत. परंतू ज्या स्वरुपात जशी माहिती उपलब्ध आहे तशीच्या तशी ती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना सांगण्यांत आले. अपिलार्थी यांनी

अशीही तक्रार केली की, कार्यालयात अभिलेख्याचे व रेकॉर्डचे योग्यरितीने जतन केलेले नाही व त्याप्रमाणे आदेश द्यावेत अशी विनंतीही त्यांनी केलेली होती. परंतू त्याने समाधान न झाल्याने अपिलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये स्पष्टपणे महानगरपालिकेच्या AEBP(S)H&K ward यांनी प्रत्यक्ष डिमार्कटेड आराखडयामध्ये संदर्भाधीन पत्र क्र. AE/43-D/WS/Sur/H&K dt.12.11.2007, AB/32-D/WS/Sur/H&K dt. 16 oct.2009 प्रमाणे निरिक्षण द्यावे व संबंधित कागदपत्रे तसेच टिक्का शिट्स ३०-७५ पर्यत उपलब्ध करुन द्यावेत व त्यांच्या छायांकित प्रतीची माहिती मागितलेली दिली नाही. सदरची माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. परंतू उत्तर देताना त्यांनी ज्या नस्ती मागितलेल्या नाहीत त्या नस्तीचे निरिक्षण घ्यावे असे कळविलेले असलयाचे दिसून येते व टिक्का शिट्स ज्या कापडावर असून त्या अतिशय जिर्ण व कोणत्याही प्रकारे त्याचा संदर्भात लागत नाही अशा परिस्थितीत ठेवण्यांत आलेल्या आहेत. त्यांनी निरिक्षण घेताना त्यांना ३०-६० पर्यत नोंदी घेतलेल्या आहेत. परंतू ६० ते ७५ या सर्व टिक्का शिट्स त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, टिक्का शिट्स हया ज्या स्वरुपात उपलब्ध आहेत त्याच स्वरुपामध्ये त्यांना उपलब्ध करुन देण्यांत येतील त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नविन टिक्का शिट्स तयार करण्यांत आलेल्या नाहीत. तसेच हया कार्यपध्दतीप्रमाणे संपूर्ण नस्ती जशी उपलब्ध आहे त्याचप्रमाणे त्यांना ती उपलब्ध करुन देण्यांत येतील. त्यामुळे नविन टिक्का शिट्स बाबतची माहिती उपलब्ध करुन देणे हे सर्वस्वी अशक्य आहे. ज्या पध्दतीने रेकॉर्ड जतन केलेले आहे त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतील व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

२. अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यांत येत असून, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कामकाजाच्या दिवशी व वेळ देऊन त्यांना हव्या असणा-या ६१ ते ७५ हया टिक्का शिट्सच्या छायांकित प्रती विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००३५/अपील क्र.६३१७/२०१०

श्री.ए.एस.पाटील **अपीलार्थी**
१०१, विशाल अपार्टमेंट, माणिकलाल मेहता रोड,
टेलिफोन एक्स्चेंज समोर, घाटकोपर पश्चिम मुंबई ४०००८६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मनपा मार्ग,
पत्र पेटी क्र.१९६७ मुंबई ४०००१

२. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक **उत्तरवादी**
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मनपा मार्ग,
पत्र पेटी क्र.१९६७ मुंबई ४०००१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ८/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी, तंत्र शिक्षण संचालनालयाकडे मागितलेली माहिती प्राप्त झालेली असल्याने सदर अपिलाची **सुनावणी रद्द करण्याबाबत** राज्य माहिती आयोगाकडे दि.५.२.२०११ रोजी विनंती केलेली आहे.

मुंबई
दि.८/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५९/अपील क्र.६३१८/२०१०

श्री.विजय राठोड **अपीलार्थी**
रुम नं.३६-३७ शासकिय महा.मुलांचे वसतीगृह
सी रोड, चर्चगेट मुंबई ४०००२०

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव
सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई ३२

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी **उत्तरवादी**
सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई ३२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ८/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

१. अपिलकर्ता यांनी दि.१३.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडे प्रतिभा शिक्षण संस्था,अकोला व्दारा संचलित बंद वसंतराव नाईक विजाभज आश्रमशाळा, लालखेड, ता.चांदूर रेल्वे, जि. अमरावती ही बंद शाळा अष्टविनायक शिक्षण प्रसारक मंडळ, अहेरी यांना हस्तांतरीत केल्याचे आदेशाची प्रत संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे का, त्याचा ई-नंबर व दिनांक, तसेच शासन स्तरावरुन बंद संस्था इतर संस्थेस हस्तांतरण व स्थलांतरण करण्याबाबत सूचना/मागणी प्रसार माध्यमातून वर्तमानपत्रातून प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्राचे नांव व दिनांकाची माहिती. तसेच सदर प्रस्ताव हस्तांतरीत व स्थलांतरीत करुन मंजूर केलेल्या संस्थेचे समाजकल्याण अधिकारी व विभागीय समाज कल्याण अधिकारी व संचालक वि.जा.भ.ज. पुणे यांचेमार्फत सदर प्रस्ताव मंजूर व हस्तांतरीत संस्थेचे प्रस्ताव शिफारस केलेल्या व शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची दिनांकासह आवक क्रमांकासह पुर्ण प्रस्तावाच्या छायांकित प्रती. मा.सचिव यांनी बंद शाळा हस्तांतरीत व स्थलांतरीत व मंजूर संस्ीस दिलेल्या प्रस्तावात केलेल्या टिप्पणीची प्रत इ. माहिती ३० दिवसांत मिळावी. सदर माहिती टपालाव्दारे घेणार असे नमूद केले.

२. अर्जाच्या अनुषंगाने दि.४.९.२०१० रोजी माहितीचा खर्च रु.४/- अधिक रजिस्टर पोस्टाचा टपाल खर्च रु.३५/- असे एकूण रु.३९ इतकी रक्कम चलनाने शासकिय कोषगारात भरण्यांत यावी. चलनाची प्रत सादर केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यांत येईल, असे कळविण्यांत आल्याचे दिसून येते. अपिलकर्ता यांनी दि. १४.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले, प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दि.११.१०.२०१० रोजी सर्व माहिती देण्याचे आदेशित केले. परंतू प्रत्यक्ष माहिती दोन दिवसांत उपलब्ध करुन देण्यांत येईल असे सहाय्यकानी सांगितले आहे. करिता त्यांना दि.१८.१०.२०१० रोजी कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र लिहून त्यात

अपिलार्थीनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीसाठी प्रति पेज रु.२/- प्रमाणे ७३ पृष्ठासाठी रु.१४६/- इतकी रक्कम चलनाने शासकिय कोषागारात भरण्यांत यावी,असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. त्याने समाधान झाल्यामुळे अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

३. सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. **प्रथम अपिलाच्या आदेशामध्ये अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले असले तरी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही** असे अपिलार्थी यांनी नमूद केलेले दिसून येते व सोबत संपूर्ण पत्रव्यवहार दाखल केलेला आहे

४. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम **अपिलीय अधिकारी हे आयोगापुढे सुनावणी अनुपस्थित होते. आयोगाने दि.७.१.२०११ रोजी सुनावणीची नोटीस काढलेली आहे ती मंत्रालयातील सामाजिक न्याय विभागास मिळालेली असेल असे गृहीत धरणे आवश्यक आहे** व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगाच्या पुढे सुनावणीस हजर न राहिल्यामुळे आयोगाचा अवमान केलेला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत, कागदपत्र आयोगापुढे दाखल केलेले नाहीत. अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, **जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी सुरुवातीस माहितीचा खर्च रु-४/- प्रमाणे भरावा असे कळविले आहे व त्यानंतर प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या आदेशानंतर रु.२/-प्रमाणे ७३ पृष्ठांचे रु.१४६/- खर्च भरावा असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपिलार्थी यांना सुरुवातीला माहिती उपलब्ध असून सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली दिसून येते** व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत आहेत. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला आहे किंवा नाही याबाबतची कोणतेही कागदपत्र आयोगापुढे सादर केलेली नाहीत व ते राज्य माहिती आयोगासाठी ही गंभीर आहे असे दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास हरकत नाही.

आदेश

१. **अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात, तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी हे शास्तीस पात्र राहील याची नोंद घ्यावी.**

२. **तत्कालीन जन माहितीअधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना योग्य रित्या माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये शास्ती का लादण्यांत येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत करावा अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यांत येईल व त्यांचे दरमहाच्या वेतनातून वसुल करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव,सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

४ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०११४/अपील क्र.६३३८/२०१०

श्रीमती वीणा सीप्पी, **अपीलार्थी**
ब्लॉक ५४, प्लॅट ३१, ३ रा मजला,
श्याम निवास, वॉर्डन रोड,मुंबई ४०००२६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुंबई १, शहर
मल्होत्रा हाऊस ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुबई ४००००१

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक **उत्तरवादी**
सहकारी संस्था, डी. विभाग, मुंबई.

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ९/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

१. अपिलकर्ता यांनी दि.३०.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था, डी. वॉर्ड यांचेकडे मे २००८ ते अर्जाच्या तारखेपर्यतच्या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

1.Description of the information required certified true copies of all notices issued under section 101 where the notices have not been signed by you but by somebody else.
2. in respect of which of these notice have orders been issued 2 i.e.recovers certificate.
3. The respective amounts of the recovery certificate alongwith the name of the members and their addresse be furnished to me.
4. whether information is required by past or in person information is required in person

सदरची माहिती पोष्टाने किंवा स्वत: घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.१८.८.२०१० रोजी विचारणा केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते. आपणांस निश्चित कोणत्या संस्थेविषयी माहिती हवी आहे ते दिसून येत नाही तसेच विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने माहितीच्या अधिकारात ती देता येत नाही व मुद्या क्र.३ च्या संदर्भात सुध्दा विचारणा केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येत नाही. आपणांस कोणत्या संस्थेविषयी माहिती हवी आहे ते नमूद नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२३.३.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये दि.१३.९.२०१० रोजी देण्यांत आला असून अपिल अंशत: मंजूर करण्यांत आले असून माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई यांनी अर्जदार याचे दिनांक ३०.७.२०१० चे अर्जातील मुद्या क्र.१ व २,३ ची माहिती उपरोक्त उल्लेखित केल्याप्रमाणे विहित शुल्क आकारुन देण्यांत यावी. प्रथम

अपिलाच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.८.२०१० रोजी जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करणारेच आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारांनी अर्जामध्ये मोघम स्वरुपाची माहिती मागितली असल्याचे दिसून येते असे म्हटलेले आहे. परंतू मुद्या क्र.१ च्या संदर्भामध्ये त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये निश्चित अशी मे २००८ हा कालावधी दिलेला आहे व त्या कालावधीपासून पुढे ज्या कलम १०१ खाली नोटीसेस जारी केलेल्या आहेत त्या सर्व नोटीशीच्या प्रमाणित प्रतीची उपनिबंधक यांनी सांक्षाकित केलेल्या आहे व इतर कर्मचा-यांनी सहया केलेल्या आहेत त्यांच्या प्रमाणित प्रती विचारलेल्या आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची मोघम स्वरुपाची माहिती आहे असे म्हणता येणार नाही. त्यात त्यांनी कोणत्याही प्रकारचे प्रश्न विचारुन जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले नाहीत. मुद्या क्र.१ मध्ये मागितलेल्या नोटीसेसच्या संदर्भामध्ये रिक्वरी सेलचे आदेश निर्गमित केलेले आहेत त्याची प्रत मागितलेली आहे. तसेच रिक्वरी सर्टिफिकेटप्रमाणे प्रत्येकाची किती रक्क्म आहे त्यांची नावे व पत्ते त्यांनी विचारलेले आहेत. याममध्ये कोणतीही मोघम माहिती मागितलेली आहे असे म्हणता येत नाही. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन द्यावी असे त्यांच्या अपील अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई १ शहर यांनी निर्णय दिलेला असल्यामुळे सदरची माहिती मोघत मागितलेली नव्हती हे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांनी मोघम विचारलेली माहिती ही प्रथम अपिलीय अधिकारी यांना मोघम वाटली नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही निश्चित स्वरुपाची असून ती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व तशी ती उपलब्ध करुन न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कलम ७ (१)प्रमाणे ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनिमयांच्या कलम २० प्रमाणे त्यांचे विरुध्द शास्ती कां लादण्यांत येऊ नये अशी विनंती केली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती विशिष्ट कोणतयाी संस्थेची अशी माहिती मागितलेली नाही. तसेच त्यांची वसुली काढलेली असल्यामुळे त्यांनी तशा प्रकारची माहिती मागितलेली आहे. त्यामुळे त्यात कोणतेही व्यापक जन हित नाही. सन २००८ मे पासून जर सर्व नोटीसेस काढून त्यांच्या छायांकित प्रती द्यावयाच्या झाल्या तरी सुध्दा त्या अतिशय व्यापक प्रमाणात नोटीसेस असतात. त्यामुळे ती मोघम आहे असे म्हटलेले आहे. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मोघम आहे असा मुद्या किंवा प्रश्नार्थक माहिती मागितलेली आहे असे विचारात न घेता माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलाचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन ती माहिती मोघम आणि प्रश्नार्थक नाही असेही पुन्हा सिध्द होते. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले आहे की, त्यांनी दि.१६.११.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे व प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये कलम १०१ च्या प्रकरणांची तपासणी घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे जे म्हटलेले आहे त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी तपासणी करुन घेतलेली नाही व त्यामळे ही माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. तपासणीकरिता अपिलार्थी या सुध्दा हया हजर झालेल्या नाहीत परंतू त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तपासणीकरिता यावे, असे लेखी कळविलेले नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे माहिती उपलब्ध असेल तर ती ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. जन माहिती अधिकारी यांनी विशिष्ट नोटीसेसबद्दलची तपासणी करुन त्या अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक झाले असते. परंतू तसे न करता तपासणी करुन घ्यावी व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे पुन्हा प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये आदेश दिलेले आहेत ते सुध्दा योग्य आहेत असे दिसून येते नाही. कारण प्रत्येक प्रकरणामध्ये कलम १०१ प्रमाणे ज्या नोटीसेस दिलेल्या आहेत त्या प्रत्येक प्रकरणांची तपासणी ही अपिलकर्ता यांना करावी लागेल त्यापेक्षा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातून त्या प्रकारच्या नोटीसेसची तपासणी करुन त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे जास्त सोयीचे आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत आहेत व त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द अधिनियमांच्या कलम २० (१) व २०(२)अन्वये शास्ती लादणे हे आवश्यक आहे असे म्हटलेले आहे. परंतू शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१)च्या परंतूकाप्रमाणे उपस्थित जन माहिती अधिकारी यांना शास्ती बाबत खुलासा विचारला असे आयोगापुढे असे सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही मोघम आहे ती विशिष्ट संस्थेच्या संदर्भामध्ये माहिती मागणे आवश्यक होते तशी ती मागितली असती तर ती काढून देता आली असती. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे समाधानकारक नसल्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. **अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मे २००८ पासून अर्जाच्या तारखेपर्यतच्या कालावधीतील त्यांनी सही केलेल्या कलम १०१ च्या नोटीशीच्या छायांकित प्रत व इतर दोन मुद्यांबाबत मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.**

२. **जन माहितीअधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचे दि.३०.७.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमांच्या कलम २०(१)रुपये ५०००/- इतक्या रक्कमेची शास्ती लादण्यांत येत आहे.सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसूल करण्यांत यावी व पुढील लेखाशिर्षाखाली जमा करण्यांत यावी.**

" लेखाशिर्ष क्र.००७- इतर प्रशासनिक सेवा
६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)
माहितीचा अधिकार (००७००१६-१) "

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

४ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.९/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०७८८/अपील क्र.६३४०/२०१०

श्री.शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष **अपीलार्थी**
समाजवादी पार्टी, हिंगोली,
नविन पाण्याच्या टाकीजवळ, पलटण,
ता.जि.हिंगोली.

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ३२

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी **उत्तरवादी**
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ३२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २०.११.२०१०
सुनावणीचा दिनांक ९/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

१. अपिलकर्ता यांनी दि.९.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, नगर विकास विभाग, यांचेकडे नगरपरिषद, हिंगोली व्दारा नगर विकास आराखडयामध्ये एन.टी.सी.च्या मालकीची खाजगी जागा ज्याचा आरक्षण क्र.८६ असून सर्व्हे क्र.१४३ व १५४ मधील ३.८० हे.आर. जमिन म्हाडासाठी आरक्षित करण्यांत आली होती. ते आरक्षण महाराष्ट्र शासनातर्फे उठविण्यांत आलेले आहे त्याची प्रत देण्यांत ावी तसेच या आरक्षण उठविण्याकरिता नगर परिषद हिंगोलीने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रांची व घेतलेल्या ठरावाची तसेच वरील सबंधी सर्व टिप्पण्यांची व कागदपत्राच्या सत्यप्रती इ. माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे घेणार असे नमूद केलेले आहे.

२. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१५.१०.२०१०रोजी व दि.२१.१०.२०१० रोजी देण्यांत आला असून, अपिलकर्ता उपस्थित राहिले नाहीत म्हणून मात्र अर्जदाराने पैस न भरल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच कार्यासनातून नोंदणी शाखेत सदरचे पत्र दि.१९.९.२०१० रोजी निर्गमित करण्यासाठी केले व नोंदणी शाखेतून सदरचे पत्र मात्र दि.३०.९.२०१० रोजी निर्गमित करण्यांत आले. त्यामुळे दि.९.९.२०१० व दि.३०.९.२०१० रोजी हा विलंब नोंदणी शाखेत झालेला आहे. विलंबाबाबत संबंधितांवर कार्यवाही होणे आवयक आहे व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करावा तसेच सदरचे पत्र नोंदणी शाखेतून विलंबाने निर्गति झालेले आहे याबाबत नोंदणी शाखेतील संबंधित लिपिकाविरुध्द नियमानुसार कार्यवाही सुरु करण्यांत यावी असे आदेश दिलेले

दिसून येतात. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकता र्यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, आरक्षण नोंदविण्याच्या संदर्भामध्ये जी कार्यवाही झालेली असेल त्या कार्यवाहीची माहिती त्यांना उपलब्ध होणे आवश्यक होते. जन माहिती अधिकीर यांनी दि.९.९.२०१० रोजी पाठविलेले पत्र दि.६.१०.२०१० रोजी उपलब्ध झालेले आहे परंतू ते विहित कालावधीतच्या मुदतीनंतर उपलब्ध झालेले आहे व माहिती मात्र त्यांना मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपिलाचा निर्णय हा विहित मुदतीत दिलेला आहे त्यामुळे नोंदणी शाखेत अपिलार्थीस विलंबाने पत्र निर्गमित केल्यामुळे या कार्यालयातील नोंदणी लिपिका विरुध्द कार्यवाही करण्यांत आलेली आहे. परंतू त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र आयोगापुढे दाखल केलेले नाहीत व त्यामुळे संबंधित लिपिकामुळे ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात विलंब झालेला असल्यामुळे त्यांना अधिनियमाच्या कलम ५ (४) व (५)प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यांत येते व ते अधिनियमाच्या कलम २०(२)अन्वये शास्तीस पात्र आहेत.

३. जन माहिती अधिकारी यांनी पुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, हिंगोली शाळेच्या विकास योजनेमध्ये स.न..१४३ (भाग) प १४४(भाग)मधील एकूण ३.८० हे. खाजगी जमिनीवर म्हाडाचे आरक्षण आहे. सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण या नातयाने म्हाडाने ठराव पारित करुन आरक्षणाखलील जमिनीपैकी ३०टक्के् विना बोजा/विना अतिक्रमण जमीन विनामूलय महाडास हस्तांतरीत करण्याच्या अटीवर उव्ररित ७० टक्के जमिनीवरील आरक्षण वगळण्यास मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे म्ळाडाने दि.२६.४.२००७ च्या पत्रान्वये आरक्षण वगळण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. परंतू हिंगोली नगरपरिषद 'ब' वर्ग नगरपरिषद असल्याने आणि 'ब'व'क 'नगरपरिषदेबाबत समुचित प्राधिकरणाने आरक्षण वगळण्याबाबत विनंती केल्यास त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार संचालक, नगर रचना महाराष्अ्र राज्य,पुणे यांना असल्याने म्हाडाचा सदरचा दि.२६.४.२००७ चा प्रस्ताव शासन नत्र दि.९.७.२००७ अन्वये संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडे पाठविण्यांत आला आहे. त्यावर पुढील कार्यवाही त्याचेमार्फत सुरु आहे. अद्यापपावेतो सदरचे म्हाडाचे आरक्षण वगळण्यांत आलेले नाही व त्यामुळेच मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यासनात मूळ संचिका उपलब्ध नसल्याने संचालक,नगर रचना महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागवून पुर्नबांधणी करण्यांत आलेल्या दुय्यम संचिकेतील संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना म्हाडाच्याआरक्षणाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत कळविणारे शासन पत्र दि.९.७.२००७ ची प्रत देण्यास उपलब्ध असल्याबाबत अपिलकर्ते यांना विहित कालावधीत दि.९.९.२०१० रोजी कळविण्यांत आले. असे असले तरी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या नस्तीतील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील पुर्नबांधणी करण्यांत आलेल्या दुय्यम संचिकेतील म्हाडाच्या आरक्षणा संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या छायाकिंत प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

२. अपिलकर्ता यांना जन माती अधिकारी यांनी निर्गमित केलेले पत्र ३० दिवसाचे आत उपलब्ध होण्याच्या विलंबास जबाबदार असलेले नोंदणी लिपिक हे अधिनियमाच्या कलम ५(४) (५)प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमांच्या कलम २० (२)अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यांत येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही नगर विकास विभागातील सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

४ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.९/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०७८९/अपील क्र.६३३९/२०१०

श्री.शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष **अपीलार्थी**
समाजवादी पार्टी, हिंगोली,
नविन पाण्याच्या टाकीजवळ, पलटण,
ता.जि.हिंगोली.

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी **उत्तरवादी**
अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २०.११.२०१०
सुनावणीचा दिनांक ९/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अपिलीय अधिकारी उपस्थित.

१. अपिलकर्ता यांना दि.९.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी अल्पसंख्याक, विकास विभाग यांच्याकडे क्र.वक्फ-१०/प्र. क्र.३६/भाग-१/कार्य-१० दि.२६.७.२०१० रोजीच्या पत्राव्दारे कळविले होते की, वरील प्रकरणात चौकशी सुरु असून त्याबाबत यथावकाश माहिती कळविण्यांत येईल. त्या केलेल्या चौकशीची व कार्यवाहीची व या संबंधीच्या टिप्पण्यांची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाहीत म्हणून दि.११.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दि.४.१०.२०१० रोजी सदर अपिलीय अधिकारी, अल्पसंख्याक विभाग, यांनी सुनावणी घेतली व प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१२.११.२०१० रोजी देण्यांत आला असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि.१८.१०.२०१० रोजी दिलेली माहिती तपासण्यांत आली त्या अनुषंगाने नमूद करण्यांत येते की, सदर प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. तथापि अद्याप निर्णय झालेला नाही व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांत आलेले असल्याचे दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलार्थी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी तक्रार अर्ज देऊन एक वर्ष झालेले आहे व त्या संदर्भात अद्यापपर्यत निर्णय दिलेला नाही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा सांगितले की, याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही त्यामुळे कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतू अपिलकर्ता यांनी त्या संदर्भात टिप्पणी उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केलेली आहे परंतू अपिलकर्ता यांची तक्रार व त्यावरील टिप्पणी व इतर कागदपत्र तसेच अहवाल अंतिम निर्णय उपलब्ध झाल्याशिवाय देता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले त्यामुळे सदरचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यांत येत असून हया प्रकरणी अंतिम निर्णय झाल्यानंतर त्या निर्णयाच्या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.९/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५०/अपील क्र.६२०३/२०१०

श्री.विलासराव देशमुख **अपीलार्थी**
खो. क्र.ए/१, गुरुकृपा चाळ,
हनुमान टेकडी, काजूपाडा, बोरीवली, पूर्व, मुंबई ६६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रबंधक
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, दुसरा मजला,
जुने सचिवालय,विस्तार गृह, महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुबंई ३२

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक **उत्तरवादी**
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, दुसरा मजला,
जुने सचिवालय,विस्तार गृह, महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुबंई ३२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १०/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.८.२०१० रोजी जन माहिती अधिकार तथा उपप्रबंधक महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे श्रीमती सरस्वती गजानन भावरचे वारसदार व श्री. गजानन शंकर भवर, राहणार सायन, मुंबई या अर्जदाराने आपल्या कार्यालयात (एमआरटी) अर्ज क्र.टीएनसी/१०३४/बी/२००३ दाखल केला होता त्याीच सुनावणी होऊन दि.७.७.२००४ रोजी न्यायाधिकरणाने आदेश देऊन 'जैसे थे ' स्थिती राखण्यास प्रतिवादी मे. विकेयलाल इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि.मुंबई व तहसिलदार ए.एल.टी.बोरीवली, यांना आदेशित केले होते. त्यानंतर वेळोवेळी या प्रकरणी सुनावणी होऊन (एमआरटी)न्यायाधिकरणाने उचित आदेशाची प्रत मागितल्याचे दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१५.९.२०१० रोजी आपणांस कळविण्यांत येते की, आपण संदर्भाधीन मागितलेली माहिती कार्यालयीन वेळेत माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून समक्ष येऊन घेऊन जावे असे कळविलेले असल्याचे दिसून येते. अपिलकर्ता यांनी दि.२०.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्या संदर्भामध्ये दि.१५.१०.२०१० रोजी या कार्यालयात दाखल असलेली केस क्र.टीएनसी/१०३४/बी/२००३ मध्ये एमआरटी न्यायाधिकरणाने अद्याप कोणताही आदेश पारित केलेला नाही. सदरची केस कोर्टात अद्याप चालू आहे अशा प्रकारे कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, एमआरटी न्यायाधिकरणाने उचित आदेश काढले आहेत असे त्यांना समजले व त्यामुळे त्यांनी सदरची माहिती मागितली परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यात स्थगिती दिलेली होती व ही बाब अपिलकर्ता यांना सुध्दा माहिती आहे व त्यांना अंतिम स्थगिती आदेशाची प्रत सुध्दा मिळालेली आहे. परंतू अद्यापपर्यत न्यायाधिकरणाने अंतिम निर्णय दिलेला नाही त्यामुळे त्याची प्रत उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यानी सांगितले. परंतू ज्यावेळी या प्रकरणी अंतिम निर्णय होईल त्यावेळी त्यांची प्रत त्यांना देण्यांत येईल. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

आदेश

५. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.१०/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५४/अपील क्र.६२०७/२०१०

श्री.चेतन कोठारी **अपीलार्थी**
५२ ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाबली पटेल लेन ऑफ बी.देसाई रोड,
मुंबई ४०००२६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त (मुख्यालय)
अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य,
३४१,वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स, वांद्रे पूर्व मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त औषधी विभाग **उत्तरवादी**
अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य,
३४१,वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स, वांद्रे पूर्व मुंबई ५१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २३.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १०/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी. अपिलीय अधिकारी उपस्थित

१. अपिलकर्ता यांनी दि.९.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, आयुक्त, अन्न व औषधी प्रशासन यांचे कार्यालयामध्ये गेल्या १० वर्षामध्ये किती नोटीसेस इश्यूड केल्या. तसेच संपूर्ण किती व कोणत्या कंपन्यांकरिता नोटीसेस इश्यूड केल्या व किती कंपन्यावर शास्ती लागली, गेल्या १० वर्षात किती केसेस झालेल्या आहेत अशी माहिती मागितलेली दिसून येते.

२. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.७.९.२०१० रोजी विषयांति प्रकरणी त्यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल म्हणजे माहिती विस्तृत स्वरुपाची आहे त्यामुळे कार्यालयातील मनुष्यबळ विचार करता कार्यालयाने या माहितीची मागणी प्रमाणाबाहेर व वेळ खर्च होणार आहे त्यामुळे त्यांचा कार्यालयीन कामकाजावर परिणाम होणार असल्याचे कळवून सोबत कार्यासन क्र.२०,१०,११,१२ च्या पत्राच्या प्रती जोडण्यांत आलेल्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम ७(१) व ७(९)चा संदर्भ देऊन माहिती विहित मुदतीत पुरविणे अशक्य असल्याचे कळवून आवश्यक असल्यास माहितीची तपासणी करुन आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविण्यांत येईल असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.१३.१०.२०१० रोजी ज्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यांत आले असून अपिल मान्य केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्या माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती पूर्ण मिळालेली नाही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अतिशय मोघम स्वरुपाची व संपूर्ण राज्यातील कार्यालयातील माहिती आहे व गेल्या १० वर्षातील माहिती आहे. सदरील माहिती ही मुंबई कार्यालयातील जन

माहिती अधिकारी यांनाउपलब्ध करुन देणे अशक्य आहे. संपूर्ण राज्यामध्ये प्रत्येक कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. तरी त्यांच्या कडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक झाले असते. तरी सुध्दा केल्या १० वर्षातील माहिती या कार्यालयाकडे संकलित केलेली नाही व ती उपलब्ध करुन देणे सर्वस्वी अशक्य आहे. तसेच मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देण्याकरिता कार्यालयाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होईल. त्यामुळे सदाची माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य होणार नाही व त्यामूळे प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये दिलेला निर्णय हा बरोबर असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

६. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.१०/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००५१/अपील क्र.६२८८/२०१०

श्री.शेख अब्दुल नईम अब्दुल करीम,
यु.टी.क्र.८९९, सर्कल क्र.२/४,
मुंबई मध्यवर्ती कारागृह, ऑर्थर रोड, मुंबई ४०० ०११. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (प्रतिबंधक)
शिवाजी मंडई, पोलीस आयुक्तांचे कार्यालय,
मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे)
पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०२-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्याकडे पोलीस उपआयुक्त (प्रतिबंधक) व त्यांचे स्वीय सहाय्यक स्टेनोग्राफर यांनी दिनांक १८-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात येण्याची व कार्यालयात जाण्याची त्याची नोंद माहिती मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १७-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती संबंधित कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १५-०९-२०१० रोजी देण्यात आला असून प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिलेली माहिती अपिलीय अधिकारी यांना दाखविण्यात आली त्यांनी ती बरोबर असल्याची खात्री केली व पुन्हा सुनावणीच्या वेळी दाखविण्यात आलेली माहिती तत्काळ अपिलार्थीस पुरविण्याबाबत अधिकाऱ्यांना सुचित करण्यात आले. तसेच अपिलार्थीना माहिती पाठविल्याबाबतचा पूर्तता अहवाल कार्यालयास देण्यात सांगितले. त्यामुळे अपिल निकाली काढण्यात आलेले आहे व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दिनांक १६-०९-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व खुलाशावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरचे अपलि हे निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

१) अपिल निकाली काढण्यात येते.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./५००५०/अपील क्र.६२८७/२०१०

श्री. सुदेश सुधाकर सुळे,
१५/अ मुलुंड मृग अर्चना कॉ.हौ.सो.
एस.एन.रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२)
पूर्व उपनगरे, मुंबई कक्ष क्र. २०१, २ रा मजला,
कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२)
पूर्व उपनगरे, मुंबई कक्ष क्र. २०१, २ रा मजला,
कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०४-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०१-०६-२०१० रोजी मुलुंड मृग अर्चना कॉ.हौ.सो.च्या संदर्भामध्ये उपनिबंधक /टी. श्री. तांबे यांनी बेकायदेशीर रक्कमा थकित रक्कम कोणत्या कोणत्या महिन्यांची व वर्षांची हे आदेशात भ्रष्टतापूर्वक नमूद केले नाही त्या संदर्भामध्ये एकूण ५२ मुद्दे उपस्थित करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक २१-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी एकूण ५२ मुद्यावर मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १७-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०९-०९-२०१० रोजी देण्यात आला असून विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले आहे. त्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली हे आयोगाच्या निदर्शनास आणले. तसेच अपिलकर्ता हे उपनिबंधक यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे जे अपिल आहे त्यामध्ये ते पक्षकार आहेत असे सांगितले व त्या अपिलातील मुद्यासंदर्भातच त्यांनी विश्लेषणात्मक परंतु प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांचे मत मागण्याच्या दृष्टिने माहिती अधिकारात मुद्दे उपस्थित केलेले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(च)** प्रमाणे **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्याप्रमाणे कागदपत्रे किंवा अभिलेखांच्या

साहित्याच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्यांचा समावेश होतो. **कलम २ (ञ)** अन्वंये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, कागदपत्रे यांची पाहणी करुन छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद केलेली आहे. या दोन्ही व्याख्यांमध्ये जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्राधिकरणातील निर्णय प्रक्रीयेतील गुणवत्तेच्या संदर्भातील अभिप्राय किंवा मत व्यक्त करावे अशी तरतूद नाही व त्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलकर्ता प्रथम अपिलाच्या सुनावणीस हजर झालेले नाही असेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

वरील युक्तीवादावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यात कोणतेही सार्वजनिक व्यापक हित नाही व त्यामुळे अशा प्रकारणाचे मुद्दे उपस्थित करुन माहिती मागणे व अपिल करणे व सुनावणीस उपस्थित न राहून अपिलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

१) अपिल निकाली काढण्यात येते.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००६०/अपील क्र.६२८४/२०१०

श्रीमती शबनम अमीन मुलाणी,
एफ/२२, बांद्रा पोलीस वसाहत
दुसरा माळा, आर. के.पाटकर मार्ग,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-९, हिलरोड,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पश्चिम प्रादेशिक विभाग, बांद्रा (पश्चिम),
पश्चिम नियंत्रण कक्ष, कॉटर रोड,मुंबई. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त यांच्याकडे एकूण १५ मुद्दावर माहिती मागितलेली दिसून येते. माहितीच्या मुद्दामध्ये विनापरावानगी कर्तव्यावर गैरहजर होते या संदर्भातील त्यांच्या विरुद्ध केलेल्या कारवाईच्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२-०६-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १३-१०-२०१० रोजी देण्यात आल असून **मुद्दा क्रमांक ५ व १०** वगळून इतर सर्व मुद्दांबाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे **मुद्दा क्रमांक ५ व १०** ची माहिती वरिष्ठ पोलीस निरिक्षक विमानतळ ठाणे, मुंबई यांनी पोलीस ठाण्यात अभिलेखे पडताळून मुळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व १० बाबत अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरिक्षक विमानतळ पोलीस ठाणे यांनी दिनांक ०९-११-२०१० रोजी सादर केलेली माहिती दिनांक १५-११-२०१० रोजी पुरविण्यात आलेली आहे. तद्पूर्वीच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले होते.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे कलम १९(५) अन्वये आयोगापुढे सिद्ध करावयाचे असते अशी तरतूद असताना सुद्धा व त्याबाबत त्यांना पूर्वीच समज दिली असताना सुद्धा आज त्या गैरहजर आहेत.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी शिक्षा प्रस्तावित केलेली आहे, त्या संदर्भामध्ये त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. त्यांनी १५ मुद्यांमध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या मुद्यांच्या संदर्भामध्ये त्यांना चूकीची व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध झालेली आहे. युक्तीवादापुढे त्यांनी निर्णय प्रक्रीयेतील गुणवत्तेबाबत युक्तीवाद केला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेल्या मुद्यां संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता यांच्या विरुद्ध **कारणे**

दाखवा नोटिस दिली व शिक्षेचा निर्णय दिलेला आहे. त्यातील पुराव्याच्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मागितलेली होती. त्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध होती ती त्यांना दिलेली आहेत. तरीही अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्या विरुद्ध जी कारवाई करण्यात आली आहे ती ज्या नियमाप्रमाणे करण्यात आलेली आहे ते नियम चूकीचे आहे. यावरुन अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी त्यांच्या विरुद्ध झालेल्या कारवाईच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"** या व्याख्येमध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली आणि कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे तपासणी किंवा निरीक्षण करुन त्यातील छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे आणि **"माहिती"** या संज्ञेमध्ये **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे,अभिलेखे,दस्तऐवज, शासन निर्णय यांचा समावेश होतो. ते अधिनियम किंवा नियम शासन पद्धतीत केलेले असते. त्या अधिनियमाचे किंवा नियमाचे त्यामध्ये समावेश होत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना लागू असलेली सेवा शर्तीच्या नियमाची तरतूदीची मागणी सुद्धा योग्य नाही ते नियमात प्रसिद्ध झालेले आहे. त्या नियमाप्रमाणे जर कारवाई झालेली नसली तर अर्जदारास मा.न्यायालयामध्ये किंवा नियमाप्रमाणे योग्य शासकीय अधिकाऱ्यांकडे अपिल करुन दाद मागता येईल. परंतु त्याकरीता कागदपत्रांच्या स्वरुपात जी माहिती कार्यालयात उपलब्ध असेल ती कागदपत्रे त्यांना माहिती अधिकारात मागता येतात. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे दिनांक १४-०६-२०१० च्या अर्जात जे एकूण १५ मुद्दे उपस्थित केले त्यातील मुद्देनिहाय कागदपत्रे उपलब्ध असतील तर त्यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अभिप्राय मागितलेला असला तरी त्याप्रमाणे अभिप्राय देता येणार नाही असे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मान्य करण्यास पात्र आहे.

----आदेश----

१) **अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मान्य करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी अपिलकर्ता यांचे दिनांक १४-०६-२०१० च्या अर्जातील एकूण मुद्यां संदर्भात ज्या ज्या मुद्यांमधून कागदपत्रे उपलब्ध होऊ शकतील त्या सर्व कागदपत्रांच्या छांयाकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००४८/अपील क्र.६२८६/२०१०

श्री.शंभू सरन सक्सेना,
पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,
रे रोड समोर ब्रिज वर,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
'टी' वार्ड , मुलुंड,
मुंबई ४०० ०८०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
'टी' वार्ड , मुलुंड,
मुंबई ४०० ०८०. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ३०-०९-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी 'टी' वार्ड यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००८ ते दिनांक ३०-०४-२०१० या कालावधीतील श्री. महेद्र पी. सावंत सहाय्यक अभियंता इमारत विभाग टी वार्ड यांच्या कालावधीतील अवैध बांधकामाच्या संदर्भामध्ये आलेल्या तक्रारी, त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये केलेली कारवाई व कारवाई नंतर अवैध झालेले बांधकामाच्या संदर्भात माहिती पोष्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०३-०८-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता इमारत व कारखाने यांना विहित मुदतीत पत्रोत्तराने अभिलेखाची पाहणी करण्यास तसेच विहित शुल्क भरुन छायांप्रती प्राप्त करण्यास कळविलेले आहे. अपिलकर्त्यास आवश्यक असलेली कागदपत्रे विहित शुल्क भरल्यावर १ महिन्याच्या आत देण्यात यावी असा निर्णय देवून अपिल निकाली काढण्यात आले व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी ४१३ कागदपत्रे दिली आहेत ती सन २००९-२०१० या कालावधीतील आहे व त्यात आवश्यक माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. पूर्वीची माहिती त्यांना दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की,

अपिलकर्ता यांनी कोणत्याही निश्चित एका प्रकारणातील माहिती मागितलेली नसून मोघम अशी माहिती मागितलेली आहे व त्यामुळे त्यांना दिनांक २३-०६-२०१० रोजी अशा प्रकारची माहिती कळविलेली आहे व इतर माहितीच्या संदर्भामध्ये विस्तृत प्रमाणात माहिती असल्यामुळे त्यांनी निरीक्षण करावे व आवश्यक तो माहितीचा खर्च भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले होते. परंतु त्याबाबत अपिलकर्ता यांनी निरीक्षण सुद्धा केलेले नाही व खर्चाचा भरणा सुद्धा केलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार**" म्हणजे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे व त्यामुळे विस्तृत प्रमाणात किंवा व्यापक प्रमाणात मोघम अशी माहिती मागितलेली असल्यास एकतर अंदाजे किती पृष्ठे होतात त्या प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे सुरुवातीच्या ५ दिवसांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या **कलम ७ (३)** अन्वंये कळविणे अपेक्षित असते. मोघम व विस्तृत प्रमाणात माहिती असल्यामुळे कागदपत्रांचे अंदाजे पृष्ठे संख्या कळविणे व कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे खर्च भरुन घेणे किंवा प्राप्त करणेही अपेक्षित आहे व त्याप्रमाणे निरीक्षण करुन आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे असा पर्याय आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत कळविलेले आहे. त्यापैकी अंदाजे निरीक्षण करण्यास कळविलेलेअसते तर, किंवा निरीक्षण केलेले नसले तर त्यांना अंदाजे पृष्ठ संख्या कळविणे प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे कळविणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश-----

१) **अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पृष्ठ संख्या व प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा विवरण तपशील, रजिस्टर पोस्टाच्या खर्चासहित कळविण्यात यावा व असे कळविल्यानंतर कागदपत्रांच्या छांयाकित प्रती काढून उपलब्ध करुन देण्यात यावी.**

२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००४७/अपील क्र.६२८५/२०१०

श्री.शंभू सरन सक्सेना,
पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,
रे रोड समोर ब्रिज वर,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ २)
साऊथ रिजन, नागपाडा, सर जे.जे. मार्ग,
मुंबई ४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
साऊथ रिजन, नागपाडा, सर जे.जे. मार्ग,
मुंबई ४०० ००८. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ३०-०९-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे डॉ. बाबासाहेब गोपले, श्री.बीरडीचंद आझाद, श्री.शंभू सरन सक्सेना, श्री. गायकवाड आणि श्रीमती पुष्पा राजा चालवाडी आणि इतर हे किती दिवस आझाद मैदानावर आंदोलन किंवा धरणा त्यांनी धरले होते, किती वेळा मा. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महामंत्री यांना ते भेटले होते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०८-२०१० रोजी दुरध्वनीवर संर्पक साधुन तयार असलेली माहिती घेवून जाण्यास कळविलेले होते. अपिलार्थी माहिती घेण्यास या कार्यालयात न आल्याने त्यांना माहिती देता आलेली नाही. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २४-०९-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना पोस्टाने माहिती पाठविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो व त्यानंतर अपिलकर्ता यांना सहाय्य पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आझाद मैदान पोलीस ठाणे यांच्याकडून आलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगकडे द्वितीय अपिल दाखल करुन प्रथम अपिलामध्ये सुनावणी घेतली नाही असे कारण दिलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली होती ती माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही व उपलब्ध करुन दिलेली माहिती अपुर्ण आहे. त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये धरणा किंवा निदर्शन आझाद मैदान येथे डॉ.बाबासाहेब गोपले, श्री.बीरडीचंद आझाद, श्री.शंभू सरन सक्सेना, श्री. गायकवाड आणि श्रीमती पुष्पा राजा चालवाडी यांच्या संदर्भामध्ये

सन २०००-२००७ मध्ये माहिती मागितलेली होती व त्या मर्यादेतच त्यांची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सर्वसाधारण आहे. त्यामुळे दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अशा प्रकारची माहिती संर्कालत केलेली नसते व प्रत्येक व्यक्तीच्या संदर्भामध्ये १० वर्षाच्या काळामध्ये किती निदर्शने झाली व किती वेळा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेतली याबाबतची नोंद संकलीत करुन ठेवलेली नसते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ७ (९)** प्रमाणे सदरची माहिती संकलीत करावयाची झाल्यास शासकीय यंत्रणेची साधनसामुग्री ही प्रमाणाबाहेर वळवावी लागेल, कामकाज बाजूला ठेवावे लागेल व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही, असे असले तर अपिलकर्ता यांना, जी माहिती उपलब्ध असेल ती तयार माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश-----

१) **अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निणय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक २१-०७-२०१० च्या अर्जातील जी माहिती तयार उपलब्ध असेल ती छायांकित कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७२/अपील क्र.६२९९/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७३/अपील क्र.६३००/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२३५/अपील क्र.६२३०/२०१०

श्रीमती शकुंतला एस. केडीया,
केडीया कुंज, ब्लॉक नं.१०/११, २ रा माळा,
२३, जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०५९. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती,
केंद्रीय सुविधा भवन, कळंबोली, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड, नवी मुंबई ४१० २१८.
जन माहिती अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती,
केंद्रीय सुविधा भवन, कळंबोली, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड, नवी मुंबई ४१० २१८. **...उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपीलांचे दिनांक

अपिल क्र. ६२९९ दिनांक - ०९-१०-२०१०
अपिल क्र. ६३०० दिनांक - ०९-१०-२०१०
अपिल क्र. ६२३० दिनांक - २५-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०३-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी **अपिल क्रमांक ६२९९/२०१०** मध्ये दिनांक ०५-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती यांच्याकडे एकूण **६८** मुद्द्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०३-०५-२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पुर्वीच माहिती दिलेली आहे व वेअरहाउसींग सोसायटीच्या संदर्भामध्ये माहिती हवी असल्यास कार्यालयात पूर्व परवानगी घेऊन उपस्थित रहावे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी योग्य फी आकारुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला होता. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना पुर्वीसुद्धा याच मुद्यांवर माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना आणखी कोणत्या प्रकारची माहिती पाहिजे त्या माहिती करीता कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांनी माहिती मागितलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचा त्यावरील अभिप्राय सुद्धा मागितलेला आहे. **तसेच त्यांनी सदरच पैसे किती प्राप्त करणार** अशा प्रकारची माहिती मागितलेली आहे व त्यामुळेच गुणवत्तेबाबत माहितीच्या अधिकारामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. त्याचमुळे त्यांनी तशी माहिती दिलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या दिलेली असून त्यामध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे मिळविता येण्याजोगी **"माहिती"** आणि त्यात कागदपत्रे, दस्तऐवज अभिलेखे यांचे निरीक्षण करणे छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व **कलम २(च)** मध्ये **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या असून त्या संज्ञेमध्ये साहित्याच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज स्वरुपात इत्यादीचा समावेश होतो. यावरुन कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेबाबत माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही तर ती कार्यालयामध्ये कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

अपिल क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७३/अपील क्र.६३००/२०१०

अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०४-२०१० रोजी एकून **५२** मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भामध्ये दिनांक ०३-०५-२०१० रोजी त्यांनी कार्यालयामध्ये उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक ३१-०५-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले होते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी मिळाली आहे. अपिलकर्ता यांनी दिशाभूल माहितीच्या संदर्भामध्ये जे निवेदन सादर केलेले आहे. त्या निवेदनास त्यांची ती माहिती गुणवत्तेच्या संदर्भामध्ये युक्तीवाद करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी ५२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे ते मुद्दे कागदपत्रांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली नसून कपोलकल्पीत (Hypothetical) माहिती मागितलेली आहे व त्यामुळे सदर माहितीचे उत्तर देण्यात आलेले नाही असे असले तर अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. त्या मुद्यांमधून कागदपत्रे किंवा अभिलेखाच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. ती त्यास कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु त्या मुद्यांमध्ये सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या निर्णयाबाबत किंवा प्रकरणाबाबत प्रश्न विचारलेले असतील त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय हा अपेक्षित नाही. जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याचा अधिकार आहे. त्यांच्या त्या प्रकरणातील निर्णय प्रक्रीयासंबधी असेल

किंवा नसेल व त्यातील कागदपत्रांच्या स्वरुपात असेलेली माहिती छांयाकित करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२३५/अपील क्र.६२३०/२०१०

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८९ ते माहिती उपलब्ध होईपर्यंत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसुन येते.

Description of the information required :

1) Certified Audited Ledger A/c for Mrs. Shakuntala S. Kedia pertaining to Plot NO. 1192, Road No.13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay3 A/c statement to be balanced Annually.
2) Certified Policy decisions taken regarding Levy & Waivet of Delay payment charges by the Market Iron & Steel committee.
3) Certified Copy of the Rules & Regulations of the Market Iron & Steel Committee.
4) Certified copies of any recovery order passed / pending against Mrs.Shakuntala S.Kedia or pertaining to Plot NO.1192, Road NO. 13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay.
5) Certified copies of Forfeit Notice issued / pending against Mrs.Shakuntala S.Kedia or pertaining to Plot NO.1192, Road No.13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay.

सदरची माहिती स्पीडपोस्ट मार्फत घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०७-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलात त्यांनी नवीन माहिती मागितलेली दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, **मुद्दा क्र.१ व २** ची माहिती दिलेली आहे. **मुद्दा क्र.३** च्या संदर्भामध्ये खर्च भरणा करावे असे कळविलेले आहे. **मुद्दा क्रं. ४ व ५** ची माहिती दिलेली आहे. खर्च भरणा त्यांनी केलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलामध्ये नवीन माहिती मागितलेली दिसून येते व प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अर्जादाराने ते माहितीच्या अर्जात मागितलेले आहे. तसेच फक्त माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकारे नवीन माहिती प्रथम किंवा द्वितीय अपिलात मागता येत नाही. प्रथम किंवा द्वितीय अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबत कारणमिंमासा देणारी माहिती अपेक्षित असते व त्यामुळे अपिलकर्ता यांना दिनांक ०७-०७-२०१० रोजी दिलेली माहिती व खर्चाचा भरणा करण्याच्या संदर्भात योग्य असल्यामुळे सदर अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

१) अपिल क्रमांक ६२९९/२०१० व अपिल क्रमांक ६३००/२०१० ही दोन्ही अपिले अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक ०५-०४-२०१० च्या दोन्ही अर्जाच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय कागदपत्रे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्या मुद्यांमध्ये गुणवत्तेबाबत अभिप्राय किंवा विश्लेषण मागितलेले असेल ते अपेक्षित नाही परंतु ते स्पष्ट कळविणे आवश्यक आहे. सदरची माहिती उपलब्ध करुन देताना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी योग्य ते नियंत्रण यंत्राची माहिती उपलब्ध करुन द्यावी ती जबाबदारी प्रथम अपिलीय अधिकारी यांची राहील. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपिल क्रमांक ६२३०/२०१० हे निकाली काढण्यात येते.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./५००६४/अपील क्र.६३११/२०१०
क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./५००६१/अपील क्र.६३१२/२०१०

श्री.दिपक धयालकर,
५/४४,बि.डी.डी.चाळ,गणपत जाधव मार्ग,
वरळी नाका,मुंबई ४०० ०८६. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
खोली क्र.४६, १ मजला, जुनी इमारत,
महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१.
जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (आयुक्त),
खोली क्र.४६, १ मजला, जुनी इमारत,
महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१. ...उत्तरवादी
प्रथम अपिलीय अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक(प्र.),
करनिर्धारक व संकलक खाते,
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालय,
जुनी इमारत, तळमजला, महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१.
जन माहिती अधिकारी तथा उप करनिर्धारक व संकलक(जकात),
बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत,
३ रा मजला, पलटन रोड,मुंबई ४०० ००१.

----निर्णय---

द्वितीय अपीलांचे दिनांक - ०८-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त तसेच उपनिर्धारक व संकलन (जकात) तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुलुंड चेकनाक्यावरील अधिकारी / कर्मचारी आणि महानगरपालिकेचे खाजगी ठेकेदारांचे कर्मचारी तसेच बृन्हमुंबई महानगरपालिका आणि प्रत्येक खाजगी ठेकदार यांच्यात करारान्वये झालेल्या निविदेच्या प्रत्येक वर्षाच्या प्रती व प्रत्येक खाजगी

ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी महापालिकेला जकातीद्वारे प्राप्त करुन दिलेल्या उत्पन्नाच्या लेखाविषयक प्रतिवर्षाचा अहवाल, महानगरपालिकेने खाजगी ठेकेदाराला त्याच्या कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यासंबंधी दिलेल्या रकमांचा प्रत्येक महिन्यांच्या अहवालाच्या प्रती, खाजगी ठेकेदाराचे नांव, वास्तव्याचा पत्ता, फोन नंबर, त्यांच्या कार्यालयाचा पत्ता, फोन, व्यवसास नोंदणी दाखला प्रत,महानगरपालिकेतील जकात वसुलीचे स्थान, तसेच खाजगी ठेकेदार भरत असलेल्या विविध कराची नक्कल प्रत,बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व मुलुंड जकात नाक्यावरील प्रत्येक कार्यालयातील १) अधिकारी/कर्मचारी व खाजगी ठेकेदांराच्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण नावे,२) पद, ३) शैक्षणिक अर्हता, ४) जकात नाक्यावर नियुक्त दिनांक, ५) त्यांचे पेस्केल, ६) पी.एफ., ७) ग्रॅज्युइटी, ८) विमा, ९) संपूर्ण पगार, १०) इतर सुविधा इत्यांदीची माहिती, तसेच खाजगी ठेकेदार व चेकनाक्यावरील संबंधित अधिकारी निविदेमधील कामगारांविषयक अटी/शर्तीचा किंवा आपल्या कामगार कायदयानुसार पालन होत असल्यास त्याबाबत संबंधित कामगार कायदे ह्यांचे प्रती देऊन कोणत्या कामगार कायद्यांचे पालन झाले ते दाखवावे आणि आपल्या कोणत्या कामागार कायद्याचे पालन झाले नाही दाखवून त्यांची अंमलबजावणी करुन त्यांची भारतीय घटनेच्या अनुच्छेदाप्रमाणे पारदर्शक माहिती द्यावी. माहिती स्पीड पोस्टद्वारे मिळावी असे नमुद केलेले दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५-०४.२०१० रोजी सदर अर्ज हा उपकरनिर्धारक व संकलन (जकात) यांचेकडे हस्तांतरण केलेले आहे असे दिसून येते. अर्जाच्या संदर्भामध्ये व हस्तांतरण झालेल्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती दिलेली दिसून येते. त्यामध्ये एकूण ८७ छांयाकित प्रतीमध्ये उपलब्ध असलेली माहिती प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे एकूण रु. १७४/- जकात कार्यालयामध्ये येऊन भरल्यास सात दिवसांमध्ये छांयाकित प्रती उपलब्ध होतील त्या घेऊन जाव्यात असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक १८-०३-२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्यांचे पूर्वीच्या अपिलांच्या संदर्भामध्ये सुद्धा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १७-०५-२०१० रोजी दोन अपिले अनुक्रमे, मा.आयुक्त अपिलीय प्राधिकारी आणि करनिर्धारक व संकलक (जकात) अपिलीय अधिकारी यांचे कडे दाखल केले. पुन्हा सदरचे अपिल हे करनिर्धारक यांच्याकडे हस्तांतरित केलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १५-०६-२०१० रोजी मुलुंड येथील दोन्ही चेकनाक्यांची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक व वेळ निश्चित करुन अपिलार्थीनी उपस्थित प्रतीचे निरीक्षण करुन त्यांचे त्यास दिलेले दिसून येते व त्याबाबत विहित शुल्क आकारावेत असाही आदेश दिलेला दिसून येतों. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, आयुक्त कार्यालयातील अर्ज हे मुदतीत हस्तांतरण केलेले नाही व हस्तांतरण करताना सहाय्य वगैरे घेतलेले नाही अशी तक्रार द्वितीय अपिलामध्ये नमुद केलेले आहे व तसे दिशाभूल करणारी अशी उत्तरे दिलेली आहेत. त्यांच्याविरुद्ध शास्ती करावी अशी विनंती केली. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिल मेमोमध्ये जी कारणे दिलेली आहेत त्या कारणांमध्ये माहिती उपलब्ध झाली किंवा नाही त्याऐवजी विश्लेषण केलेले आहे. युक्तीवाद करताना त्यांनी आयोगापुढे माहिती उपलब्ध झाली नाही अशा प्रकारचा युक्तीवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगपुढे असे सांगितले की, सर्वात प्रथम माहिती जर करनिर्धारक या कार्यालयात उपलब्ध आहे तर अपिलकर्ता यांनी आयुक्त यांच्याकडे माहितीसाठी अर्ज करणे योग्य नव्हते. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ६** प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना अर्ज करणे अपेक्षित असते व त्यामुळे आयुक्तांकडे अर्ज करावयाचे व योग्य रीतीने हस्तांतरित केलेले नाही. असे अर्ज करावयाचे हे योग्य नव्हते याचा अर्थ अपिलकर्ता माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा कार्यालयातील अधिकाऱ्यांना वेठीस कसे धरता येईल याबाबत तत्पर दिसून येतात.

तसेच अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. मुळातच अर्जामध्ये ठेकेदारानी जकात किती वसूल केले याबाबत विचारणा केलेली आहे. त्या संबंधात खाजगी ठेकेदार जर नेमले असतील तर ते जकात वसूलीकरीता नेमलेले असतात.

जकात वसूलीही महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनाकडूनच केली जाते. जकातनाका ठेकेदाराची नियुक्ती केली जातात ते त्याला किती किंवा इतर साफसपाईच्या संदर्भामध्ये जे नियुक्ती केले जातात तसेच ठेकेदाराला नियुक्त केल्यानंतर ठेकेदारांचे त्यांनी घेतलेल्या कर्मचाऱ्यांना किती वेतन देतात व कोणकोणत्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती करीता याबाबतची माहिती ही कार्यालयामध्ये उपलब्ध नसते व त्यामुळे तशी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. अपिलकर्ता यांना जी बदली झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे दिली त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जकातनाका कोणत्याही कर्मचाऱ्यांना ३-४ महिन्यांनंतर ठेवले जात नाही तर बदली केले जाते व त्यामुळे बदली केलेल्यांची यादी त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ती ८७ प्रती छांयाकित प्रती उपलब्ध आहे त्याबद्दल त्यांना खर्च द्यावयाचे म्हणून कळविलेले आहे व त्याप्रमाणे त्यांनी खर्च भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावयास पाहिजे होती ती घेतलेली नाही. तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, यापूर्वी सुद्धा अपिलकर्ता यांना दिनांक १८-०३-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. महापालिकेने जकात नाक्यावर नेमलेले ठेकेदार मे.क्रिस्टल ट्रेड कॉम.प्रा.लि. हे नाक्यावरील साफसफाईच्या कामाशी संबंधित असून मे.एस.टेलिव्हॉइस अँड सर्व्हिसेस प्रा.लि. हे जकात नाक्यावरील कॉम्प्यूटर सिस्टमशी संबंधित असून मे.विमान एंटरप्राईझेस हे वजनकाटयाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या कर्मचाऱ्यांची माहिती जकात खात्याने जतन करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे सदरहू माहिती मुख्यालयाकडे नाही असे उप के.वस.(ज) व जन माहिती अधिकारी म्हणाले. तसेच अपिलकर्ता यांना ठेकेदाराच्या कामाचे स्वरुप समजावून सांगितले होते व त्यामुळे त्यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे ८७ पृष्ठांच्या छांयाकित प्रती हव्या असतील तर त्यांनी रु.१७४/- भरणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

१) **अपिल निकाली काढण्यात येते.**
२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६६/अपिलक्र ६३०९/२०१०

येरळवाडी विकास मंडळ,
द्वारा, चंद्रकांत सी. बागल,
५ सी, अव्वल बाग इस्टेट, ९४ सी, डी.एस.पी रोड,
दादर(पूर्व),मुंबई - ४०० ०१४. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हा अधिकारी कार्यालय (पुर्नवसन शाखा),
सातारा, जिल्हा - सातारा.

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तथा पुर्नवसन अधिकारी,
सातारा, जिल्हा - सातारा. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक :०७.०२.२०११
अपिलकर्ता - उशिरा उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०४-०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी (पुनर्वसन) कार्यालय, सातारा यांच्याकडे येरळवाडी पुनर्वसनाच्या संदर्भामध्ये एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.०६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे पुन्हा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्ता हे उशिराने उपस्थित झाले व त्यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने आतापर्यंत त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचे दिनांक ०७.०४.२०१० च्या अर्जाची दखल घेतली नव्हती व त्या संदर्भामध्ये संबंधित लिपिकास नोटीस देण्यात आलेली आहे. परंतु प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. वास्तविक प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या मेमोचे अवलोकन केले असते तर त्यात त्यांना अपिलकर्ता यांनी दिनांक ०५.०४.२०१० रोजीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये संदर्भ आढळून आला असता व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देता आले असते. परंतु तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्याबाबत कोणतीही कर्तव्य तत्परता दाखविलेली नाही व अपिलकर्ता गैरहजर या कारणास्तव अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. म्हणजे त्यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना कार्यकारी अभियंता, धोम पाटबंधारे विभाग यांची माहिती त्यास दिनांक ०३.०२.२०१० रोजी जानेवारी २०१० च्या अर्जाप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु काही माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे तसे आयोगापुढे सांगितले. परंतु त्यांनी

त्यांच्या अर्जामध्ये पाटबंधारे खात्याने माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा मुद्दा क्र. १, २ व ३ इत्यादीच्या बाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना त्या संदर्भामध्ये एकूण १० मुद्यांमध्ये मुद्देनिहाय माहिती छांयाकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी तथा पुर्नवसन सातारा यांनी मंडळ अधिकारी श्री.पी.एम. दगडे यांना कारणे दाखवा नोटीस जर दिली असेल तर त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे **कलम २०(१)** अन्वये शास्ती लादणे आवश्यक राहील. जेणे करुन माहितीचा अर्ज हा अशा पद्धतीने गहाळ करणे किंवा संबंधित जन माहिती अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून न देण्याच्या वृतीस आळा बसेल व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

---आदेश---

१) **अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक ०५.०४.२०१०(०७.०४.२०१०) च्या अर्जामधील एकूण १० मुद्यांच्या संदर्भात मुद्देनिहाय माहिती उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.**

२) **अपिलकर्ता यांचे दिनांक ०५.०४.२०१०(०७.०४.२०१०) च्या माहिती अर्ज हा कार्यवाही साठी न घेतल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास न आणल्यामुळे तत्कालीन अव्वल कारकून श्री.पी.एम.दगडे यांच्याविरुद्ध रु.१००००/- शास्ती लादण्यात येईल. सदर शास्तीची वसूली ही त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यात येवून " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)." या लेखाशिर्षा मध्ये जमा करण्यात यावी. सदरची वसूली ही जिल्हाधिकारी कार्यालयात होण्यासाठी निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

३) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२१३/अपील क्र.६२११/२०१०

श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला,
काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड,
घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६. ...अपिलकर्ता

----विरुद्ध----

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७.
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - २६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सहाय्यक आयुक्त (इमारत व कारखाने) एन वार्ड यांच्याकडे, काकुभाई रंगवाला बिल्डीगच्या संदर्भामध्ये पावसाळी छप्पर लावण्याची परवानगी देण्याच्या संदर्भामध्ये एकूण ८मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०६-०९-२०१० रोजी अपिलकर्ता यांना सर्व मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामध्ये संबंधित नस्तीचे निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ०९-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १७-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत

कळविलेले असल्यामुळे अपिल निकाली काढण्यात आले असे दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी त्यांचे माहितीचा अर्जामध्ये Bootlegger Family पावसाळी छप्पर टाकण्याचा अर्जा संदर्भामध्ये झालेली कार्यवाहीची संपुर्ण कागदपत्रांची छायंकित प्रती मागितलेली होती असे असताना नस्तीचे निरीक्षण करावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी कळवायाची आवश्यक नव्हती. त्या संपूर्ण नस्ती मध्ये जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्या सर्व कागदपत्रांची छायांकित प्रतीचा खर्च तयार आहे. इतर मुद्यांच्या संदर्भामध्ये सुद्धा त्यांच्याकडे कागदपत्रे जी उपलब्ध आहे त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित होते. त्यांनी मागितलेले मंजूर नकाशा सदंर्भामध्ये दिनांक ०८-०५-१९८० चा नकाशा उपलब्ध नाही. हे म्हणणे म्हणजे माहिती उपलब्ध असून सुद्धा देण्याची टाळाटाळ करणे असे म्हणावे लागते. अपुर्ण माहिती दिलेली असताना सुद्धा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी न घेता निर्णय दिलेला आहे व ते अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अधिकार २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या त्यांनी दिलेली आहे व त्या व्याख्येमध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व मिळविता येण्याजोगी माहिती त्यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेखे, कागदपत्रे यांचे निरीक्षण करुन व त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व त्यामुळेच अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात आलेले होते. प्रत्येक नस्तीमध्ये आवश्यक कागदपत्रे व अनावश्यक कागदपत्रे असतात. त्यातील कागदपत्रे अर्जदारास आवश्यक असतील त्या कागदपत्रांचे छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते. असे असल्याने जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकरली असे होत नाही. परंतु त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी सर्वच कागदपत्रांची माहिती मागितलेली आहे आवश्यक व अनावश्यक कागदपत्रांचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्याबाबत आपण खर्चाचा भरणा केला असता व तसे ही त्यांना दिनांक ०६-०९-२०१० चे पत्र मिळाले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र आयोगाकडे सादर केलेले आहे. त्यावर कार्यालयतून सदरचे पत्र निर्गमित केल्याचे दिसून येते. त्यावरील पत्ता श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला, काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड, घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६ असे दिलेले आहे व त्यावरुन सदरचे पत्र हे निर्गमित केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की,अशा प्रकारचे पत्र हे साध्या टपालाने पाठविले जाते व तसे त्यांनी करण्याची पद्धत आहे. दिनांक ०६-०९-२०१० रोजीचे पत्र त्यांना निर्गमित करण्यात आलेले आहे. राज्य माहिती आयोगाची सुनावणीची नोटीस सुद्धा अपिलकर्ता यांना त्याच दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आलेली आहे व ती त्यांना उपलब्ध झालेली आहे व जन माहिती अधिकारी किंवा अपिलीय अधिकारी यांनी पाठविलेल्या पत्रात त्यांचा पत्ता पाठविलेले पत्र त्यांना उपलब्ध झालेले नाही असा निष्कर्ष काढता येणार नाही असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक असल्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक १०-०८-२०१० रोजी अर्जांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे

संयुक्तिक राहील. अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०९-२०१० चे पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे असून सुद्धा युक्तीवाद करताना त्यांनी मुद्दा क्रमांक ४ मधील sanction plan उपलब्ध नाही याबद्दल मात्र आयोगापुढे असे सांगितले की, यापूर्वी sanction plan पाहिलेले आहे व ते आता उपलब्ध नाही असे जे म्हणतात ते योग्य नाही. परंतु त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पुन्हा शोध घेऊन sanction plan उपलब्ध झाल्यास दिला जाईल. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

१) **अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक १०-०८-२०१० च्या अर्जामध्ये मुद्देनिहाय मागितलेली माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय माहिती उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रतीच्या स्वरुपामध्ये Sanction plan उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**
२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२१२/अपील क्र.६२१२/२०१०

श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला,
काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड,
घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६. **...अपिलकर्ता**

----विरुद्ध----

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७. **...उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपीलाचा दिनांक - २६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२०१० (०९-०८-२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य) एन वार्ड यांच्याकडे मे. वसंत भेलपुरी व थंडपेय यांच्याकरीता दिलेले अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये एकूण ८ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ०९-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला असल्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती उपलब्ध करुन देत नाही व माहिती लपविण्याचा प्रयत्न करतात व त्यांचे अर्जाच्या संदर्भामध्ये काही कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दिनांक ११-०८-२०१० रोजी हॉटेल मालकाकडून हॉटेल संबंधित माहिती न पुरविण्याचे कळविलेले असल्याने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसे अपिलकर्ता यांना दिनांक ३१-०८-२०१० रोजी कळविलेले आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये सुद्धा निर्णय दिलेला दिसून येत नाही मात्र आता आयोगापुढे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांना मागितलेली सर्व कागदपत्रे देण्यात येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १३-०१-२०११ रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आतापर्यंत कोणतेही तपशील किंवा माहिती किंवा पत्रव्यवहार मिळालेला नाही. त्यावर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती जरी उपलब्ध करुन दिलेली नसेल तर आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक १३-०१-२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

हॉटेल मालकांनी हरकत घेतली म्हणून माहिती उपलब्ध करुन देता आली नाही हे म्हणणे म्हणजे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निर्कष काढावा लागतो. कोणत्या नियमाप्रमाणे अनुज्ञाप्ती दिलेली असेल तर ते सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होतो. अनुज्ञाप्ती प्रत्येकाची वैयक्तिक माहिती होत नाही व त्यामुळे अनुज्ञाप्तीच्या संबंधित सर्व कागदपत्रे ही सार्वजनिक अभिलेखे असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे व त्यामुळे तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध **कलम २०(२)** अन्वये शिस्तभंगाची शिफारस करणे आवश्यक राहील. आयोगापुढे सुद्धा गांभीर्याने उपस्थित न होता खुलासा सादर न करता जन माहिती अधिकारी हजर झालेले आहेत. जन माहिती अधिकारी हजर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी जर माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल तर ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय कागदपत्रे छायांकित प्रती देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक १०-०८-२०१० च्या अर्जामध्ये व अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये मागितलेली मुद्देनिहाय माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपिलकर्ता यांचे दिनांक १०-०८-२०१० अर्जाच्या अनुषंगाने तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ११(१) अन्वये कोणतीही कारवाई न करता हॉटेल मालकांनी हरकत घेतल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही असे कळविल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निर्ष्कष काढावा लागतो व त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते. सदर शिस्तभंगाची कारवाई त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे सक्षम अधिकारी यांना करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६५/अपिलक्र ६३१३/२०१०

श्री. प्रकाश पा.कटके,
१०२/३, अे विजया वैशाली नगर,
के.के. मार्ग, महालक्ष्मी (पूर्व),
मुंबई - ४०० ०११. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद - ४३१ ००४. महाराष्ट्र.

जन माहिती अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद - ४३१ ००४. महाराष्ट्र. **..उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०१.०२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडे, duplicate Migration Certificate and Merit Certificate मिळावे असा माहिती अर्ज केला होता. माहितीचा कालावधी ०९.०१.१९९१ ते २५.०१.२०१० असून त्याकरीता त्यांनी फी सुध्दा भरलेली आहे. त्याप्रमाणे DO99549 for MERIT CERTIFICATE AND MIGRATION CERTIFICATE OF M.A. (Eco.) examination held in April 1983 under Seat No.10760 उपलब्ध करुन द्यावी म्हणून माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०५.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी duplicate Migration Certificate उपलब्ध करुन देण्याकरीता Original Migration Certificate हे गहाळ झालेले आहे व पुढील शिक्षणासाठी आवश्यक आहे असे बॉण्ड पेपर द्यावे लागेल. तसेच Merit Certificate च्या संदर्भामध्ये जे जे विद्यार्थी परीक्षा with exemption पास झालेले आहेत त्यांना दिले जात नाही व त्यामुळे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०३.०८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०६.०९.२०१० रोजी दिलेला आहे व त्यामध्ये त्या कार्यालयाने Statement of Marks, Migration Certificate,

अर्थशास्त्रामध्ये जे गुणवत्ता यादीत आहेत व Ordinance ची छांयाप्रत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे दिलेले आहे. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांनी राज्य माहती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. द्वितीय अपिलाच्या सुनावणीमध्ये अपिलकर्ता यांनी त्यांना Migration Certificate माहिती अधिकारात करुन द्यावे असे मागितलेले असून सुध्दा अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेले नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, Merit Certificate सुध्दा त्यांनी पूर्वी उपलब्ध करुन दिलेले नव्हते व Migration Certificate मात्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले होते. तरी सुध्दा त्यांनी आयोगापुढे शपथपत्र दाखल केलेले आहे व त्यामध्ये Merit Certificate उपलब्ध करुन द्यावे. या सदंर्भात Ordinance 101 व 102 च्या प्रती विश्लेषण केलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, Merit Certificate हे त्यामुळेच उपलब्ध करुन दिलेलेच नाही असे दिसून येते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे त्यांना Merit Certificate उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्यामध्ये **सार्वजनिक प्राधिकरणात** असलेली व अधिनियमाने मिळविता येण्याजोगी माहिती त्यात एखादे काम, कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे यांची पाहणी करुन व त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे तसेच **"माहिती"** या संज्ञेचा अर्थ **सार्वजनिक प्राधिकरणामध्ये** साहित्यांच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, दस्तऐवज,अभिलेखे इत्यादींचा समावेश होतो. यावरुन उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा होतो. त्याप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध नाही ती तयार करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक ०५.०३.२०१० रोजी त्यांचे दिनांक ०१.०२.२०१० रोजीच्या अनुषंगाने उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिलाच्या मेमोचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांना उपलब्ध असेलेली कागदपत्रे, दस्तऐवज किंवा अभिलेखे यांच्या छांयाकित प्रतीच्या ऐवजी त्यांनी Merit Certificate च्या संदर्भामध्ये गुणवत्ता निकाषावर कारवाई करुन मुळ Merit Certificate अपेक्षित दिसून येते. ती बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या वर नमुद केल्याप्रमाणे तरतुदीमध्ये येत नाही. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

जन माहिती अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीची माहिती आहे असे दिसून येत नाही. माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही बाब सिद्ध करण्याची जबाबदारी अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची आहे. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केलेले नाहीत व त्यामुळे मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ तरतुदीचे योग्य रीतीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांना सुनावणीसाठी उपस्थित राहण्याकरीता त्यांनी समज देणे अपेक्षित आहे.त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

१) अपिल निकाली काढण्यात येते.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.
३) सदर निर्णयाची एक प्रत मा. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना स्वतंत्रपणे उचित कारवाईसाठी पाठविण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६७/अपिलक्र ६३१०/२०१०

येरळवाडी विकास मंडळ,
द्वारा, चंद्रकांत सी. बागल,
५ सी, अव्वल भंग इस्टेट, ९४ सी, डी.एस.पी रोड,
दादर(पूर्व),मुंबई - ४०० ०१४. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
मु.पो.वडुज आणि येरळवाडी
ता.खटाव, जिल्हा - सातारा- ४१५ ००६.

२) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत
येरळवाडी, ता.खटाव, जिल्हा - सातारा- ४१५ ००६.

३) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
उप विभागीय कार्यालय, वडुज, जिल्हा परिषद,
सार्वजनिक बांधकाम विभाग, वडुज, जिल्हा - सातारा. ...उत्तरवादी

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०५.०४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, खटाव यांच्याकडे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या संदर्भामध्ये धारीकेतील गाव खटाव, जिल्हा सातारा, व मु.पो.येरळवाडी या संदर्भात दिनांक ०१.०४.२००५ ते ३१.०३.२०१० या कालावधीतील माहिती व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नियुक्त केलेले अधिकारी यांची माहिती द्यावी. तसेच येरळवाडी ग्रामपंचायत सभागृहासाठी येणाऱ्या प्रकल्पाच्या संदर्भामध्ये एकूण ५ विषयांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक ०७.०४.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या मागणीनूसार माहिती ही जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जिल्हा सातारा यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने सदरचा अर्ज ग्रामसेवक, ग्रामपंचायत येरळवाडी यांच्याकडे वर्ग करण्यात येत आहे. त्यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर ग्रामपंचायत येरळवाडी दिनांक ११.०५.२०१० रोजी मागितलेली संपुर्ण

माहिती इंग्रजी या भाषेत असल्याने इंग्रजी भाषेचा अर्थ कळत नसल्यामुळे मराठी या भाषेतून मागवावी. ग्रामपंचायतीकडील उपलब्ध माहिती समक्ष पहाण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये वेळ व दिनांक कळवून उपस्थित राहील्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते.त्यावर दिनांक १६.०५.२०१० रोजी तुम्ही स्वतः diploma धारक आहे व त्यामुळे भाषेची काही अडचण असल्यास काही कारण नाही तसे अर्जामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती द्यावयाची आहे व कार्यालयात भेट दऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन जावी असे त्यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २१.०६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १९.०७. २०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय माहिती उपअभियंता सातारा जि.प.(बां.) उपविभाग खटाव वडूज यांना कळविलेले दिसून येते व तसेच दिनांक १९.०७.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरचा अर्ज हा इंग्रजी भाषेत असल्यामुळे त्याबाबत अर्थ कळत नसल्यामुळे तसे अपिलकर्ता यांनी कळविलेले होते. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही एकूण १४ विभागांच्या विषयी आहे व त्या विभागांना कळविलेले आहे व अर्जदारास ज्या विभगाने कळविलेले आहे व यातील काही विभाग उप अभियंता सातारा, जि.प. बांधकाम उपविभाग वडूज यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १९.०७.२०१० च्या अन्वये माहिती तयार असून रक्कम भरणेकामी कळविलेली आहे व गट विकास अधिकारी पंचायत समिती खटाव (वडूज) यांचे पत्र दिनांक १०.०८.२०१०अन्वये मुद्दा क्र. १ ते ७ बाबतची माहिती तयार असून त्याचे रु.१२/- भरणेकामी कळविलेले होते. परंतु अर्जदार यांनी रक्कम भरलेली नाही. तसेच दिनांक १९.०७.२०१०च्या अर्जामध्ये सुद्धा या सुंदर्भामध्ये रु.१२/- भरणे आवश्यक आहे व तसेच पुरविण्यात येणारी माहिती एकूण पाने संख्या २०४/- इतकी आहे. प्रती पाने रु.२/- प्रमाणे रु.४०८/- व पोस्टेज खर्च अंदाजे रु.१००/- अशी एकूण रक्कम या कार्यालयाकडे जमा करण्यात यावी. माहिती शुल्क पुरविल्यानंतर माहिती सत्वर देण्यात येईल. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी खर्च भरणा केलेला आहे. परंतु त्यांना येरळवाडी बहुउद्देशीय सार्वजनिक सभागृह बांधण्याचा व दलितवस्ती अंतर्गत रस्ता खडीकरण व डांबरीकरण संदर्भामध्ये Voucher देयके इत्यादी बाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. प्राप्त खर्च भरणा एकत्रित करण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी ग्रामसेवक ग्रामपंचायत उपअभियंता या संदर्भामध्ये नियम असलेले संपुर्ण कागदपत्रे, Voucher,अभिलेख व इतर कागदपत्रांची छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

अपिलकर्ता यांनी अर्जदार म्हणून माहिती मागताना कोणतेही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अनेक विषय असल्यास व त्या विषयाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त केले असते त्या संबंधित जन माहिती अधिकारी यांचे त्याच विषयाच्या संदर्भामध्ये माहिती मागणे ही अपेक्षित असते. जनेकरुन अशी माहिती ३० दिवसामध्ये उपलब्ध होवू शकते. एखाद्या अर्जामध्ये अनेक विषयी माहिती मागितलेली असल्यास तो अर्ज हस्तांतरीत करुन त्याप्रमाणे ३० दिवसात माहिती मिळेल त्याबाबत खात्री देता येत नाही व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती ३० दिवसात उपलब्ध होवू शकते असे असले तरी अपिलकर्ता यांचे दिनांक ०५.०४.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने उर्वरीत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्या करीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश---

१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना येरळवाडी बहुउद्देशीय बांधकामाच्या संदर्भामध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भामध्ये **Voucher** देयके प्रमाणपत्रे यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच येरळवाडी रस्ते खडीकरण व डांबरीकरणाच्या संदर्भामध्ये **Voucher** देयके, अंदाज पत्रके वगैरे कागदपत्रांच्या स्वरुपात छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक तसेच उपअभियंता हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./४९६४३/अपिलक्र ६३३३/२०१०

श्री.विजय एच.जयस्वाल,
३५, कांता निवास, डी.जे.रोड,
विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
मु.पो.रत्नागिरी,
जिल्हा - रत्नागिरी.

जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,
मालगुंड पोलीस स्टेशन, मु.पो. मालगुंड,
जिल्हा - रत्नागिरी. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०१.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - प्रतिनिधी उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०.०६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक यांच्याकडे दिनांक ११.०२.२००९ रोजी दाखल केलेली FIR कलम ३६३, ३६४,५०६ आणि ३४ श्री. जगदीश कदम आणि इतर यांच्या विरुद्ध तसेच दिनांक ०९.०२.२००९ चे श्री. सिद्धार्थ जयस्वाल यांनी दिलेले पत्रांच्या संदर्भामध्ये तपासाबद्दलची माहिती व तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेली कार्यवाहीची माहिती सन २००८ पासून ते आतापर्यंतची माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी सदर अर्ज हा दिनांक २४.०६.२०१० रोजी उप विभागीय पोलीस अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०६.०७.२०१० रोजी माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त खर्च रु.३१/- इतका आहे व शुल्क कार्यालयाकडे प्रदान करण्यात यावे किंवा Money order किंवा शासकीस कोषागरे यांच्याकडे करावे. चलनाची प्रत पाठवून व माहिती ३० दिवसांत घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २३.०७.२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २३.०९.२०१० रोजी देण्यात आला असून अतिरिक्त खर्च भरणा केला नसल्यामुळे सदर अपिल हे फेटाळण्यात

ओलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. द्वितीय अपिल मेमोमध्ये जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे नमुद केलेले आहे. जन माहिती माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जो अर्ज केलेला आहे तो जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता पोलीस निरीक्षक यांच्याकडे केलेले आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर अर्ज दिनांक २४.०६.२०१० रोजी प्राप्त झालेले आहे. अर्जात मागितलेली माहितीच्या संदर्भात दिनांक ०६.०७.२०१० रोजी म्हणजे विहित मुदतीत अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भात अतिरिक्त खर्च भरणा रु.३१/- करावा असा तपशीलात कळविलेले होते. तसेच मुद्दां क्र.१, २ व ३ च्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय उत्तर दिलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांनी खर्च भरणा सुद्धा केलेला नाही व माहिती व्यक्तिश: घेणार असे नमूद केलेले असूनही केव्हाही माहिती घेण्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित झालेले नाही व त्यामुळे प्रथम अपिल याच कारणास्तव फेटाळण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे बरोबर असून अपिलकर्ता यांनी स्वत: अर्ज करताना जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेले नाही व त्यामुळे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हा मुद्दा निकाली निघतो. अर्जातच अपिलकर्ता यांनी माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांनी दिनांक ०६.०७.२०१० रोजी कळविल्यानंतर त्यांनी खर्च भरणा करुन व्यक्तिश: माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते तसे न करता त्यांनी प्रथम अपिल व द्वितीय अपिल दाखल केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

१) अपिल निकाली काढण्यात येते.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५०१६२/अपिलक्र ६३३७/२०१०

श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले,
सिध्दिविनायक प्रसार डॉ. शामा प्रसाद,
मुखर्जी रोड, डोंबिवली (पूर्व), ४२१ २०१. ...अपिलकर्ता
ता.कल्याण,जि.ठाणे.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव),
शहर बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई' विभाग, ३ रा मजला,
१० शेख हफिअुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर -२,
बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई' विभाग, ३ रा मजला,
१० शेख हफिअुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २०-०७-२०१० (२२-०७-२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई'विभाग यांच्याकडे मुंबई उच्च न्यायालयाची इमारतीच्या संदर्भामध्ये ऐतिहासिक वास्तू म्हणून कोणत्या तारेखस, कोणत्या महिन्यास, कोणत्या वर्षी घोषित करण्यात आली, त्या भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ किती चौरस मीटर आहे, तसेच भुखंडावर एकूण क्षेत्रफळ किती चौरस मीटर बांधकाम करण्यात आलेले आहे, संबंधीत नव्याने करण्यात येणाऱ्या बांधकामाबाबत जी नियमावली आहे, अेनॅक्स बिल्डिंगवर नव्याने चौथा मजला बांधण्यात आला तसेच संबंधित अेनॅक्स बिल्डिंगच्या दोन्ही बाजूस जुनी बांधकाम तोडून (जे पूर्वी तळ अधिक एक मजल्याचे) नव्याने चौथा मजला पर्यंतचे बांधकाम करण्यात आले सदर बांधकामामुळे एकूण किती

चौरस मीटर बांधकाम नव्याने करण्यात आले, नव्याने करण्यात येणाऱ्या बांधकामाबाबत राज्य शासनाच्या वतीने जो प्रस्ताव दाखल करण्यात आला त्या प्रस्तावाची छायांकित प्रत, नवीन बांधकामास मान्यता देताना मुंबई संस्कृती वारसा जतन समिती कोणकोणत्या निकषात शिथिलता प्रदान केली, मुंबई संस्कृती वारसा जतन समितीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रती, तसेच बांधकाम मंजूरीच्या छाननीपत्रकाची तसेच धारिकेची सत्यप्रत मिळावी अशी माहिती एकूण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती कालावधी सन २०००-२०१० आहे. माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १३-०८-२०१० रोजी मागितलेली माहिती बाबतची धरणी कार्यालयात उपलब्ध आहे. संबंधित धरणी चे अवलोकन हवे असलेले आराखडे व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती खालील शुल्क भरुन आपणांस उपलब्ध करुन घेवू शकता. झेरॉक्स प्रतीसाठी लागणारा खर्च आपणांस करावा लागेल व त्याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.मंजूर आराखड्याच्या व कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसाठी व त्यासाठी जाण्यायेण्यासाठी लागणारा खर्च अर्जदारास करावा लागणार आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २५-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २९-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी खर्च भरावे असे कळविलेले असल्यामुळे व अपिलकर्ता यांनी खर्च भरणा केला नसल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिला सोबत त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे व जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न देता अर्ज निकाली कसा निघू शकतो याचा अर्थबोध होत नाही. अर्जदाराने आपल्या अर्जात स्पष्टपणे कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतींची मागणी केलेली आहे ती पोस्टाने पूर्वसुचना देवून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत संबंधित धारिणीची अवलोकन करुन हवी असलेले आराखडे व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती खालील शुल्क भरुन आपणांस उपलब्ध करुन घेवू शकता. झेरॉक्स प्रतीसाठी लागणारा खर्च आपणांस करावा लागेल. प्रमाणित प्रती हव्या असल्यास खालील शुल्क आकरण्यात येईल या गोष्टीचा संबंधच येत नाही कारण अर्जदाराने अर्जात कुठेही कागदपत्रे बघण्याबाबत वेळ व दिवस याची मागणी केलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्याची टाळाटाळ करीत आहेत. तसेच अर्जदाराने ज्या कागदपत्रांची मागणी केली आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रमाणित प्रतीसाठी रु.२५/- एका बाजूस हे शुल्क कोणत्या हिशोबाने नमुद केले आहे याचा अर्थबोध होत नाही. कारण एका पानांच्या दोन्ही बाजूच्या झेरॉक्स प्रत काढण्यासाठी रु.२/- खर्च येतो व प्रमाणित करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे. तसेच अर्जदाराने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसाठी जो खर्च येतो त्याची एकूण रक्कम नमुद करणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी तसा खर्च नमुद केला असता तर अर्जदाराने व्यक्तीश: किंवा मनीआर्डरने शुल्क पाठविले असते व त्यामुळे तपशीलात नमुद केलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतूदी अन्वये नि:शुल्क देण्याचा आदेशीत व्हावेत व दंडात्मक कारवाई व्हावी असे नमुद केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती अधिकारी २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"**या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येमध्ये कोणत्याही **सार्वजनिक प्राधिकरणाकडे** असलेली किंवा त्याच्या नियत्रंणात असेलेली व अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे व त्यामध्ये १) एखादे काम, दस्तऐवज,अभिलेख यांची पहाणी करणे; २) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखाच्या टिपण्या,

उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे; ३) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे; ४) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉलिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्ट आऊट) मार्फत माहिती मिळविणे याबाबतचा अधिकाराचा समावेश होतो. त्याप्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५ चे **नियम ४** मधील तरतुदीप्रमाणे निरीक्षण करण्याकरीता अपिलकर्ता यांना कळविलेले होते. माहिती जर व्यापक प्रमाणात असेल व जुनी असेल तर निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांची माहिती उपलब्ध करुन घेणे असे त्यांची तरतुद आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्यावे लागते. छायांकित प्रतीच्या संदर्भामध्ये महानगरपालिका यांनी खालील नियमाच्या अनुषंगाने त्यांनी खर्च भरणा व खर्चासंदर्भामध्ये आकरणी कळविण्यात आली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही वैयक्तिक आकरणी करण्यात आलेली नाही. मात्र छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरीता कार्यालयात झेरॉक्स मशीन उपलब्ध नसेल तर त्याकरीता बाजारात जाऊन छायांकित प्रती काढून उपलब्ध करुन द्यावी लागते. त्याकरीता संपुर्ण नस्ती देण्याकरीता कोणत्याही प्रकारच्या वाहतूक वाहन महापालिकेने पुरविलेली नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी महापालिकेतील कर्मचाऱ्यास वाहतूक वाहनाचा खर्च करावा लागतो व वाहतूक वाहनाचा खर्च करण्यासाठी कळविण्यात आले होते. परंतु असे असले तरी महापालिकेस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरीता स्वतंत्रपणे नियम करण्याचा अधिकार नाही. महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या **नियम ४** प्रमाणे प्रत्येक विभागाने नकाशे व आरखडा उपलब्ध करुन देण्याकरीता खर्चाची आकरणी करण्याकरीता नियम केले असतील त्याप्रमाणे नकाशे व आराखड्या करीता खर्चाची आकारणी करणे तसेच A साईज आकाराचे कागदापेक्षा मोठा आकार असेल तर प्रत्यक्ष झेरॉक्स आकरणी खर्च व टपाल खर्च व नेहमीच्या आकाराचा कागद असेल व माहिती तयार असेल रु.२/- प्रती पृष्ठे आकरण्यात यावी अशी तरतूद आहे व त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्याच प्रमाणे आकारणी करणे आवश्यक होते. प्रमाणित करणे व सांक्षाकित करणे यामध्ये निश्चित फरक आहे. प्रमाणित करुन द्यावयची असेल तर पुर्वीच्या नियमाप्रमाणे आकरणी करणे आवश्यक असते. परंतु सांक्षाकित करण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे अतिरिक्त शुल्क घेणे अपेक्षित नाही. सांक्षाकित करणे यांचा अर्थ **"माहिती अधिकारात"** छायांकित प्रती उपलब्ध करुन दिली व प्रत्येक अशाप्रकारे स्वाक्षरी करुन देणे व त्याप्रमाणे अतिरिक्त खर्च पुन्हा भरणे आवश्यक नाही. अपिलकर्ता यांनी निरीक्षण करावे असे जे कळविलेले आहे ते राज्याच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे असल्याने माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे असे निकष काढण्यात येत नाही. त्यांनी वरील युक्तीवादाप्रमाणे त्यांना जी माहिती हवी आहे ती प्रती पृष्ठे संख्या कळवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्या अधिनियमाचे **कलम ७(३)** प्रमाणे मागितलेली माहितीचे मुद्देनिहाय संदर्भामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांची संख्या व प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे व तसे टपाल खर्च अपिलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते व त्याप्रमाणे कळविल्यावर अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश-----

१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांनी मागितलेली माहिती एकूण ८ मुद्यांच्या संदर्भामध्ये जी धारिणी असेल त्या धारिणीमध्ये असलेले एकूण कागदपत्रांची संख्या विवरण व प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे खर्चाची आकारणी तसेच नकाश किंवा आराखडा असेल त्याप्रमाणे आकारण्यात यावयाची फी व टपालखर्च आकारण्यात यावा. तसे कळविल्यानंतर अपिलकर्ता यांनी संबंधित खर्चाचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांना कळविल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्या छायांकित प्रती काढून अपिलकर्ता यांना नोंदणीकृत टपालाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५०१४४/अपिलक्र ६३३६/२०१०

श्री.दिलीप बी. नेवाटिया,
शशी दीप, ५-A, वरळी सीफेस,
मुंबई ३ ४०० ०३०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३.

जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३. ..उत्तरवादी

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उद्योग भवन, प्लॉट नं.२५०-D, S.No.१६२९, वरळी इस्टेट, मुंबई च्या संदर्भामध्ये असलेली कागदपत्रे देयके, नोटीस, अभिलेखे, पत्रव्यवहार च्या संदर्भामध्ये निरीक्षण करुन आवश्यक असेलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देण्याबद्दल तसेच वर्षनिहाय निरीक्षण व मजले निहाय निरीक्षण दिनांक ०१-०४-२००४ व ३१-०३-२०१० काळावधीतील तसेच अर्ध वर्षिक देयके दिनांक ०१-०४-२००४ तसेच एकूण १५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २३-०४-२०१० रोजी दिनांक ०६-०५-२०१० रोजी वेळ ११.०० ते ५.०० काळावधीत आपण मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये निरीक्षणाची फी भरुन माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर निरीक्षणाअंती दिनांक २१-०५-२०१०

रोजी अपिलकर्ता यांनी त्यांना आवश्यक असेलेली कागदपत्रांच्या प्रमाणित छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी जी य़ादी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिली. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक ०२-०६-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला नाही. अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. मात्र दिनांक १९-०६-२०१० रोजी अपिलकर्ता यांना संपुर्ण माहितीचा अतिरिक्त खर्च रु.१११४६/- (रु.२३०/- प्रत्येक मालमत्ता प्रत्येक वर्षाकरीता व त्यानंतर रु.२/- छायांकित प्रती व रु.५०/- प्रमाणित प्रती करीता) कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २८-०७-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. दिनांक ११-०८-२०१० रोजी पुन्हा अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलीय अधिकारी च्या संदर्भात --- कळवून मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग यांचे दिनांक ०९-०७-२०१० चा निर्णय देण्याचे निदर्शनास आणण्यात आले व त्याप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी प्रथम अपिलाचा निर्णय देवून माहिती अधिकारातंर्गत प्रती देण्याबाबत करनिर्धारक व संकलन खात्याच्या परिपत्राकानुसार अपिलकारास पाठविलेले उत्तर बरोबर आहे. त्यानुसार करनिर्धारक व संकलन खात्याकडील माहिती अधिकारांर्गत द्यावयाच्या प्रतीबाबत प्रसारित करण्यात आलेल्या परिपत्रकाची प्रत अपिलकारास देण्यात यावी. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या बाबीबाबत अपिलकार समाधानी असल्यामुळे अपिल निकीलात काढण्यात येत आहे असे सुनावणी दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी जी आकारणी केलेली आहे ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे केलेली नाही व त्यामुळे त्यांनी आकारणी रक्कमेची भरणा केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास येणाऱ्या खर्चाकरीता नियम केलेले आहे व त्या नियमाप्रमाणे / परिपत्रकाप्रमाणेच आकारणी करण्यात आलेली आहे. परंतु सदरची आकारणी ही अवाजवी आहे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असे नियमात म्हटले असल्यामुळे त्याप्रमाणे आकारणी करणे संयुक्तिक राहील. तसे प्रमाणित करण्याकरीता खर्च आकारणी ही सुद्धा योग्य नाही. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे पुन्हा युक्तीवाद केला, माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी, कलम ६ अन्वये माहिती मिळवण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणतीही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसांच्या आत, एकतर विहित करण्यात येईल अशा फीचे प्रदान केल्यावर माहिती देईल, तसेच पोटकलम (३) मध्ये माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असेल त्याबाबतीत राज्य जन माहिती अधिकारी यांनी पोटकलम (१) अन्वये विहित केलेली फी नुसार जादा रक्कम त्याने कशाच्या आधारे ठरविली त्या हिशेबासह, माहिती पुरविण्याचा त्यांने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशील व त्याद्वारे त्यांना फी भरण्याची विनंती करेल अशी तरतुद आहे. पोटकलम (१) प्रमाणे विहित करण्यात आलेली अशी फी आकरण्याचा आर्थिक देय कलम २७(२) अन्वये पोटकलम २ (--) अन्वये फी च्या संदर्भामध्ये समुचित शासनाला नियम करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे समुचित शासनाने महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ हे पारित केलेले आहे व त्या नियमाचे कलम ४ प्रमाणे खालील प्रमाणे तरतूद आहे. ‘‘----------’’

वरील तरतुदीप्रमाणे महापालिकेने नकाशे व आराखड्या करीता जर खर्च आकारणी करण्याकरीता नियम केले असतील त्या नियमाप्रमाणे फी आकारणे संयुक्तिक राहील. त्या नंतर कोणत्याही प्रकारचे नियम माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे करण्याचा अधिकार हा महापालिकेस नाही. त्याचप्रमाणे माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात प्रत्यक्ष तयार आहे त्या करीता प्रति पृष्ठ रु.२/-, परंतु जर कागदाचा आकार A ४ पेक्षा जास्त असेल प्रत्यक्ष छायांकित प्रतीच्या खर्च व आकरणी खर्च अशी तरतूद आहे. प्रमाणित करुन देण्याकरीता कोणत्याही प्रकारचे आकारणीची तरतूद नियमात नाही व त्यामुळे A४ आकाराचा कागदप्रतीच्या स्वरुपात जर माहिती उपलब्ध असेलतर प्रति पृष्ठे रु.२/- व त्यापेक्षा मोठ्या आकाराचा कागद असेल त्या छायांकित प्रतीचा खर्च, टपाल खर्च व नकाशा व आराखडा आकारण्यात येणारा खर्च करणे संयुक्तिक राहील. प्रमाणित करण्याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारात छायांकित प्रती उपलब्ध करुन दिली व धारिका यांची सांक्षाकित करुन देणे आवश्यक आहे व त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त खर्च आकारणे योग्य होणार नाही. तसेच वाहतुक वाहनाचा खर्च सुद्धा आकारण्यात येणार नाही. सांक्षाकित करण्याकरीता महापालिकेच्या नियमाप्रमाणे आकारणी केली असेल तर आयोगाच्या नियमात म्हटले असेल तर महापालिकेने आकारणी केलेला खर्च हा अवाजवी दिसून येतो. प्रमाणित करणे व सांक्षाकित करणे यामध्ये निश्चितच फरक

आहे. प्रमाणित करुन द्यावयाची असल्यास खर्च आकरणी करणे योग्य आहे. परंतु सांक्षाकित करण्याच्या संदर्भाम्ध्ये वर नमुद केल्याप्रमाणे धारिकेची आकारणी करणे आवश्यक नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

१) **अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांनी आवश्यक असलेल्या कागदपत्रांचा खर्च हा वर विवेचन केल्याप्रमाणे आकारणी करण्यात यावी.**

२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६२/अपिलक्र ६३३५/२०१०

श्री.सुभाष यशवंत मोरे,
सी-६०३, विनस अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि.,
चोगले नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ..उत्तरवादी

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वैद्यकीय अधिकारी गट-ब पदे सामान्य प्रशासन विभाग निर्णयानुसार गट-अ अंतभूत केल्याबाबतची प्रत मिळणे, सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय क्र.संघट-१०९६/२८३/२६९६/सेवा-६, दिनांक १७ जुलै १९९६ ची माहिती समक्ष घेणार, तसेच दिनांक १३-०७-२०१० रोजीच्या अर्जावर काय कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे अशी माहिती मागितलेली दिसून येते.विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथमअपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अर्जदाराने दाखल केलेला अर्ज हा दिनांक १३-०७-२०१० रोजी जर दाखल केला असेल तर तो वेगवेगळया शाखामधुन माहितीचा अधिकार म्हणून दिनांक १५-०९-२०१० रोजी प्राप्त झाला व त्यानुसार दिनांक १०-१०-२०१० च्या पत्रान्वये अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच पुन्हा माहितीची छायांकित प्रत अस्पष्ट असल्याबाबत त्यांनी पुन्हा दिनांक २३-११-२०१० रोजी सदर शासन निर्णयाची स्वच्छप्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव कार्यासन सेवा - १ यांच्याकडे अद्याप प्राप्त झालेला नाही व अपिलावर निर्णय देता आलेला नाही. सदर अपिलाच्या सुनावणीची नोटीस शाखेच्य चुकीमुळे अन्य अपिलीय प्राधिकारी व उप सचिव यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व अपिलकर्ता आज गैरहजर असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

१) अपिल निकाली काढण्यात येते.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६३/अपिलक्र ६३३४/२०१०

श्री.संतोष कुमार तिवारी,
सी-०४, न्यु मीरा पॅराडाईज,
गिता नगर, मिरा-भाईंदर रोड,
मिरा रोड (पूर्व), ठाणे. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कस्तुरबा क्रॉस रोड नं. २, कस्तुरबा म्युनिसिपल स्कुल नं.२,
सभागृह,तळमजला, बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कस्तुरबा क्रॉस रोड नं. २, कस्तुरबा म्युनिसिपल स्कुल नं.२,
सभागृह,तळमजला, बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६. **...उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :२९.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

अपिलकर्ता यांनी दिनांक १६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे आतापर्यंत प्रकल्प जातीच्या संदर्भातील किती प्रमाणेपत्र निर्गमित केले व सर्व जातीच्या प्रमाणप्रत्रांची छायांकित प्रती व श्री. किशोर संखे यांनी सही केलेल्या प्रमाणपत्रांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच श्री. किशोर संखे यांनी सही अधिकारी असल्याने प्रमाणपत्र सुद्धा उपलब्ध करुन देण्यात यावी. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०२-०८-२०१० रोजी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये एकूण जातीचे प्रमाणपत्रे नस्तीचे १३०० x १० कागदपत्रे झेरॉक्स प्रती एकूण १३००० व प्रत्येक प्रतीसाठी प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे रु २६०००/- चा भरणा करावा

असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव दिनांक २४-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक ०२-०८-२०१० चे पत्र आहे ते १० व्या महिन्यात प्राप्त झालेले आहे. परंतु त्यांनी दाखविलेले स्टॅम्प चे अवलोकन केले असता १० आकडा हा वर्षाचा असून महिना ८ च दिसून येतो व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी जावक नोंद वहीची तपासणी केली असता त्यामध्ये ऑगस्ट महिन्यात जावक नोंदणी क्रमांक घेऊन निर्गमित केलेले दिसून येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्च भरणा करावा असे केलेले दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही केलेली असून माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली नाही असा निकष काढावा लागतो. त्याकरीता अपिलकर्ता यांचे हित सदरचा खर्च भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) **अपिल निकाली काढण्यात येते.**

२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/१५३२/तक्रार क्र.८

श्रीमती विशाखा विनायक इंगळे,
बी/६, अलंकार को.ऑ.हौ.सोसा.(लि.),
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),
मुंबई -४०० ०८९. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१.
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),
एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

तक्रारदार यांनी त्यांचे दिनांक ११-०५-२०१० रोजीच्या प्रशासकीय अधिकारी (शाळा) एम/पश्चिम तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाचे कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या संदर्भामध्ये दिनांक ०५-०१-२०११ रोजी आयोगाच्या कार्यालयातून सुनावणीची नोटीस देण्यात आली होती त्या तक्रारीची आज सुनावणी देण्यात आली.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी त्यांच्या स्वत:च्या सेवा पुस्तकाची छायांकित प्रमाणित सत्यप्रत मागितलेली होती. सदरची छायांकित प्रती व्यक्तीश: घेणार असे नमुद केलेले होते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२०१० रोजी कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका हा वैयक्तिक स्वरुपाची कार्यालयीन अभिलेखे असल्यामुळे याबाबतच्या नोंदी, उतारे ह्या कागदपत्रांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती देणे शक्य नाही. परंतु त्यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. परंतु त्यांनी स्वत:ची सेवा पुस्तिकेची प्रत मागितलेली असल्यामुळे ते कोणत्याही प्रकारे गोपनीय असू शकत नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीचे **कलम ८** मधील माहिती प्रकट करण्याचा अपवादामधील मुद्यां संदर्भामध्ये समाविष्ठ होत नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका ही त्यांची वैयक्तिक बाब असल्यामुळे ती गोपनीय असते व त्यामुळे ती उपलब्ध करुन देणे ते योग्य नाही.

परंतु कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी हा सार्वजनिक सेवक असल्यामुळे व सार्वजनिक सेवा करीता असल्यामुळे त्यांची स्वत:ची सेवा पुस्तिका ही सार्वजनिक अभिलेखांची भाग होते व त्यामुळे सदरची सेवा पुस्तिका ही गोपनीय नाही व ती त्यांच्या कर्मचाऱ्यांची किंवा अधिकाऱ्यास ऐरवी सुद्धा उपलब्ध करुन दिली जाते व त्यामुळे तक्रारदारास त्यांनी मागितलेली स्वत:ची सेवा पुस्तिकेची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) **तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ११-०५-२०१० रोजीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती व्यक्तिशः उपलब्ध करण्यात येईल. त्याकरीता हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत तक्रारदार यांनी व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

२) **तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२१०७/तक्रार क्र.९

श्रीमती विशाखा विनायक इंगळे,
बी/६, अलंकार को.ऑ.हौ.सोसा.(लि.),
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),
मुंबई -४०० ०८९. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक महापालिका आयुक्त,
एम/पश्चिम विभाग, एम विभाग कार्यालय इमारत,
शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१.
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),
एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

तक्रारदार यांनी दिनांक २६-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा) एम/पश्चिम यांच्याकडे, स्टेशन चेंबूर मनपा मराठी शाळा क्रमांक २ येथील शिक्षक कर्मचारी यांचे वार्षिक मुल्यमापन तसेच वार्षिक तपासणी अहवाल (inspection) अहवाल इत्यादी तुलनात्मक तक्ता यांच्या छायांकित प्रती मागितलेली असून माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ११-०५-२०१० रोजी सहाय्यक आयुक्त यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय माहिती दिली असल्यामुळे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु तक्रारदार यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयाविरुद्ध द्वितीय अपिल दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. वास्तविक तक्रारदार यांनी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे द्वितीय अपिल दाखल करणे आवश्यक होते.

तक्रारदार यांनी आयोगाच्या सुनावणीस असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना कुरिअर

ने माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला होता व त्याबाबतचा पत्र क्रमांक एम /प / ९३४५ दिनांक २०-०४-२०१० आहे व माहिती त्यांनी कुरिअर मार्फत घेतली नाही. कुरिअर परत आलेले आहे. तरीही सदरची माहिती ही प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्याकडे उपलब्ध नसते. प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्याकडे तपासून दिलेली आहे किंवा याबद्दलची माहिती मिळू शकते. परंतु अहवाल हा त्या त्या शाळेतच उपलब्ध असतो व त्या शाळेचे मुख्यध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी सदरची तपासणी अहवाल हा त्या शाळेच्या मुख्यध्यापकाकडे मागणे संयुक्तिक झाले असते व त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी संबंधित शाळेकडेच जाणे आवश्यक असल्याने माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

----- आदेश -----

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२९८९/तक्रार क्र.३३

श्री.दिगंबर शंकर गिरमे,
सिटी सर्व्हे नं. ४२२, कसबा पेठ,
पुणे -४११ ०११. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,
गृह विभाग (पोल-१३),
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पोल-१३),
गृह विभाग (पोल-१३),
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

तक्ररदार यांनी त्यांचे अपिल क्रमांक २००९/५५२२/०२ चे दिनांक २०-०८-२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे तक्रार दाखल केलेली दिसून येते.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी गृहविभाग यांनी तक्रारदार यांना दिनांक ०९-०९-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे, विधी व न्याय विभाग यांनी सामान्य प्रशासन विभाग यांना

दिलेल्या अर्जाबाबत गृहविभागाने माहिती द्यावी असा आग्रह धरलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे अन्वये माहिती ज्या विभागाशी संबंधित आहे त्याच विभागाशी अर्जदाराने संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे असे असले तरी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२९९०/तक्रार क्र.३४

श्री.दिगंबर शंकर गिरमे,
सिटी सर्व्हे नं. ४२२, कसबा पेठ,
पुणे -४११ ०११. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस संचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा उप-सहाय्यक पोलीस महानिरिक्षक (गोप.),
पोलीस संचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

तक्ररदार यांनी त्यांचे अपिल क्रमांक २००९/५५०३/०२ चे दिनांक १८-०८-२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली दिसून येते.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना आतापर्यंत संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु तक्रारदार यांची गुणवत्तेच्या संदर्भामध्ये व निर्णय प्रक्रीयेच्या संदर्भामध्ये तक्रार आहे.

तक्रारदार यांनी सुद्धा युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये योग्यरीत्या तपास कार्यवाही केलेली नाही. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती दिल्यास, दिलेली माहिती ही कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेबाबत किंवा निर्णय प्रक्रीयेबाबत आयोगाकडे मुद्दे उपस्थित करता येते नाही. आयोग हे न्यायालय किंवा तक्रार निवारण केंद्र सुद्धा नाही व त्यामुळे तक्रारदार यांना अपिलाचा निर्णयाप्रमाणे पोलीस आयुक्त पुणे यांच्याकडून आलेल्या उत्तराची प्रत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदर तक्रार ही निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००५६/अपिलक्र ६२९२/२०१०

श्री.जगजीतसिंग काहलोन,
सचिव-सोसायटी फॉर अवेरनेस ऑफ सिव्हील राईटस्,
जे-२२०,अन्सा, साकी विहार रोड,
साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त (मुख्यालय),
अन्न आणि औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांचे कार्यालय,
बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (मुख्यालय),
अन्न आणि औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांचे कार्यालय,
बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०२.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी अन्न व औषध यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

a. Please provide access to the copies of the licenses issued by the competent authority under the NDPS Act 1985 and Maharashtra NDPS rules 1985 in Form OP-I,!! including sub sections of various allottees of codeine Phosphate in above period. Provide Xerox copies of requested info thereafter.
b. Provide access to the reports of the inspection carried our by the Officers of FDA who have inspected the consignments of the Narcotic Drugs under the Maharashtra NDPS rules 1985 section 79(4) at various establishments in the said period.
c. Provide access and inspection of file on the letter of intimation received from the Superintendent of Factories Govt. Opium and Alkloid factories to the state Drugs Controller on despatch of material codeine phosphate to the Mfgrers (allotees) as required under section 79(4) of the MNDPS rules 1985.

सदर अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०४-०८-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २४-०९-२०१० रोजी दिलेला असून त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचे विश्लेषण करुन निर्णय दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुख्यालयासह राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयाशी निगडीत आहे. अर्जदारास मुख्यालयाशी निगडीत ७ पृष्ठे दिनांक ०४-०८-२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दिनांक ०६-०९-२००८ चे आधारे प्रशासनाचे महाराष्ट्रातील इतर जिल्हा कार्यालयाकडे माहितीसाठी संबंधित जन माहिती अधिका-याकडे स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक होते व तसे त्यांनी कळविलेले असून सर्व कार्यालयाचे पत्ते दिलेले आहे. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती मुख्यालयामध्ये उपलब्ध नसते. ती त्या त्या जिल्हा कार्यालयात उपलब्ध असते व ती त्या त्या जिल्हा कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. सर्व महाराष्ट्रातील कार्यालयातील माहिती ती संकलित करुन देणे सुद्धा अशक्य आहे व तसे त्यांनी कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलाचा निर्णयामध्ये सुद्धा त्याबाबत अपिलकर्ता यांना विवेचन करुन निर्णय दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अन्न व औषध प्रशासनातील सर्व जन माहिती अधिकारी हे मुख्यालय या एकाच प्राधिकरणात येतात. त्यामुळे प्रशासनाच्या महाराष्ट्रातील सर्व कार्यालयाची माहिती प्रतिवादी यांनी देणे आवश्यक आहे. इतर कार्यालयांना माहिती देण्यासाठी अर्ज करण्यास सुचविणे योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा सांगितले की, राज्यातील विविध कार्यालयातुन या विषयाच्या धारीका मागवून अर्जदारास तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे व अभिलेखाच्या छायांकित प्रती अर्जदारास उपलब्ध करुन देणे हे अव्यवहारर्य आहे व निश्चितच माहितीचा अधिकार कक्षेत येत नाही. माहितीचा अधिकार कायदा कलम २(एच) मधील सार्वजनिक प्राधिकरणाची व्याख्या पाहता या कायद्यासाठी बांद्रा पूर्व मुंबई ५१ येथील प्रशासनाचे मुख्यालय हे एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे. विभागीय कार्यालये व जिल्हा कार्यालये हे सुद्धा शासनाचे आदेशानुसार स्थापीत / गठीत करण्यात आलेली आहेत. शासनद्वारे त्या त्या कार्यालयासाठी स्वतंत्र निधी, मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जाते. त्यामुळे प्रशासनाची सर्व विभागीय व जिल्हा कार्यालयेसुद्धा संबंधित कार्यक्षेत्रासाठी माहितीचा अधिकार कायद्यासाठी स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहेत. मुख्यालयातील जन माहिती अधिकारी हे औषध विभागासाठी जन माहिती अधिकारी आहेत. राज्यातील इतर जन माहिती अधिकारी हे त्यांच्या कार्यकक्षेत व अधिपत्याखाली येत नाहीत. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दिनांक ०६-०९-२००८ मध्ये अर्ज केवळ एकाच सार्वजनिक प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची बाब स्पष्ट केली आहे. कलम ६(३) मध्ये अन्य संबंधित प्राधिकरण याबाबत असणारा उल्लेख एकवचनी आहे. जेथे अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित असेल, तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरित करणे आवश्यक नाही. तसेच

अर्जदाराचा अर्ज मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एनडीपीएस ॲक्ट व नियमांतर्गत माहितीचा तपशील असून प्रशासनाचे विविध कार्यालयाने (अनेक कार्यालय) दिलेले परवाने, केलेल्या तपासणी इत्यादिंशी निगडीत आहे. महाराष्ट्र एनडीपीएस नियम १९८५ अतंर्गत जिल्हा कार्यालयातील सहाय्यक आयुक्त हे अनुज्ञाप्ती प्राधिकारी असून अशा अनुज्ञाप्ती सादर करणाऱ्या संस्थांच्या तपासणी त्यात्या कार्यालयातील अधिकारी करतात. त्यामुळे संबंधित कागदपत्रे धारीका त्या त्या जिल्हा व विभागीय कार्यालयाकडेच असतात. नियमितपणे अशा धारिका अथवा त्यांच्या प्रती मुख्यालयात ठेवल्या जात नाहीत. तशी आवश्यकताही नाही व असे कागदपत्र मुख्यालयात ठेवणेही अव्यवहार्य, अनावश्यक व शासकीय यंत्रणेचा वेळ व पैसा खर्च करणारी बाब आहे. त्यामुळे अर्जदाराने मागणी केलेली संपुर्ण राज्यातील जिल्हा कार्यालयीची माहिती मुख्यालयाकडे उपलब्ध नसते.

वरील युक्तीवादा प्रमाणे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अन्न व औषध प्रशासनाच्या मुख्यलायामध्ये निश्चितपणे उपलब्ध नसते. तसेच अन्न व औषध प्रशासन हे जर एकाच विषयाकरीता सार्वजनिक प्राधिकारण असले तर मुख्यालयामध्ये नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी त्या मुख्यालयातील उपलब्ध असलेल्या माहिती करीता जन माहिती अधिकारी आहेत. कोणत्याही विभागात कोणत्याही कायाद्याची अंमलबजावणी करावयाची असल्यास मुख्यालय तसेच त्या विभागातील अन्य प्रशासकीस विभाग व जिल्हा कार्यालये यांच्यातील अधिकारी किंवा कर्मचारी यांना त्या कायद्याची अंमलबजावणीच्या संदर्भामध्ये अधिकार दिलेले असतात व त्यात्या कार्यक्षेत्रामध्ये त्याप्रमाणे त्या अधिनियांमाच्या तरतुदीची अंमलबजावणीचे अधिकार हे स्वतंत्र असते व त्यामुळे त्यांनी केलेली स्वतंत्र कार्यवाही ही त्या कार्यालयाची माहिती होते. ती कार्यालयाच्या नियत्रंणात खालील माहिती आहे व त्यामुळे त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणे संयुक्तिक असते. सर्व राज्य व्यापी माहिती एकाच जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे ही बाब सर्वस्वी अव्यवहार्य व अशक्य आहे. याची संसदेन अधिनियम करताना सुद्धा विचारात घेऊनच ३० दिवसांची मुदत दिलेली आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (१) अन्वये जन माहिती अधिकारी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकारणामध्ये माहिती देण्यासाठी त्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना, राज्य जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील अशी तरतूद आहे. ही तरतुद वरीलप्रमाणे गृहित धरण्याकरीता आलेली आहे. अन्यथा प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणात एकच जन माहिती अधिकारी नियुक्त करावे असे संसदेने पारित केले असते व त्या तरतुदीप्रमाणेच जन माहिती अधिकारी यांनी अन्न व औषध प्रशासनाची अखत्यारीतील निरनिराळ्या जन माहिती अधिकारी त्या त्या स्तरावर नियुक्त केलेले आहेत व त्यांच्याकडे माहिती मागावी असे जे कळविलेले आहे ते योग्य आहे.पुढे जाऊन अधिनियमाचे कलम ६ (१) मध्ये माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीने संबंधित सार्वजनिक प्राधिकारणाच्या राज्य जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे व असा अर्ज सादर केल्यानंतर अधिनियम ७ (१) प्रमाणे ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे व कलम ५(१), कलम ६(१) व कलम ७ (१) यांचे एकत्रित विचार केल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यास ती ३० दिवसामध्ये उपलब्ध होवू शकेल असा अर्जाचा अर्थ लावावा लागतो. अन्यथा

सर्व राज्यातील वेगवेगळ्या कार्यालयातील माहिती ही एकत्रित करुन किंवा संकलित करुन ३० दिवसांमध्ये उपलब्ध करुन देणे शक्य नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांच्या मुख्यालयातील कार्यासनाकडुन उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणजे त्यांना माहिती योग्यरीत्या पुरविलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जी उर्वरित माहिती ही त्या त्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) अपिल निकाली काढण्यात येते.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/४६४/तक्रार क्र.१६४२

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक २०-०३-२०१० रोजी त्यांचे दिनांक २५-०१-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलबध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार २००५ चे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी त्यांचे दिनांक २५-०१-२०१० च्या अर्जामध्ये, १) महाराष्ट्र राज्याच्या अंतर्गत कोणतेही आयोग स्थापन केले आणि त्या आयोगाचे अधिसुचना अथवा शासन निर्णय न करता त्या आयोगाचे कामकाज सुरु झाले व त्या आयोगांच्या मार्फत न्यायदान सुध्दा चालूच राहिले तर त्या आयोगांचे स्थापना अधिसुचने शिवाय कामकाज कायदेशीर आहे ही कोणत्या नियमाने ठरले त्या नियमांची सविस्तर माहिती, २) राज्य माहिती

आयोगाची स्थापनेची अधिसुचना काढण्याबाबत कोणा कर्मचाऱ्यांस नियुक्त केले होते व त्यांनी सदर राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची अधिसुचना जी काढली नाही त्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत घ्याची माहिती, ३) अधिसुचना काढण्याबाबतचे कार्य ज्या संबंधित कर्मचाऱ्यांचे असते ते कार्य त्या संबंधित कर्मचारी ह्यांनी केले नाही, ४) कोणत्याही आयोगाची अधिसुचना काढल्यामुळे नेमक्या कशा प्रकारची प्रशासकीय कामकाज सुधारणा व सुलभता होते ह्याची माहिती.,५) राज्य माहिती आयोग बाबतची अधिसुचना अजूनपर्यंत काढलेली नाही म्हणून आता राज्य माहिती आयोगाच्या स्थापने संबंधीची अधिसुचना काढण्याचे प्रस्तावित अथवा ठरलेले आहे काय ह्याची माहिती, ६) राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची व त्या अनुषंगाने त्याने केलेले कार्य अधिसुचना न काढता अथवा अधिसुचना त्याच्या अंतर्गत जो कारभार चालू आहे ती कायदेशीर व अधिकृत कोणत्या नियमामुळे ठरले ह्याची माहिती, ७) राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची अधिसुचना काढण्यात आलेली नाही व विना अधिसुचनेचे शिवाय राज्य माहिती आयोग कामकाज गैरकामकाज म्हणजे बेकायदेशीर कामकाज त्या आयोगाचे ठरावे म्हणून कोणा समक्ष दाद मागावयाची आहे ह्याची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने दिनांक ०६-०३-२०१० रोजी आपल्या अर्जातील इतर मुद्यांद्वारे आपण विविध बाबींवर निम्नस्वाक्षरीतांचे भाष्य अपेक्षिली असून माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येत ते मोडत नाही. त्यामुळे त्याबाबत आपणांस माहिती देता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे माहितीचाअधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, राज्य माहिती आयोगाचे मुख्य आयुक्त यांची नियुक्ती झाली परंतु राज्य माहिती आयोगाची स्थापना अधिसुचना अद्याप काढण्यात आलेली नाही व त्यामुळेच एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांचे भाष्य माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे अपेक्षित नाही. माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अधिसुचना काढण्यात आलेली नाही हे खरे आहे. परंतु या संदर्भातील कायदेशीर व बेकायदेशीर परिणामाच्या संदर्भातील तक्रारदार यांचे मत विचारलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) (ञ) प्रमाणे **" माहिती"** व **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे मिळविता येण्याजोगी **"माहिती"** आणि त्यात कागदपत्रे, दस्तऐवज अभिलेखे यांचे निरीक्षण करणे छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व **कलम २(च)** मध्ये **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या असून त्या संज्ञेमध्ये साहित्याच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज स्वरुपात इत्यादीचा समावेश होतो यांचे निरीक्षण करुन छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे. परंतु तक्रारदार यांनी जर माहिती अधिकारी यांचा जो अभिप्राय मागितलेला आहे तो वरील दोन्ही व्याख्येमध्ये अपेक्षित नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही व तसे त्यांनी कळविलेले आहे असे असेल तर तक्रारदार यांचे दिनांक २५-०१-२०१० चा माहिती अर्जामध्ये मुद्या क्र. २ मध्ये राज्य माहिती आयोगाची स्थापनेची अधिसुचना काढण्याबाबत कोण कर्मचाऱ्यांस नियुक्त केले होते व त्यांनी सदर राज्य माहिती आयोगाची स्थापनेची अधिसुचना जी काढली नाही त्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहे याची माहिती मात्र उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. राज्य माहिती आयोगाची स्थापना किंवा राज्य मुख्य आयुक्तांची नियुक्तीची तारीख दिलेली असेल त्या तारखेस सदर विषयांच्या संदर्भामध्ये ज्या अधिकाऱ्यांने कार्यवाही करणे आवश्यक होते अशा अधिकाऱ्यांने माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्याप्रमाणे उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याप्रमाणे तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत तक्रारदार यांचे दिनांक २५-०१-२०१० च्या अर्जातील मुद्या क्र. २ च्या संदर्भामध्ये माहिती ही विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२४१७/तक्रार क्र.१६३९

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन,
बॅकबे रेक्लमेशन, विधानभवन मार्ग, मुंबई ४०० ०३२.
जन माहिती अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधान मंडळ सचिवालय यांच्याकडे, चालू पावसाळी अधिवेशनामध्ये जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती व तालुका स्तरीय भ्रष्टाचार समितीच्या संबंधी कोणासदस्याने सभागृहापुढे प्रश्न उपस्थित केला ह्याची माहिती

द्यावी. चालू पावसाळी अधिवेशनामध्ये सरकारी कर्मचारी त्याच्या सरकारी कार्यालयामध्ये खाजगी सेवक ठेवून कामकाज करतात म्हणून ह्या संबंधी कोणासदस्याने प्रश्न उपस्थित सभागृहात केला व त्यावर कोणी कशा प्रकारे खुलासा केला ह्याची माहिती, महाराष्ट्र विधानसभा मधील सदस्यांची पक्षनिहाय यादी आज रोजीपर्यंतची अर्जदारास हवी आहे त्याचा दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांकासह, महाराष्ट्र विधानसभेचे जे सदस्य आहेत त्याच्या निवडीचे नियम आणि त्यांनी सभेच्यामध्ये कोणते नियम पाळायचे आहेत ह्या सर्वाची सविस्तर माहिती, महाराष्ट्र विधानसभेचे जे नियम व कामकाज नियम जे आहेत त्या नियमावली अर्जदारास हवी आहे, महाराष्ट्र विधानसभेमध्ये महाराष्ट्र विधान सभा चालू झाल्यापासून आजपर्यंत कोणा सदस्याने पिटीशन कमिटी समोर पिटीशन दाखल केलेली आहेत त्या सदस्याची नावे व एकूण किती पिटीशन आजपर्यंत सदर कमिटी समोर दाखल झालेली होते व यापैकी किती प्रलंबित आहेत याबद्दलची सविस्तर माहिती,सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र विधानसभा / मंडळाच्यामध्ये पिटीशन कमिटीचे कोण सदस्य आहेत व किती आहेत त्यांची नावे काय आहेत यांची सविस्तर माहिती, महाराष्ट्र विधान परिषदेच्या पिटिशन कमिटी पुढे आलेल्या पिटीशनचे किती कालावधीमध्ये त्या पिटिशनवर निर्णय होतो त्या कालावधीची माहिती, माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी दिनांक २६-०८-२०१० रोजीच्या मागणी केलेल्या माहितीसंदर्भात पाठवावयाच्या माहितीच्या प्रती व पुस्तिका यांचा खर्च रु.१९५/- तसेच रजिस्टर टपालखर्च रु.१८०/- असे एकूण रु.३७५/- (रक्कम रुपये तीनशे पंच्याहत्तर फक्त) खालील स्वाक्षरी करणारे शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे रोखीने जमा करावेत अथवा उक्त रकमेचा ''कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी'' महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (Section Officer and Drawing and Disbursing Officer, Maharashtra Legislature Secretariat) यांना देय असलेला धनादेश वा धनाकर्ष पाठवावा, जेनेकरुन आपणांस हवी असलेली माहिती नोंदणीकृत टपालद्वारे पाठविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. तसेच मुद्या क्र. ३ च्या संदर्भामध्ये माहिती ही सामान्य प्रशासन विभागात असल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले होते. गैरतक्रारदार यांनी आयोगापढे असे सांगितले की, अर्जदाराने मागितलेली माहिती ही विधानमंडळ सचिवालयाच्या विविध ७ कक्षांशी संबंधित होती व त्या कक्षांकडुन दिनांक २५-०८-२०१० माहिती प्राप्त झाली. त्यानंतर लगेच माहिती तयार असून ती विहित शुल्क अदा करुन प्राप्त करुन घ्यावी असे अर्जदारास दिनांक २६-०८-२०१० रोजी म्हणजेच विहित मुदतीत माहिती घेऊन जाण्यास कळविण्यात आले. इतकेच नव्हेतर अर्जादाराशी त्यांचे भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधुन माहिती घेऊन जाण्याची विनंती केल्यावर ''मी विधान भवन कार्यालयात येऊन माहिती घेऊन जातो'' असे सांगुन सुद्धा दिनांक १८-०९-२०१० च्या पत्रान्वये माहिती अधिकाराच्या विहित कालावधीत माहिती पुरवलेली नाही, प्रयत्न केला आहे म्हणून आपण मला सदरची माहिती नि:शुल्क द्यावी. त्यावर या सचिवालयाने अर्जदारास, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे विहित कालावधीतच म्हणजे ३० दिवसांत कळविलेले असल्यामुळे नि:शुल्क माहिती मिळण्याबाबतची आपली मागणी मान्य करता येत नाही असे कळवून पूर्वी कळविल्यानुसार विहीत शुल्क अदा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी

असे कळविल्याचे दिसुन येते. त्यानंतर अर्जदाराने दिनांक ०४-११-२०१० रोजी शुल्क फी अदा करुन माहिती घेतलेली आहे. त्यानंतर विधानमंडळ सचिवालाच्या अपिलीय अधिकाऱ्यांकडे प्रथम वा कोणतेही अपिल दाखल केलेले नाही. सामान्य प्रशासन विभागाची माहिती सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २६-०८-२०१० रोजी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सुद्धा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे मात्र तक्रार दाखल केलेली आहे. त्या तक्रारीमध्ये त्यांनी शुल्कांचे पत्र विलंबाने मिळाले व त्यामुळे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्यामुळे शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केली.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ७(३)** प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी खर्च विवरण ज्या तारखेला अर्जदारास कळविलेले असेल त्या तारखेपासून खर्चाचा भरणा होईपर्यंतचा कालावधी हा ३० दिवसातुन वगळून मिळतो व त्यामुळे विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाने माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२९६२/तक्रार क्र.१६३५

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी महसूल व वन विभाग यांच्याकडे, ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये विभागामार्फत CRZ-II व ५० मीटर मॅन्ग्रोव्हजच्या बफर क्षेत्राने बाधीत होणाऱ्या जमीनीवर बांधकाम परवानगी कोणत्या निकाषावर दिली जाते या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात त्यांनी एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी दिनांक १८-१०-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी मागितलेली माहिती ही महसूल विभागाशी संबंधित नाही व तो नगरविकास विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांचा मूळ अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(३) (२) अन्वंये जन माहिती अधिकारी, नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांचे दिनांक १७-०८-२०१० रोजी हस्तांतरीत केला होता व तसे अर्जदारास सुद्धा कळविण्यात आले होते. परंतु दिनांक १८-१०-२०१० रोजीच्या पत्रांन्वये माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमुद करुन माहिती लवकरात लवकर पुरवावी, अशी विनंती केली. त्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक २७-१०-२०१० अन्वये उपरोक्त नमूद वस्तूस्थिती पुन्हा अर्जदारास कळविण्यात आली आहे. अर्जदाराने माहिती अप्राप्त झाल्याचे नमुद करुन उप सचिव तथा अपिलीय अधिकारी (ज-४) यांचेकडे दिनांक ०४-११-२०१० च्या अर्जान्वये अपिलअर्ज दाखल केला होता. परंतु अपिलाच्या सुनावणीस

दिनांक २०-११-२०१० रोजी उपस्थित राहिलेले नाही. त्यामुळे अपिलीय अधिंकारी यांनी सदर प्रकरणामध्ये अर्जदारास कोणतेही स्वारस्य नसल्याचे निष्कर्ष काढून त्यांचे अपिल अमान्य केला आहे.

तक्रारदार यांनी वास्तविक माहिती मागताना ती कोणत्या विभागाची आहे याबद्दलची निश्चित माहिती घेऊनच त्या संबंधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणे अपेक्षित असते. परंतु ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागितलेली आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणाशी माहिती संबंधीत नसेल तर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहितीशी संबंधित विभागाकडे जर नियमाप्रमाणे अर्ज हस्तांतरीत केला असेल तर अशा हस्तांतरीत झालेल्या विभागातील जन माहिती अधिकारी यांच्याशी संर्पक साधने आवश्यक असते व त्या विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी जर माहिती दिली नाही तर हस्तांतरीत विभागातील प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल करणे अपेक्षित असते. जेणेकरुन माहिती उपलब्ध करणे सोपे होते व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा आदेश दिल्यानंतर माहिती जर उपलब्ध झाली नाही तर हस्तांतरीत विभागाचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे तक्रार किंवा अपिल दाखल करणे अपेक्षित असते. अन्यथा पूर्वीचे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील अर्जावर व प्रथम अपिलावर कार्यवाही केली व राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या विरुद्ध द्वितीय अपिल किंवा तक्रार दाखल केली तर त्यांच्याकडील कारवाई ही मुदतीत झाली आहे, या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल व तक्रार ही निकाली काढावी लागते. कारण अपिलकर्ता किंवा तक्रारदार यांनी हस्तांतरीत विभागाचे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचे द्वितीय अपिलात किंवा तक्रारीत पक्षकार केलेले नसते व त्यामुळे त्यांना सुनावणीची नोटीस काढता येत नाही व तक्रार किंवा अपिलांची सुनावणी मध्ये हस्तांतरीत विभागाचे अधिका-यांच्या संदर्भात कोणताही आदेश देता येत नाही यामध्ये अपिलकर्ता / तक्रारदार यांचाच कालापव्यय होतो माहितीसुद्धा मिळत नाही व त्यामुळे या प्रकरणतासुद्धा तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२९६३/तक्रार क्र.१६३६

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा कोस्टल ऑफिसर(MCZMA),
पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी पर्यावरण विभाग यांच्याकडे, CRZ-II व ५० मीटर मॅन्ग्रोव्हजच्या बफर क्षेत्राने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या जमीनीमध्ये बांधकामसंबंधी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती मिळाली नाही तक्रारदार यांचे दिनांक १८-१०-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी यांचे कार्यालयात त्यांची नेमणूक कंत्राटी पदावर कोस्टल अधिकारी म्हणून करण्यात आलेली आहे व जन माहिती अधिकारी म्हणून माझी नेमणूक दिनांक १५-१०-२०१० रोजीच्या आदेशान्वये करण्यात आलेली आहे. तक्रारदार यांचा माहिती अर्ज नियुक्तीपुर्वीच्या आहे व त्यामुळे त्यांच्या निदर्शनास आणण्यात आलेले नाही. परंतु राज्य माहिती आयोगाची नोटीशी नंतर व्यक्तिश: सर्व आवश्यक माहिती गोळा करुन अर्जदारास दिनांक २५-०२-२०११ रोजी देण्यात आलेली आहे.

तसे त्यांनी दुरध्वनीवरुन माहिती घेण्याविषयी सुचित केले व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याचा कोणताही प्रयत्न नाही. यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००७६/अपिल क्र ६३०२/२०१०

श्री.नैनेश सुरेश डोळस,
द्वारा, माहिती अधिकारी महासंघ,

जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानगरपालिका चिटणीस (प्रभारी),
महानगरपालिका मुख्य कार्यालय,
विस्तारित इमारत, १ माळा, खोली क्र.१००,
महानगरपालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा महानगरपालिका उप - चिटणीस,
महानगरपालिका मुख्य कार्यालय,
विस्तारित इमारत, १ माळा, खोली क्र.१००,
महानगरपालिका मार्ग, मुंबई ४०० ००१. ...उत्तरवादी

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०३.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित. (उशिराने हजर)
जन माहिती अधिकारी - उपस्थित.(तत्कालीन)
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त कार्यालय यांच्याकडे, आपल्या महानगरपालिकेत गेली १० वर्षापेक्षा अधिक कालावधी on deputation वर आलेल्या अधिकाऱ्यांची माहिती एकूण ७ मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जांच्या अनुषंगाने सदर अर्जांतील (तीन) येथील अनुक्रमांक १ व २ येथे विचारणा केलेली माहिती स्थायी समितीच्या अखत्यारित असेलेल्या महानगरपालिका चिटणीस कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे कार्यालय अधिक्षक (आयुक्त), जन माहिती अधिकारी ह्यांनी सदर अर्जांची छांयाकित प्रत दिनांक १३-०८-२०१० रोजी परस्पर कार्यवाहीकरीता चिटणीस कार्यालयाकडे पाठविलेली आहे. पुन्हा ती आस्थापना विभागांशी संबंधित असल्यामुळे सदर अर्ज दिनांक १६-०८-२०१० रोजी त्यांच्याकडे अग्रेषित करण्यात आला. त्याप्रमाणे अर्जदारास दिनांक २६-०८-२०१० रोजी प्राप्त झालेली माहिती पुरविण्यात आली व त्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती नाकरण्यात आलेली आहे. या कारणास्तव प्रथम अपिल दाखल केले. परंतु प्रथम अपिलाच्या सुनावणीस तक्रारदार / अपिलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेतील, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १२-०९-२००८ रोजी निर्गमित केलेले परिपत्रानुसार अपिलीय प्राधिकारी ह्यांनी, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकण्यात येऊन अपिलांची सुनावणी केली व त्याप्रमाणे निर्णयाची प्रत अपिलकर्ता यांना

पाठविण्यात आली. परंतु तक्रारदार/ अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिकेमध्ये जे आयुक्त, सहआयुक्त, उप आयुक्त किंवा इतर पदावर जे अधिकारी शासनाकडून नियुक्त केले जातात ते शासकीय अधिकारीच असतात असे असुन सुद्धा महानगरपालिकामध्ये शासकीय अधिकारी नियुक्त केले नाही असे दिशाभूल करणारी खोटी उत्तरे महानगरपालिकेचे चिटणीस विभगाचे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. त्यांनी कोणत्याही एका विभागात शासकीय अधिकारी किती आहेत अशी माहिती मागितलेली नाही तर संपुर्ण महानगरपालिकेमध्ये किती शासकीय अधिकारी deputation वर आहेत ही माहिती आवश्यक असल्यामुळे त्यांनी आयुक्त कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली होती. सर्वसाधरण समज असा आहे की, कोणत्याही मोठ्या आस्थापनातील सर्व अधिकारी किंवा कर्मचारी यांची माहिती ती सार्वजनिक प्राधिकरणातील सामान्य प्रशासन विभागकडे उपलब्ध असणे अपेक्षित असते व त्यामुळे आयुक्त कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज हा सामान्य प्रशासन विभागाचे माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरण करणे अपेक्षित होते. परंतु अर्ज लहानश्या चिटणीस विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला व चिटणीस विभागात कोणताही शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर नाही असे त्यांनी उत्तर दिले. मात्र आयुक्तासहित अतिरिक्त उप आयुक्त याबाबतीवरील काही अधिकारी हे शासकीय माहिती अधिकारी आहेत व त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. यावरुन आयुक्त कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी मुळातच माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने टाळाटाळ केलेली आहे. तसेच त्यांनी मुद्येनिहाय माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हे सुद्धा चिटणीस विभागाचे होते तर त्यांनी कोणतेही उत्तर कळविलेले नव्हते म्हणून ते प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहिलेले नव्हते.

अपिलकर्ता आणि उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावर सादर केलेला पत्रावरुन असे दिसुन येते की, सदर अर्जांच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली आहे. कोणत्याही माहितीच्या अर्जांमध्ये मुद्येनिहाय माहिती मागितलेली असेल तर ती उपलब्ध असेल त्याप्रमाणे, उपलब्ध नसेल त्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला असेल त्याप्रमाणे मुद्येनिहाय उत्तर देणे आवश्यक असते. परंतु अर्जांचे वाचन न करताच उत्तर दिले जाते किंवा प्रथम अपिलाचा निर्णय केला जातो व त्यामुळे अर्जदार हे वारंवार माहिती लपविली किंवा खोटी माहिती दिली अशा प्रकारची तक्रार करत असतात. सध्याच्या प्रकरणात सुद्धा वर नमुद केल्याप्रमाणे आयुक्त कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज योग्य त्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत करणे संयुक्तिक होते. चिटणीस कार्यालयसुद्धा आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी संपुर्ण महानगरपालिकेतील अधिकारी किंवा कर्मचारी यांची माहिती ती सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे उपलब्ध असते व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरीत केले त्यांच्याविरुद्ध शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापुर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक राहील व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

१) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ०२-०७-२०१० अर्जांच्या अनुषंगाने मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपिलकर्ता यांचे दिनांक ०२-०७-२०१० चा अर्ज हा ज्या जन माहिती अधिकारी यांनी चिटणीस कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत केला त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती कां करण्यात येवू नये याबद्दलचा खुलासा त्यांनी समक्ष आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत करण्यात यावा अन्यथा त्यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यात येईल.

३) सदर निर्णयाची एक प्रत महानगरपालिकेतील आयुक्त यांनी माहितीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२४३९/तक्रार क्र.१६४०

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा मास्टर व सहायक प्रोथोनोटरी (प्रशा.),
उच्च न्यायालय,
मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे एकूण १२ मुद्यांमध्ये वेगवेगळी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना दिनांक २५-०८-२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले की, त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये त्यांनी निरीक्षण करावे व मुद्या क्र.२ ते ७,८,९,१० आणि १२ ह्या संबंधित विभागाकडुन माहिती मागितलेली आहे. जेव्हा ती मिळेल तेव्हा उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु संबंधित विभागाकडुन अद्यापही सदर माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे ती पुरविण्यात आलेली नाही. तसेच अपिलकर्ता यांनी प्रथम अपिल दाखल केलेले नाही.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माननीय उच्च न्यायालयामध्ये अनेक विभाग आहेत व तक्रारदार यांनी माहितीच्या अर्जामध्ये अनेक विभागातील अनेक विषयांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे. वास्तविक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भातील माहिती माननीय उच्च न्यायालय यांच्याकडे माहिती मागण्याची अपेक्षित नाही व तसेच इतर विभागाकडे सुद्धा जी माहिती मागितलेली आहे ते सर्व विभाग ते एकाच इमारतीत नाहीत व माहिती उपलब्ध करुन घेणे व ती मुदतीत देणेही शक्य होत नाही. तसेच माननीय उच्च न्यायालयातील माहिती उपलब्ध करुन माहिती पुरवावयाची असेल तर सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक असते. तसेच तक्रारदार यांनी माहिती मागितलेली आहे ती माहिती स्वरुपात अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी मागितलेली माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांनी विश्लेषण स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु तशी माहिती मागितलेली असेल तर जन माहिती अधिकारी यांनी त्या मुद्या संदर्भामध्ये अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती मागता येत नाही किंवा याबद्दलचे उत्तर देणे अपेक्षित असते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हे संसदेन पारित करताना ३० दिवसांमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असे मुदत घालून दिलेली आहे व माहितीचा अर्ज कलम ६ (१) प्रमाणे केल्यानंतर त्याबाबत संपूर्ण प्रकीया कलम ११ पर्यंत ३० दिवसांत पुर्ण करावे अशी अपेक्षा संसदेची दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वच माहिती उपलब्ध नसते ही बाब सुद्धा संसदेला माहीत होती व त्याप्रमाणे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे ज्या कर्मचारी वा अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असेल त्यांच्याकडून माहिती संकलीत करुन ३० दिवसांत पुरविणे अपेक्षित असते. ज्या अधिकारी किंवा कर्मचारी याचे सहाय्य जन माहिती अधिकारी यांनी मागितले अशा कर्मचारी व अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे समजण्यात येते व एकदा जन माहिती अधिकारी समजण्यात आल्यावर विलंबास असे अधिकारी जबाबदार असल्यास ते शास्तीस पात्र असतात अशाप्रकारची तरतुद ही अधिनियमात आहे. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता मान्यता घेणे अशी तरतुद अधिनियमात नाही. परंतु तशाप्रकारचे नियम सक्षम प्राधिकारी यांनी केले असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्याची ३० दिवसांची मुदत ही बंधनकारक आहे. त्यात कोणत्याही प्रकारचे शिथिलता देता येणार नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये अर्जदार यांनी मागितलेले माहितीचे स्वरुप हे तपासुन बघणे आवश्यक असते व माहिती जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे शक्य आहे किंवा नाही ही बाब सुद्धा तपासून बघणे आवश्यक असते व त्याकरीता अर्जदाराने सुद्धा सार्वजनिक प्राधिकरण जरी एकच असले तरी त्यामध्ये अनेक विभाग / उपविभाग / विषयानुसार असतात व त्यामुळे एकच अर्जात वेगवेगळ्या विषयांची / विभागांची / शाखांची माहिती मागितल्यास ती ३०

दिवसांत पुरविताच येईल असे नाही व त्यामुळे एका अर्जात एका शाखा किंवा विषयांचीच माहिती मागणे संयुक्तीक असते. अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यावर सुरुवातीचे ५ दिवसांमध्ये संबंधित अर्जात मागितलेली माहिती ही इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास त्यांना असा आदेश द्यावा लागतो. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आदेश विलंबाने दिल्यास त्या अधिकारी वा कर्मचाऱ्यांकडुन माहिती ही ३० दिवसांच्या आत पुरविण्याचे दृष्टिने विलंब होतो व त्यास सर्वस्वी जन माहिती अधिकारी जबाबदार असतात व सुरुवातीच्या ५ दिवसांत माहिती पुरविण्याचा आदेश दिलेला असेल तर असे सहाय्य घेतलेले अधिकारी व कर्मचारी हे विलंबास जबाबदार असतात. या अर्जाच्या संदर्भामध्ये अद्यापही त्या अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त झाली किंवा नाही याबद्दलचा कोणताही खुलासा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे अद्यापपर्यंत दिलेला नाही व त्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे जर ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देता येईल. अधिनियम ७(६) प्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी लागते व त्यामुळे सदरचा अर्जाच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मुद्या क्र. १ च्या संदर्भात मात्र मुदत कळविलेली असल्यामुळे तक्रारदार यांनी निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे व त्या करीता खर्च भरणा हा आवश्यक आहे. तक्रारदार यांनी एकाच अर्जात अनेक विषयांची / शाखांची विभागांची माहिती मागितली असल्याने विलंबास शास्ती लादणे योग्य होणार नाही.

----- आदेश -----

१) **तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ०९-०८-२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुद्येनिहाय विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

२) **तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०११३/अपिलक्र ६३४९

श्री.जयप्रकाश मामचंद बगोरिया, ...अपिलकर्ता
१/३५, श्रीराम को.हौ.सो.,खेर नगर,
बांद्रा(पूर्व) मुंबई ४०० ०५१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा कार्यालय, प्रशासकीय इमारत,
९वा मजला,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, अंधेरी,
दादाभाई नवरोजी रोड,
अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१३.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तहसीलदार अंधेरी यांच्याकडे प्लॉट सर्व्हे नं. ३४१(पार्ट), बांद्रा (ईस्ट) अंदाजे ३१७ चौ.फुट हि मिळकत श्री.मामचंद सुखराम बगोरीया यांना १९५७ साली भाडेपट्टयाने दिलेल्या बाबतची अंदाजे जुनी फाईल क्र.NAE SR १४८ च्या संदर्भामध्ये निरीक्षण द्यावे आणि निरीक्षणा अंती प्रती द्यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा काळावधी १९५७-१४ जुन,२०१० माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १४-०७-२०१०रोजीचे पत्र दिनांक २६-०७-२०१० देण्यात आलेले

दिसून येते. त्यात नस्ती आढळून येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १५-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०६-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिल अंशत: मान्य करण्यात येवून तहसीलदार अंधेरी यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या संचिकेचा अभिलेख कक्षात तपास घेऊन सदरची माहिती १५ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगपुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जुनी फाईल आहे व जुन्या फाईलचे अभिलेखाकारकामध्ये उपलब्ध असणे आवश्यक होते. परंतु अद्यापपर्यंत त्यांना माहिती दिलेली नाही व त्यामुळे निरीक्षण करता आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची नस्ती तलाठी यांनी शोधण्याचा प्रयत्न केला. तहसीलदार अंधेरी विभागाने नस्ती शोधण्याचा प्रयत्न केला परंतु उपलब्ध झाली नाही. परंतु सदरच्या नस्ती संदर्भामध्ये सन २००० मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एक अहवाल पाठविलेला आढळून येतो व त्यामुळे सदर प्रकरणाची मूळ नस्ती जिल्हाधिकारी कार्यालय शाखेकडे उपलब्ध असल्याने त्यांच्या कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. अर्जदाराने अर्जासोबत पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने या कार्यालर्यात दिनांक २७-१०-२०१० अन्वये मा. जिल्हाधिकारी, मुंऊजि यांचे कार्यालयात सदर जमीनीबाबतच्या माहिती संदर्भात नस्तीची मागणी केली त्यानंतर स्मरणपत्र-१ अन्वये दिनांक २५-०१-२०११ अन्वये पाठपुरावा केला. सदर प्रत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, मुंऊजि यांनी श्री.मामचंद सुखाराम बगोरिया मौजे-बांद्रा स.नं.३४१ मधील भाडेपट्टाने प्रदान केलेल्या जमीनीबाबत अभिलेखात उपलब्ध नस्ती दिनांक १५-०२-२०११ रोजी या कार्यालयास सुपूर्द करण्यात आली आहे. सदर नस्तीत अर्जदाराने अर्जासोबत पाठविलेले पत्राचे उल्लेख असून या कार्यालयाची नस्ती आणि १ ते ४७ चा समावेश आहे. सदर नस्तीचे परीक्षण घेऊन आज रोजी सदर अर्जदार यांस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याची तजविज ठेवली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तहसीलदार कार्यालयातुन त्यांना माहिती उपलब्ध करणे अपेक्षित आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तहसीलदार कार्यालयातून नस्ती ही जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दाखल झालेली असावी व त्यामुळे ती त्या ठिकाणी उपलब्ध झाली. नस्तीचा शोध हा सर्वच कार्यालयातून घेण्यात आलेला आहे असे असेल तर अपिलकर्ता यांनी तहसीलदार कार्यालयात पुन्हा नस्तीचा शोध घेऊन पुन्हा उपलब्ध झाल्यास किंवा उपलब्ध न झाल्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तीक राहील.

----आदेश----

१) **अपिलकर्ता यांचा नस्तीचा शोध तहसीलदार कार्यालयातील जन माहिती अधिकारी तहसीलदार कार्यालयात घेणे व उपलब्ध झाल्यास किंवा न झाल्यास अपिलकर्ता यांना तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.**

२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई

Gawas/feb 2011

दिनांक :१७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०११५/अपिलक्र ६३४८

श्री.ओनिल अँथनी किनी, ...अपिलकर्ता
५३, कालिना, कोलिव्हरी व्हिलेज,
सांताक्रूझ(पूर्व) मुंबई ४०० ०९८.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,
मुख्य सचिवांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
मुख्य सचिवांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी मुख्य सचिवांचे कार्यालयात त्यांच्ये दिनांक ०५-१२-२००९ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या, 'Memorandam of request on behalf of 'Mool East Indian Sanghatna Trust',for poor and underprivileged East-Indian community. च्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२०१० रोजी आपल्या पत्रातील दिनांक ०५-१२-२००९ चा संदर्भ या कार्यालयाच्या क्रमांक : मुसका २००९/जनरल/१७१५८, दिनांक २२-१२-२००९ अन्वये अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना अग्रेषित करण्यात आलेला आहे. याबाबत माहितीच्या अधिकारात अधिक माहितीसाठी विभागाच्या माहिती अधिकाऱ्यांकडे (जसे,अवर सचिव तथा राज्य जन माहिती अधिकारी, महसूल व वन विभाग (वने), मंत्रालय, मुंबई ४०००३२)

परस्पर संर्पक करणे उचित ठरेल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०६-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी मुख्य सचिव यांच्या कार्यालयामध्ये प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून सदर अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्ज हा मुख्य सचिवांकडे या करता दिला होता की, त्यांच्या अर्जात मागितल्याप्रमाणे त्यांना न्याय मिळू शकेल. परंतु त्या अर्जाची कोणतीही दखल न घेता माननीय सचिव कार्यालयाने ते अतिरिक्त मुख्य सचिव (वने), यांच्याकडे हस्तांतरीत केला. परंतु त्यांच्या कार्यालयामध्ये चौकशी केली असता अशा प्रकारची कोणतीही नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाली नाही असे त्यांना कळविण्यात आले व त्यामुळे त्यांनी पुन्हा त्यांचे अर्जाचा शोध घेण्याकरीता मुख्य सचिवाच्या कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु त्यांचे कार्यालयातील कार्यवाही संपली असे कळवून त्यांनी प्रथम अपिल निकाली काढले. मात्र त्यांचे दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्जाच्या संदर्भामध्ये पुढे काय झाले हे कळून येण्यास कोणताही मार्ग नव्हता. उलटपक्षी त्यांनी प्रथम अपिलाचा निर्णयामध्ये अर्जदाराने योग्य माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज किंवा पाठपुरावा केला पाहिजे व प्रस्तुत प्रकरणी वन विभागामार्फत कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे अपिलार्थीस ज्ञात असूनही मुख्य सचिव कार्यालयाच्या माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध केली नाही हे अपिलार्थीचे म्हणणे विसंगत आहे असे नमुद केले. वास्तविक वन विभागामध्ये त्यांनी चौकशी केली होती. त्यावर मुख्य सचिव यांच्या कार्यालयास वन विभाग संबंधित कार्यालयाना बोलवून अर्ज हस्तांतरीत झाल्यावर ते मिळून कसे येतात त्याबाबत जाब विचारणे आवश्यक होते. परंतु तसे न करता त्यांनी अपिल फेटाळेले व पुन्हा त्यांचे दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्जाच्या संदर्भात काहीही आढळ झालेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुख्य सचिव यांच्या कार्यालयात जे अर्ज येतात त्यावर तशी कार्यवाही होत नाही व ती कार्यवाही होण्याकरीता त्यात्या संबंधित कार्यालयाकडे सदरचा अर्ज किंवा तक्रार ही हस्तांतरीत केली जातात व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांचे दिनांक ०५-१२-२००९ अर्ज सुद्धा संबंधित विभागात हस्तांतरीत केलेला आहे. असे असेल तर त्यावेळेस एखाद्या व्यक्तीचा हस्तांतरीत केलेला अर्ज सुद्धा संबंधित विभाग नाकारते त्यावेळेस मुख्य सचिव कार्यालयही जबाबदार आहे की, त्या संदर्भामध्ये चौकशी करुन तो अर्ज निश्चितपणे त्या कार्यालयामध्ये आवक नोंदवही मध्ये अथवा संबंधित कार्यालयात आस्थापनाकडे चौकशी करुन मार्गविताना योग्य ते मार्गदर्शन करणे योग्य ठरेल व त्यामुळे मुख्य सचिवांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरीत केलेला अर्ज हा कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठविला त्याची खात्री करुन अपिलकर्ता यांना तसे कळविणे संयुक्तिक राहील.अर्जाचे हस्तांतरण झाल्यानंतर त्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही तर त्या कार्यालयात प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल करावे असे कळविल्यास अपिलकर्ता यांना संबंधित अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध होवू शकेल. अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

---आदेश---

१) अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक २२-१२-२००९ रोजी हस्तांतरण केलेला अर्जाच्या संदर्भामध्ये दिनांक १०-०५-२०१० रोजी कळविल्याप्रमाणे हस्तांतरण केलेला माहितीचा अर्जाच्या संदर्भामध्ये अप्पर सचिव, मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलकर्ता यांना कळवावे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक :१७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००५४/अपिलक्र ६३९४

श्री.तुषार गो.जाधव, **...अपिलकर्ता**
७२, गांधीनगर,दै.शिबनेर मार्ग,
वरळी, मुंबई ४०० ०१८.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर,
जिल्हाधिकारी व जिल्हादंडधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,
जुने जकात घर, श.भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, महसूल शाखा, मुबई शहर,
जिल्हाधिकारी व जिल्हादंडधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,
जुने जकात घर, श.भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१. **...उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०८.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक तथा शासकीय माहिती अधिकारी यांच्यातर्फे श्रीमती श्रद्धा विनय सांरग हे हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सदर प्रकरणात परिपत्रक दिनांक ०१-०२-२०१० नुसार अर्जदार अपिलार्थीने खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

वरळी योजना क्र.५२ मधील सोबतच्या नकाशा मध्ये दर्शविलेल्या चिंचोळया पट्टीला भूकर (सर्वे नंबर) क्रमांक दिलले नाहीत. परंतू त्यातील काही जमीन वरळी सागर, पिरामल ब्रदर्स,शुभदा, सुखदा व पौर्णिमा गृहनिर्माण संस्था ह्यांना शासनाने भाडेपट्टयाने दिलेली आहे. तसेच उर्वरीत जमिनीवर, शिवाजी व कृष्ण नगर ह्या झोपड्यांत बृहन्मुंबई महानगरपालिके कडून फोटोपास वितरीत केलेले आहेत. सबब ही जमीन शासनाची आहे किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे ह्याबाबत माहिती देण्यात यावी.

अर्जदाराने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अर्जदाराने वरळी योजना क्र.५२ मधील भूखंडाविषयी विश्लेषण केलेले आहे. जमीन ही शासनाची मालकीची आहे

किंवा बृहन्मुंबई महानगर पालिकेची याबाबत विचारणा करण्यात आली होती व सदरची मिळकत कोणाच्या नांवे आहेत याबाबतची माहिती कळविण्यात यावी.

सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला आवश्यक असलेले कागदपत्रे पुरविलेले आहेत. तसेच दिनांक २३-०७-२०१० च्या पत्राने अर्जदाराने ज्या भूखंडाविषयी माहिती मागितलेली आहे त्या विषयी सदर भूखंडाबाबत मालकी हक्का संबंधित ती शासनाची आहे किंवा महानगरपालिकेची आहे ह्याबाबत उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने निषिद्ध मालकी हक्काबद्दल सांगता येत नाही.

त्यानंतरही अर्जदाराच्या म्हणण्यानूसार अर्जदाराने या आधी महानगरपालिकेकडे अर्ज दाखल केला होता व त्यात त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे म्हटले आहे. दिनांक ०५-१२-२०१० रोजी जन माहिती अधिकारी वसाहत अधिकारी, जी /दक्षिण विभाग यांच्या कार्यालयाने अर्जदाराला सदरची माहिती जिल्हाधिकारी तथा माहिती अधिकारी कार्यासन क्रमांक २, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, बृहन्मुंबई महानगरपालिका जर जागेचा मालकी हक्क सांगत असेल तर त्यांच्याकडे संपुर्ण माहिती असणे अपेक्षित व आवश्यक आहे व तसे नसल्यास त्यांनी त्यांच्याकडे या जागेसंबंधी जी कागदपत्रे उपलब्ध आहेत आणि त्या कागदपत्रांच्या आधारे ते मालकी हक्क सांगत आहेत. त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती प्रमाणित करुन अर्जदाराला विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. तर कुठल्याही प्रकारचे कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास तसे पत्र (कागदपत्र नसल्याबाबतचे) अर्जदाराला लेखी पत्र द्यावयाचे आहे व तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी याबाबत नगर भूमापन क्र.२ जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन कुठलाही पत्रव्यवहार झाले असल्यास त्या प्रतीच्या छायांकित प्रती सुद्धा अर्जदाराला पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्यानंतर मालकी हक्क जर बृहन्मुंबई दाखवत असेल तर ती त्यांनी योग्य पाठपुरावा करुन सदर कागदपत्रे मिळावीत व त्यानुसार अर्जदाराला मिळाल्यानंतर पत्रव्यवहार करावा. वरील आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) जन माहिती अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका जी/दक्षिण कार्यालय यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी अर्जदाराने जी माहिती मागितलेली वरळी योजना क्र.५२ मधील सोबत नकाशा मध्ये दर्शविलेल्या चिंचोळया पट्टयालगतच्या वरळी सागर, पिरामल ब्रदर्स, शुभदा, सुखदा व पौर्णिमा यांना शासनाने भाडेपट्टीवर दिलेले आहे या संबंधित माहिती अर्जदाराला आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत

विनाशुल्क पाठविण्यात यावी. मागितलेली माहिती उपलब्ध नसल्यास तशा प्रकारचा पत्रव्यवहार करावा. तरी काहीही उपलब्ध नसल्यास तसे लेखी पत्र द्यावे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०१६७/अपिलक्र ६३९७

श्री.गौरंग सी.शहा,
जी-१०१, पंचशील गार्डन्स को.हौ.सो.
महावीर नगर, कांदीवली (पश्चिम), **...अपिलकर्ता**
मुंबई ४०० ०६७.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ.-दोन, ...उत्तरवादी

बृहन्मुंबई महापालिका, महापालिका इमारत, सी विंग,
संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फूट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,
कांदीवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), आर विभाग,
बृहन्मुंबई महापालिका, महापालिका इमारत, सी विंग,
संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फूट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,
कांदीवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :२०.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. उत्तरवादी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.बा.वे.शिंदे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की अर्जदाराला माहिती पुरवण्याची जन माहिती अधिकारी यांची तयारी आहे. ह्या आधी माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे नेमकी कोणती माहिती पाहिजे त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला माहिती घेऊन जाण्याबद्दल सांगितले होते. परंतु मागितलेली नकाशे हे बहुतांश बंडलामध्ये बांधले होते व ते ओळखता येवू शकले नाहीत म्हणून ते अर्जदाराला देता आले नाही. सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी यांनी सदर प्रकरणात दिनांक ०३-०३-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दुपारी १२ नंतर संर्पक साधल्यास अर्जदाराने प.पत्र **अ** नुसार मागितलेली तिन्ही संस्थेबाबतची माहिती (Occupation finance Plan) हे पुरविण्यात येतील. सदरची माहिती ही विनाशुल्क पुरविल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी ह्या आयोगासमोर कबूल केले. त्यावरुन अर्जदाराचे समाधान झाले व अर्जदाराने दिनांक ०३-०३-२०११ रोजीची माहिती उपलब्ध करुन घेण्यास तयारी दर्शविली. त्यानंतर ही अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) अपिल निकाली काढण्यात येते.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०१६१/अपिलक्र ६३९६

श्री. प्रभाकर विष्णू सुरते,
१७८, संत तुकाराम मार्ग, सी.के. बिल्डींग, २ रा मजला, ...अपिलकर्ता
रु.नं.४७, दाणबंदर, मस्जिद बंदर (पूर्व),
मुंबई ४०० ००९.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन),
वरळी विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
१० मजला, इ विंग,नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगाव, मुंबई ४०० ०१०.

जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन),
वरळी विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
१० मजला, इ विंग,नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१८.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. उत्तरवादी जन माहिती अधिकारी श्री.जिवातोडे, सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन), कार्यालय वरळी विभाग हे हजर आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी श्री. एस.ए.के. काझी विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई हजर आहेत व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.जे.चन्ने विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई हे सुद्धा हजर आहेत.

अर्जाचे प्रथम अपिलाचे परिपत्रक Annexture A अवलोकन केले असता अर्जदाराने मागितलेली बरीचशी माहिती मिळालेली नाही व त्यामुळे अर्जदाराने या आयोगासमोर द्वितीय अपिल दाखल करावे लागले. सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी यांना श्री. गंवडी ह्यांनी निरीक्षण देण्याचे कबूल केलेले आहे व त्यानुसार अर्जदाराला निरीक्षण देऊन, अर्जाला त्या फाईलमधून जे कागदपत्रे पाहिजे ते विनाशुल्क देण्यात येतील असेही कबूल केले आहे. त्यामुळे अर्जदाराचे / अपिलार्थीचे समाधान झाले असून अपिल निकाली काढण्यात येते. त्यानंतर ही अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार अर्जदार ह्या आयोगासमोर करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ२०१०/तक्रार क्र.४८

श्री.संदीप प्रकाश केदारे, **---तक्रारदार**
१७,१३६०, जुनी एम.एच.बी.कॉलनी,
गोराई रोड, (बोरिवली (पश्चिम),
मुंबई ४०० ०९१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,
अनुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक व माहविद्यालय,
आकुर्ली रोड, कांदिवली (पश्चिम),मुंबई

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
अनुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक व माहविद्यालय,
आकुर्ली रोड, कांदिवली (पश्चिम),मुंबई **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. अर्जदाराला ह्या आधी माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच या आयोगासमोर बरीचशी माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच प्रती या आयोगाच्या रेकॉर्डवर लावलेले आहे. तसेच अर्जातील मागासवर्गीय कर्मचारी शिक्षक हे जर त्या कार्यालयात

कार्यरत आहेत. त्यांच्याबाबत शाळेकडे असलेले जाती विषयक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती पाहिजे आहेत व त्यासाठी सदर संस्थेचे प्राचार्य ह्यांनी त्यांच्या या कार्यालयात उचित कार्यवाहीसाठी देण्याचे कबूल केले आहे. ह्या आयोगासमोर अर्जदाराला मागितलेली माहिती देण्याचे कबूल केलेले आहे व अर्जदाराने हे मान्य केलेले आहे म्हणून तक्रार क्रमांक ४८/०१ हे निकाली काढण्यात येते व अर्जदाराचे समाधान न झाल्यास ह्या आयोगासमोर तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) अपिल निकाली काढण्यात येते.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२१०६/तक्रार क्र.१०

श्रीमती विशाखा विनायक इंगळे, **--तक्रारदार**
बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सोसायटी,
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),मुंबई ४०० ०८९.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (शिक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ.आंबेडकर मार्ग,
परेल, मुंबई ४०० ०१२.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण खाते,
लखमजी नप्पू रोड, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व),
मुंबई ४०० ०१४. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदाराने ३० जुलै, २०१० रोजी ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे व त्यातही आयोगाने आदेश करुन सुद्धा अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. सदर आदेशाला निर्गमित करुन १ महिन्याचा कालावधी उलटुन गेलेला आहे. संबंधिताना माहिती देण्याविषयी निर्देश देण्यात यावेत अशी विनंती केलेली आहे. त्या विषयांच्या अनुषंगाने ह्या आयोगासमोर श्रीमती जयश्री यादव प्रशासकीय शाळा हे हजर आहेत व अर्जदाराला ३० पेजेसची माहिती ह्या आयोगासमोर पुरविण्यात आलेली आहे. तरी अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येवुन अर्जदाराला ह्या आयोगासमोर माहिती उपलब्ध दिल्यानंतर अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४६/०१

श्री.जगदीश देवराम टोरपे, **---तक्रारदार**
२५-अे, टोरने हाऊस, पहिला मजला,
फ्लॅट क्र.२, तेजपाल स्कीम, ५ वा रस्ता,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),
बृहन्मुंबई महानगरपालिका पश्चिम उपनगरे,
के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम,मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प),
बृहन्मुंबई महानगरपालिका पश्चिम उपनगरे,
के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम,मुंबई. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी हजर आहेत. ह्या आयोगाने दिनांक ३१-१०-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला होता. सदर प्रकरणात अर्जदार / अपिलार्थी यांनी दिनांक २०-०८-२००९ तक्रार दाखल केलेली आहे व त्यात अर्जदाराला माहिती मिळालेली नाही, संबंधिता विरुद्ध योग्य कारवाई करण्यात यावी. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत व अर्जदाराला माहिती पुरविलेली किंवा नाही कुठलाही उल्लेख अथवा उत्तर जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे दाखल केलेला नाही. तसेच या आयोगाने दिनांक ०५-०२-२०११ रोजी सुनावणीची तारीख ठेवल्यानंतर ह्या प्रकरणात दिनांक २१-०२-२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली व ह्या अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबत लेखी खुलासा सादर करावा असे म्हटले होते. जर उपस्थित न राहिल्यास ह्या अधिनियमाचे कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व निर्णय एकतर्फी देण्यात येईल अशी सुनावणीची नोटीस देवून सुद्धा आज २१-०२-२०११ रोजी जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प),

बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे,के व एव वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई हे गैरहजर आहेत व कुठलेही उत्तर दाखल केलेले नाही. या आयोगासमोर अर्जदाराने माहिती न मिळाल्याबद्दल तक्रार सुनावणी दरम्यान अशी तक्रार दाखल केलेली आहे. अर्जदाराला आजपर्यत माहिती मिळालेली नाही. अर्जदाराचे म्हणणे ग्राह्य धरुन ह्या आयोगाला असलेले कलम १८ च्या अधिकारानुसार सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांना दोषी ठरविण्यात येते व त्यांच्याविरुद्ध लागू असलेले सेवा विषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते व वरील आदेश पारित करुन अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) आयुक्त महानगरपालिका बृहन्मुंबई यांना असा आदेश देण्यात येतो व शिफारस केल्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प) बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे, के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई यांच्या विरुद्ध व शिफारस ह्या नियमाचे कलम २०(२) नूसार शिफारस केल्याप्रमाणे कारवाई करुन ३ महिन्याच्या आत अहवाल हा आयोगाला पाठवावा.

२) तसेच सध्या कार्यरत असेलेले जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प) त्यांनी अर्जदाराला आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क म्हणजे पंजीबद्ध डाकेने ह्या आयोगाचा निर्णय दिनांक ३१-१०-२००८ नुसार अर्जदाराला माहिती पाठवावी.

३) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४७/०१

श्री.सुरेश भिमसेन कागिनकर, **---तक्रारदार**
३/१०१, योगेश्वर गृहनिर्माण संस्था,
ना.म.जोशी मार्ग,
मुंबई ४०० ०१३.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी / संगा,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार /अपिलार्थीने ह्या आयोगासमोर दिनांक ३०-०८-२०१० रोजी खालील तक्रार दाखल केलेली आहे.

दिनांक ३०-०६-२०१० रोजीच्या ऑर्डरनुसार मा.माहिती अधिकारी (उपमुख्य अधिकारी) सं.गा, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गुहनिर्माण भवन बांद्रा,मुंबई ह्यांच्याकडून अद्यापपर्यंत मी मागणी केलेली माहिती मला मिळाली नाही आहे ह्याची आपण नोंद घ्यावी. सदर प्रकरणी संबधीत अधिकारी ह्यांच्यावर शासन नियमानुसार योग्य ती उचित कारवाई करण्यात यावी हि नम्र विनंती.

सदर प्रकरणात ह्या आयोगाने तक्रार नं.२०१०/१०१४/०२ ह्या तक्रारी संबंधित दिनांक २३-०३-२०१० रोजीचा आदेश पारित केला होता. त्यानुसार अर्जदाराने Rent विषयीच्या प्रती मागितलेल्या होत्या. सदर Rent विषयीच्या प्रती रुम नं. ६४, बिल्डीग नं. २, जिजामाता ट्रान्झिट कॅम्प, काळाचौकी, मुंबई या संबधी होती. सदर प्रकरणात अर्जदाराने ह्या आयोगासमोर द्वितीय अपिल

दाखल केले होते व दिनांक २३-०३-२०१० रोजी ह्या आयोगाने आदेश पारित केला होता की, अर्जादाराला १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी आणि त्यानुसार ह्या प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अर्जदार / अपिलार्थी हजर होते व प्रतिवादी श्री. सुर्यवंशी हजर होते आणि अर्जदाराला माहिती पुरविण्यात आलेली नव्हती म्हणून उत्तरवादी यांना आदेश सुचना दिले होते की, १५ दिवसांच्या आत अर्जदाराला माहिती पुरवावी. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार हे जन माहिती अधिकारी यांना भेटला परंतु अर्जदाराला माहिती देण्यात आलेली नाही आणि म्हणून आयोग निष्कर्षाप्रती पोहचले की, उत्तरवादी ह्या अधिनियमाच्या तरतुदीचा भंग केलेला आहे म्हणून रु.२५०००/- दंड करण्यात येवू नये अशाप्रकारचे कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. कारणे दाखवा नोटीस सदर प्रकरणी आदेश पारित करुन देण्यात आलेली आहे. या अनुषंगाने सदर प्रकरणी ह्या आयोगाने दिनांक ०४-०२-२०११ रोजी सुनावणीची नोटीस जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी, उप मुख्य अधिकारी मुंबई, मुंबई इमारत दुरस्ती व पुनर्रचना मंडळ,गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना सदर प्रकरणाची नोटीस देवुन सुनावणीची आज म्हणजे दिनांक २१-०२-२०११ रोजी दुपारी २.०० वाजता ठेवण्यात आली आहे.

सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी हजर होते. परंतु उत्तरवादी यांच्यातर्फे डॉ.अविनाश गोटे उपमुख्य अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. ह्यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणी अर्जदाराने त्यांचे अपिल दाखल केलेले नाही. तसेच ह्या प्रकरणात जन माहिती अधिकारी हे इस्टेट मॅनेजर श्री. संजय सुर्यवंशी हे हजर होते. सदर प्रकरणी कागदपत्राचे अवलोकन केले असता दिनांक १४-०६-२०१० रोजी श्री. सुर्यवंशी (मिळकत व्यवस्थापक) हे हजर होते. परंतु अर्जदाराला माहिती देण्याबाबत कुठलीही तसदी घेतल्याचे दिसत नाही. तसेच ह्या प्रकरणात श्री. सुर्यवंशी हे दिनांक १४-०६-२०१० रोजी सुद्धा हजर होते. अपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार श्री.सुर्यवंशी हे सुद्धा मागील तारखेला हजर होते. तसेच त्यांच्या म्हणण्यानुसार सदर माहिती ही कार्यकारी अभियंता यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यांनी ह्या आयोगासमोर दिनांक १८-०२-२०११ रोजी जे लेखी जबाब दाखल केलेले आहे. त्या संबंधीत मूळ अर्ज पुढील कार्यवाहीसाठी कार्यकारी अभियंता ''इ विभाग'' यांना दिनांक १२-११-२००९ रोजी जा.क्र.४६००/०९ अन्वये पाठविण्यात आला होता. परंतु कार्यकारी अभियंता ''इ-१'' या कार्यालयाने कार्यकारी अभियंता ''फ/ दक्षिण'' या कार्यालयाशी संबंधीत असल्याने दिनांक ०२-१२-२००९ रोजी जा.क्र.७२५/०९ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे. तसेच संक्रमण गाळ्याविषयक कार्यभाराचे जन माहिती अधिकारी हे मिळकत व्यवस्थापक श्री.संजय सुर्यवंशी हे आहेत. दिनांक ०४-०९-२००९ पासून संक्रमण गाळे विषयक सर्व कामकाज हे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडे प्राधिकरणाचे व मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचे आदेशानुसार वर्ग केले आहे. त्यामुळे अर्जदार / अपिलार्थी यांनी उप मुख्य अधिकारी / संक्रमण गाळे यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले असते तर अर्जदाराचे मुद्या निकाली निघाला असता. त्या अनुषंगाने ह्या आयोगाने अर्जदाराला तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांना सदर प्रकरणी अर्जदाराचे प्रथम अपिल निकाली काढण्याच्या दृष्टिने तोंडी सूचना व आदेश दिलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या प्रती ह्या आयोगाकडून घेऊन दिनांक २८-०२-२०११ ला सकाळी ११ वाजता सुनावणी घ्यावी व जन

माहिती अधिकारी किंवा कार्यकारी अभियंता यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन अर्जदाराला विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची माहिती ही विनाशुल्क पुरविण्यात यावी.

हे काहीही असले तरी सदर प्रकरणात निश्चितच अर्जदाराला माहिती पुरविण्याच्या दृष्टिने व प्रथम अपिल निकाली काढल्याचे दृष्टिने नियमानुसार कार्यवाही झालेली नाही व ह्या प्रकरणी मुख्य अधिकारी (Chief Officer), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी एखाद्या सक्षम अधिका-यामार्फत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्या विरुद्ध अधिनियमानुसार चौकशी करुन माहिती उशिरा देण्याबाबत जबाबदारी निश्चित करावी व जबाबदार आढळल्यास त्यांना लागू असलेला सेवा विषयक नियमाचे भंग केल्याच्या कारणावरुन शिफारस केल्याचे गृहित धरुन योग्य ती कारवाई करावी. तसेच ह्या आयोगाने दिनांक **३०-०६-२०१०** रोजी पारित केलेला आदेशाच्या अनुषंगाने उत्तरवादी श्री. संजय सुर्यवंशी तथा जन माहिती अधिकारी यांच्याविरुद्ध अर्जदाराचा अर्ज ह्या अधिनियमाचे कलम ७(१) नूसार निकाली न काढल्यामुळे व अर्जदाराला माहिती न पुरविल्यामुळे रु.५०००/- चा दंड बसविण्यात येतो व सदरचा दंड हा त्यांनी २ मासिक हप्त्यात संबंधित संस्थेकडे भरणा करावे. सदर लेखाशिर्षा, ''००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)''. या सार्वजनिक लेखाशिर्षा खाली जमा करण्यात यावी. वरील आदेश व सुचना देवुन तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४५/०१

श्री.मंगेश गोविंद घोरपडे, **---तक्रारदार**
५०, पेरीन नरीमन स्ट्रीट, दुसरा माळा,
रुम नं. ११, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य नियोजकार, **---गैरतक्रारदार**
सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
नियोजन व वास्तुशास्त्र विभाग,
सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार गैरहजर आहेत. अर्जदाराने दिनांक ०७-०२-२००८ रोजी आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे. त्यात अर्जदाराने दिनांक ०३-१२-२००७ रोजी अर्जावर जन माहिती अधिकारी सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई या कार्यालयाकडून माहिती मागितलेली आहे. मागितलेली माहिती ही ६ मुद्यांमध्ये आहे. अर्जदाराचे म्हणण्यानुसार ३ मुद्यांची माहिती दिलेली आहे व ३ मुद्यांची माहिती बाकी आहे. मुद्या क्र. २,३,६ ची माहिती बाकी आहे. अर्जदाराने प्रथम अपिल दिनांक २९-०१-२००८ अपिलीय अधिकारी सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे पोस्टाने (डाक नोंद पोच द्वारे) अपिल अर्ज पाठविलेले आहे व स्वीकृत न करताच परत पाठविलेले आहे. त्यामुळे अर्जदाराने तशी तक्रार केलेली आहे. अपिल अर्ज स्वीकरण्यात आलेला नाही. तरी सदर प्रकरणात पुढील कार्यवाही कशा प्रकारे करणे योग्य होईल ह्या बाबत मार्गदर्शन करावे.

सुनावणी दरम्यान अतिरिक्त मुख्य नियोजनकार विभागाचे श्री किरण शिंदे हजर आहेत. व्यवस्थापक (पणन - १) श्री. राजेंद्र मोरे हजर आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदारास दिनांक ०३-१२-२००७ च्या अर्जानुसार परिपत्रक Annexture A नूसार माहिती नियोजनकार यांच्याकडे उपलब्ध असुन मुद्या क्रमांक १,४ व ५ या मुद्यांची माहिती दिलेली आहे. मुद्या क्रमांक २ व ६ पणन

विभागाशी संबंधित आहे व त्यांच्या म्हणण्यानूसार त्यांना वरील सुचना अभिप्रेत नसल्यामुळे माहिती पाठवू शकले नाही व अर्जातील माहिती शोधुन घेऊन पाठविण्यास तयार आहेत. तरी अर्जदाराने मुद्या क्रमांक २ व ६ ची माहिती पंजीबद्ध डाकेने आजपासून १० दिवसांच्या आत पाठवयाची आहे. आयोगापुढे तसा मुद्या क्रमांक ३ अभियांत्रिकी विभागाशी संबंधित आहे व त्यासाठी सेवा पुरविण्यासंबंधी बाबत सत्य परिस्थिती अर्जदाराने आज पासून १० दिवसांच्या आत पंजीबद्ध डाकेने पाठवावयाची आहे. त्या संबंधित मुद्यांबाबतचे स्पष्टिकरण अर्जदाराला लेखी स्वरुपात कळवावे. तसेच मुद्या क्रमांक ४ व ५ ची माहिती देण्यात आलेली आहे. अर्जदार गैरहजर असल्यामुळे वरील बाबींचे आणखी शहानिशा होवू शकली नाही. तरी वरील दिलेल्या सुचनेनुसार अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००७४/अपिलक्र ६३९३

श्री.जितेंद्र एच.प्रसाद, **...अपिलकर्ता**
बायोटेक्नो लॅब, २८८/९०, डॉ.सी.एच.स्ट्रीट,
चार्टर हाऊस समोर, धोबीतलाव,
मरीन लाईन्स,मुंबई ४०० ००२.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३)मुंबई,
गृहनिर्माण भवन,कक्ष क्र.६९, तळमजला,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पी-विभाग,
३१५, ए/१ इमारत, वडाळा ट्रक टर्मिनल, आरटीओ जवळ,
वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार / अपिलार्थी हजर आहे. दोघांचे म्हणणे ऐकूण घेतलेले आहे. दोघांच्या म्हणणे ऐकल्यानंतर अर्जदाराला परिपत्रक नुसार जी माहिती पाहिजे आहे ती सहकारी गृहनिर्माण संस्था पी-विभाग, मालाड (पश्चिम) या संस्थेची पंजी बद्दलची माहिती पाहिजे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर संस्था ही नियमानुसार पंजीबद्ध करण्यात आलेली नाही अशी अर्जदाराची तक्रार आहे. सदर प्रकरणी सुनावणी दरम्यान या संबंधित अर्जदाराने जनविकास को.ऑप.सो.लि.,मालाड वेस्ट या संस्था संबधातील जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक मुंबई यांच्या आख्यारित असेलेली सर्व कागदपत्रांचे निरीक्षण दिनांक २३-०२-२०११ रोजी दुपारी २.०० नंतर द्यावयाची ठरली आहे. तसेच माहिती संबंधित संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावयची असेल तशा प्रकाराची इच्छा व्यक्त केल्यास ती सुद्धा माहिती जन माहिती अधिकारी यांनी शक्य तितक्या लवकर मिळवून अर्जदाराला उपलब्ध करुन द्यावयाची आहे व त्यानंतर अर्जदार हा महाराष्ट्र राज्य सहकार अधिनियम १९६० चे कलम १५४ नुसार अपिल करावयाचे झाल्यास अर्जदार तसे अपिल करील. माहिती संबंधीत कुठलीही तक्रार असल्यास त्या संबंधित अर्जदार हा अधिनियमाचे कलम १९(१) प्रमाणे वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रार करु शकतो. वरील आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) अर्जदार व जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी आता कबूल केल्यामुळे दिनांक २३-०२-२०११ तारखेला जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात दुपारी २ नंतर संबंधित संस्थेविषयीची जी माहिती आवश्यक आहे ती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे ठरल्यावरुन अर्जदाराचे अपिल निकाली काढले आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./४९३१४/अपिलक्र ६३९५

श्री.सी.पी.सिंग (ॲडव्होकेट), ...अपिलकर्ता
०२, क्लासिक पॉवर रेसिडेन्सी, गुरु निवास सबवे रोड नं.२ समोर,
टी.पी.एस-VI, सांताक्रुझ (पश्चिम),मुंबई ४०० ०५४.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नवि-१०),
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-१०),

नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. **...उत्तरवादी**

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी सुनावणी दरम्यान गैरहजर आहे. अर्जदाराचा मुळ अर्ज परिपत्रक दिनांक २४-०९-२००९ रोजीच्या अर्जानूसार जन माहिती अधिकारी यांच्या सांगण्यानुसार माहिती पुरविण्यात आलेली आहे. तरी सुद्धा अर्जदाराने परिपत्रक **ब** नुसार प्रथम अपिल दिनांक ०९-०३-२०१० रोजी दाखल केलेले आहे. उप सचिव, नगर विकास यांच्याकडे दिनांक ०३-०४-२०१० रोजी सुनावणी झाली. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला दिनांक १२-०४-२०१० रोजी कागदपत्राचे अवलोकन करुन माहिती पुरविण्यात आलेली आहे.

तसेच जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अर्जाच्या मूळ प्रपत्र Annexture A नुसार दिनांक ३०-११-२०१० रोजी अपिल क्रमांक ६०९२ ह्या आधीच निर्णय दिलेला आहे व त्या अनुषंगाने स्वत: दिनांक २४-१२-२०१० रोजी पुन्हा माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यांनी ह्या आयोगासमोर असे निदर्शनास आणले की, दिनांक ३०-११-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे लिहून दिले की, स्वत: माहितीसाठी येतील परंतु ते न आल्यामुळे शेवटी दिनांक १५-०४-२०१० रोजी अर्जदाराला शीघ्र टपालाने माहिती पाठविण्यात आलेली आहे. तसेच अर्जदाराने असे निदर्शनास आणले की, अर्जदाराने पत्र दिलेल्या पत्त्यावरुन पत्रव्यवहार हा Unclaim म्हणून परत येत आहे. दिनांक ०५-०४-२०१० रोजीच्या निर्णयानुसार अपिल निकाली काढण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक २४-१२-२०१० रोजी उत्तर दिले व माहिती पाठविण्यात आली. सदर माहिती शीघ्र डाकेने पाठविली व ती परत आलेली नाही ती स्वीकारली असावी. यावरुन असा निकष काढण्यात येतो की, सदरची माहिती स्वीकारलेली आहे. तसेच अपिलकर्ता यांचे समाधान झाले असावे असा निकष काढण्यात येत असून अर्जदाराचे अपिल हे खारीज करण्यात येते.

----आदेश----

१) अपिल खारीज करण्यात येते.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४९/०१/११

श्रीमती शैलजा भालचंद्र सुभेदार, ---तक्रारदार
अंबिका को.ऑ.हौ.सो.लि.,
बिल्डींग नं.७, रुम नं.१७८,
सिद्धार्थ नगर नं.३,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०० १०४.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१. ----गैरतक्रारदार

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / तक्रारदार गैरहजर आहेत. ह्या प्रकरणी अपिल क्रमांक २०१०/५०८७/०२ वर आयोगाने अर्जदाराचे अपिल मान्य करुन दिनांक २८-१२-२००६ रोजी सादर केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी असे म्हटले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्री. बी.एम.काकड हे हजर आहेत. यांच्या म्हणण्यानुसार मा. राज्य माहिती आयुक्त यांनी दिनांक २३-०६-२०१० रोजी दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी म्हणून जा.क्र. २२५२ नूसार दिनांक १३-०७-२०१० चे पत्राद्वारे माहिती पाठविण्यात आली होती. त्यानंतर दिनांक १२-०८-२०१० रोजी अर्जदार / तक्रारदार यांनी पुन्हा तक्रार अशी तक्रार केली की, मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार माहिती पुरविण्यात आलेली नाही. दिनांक १४-१२-२०१० रोजी सदर प्रकरणी ह्या आयोगासमोर सुनावणी झाली व त्यात मौखिक आदेश देण्यात आले. दिनांक ०७-१२-२०१० रोजी झालेल्या रोजनाम्याची प्रत मिळावी अशी विनंती केली व ती सुद्धा मान्य करण्यात येवून दिनांक २०-१२-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अर्जदार हजर झाले. परंतु नकार दिल्यामुळे सदरची माहिती साध्या पोस्टाने अर्जदाराला पाठविण्यात आली. त्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले असेल असा निकष काढल्यामुळे अर्जदाराची तक्रार ही निकाली काढण्यात येते. अर्जदाराला सदर माहिती पोस्टद्वारे पाठविलेली आहे. माहिती न प्राप्त झाल्यास स्वत: जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी प्रथम श्रेणी - १, यांच्याकडुन विनाशुल्क उपलब्ध करुन घ्यावी.

----आदेश----

१) तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.५०/०१

श्री.विश्वास वसंत ताम्हणकर, ---तक्रारदार
टागोर नगर, चाळ क्र. १५६,
खो.क्र.२५८५, ग्रुप क्र.५/ब,
विक्राळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
(मुख्यालय -१), पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,
बृहन्मुंबई, मुख्यालय-१,तळमजला, क्रॉफर्ड मार्केटसमार,
डी.एन.रोड,मुंबई ४०० ००१. ----गैरतक्रारदार

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / अपिलाथी गैरहजर आहेत. अर्जदाराने दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या अनुषंगाने ह्या आयोगाने ह्या प्रकरणी ह्या आधी दिनांक ०४-१०-२०१० सुनावणी झाली. अर्जदार हजर होते व उत्तरवादी हजर होते. सदर प्रकरणी कुठल्याही प्रकारचे लेखी अथवा मौखिक आदेश पारित करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे सदर प्रकरण प्रलंबित होते. त्या प्रकरणी ह्या आयोगाने आज दिनांक २२-०२-२०११ रोजी सुनावणी ठरविली असताना अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय - १ श्री.बी.वाय.जंजाळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस

आयुक्त, मुख्यालय-१ श्री.एच.झेड.राठोड हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, मुख्यालय -१ श्री.विजयसिंह जाधव हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी या आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दिनांक ०४-१०-२०१० अर्जदाराची तक्रार क्रमांक रामाआ-२०१०/ त.क्र.९७३/०२ ह्या आयोगाला लेखी उत्तर दाखल केलेले आहे व त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय -१), मुंबई यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयाच्या अभिलेखानुसार संबंधित कार्यसनाकडुन प्राप्त झालेली माहिती अर्जदारास जावक क्र. ६११/सपोआ/मुख्या-०१/माअअ/०९ दिनांक १२-०१-२००९ रोजी अन्वये पाठविण्यात आलेली आहे.

अर्जदाराने सदर प्रकरणात सह.पोलीस आयुक्त श्री. हिरा राठोड यांनी सत्य पडताळणी न करता त्यांना माहिती तशीच दिली त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन झालेले नाही असे म्हटले आहे. तरी अर्जदार गैरहजर असल्यामुळे कुठल्या कागदपत्रांची पडताळणी झाली नाही व कुठल्या आदेशाबद्दल पालन झाले नाही त्याबाबत अर्जदाराची तक्रार आहे. अर्जदार गैरहजर असल्यामुळे हे समजू शकले नाही. अर्जदार गैरहजर असल्यामुळे अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येते. तसेच सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी असे सांगितले की, अर्जदार हा वारंवार जुनी व जास्त प्रमाणात माहिती मागुन व त्यावर प्रश्न व उपप्रश्न विचारणे. त्या अनुषंगाने अर्जदाराने प्रकरणात माहिती मागितलेली आहे. सन २००७ या वर्षात नस्ती क्रमांक ११८ द्वारे माहिती मागितलेली आहे. सन २००८ या वर्षात ७ अर्ज दाखल केले, सन २००९ या वर्षात ८ अर्ज दाखल केले,सन २०१० मध्ये ५ अर्ज दाखल केले व त्यात बहूतेक अर्ज त्याच प्रकारच्या माहिती संबंधित आहे. त्यामुळे अर्जदाराला ह्या पूर्वी उपलब्ध असलेली संपुर्ण माहिती प्राप्त करुन देण्याबाबत प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार मागितलेली माहिती वास्तविक पाहता कलम ७(९) खाली निकाली काढण्यात येवू शकते कारण मागितलेली माहिती ही २५ मुद्दे व त्यापेक्षा अधिक प्रमाणात मागविण्यात आली आहे. सदरची माहिती ही वारंवार मागितली जाते. तरीसुद्धा अर्जदाराला माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे अर्जदाराने केलेली तक्रार ही सत्यावर आधारित नसून चूकीची केली म्हणून सदर माहिती अधिकाराच्या गैरवापरातुन तक्रार घडत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तरी अर्जदाराची तक्रार ही खारीज करण्यात यावी ही विनंती केली आहे. उत्तरवादी यांनी दाखल केलेले उत्तर दिनांक ०४-१०-२०१० रोजीचे अवलोकन तसेच दिनांक २२-०२-२०१० अर्जदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने उत्तरवादी यांनी दाखल केले उत्तर मान्य करुन अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येते.

----आदेश----

१) तक्रार खारीज करण्यात येते.

२) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.५२/०१

श्री.अब्दुल गफूर का.हुणशाळ, **---तक्रारदार**
हॉटेल प्रेसिडेंन्ट, महाराष्ट्र नगर,
बांद्रा(पूर्व), मुंबई ४०० ०५१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला,गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला,गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१. **----गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / तक्रारदार गैरहजर आहेत. अर्जदार यांनी ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे व त्यात ह्या आयोगाने आदेश देवून संबंधित अधिकारीने माहिती आजतागायत दिली नाही व ती देण्याची टाळाटाळ करीत आहेत. त्यावर संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व अर्जदाराला लवकरात लवकर माहिती देण्याचा आदेश देण्यात येवून या अनुषंगाने ह्या आयोगाने सुनावणी ठेवली होती व आज दिनांक २२-०२-२०११ रोजी अर्जदार गैरहजर आहेत. अर्जदाराला दिनांक २०-०३-२०१० रोजीच्या पत्रासोबत मागितलेली माहिती अर्जदाराला पाठविण्यात आलेली आहे व त्याची एक प्रत ह्या आयोगासमोर दाखल करण्यात आलेली आहे व त्यामुळे अर्जदाराला माहिती मिळाल्यामुळे अर्जदार आज दिनांक

२२-०२-२०११ रोजी गैरहजर राहिल्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले असावे असा निकष काढण्यात येवून अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) तक्रार निकाली काढण्यात येते.

२) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०२९९/अपिलक्र ६४०८

क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०२९९-ब/अपिलक्र ६४०९

श्री.आनंद सोपान पारगावकर, ...अपिलकर्ता
१३५/३६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,
पंतनगर, घाटकोपर (पूर्व),मुंबई ४०० ०७५.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड,
ब्रांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०.
जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी (प्रकल्प),
एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड,
ब्रांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०१.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २३.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी हे हजर आहेत. दोन्ही प्रकरणात मागितलेली माहिती ही खेतवाडी, टीपीएसए-६,फायनल प्लॉट नं.- १०६, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०० ०५४ ह्या संबंधित माहिती आहे. अर्जदाराने सुनावणी दरम्यान अपिल क्र.६४०८/२०११ ची माहिती मागितलेली आहे. ती २ मुद्यांमध्ये आहे व त्यात १९९२ पासून ते दिनांक ११-०३-२०१० पर्यंत कॉलनी अधिकारी यांनी जो काही पत्रव्यवहार मनपा मुख्यालय, एम.एस.आर.डी.ए. कार्यालयातून आलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या नक्कल प्रती पाहिजे आहेत तसेच सदर कालावधीत कॉलनी ऑफिसर यांना मनपा मुख्यालय, एम.एस.आर.डी.ए. कार्यालयातून आलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या मूळ प्रती पाहिजे आहे. अर्जदार हा दारिद्रय रेषेखाली नाही आहे. यासंबंधित सार्वजनिक माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी (प्रकल्प) एच/पश्चिम विभाग यांनी अर्जदाराला दिनांक १२-०३-२०१० रोजीच्या अर्जानुसार पत्र दिले व त्यात दिनांक २०-०३-२०१० रोजी अर्जदाराला ह्या आधी कळविण्यात आले आहे की, सदर कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्याकरीता तयार ठेवण्यात आलेली असून माहितीचा अधिकार अधिनियमातंर्गतचे आकार पालिकेकडे भरणा केल्यानंतर आपणांस देण्यात येईल. त्यानंतर अर्जदाराने प्रथम अपिल अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०६-२०१० रोजी दाखल केले व त्यात माहिती दिलेली नाही आवश्यक असलेली माहितीच्या स्वरुपात खेतवाडी नकाशाबाबतचे अर्जदाराला जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ वसाहत अधिकारी यांनी दिनांक २२-०३-२०१०अर्जदाराला पत्र दिले व अर्जदाराला असे कळविले की, माहिती संदर्भात सदर पत्र प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष संर्पक साधावा. आपणांकडून विलंब झाल्यास अर्जदाराचे अपिल निकाली काढुन दप्तरी दाखल करण्यात येईल.

या अनुषंगाने अर्जदाराला दिनांक ०८-०७-२०१० रोजी दुसरे पत्र देण्यात आले व त्यात दिनांक ३०-०६-२०१० रोजी अर्जदार गैरहजर होते. त्यामुळे पुन्हा सुनावणी दिनांक २१-०७-२०१० रोजी दुपारी ३.१० वाजता सहायक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर तारखेला सुनावणी घेण्यात आली. परंतु अर्जदाराला त्याबाबतची प्रत देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी श्री.आत्माराम धुरी, कॉलनी ऑफीसर हजर आहेत व त्यांनी या आयोगासमोर प्रथम अपिल दिनांक २९-०७-२०१० रोजीचा आदेश दाखल केलेला आहे. सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी एच/पश्चिम विभाग यांनी अपिलकारास आवश्यक असलेली माहिती माहिती अधिकारातंर्गत देण्यात यावी असे म्हटले आहे. त्यानुसार अर्जदाराला दोन्ही अपिलांबाबत दिनांक ०३-०३-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांची त्या दिवशी भेट न झाल्यास फोनवर संर्पक साधुन (फोन नं. ८९७६३२७०४४/९२२४६३७२९७) व जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्यास श्री.माळवणकर यांच्याशी संर्पक साधुन अर्जदाराला दोन्ही अपिलांचे पपत्र अ नूसार मागितलेली माहिती विनाशुल्क त्या तारखेला पुरविण्यात येईल.अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार अर्जदार ह्या आयोगासमोर करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

अर्जदार / अपिलार्थी पपत्र अ नुसार दिनांक १२-०३-२०१० रोजी नुसार मुद्या क्र.१ व २ ची माहिती पाहिजे आहे.

----आदेश----

१) **अपिल निकाली काढण्यात येते.**
२) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/तक्रार क्र.२१/०१

श्री.रामानंद शर्मा, **---तक्रारदार**
५ वा मजला, पोटिया इंडस्ट्रीयल इस्टेट,
दारुखाना, मुंबई ४०० ०१०.

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९,
३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे. **----गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२३.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी यांनी दिनांक ०१-१०-२००९ रोजी जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता, एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९, ३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे यांच्याकडे, "Total list of load sanctioned but not yet released as on this date 1st oct, 2009 with details such as Name of the Party, Contract demand sanctioned, date of sanction, and feeder on which the load is proposed to be given." अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अर्जदाराने दुसऱ्या अर्जात दिनांक ०१-१०-२००९ रोजी नुसार,

"1) Name of the feeder 2) Current rating capacity of the conductior, 3) Actual current at which the feeders are operating, 4) Number of times the feeder has tripped due to over load (current) in the past two months." अशी एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जदाराचा अर्ज कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., ओ. ॲण्ड एम डिव्हीजन, वसई यांना दिनांक २१-१०-२००९ रोजी पाठवून त्यांना अशी विनंती करण्यात आली होती की, अर्जदाराला पाहिजे असलेली माहिती परस्पर अर्जदाराला पाठवून त्या संबंधीची माहिती ह्या कार्यालयात द्यावी.

वरील सुचनेनुसार कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डिव्हीजन, वसई यांनी कुठल्याही प्रकारची माहिती अर्जदाराला दिली नाही अशी तक्रार ह्या आयोगासमोर दाखल केलेल्या तक्रारीत केली आहे व ह्या संबंधी त्यांनी वारंवार कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठपुरावा स्वत: जावून त्यास संबंधित अध्यक्ष सचिव यांच्याकडे विचारणा केली असता तसेच फोनवर संर्पक साधुन सुद्धा अर्जदाराला माहिती पुरविलेली नाही किंवा कुठल्याही प्रकाराचा पत्रव्यवहार केलेला नाही व त्यामुळे अर्जदाराने ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केली आहे.

सदर प्रकरणात अर्जदाराने जर प्रथम अपिल दाखल केले नसेल तर जन माहिती अधिकारी किंवा कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डीएन, वसई यांनी अर्जदाराला माहिती उपलब्ध केली किंवा नाही, कसे कोणाकडून उपलब्ध होईल किंवा प्रथम अपिल कोणाकडे करावयाचे ह्याबाबत कायद्याने सांगणे बंधनकारक होते पण कुठलीही तसदी घेतली नाही. सदर प्रकरणात उत्तरवादी गैरहजर असल्यामुळे या घडीला शहानिशा होवू शकली नाही. या आयोगासमोर अर्जदाराने २ वेळा पत्रव्यवहार करण्याबाबत निदर्शनास आणले होते. सदरचे पत्र अर्जदाराला दिनांक १८-११-२००९ रोजी मिळाले आहे व दुसरे पत्र दिनांक २१-१०-२००९ चे दिसते. तर वरील बाबतीत कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डिव्हीजन, वसई,जिल्हा-ठाणे यांनी अर्जदाराला कुठलीही माहिती पुरविण्याची तसदी घेतली नाही किंवा पत्रव्यवहार केला नाही. तरीही ह्याबाबत अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९, ३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे यांनी सदर प्रकरणात स्वत: किंवा संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा सक्षम अधिकाऱ्याला सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत व अर्जदाराला माहिती का देण्यात आली नाही किंवा विलंब का लावला याबाबत त्यांच्या विरुद्ध नियमानूसार कारवाई करावी.

कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डीएन, वसई यांना शेवटी पुन्हा एकवेळ संधी देवून असा आदेश करण्यात येतो की, दिनांक २१-१०-२००९ चे पत्र क्रमांक १३०८४ व संदर्भ क्र. मुअ/कपक/तांत्रिक/५०९२ दिनांक ०६-१०-२००९ अर्जदाराला हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पंजीबद्ध डाकेने माहिती पुरवावी. सदर माहिती अर्जदाराला या आदेशानुसार न मिळाल्यास अर्जदार ह्या आयोगासमोर कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

१) **तक्रार निकाली काढण्यात येते.**

२) **सदर निर्णयाची एक प्रत कार्यकारी अभियंता, ओ ॲण्ड एम, वसई, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि., रामदास नगर, साईबाब मंदिर जवळ, वसई (पूर्व). जिल्हा-ठाणे यांना देण्यात येत आहे.**

३) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१४०/अपील क्रमांक ६२८३/२०१०

श्रीमती फातिमा तय्यबजी ढोलकवाला,
१०४, पुष्पांजली,एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०००५४. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिक आयुक्त
बी अँड एफ, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिक आयुक्त
बी अँड एफ, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-५०. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी सहाय्यक अभियंता,इमारत व कारखाने यांच्याकडे टेनंट कोपार्टनरशीप हौसिंग सोसायटी, सीटीएस नं.२१०,जी वार्ड नं.३१९१ प्लॉट नं.७८ च्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.७.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी पत्ता दिला नाही असे कारण कळवून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, महानगरपालिकेतील इमारत विभागात सीटीएस क्रमांक दिला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही व सीटीएस क्रमांक दिला तर पत्ता दिला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. वास्तविक महानगरपालिकेच्या अभिलेख विभागात कोणत्याही इमारतीच्या संदर्भात प्रकरण शोधावयाचे असल्यास त्याबाबत योग्य ती अभिलेख जतन करण्याची पध्दत वापरणे आवश्यक आहे परंतु कोणत्याही पकारे त्यांना माहिती मागीतली तर नस्ती आढळून येत नाही अशाप्रकारचे उत्तर दिले जाते. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच करण्यात येते असे दिसून येते. या प्रकरणीसुध्दा अपिलकर्ता यांनी इमारतीचा सव्हे क्रमांक दिला असूनसुध्दा पत्ता दिला नाही या कारणास्तव त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीही कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे या कारणास्तव प्रथम अपील निकाली काढणे याचा अर्थ प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच केली असे असा निष्कर्ष काढावा लागतो. यास्तव त्यांनी अधिनियमांच्या तरतुर्दीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे.प्रथम अपीलीय अधिकारी हे त्यांच्या शाखेतील किंवा विभागातील वरिष्ठ अधिकारी असतात याचे कारणच मुळात असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसेल तर वरिष्ठ अधिका-यांनी ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु कोणतेही प्रथम अपीलीय अधिकारी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती चौकशी करीत नाहीत व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपीलांची संख्या वाढत आहे. त्यामुळे आयुक्त, महानगरपालिका यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना कमीतकमी योग्य तो निर्णय देऊन माहिती उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने चौकशी करणे आवश्यक आहे असे आदेश देणे आवश्यक आहे. सदरच्या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांच्याविरुध्दही शास्ती लादणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु आज ते आयोगापुढे हजर नसल्यामुळे

अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.२०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष खुलासा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास शास्ती कायम करण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४१/अपील क्रमांक ६२८२/२०१०

श्रीमती फातिमा तय्यबजी ढोलकवाला,
१०४, पुष्पांजली,एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०००५४. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,
इमारत प्रस्ताव, डब्ल्यू.एस.एच वार्ड, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०

जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,
इमारत प्रस्ताव, डब्ल्यू.एस.एच वार्ड, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी (इमारत प्रस्ताव),उपमुख्य अभियंता(W/S) यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Particulars of Bldg. on plot bearing C.T.S.No.२१०,T.P.S.-III,Santacurz(W)S.V.Rd.,Mumbai-४०००५४,Pushpanjali Tenant

Co-Operative Housing Society- Kindly provie me the following information- Sanctioned(approved plan-year १९७८) builder-M/S Raja Construction co.

a) Number of Stilts Car Parking Space-Area-Direction-South-East-West,North
b) Number of enclosed portios-area-direction.
c) Open plot-Garden-area-direction
d) Number of servant's toilets
e) If there is a passage from the interior of the building to go from front to back or (vise versa)
f) No. of underground tanks for the society.
g) Number of flats first floor and their areas, area of the flats on ३rd floor ३०१ & ३०२(carpet area)

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.७.२०१० रोजी काही माहिती उपलब्ध आहे परंतु मूळ नस्ती आढळून येत नाही. मात्र मूळ नस्ती शोधण्याचा प्रयत्न चालू आहे व संबंधीत वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपिलकर्ता यानी दि.२.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन, फाइल वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन फाईल पुर्नगठीत करण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे ती १९७८ सालातली आहे व जोपर्यंत इमारत आहे तोपर्यंत त्या संदर्भातील संपूर्ण नकाशे, कागदपत्र इत्यादी गोष्टी जतन करणे आवश्यक असते. परंत प्रत्येक वेळेस नस्ती आढळून येत नाही अशाप्रकारचे उत्तर इमारत विभागाकडून दिले जाते असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात काही माहिती उपलब्ध आहे परंतु मूळ नस्ती उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे संबंधीत नस्ती जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा पुर्नगठीत करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. दरम्यान संबंधीत फाईल उपलब्ध झालेली आहे व

निरिक्षणाकरीता उपलब्ध आहे असे आयोगापुढे खुलासा करतांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती/छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून१० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रमाणित करुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१५/अपील क्रमांक ६२१३/२०१०

डॉ.मुकेश बैजनाथ शुक्ल,
सी-०१, ओम चामुंडा को.ऑप.हौ.सोसायटी,
वाकोला ब्रीज,दत्तमंदीर रोड, सांताक्रूझ(पूर्व),
मुंबई-४०००५५. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा निबंधक,
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट कँपस, महात्मा गांधी रोड,
मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट कँपस, महात्मा गांधी रोड,
मुंबई-४०००३२. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी द.१३.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Subject of Information - Faculty of Ayurveda - Kayachikitsa(final year B.A.M.S. Course) and M.D. Ayurveda Kaya Chikitsa. The subject of Panchkarma is part of Kayachikitsa ४th paper first Section in under graduate (B.A.M.S. course)and also in Postgraduate Course(M.D. Ayurveda Kayachikitsa)

The Period to which the information relates -Since the date of inception of faculty of Ayurveda in the University till date

Description of the information required - As Panchakarma is a part of Kayachikitsa- ४th paper first section and is not a separate subject in Mumbai University:

१. Whether it is to be construed that the recognized post graduate students of M.D. Kayachikitsa are also having knowledge of Panchakarma?
२. Whether the experience of approved Undergraduate and Postgraduate Teacher who are teaching Kayachikitsa-४th paper first section= Panchakarma, will be counted also as teaching experience in Panchakarma&ref.dated June ०६,२००५-Post Graduate Lecture for the

Ayurved Vachaspati-M.D. Degree for the first and second term of academic year २००५-२००६)?

३. Whether the approved Postgraduate Teacher and Guide in Kayachikitsa will also be considered as the approved Postgraduate Teacher and Guide in Panchakarma?

अर्जाच्या अनूषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.४.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी चेअरमन,ॲडहॉक बोर्ड ऑफ स्टडीज,कायाचिकित्सा यांच्याशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. तत्पूर्वी दि.२१.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१,२,३ संदर्भात अभिप्रायात्मक प्रश्न असल्यामुळे माहितीच्या अधिकारात येत नाही असे उत्तर त्यांना दिले होते व त्याबाबत संबंधीत प्राधिकरणाशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन घेता येईल असेही कळविण्यात आले होते. त्यानंतर दि.२७.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात आले होते व त्यानंतर दि.१५.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या त्यांच्या मुद्यांच्या संदर्भत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेसुध्दा समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये ३ प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या प्रश्नांच्या माध्यमातून संबंधीत प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे मत मागितलेले आहे. त्यामुळे संबंधीत अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. महितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी हे सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेले अभिलेखे, कागदपत्र किंवा दस्तऐवज यांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत माहिती अधिका-यांनी अभिप्राय देणे अपेक्षित नाही. राज्य माहिती आयोग हे कोणत्याही प्रकारचे तक्रार निवारण न्यायालय नाही त्यामुळे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत चौकशी करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(त्र) प्रमाणे 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेल्या तसेच अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मिळविता येण्याजोगी माहिती देणे अपेक्षित आहे व त्यात कागदपत्र,दस्तऐवज,अभिलेखे यांचे निरिक्षण करुन छायांकित पती उपलब्ध करुन घेणे किंवा संगणकात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. व त्याकरीता माहिती या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. या संज्ञेच्या व्याख्येत सार्वजनिक प्राधिकरणाकडे साहित्याच्या स्वरुपात उदा.कागदपत्र, दस्तऐवज,परिपत्रके इत्यादींच्या संदर्भात असलेल्या माहितीचा समावेश होतो व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे अभिमत मागणे अपेक्षित नाही व तसे त्यांना कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे विलंबाच्या संदर्भात सदर प्रश्नाबाबतचे स्पष्टीकरण डॉ.सुरेखा देवाईकर(चेअरपरसन)आयुर्वेद फॅकल्टी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर त्यांचे

स्पष्टीकरण अर्जदारास देणे शक्य व्हावे. या सर्व बाबींची पूर्तता करतांना त्यासाठी काही काळ विलंब झाला असा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही,उलटपक्षी जी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही ती सुध्दा देण्याचा प्रयत्न केलेला आहे व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४६/अपील क्रमांक ६२८१/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी(इ.व का.),
मुंबई महानगरपालिका पी नॉथ कार्यालय, मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी(इ.व का.),
मुंबई महानगरपालिका पी नॉथ कार्यालय, मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३१.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारती व कारखाने),पी नॉर्थ,महानगरपालिका कार्यालय, लिबर्टी गार्डन, मालाड(प.) यांच्याकडे अर्ज करुन पुढीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते- **अवैध बांधकामोंकी लिखित शिकायत पर इमारत विभाग द्वारा की गई कारवाई के संदर्भमें जानकारी.** सदर अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी १५.३.२०१०,२४,५,२०१० रोजी केलेल्या अर्जांच्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते.काही मुद्यांमध्ये अपिलकर्ता यांनी मोघम माहिती मागीतलेली आहे,काही मुद्यांमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे मत विचारलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी २१.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.७.२०१० रोजी देण्यात आला असून उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री.एस.एच. असीफ,कनिष्ठ अभियंता उपस्थित आहेत. त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली ती अतिशय मोघम स्वरुपाची आहे. असे असले तरी त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात मात्र कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली दिसून येत नाही व त्याबाबत त्यांना काहीही कळविण्यात आलेले नाही. अर्जदाराने अर्ज केल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्या अर्जात मागितलेल्या माहितीची छाननी करुन त्याप्रमाणे त्यांना उत्तर किंवा कागदपत्र उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु सदरच्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व यास्तव त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी आज सुनावणीस उपस्थित नाहीत व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.३१.५.२०१० च्या अर्जातील नमूद केलेल्या तक्रारींच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती तसेच इतर मुद्यांमधील कागदपत्र उपलब्ध असतील तर ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती अपिलकर्ता यांना व्यक्तीश: जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता यांच्या दि.३१.५.१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसात माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे व आज ते आयोगापुढे सुनावणीससुध्दा हजर झाले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.५०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत करावा तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती कायम करण्यात येईल व सदर शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश दिले जातील याची नोंद घ्यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१४८/अपील क्रमांक ६२७९/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
पी/उत्तर विभाग,बृहन्मुंबई मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी,
पी/उत्तर विभाग,बृहन्मुंबई मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुंबई महानगरपालिका,पी(उत्तर) विभाग यांच्याकडे मालाड(नॉर्थ) विभागातील **इमारत विभागमें कार्यरत अभियंताओंकेसंबंधमें जानकारी** अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.७.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांच्या आत देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी २२.६.२०१० रोजी मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे व ती त्यांनी घेऊन जावी असे कळविण्यात आले होते. परंतु माहिती घेऊन न जाता त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरसुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती निरनिराळया विभागांची असून कोणत्याही कागदपत्रांच्या संदभात निश्चित अशी माहिती मागीतलेली नाही.सर्व माहिती मोघम स्वरुपात मागीतलेली दिसून येते. अपिलकर्ता यांच्या दि.२४.५.२०१० च्या अर्जातील मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(त्र) प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमाच्या तरतुदीपमाणे मिळविता येण्याजोगी असलेली कागदपत्र,अभिलेखे,दस्तऐवज यांचे निरिक्षण करणे व निरिक्षणाअंती छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे. तसेच अधिनियमाच्या कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्र,अभिलेखे,दस्तऐवज,परिपत्रके, शासन निर्णय,संविधा इत्यादीच्या स्वरुपात असलेली माहिती याचा समावेश होतो. या दोन्हीही व्याख्यांवरुन कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते.त्यामुळे अर्जदाराने कागदपत्राचे वर्णन करुन माहिती मागणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारची

माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात ती सर्व माहिती मोघम स्वरुपाची आहे व कोणत्याही कागदपत्राचे निश्चित वर्णन केलेले नाही व ती तयार करुन द्यावयाचे झाल्यास सावजनिक प्राधिकरणाची यंत्रणा मोठया प्रमाणावर वळवून व तयार करुन द्यावी लागेल व तसे अधिनियमाच्या कलम ७(९)प्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे जी माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध आहे ती माहिती अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी कारण माहितीच्या अर्जात त्यांनी माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे व तसे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी याना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/४९३५१/अपील क्रमांक ६२१८/२०१०

श्री.अशोक बन्सोड,
फ्लॅट नं.७०३, जमुना अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.,
६८,एस.व्ही.रोड, शॉपर्स स्टॉप समोर,अंधेरी(प.),
मुंबई-४०००५८. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)(प.उ.)१,
बृहन्मुंबई महानगरपालिका के विभाग कार्यालय,
भाभा हॉस्पीटल जवळ, आर.के. पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)(प.उ.)१ ,
बृहन्मुंबई महानगरपालिका के विभाग कार्यालय,
भाभा हॉस्पीटल जवळ, आर.के. पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.७.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.६.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव)यांच्याकडे फाईल क्र.CE/७३५५/BSII/३A-K located at Jamuna Apartment C.H.S.Ltd.,६८,S.V. Rd.,Opposite to

Shopper's stop, Andheri(West), Registration No. BOM /HSG/ KW/७३८२/१९८४ च्या संदर्भात सी.सी., आय.ओ.डी., ओ.सी., लेआऊट प्लॅन,बिल्डिंग कंप्लीशन सर्टिफिकीट,तसेच इमारतीच्या संदर्भातील इतर कागदपत्र प्रत्यक्ष घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.११.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदभात दि.१२.६.२००९ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की,त्यांनी दि.६.३.२००९ रोजी जी माहिती मागीतली त्या माहितीच्या संदर्भात नस्ती आढळून येत नाही असे त्यांना दत्तर देण्यात आले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्येसुध्दा नस्ती आढळून येत नाही व त्या नस्तीचा शोध घेण्यात यावा असे कळविण्यात आले होते. मात्र अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्या इमारतीच्या संदर्भात माहिती मागीतलेली आहे त्या इमारतीच्या संदर्भातील नस्ती क्रमांक आढळून येत नसल्यामुळे माहितीचा शोध घेता येत नाही. तरी सर्व कार्यालयामध्ये व भांडूप कॉंप्लेक्स येथील गोडाऊनमध्ये शोध घेतला तरी सदरची नस्ती आढळून आलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जर पाण्याचे देयक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिले तर त्या देयकावर नस्ती क्रमांक असतो व त्या क्रमांकाप्रमाणे शोध घेणे सुलभ होईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी पाण्याचे देयक उपलब्ध करुन दिले जाईल असे सांगितले. परंतु एकूणच महानगरपालिकेतील इमारत व कारखाने या विभागातून नस्त्या आढळून येत नाहीत अशाप्रकारचे उत्तर अर्जदारांना दिले जाते असे सर्वसाधारणत: दिसून येते. त्यावरुन अभिलेख्यांचे योग्यरित्या जतन महापालिकेमार्फत केलेले दिसून येत नाही व ती महापालिकेतील वरिष्ठ अधिका-यांची अकार्यक्षमता आहे असे म्हणावयास हरकत नाही. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दि.१४.४.०४ रोजीसुध्दा बेकायदेशीर वापराच्या संदर्भात तक्रार केलेली होती व त्या तक्रारीबाबत कोणतीही चौकशी झालेली नाही. त्यानंतर दि.९.१२.०५ रोजीसुध्दा एक तक्रार केली होती व त्या तक्रारीच्या संदर्भातही कोणत्याही पकारे चौकशी करण्यात आलेली नाही. दि.१७.७.०९ रोजी पुन्हा त्यांनी त्यांच्या केलेल्या तक्रारींवर काय कार्यवाही झाली याबद्दल माहिती अधिकारात माहिती मागीतली परंतु त्याबाबतही कोणतेही उत्तर दिलेले नाही. दि.२७.१०.०९ रोजीसुध्दा त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन कार्यवाहीची माहिती विचारली परंतु त्याबाबतही उत्तर दिले जात नाही व यावरुन माहिती

देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे असे म्हणावे लागते असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

वरील दोन्हीही विभागांमध्ये अभिलेख्यांचे जतन योग्यरितीने केलेले नाही असे आढळून येत असल्यामुळे यापुढे आयुक्त, महानगरपालिका यांनी इमारतींच्या संदर्भातील ज्या नस्त्या आहेत त्या नस्त्यांचे जतन करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र अभिलेखे अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे अभिलेख्यांचे जतन करण्याची प्रक्रिया मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी सुरु करणे आवश्यक आहे अन्यथा इमारतीस ७५ वर्षे पूर्ण झाली असली तरी त्याबाबतची कागदपत्र उपलब्ध होणे आवश्यक असते व तीच महानगरपालिकेत उपलब्ध होत नाहीत किंवा आढळून येत नाहीत अशाप्रकारचे उत्तर दिले जाते. सदर प्रकरणी माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी त्यांच्याकडील पाण्याचे देयक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावे जेणेकरुन त्यावरुन तरी नस्तीचा शोध घेणे सुलभ होइल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी इमारतीच्या वास्तुशास्त्रज्ञांकडे संपर्क साधून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांपमाणे नवीन नस्ती पुर्नगठीत करावी व अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने सर्व कागदपत्र उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

Gawas/feb 2011

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००५७/अपील क्रमांक ६२९१/२०१०

श्री. आर.पी.यजुर्वेदी,
जे-२२०, अन्सा साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-९, बांद्रा(प.),
मुंबइ-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पश्चिम नियंत्रण कक्ष, कारख रोड,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे अर्ज करुन copy of the charge sheet filed at Hon.Court No.३९ Vile Parle OW ५४३६ dt.२६.६.२००९ as per letter addressed to the SRA Bandra(E) against developer Amroo Khan under MR & TP Act u/s ५३(७) एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण पोस्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना २७.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदार यांना समाधानकारक

उत्तर दिले असल्याने सदरचे अपील दि.७.१.२०१० रोजी दफ्तरी दाखल करण्यात येत असल्याचे आदेश दिले हाते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी अर्ज केला त्यावेळेस माहितीशी संबंधीत गुन्हयात दोषारोपपत्र न्यायालयात सादरकेल्याने व ते प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही परंतु आता आरोपपत्र सादर झाले असेल तर त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आरोपपत्राची कागदपत्र एकाच प्रतीत असतात व ती न्यायालयात दाखल झालेली असतात व त्यामुळे त्यांच्याकडे आरोपपत्राच्या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध नाहीत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आरोपपत्राची प्रत उपलब्ध असली पाहिजे असे आयोगापुढे सांगितले व त्यामुळे जन माहिती अधिकारी व पोलीस निरिक्षक यांच्यात या मुद्याच्या संदर्भात मतभेद दिसून आले. मात्र दि.२७.१.२०११ रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांना अर्जदार यांनी मागणी केलेल्या मुद्याचा तपास पूर्ण करुन दोषारोपपत्र मा.रेल्वे मोबाईल न्यायालय,कोर्ट केस क्र.४३/पीडब्ल्यू/०९ अन्वये मा.३९ वे न्यायालय, विलेपार्ले येथे दाखल करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे, तरी अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती मा.न्यायालयाकडून घेण्याबाबत अर्जदार यांना अवगत करावे असे नमूद केलेले दिसून येते. त्यावर अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले असले तरी त्या संबंधातील नस्ती ही पोलीस कार्यालयात उपलब्ध असली पाहिजे त्याशिवाय न्यायालयामध्ये सरकारीपक्षातर्फे कोणत्याही प्रकारे त्या प्रकरणाच्या संदर्भात पुढील कार्यवाही करता येणार नाही. यावरुन ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक आहे. असे असल्यास अपिलकर्ता यांना दोषारोपपत्राच्या संदर्भातील कागदपत्रांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील किंवा दोषारोपपत्राच्या संदर्भातील कोणतेही कागदपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत असे स्पष्टपणे अपिलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना १० दिवसाच्या आत दोषारोपपत्राची प्रत

विनामुल्य रजिस्टरपोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी व दोषारोपपत्राची प्रत उपलब्ध नसेल तर ती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविण्यात यावे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००५५/अपील क्रमांक ६२९०/२०१०

श्री. आर.पी.यजुर्वेदी,
जे-२२०, अन्सा साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या शेजारी,
एल्फीस्टन कंपाऊंड, मुंबई.

जन माहिती अधिकारी,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या शेजारी,
एल्फीस्टन कंपाऊंड, मुंबई. **..... उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडे अर्ज करुन List of Educational institutes not approved by AICTE flouting regulations and norms and action taken thereon: Information and Inspection of records अशी माहिती मागीतलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २००९ एप्रिल ते अर्जाच्या तारखेपर्यंतचा असून माहिती एकूण A ते F या मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमूद करुन त्याकरीता त्यांनी मोबाईल नंबरही दिलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना पत्र क्रमांक ११/तंशिसं/ मा.अ./ २०१०/१२१८, दि.७.८.२०१० अन्वये माहिती देण्यात आली होती. परंतु अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी दि.२५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही. परंतु काल १.२.२०११ रोजी त्यांना कार्यालयाकडून एक पत्र मिळाले आहे व ते त्यांनी अद्यापपर्यंत फोडलेले नाही. त्यामुळे त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.७.८.२०१० रोजी माहिती दिलेली होती परंतु त्याबाबतचे कोणतेही पत्र त्यांनी आयोगापुढे सादर केलेले नाही. मात्र खुलासा दाखल करतांना व तोंडी युक्तीवाद करतांना सदर

कालावधीमध्ये कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेचे काम तातडीने व तात्काळ करणे आवश्यक होते व या प्रवेश प्रक्रियेसाठी कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी व्यस्त होते. तसेच या कार्यालयात अतिशय अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास विलंब झाला. याबद्दल दिलगीर आहेत, भविष्यामध्ये याबाबत दक्षता घेण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. परंतु प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व ती उपलब्ध करुन दिलेली नाही व सहा महिन्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे मात्र आयोगापुढे दाखविण्यात आले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही ते आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुन तंत्रशिक्षण संचालनालय या कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत उदासिनता आहे असे दिसून येते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहितीचा अर्ज हाताळणे आवश्यक आहे. माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर संबंधित शाखेकडे किंवा अधिका-यांकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांचे सहाय्य अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे घेणे आवश्यक आहे. परंतु तसेही त्यांनी केलेले दिसून येत नाही. परंतु त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, संबंधीत अधिका-यांनी/कर्मचा-यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते.वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी व कर्तव्य आहे व तो आता सेवेचा एक भाग झाला आहे. त्यामुळे विभाग प्रमुखांना याबाबत योग्य ती यंत्रणा देणे आवश्यक आहे.प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा पथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते.मात्र अपिलकर्ता यांना माहिती देण्यास विलंब झालेला असल्यामुळे संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे इतर कर्मचारी व अधिकारी यांचे सहाय्यक घेणे आवश्यक असते व असे अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असेल तर त्यांना माहिती अधिकारी समजण्याज येते व त्या अधिकारी/कर्मचारी यांनी सदरच्या अर्जावर प्रक्रिया केली नसेल तर त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.१९.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने A ते F अशी मुद्देनिहाय माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात सहाय्य घेणे आवश्यक असते व ज्यांनी ज्यांनी सहाय्य केलेले नसेल त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही विभाग प्रमुख यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या

निर्णयाची एक प्रत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.
३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१७/अपील क्रमांक ६२२२/२०१०

श्री. निलेश सहदेव टोपले द्वारा आनंद दगडू इंगळे,
के.डब्ल्यू.पी.आय. म्युनिसिपल कॉलनी, दादाभाई क्रॉस रोड,
टेप व्हिलेज, अंधेरी(पश्चिम),
मुंबई-४०००५८. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, पालिराम रस्ता,
अंधेरी(पश्चिम), मुंबई-४०००५८.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, पालिराम रस्ता,
अंधेरी(पश्चिम), मुंबई-४०००५८. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२८.७.२०१० रोजीजन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),बृहन्मुंबई महानगरपालिका, के(प.)विभाग यांच्याकडे अर्ज करुन बाँबे कॅम्बरीज स्कुल अंबोली, अंधेरी(प.) या शाळेची वर्ष १९९० ते २०१० या कालावधीतील एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून यते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.३०.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना के/पूव विभाग अंधेरी या शाळेची माहिाती मिळाली आहे परंतु त्यांच संस्थेची शाळा के(पश्चिम) विभाग यांच्याकडून मात्र माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, दिनांक १.९.२०१० रोजी विभाग निरिक्षक(शाळा) यांनी मुख्याध्यापिका बाँबे कॅम्बरीज स्कुल,अंधेरी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच तत्कालीन माहिती अधिकारी आकस्मिक आजारी पडल्यामुळे व त्या कालावधीचा कार्यभार कोणालाही न दिल्यामुळे अर्जदारास माहिती देता आली नाही व ही बाब अर्जदार श्री.निलेश टोपले यांना व्यक्तीशः बोलवून सांगण्यात आली होती. तसेच अर्जदाराने अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त, के/पश्चिम विभाग यांचेकडे अपील न करता ३०.८.२०१० रोजी अपीलीय अधिकारी प्रशासकीय अधिकारी/शाळा यांच्या नावे अर्ज केला व त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नाही. तसेच अपिलकर्ता यांना बोलावून विना अनुदानित शाळेचे दस्तऐवज व माहिती परिरक्षीत केली जात नाही असे तोंडी सांगीतले होते व तरीसुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी बाँबे केम्बरीज स्कुल,अंबोली यांचेकडे लेखी पत्र दिले होते. परंतु त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विनाअनुदानित शाळा असल्यामळे त्यांना लागू होत नसल्यामुळे माहिती देण्यास नकार दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मान्यता दिली आहे त्या संदर्भातील माहिती त्यांनी मागीतली होती व ती माहिती कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदरच्या तक्रार क्र.२०१०/४१५/०२ च्या संदर्भात आयोगाचा निर्णय झालेला आहे व त्यामध्ये खाजगी विनाअनुदानित शाळांची माहिती

देता येणार नाही असा हा निर्णय आहे. ही बाब अपिलकर्ता यांना कळविण्यात आली होती. असे असले तरी अपिलकर्ता यांनी त्यांच्या शाळेच्या मान्यतेच्या संदर्भात के(पूर्व) विभाग यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी के(पश्चिम) विभाग यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तसेच मुख्य कार्यालयात जर शाळेच्या संदर्भातील प्रस्ताव उपलब्ध असेल तर त्या प्रस्तावाची कागदपत्र अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. यास्तव सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात यत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत कार्यालयात शाळेच्या मान्यतेविषयी व अपिलकर्ता यांच्या अर्जातील १ ते ६ मुद्यांच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध असेल ती मुद्देनिहाय कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता यांच्या दि.२८.७.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष करावा. शास्तीच्या संदर्भातील माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अवगत करावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१६/अपील क्रमांक ६२१४/२०१०

श्री. निलेश सहदेव टोपले द्वारा आनंद दगडू इंगळे,
के.डब्ल्यू.पी.आय. म्युनिसिपल कॉलनी, दादाभाई क्रॉस रोड,
टेप व्हिलेज, अंधेरी(पश्चिम),
मुंबई-४०००५८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,गुंदवली,
अंधेरी, मुंबई-४०००९३.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,गुंदवली,
अंधेरी, मुंबई-४०००९३. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा), बृहन्मुंबई महानगरपालिका, के(पूर्व) विभाग यांच्याकडे दि.२८.७.२०१० रोजी अर्ज करुन बाँबे कॅम्बरीज स्कुल, चकाला,अंधेरी पूर्व या शाळेची वर्ष १९९० ते २०१० या कालावधीतील माहिती प्रथम मान्यतेपासून मान्यताप्राप्त तुकडयांची संख्या तसेच मान्यताप्राप्त नसलेल्या तुकडयांची संख्या अशी एकूण ६ मुद्यांमध्ये शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय झालेल्या नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा देण्यात आलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता विभाग निरिक्षक(शाळा) यांनी दि.२३.८.२०१० रोजी संबंधित शाळेला भेट दिली. संबंधित शाळेने त्यांच्या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही व शाळा अनएडेड असून ती सरकारी संस्थेत मोडत नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अधिनियमाप्रमाणे मागीतलेली माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले व त्याकरीता मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.५१३२/०८ मध्ये दिलेल्या आदेशाची प्रत व माहिती आयुक्तांनी श्री.लिओ मसकरांस विरुध्द माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री. रॉड्रीग्ज,इंजिनिअरींग कॉलेज यांच्या अपीलांच्या आदेशाची प्रत जोडली आहे.परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर सदर माहिती पब्लीक अॅथॉरिटी म्हणजे प्रशासकीय अधिकारी (शाळा), के(पूर्व) विभाग यांच्याकडे असलेली माहिती एकूण ४६२ पृष्ठे अर्जदारास विनामुल्य दि.७.९.२०१० रोजी पुरविण्यात आली आहे. अर्जदाराची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोचपावतीदेखील घेण्यात आलेली आहे. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी शाळेची माहिती असल्यामुळे संबंधित शाळेकडून माहिती घेण्याचा सुरुवातीला प्रयत्न केला व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देतांना विलंब झालेला आहे असे सांगितले. परंतु अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे व त्याबाबतची पोचसुध्दा त्यांनी दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०००७०/अपील क्रमांक ६३०४/२०१०

श्री. विकास सुधाकर हरियाण,
लखमा जानु खोत चाळ, न्यु आग्रिपाडा,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमहासमादेशक,
महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालय,
जुने सचिवालय जोड इमारत, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ प्रशासिक अधिकारी(प्रशा:धोरण),
महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालय,
जुने सचिवालय जोड इमारत, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.१५.१.२०११ रोजी सदर अपिलाची माहिती त्यांना प्राप्त झाली असून मिळालेल्या माहितीशी ते सहमत असल्याबाबतचे लेखी पत्र दिले असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७१/अपील क्रमांक ६३०५/२०१०

श्री. अनिल लक्ष्मण कांबळी,
बी.एम.सी. स्टॉल लायसन्स क्र.१२४२७,
चुनाम लेन, पंडित बिल्डिंगजवळ, डॉ.भडकरकम मार्ग,
ग्रँट रोड, मुंबई-४००००१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
अे विभाग कार्यालय, १३४ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी,
अे विभाग कार्यालय, १३४ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई-४००००१. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक, अनुज्ञाप्ती, ए वार्ड यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते-

१) Transfer of Stall No.१०८३ in the name of Yasmin Shaikh and allotting place for doing business in A ward dated ३०.३.२००७.

२) All documents received from Licensee Mr. Muzzaffar Rahimattulla Shaikh to transfer of Sq.Stall Lic.No.१०८३ in the name of Yasmin Shaikh.

३) SL/०००५२५/LEA dated १७.४.२००७

४) Papers U/a LOP/१४३९ dtd १७.३.२००७

५) Total Nos. of transfer applications received before and after dated १२.२.२००७ pending and cleared till this application in A ward.

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून दि.१७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.७.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपलि अंशत: मान्य करण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या पत्रात म्हटल्याप्रमाणे विहित शुल्क आकारुन त्यांना ७ दिवसांच्या आत माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु.८०/- चा भरणा करावा असे कळविले व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.८.१०.२०१० रोजी रु.८०/- च्या खर्चाचा भरणा केलेला आहे.त्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना मुद्दा क्र.१,२ व ५ च्या संदर्भात अपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांच्या अजाच्या अनुषंगाने दि.२३.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध आहे व त्याबाबत खर्चाचा भरणा करावा असे रजिस्टर पोस्टाने कळविण्यात आले होते. परंतु रजिस्टर पत्र परत आलेले आहे. अपिलकर्ता यांनीसुध्दा आयोगापुढे असे सांगितले की. ते मुंबई बाहेर होते व त्यामुळे सदरचे पत्र परत गेलेले होते. मात्र ज्या नस्तीच्या संदर्भात माहिती मागीतली होती त्यातील संपूण माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की, सदरच्या नस्तीतील संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यास कोणतीही हरकत नाही. यापूर्वी आवश्यक तेवढीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु अपिलकर्ता यांना संपूर्ण नस्तीतील प्रत्येक पृष्ठाच्या संदर्भात खर्चाचा भरणा करण्यास संमती दिलेली असल्यामुळे त्यांना नस्तीमधील संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील व त्याकरीता सदरचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीतील दिलेल्या माहितीपेक्षा उर्वरीत कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा केल्यानतर व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्याकरीता अपिलकर्ता यांनी व्यक्तीश: जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००६९/अपील क्रमांक ६३०६/२०१०

श्री. शंकर नागेश कविलकर,
टी/४५/३०४, प्रतिक्ष नगर, सायन कोळीवाडा,
मुंबई-४०००२२. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता(रस्ते वाह. व पुल),
मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(रस्ते) शहर,
कमर को.ऑप.हौ.सो.,१ला मजला, पट्ठे बापूराव मार्ग,
ग्रँट रोड, मुंबई-४००००७. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(रस्ते)शहर यांच्याकडे अर्ज करुन सायन रोड क्र.२८ व २९ मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या संदर्भात सन २०१० या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसनू येते.

१)महापालिकेच्या कोणत्या अधिका-यांच्या देखरेखीखाली काम निर्देशित केले गेले त्यांची नावे देण्यात यावी.

२)सदर कामाची जी तपासणी ज्या प्रयोगशाळेत करण्यात आली त्या प्रयोगशाळेचा पत्ता देण्यात यावा.

३) सदर कामासाठी ज्या तपासण्या केल्या गेल्या त्या किती व कोत्या प्रकारच्या होत्या, त्याची तारखेसहीत माहिती देण्यात यावी.

४) सदर कामाचे प्रयोगशाळेत वरील तपासण्या केल्या गेलेल्या अहवालाची छायांकित प्रत देण्यात यावी

माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१२.८.२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात तपासणी अहवाल उपलब्ध करुन दिलेला दिसून येतो. मुद्दा क्र.४ च्या संदर्भात तपासणी अहवालाच्या एकूण १०६ इतक्या छायांकित प्रतिंसाठी प्रति प्रत रु.२/- प्रमाणे एकूण रु.२१२/- इतके शुल्क कार्यालयात जमा केल्यानंतर उपलब्ध करुन

देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६.९.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीपेक्षा अधिक माहिती उपलब्ध असल्यास ती १५ दिवसाच्या आत द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सुरुवातीला युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याअर्जाप्रमाणे त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि.१२.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपिलकर्ता यांनी माहिती अपुर्ण व मागीतलेल्या माहितीपेक्षा वेगळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे सांगितले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये अपिलकर्ता यांनी मागीतलेलीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दाखविले. तरीही अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, काँक्रीटच्या रस्त्याला तडे गेल्यानंतर जी तपासणी प्रयोगशाळेत केलेली आहे त्या तपासणीच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलली नाही. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या बद्दल तोंडी स्पष्टीकरणात ते दाखवून दिले व यावरुन अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, दि.२९.९.२०१० रोजीसुध्दा या कार्यालयाच्या दस्तऐवजात उपलब्ध असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यापेक्षा अधिक माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांना कळविलेले होते. असे जरी दिसून येत असले तरी तडे गेल्यानंतर प्रयोगशाळेत तपासणी केलेली आहे किंवा नाही याबद्दलची माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना त्यांनी मागीतलेल्या सायन रोड क्र.२८,२९ मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या संदर्भात तडा गेल्यानंतर प्रयोगशाळेमध्ये तपासणी केली गेली असल्यास त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा तशा प्रकरची तपासणी केली गेली नसल्यास तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००६८/अपील क्रमांक ६३०७/२०१०

श्री. अशोक वसंतराव दळवी,
२२, मोहन अपार्टमेंट, रमेश नगर, अंबोली,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५८. **.....** **अपिलकर्ता**

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग-१, ६वा मजला मल्होत्रा हाऊस,
जनरल पोस्ट ऑफीससमोर, मुबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग-१, ६वा मजला मल्होत्रा हाऊस,

जनरल पोस्ट ऑफीससमोर, मुबई-४००००१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१८.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे त्यांनी दि.१.१२.२००९ रोजी अपना सहकारी बँकेच्या विरोधाम त्यांचे सभासदत्व रद्द केल्याबद्दल अप्पर आयुक्त व विशेष निबंधक पुणे यांना तक्रार केली होती त्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली दिसून येते. तसेच मुद्दा क्र.२मध्ये त्यांनी काही मागण्या केलेल्या आहेत व त्या मान्य कराव्यात असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१०.६.२०१० रोजी आपला तक्रार अर्ज कार्यालयाकडील दि.४.६.२०१० रोजीच्या पत्राने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,एफ/एस विभाग, मुंबई यांच्याकडे तक्रारीतील मुद्यांवर चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी पाठविण्यात आलेला आहे. सदरचा अहवाल अद्यापपर्यंत या कार्यालयास प्राप्त झलेला नाही. अहवाल प्राप्त होताच आपल्या तक्रारीचे संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई(१) शहर यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.८.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयात दि.९.८.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही व त्यांना त्या संदर्भात ३० दिवसांच्या आत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी तक्रार केलली आहे त्या तक्रारीच्या संदर्भात योग्य त्या चौकशीसाठी संबंधित अधिकारी यांच्याकडे ती तक्रार हस्तांतरीत केलेली आहे असे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले होते. त्यानंतर त्या तक्रारीच्या चौकशीच्या संदर्भात स्मरणपत्रसुध्दा उपलब्ध करुन दिलेले आहे परंतु त्याबाबत अहवाल प्राप्त झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. पुढे युक्तीवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे

सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च) प्रमाणे व २(त्र) प्रमाणे **माहिती** व **माहितीचा अधिकार** या दोन्ही संज्ञांच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत व त्याप्रमाणे अर्जदाराच्या अर्जासंदर्भात ज्यावेळेस कार्यालयात कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणाची चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे म्हणजेच कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे त्यांच्या तक्रारअर्जावरील तक्रारीची चौकशी करुन ज्यावेळेस अहवाल प्राप्त होईल त्यावेळेस तो उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना कळविण्यात आले होते. व तशाच प्रकारचे विश्लेषण हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयामधील विवेचनाच्या अंतिम परिच्छेदात केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहितीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी झाल्यावर अहवाल उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००४३/अपील क्रमांक ६३०८/२०१०

श्री. प्रकाश गोविंद नवाथे,
२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप. हौ.सो.लि.,
२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई-१९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. म.न.पा. आयुक्त,
एफ उत्तर विभाग,
माटुंगा, मुंबई-१९.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,
म.न.पा. एफ उत्तरन विभाग, ९६ भाऊ दाजी मार्ग,
माटुंगा, मुंबई-१९. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२७.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिधारक व संकलक यांच्याकडे अर्ज करुन राजबागला ऑक्युपेशन सर्टिफिकेट प्राप्त झाल्यावर वरील प्रापर्टी टॅक्स कमी होणार/जास्त होणार याबाबत माहिती देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.६.९.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे मागीतलेली माहिती **माहिती** या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही व त्यामुळे ती आपणास देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.८.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे ती सांप्रदायिक म्हणजेच कपोलकल्पीत स्वरुपाची असून भविष्यात काय घडेल अशा प्रकारची माहिती मागीतलेली आहे व माहिती या संज्ञेत मात्र कार्यालयातील अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात अशी तरतूद असल्यामुळे सदरची माहिती नाकारली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक आहे तसेच प्रथम अपीलाचा निर्णयही संयुक्तिक असल्याने अपिलकर्ता यांना निवासी वापराचे प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यानंतर आकारण्यात आलेल्या कराच्या संदर्भात नियम उपलब्ध असल्यास त्या नियमाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांच्या दिनांक २७.८.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने निवासी वापराचे प्रमाणपत्र इमारतीस उपलब्ध करुन दिल्यानंतर कर आकारण्या संदर्भात नियम असल्यास त्याबद्दलची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व नसल्यास त्यांना स्पष्टपणे तसे कळविण्यात यावे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२०/अपील क्रमांक ६२१५/२०१०

श्रीमती विशाखा वि.इंगळे,
बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळकनगर, चेंबूर(प.),
मुंबई-४०००८९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एम/पश्चिम विभाग,
एम विभाग कार्यालय इमारत, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर-४०००७१.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एम/पश्चिम विभाग,
एम विभाग कार्यालय इमारत, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर-४०००७१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा, एम/पश्चिम, पालिका विभाग कार्यालय, चेंबूर(पूर्व) यांच्याकडे संदर्भ

क्र.MW/OD/११९१ दि.९.३.२००९ रोजीच्या पत्राची छायांकित प्रमाणित प्रत व त्या संदर्भात आपले कार्यालयीन संदर्भीय पत्र दि.१६.३.०९ व २१.३.०९ यामध्ये नमूद केलेले पालिका सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील क्र.एलसीपी/२२३२/०८ दि.१६.१२.०८ च्या संदर्भीय पत्राची छायांकित प्रमाणित प्रत व्यक्तीशः देण्यात यावी असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२६.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्ण दि.१७.९.२०१० रोजी देण्यात आला आहे व अपिलकर्ता यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे व त्या व्यतिक्ति आणखी काही माहिती अवी असेल तर जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क करावा अशाप्रकारचा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दि.४.१०.२०१० रोजी पुन्हा अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना ३ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली असून रु.६/- इतका खर्चाचा भरणा त्यांच्याकडून घेतलेला आहे. त्यापैकी त्यांनी मागीतलेली दि.९.३.०९च्या पत्राची छायांकित प्रत या पृष्ठाची एकच बाजू दिलेली असून त्यावर पीटीओ लिहिलेले असूनसुध्दा पाठपोट छायांकित प्रत दिलेली नाही. तसेच दि.१६.३.०९ व दि.२१.३.०९या पत्रांच्या प्रती मागितलेल्या नसुनसुध्दा त्यांना २ प्रती विनाकारण उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. या दोन्ही पत्रांमध्ये सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील क्र.LCP/२२३२/०८ दि.१६.१२.०८ या संदर्भांकित पत्राची छायांकित प्रत त्यांनी मागीतली होती व ती मात्र त्यांना देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिलेली आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी या नुकत्याच रुजु झालेल्या आहेत व त्यामुळे अपिलकर्ता यांना जर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नसेल तर त्यांना त्या पत्रांची माहिती उपलब्ध करुन देता येईल,यास्तव सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० विसाच्या आत अपिलकर्ता यांना दि.९.३.२००९ च्या पत्राची पाठपोट छायांकित प्रत तसेच सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील संदर्भ क्रमांक

LCP/२२३२/०८ दि.१६.१२.०८च्या पत्राची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२२/अपील क्रमांक ६२१९/२०१०

श्री. इंगळे व्ही.एस.,
बी/६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळक नगर, चेंबूर(प.),
मुंबई-८९. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक,
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मंबई-४०००१८.

जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मंबई-४०००१८. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग,चाळी तथा जन माहिती अधिकारी, व्यवस्थापक,मुंबई विभाग विकास चाळी यांच्याकडे अर्ज करुन दि.११.५.२००९ व ३१.३.२०१० रोजी श्री.प्रकाश इंगळे यांना अनुक्रमे संदर्भ क्र.इव्हिएन/१३०३/२००९ व क्र.इव्हीएन/१२८४/२०१० या खाली पत्रे पाठवून उचित कारवाई प्रस्तावित करण्यासंबंधात त्यांना सुचित करण्यात आले आहे त्यावर आपण तयार केलेल्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रमाणित प्रत सादर करण्यात यावी त्याचबरोबर दि.३१.३.२०१०,२०.४.२०१०,७.५.२०१० आणि दि.१४.७.२०१० रोजी पत्रे पाठवून त्यामध्ये उल्लेखिलेला दस्तऐवज पुरविण्यात यावा अशाप्रकारची माहिती तसेच समेट घडवून आणल्या संदर्भात अहवालाची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय दिलेला नाही परंतु आदेशाची नोंद घेतलेल्या नोंदवहीच्या पृष्ठाची छायांकित प्रत दाखल केली आहे. त्यामुळेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता वारंवार माहितीचा अर्ज करतात व त्या सर्व अर्जांना वेळोवेळी त्यांनी उत्तरेही दिलेली आहेत. अपिलकर्ता एकाच विषयाची माहिती वेगळया पध्दतीने मागवतात व ती पुरवूनही त्यांचे समाधान होत नाही. अपिलकर्ता यांनी सादर केलेले अर्ज व त्यांना कार्यालयाकडून देण्यात आलेली उत्तरे याची सुची त्यांनी आयोगाच्या अवलोकनार्थ जोडलेलीआहे. अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्यांमध्ये काही तथ्य नसते. बीडीडी चाळीतील दोन भावांचा वाद असून त्या वादाच्या सदर्भात अपिलकर्ता वारंवार मिळकत व्यवस्थापक तसेच पोलीस यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करीत आहेत. पोलीसांनीसुध्दा अपिलकर्ता यांना दिवाणी वाद असल्यामुळे हस्तक्षेप करता येत नाही असे वारंवार सांगितलेले आहे. त्यांना आत्तापर्यंत सर्व कागदरत्रांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच पोलसांनीसुध्दा त्याना माहिाती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अर्जदार यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नाही व त्यांच्या स्वत:च्या हिताकरीता ते सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिका-यांना वेठीस धरत आहेत असे दिसून येते, तरीही त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२१/अपील क्रमांक ६२१७/२०१०

श्री. विनायक एस.इंगळे,

द्वारा- बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळक नगर, चेंबूर(प.), मुंबई-८९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-३, बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड,
भायखळा(पूर्व), मुंबई-४०००३३.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,
बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड,
भायखळा(पूर्व), मुंबई-४०००३३. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरिक्षक वरळी पोलीस ठाणे यांच्याकडे अर्ज करुन भविष्यात अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने आपण आणि श्री.आर.पी.वैती,सहाय्यक व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग,वरळी यांनी संयुक्तिकपणे केलेले उपाय इत्यादी अहवालाची झेराक्स प्रमाणित पुरविण्याबाबत तसेच त्यांच्या कार्यालयात उपरोक्त क्रमांकाचेआपणास प्राप्त झालेल्या पत्राचा सद्यस्थितीपर्यंतचा अहवाल अवगत करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी

आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांचा सहभाग घेऊन कोणत्याही प्रकारचा अहवाल तयार केलेला नाही. मात्र व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग चाळी, वरळी व अपिलकर्ता यांचे बंधू यांच्या संदर्भात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न पोलीसांनी वेळोवेळी केलेला आहे. अपिलकर्ता व त्यांचे बंधू यांच्यामध्ये बीडीडी चाळीत रहाण्यासंदर्भात वाद आहे. अपिलकर्ता हे बीडीडी चाळीत रहात नसून ते चेंबूर येथे राहतात व बीडीडी चाळीतील जागा ही त्यांचे बंधू श्री.प्रकाश इंगळे यांच्या कब्जात आहे व विषयांकित खोलीची भाडेदारी श्री.प्रकाश इंगळे यांच्या नावावर हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे श्री.विनायक इंगळे यांचे वास्तव्य तेथे होते परंतु त्यांचे भाऊ त्यांना सदरच्या खोलीत राहू देत नाहीत व त्याबाबत त्यांची तक्रार आहे. मुंबई विकास विभाग चाळीची इमारत ही शासनाची मालमत्ता असून इमारतीमधील गाळे भाडेकरुंना भाडेतत्वावर वाटप केलेले आहेत. मंबई विकास विभाग चाळीच्या इमारतीमधील गाळे कोणाही व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नाही. श्री.प्रकाश इंगळे यांनी श्री.विनायक इंगळे यांना सदरच्या खोलीत रहाण्यास सौजन्य व सहकार्य दाखविण्यासाठी व सामोपचाराने समेट घडविण्यासाठी तसेच भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडून पेचप्रसंग निर्माण होऊ नये यास्तव सदरचे वादग्रस्त प्रकरण आपल्या विभागाकडे पाठविण्यात येत आहे. तरी सदर प्रकरणी दोन्ही व्यक्तींमध्ये योग्य तो समेट घडवून या कार्यालयास अहवाल पाठवावा असे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना लिहिले असल्यामळे त्या अहवालाची माहिती अपिलकर्ता यांनी मागीतलेली दिसून येते. त्या संदर्भात अपिलकर्ता यांना एकूण १ ते ३१ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली आहेत व त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरिक्षक यांनी समेट घडविलेला असून त्याबद्दलची कागदपत्र दिलेली दिसून येतात. मात्र अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, समेट घडवतांना त्यांना कधीही बोलावण्यात आलेले नाही. या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील कारवाईच्या संदर्भात हस्तक्षेप करता येत नाही किंवा हस्तक्षेप करणे अपेक्षित नाही व त्यामुळे कागदपत्रांच्या स्वरुपात जेवढी माहिती उपलब्ध असेल ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे अपिलकर्ता यांना ती सर्व कागदपत्र उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ८.२.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००८६/अपील क्रमांक ६३२३/२०१०

श्री. भास्कर विश्राम गावडे,
बी.डी.कदम चाळ, एक्सेल कंपनी शेजारी,
वीरा देसाई रोड, अंधेरी(प.), मुंबई-५३. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
परिरक्षण विभाग, के/पश्चिम विभाग,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५३.

जन माहिती अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
परिरक्षण विभाग, के/पश्चिम विभाग,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५३. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी सी.टी.सर्व्हे क्र.७२० मधील प्रमोद नवलकर उद्यानाबाबत विरा देसाई मार्ग, कवारी रोड,विलाल मजिद समोर, अंधेरी(प.) च्या संदर्भात अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतली आहे.

१) शौचालय स्थलांतर करण्याकरीता पास केलेल्या प्रस्तावाची प्रत, सक्षम प्राधिकरणाने म.न.पा. कार्यालयात दिलेली प्रत मिळावी

२) १३.४.२०१० रोजी सहाय्यक अभियंता श्री.जाधव यांनी केलेल्या परिक्षण(तपासणी)चा रस्ता नियमित रेषेमध्ये पूर्वस्थायी शौचालय येतात किंवानाही याचा तपासणीअहवाल सादर करावा

३) विकासकाने ५% ॲमिनिटी म्हणून देण्यात येणारा भुखंड हा कोणाच्या अखत्यारीत असणार याचा लेखी खुलासा करावा व त्याचा उपयोग(एसआरए) किंवा सेल बिल्डिंगमधील रहिवाशांकरीता असेल व तो मोफत असेल कि शुल्क भरावा लागणार याचा खुलासा करावा,

माहिती प्रत्यक्ष घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३.६.२०१० रोजी एकूण ३ मुद्यांवर माहितीच्या संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी/सहाय्यक अभियंता(परि.)उत्तर यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलकर्त्यांस स्थळ पाहणीच्या अहवालाची प्रत सात दिवसांचे आत देण्यात यावी. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेलेआहे.

सुनावणीस अपिलकर्ता हजर आहेत, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्र दाखल केलेली नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या नोटीसचा अवमान केलेला आहे व त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे त्या संदर्भात युक्तीवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना प्रस्तावाची संपूर्ण माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा

नाहीत याबद्दलचा अहवालही त्यांना दिलेला नाही. मात्र दि.३.६.२०१० च्या पत्रामध्ये स्पष्टपणे रु.२/- प्रति प्रत भरणा केलनंतर सदर प्रस्तावाची छायांकित प्रत आपल्याला उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले आहे. अहवालाच्या संदर्भात कार्यालयामधून हातोहात अहवालाची प्रत देण्यात आली आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच विकासकाकडून ५०% च्या संदर्भातसुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे पुन्हा असे म्हणणे आहे की, प्रस्तावाच्या छायांकित प्रतीचा खर्च ते भरण्यास तयार होते परंतु जन माहिती अधिकारी यांनी ३०व्या दिवशी खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. वास्तविक माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ५-७ दिवसात खर्चाचा भरणा करण्यास कळविणे आवश्यक असते, जेणेकरुन अर्जदारास खर्चाचा भरणा करुन मुदतीत माहिती प्राप्त करुन घेता येते. परंतु ३०व्या दिवशी खर्चाचा भरणा करण्यास कळविणे याचा अर्थ माहिती देण्यास टाळाटाळच करण्याचा उद्देश दिसून येतो व मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल तर विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ७(६) मध्ये आहे. त्याप्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत याबाबतच्या अहवालाची प्रत किंवा नकाशे उपलब्ध करुन द्यावेत असे त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना सांगितले. उत्तरवादी गैरहजर असल्यामुळे व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्दल काहीही कागदपत्र सादर केलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरुन असा निर्णय देण्यात येतो की, सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.३.५.२०१० च्या अर्जात मागितलेल्या ३ मुद्यांच्या संदर्भात मुद्देनिहाय संपूर्ण प्रस्तावाची तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत त्या अहवालाची प्रत तसेच नकाशाची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१५७/अपील क्रमांक ६३२०/२०१०

श्री. अण्णाजी शामराव अडबोल,
१६/२५२, कन्नमवार नगर नं.१,
विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
दर्यापूर, जि.अमरावती.

जन माहिती अधिकारी,
दर्यापूर, जि.अमरावती. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.६.२०१० रोजी मौजे लोहिजखेडा येथे गट क्र.१४ व १५च्या दुरुस्ती करण्यासाठी दि.१८.१२.०९ रोजी दिलल्या अर्जाच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.७.२०१० रोजी त्यांच्या दुरुस्ती तक्रार अर्जाच्या संदर्भात गुणवत्तेच्याबाबत नायबतहसिलदार यांनी कळविलेले दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीनुसार मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२३.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना एकूण

३४ पानांची माहिती पुरविण्यात आलेली दिसून येते तसेच अपिलार्थी यांनी अपिलामध्ये मागीतलेली माहिती, माहिती या संज्ञेत बसत नसल्यामुळे अपिल फेटाळण्यात आले आहे असा निर्णय दिल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यांनी गट नं.१४ व १५करीता दुरुस्ती अर्ज केलेला आहे परंतु सदरच्या दुरुस्ती अर्जाच्या संदर्भात त्यांना मागीतलेली माहिती देण्यास दुर्लक्ष करण्यात आले आहे. परंतु नायब तहसिलदार, दर्यापूर यांनी असे सांगितले की, त्यांच्या अर्जाची सुनावणी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता-६६च्या तरतुदीप्रमाणे सुरु आहे व तेथे प्रत्येक तारखेस हजर रहाण्याकरीता त्यांना २९.७.२०१० रोजी कळविण्यात आले होते. तसेच त्याबाबतची सर्व माहिती अपिलकर्ता यांना १ ते ३४ कागदपत्रांमध्ये देण्यात आलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यातील फक्त ३ कागदपत्र नवीन असून ३० कागदपत्र त्यांनीच दाखल केलेली आहेत. परंतु त्यावर नायबतहसिलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की जी सुनावणी आहे ती महसूल कायद्याप्रमाणे असल्यामुळे व ती आरटीएस अपिलाची सुनावणी असल्यामुळे माहितीच्या अधिकारात त्याबद्दल कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही किंवा त्या अपील अर्जाच्या सुनावणीसंदर्भात कार्यवाही का करण्यात येत नाही याबाबतही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांनी मूळ माहिती अर्ज व प्रथम अपील या दोन्ही कारवाया या त्या कार्यालयाच्या क्षेत्रातील नसल्याने प्रतिवादी म्हणून सदर अपिल अर्जाविरुध्द दोन्ही पक्षांना नोटीस पाठवून सुनावणीसाठी हजर रहाण्यास कळविण्यात आले आहे. सुनावणीच्यावेळी असे आढळून आले की, सदर अपील तहसिलदार, दर्यापूर यांच्या अधिकारक्षेत्रातील आहे. म्हणून उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांचे नाव प्रकरणातून वगळण्यात यावे असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. थोडक्यात अपिलकर्ता यांच्या दुरुस्ती अर्जाच्या संदर्भात तातडीने निर्णय होणे अपेक्षित आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्र उपलब्ध होत नाहीत व कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात राज्य माहिती आयोगास आदेश देता येत नाहीत व त्यामुळे त्यांना पृष्ठ १ ते ३४ उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१५८/अपील क्रमांक ६३१९/२०१०

श्री. शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली, मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
पी-नॉर्थ, बृहन्मुबई महानगरपालिका,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.),
मुंबई.

जन माहिती अधिकारी,
इमारत विभाग, पी-नॉर्थ, बृहन्मुबई महानगरपालिका,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.),
मुंबई. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान झाले व मी संतुष्ट आहे असे अपिलकर्ता यांनी लेखी लिहून दिले आहे

असे जावक नोंद वहीवरील नोंद दाखवून प्रतिपादन केले. सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचे अपील **निकाली** काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१५६/अपील क्रमांक ६३२१/२०१०

श्री. राजेश कृष्णाजी घडशी,
विजय कर्पे चाळ नं.३बी, रुम नं.१०,
ज्यु जिम्मी बाग, कल्याण तिसगाव रोड, कल्याण(पूर्व),
ठाणे. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता(स्थापत्य),
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
घाटकोपर. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्यातर्फे श्री.महेश गावडे यांनी दि.२०.१.२०१० रोजी माहिती अधिकारी(म्हाडा) यांच्याकडून मला सर्व माहिती मिळाली असल्याने माझी काहीही तक्रार नाही असे लेखी सादर केलेले निवेदन आयोगासमोर सादर केले. यास्तव सदरचे अपील **निकाली** काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/४२२०६/अपील क्रमांक ५८४०/२०१०

श्री. डॉ.शहा बाहुबली हिरालाल,
हिरानगर, होमिओपॅथी क्लिनीक, रणवरे टॉवर्स,
सिनेमा टॉवर्स, बारामती-४३३१०२. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
अनेकांत एज्यूकेशन सोसायटी,
तुळजाराम चतंररंग कॉलेज कँपस,

बारामती-४३३१०२, जि.पुणे.

जन माहिती अधिकारी,
अनेकांत एज्यूकेशन सोसायटी,
तुळजाराम चतंररंग कॉलेज कँपस,
बारामती-४३३१०२, जि.पुणे. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ३.७.२००९
सुनावणीचा दिनांक : ९.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२५.५.०९ व २६.५.०९ रोजी जन माहिती अधिकारी अनेकांत एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे संस्थेच्या कार्यालयातील कर्मचा-यांची नावे, त्यांनी धारण केलेले पद व शैक्षणिक अर्हता, नियुक्तीचा दिनांक व त्यांचे वय इत्यादी माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५प्रमाणे नियुक्त केलेले माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे व हुद्दा, माहितीच्या वेबसाईटचे नाव व अधिनियमाप्रमाणे आवश्यक असलेली सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे काय तसेच संस्थेचे कामकाज व घटनात्मक रचनेच्या संदर्भात सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि.६.४.२०६२ रोजी नोंदणीकरीता दाखल केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत व इतर ६ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते.

२. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२२.६.२००९ रोजी सचिव, अनेकांत एज्युकेशन सोसायटी,बारामती ही अल्पसंख्यांक संस्था माहिती अधिकाराच्या कायद्यात येत नाही अशी आमची धारणा आहे. तथापि, आपण पूर्व सूचना देऊन संस्था कार्यालयात यावे म्हणजे त्यावेळी मा.अध्यक्ष व मा.सचिव उपस्थित राहून आपणास आवश्यक ती माहिती देतील याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२५.६.०९ रोजी आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा त्या पत्राप्रमाणे दि.२९.६.०९ रोजी अध्यक्ष,अनेकांत एज्युकेशन सोसायटी,बारामती यांनी त्याचप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते. अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील दाखल केल्यानंतरसुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे दि.१४.१२.०९ रोजी ३ पत्रे व्हीडीओ कॉनफरन्सींगच्या सुनावणीसंदर्भत दिलेली दिसून येतात. तसेच सदर अपिलाची सुनावणी राज्य माहिती आयोगाच्या पूर्ण खंडपीठाकडे करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती, संस्थेने दिलेल्या त्या संदर्भातील उत्तराच्या संदर्भात सदर अपिलाची सुनावणी ही पूर्ण खंडपीठाने घेण्याची

आवश्यकता नसल्यामुळे मुख्य माहिती आयुक्त यांनी ही सुनावणी दि.९.२.११ रोजी घेतलेली आहे. सुनावणीस अपिलकर्ता तसेच तु.च.महाविद्यालयाचे प्राचार्य व तु.च. महाविद्यालयाचे रजिस्ट्रार हजर होते.

३. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांना सदर संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. तसेच व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे सुनावणी घेणा-या माहिती आयुक्तांनी मुंबई उच्च न्यायालयाने(नागपूर खंडपीठ) याचिका क्र.५२९४/२००८ संदर्भात दिलेल्या निकालाचा गोषवारा देऊन सुनावणी स्थगित केली. तसेच दि.१४.१२.२००९ रोजी मा.मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे अर्जकरुन या अपिलाची सुनावणी पूर्ण पीठाकडे घेऊन युक्तीवाद करण्याची विनंती केली. तसेच या सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाचा अभ्यास केला असता त्या निर्णयामध्ये पब्लीक ट्रस्टना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होण्याकरीता अधिनियमात नमुद केलेल्या अटींपैकी एक अट(किमान) पूर्णकेल्याचे दाखवून दिल्यास सदर संस्थेस अधिनियम लागू होऊ शकतो असे प्रतिपादन केले. त्याप्रमाणे संस्थेस राज्य शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोग,विद्यापीठ यांचेकडून प्रत्यक्ष अनुदान किंवा भरघोस अर्थसहाय्य मिळत असल्याबाबत युक्तीवादाच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिल्यावरुन प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्याप्रमाणे संस्थेच्या नोंदणीकृत घटनेप्रमाणे अनेकांत एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे उद्दिष्ट राष्ट्र उभारणीकरीता विविध प्रकारचे शिक्षण देण्याकरीता शाळा,महाविद्यालय, वसतीगृह, पाठशाळा,वृत्तपत्र,ग्रंथालये व संशोधन संस्था स्थापन करणे आणि त्या चालविणे हे आहे(Appendix-I) म्हणजेच संस्थेने स्थापन केलेल्या आणि शासनाकडून दरवर्षी वेतन व वेतनेतर खर्चाकरीता भरघोस अनुदान प्राप्त करणा-या महाविद्यालयांचे संचालन व व्यवस्थापन हा संस्थेच्या नियमित कामकाजाचा एक भाग असल्याने सदर महाविद्यालयांना मिळणारे भरघोस अर्थसहाय्य हे एक प्रकारे संस्थेला मिळणारे अर्थसहाय्यच आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीतर्फे बारामती व जयसिंगपूर येथे प्रत्येकी एक अनुदानित वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय चालविले जाते. ही महाविद्यालये व त्यांचे कामकाज संस्थेच्या कारभाराचा एकात्मिक व अविभाज्य घटक असल्यानेच ही दोनही महाविद्यालये वेगवेगळया विद्यापीठांशी संलग्न असली तरी एका महाविद्यालयात नियुक्त केलेल्या कर्मचा-याची संस्था दुस-या महाविद्यालयात बदली करु शकते(Appendix-V) याचाच अर्थ संस्थेच्या महाविद्यालयातील नियुक्त कर्मचारी हे केवळ त्या महाविद्यालयाच्या नव्हे तर संस्थेच्या सेवेतील कर्मचारी असून त्यांच्या वेतनापोटी शासनाकडून मिळणारे अनुदान हे संस्थेला मिळणारे अप्रत्यक्ष अर्थसहाय्य आहे. संस्थेची उपरोक्त दोन्ही अनुदानीत महाविद्यालये सुरु करतांना शासन व विद्यापीठ यांचेकडे परवानगी व संलग्नता याकरीता

केलेले अर्ज हे संस्थेतर्फे केले गेले आहेत व नियमानुसार परवानगी संस्थेच्या नावाने आहे त्यामुळे संस्था व सदर महाविद्यालये यांना स्वतंत्र मानणे अतार्किक आहे. राज्य शासनातर्फे चेअरमन, अनेकांत एज्युकेशन सोसायटी या नावाने महाविद्यालय चालविण्याकरीता जयसिंगपूर येथे अंदाजे एक लाख चौ.मि.भुखंड रीवार्डने दिला असून त्या भुखंडावर महाविद्यालयाकरीता विविध इमारती संस्थेने उभारल्या आहेत. सदर भुखंड महावीर को.ऑप.बँक या वित्त संस्थेकडे संस्थेने महाविद्यालयाकरीता रु.२५,००,०००/- इतके कर्ज घेण्याकरीता संस्थेच्या नियामक मंडळाच्या ठरावानुसार घेतले होते. सदर कर्जाची परतफेड महाविद्यालयाकडून नियत वेळेत न झाल्याने न्यायालयीन प्रक्रिया होऊन उपरोक्त भुखंडाचा काही भाग व त्यावरील इमारत वित्त संस्थेच्या ताब्यात दिली गेली होती. यावरुन महाविद्यालय व संस्था निरनिराळे नसुन एकच आहेत(Appendix-XIII). संस्थेच्या बारामती येथील महाविद्यालयाकरीता राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ यांचे अनुदानातून बांधलेल्या सर्व इमारती संस्थेच्या नावावर असलेल्या भुखंडावर असून त्या इमारतींची मालकी संस्थेकडे आहे व या इमारतींमधून संस्थेस भाडयाचे उत्पन्न मिळते तसेच वसतीगृह विद्यार्थ्यांचे भाडेसुध्दा संस्थेकडे जमा हाते व ते संस्थेच्या उत्पनाचे साधन आहे हे भुखंडाचा सातबारा(Appendix-VI) संस्थेच्या बारामती स्थानिक समितीचे (संस्थेच्या घटनेप्रमाणे स्थापन झालेली उपसमिती) अंदाजपत्रक(Appendix-II) महाविद्यालयाचे ऑडीटेड स्टेटमेंट(Appendix-VII)यावरुन सिध्द होते. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ८६ पमाणे संलग्न महाविद्यालयाचा कारभार पाहण्याकरीता स्थापन करावयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद संस्थेच्या अध्यक्षांकडेच असते. तसेच या समितीमध्ये संस्थेच्या सचिवांचा समावेश असतो. या समितीच्या कार्यकक्षेतील तरतुदी पाहिल्या असता महाविद्यालयाकरीता आवश्यक असणा-या अध्यापक व अध्यापकेतर पदांची निर्मिती करणे, महाविद्यालयाचा दर्जा वाढविणे याकरीता केवळ शिफारसी करणे समितीच्या अखत्यारीत असून अंतिम निर्णय करण्याचे अधिकार संस्थेच्या व्यवस्थापनाकडे असल्याचे दिसून येते. हीच बाब महाविद्यालयाच्या अंदाजपत्रकासही लागू आहे(Appendix-XIV) वरील सर्व बाबींचा विचार करता संस्थेतर्फे चालविली जाणारी अनुदानित महाविद्यालये ही संस्थेच्या कारभाराचा एकात्मिक व अविभाज्य भाग असून या महाविद्यालयाचा कारभार हा संस्थेच्या प्रशासनाचाच एक भाग आहे हे स्पष्ट होते.तसेच निरनिराळया शासकीय अनुदान व अर्थसहाय्यातुन उभारण्यात आलल्या इमारती व वसतीगृहांची मालकी संस्थेकडे असून ती या संस्थेच्या उत्पन्नाचा एक प्रमुख स्त्रोत आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(ii) मधील तरतुदी तसेच उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.५२९४/२००८ संदर्भातील निर्णयातील मुद्दा क्र.७ व ८ चे विश्लेषण यांचा विचार केला असता अनेकांत एज्युकेशन

सोसायटी या ट्रस्टला माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो असे त्यांनी ठाम प्रतिपादन केले आहे.

४. त्यावर प्राचार्य तु.च.महाविद्यालय, बारामती यांनी युक्तीवाद केला. वास्तविक अपिलकर्ता यांनी महाविद्यालयाचे माहिती अधिकारी यांना माहिती मागीतली नव्हती. महाविद्यालयाचे माहिती अधिकारी हे प्राचार्य असतात परंतु अपिलकर्ता यांनी संस्थेकडे माहिती मागीतलेली होती व त्यामुळे संस्थेचे पदाधिकारी यांनी आयोगापुढे हजर रहाणे आवश्यक होते. तसे प्राचार्य यांना आयोगाने विचारले असता संस्थेने प्राचार्यांना पाठविले असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. प्राचार्यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांना शासनाचे अनुदान मिळते हे खरे आहे परंतु शासनाचे अनुदान हे प्राचार्य, महाविद्यालय यांच्याकडे वर्ग केले जाते. संस्थेला कोणत्याही प्रकारचे शासनाचे अनुदान मिळत नाही. संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०च्या अंतर्गत तसेच सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत झालेली आहे व त्यामुळे ती सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे. सार्वजनिक विश्वस्त संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान उपलब्ध होत नाही व त्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त संस्थेला शासनाचे अनुदान नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अनेकांत एज्युकेशन सोसायटी ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे असल्यामुळे व संस्थेला कोणतेही प्रत्यक्षअनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी त्यांना लागू होत नाहीत. तसेच संस्थेस अल्पसंख्यांक संस्थेचा दर्जा असल्यामुळेसुध्दा अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना लेखी प्रतिज्ञापत्रात सादर केल्याप्रमाणे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान मिळते व ते पर्यायाने संस्थेलाच मिळत असते. सदर निर्णयाच्या संदर्भात प्राचार्य यांनी पुढे युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, शिक्षण संस्था असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचे शासनाकडून अनुदान मिळत नाही. मात्र पुढे अपिलकर्ता यांनी पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की. संस्थेस विद्यापीठ अनुदान आयोगाकडून इमारतीच्याकरीता अनुदान मिळाले आहे तसेच इतर अनुदान जे मिळते ते सुध्दा संस्थेलाच मिळते याबद्दल मात्र प्राचार्यांनी तशा प्रकारची व्यवस्था आहे हे मान्य केले.

६. कोणतीही शाळा किंवा महाविद्यालय शासनाकडून मंजूर होताना माध्यमिक शाळासंहिता तसेच विद्यापीठ अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे शाळा किंवा महाविद्यालय हे संस्थांना मंजूर होते. कोणत्याही व्यक्तीला वैयक्तीकरित्या शाळा किंवा महाविद्यालय शासनाकडून मंजूर होत नाही. माध्यमिक शाळासंहिता यामध्ये शाळा मंजूर करण्याच्या

संदर्भात ज्या तरतुदी आहेत त्यामध्ये मान्यतेच्या शर्ती दिलेल्या आहेत व त्यामध्ये नवीन शाळा सुरु करणे याबाबतच्या तरतुदी केलेल्या आहेत.

७. शाळा सुरु करण्यासाठी मान्यतेच्या शर्ती, मान्यता नाकारणे, काढून घेणे या संदर्भात प्रकरण २ मध्ये तरतूद केलेली आहे त्यामध्ये २.१ मध्ये शाळा सुरु करण्यासाठी व्यवस्थापनाने अर्ज केला पाहिजे अशी तरतूद आहे.मान्यतेच्या शर्तीमध्ये मुद्दा क्र.३.२ मध्ये एकूण १६ शर्तींची व्यवस्थापनाने पूर्तता केली असली पाहिजे अशी तरतूद दिलेली आहे. त्याचप्रमाणे तात्पुरती व कायम मान्यता या बद्दलसुध्दा तरतूद करण्यात आली आहे. मान्यता नाकारणे, मान्यता काढून घेणे याबद्दलचीसुध्दा तरतूद आहे. जेव्हा शाळेच्या व्यवस्थापनात बदल करण्याचे योजले असेल तेव्हा असा बदल करण्यासाठी उपसंचालकांची पूर्व परवानगी मिळवली पाहिजे तसेच मान्यताप्राप्त शाळेचे एका व्यवस्थापनाकाडून दुस-या व्यवस्थापनाकडे हस्तांतर पोटनियमांच्या अधीन राहील. वेतन व वेतनेतर अनुदान या संदर्भात शासन व सहाय्यक अनुदानासाठी पात्रता या संदर्भात मुद्दा क्र.८६.२ मध्ये खाजगी मालकीच्या शाळा(म्हणजे १९६० चा संस्था नोंदणी अधिनियम क्र.२१ किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था १९५० किंवा शासनाने याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी न केलेल्या शाळा जातीय शाळा आणि शासनाने बिगर सहाय्यक अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा या लोकनिधीतून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असणार नाहीत अशी तरतूद आहे. मान्यताप्राप्त शाळा मंजुरी प्राधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार निधी उपलब्ध असेल तर खालीलप्रकारचे अनुदान मिळण्यास पात्र असतील. मात्र ज्या संस्था अशा शाळा चालवित असतील त्या संस्थांची वेळोवेळी दुरुस्त केलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी केलेली असली पाहिजे.१)वेतन अनुदान,२) वेतनेतर अनुदान,३)इमारत अनुदान,४) शासन वेळोवेळी मंजूर करेल अशी इतर अनुदाने त्याकरीता पात्र असतील. सहाय्यक अनुदानासाठी नोंदणीकरीता करावयाचे अर्ज मुद्दा क्र.९३.१ मध्ये विभागाकडून सहाय्यक अनुदान घेऊ इच्छिणा-या शाळांनी त्यांना ज्या वर्षी अनुदान मिळावयाचे असेल ते शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या किमान ६ महिन्यांपूर्वी समुचीत प्राधिका-यांकडे परिशिष्ट २१ मध्ये दिलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे.प्राप्तानुदानित शाळांच्या यादीमध्ये एकदा शाळा समाविष्ट करण्यात आली म्हणजे त्या शाळेस ती जोपर्यंत मान्यतेच्या अटी पूर्ण करीत राहील आणि इतर नियमांचे व विभागांतर्गत वेळोवेळी दिलेल्या सचनांचे पालन करीत राहील तोपर्यंत वर्षावर्षाला अनुदान मिळत राहील.

यावरुन अनुदानेतर शाळांच्या संदर्भात व्यवस्थापनानेच अर्ज करावयाचा असल्यामुळे अनुदान हे संस्थेलाच मिळते असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच खजगी प्राप्तानुदान शाळांच्या व्यवस्थापनाने व शाळेची इमारत बांधण्याकरीता किंवा शाळेच्या

इमारतीचा विस्तार करण्याकरीता अनुसुचित बॅकांनी देऊ केलेल्या कर्जाकरीता शासनाची हमी देण्याच्या योजनेबाबतचा नियमसुध्दा दिलेला आहे व त्याप्रमाणे शासन त्याकरीता हमी देत असते.महाविद्यालयाच्या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४च्या कलम ८२ च्या पोटकलम(३) प्रमाणे नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता व्यवस्थापनाने अर्ज करावा अशी तरतूद आहे. त्याप्रमाणे कलम ८१ मध्ये मान्यता देण्यासंदर्भात व्यवस्थापनालाच महाविद्यालय मंजुर होते अशी तरतूद आहे आणि विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय व्यवस्थापनास कोणताही बदल करता येत नाही अशीही तरतूद त्यामध्ये आहे. तसेच सदरच्या महाविद्यालयामध्ये किंवा शाळांमध्ये शिक्षक व कर्मचारी यांची नियुक्ती तसेच त्यांना काढून टाकणे किंवा पदोन्नती देणे किंवा बदली करण्याचे अधिकार हे संस्थांनाच आहेत व संस्था हे अधिकार उपभोगतात. थोडक्यात कोणतीही शैक्षणिक संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०च्या तरतुदीप्रमाणे नोंदणीकृत असल्याशिवाय शाळा किंवा महाविद्यालय मंजूर होत नाही व शाळा किंवा महाविद्यालयास शासनाचे अनुदान असले तर ते अप्रत्यक्षपणे संस्थेला शाळा किंवा महाविद्यालय चालविण्यासाठीचे अनुदान असते व त्यामळे कोणत्याही अनुदानित शैक्षणिक संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होत नाही असे म्हणता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ३(ज) मध्ये "सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ" समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे व त्यामध्ये (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्यांच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय (दोन)समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशी अशासकीय संघटना यांचा समावेश होतो.

वरील व्याख्यांप्रमाणे व अपिलकर्ता यांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे तसेच प्राचार्य यांनी मान्य केल्याप्रमाणे अनेकांत शिक्षण संस्थेस शासनाकडून विद्यापीठ अनुदान मिळते याबाबत कोणतेही मतभेद दिसून येत नाही. संस्थेतर्फे याचिका क्र.५२९४/०८ मधील निर्णय हा एका धार्मिक मठाच्या संदर्भात निर्णय आहे व सदरचा धार्मिक मठ हा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०प्रमाणे नोंदणीकृत असून सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे परंतु त्यास शासनाचे अनुदान नही व त्यामळे मा.उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी त्यास लागू होणार नहीत असा निर्णय दिलेला आहे. परंतु त्याच निर्णयामध्ये परि.८ मध्ये Any person seeking to establish that a particular trust is covered by the provisions of the

Right to Information Act will have to first prove that it is a public trust created by Government or Parliament or is substantively financed by the Government असे नमूद केलेले आहे व त्याप्रमाणे सदरच्या अनेकांत शिक्षण संस्थेस महाविद्यालय व शाळा चालविण्याकरीता शासनाकाडून अनुदान मिळते असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपूर यांच्यापुढील याचिका क्र.५०६७/०९मध्ये न्यायमूर्ती श्री.एस.ए. बोबडे आणि न्यायमूर्ती श्री.ए.बी.चौधरी यांच्या खंडपीठाने दि.१०.८.२०१० रोजी शिक्षण प्रसारक मंडळ कामठी विरुध्द स्टेट इन्फर्मेशन कमिशन नागपूर बेंच, नागपूर, श्री.भुषण केशवराव तिजारे व सहशिक्षण संचालक, नागपूर विभाग,नागपूर या याचिकेमध्ये परि.७ मध्ये खालीलप्रमाणे निरिक्षण केलले आहे.

In the instant case, it is not in dispute that the said College run by the petitioners - Society is receiving grants-in-aid and the grants-in-aid received by the College from the Government are managed by the Society and its College. We, therefore, hold that the Non-Government Schools/Colleges/institutions receiving grants-in-aid either from the State Government or the Central Government are fully covered by the definition of public authority and such Schools/Colleges are covered by the provisions of the Right to Information Act,२००५.

वरील निर्णयाप्रमाणे याचिकाकर्ता यांची याचिका फेटाळण्यात आलेली आहे याचा अर्थ संस्थेस शाळा किंवा महाविद्यालय चालविण्याकरीता अनुदान मिळते त्यामुळे अनेकांत शिक्षण संस्थेचासुध्दा सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत समावेश होतो व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. त्यामुळे संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ५(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी नियुक्त करणे तसेच कलम १९(१)प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहील व त्यानंतर अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२५.५.०९, २६.५.०९च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून अनेकांत शिक्षण संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात व हा निर्णय मिळाल्यापासून पांच दिवसांचे आत अनेकांत शिक्षण संस्था,बारामती मध्ये

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) अन्वये जन माहिती अधिकारी तसेच कलम १९(१) अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करावी.

२) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती केल्यानतर संबंधित जन माती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.२५.५.०९ व २६.५.०९च्या अर्जांच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची पत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ११.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७७/अपील क्रमांक ६३०३/२०१०

श्री. रसिकलाल रतीलाल गांधी,
द्वारा वरुन कॉंप्युटर सर्व्हीस, पांजरपोळ कंपाऊंड,
जैन देवळाजवळ, मुंबई-४. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(इ) मुंबई,
गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,
बंद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग को.ऑप.हौ.सो.,
एम.एम.आर.डी.ए. बिल्डिंग, रुम नं.३१५/३१६,
वडाळा, मुंबई-४०००३१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(पी वार्ड) यांच्याकाडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७३(IAB) व ७८, नियम १९६१ प्रमाणे नियम ५८(ए)च्या संदर्भात निवडून आलेल्या समितीने बॉंड दिलेले आहेत किंवा नाहीत याची माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३१.८.२०१० रोजी सदर कारणास्तव प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपील

अंशतः मान्य करण्यात येत असून उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग यांनी अर्जदारांना बंधपत्राची माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.१८.१.२०१० रोजी संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार योग्य ती वैधानिक कार्यवाही करण्यात येत आहे असे असे अपिलकर्ता यांना कळविले आहे. असे असले तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दि.११.१०.२०१० रोजी दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संस्थेच्या संचालक मंडळावर कारवाई झालेली असल्यामुळे आता त्यांची काहीही तक्रार राहिलेली नाही व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७५/अपील क्रमांक ६३०१/२०१०

श्री. आय.पी.योगींदरन,
सहा.अभियंता,इमारत विभाग(दक्षिण) विभाग,
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उप्रम(बृहन्मुंबई महानगरपालिका),
मुंबई सेंट्रल बस डेपो, मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा चिफ इंजिनिअर(सिव्हील),
बेस्ट उपक्रम, इलेक्ट्रीक हाऊस,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००८.

जन माहिती अधिकारी,
सिव्हील इंजिनिअर डिपार्टमेंट,
बेस्ट उपक्रम, इलेक्ट्रीक हाऊस,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.६.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, स्थापत्य यांत्रिकी विभाग, बेस्ट यांच्याकडे राज्याच्या आरक्षण धोरणाच्या संदर्भात नियुक्ती व पदोन्नतीबाबत उप अभियंता, ग्रेड जी/जी-४ च्या संदर्भात एकूण ९ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते.सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.६.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांना रु.१८४/- डॉक्युमेंट चार्ज व रु.२५/- पोस्टाचे चार्ज असे एकूण रु.२०९/-चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी भरणा केल्यानंतर त्यांना दि.१२.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.८.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व सुनावणीत ठरल्याप्रमाणे दि.२७.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तरीसुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी अपिलकर्ता यांना उपरोक्त माहिती दिली व त्याचप्रमाणे काही माहिती देतांना काही कालावधी लागेल असे त्यांना पत्राद्वारे कळविले होते. तरीसुध्दा त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतु अपिलकर्ता यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध झालेली माहिती दि.३.१२.२०१० नुसार त्यांना हस्तपोच केलेली आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपिल निकाली काढण्यात येतआहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९९७/तक्रार क्र. १६१५/का.१

श्री. वसंत आदितीरावितार,
ग्रीन हिल को.ऑप.हौ.सोसायटी, २५-बी/४०२,

नवीन दिंडोशी,गोरेगाव(पूर्व),
मुंबई-४०००६५. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,
अतिक्रमण व निष्कासन,
अतिक्रमण यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, तळमजला,
रुम नं.६८, वांद्रे(पूर्व),
मुंबई-४०००५१. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १०.१०.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी त्यांच्या अपिल क्र.५४११/०८च्या दि.३.७.२०१० च्या आयोगाच्या निर्णयाप्रमाणे व दि.२२.२.२०१० च्या अपिल क्र.५४११/०२ व तक्रार क्र.७२४/०२ मधील निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माीिती आयोगाकडे दि.११.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अपिलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.१०.०९ रोजी तक्रार केली होती. परंतु त्या तक्रारीच्या निर्णयाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी सध्याची तक्रार आयोगाकडे केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना वेळोवेळी पकरणातील सर्व माहिती उपलब्ध करुन दिलली आहे. दि.७.११.०९ च्या प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशात नमूद केल्यानुसार -

१) उपजिल्हाधिकारी(अति/निष्का)अंधेरी यांच्या दि.१८.४.०६ च्या सुनावणीच्या नोटीसीस अनुसरुन संचिका डी.नं.२५६ आढळून न आल्याने त्याच प्रकरणात श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दि.१६.३.०९ रोजी सादर केलेला अर्ज मा.अप्पर जिल्हाधिकारी(अति./निष्का.)पश्चिम उपनगरे यांजकडून दि.१०.७.०९ रोजी प्राप्त झालेल्या व त्यासोबत असलेल्या पुराव्याच्या आधारे दि.१७.११.०९ रोजी डी.नं.२५६ बाबतीत अपात्रतेचा आदेश पारीत केला व त्याची पोच तक्रारदाराने दि.१८.११.०९ रोजी स्वाक्षरीसह घेतलेली आहे. तद्नंतर सदर आदेश श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अंतर्गत मा.प्रशासन व आयुक्त कोकण विभाग यांजकडे आव्हान करुन स्लम अपिल क्र.९७३/०९ दि.६.१.२०१० रोजी दाखल केले आहे. अपिलाचा निर्णय प्रलंबित आहे.

२) अपिलार्थी यांच्या म्हणण्यानसार उपलोकआयुक्त यांजकडे आवक क्र.४९४८/२००९ दि.२७.१०.०९ व राज्य माहिती आयोग यांजकडे आवक क्र.४४७२/०९ व दि.२७.१०.०९ रोजी केलेला अर्ज व उक्त प्रकरणाबाबत या कार्यालयाकडे कोणताच पत्रव्यवहार प्राप्त झालेला दिसून येत नाही.

३) मा.राज्य माहिती आयोगाच्या दि.२२.२.२०१० च्या आदेशामध्ये अपिलार्थी यांनी केलेल्या कंटेम्ट अर्ज दि.१७.५.१० ची सुनावणी दि.२.७.२०१० रोजी झाली. त्या अनुषंगाने मा.राज्य माहिती आयोग यांनी दिलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थी यांना दि.८.७.२०१० रोजी यथा योग्य माहिती दिली व त्याची प्रत आयोगास सादर करण्यात आली आहे. सदर माहिती दिल्यानंतर पुन्हा अपिलार्थी यांना या कार्यालयातून दि.९.१२.२०१० चे पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणाची संचिका आढळून आल्याचे कळविण्यात आले व अपिलार्थी दि.३०.९.२०१० रोजी समक्ष कार्यालयात आले असता त्यांना त्यांचे माहिती व अवलोकनार्थासाठी डी.नं.२५६ बाबतची संचिका दाखविण्यात आली व त्यांना संचिकेतील कागदपत्रांची आवश्यकता असल्यास ते प्राप्त करुन घ्यावे असे दि.९.१२.२०१० चे पत्राने कळविण्यात आले आहे. माहिती करीता श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी या कार्यालयात दाखल केलेले कागदपत्रे सोबत जोडत आहे(जोडपत्र-अ)

४) या प्रकरणाची वेळोवेळी माहिती अपिलार्थी यांना या कार्यालयातून देण्यात आली आहे. दि.३०.९.२०१० रोजी संचिकेचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास आले की, अपिलार्थी आपल्या अर्जाद्वारे ज्या व्यक्तीसंदर्भात माहिती मागत आहेत त्यांना या योजनेचया परि.२ मध्ये अ.क्र.२५४५अनुषंगाने यापुर्वीच पात्र करण्यात आले आहे व श्रीम.सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी सादर केलेल्या पुराव्यातील शिधापत्रिका,मतदान ओळखपत्र,मतदान यादी, विज बिल यांचा तपशील पाहता असे आढळून आले की, श्रीम.सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांचेतर्फे त्यांचे पती श्री.मनोहर परमार हे यापूवी प्रश्नांकित झोपडीसाठी दि.२८.१२.०४ मध्ये पात्र झाले आहेत. माहिती करीता श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशिल सोबत जोडत आहे.(जोडपत्र ब)

५) अपिलार्थी यांच्या अपिल अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी या कार्यालयात तसेच इतर अन्य सतरावर केलेल्या अर्जामध्ये सदरहू प्रकरणात श्री.मनोहर परमार यांना प्रश्नांकित झोपडीची उपरोक्तपणे दाखविण्यात आलेली पात्रतेची बाब(परि.२ मध्ये अ.क्र.२५४५) शासनापासून लपवून ठेऊन यापुर्वी पात्र झालेल्या झोपडीचीच त्याच पुराव्याच्या आधारे स्वतंत्र झोपडी असल्याचे भासवून आणखी एक झोपडी पात्र करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

असे असले तरी तक्रारदार यांना दि.८.७.२०१० रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती चुकीची आहे असे पुन्हा तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामध्ये उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी(अति./निष्का.) अंधेरी यांनी दि.१८.७.२००४रोजी आपणास पाठविलेल्या नोटीसबाबतची नस्ती या कार्यालयात आढळून येत नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणले व दि.१८.७.०४ ही तारीख चुकीची आहे व त्यांनी जी माहिती मागीतली होती ती २००६ या वर्षातील असल्यामुळे त्यांना दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे व त्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे नस्ती आढळून आली नव्हती व त्याप्रमाणे तक्रारदार यांना कळविण्यात आले होते परंतु अनवधानाने त्या ठिकाणी तारीख चुकीची घालण्यात आली आहे. मात्र दौलतनगरच्या संदर्भातील नस्ती आढळून आली व त्याबद्दल तक्रारदार यांना कळविण्यात सुध्दा आले व त्यात जी टिप्पणी आहे ती टिप्पणी मान्य करण्यास कोणत्याही अधिका-याची हरकत नाही व त्यामुळे आदेश काढण्यात आले नसावेत व नस्तीमध्ये सुध्दा ते

आदेश नाहीत व याबाबतचे अवलोकन तक्रारदार यांना दिलेले आहे. त्यामुळे त्यांना जे आदेश अपेक्षित आहेत ते अद्यापही नस्ती आढळून आल्यावरसुध्दा त्यामध्ये दिसून येत नाहीत. असे असल्यास तक्रारदार यांना त्याप्रमाणे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१)तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात अपिल क्र.१५११/०२, तक्रार क्र.७२४/०२ मधील निर्णयाप्रमाणे आदेश उपलब्ध असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन द्यावी किंवा उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे त्यांना कळविण्यात यावे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यातयावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०११/८३९/तक्रार क्र. २/का.१

श्री. नवीन शामराव परब,
मुळगांवकर बिल्डिंग, १ला मजला,
७ टोपीवाला लेन,लॅमिंग्टन रोड,
मुंबई-४००००७. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,
करनिर्धारण व संकलन खाते, डी विभाग,
महापालिका कार्यालय इमारत, ४था मजला,
जोबनपुत्र आवार, ग्रँट रोड, नाना चौक आवार रोड,

मुंबई-४०० ००७. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ९.४.२०१०

तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी दि.९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दि.१५.३.२०१० च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दि.३०.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जी फीची आकारणी केलेली आहे त्या आकारणीच्या संदर्भात ती अवाजवी आहे अशी तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

तकारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, कोणत्याही कागदपत्रांचे निरिक्षण करण्याकरीता रु.२३०/-(रु.१८०/- + रु.५०/-) प्रमाणित करण्याची फी व अशाप्रकारेच प्रति प्रॉपर्टी पर इअर जी फी आकारली जाते ती अवाजवी आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे निरिक्षणकरण्याकरीता सुरुवातीच्या १ तासाला कोणत्याही प्रकारचे शुल्क नाही व त्यानंतरच्या प्रत्येक १५ मिनिटांना रु.५/- इतके शुल्क आहे असे असतांना उपलब्ध झालेली माहिती प्रमाणित करुन देण्याकरीता कोणत्याही प्रकारचे शुल्क त्या नियमात नाही व त्यामुळे प्रमाणित करण्याकरीता रु.५०/- आकारणी करणे योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने जे परिपत्रक तयार केले आहे त्या परिपत्रकाप्रमाणे फी आकारणी करण्यात येते परंतु, सदरच्या परिपत्रकाची प्रत त्यांनी सादर केलेली नाही. तसे जरी असले तरी सक्षम सार्वजनिक प्राधिकरणाशिवाय कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने महाराष्ट्र माहतीचा अधिकार अधिनियम २००५मध्ये नमूद केलेली प्रमाणित फी घेणे संयुक्तिक राहील व तसे आदेश सुध्दा मुख्य माहिती आयुक्त यांनी अपिल क्र.२१५१/०२, २९७७/०२, ३५२/०२, २७७/०२ मध्ये दि.९.७.२०१० रोजी दिले आहेत.

महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जे फी आकारणीचे नियम केले आहेत किंवा परिपत्रक काढले आहे त्या संदर्भात सर्वच अर्जदारांकडून आयोगाकडे तक्रार केली जाते. त्याकरीता पुन्हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त/उप आयुक्त यांना तक्रारीच्या संदर्भात सुनावणीस आयोगापुढे उपस्थित रहाण्याकरीता दि.२.२.२०११ रोजी आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढण्यात आली होती.परंतु त्या दिवशीसुध्दा संबंधित उपआयुक्त व अतिरिक्त आयुक्त सुनावणीस हजर न राहता त्यांनी कनिष्ठ अधिका-यांना आयोगाच्या कार्यालयात सुनावणीस उपस्थित रहाण्याकरीता पाठविले. असे असल्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये निर्णय होइपर्यंत या संबंधित तक्रारदारास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.१५.३.२०१०च्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ३०.३.२०१० रोजी जी खर्चाची आकारणी कळविली आहे ती रद्द करण्यात येऊन त्यांना त्यांच्या दि.१५.३.२०१० च्या अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी..

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३००८/तक्रार क्र. १५८४/का.१

श्री. एरॉल सिक्वेरा,
३ए, पृथ्वी निवास, पभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबइ-४०००५५. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महापालिका आयुक्त कार्यालय,
पाणी विभाग, एच/पूर्व वार्ड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २५.११.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२४.८.०९ च्या अर्जासोबत दिलेल्या परिशिष्टाच्या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही या करीता राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, ते वारंवार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित होतात परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना दि.१५.२.२००९ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु पुन्हा तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या माहितीच्या अर्जासोबत दि.२८.१२.०७ रोजी जी तक्रार केली होती त्या तक्रारीची प्रत जोडण्यात आली आहे व त्याप्रमाणे मुद्दा क्र.५ च्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. प्रत्यक्षात तक्रारदार यांना माहिती उपलब्ध होण्यापेक्षा त्यांच्या इमारतीमधील नळ जोडणीच्या संदर्भात व त्यांच्या घराच्या गच्चीवर जो पाईप दिलेला आहे तो बंद न करता तो अजूनही सुरु आहे व त्या संदर्भात काय कारवाई केली याबद्दलची त्यांना माहिती हवी आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, अवैध नळ जोडणी घेतलेली आहे व त्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता हे कोणतीही कारवाई करीत नाहीत व हीच त्यांची मूळ तक्रार आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असलली माहिती मिळवता येते परंतु कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन ती दिली जात नाही. त्यामुळे अवैध नळ जोडणीच्या संदर्भात आयोगाकडून कारवाई करुन मिळावी असे त्यांचे म्हणणे असल्यास आयोग हे तक्रार निवारण केंद्र नाही. असे असले तरी तक्रारदार यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.२४.८.०९ रोजीच्या अर्जासोबत २८.१.२००७ रोजीच्या दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात मुद्दा क्र.५ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३२६६७/तक्रार क्र. १२४४/का.१

श्री. बालचंद्र पिल्लाई जी.,
सन अँड सँड अपार्टमेंट,
२रा मजला, फ्लॅट नं.१,
जिल हिल बार जवळ, वाड चौकी,
नानी दमन, दमण-३९६ २१५. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा जनरल मॅनेजर,
महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन,
वाहन व्यवहार भवन, जेबीबी मार्ग, मुंबई. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २७.५.२००८
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१९.६.०७च्या अर्जान्वये माहिती उपलब्ध झाली नाही तसेच दि.२५.३.०८ च्या अपिल व तक्रारीच्या संदर्भातसुध्दा चुकीची माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकड दि.१३.६.०८ रोजी तक्रार केलेली आहे. तक्रारदार आज गैरहजर आहेत. गैरतक्रारदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये तक्रारदार यांना

दि.१३.३.०८ रोजी जनरल मॅनेजर(एस अँड पी) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर पुन्हा दि.२०.६.०८ रोजी मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती त्या संदर्भातच उपस्थित केले आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा दि.२०.६.०८ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.ज्या अर्थी तक्रारदार गैरहजर आहेत त्याअर्थी त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/२९९४९/तक्रार क्र. १०९८/का.१

श्री. जयेश रतिलाल गंगर,
सी-१०१, प्रभात को.ऑप हौ.सो.लि.,
एस.पी.मुखर्जी रोड, ब्राम्हण सभेसमोर,
डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त,
ठाणे शहर, ठाणे. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १२.११.२००७
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार गैरहजर आहेत,गैरतक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार यांनी दि.१२.११.०७ रोजी त्यांच्या दि.८.१२.०७च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते. सदचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पोलीस उप अधिक्षक,गृह यांनी पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्याकडे हस्तांतरीत केलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते.

गैरतक्रारदार यांनी अर्जदार यांनी केलेल्या अपील अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी/पोलीस उप अधिक्षक(गृह), ठाणे (ग्रामिण) यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी दि.८.१२.०७ रोजी माहिती अधिकारान्वये केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही पोलीस आयुक्त ठाणे यांच्या कार्यक्षेत्राशी निगडीत असल्याने सदरचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पुढील कार्यवाहीसाठी त्यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याबाबत अर्जदारास कळवून अर्ज मा.पोलीस आयुक्त कार्यालय ठाणे(शहर) यांच्याकडे पाठविला असल्याचे दि.८.१२.२०१०च्या पत्रान्वये कळविले. कार्यालयाने उपलब्ध अभिलेख पडताळून पाहिले असता अर्जदार यांचा दि.८.१२.०७

रोजीचा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही, मात्र दि.२०.१.०९ रोजी या कार्यालयात पोस्टाने पाठविलेला अर्ज दि.१२.२.०९ रोजी प्राप्त झाला, सदरची माहिती संकलीत करुन दि.३.३.०९ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा दि.१७.९.०९ रोजी रजिस्टर पोस्ट द्वारा केलेला अर्ज दि.१९.१०.०९ रोजी कार्यालयात प्राप्त झाला. तसेच अर्जदार यांनी शासकीय माहिती अधिकारी ठाणे(ग्रामिण) यांच्या कार्यालयात दि.२०.८.०९ रोजी केलेला अर्ज दि.२०.१०.०९ रोजी त्यांच्याकडे प्राप्त होऊन तो दि.२४.१०.०९ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झाला. सदरच्या दोन्ही अर्जाची माहिती सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक डोंबिवली पोलीस स्टेशन यांच्याकडून संकलीत करुन सदर माहिती अर्जदार यांनी रजिस्टर पोस्टाने मागणी केलेली असल्याने पोस्टाचे शुल्क रु.२५/- इकडील कार्यालयास भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कार्यालयाने जावक क्र.सपोआ/डों./केमाअ/२२३/२२५/०९ दि.१८.११.०९ रोजी तक्रारदारास कळविले होते. परंतु तक्रारदार अद्यापपर्यंत इकडील कार्यालयात हजर झाले नाहीत अथवा माहिती टपालाने पाठविण्यासाठी येणारा खर्च त्यांनी भरलेला नाही. त्यामुळे माहिती इकडील कार्यालयात देण्यास प्रलंबित आहे असा खुलासा आयोगाकडे त्यांनी सादर केलेला आहे. तोंडी युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारदार हे दिलेल्या पत्त्यावर रहात नाहीत त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल

झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३०२५६/तक्रार क्र. १०९७/का.१

श्री. जयेश रतिलाल गंगर,
सी-१०१, प्रभात को.ऑप हौ.सो.लि.,
एस.पी.मुखर्जी रोड, ब्राम्हण सभेसमोर,
डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहापूर विभाग, शहापूर,
जिल्हा ठाणे ग्रामिण. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २५.११.२००७
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार जयप्लास्ट यांनी दि.८.१२.०७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन दि.३.२.०५ रोजी पोलीसआयुक्त यांना दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली याबाबत माहिती मागीतलेली दिसून येते.सदरचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पोलीस उप अधिक्षक(गृह) यांनी उप विभागीय पोलीस अधिकारी शहापूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवलला दिसून यतो. अर्जाच्या अनुषंगाने दि.७.२.०८ रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मुरबाड यांनी अर्जदार यांना माहितीच्या संदर्भात रु.५५/-चा खर्च भरावा अस कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.९.२.०८ रोजी माहितीच्या संदर्भात पुन्हा रु.५५/- चा खर्च भरावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.१५.१२.०८ रोजी खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्या संदर्भातच तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.०७ रोजी तक्रार केली हाती. तक्रारीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे सादर केले असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३१२९/तक्रार क्र. ७१६/का.१

श्री. प्रद्योत गोविंद नवाथे,

राजबाग, ब्लॉक नं.२०५, दालूचंद को.ऑप.हौ.सो.,
भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एफ एन विभाग,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, मुंबई-४००००१. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २६.१०.२००९
जन माहिती अधिकारी, तक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२६.१०.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये दि.२३.६.०९ रोजी अपिल क्र.३७०५/०२ मध्ये अपील अर्जात केलेल्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी तक्रार केलेली दिसून येते. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना कलम ७८ अन्वये नोटीस दिलेली आहे त्या नोटीसच्या प्रती व प्रशासक नियुक्तीची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्दा क्र.३ च्या संदर्भात माहिती अर्जाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांकडे पाठवून अपिलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. मुद्दा क्र.४च्या संदर्भात विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग यांच्याकडे अपिलार्थी यांनी सहकार कायद्यानुसार दाद मागावी असे जे म्हटलेले आहे त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही करणे अपेक्षित नाही.त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे त्यांनी आयुक्त, सहकार यांच्याकडे तक्रार केलेली आहे परंतु सदरची तक्रार त्यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस एफ/ईन वार्ड यांच्याकडे पाठवून दिलेली आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन झालेले नाही. परंतु तक्रारदार यांनी जी कार्यवाही करावयाची आहे ती स्वतंत्रपणे सहकार अधिनियमाप्रमाणे करावयाची आहे असे नमूद केले आहे व त्याप्रमाणे सहकार अधिनियमाप्रमाणे केलेली तक्रार ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीपमाणे होत नसल्यामुळे त्याबाबत केलेल्या कारवाईबाबत कोणतेही अधिकार राज्य माहिती आयोगास नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ३.२.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३७०४७/तक्रार क्र.१२७१व १२७२/का.१

श्री. इंद्र बहादूर शर्मा,
१०, शर्मा चाळ, अंधेरी कुर्ला रोड,
कृष्णा नगर, मरोळ नाका, अंधेरी(पूर्व),
मुंबई-४०००५९. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
श्रीनिवास बगडका ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स,
श्रीनिवास बगडका माग, जे.बी. नगर,
अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ७.१२.२००८
जन माहिती अधिकारी, तक्रारदार अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी व तक्रारदार दोघेही अनुपस्थित आहेत. तक्रारदार यांनी दि.१०.१०.२००८,३.१२.०८ आणि १८.१२.०८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत परंतु तक्रारीसोबत त्यांनी माहितीच्या अर्जाची प्रत दाखल केलेली नाही किंवा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणत्या प्रकारचे उत्तर दिलेले आहे त्याबाबतही काहीही दाखल केलेले नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/ /अपील क्रमांक ६९९३/२०१०

श्री.चंदु तुलसीदास पहुजा,
सी/२०३, ॲटलांटा को.ऑप.हौ.सो.,
एव्हर शाईन नगर, मालाड मार्वे लिंक रोड,
वलनाई व्हिलेज, मालाड(प.), मुंबई-४०००६४. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,
कक्ष क्र.६९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),
मुंबई-५.

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक पी विभाग,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,
कक्ष क्र.६९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),
मुंबई-५ **.** **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ३.४.२०१०
सुनावणीचा दिनांक : १६.१२.२०१०
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी दि.२१.८.०९ व दि.१६.११.०९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात आदेश देण्याची विनंती केली आहे. राज्य माहिती आयोगाकडे अपिल क्र.२०१०/४७०३/०२ या अपिलाची सुनावणी होऊन दि.३०.४.२०१० रोजी निर्णय झाला असून उप निबंधक यांनी प्रशासकास आदेश देऊन अपिलकर्ता यांना निरिक्षणासाठी नस्ती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे दि.१९.५.२०१० रोजी उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९(२)(अ) अन्वये आदेश काढून संस्थेने श्री.सी.टी.पहुजा यांना तत्कालीन निविदांची तपासणी घेण्याकरीता दफ्तर उपलब्ध करुन द्यावे व तसे केल्याचे अर्जदार व या कार्यालयास कळविण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर पुन्हा दि.१३.७.२०१० रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) यांनी उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग यांना, राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२०१० रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन आपल्या कार्यालयाने अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केली नसल्याची तक्रार राज्य माहिती आयोगाकडे केली आहे, तरी मा.राज्य माहिती आयुक्त यांच्याकडील दि.३०.४.२०१०च्या आदेशांच्या अनुषंगाने कार्यवाही करावी असे कळविलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी ॲटलांटा कोऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटीच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या संदर्भात या पूर्वीसुध्दा बंधपत्राच्या प्रति संचालक मंडळाने दाखल केलेल्या आहेत किंवा नाहीत याबद्दलची माहिती मागीतली होती व ती माहिती त्यांना दि.५.१.०९ रोजी उपनिबंधक,सहकारी संस्था यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर सस्थेने इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जे टेंडर्स मागविलेले होते त्या टेंडर्सच्या संदर्भात निरिक्षण करुन माहिती मिळावी याबद्दलसुध्दा माहिती मागीतलेली होती व त्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाचा वर नमूद केल्याप्रमाणे निर्णय आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांनी उपनिबंधक यांच्या आदेशांचे पालन झाले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकाडे तक्रारसुध्दा केलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुन्हा उपनिबंधक

सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी त्यांच्या दि.१९.५.२०१०च्या आदेशांचे पालन संस्थेच्या संचालक मंडळाने केलेले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम ७९(१) प्रमाणे त्यांना जे अधिकार आहेत त्या अधिकाराचा वापर करुन कारवाई करणे संयुक्तिक होईल. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च)व (त्र)प्रमाणे माहिती व माहितीचा अधिकार या दोन्ही संज्ञांच्या व्याख्येप्रमाणे कार्यालयात किंवा माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध होते. कोणत्याही अन्य अधिनियमाच्या अन्वये कारवाई करावयाची असल्यास त्याबाबत राज्य माहिती आयोगास आदेश देण्याची तरतूद नाही. असे असले तरी सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग,मुंबई यांनी त्यांच्या दि.१९.५.२०१० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ७९(२)(अ) प्रमाणे आदेशांचे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करुन अपिलकर्ता तक्रारदार यांना संस्थेची कागदपत्र विशेषत: टेंडर संदर्भातील कागदरत्र निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावीत.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ११.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५५१/अपील क्रमांक ६४४२/२०१०

श्री. अजय माळतकर,
नेताजी सुभाषचंद्र नगर, रुम नं.२,
जेरबाई वाडिया रोड, परेल,भोईवाडा,
मुंबई-४०००१२. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल,
मुंबई-४०००१२.

जन माहिती अधिकारी(वसाहत),
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल,
मुंबई-४०००१२. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(मिळकत)यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते:-

i)Information require of Mr.Nagraj N.Malatkar name in Sub-Tenant occupant of shop N०.२A in Vacant Land Tenancies on Municipal Plot bearing C.S.No.७१४,७१८,७२० of Dadar Naigaon Div.Jerbai Wadia Road, Bhoiwada, Mumbai-४०००१२.

ii) The period of which the information is related from the years १९७२ to २०१०.

iii) Written and Copy of detail require of the information.

iv) Information is required by in person.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलबध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१२.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.७.१२.२०१० रोजी देण्यात आला असून वसाहत अधिकारी श्री.आर.बी.कवटे यांना मागीतलेल्या प्रकरणाच्या संदर्भात दुरुस्ती करुन अहवाल सादर करावा व माहिती आठवडयाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांची मंजुरी घेऊन उपलब्ध करुन द्यावी अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यानी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये निवासी व व्यापारी या तत्वावर जी दोन टेनामेंट्स आहेत त्यामध्ये त्यांची आजी श्रीमती सिताबाई नारायण मालतकर यांचे नाव होते परंतु एफ(द.)/८९१ च्या संदर्भात जे आदेश काढण्यात आले आहेत त्यामध्ये व्यापारी टेनामेंट्सच्या संदर्भात त्यांचे काका श्री.नागराज एन.मालतकर यांचे नाव आलेले आहे व ते कशाच्या आधारावर घेण्यात आले आहे त्याबद्दलची कागदपत्र त्यांनी मागीतलेली आहेत. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये वसाहत अधिकारी श्री.आर.बी.कवटे यांना योग्य त्या चुकांची दुरुस्ती करुन मंजुरी घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्येसुध्दा मिळकत विभागाने चुकीचे ॲनेक्स्चर निर्गमित केलेले आहे व त्यावरुनच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला असूनसुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा कोणतीही कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी ज्या मिळकतीच्या संदर्भात ही माहिती मागीतलेली आहे ती मिळकत ही एसआरए म्हणजेच झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये दि.२८.फेब्रुवारी,२०११ रोजी नष्ट करण्यात येणार आहे व त्यामुळे त्यांना ही माहिती तातडीने उपलब्ध झाल्यास योग्य ती पुढील कारवाई करता येइल असे त्यांनी पुढे सांगितले. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आज सुनावणीस गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कागदपत्र दाखल केलेली नाहीत. त्यामुळे आयोगाच्या नोटीसचा त्यांनी अवमान केलेला आहे. तत्कालीन किंवा विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली

नसल्यामुळे त्यांनी अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे ते दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु आज जन माहिती अधिकार गैरहजर असल्यामुळे व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.१०.२०१०च्या अर्जात मागीतलेली माहिती, प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे दुरुस्त करुन, व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) माहिती व्यक्तीश: उपलब्ध करुन घेण्याकरीता अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्याच्या दिवशी संबंधित विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपिलकर्ता यांच्या दि.११.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व आयोगापुढे ते सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये त्यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचे त्यांचे म्हणणे त्यांनी आयोगापुढे उपस्थित राहून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष मांडावे अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२७/अपील क्रमांक ६३४१/२०११/०२

श्री. विलास आसाराम साळवे,
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स नं.११८८२,
भांडुप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोर(पूर्व),
मुंबई-४०००७७.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोर(पूर्व),
मुंबई-४०००७७. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३०.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),एन वार्ड, घाटकोपर(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन जानेवारी-२००७ ते मार्च-२०१० पर्यंतच्या कालावधीत एकूण किती अर्थसंकल्प निधी मिळाला व त्या निधीतून कोणकोणती कामे करण्यात आली त्या कामांची नावे व पत्ते द्यावेत अशी एकूण १३ मुद्यांमधील माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.४.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी अर्थसंकल्पनिधीतून मागीतलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने व ती वार्ड क्र.१२३,१२४,१२५ मधील असल्याने या कार्यालयाशी संपर्क साधावा व त्यानंतर आपणास हवी असलेली माहिती रु.२/- प्रति प्रत याप्रमाणे पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१३.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.६.२०१०

रोजी देण्यात आला असून अपिलकर्त्यांस १५ दिवसात माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.२०.६.२०१० काही मुद्यांच्या संदर्भात माहिती व इतर माहितीच्या संदर्भातील कागदपत्रांच्या संदर्भात अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु तरीही अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही व कोणताही पत्रव्यवहार मिळालेला नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.४.२०१० रोजी खर्चाचा भरणा करावा असे कळविले व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरसुध्दा खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ही दोन्ही पत्रे त्यांना मिळालेली नाहीत. त्यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली,द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली परंतु उपरोक्त खर्चाचा भरणा करावा याबद्दलची पत्रे मात्र मिळालेली नाहीत. या चारही पत्रांवरील पत्त्याचा विचार केल्यास अपिलकर्ता यांनी दिलेल्या पत्त्यावरच खर्चाचा भरणा करावा ही पत्रेसुध्दा पाठविलेली आहेत व त्यामुळे सदरची पत्रे अपिलकर्ता यांना मिळाली नाहीत असे जरी त्यांचे म्हणणे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी जावक क्रमांक देऊन ती पत्रे दिलेली आहेत. त्यामळे त्यांनी ती पत्रे पाठविलेली आहेत असे गृहित धरावे लागते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागीतलेली असल्यामुळे व त्यास छायांकित प्रतिचा खर्च व उपरोक्त खर्च रु.३१०+ रु.२४८० इतका कळविलेला असल्यामुळे त्यांनी त्या खर्चाचा भरणा करुनच माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती कळविली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२८/अपील क्रमांक ६३४२/२०११/०२

श्री. विलास आसाराम साळवे,
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स नं.११८८२,
भांडुप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,
भांडुप(प.), मुंबई-४०००७८.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,
भांडुप(प.), मुंबई-४०००७८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण) यांच्याकडे अर्ज करुन वार्ड क्र.१०४,१०६,१०७ व १११ बाबत वर्ष २००७ ते मे-२०१० या कालावधीतील कॉंक्रिटीकरण तसेच पेव्हरच्या संदर्भात एकूण १३ मुद्यांवर माहिती पत्रव्यवहार सर्वसाधारण टपालाने करावा असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते.अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती अतिशय विस्तृत व वेळखाऊ स्वरुपाची असून ती संकलीत करुन आपणास देण्यासाठी उपलब्ध कर्मचा-यांचा कामाचा वेळ खर्च पडणार आहे. त्यामुळे एखाद्या विशिष्ट कामाविषयी माहिती हवी असल्यास माहितीचे निरिक्षण करण्यासाठी कार्यालयीन वेळेत आपण सूचना देऊन प्रत्यक्ष भेटावे व आवश्यक असल्यास माहिती सुचित करुन शुल्क भरल्यानंतर सदर माहिती आपणास उपलब्ध करुन देण्यात येइल व इतर दोन मुद्यांच्या संदर्भात प्रति पृष्ठ रु.२/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.२२.६.२०१० रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०.७.२०१० रोजी देण्यात आला असून तो पुढीलप्रमाणे आहे - जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिलेले असल्यामळे सदरचे अपील अमान्य करण्यात आले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना दि.२५.६.२०१० चे पत्र मिळालेले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना टपाल दाखला घेऊनच सदरचे पत्र दिलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना इतर पत्रे मिळतात परंतु खर्चाचा भरणा करावा असे नमूद केलेले पत्र मात्र मिळत नाही. ते आयोगात त्यांच्या सर्वच अपीलांच्याबाबत याप्रकारे सांगत आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्या उत्तराप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१३१/अपील क्रमांक ६३४५/२०११/०२

श्री. संजय अर्जून पटेल,
बस्ताव मिस्किटा चाळ, एम.आय.डी.सी. रोड नं.११,
आर.सी.मारुती शाळेसमोर, अंधेरी(पूर्व),
मंबई-४०००९३. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,के-पूर्व विभाग कार्यालय,
गुंदवली, आझाद रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,के-पूर्व विभाग कार्यालय,
गुंदवली, आझाद रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी के/ई वार्ड, अंधेरी(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन श्री.काळे हे बुधवार दि.९.६.२०१० रोजी १२ ते १.३० वा. के/पूर्व विभाग कायालयातून मुळगांव, अंधेरी प्लॉट नं.७५ या जागेवरील घर तोडण्यास आले होते त्यावेळी म.न.पा.ने कोणती नोटीस दिली व तक्रार केल्याची प्रत देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी ३ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणेही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीस

गैरहजर आहेत. मात्र त्यांचे प्रतिनिधी सुनावणीसाठी हजर आहेत. प्रतिनिधींना सदर प्रकरणाबाबत काहीही माहिती नाही व ते प्राधिकृत नाहीत व त्यांना कागदपत्रांचीसुध्दा माहिती नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. जन माहिती अधिकारी का गैरहजर आहेत याबद्दल त्यांनी आयोगापुढे काहीही कागदपत्र दिलेली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती व प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाप्रमाणे व प्रथम अपील क्र.एसीकेई/१४९३७/बीएफ दि.१७.८.२०१० च्या आदेशाप्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत व प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष करावा व तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१०६/अपील क्रमांक ६२६०/२०१०/०२

श्रीमती धवनी देसाई द्वारा तारिनीबेन देसाई,
नानिक निवास III, तळ मजला, फ्लॅट नं.२,
वार्डन रोड, मुंबई-४०००२६. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)शहर,
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर-१,
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत व प्रस्ताव) शहरे-१ ई-वार्ड यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलली दिसून येते -

1. Kindly provide each and every correspondence (to and from) between Shyam CHS Ltd (at 51, Bhulabhai Desai Rd, Mumbai 400 026) and your ward office regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's, canopy and proposed Overhead Water Tank.
2. Kindly provide each and every correspondence (to and from) between your ward office and Shri Sachin Wairker (Licensed Surveyor / Architect) regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's. canopy and proposed Overhead Water Tank.
3. Kindly provide each and every correspondence (to and from) between Your ward office and any other Licensed Surveyor / Architect regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's, canopy and proposed Overhead Water Tank to be carried at side Nanik Niwas III (Shyam CHS Ltd) situated at Bhulabhai Desai Rd, Mumbai – 400 026.
4. Kindly Provide each and every correspondence (to and fro) between your ward office and any other person / persons regarding the above mentioned proposal for regularization of repairs at site Nanik Niwas III (Shyam CHS Ltd) situated at Bhulabhai Desai Rd, Mumbai – 400 026.

5. Any other information available on the above "subject matter of information"

सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरिक्षण करण्याकरीता कळविण्यात आले असून निरिक्षणाकरीता कागदपत्रांच्या संदर्भात खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यानी दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांना "S.P.I.O. and Executive Engineer&B.P.)City-१ is directed to get the papers sent to L.O., checked" अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही काही कार्यवाही झालेली नसल्यामुळे व अपिलकर्ता यांना दिलेले उत्तर हे विधी विभागाकडे पाठविण्यासाठी समाविष्ट केले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि.२९.४.२०१० च्या अर्जामध्ये जी माहिती मागीतलेली आहे त्यापैकी मुद्दा क्र.४ मध्ये वार्ड ऑफीसने विभागाबरोबर किंवा अधिका-याबरोबर झालेली दुरुस्ती नियमित करण्यासंदर्भात झालेला पत्रव्यवहार तसेच सज्जा कनापी व पाण्याची टाकी या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत अशी मागणी केली आहे व ती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी पुढे युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की. त्यांना ज्यावेळेस निरिक्षणाकरीता नस्ती उपलब्ध करुन दिली त्यावेळेस त्या नस्तीमध्ये त्यांनी स्वत: दि.३१.१.२०१० रोजी दिलेली तक्रार समाविष्ट केलेली नव्हती. विधी विभागाकडे सदरची तक्रार अभिमत घेण्याकरीता पाठविणे आवश्यक होते ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात आली होती व त्यामुळे प्रथम अपीलीयअधिकारी यांनी सदरची कागदपत्र समाविष्ट करुन विधी विभागाकडे पाठविण्याचे आदेश दिलेले होते. त्यानंतरही सदरची कागदपत्र त्यात समाविष्ट केलेली नाहीत हे निदर्शनास आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जी तक्रार करण्यात आली होती त्या तक्रारीमध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्या मुद्यांच्या संदर्भात विधी विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक होते. परंतु सदरच्या तक्रारीची प्रत ही त्या दुरुस्तीच्या संदर्भात आक्षेप घेणारी असल्यामुळे सदरची प्रत विधी विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आली नाही व हे मुद्दाम करण्यात आले आहे असे त्यांनी

आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुनच अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात त्यांनी जी माहिती मागीतलेली होती त्यामध्ये सदरच्या तक्रारीचा समावेश नसल्यामुळे त्या तक्रारीची प्रत अद्यापपर्यंत त्यांना उपलब्ध झालेली नाही. आजही त्या नस्तीमध्ये ती नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात निरिक्षणाकरीता ज्यावेळेस त्यांना नस्ती उपलब्ध करुन दिली त्यावेळेस सदरच्या तक्रारीची प्रत आढळून आली नाही असे त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले होते. वास्तविक कोणत्याही इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जी नस्ती तयार होते त्या नस्तीमध्ये त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे् ही समाविष्ट केली जातात. सदरच्या दुरुस्तीच्या संदर्भातील नस्ती ही पूर्वी तयार केलेली आहे व अपिलकर्ता यांनी दि.३१.१.२०१० रोजी जी तक्रार केलेली आहे ती तक्रार ही स्वतंत्रपणे दिलेली आहे. त्यामुळे ती त्या नस्तीमध्ये समाविष्ट झाली नसावी. परंतु त्यावर पुन्हा अपिलकर्ता यांनी सदरची तक्रार ही नस्तीमध्ये समाविष्ट झालेली आहे या संदर्भात त्यांनी महानगरपालिकंच्या कार्यालयाकडूनच पोच मिळाली आहे व त्यावरुनच सदरच्या तक्रारीची प्रत ही जाणीवपूर्वक त्या नस्तीमध्ये समाविष्ट केली गेली नाही असा त्यांचा आरोप आहे व त्याप्रमाणे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये - Missing papers to be put back - reasons/notings why they were out असा उल्लेख केलेला आहे. परंतु त्यामध्ये त्यांनी ३१.१.२०१० रोजी दिलेल्या तक्रारीचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही व तरीही त्यांनी जाणीवपूर्वक सदरची तक्रारीची प्रत नस्तीमध्ये ठेवण्यात आलेली नाही या कारणाकरीता जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी आयोगाकडे विनंती केलेली आहे. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कोणत्याही इमारतीच्या दुरुस्तीच्या संबंधीची जी नस्ती असते ती सबइंजिनिअर हाताळत असतात. माहिती अधिकारी हे असलेली माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात त्यामुळे सदरची तक्रारीची प्रत ही नस्तीत का समाविष्ट करण्यात आली नाही याबद्दल त्यांना काहीही सांगता येणार नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यावरसुध्दा दि.३१.१.२०१० च्या तक्रारीची प्रत ही विधी विभागाकडे पाठविण्यापूर्वी का समाविष्ट करण्यात आली नाही हा मुद्दा मात्र अनिर्णितच राहतो व त्याबद्दल त्यांना तसे सांगता येणार नाही. मात्र एक बाब स्पष्ट दिसून येते की, माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपील मेमोमध्ये किंवा प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये ३१.१.२०१० च्या तक्रारीचा स्पष्टपणे उल्लेख दिसून येत नाही तर फक्त कागदपत्र समाविष्ट केलेली नाहीत अशाप्रकारचा उल्लेख आहे. परंतु कोणती कागदपत्र याबाबतचे स्पष्टीकरण नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागीतल्यावर जी माहिती कागदपत्रांमध्ये,अभिलेख्यांमध्ये उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती माहिती उपलब्ध होते. जी माहिती उपलब्ध नाही ती का उपलब्ध

नाही या संदर्भात प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलामध्ये मुद्दा जरी उपस्थित केलेला असला तरी त्याबद्दलचे निश्चीत कारण जर जन माहिती अधिकारी यांना देता येत नसेल तर त्याकरीता जबाबदारी निश्चित करुनच त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देता येईल. कोणत्याही कार्यालयात कोणत्याही नस्तीबाबत एकच अधिकारी ती नस्ती हाताळत नसतात व त्यामुळे नस्तीमध्ये कागदपत्र नाहीत या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाविरुध्द राहील व त्यामुळे सदरच्या प्रकरणात जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व संबंधित विभागामध्ये ज्या ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचा नस्ती हाताळण्यामध्ये सहभाग असतो त्या सर्वांच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करण्याकरीता चौकशी करुन जबाबदारी निश्चित झाल्यावरच आयोगाने निर्णय देणे योग्य होईल.त्यामुळे आयुक्त महानगरपालिका यांनी चौकशी अधिकारी नेमून चौकशी करुन आयोगास अहवाल सादर करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपीलावर अंतरिम आदेश पारित करणे संयुक्तिक राहील.

अंतरिम आदेश

१) मा.आयुक्त महानगरपालिका यांनी सदरच्या प्रकरणामध्ये चौकशी अधिकारी नियुक्त करुन अर्जदार अपिलकर्ता यांनी तक्रार केल्याप्रमाणे फाईल क्र.ईबी/४८६०/डी/ए Regarding proposed Regularization of additions/alterations and Major repairs at Nanik Niwas ३, Bhulabhai Desai Road, Mumbai-२६ C.S.No.६८५,Malabar Hill Division, Shyam Co. Hsg. Society Ltd. च्या संदर्भात नस्तीमध्ये जाणीवपूर्वक विधी विभागाच्या अभिप्रायासाठी पाठविलेल्या नस्तीमध्ये अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारीची प्रत किंवा इतर कागदपत्र समाविष्ट न करण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करावी व आयोगाकडे अहवाल १५ दिवसाच्या आत सादर करण्यात यावा.

२) सदरच्या निर्णयाची १ प्रत आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

Gawas/feb 2011

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३२१/अपील क्रमांक ६४१५/२०१०/०२

श्री.शेख मुरादजी शाहजहाँ,
मितला धाम,जरी वर्गीस टर्मट कंपनीच्या समोर,
वॉटर टँक रोड, प्लॉट नं.२५६, मालाड(पूर्व),
मुंबई-४०००९७. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणाची सुनावणी दि.२८.२.२०११ रोजी सकाळी १०.३० वाजता ठेवण्यात आली होती परंतु त्यावेळेस कोणीही हजर नव्हते म्हणून सदर सुनावणी पुन्हा दुपारी २.०० वाजता ठेवण्यात आली. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर होते. सदर प्रकरणाची चौकशी केली असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय दि.२०.१०.२०१० रोजी दिलला दिसून येतो. त्या निर्णयाचे अवलोकन केले असता व जन माती अधिकारी यांच्याशी चर्चा करतांना अर्जदाराचे उत्तर तयार असून अपिलार्थिनी ते व्यक्तीश: मागीतले होते त्यामुळे ते पोस्टाने पाठविले नाही असे त्यांनी सांगितले. अपिलार्थिना १० दिवसाच्या आत माहिती व्यक्तीश: देण्यात यावी असे आदेश देऊन सदर अपील निकाली काढण्यात आलेले आहे असे दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने अर्जदाराने या आयोगासमोर द्वितीय अपील सादर केले. वास्तविक पहाता अर्जदाराने मागीतलेली माहिती ही जर तयार होती तर अर्जदार अपिलार्थी हे सुनावणी दरम्यान उपस्थित होते तेव्हा त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्यासमोर समक्ष माहिती का पुरविली नाही व पुन्हा १० दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असे आदेश देण्याचे कोणतेही कारण दिसत नाही.

तसेच अर्जदाराने मागीतलेली माहिती ही १७ मुद्यांमध्ये असून त्याबद्दल प्रथमअपीलीय अधिकारी यांनी सदर मुद्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण घेऊन प्रत्येक मुद्यावर मुद्देसुद माहिती देणे अपेक्षित होते. परंतु या आयोगासमोर दाखविलेल्या उत्तरावरुन निश्चितच समाधानकारक उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले नाही व ब-याच मुद्यांची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे म्हटलेले आहे. वास्तविक ही माहिती महानगरपालिकेशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्येक मुद्याबाबत स्पष्टीकरण किंवा माहितीबाबत स्पष्ट उल्लेख असावयास पाहिजे होता. म्हणून सदर पकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२०.१०.२०१० रोजी दिलेला निर्णय हा रद्दबातल ठरविण्यात येत आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, दि.१६.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सुनावणी घेण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याबाबत उपलब्ध असलेली माहिती किंवा त्याबाबतचे स्पष्टीकरण लेखी स्वरुपात प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दाखल करावे.प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याचे अवलोकन करुन दिलेली माहिती

बरोबर आहे किंवा नाही ते तपासून योग्य ते आदेश पारीत करुन त्याची प्रत अर्जदाराला उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर द्वितीय अपील ९० दिवसाच्या आत करु शकतात. यास्तव खालील आदेश पारित करुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) दि.२०.१०.२०१० रोजी पारित केलेले अपील क्रमांक २८२५४ चे आदेश रद्दबातल करण्यात येत आहेत.

२) प्रथम अपीलीय अध्किारी यांनी दि.१६.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता अर्जदाराच्या दि.२७.९.२०१० च्यामूळ अपील अर्जाच्या संदर्भात सुनावणी ठेवावी व माती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान मुद्देसुद लेखी निवेदन दाखल करावे. त्याची प्रत अपीलीय अधिका-यांसमोर अर्जदारास देण्यात यावी व अर्जदाराचे संपूर्ण म्हणणे ऐकून योग्य ते आदेश त्यानंतर ८ दिवसांच्या आत पारीत करावे व त्याची १ प्रत अर्जदाराला अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी.

३) त्यानंतरही अर्जदाराचे समाधान झाले नाही तर अर्जदार ९० दिवसाच्या आत या आयोगासमोर द्वितीय अपील दाखल करुन शकतो.

मुंबई **(भास्कर पाटील)**

दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३१६/अपील क्रमांक ६४११/२०१०/०२

श्री.महम्मद हमीद शेख(समाजसेवक सतर्क नागरीक),
नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,एमएमआरडीए,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, वांद्रे,मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,एमएमआरडीए,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, वांद्रे,मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रपत्र-अ मध्ये अर्ज करुन माहिती मागीतलेली दिसून येते. त्यात सदर प्रकरणी ठेकेदार किती आहेत, त्यांची नावे, त्यांच्या लायसेन्सच्या संबंधात माहिती इत्यादीबाबत अर्जदाराला कळविण्यात आले आहे व त्यानुसार अर्जदाराला पैशाचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अर्जदाराला दिलेल्या उत्तरास लागलेला अवधी विचारात घेता अर्जदाराला माहिती

विनाशुल्क पुरविण्याचे आदेश या आयोगाने दिले. अर्जदाराला या आधी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अर्जदारास आणखी माहितीची आवश्यकता होती व त्याबाबत अर्जदाराला माहिती अधिकारी यांनी १० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले व सदरची माहिती विनामुल्य,अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पुरविण्यात येईल असे मान्य केले आहे. यास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

यानंतरही अर्जदारास काही अडचण असल्यास ते या आयोगासमोर या अधिनियमाच्या कलम १८ खाली तकारवजा अर्ज सादर करु शकतात.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३१७/अपील क्रमांक ६४१२/२०१०/०२

श्री.महम्मद हमीद शेख(समाजसेवक सतर्क नागरीक),
नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
३रा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
३रा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १०.८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी प्रपत्र अ मध्ये दि.१०.८.२०१० रोजी अर्ज करुन माहिती मागीतलेली आहे. मागीतलेली माहिती मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ म्हाडा द्वारा होनेवाले विकास कार्यक्रम के बारेमे तसेच राज नंदिनी लेबर सहकारी संस्था,मर्यादित या संस्थेचे मुख्यप्रवर्तक वगैरे बाबतची माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जदारास कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी दि.१८.९.२०१० रोजी पत्र पाठविले व राज नंदिनी लेबर सहकारी संस्था यांनी कोणकोणती विकास कामे पूर्ण केली आहेत व कोणत्या फंडातून ती पूर्ण केली आहेत व कामे सुरु होण्याचा व संपल्याचा कालावधी याबाबतची माहिती कळविलेली दिसून येते. परंतु सदर लेबर सहकारी संस्थेचे पंजीकरण करतांना मुख्य प्रवर्तक कोण होते तसेच त्यांचे सदस्य कोण होते याबाबतची माहिती (डीडीआर) तसेच अध्यक्ष,काम वाटप

समिती तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पूर्व उपनगरे-२, कोकण भवन,सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधीत असून माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे तरी याबाबत संबंधित कार्यालयाकडे संपर्क साधावा असे अर्जदारास कळविलेले दिसून येते व त्याकरीता सदर पत्राची प्रत डीडीआर,काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पूर्व उपनगरे-२ कोकण भवन,सीबीडी बेलापूर,नवी मुंबई यांना पाठविण्यात आलेली आहे. अर्जदारास उर्वरित माहिती मिळाली असून फक्त सदर संस्थेच्या पंजीकरणाबाबत माहिती मिळालेली नाही म्हणून डीडीआर-अध्यक्ष, काम वाटप समिती यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी संबंधित संस्थेबद्दलची माहिती अर्जदारास अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर व कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी दि.१८.९.२०१० च्या पत्राच्या अनुषंगाने निर्देशित केलेली माहिती अर्जदारास हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामुल्य नोंदणीकृत डाकेने पाठवावी. माहिती उपलब्ध नसल्यास तसे अर्जदारास कळवावे. तसेच सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी कोण असतील याबाबतची माहितीही कळवावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर अधिनियमाच्या कलम १८ खाली तक्रारवजा अर्ज करु शकतात. वरील आदेश देऊन सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २८.२.२०११

(भास्कर पाटील)
प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३२७/अपील क्रमांक ६४१७/२०१०/०२

श्री. अशोक कुंचीकोरवे,
एम.पी.नगर,घोरवाडा,
रुम नं.बी.८०, धारावी क्रॉस रोड,
मुंबई-४०००१७ ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परि.६, ४था माळा,
प्रशासकीय इमारत, आरसी मार्ग,
चेंबूर, मुंबइ-४०००७१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पूर्व प्रादेशिक विभाग,
चेंबूर, मुंबई-७१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी प्रपत्र-अ नुसार दि.१२.७.२०१० रोजी प्रशासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, अप्पर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,चेंबूर, मुंबई यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन एकूण ८ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. त्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार अर्जदाराचे समाधान न झाल्याने अर्जदाराने दि.९.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,परिमंडळ-६, ४था मजला, प्रशासकीय इमारत,आरसी मार्ग, चेंबुर, मुंबई-७१ यांच्याकाडे प्रथम अपील दाखल केले. अर्जदाराचे मिळालेल्या माहितीने समाधान झालेले नाही. अर्जदारास द्यावयाची माहिती नष्ट करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.७.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व दि.९.९.२०१० रोजी आदेश पारित करण्यात आले. सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी पोलीस निरिक्षक श्री.जाधव सुनावणीस उपस्थित होते. अपीलार्थी यांना पत्रान्वये कळवूनही ते सुनावणीस गैरहजर होते. अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे शासकीय माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली आहे परंतु कागदपत्रांचा दस्तऐवज नियमाप्रमाणे नष्ट केल्यामुळे पोलीस ठाणेस मागणी केलेली कागदपत्र उपलब्ध

नसल्याचे त्यांना कळविण्यात आले आहे. अर्जदार सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांना माहिती कोणत्या नस्तीच्या आधारे दिलेली आहे ते स्पष्ट झाले नाही. अर्जदाराला उत्तर दिले असल्याच्या कारणास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात आले आहे.

त्यानंतर अर्जदाराने या आयोगासमोर दि.९.११.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्या अपिलात प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांचे अपील क्र.४३०५ /१०, दि.९.९.२०१० चे आदेश सुनावणी न घेता व चुकीचे आदेश दिले असे नमूद केले आहे व वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी दिलेली माहिती खोटी/अपुरी आहे म्हणून संबंधीतांविरुध्द कार्यवाही करुन अर्जदाराला दस्तऐवज देण्याबाबतचे आदेश द्यावेत असे म्हटले आहे.

सदर सुनावणीस अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत,जन माहिती अधिकारी हजर आहेत. त्यांनी त्यांच्यातर्फे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. दिलेल्या लेखी खुलाशानुसार अर्जदाराने विक्रोळी पार्कसाईट पोलीस ठाणे येथे दि.१३.४.०७ व दि.२५.९.०७ रोजी ज्या तक्रारी दाखल केलेल्या आहेत त्या संबंधीचा चौकशी अहवाल तसेच हस्तगत केलेली क्वालीस मोटरकार एमएच-०४ बीडी १७२१ चे दस्तऐवज व अपीलकार यांना विकलेल्या सदर गाडीच्या करारनाम्याची सत्यप्रत मिळणेबाबत नमूद केले आहे. तसेच मानवी हक्क आयोग केस क्र.बीजीएक/०४/२००८-०९ मध्ये सादर केलेला अहवाल व दस्तऐवजांची नक्कल प्रत मिळणेबाबत नमूद केले आहे. सदर निवेदनात असे सुध्दा नमूद केले आहे की, तक्रार अर्ज व चौकशीची कागदपत्र मुदत संपल्याने नष्ट करण्यात आली असल्याने व मानवी हक्क आयोगास अहवाल सादर करण्यात आल्याने व पोलीस ठाणे अभिलेखावर अहवाल उपलब्ध नसल्याने अर्जदार अपिलकर्ता यांनी मागीतलेली कागदपत्र देण्यात आलेली नाहीत.

सदर प्रकरणी अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे जर सदर कागदपत्र नियमानुसार नष्ट करण्यात आली असतील तर या संबंधीचे कागदपत्र किंवा रजिस्टर मधील नोंदी याबाबतची माहिती अर्जदाराला हवी आहे व ती देण्याची जबाबदारी संबंधीत वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस स्टेशन यांची आहे. तरी वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस स्टेशन यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी अर्जदार स्वत: निरिक्षणासाठी आल्यास या नष्ट केलेल्या अभिलेखासंबंधीची माहिती त्यांना प्राप्त करुन द्यावी. जर अशाप्रकारची मूळ अभिलेखातील रजिस्टर मधे नोंदी घेतलेल्या नसतील तर अर्जदाराला तसे लेखी कळवावे. अर्जदाराला अशाप्रकारची लेखी माहिती न मिळाल्यास अर्जदार या आयोगासमोर त्याप्रमाणे लेखी तक्रार माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १८ खाली करु शकतात.

त्याचप्रमाणे सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, अर्जदाराची तक्रार दि.१३.४.०७ व २५.९.०७ च्या अनुषंगाने चौकशी अहवाल हा मानवी हक्क आयोगाच्या

प्रकरणात दाखल करण्यात आलेला आहे. तरी या संबंधी अर्जदाराने अर्जदाराचे प्रकरण चालू असल्यास तशाप्रकारे अर्ज करुन सदर मूळ अभिलेखाचे निरिक्षण मागवावे किंवा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार माहिती मिळण्यासाठी अर्ज करावा व माहिती मिळवावी. यास्तव खालील आदेश पारित करुन सदाचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी अर्जदाराच्या दि.१३.४.०७ व २५.९.०७ च्या तक्रारीच्या संबंधाने सदरची कागदपत्र नष्ट केल्याबाबत त्यांच्याकडे नियमानुसार नोंद असल्यास, त्याबाबतची माहिती अर्जदाराने मागीतल्यास ती त्यांना पुरवावी. जर कागदपत्र नष्ट केल्याची नोंद नसेल तर तशाप्रकारे लेखी उत्तर अर्जदाराला देण्यात यावे.

वरील आदेश देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

प्रत - वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३१८/अपील क्रमांक ६४१३/२०१०/०२

श्री. महम्मद हमीद शेख(समाजसेवक-सतर्क नागरिक),
नेहरु नगर, चाळ क.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व),
मुंबई-४०००५१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
जी/उत्तर विभाग विभाग कायालय, पहिला मजला,

हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),
मुंबई-४०००२८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),
दादर, जी/उत्तर विभाग कायालय,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),
मुंबई-४०००२८. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदाराने दि.१६.८.२०१० रोजी केलेल्या अर्जानुसार मागीतलेली माहिती अर्जदाराला मिळाली परंतु खाली नमूद केलेली माहिती मिळालेली नाही-

एक) ज्या कंपन्यांची माहिती मागीतलेली आहे त्या कंपन्यांनी ए.एस.बी.भरलेली डिपॉझीट सह चलान क्रमांक

दोन) एफ.एम.डी. डिपॉझीट चलान क्रमांक व रिटर्न मनीसह चलान क्रमांक देण्यात यावे

उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार सदरची माहिती उपमुख्य अभियंता(नियोजन),बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयामार्फत जन माहिती अधिकारी हे ८-१० दिवसात विनामुल्य, अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन दतील. त्यानंतरही अर्जदाराला माहिती घेण्यासाठी काही अडचण असल्यास अर्जदाराला या आयोगासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ खाली लेखी तक्रार करता येईल. वरील आदेश देऊन सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२४३८/तक्रार क्र. १६४१/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
नगर विकास विभाग, नवि-२०,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ६.९.२०१०
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.६.९.२०१० रोजी त्यांच्या दि.२६.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/नगर विकास विभाग, मंत्रालय यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी शासन निर्णय निमसरकारी कार्यालये म्हणजे नगरपालिका आणि नगरपरिषदा व इतर मंडळे/महामंडळे याविषयी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली होती-

१) राज्य शासनाने प्रसुतीच्या संदर्भात जे नियम केलेल आहेत तेच नियम महानगरपालिका कर्मचा-यांना लागू का करण्यात आले नाहीत याबद्दलची माहिती द्यावी.

२) तसेच महानगरपालिका व नगरपालिका यांच्यामध्ये प्रतिनियुक्ती पदासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य अधिकारी तथा आयुक्त अथवा प्रशासक म्हणून आपल्या विभागातील कर्मचारी यांना पाठविण्यात येते अशा स्थितीत आयुक्त,प्रशासक,मुख्याधिकारी हे शासनाच्या निर्णयानुसार प्रशासकीय ठराव त्या त्या नगरपालिका,महानगरपालिका,नगरपरिषदेमध्ये मांडत नसल्यामुळे ते कोणत्या नियमामुळे राज्य शासनाच्या निर्णयाचा अवमान केला म्हणून शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतात त्याची माहिती द्यावी.

ही माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, सदर प्रकरण माझे पूर्व अधिकारी तथा राज्य माहिती अधिकारी श्री. आर.एस.घाडगे यांच्या काळातील असून सदर प्रकरणी तक्रारदार श्री.डोळस यांच्या ६.९.२०१०च्या अर्जास अनुसरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याचे सांगितले.

श्री.डोळस यांच्या अर्जातील सर्व मुद्यांच्या संदर्भात दि.१०.८.२०१० रोजी माहिती कळविण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी मागीतलेली माहिती ही राज्यातील २२६ नगरपरिषदा व २३ महानगरपालिका यांच्याशी संबंधीत आहे. या सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा या सार्वजनिक प्राधिकरण असल्यामळे त्यांच्याकडून ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. मंत्रालयात अशाप्रकारची कोणतीही माहिती उपलब्ध नसते. महानगरपालिकेचे कामकाज मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार चालते. या अधिनियमातील प्रकरण ४, कलम ४५ येथे नमूद केल्यापमाणे महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक व सेवेच्या शर्तीबाबत तरतूद आहे तर नगरपरिषदांचे कामकाज महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम,१९६५ नुसार चालते. या अधिनियमातील प्रकरण पाच, कलम ७५ येथे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नेमणुकीसंबंधी तरतूद आहे. सदर अधिनियमांच्या प्रती शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई येथे उपलब्ध आहेत. मुद्दा क्र.४ च्या संदभात कोणतीही बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही. मुद्दा क्र.५ रजेच्या संदर्भातील धोरण हा वित्त विभागाशी संबंधीत आहे त्यामुळे वित्त विभागाकडे तो हस्तांतरीत करण्यात आला आहे. तक्रारदार यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता तक्रारदार यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती राज्यातील महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या कायद्याप्रमाणे ज्या स्थापन झालेल्या महानगरपालिका व नगरपरिषदा आहेत त्यांच्या स्तरावरील माहिती आहे. महानगरपालिका व नगरपरिषदा या स्वायत्त संस्था आहेत. शासनाने जरी कोणतेही नियम केले असले तरी जोपर्यंत महानगरपारिला व

नगरपरिषदा त्यांच्या बैठकीत सदरच्या नियमाच्या संदर्भात निर्णय घेत नाहीत तोपर्यंत कोणतेही अधिकारी यांना तो निर्णय लागू करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी शासनाच्या प्रस्तुत नियमाच्या संदर्भात जी माहिती मागीतलेली आहे त्या संदर्भत प्रत्येक महानगरपालिका व नगरपरिषदांना ते नियम अंमलात आणण्याचा निर्णय घेतला असल्यासच अधिकारी किंवा कर्मचारी त्याबाबत अंमलबजावणी करु शकतात. त्यामुळे सदरची माहिती प्रत्येक महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्याकडे स्वतंत्रपणे मागणे संयुक्तिक राहील. यास्तव तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/१७९९/तक्रार क्र. १६५०/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रिअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
सहकार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ५.७.२०१०
तक्रारदार उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.९.२.२०१० च्या सहकार विभागात केलेल्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या दि.९.२.२०१०च्या अर्जात सहकार विभागाने बंधपत्रासंबंधी बनविलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. परंतु त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. आज सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार विभाग,मंत्रालय,मुबई हे हजर नाहीत. यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते व त्यामुळे संबंधित जन माहितीअधिकारी तथा कक्ष अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापूी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्रआहे.

आदेश

१) तक्रारदार यांच्या दि.९.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तसेच तक्रारीच्या सुनावणीससुध्दा जन माहिती अधिकारी उपस्थित राहिले नाही म्हणून अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द रु.५०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगाकडे समक्ष करावा. तसे न केल्यास रु.५०००/-ची शास्ती कायम करण्यात येऊन ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/तक्रार क्र. १६४९/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त प्रशासन,
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
ठाणे. .... गैरतक्रारदार

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १५.७.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे यांच्याकडे अर्ज करुन, स्वसंरक्षणासाठी रिव्हॉल्वर/पिस्तोल परवाना नाकारतांना जी कलमे,कारणे नमूद असतात त्याची व सशुल्क पोलीस संरक्षण पुरवलेल्या व्यक्तींबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.६.२०१० रोजी मुद्दा क्र.१च्या संदर्भात नियमावली बाजारात उपलब्ध असल्यामुळे ती पुरविण्याची आवश्यकता नाही तसेच मुद्दा क्र.२ बाबत दि.२४.१०.२००५ भाग ४(अ) अन्वये माहिती गोपनीय असल्याने ती आपणास पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच इतर मुद्यांच्या संदर्भातही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.निरंक अन्वये देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आले आहे. मात्र तक्रारदार यांनी द्वितीय अपील दाखल न करता आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्या संदर्भात शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,ठाणे यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, अर्जदार यांनी मागणी केलेले त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ व २(ब) ची माहिती पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखेशी संबंधीत असल्याने ती संकलीत करुन देण्याबाबत इकडील कार्यालयातून दि.१२.६.२०१० रोजी पत्र देण्यात आले. त्यात मुद्दा क्र.२,३,४ व ५ बाबतची माहिती विशेष शाखेशी संबंधीत असल्याने ती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले आहे. परवाना शाखा यांच्याकडील दि.१९.६.२०१० व विशेष शाखा यांच्याकडील दि.२९.६.२०१० अन्वये माहिती प्राप्त झाल्याने तक्रारदार यांना दि.३०.६.२०१० अन्वये विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आलेली होती. मात्र विशेष शाखा ही अधिनियमाच्या कलम २४(४) नुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होण्यापासून वगळण्यात आली असल्यामुळे विशेष शाखेची माहिती मात्र त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांनी कळविले होते.परंतु तरीसुध्दा अपिलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार कलेली आहे. त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, पोलीस आयुक्तालय सोलापूर यांनी मात्र विशेष शाखेच्या संदर्भात दि.२१.१.२०११ रोजी संपूर्ण माहिती त्यांना दिलेली आहे व त्यामुळेच तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, इतर सर्व पोलीस आयुक्तालये जर माहिती देत आहेत तर ठाणे पोलीस आयुक्तालय किंवा ठाणे(ग्रामिण) यांनी मात्र ती विशेष माहिती आहे म्हणून देता येत नाही हे कळविलेले आहे ते योग्य नाही. त्याकरीता तक्रारदार यांनी पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर यांच्याकडून मिळालेली माहिती आयोगाच्या निदर्शनास

आणली व त्यामुळे तक्रारदार यांनी ठाणे शहरातील किती व्यक्तींना ठाणे पोलीस आयुक्त यांनी सशुल्क पोलीस संरक्षण दिले याबद्दलची माहिती व इतर अनुषंगिक माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता त्यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन ठाणे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत तक्रारदार यांना त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना पोलीस आयुक्त, सोलापूर यांनी ज्याप्रमाणे विशेष शाखेकडून विशिष्ट व्यक्तींना संरक्षण दिल्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्याचप्रमाणे ठाणे आयुक्त कार्यालय यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/१७६८/तक्रार क्र. १६४८/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. **.... तक्रारदार**

<u>विरुध्द</u>

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. **.... गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २९.६.२०१०
तक्रारदार, गैरतक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२९.६.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.७.५.२०१० च्या आरोग्य विभागातील माहिती अधिका-यांकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील मनोरुग्णालयाच्या संदर्भात महाराष्ट्रामध्ये एकूण किती मनोरुग्णालये आहेत, ती कोठे आहेत त्या रुग्णालयातील साफसफाईचा ठेका देणे व तो ठेका मंजूर करणे यासाठी कोण अधिकारी नियुक्त आहेत, ठेका देण्यामध्ये नियमबाह्यता असल्यास कोणत्या सक्षम अधिका-याकडे दाद मागावी याबद्दलची माहिती तसेच त्या संदर्भात एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१७.६.२०१० रोजी मुद्दा क्र.१ बाबत राज्यात एकूण ४ शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालये आहेत. सदर मनोरुग्णालये ठाणे,पुणे, रत्नागिरी आणि नागपूर येथे आहेत. तसेच मुद्दा क्र.२ ते ७ बाबतची माहिती आपण संबंधित प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांचेकडून घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याचप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.३.७.२०१० रोजी त्यांच्या एकूण ८ मुद्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,प्रादेशिक मनोरुग्णालय,ठाणे यांच्याकडून माहिती उपलब्ध झाली. परंतु पुणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयातील माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी मंत्रालयातील सार्वजनिक आरोग्य विभागात माहिती मागीतली होती. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२,३ ते ८ पर्यंतची माहिती ही त्या त्या मनोरुग्णालयाच्या स्तरावरची आहे आणि प्रत्येक मनोरुग्णालय हे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. तक्रारदार यांनी त्यांच्याकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरची तक्रार अंशत: मान्य करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यानी मनोरुग्णालये- पुणे,रत्नागिरी,नागपूर येथून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ ते ८च्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी सदरचा माहितीचा अर्ज ३ मनोरुग्णालयांना(पुणे,रत्नागिरी,नागपूर)हस्तांतरीत करावा.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना सदर आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल

झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९६४/तक्रार क्र. १६३७/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ४.११.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.४.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या माहितीचा अर्ज दि.९.७.२०१० प्रमाणे माहिती प्राप्त झाली नाही म्हणून तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयातून तक्रारीच्या चौकशीकरीता नोटीस काढण्यात आली होती. माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.वानखेडे यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये तक्रारदार यांनी के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरीग,ठाणे(पूर्व) या संस्थेच्या अनुषंगाने माहिती मागीतली होती. सदर माहिती ही एका खाजगी शैक्षणिक संस्थेची असल्याने या माहितीशी निगडीत कागदपत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडे उपलब्ध नाही. परंतु या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या तंत्रशिक्षण संचालनालयाशी सदर माहिती निगडीत असल्यामुळे याबाबतची माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना दि.३.९.२०१० रोजी कळविण्यात आले होते. अर्जदाराने केलेल्या अपीलावर दि.२५.११.२०१० रोजी मंत्रालयात सुनावणी झाली. सदर सुनावणीस सहाय्यक जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय श्री.मोहिते उपस्थित होते. सुनावणीनंतर अर्जदार कार्यालयात आले परंतु त्यावेळी माहिती तयार नव्हती. अर्जदाराने माहिती व्यक्तीशः घेऊन जातो असे सांगितले. त्यानंतर दि.२५.११.२०१० रोजी माहिती तयार ठेवण्यात आली होती. परंतु अर्जदारास दि.१४.२.२०११ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे असा खुलासा त्यांनी आयोगापुढे दिलेला आहे. तंत्र शिक्षण संचालनालयाचे माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग हे विनाअनुदानित महाविद्यालय आहे व विनाअनुदानित महाविद्यालयांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे त्या संस्थेच्या संदर्भातील माहिती ही उपलब्ध होऊ शकत नाही. मात्र तंत्र शिक्षण संचालनालयाकडे जी

माहिती आहे ती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२८१३/तक्रार क्र. १६३८/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्टीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १६.१०.२०१०
तक्रारदार, गैरतक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१६.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,गृह विभाग यांनी त्यांच्या दि.८.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे कम १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, पोलीस विभागामार्फत ठाणे शहर भागात रहाणा-या व्यक्तीस पोलीस संरक्षण जे सशुल्क पुरविले गेले आहे त्यापोटी आजमितीपर्यंत एकूण किती थकबाकी सशुल्क पोलीस संरक्षण वापरणारे/घेणा-या व्यक्तींनी दिलेली नाही याची माहिती त्या सर्व रकमेच्यासह व इतर अनुषंगिक माहिती ८ मुद्यांमध्ये मागीतलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदर अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी मागणी केलेली माहिती ही पोलीस आयुक्त बृहन्मुंबई,पोलीस आयुक्त-ठाणे व पोलीस अधिक्षक-ठाणे(ग्रामिण) यांच्याशी संबंधीत असल्याचे आढळून आल्यामुळे अधिनियमाच्या कलम ६(३) अनुसार त्यांच्या अर्जाच्या प्रती १३.७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे उपरोक्त ३ कार्यालयांकडे पाठविण्यात आल्या. परंतु दि.२.८.२०१० रोजीच्या अर्जाद्वारे अर्जदार यांनी पोलीस आयुक्त-ठाणे यांनी आवश्यक ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे कळविले. सदर माहिती गोपनीय असल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४.१०.०५,भाग-४(अ) अन्वये ती पुरविता येत नाही असे पोलीस आयुक्त,ठाणे यांनी त्यांचे पत्र दि.३०.७.२०१० रोजी त्यांना कळविले आहे. त्यानंतर अर्जदार यांनी दि.६.९.२०१० रोजी एक स्वतंत्र अर्ज केला होता. त्यात पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई कार्यालय यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविलेली आहे. तथापी पोलीस आयुक्त ठाणे तसेच पोलीस अधीक्षक ठाणे(ग्रामिण) यांच्याकडील माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्याबाबत पुन्हा अर्जदार यांनी असे सांगितले की, पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांच्याकडुन जी माहिती प्राप्त होते ती पोलीस आयुक्त,ठाणे किंवा पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामिण यांच्याकडून प्राप्त होत नाही व

ती गोपनीय आहे असे कळविले जाते हे विसंगत आहे व ती माहिती गृह विभागाकडून पुरविण्यात यावी असे त्यांनी नंतरच्या अर्जात कळविले होते. कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी पुढे युक्ती वाद करतांना सांगितले की, अर्जदाराचा अर्ज ३ कार्यालयांकडे पाठविण्यात आला होता. त्यानंतर मात्र अर्जदाराने प्रथम अपील दाखल केलेले नाही व कक्ष अधिकारी यांच्याकडे ते अर्जातील माहिती मिळावी अशी मागणी करीत आहेत. तक्रारदार यांना जी माहिती उपलब्ध झाली नाही त्या संदर्भात ठाणे अधीक्षक व पोलीस अधीक्षक-ठाणे ग्रामिण यांच्या पत्राचे अवलोकन केले असता मागीतलेली माहिती पोलीस संरक्षणाबाबतची आहे व ती इकडील जिल्हा विशेष शाखा ठाणे(ग्रामिण) यांच्याशी संबंधीत असून सदरची शाखा परिपत्रक क्र.एचडीओ-१००५/२४२४/प्रक्र/२९२/आ.१ गृह विभाग मंत्रालय, मुंबई-३२ दि.२९ ऑक्टोबर,२००५ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २४(४) अन्वये वगळण्यात आला असून तो State Intelligence Department and its subsidiaries, Special /Branch of all Police Commissionerates, District Special Branch of all District Superintendents of Police in all the Districts असा असल्यामुळे सदरच्या शाखांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

श्री. भुषण पांडुरंग माळगांवकर,
१२२, फ्लॅट नं.३०२, मुकेश अपार्टमेंट्स,
नाडकर्णी मार्ग, वडाळा(पूर्व),
मुंबई-४०००३७. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १६.९.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१६.९.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.५.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दि.१८.२.२०११ रोजी म्हणजे आज घेण्यात आली. सदरच्या माहिती अर्जात अपिलकर्ता यांना ९.२.२०१० रोजी उत्तर पाठविण्यात आले आहे असे माहिती अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. सुनावणीस तक्रारदार हजर आहेत व त्यांनीही माहिती मिळाली असे सांगितल्यावरुन सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४०/अपील क्रमांक ६२८३/२०१०

श्रीमती फातिमा तय्यबजी ढोलकवाला,
१०४, पुष्पांजली,एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०००५४. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिक आयुक्त
बी अँड एफ, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिक आयुक्त
बी अँड एफ, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-५०. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी सहाय्यक अभियंता,इमारत व कारखाने यांच्याकडे टेनंट कोपार्टनरशीप हौसिंग सोसायटी, सीटीएस नं.२१०,जी वार्ड नं.३१९१ प्लॉट नं.७८ च्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.७.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी पत्ता दिला नाही असे कारण कळवून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, महानगरपालिकेतील इमारत विभागात सीटीएस क्रमांक दिला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही व सीटीएस क्रमांक दिला तर पत्ता दिला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. वास्तविक महानगरपालिकेच्या अभिलेख विभागात कोणत्याही इमारतीच्या संदर्भात प्रकरण शोधावयाचे असल्यास त्याबाबत योग्य ती अभिलेख जतन करण्याची पध्दत वापरणे आवश्यक आहे परंतु कोणत्याही पकारे त्यांना माहिती मागीतली तर नस्ती आढळून येत नाही अशाप्रकारचे उत्तर दिले जाते. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच करण्यात येते असे दिसून येते. या प्रकरणीसुध्दा अपिलकर्ता यांनी इमारतीचा सव्हे क्रमांक दिला असूनसुध्दा पत्ता दिला नाही या कारणास्तव त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीही कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे या कारणास्तव प्रथम अपील निकाली काढणे याचा अर्थ प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच केली असे असा निष्कर्ष काढावा लागतो. यास्तव त्यांनी अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे.प्रथम अपीलीय अधिकारी हे त्यांच्या शाखेतील किंवा विभागातील वरिष्ठ अधिकारी असतात याचे कारणच मुळात असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसेल तर वरिष्ठ अधिका-यांनी ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु कोणतेही प्रथम अपीलीय अधिकारी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती चौकशी करीत नाहीत व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपीलांची संख्या वाढत आहे. त्यामुळे आयुक्त, महानगरपालिका यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना कमीतकमी योग्य तो निर्णय देऊन माहिती उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने चौकशी करणे आवश्यक आहे असे आदेश देणे आवश्यक आहे. सदरच्या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास

टाळाटाळ केलेली असल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांच्याविरुध्दही शास्ती लादणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु आज ते आयोगापुढे हजर नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.२०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष खुलासा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास शास्ती कायम करण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४१/अपील क्रमांक ६२८२/२०१०

श्रीमती फातिमा तय्यबजी ढोलकवाला,
१०४, पुष्पांजली,एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०००५४. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,
इमारत प्रस्ताव, डब्ल्यू.एस.एच वार्ड, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०

जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,
इमारत प्रस्ताव, डब्ल्यू.एस.एच वार्ड, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी (इमारत प्रस्ताव),उपमुख्य अभियंता(W/S) यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Particulars of Bldg. on plot bearing C.T.S.No.२१०,T.P.S.-III,Santacurz(W)S.V.Rd.,Mumbai-४०००५४,Pushpanjali Tenant Co-Operative Housing Society- Kindly provie me the following information- Sanctioned(approved plan-year १९७८) builder-M/S Raja Construction co.

h) Number of Stilts Car Parking Space-Area-Direction-South-East-West,North
i) Number of enclosed portios-area-direction.
j) Open plot-Garden-area-direction
k) Number of servant's toilets
l) If there is a passage from the interior of the building to go from front to back or (vise versa)
m) No. of underground tanks for the society.
n) Number of flats first floor and their areas, area of the flats on ३rd floor ३०१ & ३०२(carpet area)

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.७.२०१० रोजी काही माहिती उपलब्ध आहे परंतु मूळ नस्ती आढळून येत नाही. मात्र मूळ नस्ती शोधण्याचा प्रयत्न चालू आहे व संबंधीत वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपिलकर्ता यानी दि.२.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन, फाइल वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन फाईल पुर्नगठीत करण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे ती १९७८ सालातली आहे व जोपर्यंत इमारत आहे तोपर्यंत त्या संदर्भातील संपूर्ण नकाशे, कागदपत्र इत्यादी गोष्टी जतन करणे आवश्यक असते. परंत प्रत्येक वेळेस नस्ती आढळून येत नाही अशाप्रकारचे उत्तर इमारत विभागाकडून दिले जाते असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात काही माहिती उपलब्ध आहे परंतु मूळ नस्ती उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे संबंधीत नस्ती

जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा पुर्नगठीत करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. दरम्यान संबंधीत फाईल उपलब्ध झालेली आहे व निरिक्षणाकरीता उपलब्ध आहे असे आयोगापुढे खुलासा करतांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती/छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून१० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रमाणित करुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१५/अपील क्रमांक ६२१३/२०१०

डॉ.मुकेश बैजनाथ शुक्ल,
सी-०१, ओम चामुंडा को.ऑप.हौ.सोसायटी,
वाकोला ब्रीज,दत्तमंदीर रोड, सांताक्रूझ(पूर्व),
मुंबई-४०००५५. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा निबंधक,
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट कँपस, महात्मा गांधी रोड,
मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट कँपस, महात्मा गांधी रोड,
मुंबई-४०००३२. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी द.१३.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Subject of Information - Faculty of Ayurveda - Kayachikitsa(final year B.A.M.S. Course) and M.D. Ayurveda Kaya Chikitsa. The subject of Panchkarma is part of Kayachikitsa ४th paper first Section in under graduate (B.A.M.S. course)and also in Postgraduate Course(M.D. Ayurveda Kayachikitsa)

The Period to which the information relates -Since the date of inception of faculty of Ayurveda in the University till date

Description of the information required - As Panchakarma is a part of Kayachikitsa- ४th paper first section and is not a separate subject in Mumbai University:

४. Whether it is to be construed that the recognized post graduate students of M.D. Kayachikitsa are also having knowledge of Panchakarma?
५. Whether the experience of approved Undergraduate and Postgraduate Teacher who are teaching Kayachikitsa-४th paper first section= Panchakarma, will be counted also as teaching experience in

Panchakarma&ref.dated June ०६,२००५-Post Graduate Lecture for the Ayurved Vachaspati-M.D. Degree for the first and second term of academic year २००५-२००६)?

६. Whether the approved Postgraduate Teacher and Guide in Kayachikitsa will also be considered as the approved Postgraduate Teacher and Guide in Panchakarma?

अर्जाच्या अनूषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.४.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी चेअरमन,ॲडहॉक बोर्ड ऑफ स्टडीज,कायाचिकित्सा यांच्याशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. तत्पूर्वी दि.२१.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१,२,३ संदर्भात अभिप्रायात्मक प्रश्न असल्यामुळे माहितीच्या अधिकारात येत नाही असे उत्तर त्यांना दिले होते व त्याबाबत संबंधीत प्राधिकरणाशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन घेता येईल असेही कळविण्यात आले होते. त्यानंतर दि.२७.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात आले होते व त्यानंतर दि.१५.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या त्यांच्या मुद्यांच्या संदर्भत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेसुध्दा समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये ३ प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या प्रश्नांच्या माध्यमातून संबंधीत प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे मत मागितलेले आहे. त्यामुळे संबंधीत अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. महितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी हे सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेले अभिलेखे, कागदपत्र किंवा दस्तऐवज यांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत माहिती अधिका-यांनी अभिप्राय देणे अपेक्षित नाही. राज्य माहिती आयोग हे कोणत्याही प्रकारचे तक्रार निवारण न्यायालय नाही त्यामुळे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत चौकशी करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(त्र) प्रमाणे 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेल्या तसेच अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मिळविता येण्याजोगी माहिती देणे अपेक्षित आहे व त्यात कागदपत्र,दस्तऐवज,अभिलेखे यांचे निरिक्षण करुन छायांकित पती उपलब्ध करुन घेणे किंवा संगणकात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. व त्याकरीता माहिती या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. या संज्ञेच्या व्याख्येत सार्वजनिक प्राधिकरणाकडे साहित्याच्या स्वरुपात उदा.कागदपत्र, दस्तऐवज,परिपत्रके इत्यादींच्या संदर्भात असलेल्या माहितीचा समावेश होतो व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे अभिमत मागणे अपेक्षित नाही व तसे त्यांना कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे विलंबाच्या संदर्भात सदर प्रश्नाबाबतचे स्पष्टीकरण डॉ.सुरेखा देवाईकर(चेअरपरसन)आयुर्वेद फॅकल्टी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर त्यांचे

स्पष्टीकरण अर्जदारास देणे शक्य व्हावे. या सर्व बाबींची पूर्तता करतांना त्यासाठी काही काळ विलंब झाला असा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही,उलटपक्षी जी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही ती सुध्दा देण्याचा प्रयत्न केलेला आहे व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

३) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४६/अपील क्रमांक ६२८१/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी(इ.व का.),
मुंबई महानगरपालिका पी नॉथ कार्यालय, मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी(इ.व का.),
मुंबई महानगरपालिका पी नॉथ कार्यालय, मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३१.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारती व कारखाने),पी नॉर्थ,महानगरपालिका कार्यालय, लिबर्टी गार्डन, मालाड(प.) यांच्याकडे अर्ज करुन पुढीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते- **अवैध बांधकामोंकी लिखित शिकायत पर इमारत विभाग द्वारा की गई कारवाई के संदर्भमें जानकारी.** सदर अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी १५.३.२०१०,२४,५,२०१० रोजी केलेल्या अर्जांच्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते.काही मुद्यांमध्ये अपिलकर्ता यांनी मोघम माहिती मागीतलेली आहे,काही मुद्यांमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे मत विचारलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी २१.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.७.२०१० रोजी देण्यात आला असून उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री.एस.एच. असीफ,कनिष्ठ अभियंता उपस्थित आहेत. त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली ती अतिशय मोघम स्वरुपाची आहे. असे असले तरी त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात मात्र कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली दिसून येत नाही व त्याबाबत त्यांना काहीही कळविण्यात आलेले नाही. अर्जदाराने अर्ज केल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्या अर्जात मागितलेल्या माहितीची छाननी करुन त्याप्रमाणे त्यांना उत्तर किंवा कागदपत्र उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु सदरच्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व यास्तव त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी आज सुनावणीस उपस्थित नाहीत व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.३१.५.२०१० च्या अर्जातील नमूद केलेल्या तक्रारींच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती तसेच इतर मुद्यांमधील कागदपत्र उपलब्ध असतील तर ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती अपिलकर्ता यांना व्यक्तीश: जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता यांच्या दि.३१.५.१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसात माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे व आज ते आयोगापुढे सुनावणीससुध्दा हजर झाले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.५०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत करावा तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती कायम करण्यात येईल व सदर शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश दिले जातील याची नोंद घ्यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१४८/अपील क्रमांक ६२७९/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
पी/उत्तर विभाग,बृहन्मुंबई मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी,
पी/उत्तर विभाग,बृहन्मुंबई मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुंबई महानगरपालिका,पी(उत्तर) विभाग यांच्याकडे मालाड(नॉर्थ) विभागातील **इमारत विभागमें कार्यरत अभियंताओंकेसंबंधमें जानकारी** अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.७.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांच्या आत देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी २२.६.२०१० रोजी मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे व ती त्यांनी घेऊन जावी असे कळविण्यात आले होते. परंतु माहिती घेऊन न जाता त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरसुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती निरनिराळया विभागांची असून कोणत्याही कागदपत्रांच्या संदभात निश्चित अशी माहिती मागीतलेली नाही.सर्व माहिती मोघम स्वरुपात मागीतलेली दिसून येते. अपिलकर्ता यांच्या दि.२४.५.२०१० च्या अर्जातील मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(त्र) प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमाच्या तरतुदीपमाणे मिळविता येण्याजोगी असलेली कागदपत्र,अभिलेखे,दस्तऐवज यांचे निरिक्षण करणे व निरिक्षणाअंती छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे. तसेच अधिनियमाच्या कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्र,अभिलेखे,दस्तऐवज,परिपत्रके, शासन निर्णय,संविधा इत्यादीच्या स्वरुपात असलेली माहिती याचा समावेश होतो. या दोन्हीही व्याख्यांवरुन कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते.त्यामुळे अर्जदाराने कागदपत्राचे वर्णन करुन माहिती मागणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारची

माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात ती सर्व माहिती मोघम स्वरुपाची आहे व कोणत्याही कागदपत्राचे निश्चित वर्णन केलेले नाही व ती तयार करुन द्यावयाचे झाल्यास सावजनिक प्राधिकरणाची यंत्रणा मोठया प्रमाणावर वळवून व तयार करुन द्यावी लागेल व तसे अधिनियमाच्या कलम ७(९)प्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे जी माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध आहे ती माहिती अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी कारण माहितीच्या अर्जात त्यांनी माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे व तसे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी याना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/४९३५१/अपील क्रमांक ६२१८/२०१०

श्री.अशोक बन्सोड,
फ्लॅट नं.७०३, जमुना अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.,
६८,एस.व्ही.रोड, शॉपर्स स्टॉप समोर,अंधेरी(प.),
मुंबई-४०००५८. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)(प.उ.)१,
बृहन्मुंबई महानगरपालिका के विभाग कार्यालय,
भाभा हॉस्पीटल जवळ, आर.के. पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)(प.उ.)१ ,
बृहन्मुंबई महानगरपालिका के विभाग कार्यालय,
भाभा हॉस्पीटल जवळ, आर.के. पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.७.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.६.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव)यांच्याकडे फाईल क्र.CE/७३५५/BSII/३A-K located at Jamuna Apartment C.H.S.Ltd.,६८,S.V. Rd.,Opposite to

Shopper's stop, Andheri(West), Registration No. BOM /HSG/ KW/७३८२/१९८४ च्या संदर्भात सी.सी., आय.ओ.डी., ओ.सी., लेआऊट प्लॅन,बिल्डिंग कंप्लीशन सर्टिफिकीट,तसेच इमारतीच्या संदर्भातील इतर कागदपत्र प्रत्यक्ष घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.११.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदभात दि.१२.६.२००९ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की,त्यांनी दि.६.३.२००९ रोजी जी माहिती मागीतली त्या माहितीच्या संदर्भात नस्ती आढळून येत नाही असे त्यांना दत्तर देण्यात आले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्येसुध्दा नस्ती आढळून येत नाही व त्या नस्तीचा शोध घेण्यात यावा असे कळविण्यात आले होते. मात्र अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्या इमारतीच्या संदर्भात माहिती मागीतलेली आहे त्या इमारतीच्या संदर्भातील नस्ती क्रमांक आढळून येत नसल्यामुळे माहितीचा शोध घेता येत नाही. तरी सर्व कार्यालयामध्ये व भांडूप कॉंप्लेक्स येथील गोडाऊनमध्ये शोध घेतला तरी सदरची नस्ती आढळून आलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जर पाण्याचे देयक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिले तर त्या देयकावर नस्ती क्रमांक असतो व त्या क्रमांकाप्रमाणे शोध घेणे सुलभ होईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी पाण्याचे देयक उपलब्ध करुन दिले जाईल असे सांगितले. परंतु एकूणच महानगरपालिकेतील इमारत व कारखाने या विभागातून नस्त्या आढळून येत नाहीत अशाप्रकारचे उत्तर अर्जदारांना दिले जाते असे सर्वसाधारणत: दिसून येते. त्यावरुन अभिलेख्यांचे योग्यरित्या जतन महापालिकेमार्फत केलेले दिसून येत नाही व ती महापालिकेतील वरिष्ठ अधिका-यांची अकार्यक्षमता आहे असे म्हणावयास हरकत नाही. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दि.१४.४.०४ रोजीसुध्दा बेकायदेशीर वापराच्या संदर्भात तक्रार केलेली होती व त्या तक्रारीबाबत कोणतीही चौकशी झालेली नाही. त्यानंतर दि.९.१२.०५ रोजीसुध्दा एक तक्रार केली होती व त्या तक्रारीच्या संदर्भातही कोणत्याही पकारे चौकशी करण्यात आलेली नाही. दि.१७.७.०९ रोजी पुन्हा त्यांनी त्यांच्या केलेल्या तक्रारींवर काय कार्यवाही झाली याबद्दल माहिती अधिकारात माहिती मागीतली परंतु त्याबाबतही कोणतेही उत्तर दिलेले नाही. दि.२७.१०.०९ रोजीसुध्दा त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन कार्यवाहीची माहिती विचारली परंतु त्याबाबतही उत्तर दिले जात नाही व यावरुन माहिती

देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे असे म्हणावे लागते असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

वरील दोन्हीही विभागांमध्ये अभिलेख्यांचे जतन योग्यरितीने केलेले नाही असे आढळून येत असल्यामुळे यापुढे आयुक्त, महानगरपालिका यांनी इमारतींच्या संदर्भातील ज्या नस्त्या आहेत त्या नस्त्यांचे जतन करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र अभिलेखे अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे अभिलेख्यांचे जतन करण्याची प्रक्रिया मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी सुरु करणे आवश्यक आहे अन्यथा इमारतीस ७५ वर्षे पूर्ण झाली असली तरी त्याबाबतची कागदपत्र उपलब्ध होणे आवश्यक असते व तीच महानगरपालिकेत उपलब्ध होत नाहीत किंवा आढळून येत नाहीत अशाप्रकारचे उत्तर दिले जाते. सदर प्रकरणी माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी त्यांच्याकडील पाण्याचे देयक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावे जेणेकरुन त्यावरुन तरी नस्तीचा शोध घेणे सुलभ होइल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी इमारतीच्या वास्तुशास्त्रज्ञांकडे संपर्क साधून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांपमाणे नवीन नस्ती पुर्नगठीत करावी व अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने सर्व कागदपत्र उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

Gawas/feb 2011

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००५७/अपील क्रमांक ६२९१/२०१०

श्री. आर.पी.यजुर्वेदी,
जे-२२०, अन्सा साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-९, बांद्रा(प.),
मुंबइ-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पश्चिम नियंत्रण कक्ष, कारख रोड,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे अर्ज करुन copy of the charge sheet filed at Hon.Court No.३९ Vile Parle OW ५४३६ dt.२६.६.२००९ as per letter addressed to the SRA Bandra(E) against developer Amroo Khan under MR & TP Act u/s ५३(७) एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण पोस्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना २७.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदार यांना समाधानकारक

उत्तर दिले असल्याने सदरचे अपील दि.७.१.२०१० रोजी दफ्तरी दाखल करण्यात येत असल्याचे आदेश दिले हाते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी अर्ज केला त्यावेळेस माहितीशी संबंधीत गुन्हयात दोषारोपपत्र न्यायालयात सादरकेल्याने व ते प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही परंतु आता आरोपपत्र सादर झाले असेल तर त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आरोपपत्राची कागदपत्र एकाच प्रतीत असतात व ती न्यायालयात दाखल झालेली असतात व त्यामुळे त्यांच्याकडे आरोपपत्राच्या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध नाहीत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आरोपपत्राची प्रत उपलब्ध असली पाहिजे असे आयोगापुढे सांगितले व त्यामुळे जन माहिती अधिकारी व पोलीस निरिक्षक यांच्यात या मुद्याच्या संदर्भात मतभेद दिसून आले. मात्र दि.२७.१.२०११ रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांना अर्जदार यांनी मागणी केलेल्या मुद्याचा तपास पूर्ण करुन दोषारोपपत्र मा.रेल्वे मोबाईल न्यायालय,कोर्ट केस क्र.४३/पीडब्ल्यू/०९ अन्वये मा.३९ वे न्यायालय, विलेपार्ले येथे दाखल करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे, तरी अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती मा.न्यायालयाकडून घेण्याबाबत अर्जदार यांना अवगत करावे असे नमूद केलेले दिसून येते. त्यावर अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले असले तरी त्या संबंधातील नस्ती ही पोलीस कार्यालयात उपलब्ध असली पाहिजे त्याशिवाय न्यायालयामध्ये सरकारीपक्षातर्फे कोणत्याही प्रकारे त्या प्रकरणाच्या संदर्भात पुढील कार्यवाही करता येणार नाही. यावरुन ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक आहे. असे असल्यास अपिलकर्ता यांना दोषारोपपत्राच्या संदर्भातील कागदपत्रांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील किंवा दोषारोपपत्राच्या संदर्भातील कोणतेही कागदपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत असे स्पष्टपणे अपिलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना १० दिवसाच्या आत दोषारोपपत्राची प्रत

विनामुल्य रजिस्टरपोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी व दोषारोपपत्राची प्रत उपलब्ध नसेल तर ती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविण्यात यावे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००५५/अपील क्रमांक ६२९०/२०१०

श्री. आर.पी.यजुर्वेदी,
जे-२२०, अन्सा साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या शेजारी,
एल्फीस्टन कंपाऊंड, मुंबई.

जन माहिती अधिकारी,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या शेजारी,
एल्फीस्टन कंपाऊंड, मुंबई. **..... उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडे अर्ज करुन List of Educational institutes not approved by AICTE flouting regulations and norms and action taken thereon: Information and Inspection of records अशी माहिती मागीतलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २००९ एप्रिल ते अर्जाच्या तारखेपर्यंतचा असून माहिती एकूण A ते F या मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमूद करुन त्याकरीता त्यांनी मोबाईल नंबरही दिलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना पत्र क्रमांक ११/तंशिसं/ मा.अ./ २०१०/१२१८, दि.७.८.२०१० अन्वये माहिती देण्यात आली होती. परंतु अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी दि.२५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही. परंतु काल १.२.२०११ रोजी त्यांना कार्यालयाकडून एक पत्र मिळाले आहे व ते त्यांनी अद्यापपर्यंत फोडलेले नाही. त्यामुळे त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.७.८.२०१० रोजी माहिती दिलेली होती परंतु त्याबाबतचे कोणतेही पत्र त्यांनी आयोगापुढे सादर केलेले नाही. मात्र खुलासा दाखल करतांना व तोंडी युक्तीवाद करतांना सदर

कालावधीमध्ये कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेचे काम तातडीने व तात्काळ करणे आवश्यक होते व या प्रवेश प्रक्रियेसाठी कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी व्यस्त होते. तसेच या कार्यालयात अतिशय अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास विलंब झाला. याबद्दल दिलगीर आहेत, भविष्यामध्ये याबाबत दक्षता घेण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. परंतु प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व ती उपलब्ध करुन दिलेली नाही व सहा महिन्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे मात्र आयोगापुढे दाखविण्यात आले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही ते आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुन तंत्रशिक्षण संचालनालय या कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत उदासिनता आहे असे दिसून येते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहितीचा अर्ज हाताळणे आवश्यक आहे. माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर संबंधित शाखेकडे किंवा अधिका-यांकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांचे सहाय्य अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे घेणे आवश्यक आहे. परंतु तसेही त्यांनी केलेले दिसून येत नाही. परंतु त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, संबंधीत अधिका-यांनी/कर्मचा-यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते.वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी व कर्तव्य आहे व तो आता सेवेचा एक भाग झाला आहे. त्यामुळे विभाग प्रमुखांना याबाबत योग्य ती यंत्रणा देणे आवश्यक आहे.प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा पथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते.मात्र अपिलकर्ता यांना माहिती देण्यास विलंब झालेला असल्यामुळे संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे इतर कर्मचारी व अधिकारी यांचे सहाय्यक घेणे आवश्यक असते व असे अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असेल तर त्यांना माहिती अधिकारी समजण्याज येते व त्या अधिकारी/कर्मचारी यांनी सदरच्या अर्जावर प्रक्रिया केली नसेल तर त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.१९.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने A ते F अशी मुद्देनिहाय माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात सहाय्य घेणे आवश्यक असते व ज्यांनी ज्यांनी सहाय्य केलेले नसेल त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही विभाग प्रमुख यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या

निर्णयाची एक प्रत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.
३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१७/अपील क्रमांक ६२२२/२०१०

श्री. निलेश सहदेव टोपले द्वारा आनंद दगडू इंगळे,
के.डब्ल्यू.पी.आय. म्युनिसिपल कॉलनी, दादाभाई क्रॉस रोड,
टेप व्हिलेज, अंधेरी(पश्चिम),
मुंबई-४०००५८. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, पालिराम रस्ता,
अंधेरी(पश्चिम), मुंबई-४०००५८.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, पालिराम रस्ता,
अंधेरी(पश्चिम), मुंबई-४०००५८. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२८.७.२०१० रोजीजन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),बृहन्मुंबई महानगरपालिका, के(प.)विभाग यांच्याकडे अर्ज करुन बाँबे कॅम्बरीज स्कुल अंबोली, अंधेरी(प.) या शाळेची वर्ष १९९० ते २०१० या कालावधीतील एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून यते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.३०.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना के/पूव विभाग अंधेरी या शाळेची माहिाती मिळाली आहे परंतु त्यांच संस्थेची शाळा के(पश्चिम) विभाग यांच्याकडून मात्र माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, दिनांक १.९.२०१० रोजी विभाग निरिक्षक(शाळा) यांनी मुख्याध्यापिका बाँबे कॅम्बरीज स्कुल,अंधेरी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच तत्कालीन माहिती अधिकारी आकस्मिक आजारी पडल्यामुळे व त्या कालावधीचा कार्यभार कोणालाही न दिल्यामुळे अर्जदारास माहिती देता आली नाही व ही बाब अर्जदार श्री.निलेश टोपले यांना व्यक्तीशः बोलवून सांगण्यात आली होती. तसेच अर्जदाराने अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त, के/पश्चिम विभाग यांचेकडे अपील न करता ३०.८.२०१० रोजी अपीलीय अधिकारी प्रशासकीय अधिकारी/शाळा यांच्या नावे अर्ज केला व त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नाही. तसेच अपिलकर्ता यांना बोलावून विना अनुदानित शाळेचे दस्तऐवज व माहिती परिरक्षीत केली जात नाही असे तोंडी सांगीतले होते व तरीसुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी बाँबे केम्बरीज स्कुल,अंबोली यांचेकडे लेखी पत्र दिले होते. परंतु त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विनाअनुदानित शाळा असल्यामळे त्यांना लागू होत नसल्यामुळे माहिती देण्यास नकार दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मान्यता दिली आहे त्या संदर्भातील माहिती त्यांनी मागीतली होती व ती माहिती कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदरच्या तक्रार क्र.२०१०/४१५/०२ च्या संदर्भात आयोगाचा निर्णय झालेला आहे व त्यामध्ये खाजगी विनाअनुदानित शाळांची माहिती

देता येणार नाही असा हा निर्णय आहे. ही बाब अपिलकर्ता यांना कळविण्यात आली होती. असे असले तरी अपिलकर्ता यांनी त्यांच्या शाळेच्या मान्यतेच्या संदर्भात के(पूर्व) विभाग यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी के(पश्चिम) विभाग यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तसेच मुख्य कार्यालयात जर शाळेच्या संदर्भातील प्रस्ताव उपलब्ध असेल तर त्या प्रस्तावाची कागदपत्र अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. यास्तव सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात यत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत कार्यालयात शाळेच्या मान्यतेविषयी व अपिलकर्ता यांच्या अर्जातील १ ते ६ मुद्यांच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध असेल ती मुद्देनिहाय कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता यांच्या दि.२८.७.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष करावा. शास्तीच्या संदर्भातील माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अवगत करावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१६/अपील क्रमांक ६२१४/२०१०

श्री. निलेश सहदेव टोपले द्वारा आनंद दगडू इंगळे,
के.डब्ल्यू.पी.आय. म्युनिसिपल कॉलनी, दादाभाई क्रॉस रोड,
टेप व्हिलेज, अंधेरी(पश्चिम),
मुंबई-४०००५८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,गुंदवली,
अंधेरी, मुंबई-४०००९३.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,गुंदवली,
अंधेरी, मुंबई-४०००९३. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा), बृहन्मुंबई महानगरपालिका, के(पूर्व) विभाग यांच्याकडे दि.२८.७.२०१० रोजी अर्ज करुन बाँबे कॅम्बरीज स्कुल, चकाला,अंधेरी पूर्व या शाळेची वर्ष १९९० ते २०१० या कालावधीतील माहिती प्रथम मान्यतेपासून मान्यताप्राप्त तुकडयांची संख्या तसेच मान्यताप्राप्त नसलेल्या तुकडयांची संख्या अशी एकूण ६ मुद्यांमध्ये शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय झालेल्या नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा देण्यात आलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता विभाग निरिक्षक(शाळा) यांनी दि.२३.८.२०१० रोजी संबंधित शाळेला भेट दिली. संबंधित शाळेने त्यांच्या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही व शाळा अनएडेड असून ती सरकारी संस्थेत मोडत नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अधिनियमाप्रमाणे मागीतलेली माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले व त्याकरीता मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.५१३२/०८ मध्ये दिलेल्या आदेशाची प्रत व माहिती आयुक्तांनी श्री.लिओ मसकरांस विरुध्द माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री. रॉड्रीग्ज,इंजिनिअरींग कॉलेज यांच्या अपीलांच्या आदेशाची प्रत जोडली आहे.परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर सदर माहिती पब्लीक अॅथॉरिटी म्हणजे प्रशासकीय अधिकारी (शाळा), के(पूर्व) विभाग यांच्याकडे असलेली माहिती एकूण ४६२ पृष्ठे अर्जदारास विनामुल्य दि.७.९.२०१० रोजी पुरविण्यात आली आहे. अर्जदाराची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोचपावतीदेखील घेण्यात आलेली आहे. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी शाळेची माहिती असल्यामुळे संबंधित शाळेकडून माहिती घेण्याचा सुरुवातीला प्रयत्न केला व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देतांना विलंब झालेला आहे असे सांगितले. परंतु अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे व त्याबाबतची पोचसुध्दा त्यांनी दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०००७०/अपील क्रमांक ६३०४/२०१०

श्री. विकास सुधाकर हरियाण,
लखमा जानु खोत चाळ, न्यु आग्रिपाडा,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमहासमादेशक,
महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालय,
जुने सचिवालय जोड इमारत, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ प्रशासिक अधिकारी(प्रशा:धोरण),
महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालय,
जुने सचिवालय जोड इमारत, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.१५.१.२०११ रोजी सदर अपिलाची माहिती त्यांना प्राप्त झाली असून मिळालेल्या माहितीशी ते सहमत असल्याबाबतचे लेखी पत्र दिले असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७१/अपील क्रमांक ६३०५/२०१०

श्री. अनिल लक्ष्मण कांबळी,
बी.एम.सी. स्टॉल लायसन्स क्र.१२४२७,
चुनाम लेन, पंडित बिल्डिंगजवळ, डॉ.भडकरकम मार्ग,
ग्रँट रोड, मुंबई-४००००१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
अे विभाग कार्यालय, १३४ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी,
अे विभाग कार्यालय, १३४ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई-४००००१. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक, अनुज्ञाप्ती, ए वार्ड यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते-

१) Transfer of Stall No.१०८३ in the name of Yasmin Shaikh and allotting place for doing business in A ward dated ३०.३.२००७.

२) All documents received from Licensee Mr. Muzzaffar Rahimattulla Shaikh to transfer of Sq.Stall Lic.No.१०८३ in the name of Yasmin Shaikh.

३) SL/०००५२५/LEA dated १७.४.२००७

४) Papers U/a LOP/१४३९ dtd १७.३.२००७

५) Total Nos. of transfer applications received before and after dated १२.२.२००७ pending and cleared till this application in A ward.

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून दि.१७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.७.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपलि अंशत: मान्य करण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या पत्रात म्हटल्याप्रमाणे विहित शुल्क आकारुन त्यांना ७ दिवसांच्या आत माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु.८०/- चा भरणा करावा असे कळविले व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.८.१०.२०१० रोजी रु.८०/- च्या खर्चाचा भरणा केलेला आहे.त्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना मुद्दा क्र.१,२ व ५ च्या संदर्भात अपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांच्या अजाच्या अनुषंगाने दि.२३.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध आहे व त्याबाबत खर्चाचा भरणा करावा असे रजिस्टर पोस्टाने कळविण्यात आले होते. परंतु रजिस्टर पत्र परत आलेले आहे. अपिलकर्ता यांनीसुध्दा आयोगापुढे असे सांगितले की. ते मुंबई बाहेर होते व त्यामुळे सदरचे पत्र परत गेलेले होते. मात्र ज्या नस्तीच्या संदर्भात माहिती मागीतली होती त्यातील संपूण माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की, सदरच्या नस्तीतील संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यास कोणतीही हरकत नाही. यापूर्वी आवश्यक तेवढीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु अपिलकर्ता यांना संपूर्ण नस्तीतील प्रत्येक पृष्ठाच्या संदर्भात खर्चाचा भरणा करण्यास संमती दिलेली असल्यामुळे त्यांना नस्तीमधील संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील व त्याकरीता सदरचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीतील दिलेल्या माहितीपेक्षा उर्वरीत कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा केल्यानतर व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्याकरीता अपिलकर्ता यांनी व्यक्तीश: जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००६९/अपील क्रमांक ६३०६/२०१०

श्री. शंकर नागेश कविलकर,
टी/४५/३०४, प्रतिक्ष नगर, सायन कोळीवाडा,
मुंबई-४०००२२. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता(रस्ते वाह. व पुल),
मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(रस्ते) शहर,
कमर को.ऑप.हौ.सो.,१ला मजला, पट्ठे बापूराव मार्ग,
ग्रँट रोड, मुंबई-४००००७. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(रस्ते)शहर यांच्याकडे अर्ज करुन सायन रोड क्र.२८ व २९ मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या संदर्भात सन २०१० या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसनू येते.

१)महापालिकेच्या कोणत्या अधिका-यांच्या देखरेखीखाली काम निर्देशित केले गेले त्यांची नावे देण्यात यावी.

२)सदर कामाची जी तपासणी ज्या प्रयोगशाळेत करण्यात आली त्या प्रयोगशाळेचा पत्ता देण्यात यावा.

३) सदर कामासाठी ज्या तपासण्या केल्या गेल्या त्या किती व कोत्या प्रकारच्या होत्या, त्याची तारखेसहीत माहिती देण्यात यावी.

४) सदर कामाचे प्रयोगशाळेत वरील तपासण्या केल्या गेलेल्या अहवालाची छायांकित प्रत देण्यात यावी

माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१२.८.२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात तपासणी अहवाल उपलब्ध करुन दिलेला दिसून येतो. मुद्दा क्र.४ च्या संदर्भात तपासणी अहवालाच्या एकूण १०६ इतक्या छायांकित प्रतिंसाठी प्रति प्रत रु.२/- प्रमाणे एकूण रु.२१२/- इतके शुल्क कार्यालयात जमा केल्यानंतर उपलब्ध करुन

देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६.९.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीपेक्षा अधिक माहिती उपलब्ध असल्यास ती १५ दिवसाच्या आत द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सुरुवातीला युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याअर्जाप्रमाणे त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि.१२.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपिलकर्ता यांनी माहिती अपुर्ण व मागीतलेल्या माहितीपेक्षा वेगळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे सांगितले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये अपिलकर्ता यांनी मागीतलेलीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दाखविले. तरीही अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, काँक्रीटच्या रस्त्याला तडे गेल्यानंतर जी तपासणी प्रयोगशाळेत केलेली आहे त्या तपासणीच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलली नाही. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या बद्दल तोंडी स्पष्टीकरणात ते दाखवून दिले व यावरुन अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, दि.२९.९.२०१० रोजीसुध्दा या कार्यालयाच्या दस्तऐवजात उपलब्ध असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यापेक्षा अधिक माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांना कळविलेले होते. असे जरी दिसून येत असले तरी तडे गेल्यानंतर प्रयोगशाळेत तपासणी केलेली आहे किंवा नाही याबद्दलची माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना त्यांनी मागीतलेल्या सायन रोड क्र.२८,२९ मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या संदर्भात तडा गेल्यानंतर प्रयोगशाळेमध्ये तपासणी केली गेली असल्यास त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा तशा प्रकरची तपासणी केली गेली नसल्यास तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००६८/अपील क्रमांक ६३०७/२०१०

श्री. अशोक वसंतराव दळवी,
२२, मोहन अपार्टमेंट, रमेश नगर, अंबोली,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५८. **.....** **अपिलकर्ता**

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग-१, ६वा मजला मल्होत्रा हाऊस,
जनरल पोस्ट ऑफीससमोर, मुबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग-१, ६वा मजला मल्होत्रा हाऊस,

जनरल पोस्ट ऑफीससमोर, मुबई-४००००१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१८.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे त्यांनी दि.१.१२.२००९ रोजी अपना सहकारी बँकेच्या विरोधाम त्यांचे सभासदत्व रद्द केल्याबद्दल अप्पर आयुक्त व विशेष निबंधक पुणे यांना तक्रार केली होती त्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली दिसून येते. तसेच मुद्दा क्र.२मध्ये त्यांनी काही मागण्या केलेल्या आहेत व त्या मान्य कराव्यात असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१०.६.२०१० रोजी आपला तक्रार अर्ज कार्यालयाकडील दि.४.६.२०१० रोजीच्या पत्राने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,एफ/एस विभाग, मुंबई यांच्याकडे तक्रारीतील मुद्यांवर चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी पाठविण्यात आलेला आहे. सदरचा अहवाल अद्यापपर्यंत या कार्यालयास प्राप्त झलेला नाही. अहवाल प्राप्त होताच आपल्या तक्रारीचे संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई(१) शहर यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.८.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयात दि.९.८.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही व त्यांना त्या संदर्भात ३० दिवसांच्या आत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी तक्रार केलली आहे त्या तक्रारीच्या संदर्भात योग्य त्या चौकशीसाठी संबंधित अधिकारी यांच्याकडे ती तक्रार हस्तांतरीत केलेली आहे असे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले होते. त्यानंतर त्या तक्रारीच्या चौकशीच्या संदर्भात स्मरणपत्रसुध्दा उपलब्ध करुन दिलेले आहे परंतु त्याबाबत अहवाल प्राप्त झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. पुढे युक्तीवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे

सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च) प्रमाणे व २(त्र) प्रमाणे **माहिती** व **माहितीचा अधिकार** या दोन्ही संज्ञांच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत व त्याप्रमाणे अर्जदाराच्या अर्जासंदर्भात ज्यावेळेस कार्यालयात कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणाची चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे म्हणजेच कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे त्यांच्या तक्रारअर्जावरील तक्रारीची चौकशी करुन ज्यावेळेस अहवाल प्राप्त होईल त्यावेळेस तो उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना कळविण्यात आले होते. व तशाच प्रकारचे विश्लेषण हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयामधील विवेचनाच्या अंतिम परिच्छेदात केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहितीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी झाल्यावर अहवाल उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००४३/अपील क्रमांक ६३०८/२०१०

श्री. प्रकाश गोविंद नवाथे,
२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप. हौ.सो.लि.,
२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई-१९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. म.न.पा. आयुक्त,
एफ उत्तर विभाग,
माटुंगा, मुंबई-१९.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,
म.न.पा. एफ उत्तरन विभाग, ९६ भाऊ दाजी मार्ग,
माटुंगा, मुंबई-१९. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२७.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिधारक व संकलक यांच्याकडे अर्ज करुन राजबागला ऑक्युपेशन सर्टिफिकेट प्राप्त झाल्यावर वरील प्रापर्टी टॅक्स कमी होणार/जास्त होणार याबाबत माहिती देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.६.९.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे मागीतलेली माहिती **माहिती** या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही व त्यामुळे ती आपणास देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.८.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे ती सांप्रदायिक म्हणजेच कपोलकल्पीत स्वरुपाची असून भविष्यात काय घडेल अशा प्रकारची माहिती मागीतलेली आहे व माहिती या संज्ञेत मात्र कार्यालयातील अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात अशी तरतूद असल्यामुळे सदरची माहिती नाकारली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक आहे तसेच प्रथम अपीलाचा निर्णयही संयुक्तिक असल्याने अपिलकर्ता यांना निवासी वापराचे प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यानंतर आकारण्यात आलेल्या कराच्या संदर्भात नियम उपलब्ध असल्यास त्या नियमाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांच्या दिनांक २७.८.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने निवासी वापराचे प्रमाणपत्र इमारतीस उपलब्ध करुन दिल्यानंतर कर आकारण्या संदर्भात नियम असल्यास त्याबद्दलची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व नसल्यास त्यांना स्पष्टपणे तसे कळविण्यात यावे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२०/अपील क्रमांक ६२१५/२०१०

श्रीमती विशाखा वि.इंगळे,
बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळकनगर, चेंबूर(प.),
मुंबई-४०००८९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एम/पश्चिम विभाग,
एम विभाग कार्यालय इमारत, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर-४०००७१.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एम/पश्चिम विभाग,
एम विभाग कार्यालय इमारत, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर-४०००७१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा, एम/पश्चिम, पालिका विभाग कार्यालय, चेंबूर(पूर्व) यांच्याकडे संदर्भ

क्र.MW/OD/११९१ दि.९.३.२००९ रोजीच्या पत्राची छायांकित प्रमाणित प्रत व त्या संदर्भात आपले कार्यालयीन संदर्भीय पत्र दि.१६.३.०९ व २१.३.०९ यामध्ये नमूद केलेले पालिका सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील क्र.एलसीपी/२२३२/०८ दि.१६.१२.०८ च्या संदर्भीय पत्राची छायांकित प्रमाणित प्रत व्यक्तीशः देण्यात यावी असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२६.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्ण दि.१७.९.२०१० रोजी देण्यात आला आहे व अपिलकर्ता यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे व त्या व्यतिक्ति आणखी काही माहिती अवी असेल तर जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क करावा अशाप्रकारचा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दि.४.१०.२०१० रोजी पुन्हा अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना ३ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली असून रु.६/- इतका खर्चाचा भरणा त्यांच्याकडून घेतलेला आहे. त्यापैकी त्यांनी मागीतलेली दि.९.३.०९च्या पत्राची छायांकित प्रत या पृष्ठाची एकच बाजू दिलेली असून त्यावर पीटीओ लिहिलेले असूनसुध्दा पाठपोट छायांकित प्रत दिलेली नाही. तसेच दि.१६.३.०९ व दि.२१.३.०९या पत्रांच्या प्रती मागितलेल्या नसुनसुध्दा त्यांना २ प्रती विनाकारण उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. या दोन्ही पत्रांमध्ये सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील क्र.LCP/२२३२/०८ दि.१६.१२.०८ या संदर्भांकित पत्राची छायांकित प्रत त्यांनी मागीतली होती व ती मात्र त्यांना देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिलेली आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी या नुकत्याच रुजु झालेल्या आहेत व त्यामुळे अपिलकर्ता यांना जर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नसेल तर त्यांना त्या पत्रांची माहिती उपलब्ध करुन देता येईल,यास्तव सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० विसाच्या आत अपिलकर्ता यांना दि.९.३.२००९ च्या पत्राची पाठपोट छायांकित प्रत तसेच सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील संदर्भ क्रमांक

LCP/२२३२/०८ दि.१६.१२.०८च्या पत्राची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२२/अपील क्रमांक ६२१९/२०१०

श्री. इंगळे व्ही.एस.,
बी/६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळक नगर, चेंबूर(प.),
मुंबई-८९. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक,
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मंबई-४०००१८.

जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मंबई-४०००१८. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग,चाळी तथा जन माहिती अधिकारी, व्यवस्थापक,मुंबई विभाग विकास चाळी यांच्याकडे अर्ज करुन दि.११.५.२००९ व ३१.३.२०१० रोजी श्री.प्रकाश इंगळे यांना अनुक्रमे संदर्भ क्र.इव्हिएन/१३०३/२००९ व क्र.इव्हीएन/१२८४/२०१० या खाली पत्रे पाठवून उचित कारवाई प्रस्तावित करण्यासंबंधात त्यांना सुचित करण्यात आले आहे त्यावर आपण तयार केलेल्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रमाणित प्रत सादर करण्यात यावी त्याचबरोबर दि.३१.३.२०१०,२०.४.२०१०,७.५.२०१० आणि दि.१४.७.२०१० रोजी पत्रे पाठवून त्यामध्ये उल्लेखिलेला दस्तऐवज पुरविण्यात यावा अशाप्रकारची माहिती तसेच समेट घडवून आणल्या संदर्भात अहवालाची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय दिलेला नाही परंतु आदेशाची नोंद घेतलेल्या नोंदवहीच्या पृष्ठाची छायांकित प्रत दाखल केली आहे. त्यामुळेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता वारंवार माहितीचा अर्ज करतात व त्या सर्व अर्जांना वेळोवेळी त्यांनी उत्तरेही दिलेली आहेत. अपिलकर्ता एकाच विषयाची माहिती वेगळया पध्दतीने मागवतात व ती पुरवूनही त्यांचे समाधान होत नाही. अपिलकर्ता यांनी सादर केलेले अर्ज व त्यांना कार्यालयाकडून देण्यात आलेली उत्तरे याची सुची त्यांनी आयोगाच्या अवलोकनार्थ जोडलेलीआहे. अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्यांमध्ये काही तथ्य नसते. बीडीडी चाळीतील दोन भावांचा वाद असून त्या वादाच्या सदर्भात अपिलकर्ता वारंवार मिळकत व्यवस्थापक तसेच पोलीस यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करीत आहेत. पोलीसांनीसुध्दा अपिलकर्ता यांना दिवाणी वाद असल्यामुळे हस्तक्षेप करता येत नाही असे वारंवार सांगितलेले आहे. त्यांना आत्तापर्यंत सर्व कागदरत्रांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच पोलसांनीसुध्दा त्याना माहिाती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अर्जदार यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नाही व त्यांच्या स्वत:च्या हिताकरीता ते सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिका-यांना वेठीस धरत आहेत असे दिसून येते, तरीही त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२१/अपील क्रमांक ६२१७/२०१०

श्री. विनायक एस.इंगळे,

द्वारा- बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळक नगर, चेंबूर(प.), मुंबई-८९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-३, बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड,
भायखळा(पूर्व), मुंबई-४०००३३.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,
बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड,
भायखळा(पूर्व), मुंबई-४०००३३. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरिक्षक वरळी पोलीस ठाणे यांच्याकडे अर्ज करुन भविष्यात अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने आपण आणि श्री.आर.पी.वैती,सहाय्यक व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग,वरळी यांनी संयुक्तिकपणे केलेले उपाय इत्यादी अहवालाची झेराक्स प्रमाणित पुरविण्याबाबत तसेच त्यांच्या कार्यालयात उपरोक्त क्रमांकाचेआपणास प्राप्त झालेल्या पत्राचा सद्यस्थितीपर्यंतचा अहवाल अवगत करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी

आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांचा सहभाग घेऊन कोणत्याही प्रकारचा अहवाल तयार केलेला नाही. मात्र व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग चाळी, वरळी व अपिलकर्ता यांचे बंधू यांच्या संदर्भात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न पोलीसांनी वेळोवेळी केलेला आहे. अपिलकर्ता व त्यांचे बंधू यांच्यामध्ये बीडीडी चाळीत रहाण्यासंदर्भात वाद आहे. अपिलकर्ता हे बीडीडी चाळीत रहात नसून ते चेंबूर येथे राहतात व बीडीडी चाळीतील जागा ही त्यांचे बंधू श्री.प्रकाश इंगळे यांच्या कब्जात आहे व विषयांकित खोलीची भाडेदारी श्री.प्रकाश इंगळे यांच्या नावावर हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे श्री.विनायक इंगळे यांचे वास्तव्य तेथे होते परंतु त्यांचे भाऊ त्यांना सदरच्या खोलीत राहू देत नाहीत व त्याबाबत त्यांची तक्रार आहे. मुंबई विकास विभाग चाळीची इमारत ही शासनाची मालमत्ता असून इमारतीमधील गाळे भाडेकरुंना भाडेतत्वावर वाटप केलेले आहेत. मंबई विकास विभाग चाळीच्या इमारतीमधील गाळे कोणाही व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नाही. श्री.प्रकाश इंगळे यांनी श्री.विनायक इंगळे यांना सदरच्या खोलीत रहाण्यास सौजन्य व सहकार्य दाखविण्यासाठी व सामोपचाराने समेट घडविण्यासाठी तसेच भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडून पेचप्रसंग निर्माण होऊ नये यास्तव सदरचे वादग्रस्त प्रकरण आपल्या विभागाकडे पाठविण्यात येत आहे. तरी सदर प्रकरणी दोन्ही व्यक्तींमध्ये योग्य तो समेट घडवून या कार्यालयास अहवाल पाठवावा असे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना लिहिले असल्यामळे त्या अहवालाची माहिती अपिलकर्ता यांनी मागीतलेली दिसून येते. त्या संदर्भात अपिलकर्ता यांना एकूण १ ते ३१ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली आहेत व त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरिक्षक यांनी समेट घडविलेला असून त्याबद्दलची कागदपत्र दिलेली दिसून येतात. मात्र अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, समेट घडवतांना त्यांना कधीही बोलावण्यात आलेले नाही. या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील कारवाईच्या संदर्भात हस्तक्षेप करता येत नाही किंवा हस्तक्षेप करणे अपेक्षित नाही व त्यामुळे कागदपत्रांच्या स्वरुपात जेवढी माहिती उपलब्ध असेल ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे अपिलकर्ता यांना ती सर्व कागदपत्र उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ८.२.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००८६/अपील क्रमांक ६३२३/२०१०

श्री. भास्कर विश्राम गावडे,
बी.डी.कदम चाळ, एक्सेल कंपनी शेजारी,
वीरा देसाई रोड, अंधेरी(प.), मुंबई-५३. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
परिरक्षण विभाग, के/पश्चिम विभाग,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५३.

जन माहिती अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
परिरक्षण विभाग, के/पश्चिम विभाग,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५३. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी सी.टी.सर्व्हे क्र.७२० मधील प्रमोद नवलकर उद्यानाबाबत विरा देसाई मार्ग, कवारी रोड,विलाल मजिद समोर, अंधेरी(प.) च्या संदर्भात अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतली आहे.

१) शौचालय स्थलांतर करण्याकरीता पास केलेल्या प्रस्तावाची प्रत, सक्षम प्राधिकरणाने म.न.पा. कार्यालयात दिलेली प्रत मिळावी

२) १३.४.२०१० रोजी सहाय्यक अभियंता श्री.जाधव यांनी केलेल्या परिक्षण(तपासणी)चा रस्ता नियमित रेषेमध्ये पूर्वस्थायी शौचालय येतात किंवानाही याचा तपासणीअहवाल सादर करावा

३) विकासकाने ५% ॲमिनिटी म्हणून देण्यात येणारा भुखंड हा कोणाच्या अखत्यारीत असणार याचा लेखी खुलासा करावा व त्याचा उपयोग(एसआरए) किंवा सेल बिल्डिंगमधील रहिवाशांकरीता असेल व तो मोफत असेल कि शुल्क भरावा लागणार याचा खुलासा करावा,

माहिती प्रत्यक्ष घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३.६.२०१० रोजी एकूण ३ मुद्यांवर माहितीच्या संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी/सहाय्यक अभियंता(परि.)उत्तर यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलकर्त्यांस स्थळ पाहणीच्या अहवालाची प्रत सात दिवसांचे आत देण्यात यावी. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेलेआहे.

सुनावणीस अपिलकर्ता हजर आहेत, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्र दाखल केलेली नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या नोटीसचा अवमान केलेला आहे व त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे त्या संदर्भात युक्तीवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना प्रस्तावाची संपूर्ण माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा

नाहीत याबद्दलचा अहवालही त्यांना दिलेला नाही. मात्र दि.३.६.२०१० च्या पत्रामध्ये स्पष्टपणे रु.२/- प्रति प्रत भरणा केलनंतर सदर प्रस्तावाची छायांकित प्रत आपल्याला उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले आहे. अहवालाच्या संदर्भात कार्यालयामधून हातोहात अहवालाची प्रत देण्यात आली आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच विकासकाकडून ५०% च्या संदर्भातसुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे पुन्हा असे म्हणणे आहे की, प्रस्तावाच्या छायांकित प्रतीचा खर्च ते भरण्यास तयार होते परंतु जन माहिती अधिकारी यांनी ३०व्या दिवशी खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. वास्तविक माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ५-७ दिवसात खर्चाचा भरणा करण्यास कळविणे आवश्यक असते, जेणेकरुन अर्जदारास खर्चाचा भरणा करुन मुदतीत माहिती प्राप्त करुन घेता येते. परंतु ३०व्या दिवशी खर्चाचा भरणा करण्यास कळविणे याचा अर्थ माहिती देण्यास टाळाटाळच करण्याचा उद्देश दिसून येतो व मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल तर विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ७(६) मध्ये आहे. त्याप्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत याबाबतच्या अहवालाची प्रत किंवा नकाशे उपलब्ध करुन द्यावेत असे त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना सांगितले. उत्तरवादी गैरहजर असल्यामुळे व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्दल काहीही कागदपत्र सादर केलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरुन असा निर्णय देण्यात येतो की, सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.३.५.२०१० च्या अर्जात मागितलेल्या ३ मुद्यांच्या संदर्भात मुद्देनिहाय संपूर्ण प्रस्तावाची तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत त्या अहवालाची प्रत तसेच नकाशाची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१५७/अपील क्रमांक ६३२०/२०१०

श्री. अण्णाजी शामराव अडबोल,
१६/२५२, कन्नमवार नगर नं.१,
विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
दर्यापूर, जि.अमरावती.

जन माहिती अधिकारी,
दर्यापूर, जि.अमरावती. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.६.२०१० रोजी मौजे लोहिजखेडा येथे गट क्र.१४ व १५च्या दुरुस्ती करण्यासाठी दि.१८.१२.०९ रोजी दिलल्या अर्जाच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.७.२०१० रोजी त्यांच्या दुरुस्ती तक्रार अर्जाच्या संदर्भात गुणवत्तेच्याबाबत नायबतहसिलदार यांनी कळविलेले दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीनुसार मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२३.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना एकूण

३४ पानांची माहिती पुरविण्यात आलेली दिसून येते तसेच अपिलार्थी यांनी अपिलामध्ये मागीतलेली माहिती, माहिती या संज्ञेत बसत नसल्यामुळे अपिल फेटाळण्यात आले आहे असा निर्णय दिल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यांनी गट नं.१४ व १५करीता दुरुस्ती अर्ज केलेला आहे परंतु सदरच्या दुरुस्ती अर्जाच्या संदर्भात त्यांना मागीतलेली माहिती देण्यास दुर्लक्ष करण्यात आले आहे. परंतु नायब तहसिलदार, दर्यापूर यांनी असे सांगितले की, त्यांच्या अर्जाची सुनावणी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता-६६च्या तरतुदीप्रमाणे सुरु आहे व तेथे प्रत्येक तारखेस हजर रहाण्याकरीता त्यांना २९.७.२०१० रोजी कळविण्यात आले होते. तसेच त्याबाबतची सर्व माहिती अपिलकर्ता यांना १ ते ३४ कागदपत्रांमध्ये देण्यात आलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यातील फक्त ३ कागदपत्र नवीन असून ३० कागदपत्र त्यांनीच दाखल केलेली आहेत. परंतु त्यावर नायबतहसिलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की जी सुनावणी आहे ती महसूल कायद्याप्रमाणे असल्यामुळे व ती आरटीएस अपिलाची सुनावणी असल्यामुळे माहितीच्या अधिकारात त्याबद्दल कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही किंवा त्या अपील अर्जाच्या सुनावणीसंदर्भात कार्यवाही का करण्यात येत नाही याबाबतही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांनी मूळ माहिती अर्ज व प्रथम अपील या दोन्ही कारवाया या त्या कार्यालयाच्या क्षेत्रातील नसल्याने प्रतिवादी म्हणून सदर अपिल अर्जाविरुध्द दोन्ही पक्षांना नोटीस पाठवून सुनावणीसाठी हजर रहाण्यास कळविण्यात आले आहे. सुनावणीच्यावेळी असे आढळून आले की, सदर अपील तहसिलदार, दर्यापूर यांच्या अधिकारक्षेत्रातील आहे. म्हणून उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांचे नाव प्रकरणातून वगळण्यात यावे असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. थोडक्यात अपिलकर्ता यांच्या दुरुस्ती अर्जाच्या संदर्भात तातडीने निर्णय होणे अपेक्षित आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्र उपलब्ध होत नाहीत व कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात राज्य माहिती आयोगास आदेश देता येत नाहीत व त्यामुळे त्यांना पृष्ठ १ ते ३४ उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१५८/अपील क्रमांक ६३१९/२०१०

श्री. शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली, मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
पी-नॉर्थ, बृहन्मुबई महानगरपालिका,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.),
मुंबई.

जन माहिती अधिकारी,
इमारत विभाग, पी-नॉर्थ, बृहन्मुबई महानगरपालिका,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.),
मुंबई. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान झाले व मी संतुष्ट आहे असे अपिलकर्ता यांनी लेखी लिहून दिले आहे

असे जावक नोंद वहीवरील नोंद दाखवून प्रतिपादन केले. सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचे अपील **निकाली** काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१५६/अपील क्रमांक ६३२१/२०१०

श्री. राजेश कृष्णाजी घडशी,
विजय कर्पे चाळ नं.३बी, रुम नं.१०,
ज्यु जिम्मी बाग, कल्याण तिसगाव रोड, कल्याण(पूर्व),
ठाणे. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता(स्थापत्य),
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
घाटकोपर. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्यातर्फे श्री.महेश गावडे यांनी दि.२०.१.२०१० रोजी माहिती अधिकारी(म्हाडा) यांच्याकडून मला सर्व माहिती मिळाली असल्याने माझी काहीही तक्रार नाही असे लेखी सादर केलेले निवेदन आयोगासमोर सादर केले. यास्तव सदरचे अपील **निकाली** काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/४२२०६/अपील क्रमांक ५८४०/२०१०

श्री. डॉ.शहा बाहुबली हिरालाल,
हिरानगर, होमिओपॅथी क्लिनीक, रणवरे टॉवर्स,
सिनेमा टॉवर्स, बारामती-४३३१०२. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
अनेकांत एज्यूकेशन सोसायटी,
तुळजाराम चतंररंग कॉलेज कँपस,

बारामती-४३३१०२, जि.पुणे.

जन माहिती अधिकारी,
अनेकांत एज्यूकेशन सोसायटी,
तुळजाराम चतंररंग कॉलेज कँपस,
बारामती-४३३१०२, जि.पुणे. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ३.७.२००९
सुनावणीचा दिनांक : ९.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२५.५.०९ व २६.५.०९ रोजी जन माहिती अधिकारी अनेकांत एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे संस्थेच्या कार्यालयातील कर्मचा-यांची नावे, त्यांनी धारण केलेले पद व शैक्षणिक अर्हता, नियुक्तीचा दिनांक व त्यांचे वय इत्यादी माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५प्रमाणे नियुक्त केलेले माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे व हुद्दा, माहितीच्या वेबसाईटचे नाव व अधिनियमाप्रमाणे आवश्यक असलेली सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे काय तसेच संस्थेचे कामकाज व घटनात्मक रचनेच्या संदर्भात सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि.६.४.२०६२ रोजी नोंदणीकरीता दाखल केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत व इतर ६ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते.

२. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२२.६.२००९ रोजी सचिव, अनेकांत एज्युकेशन सोसायटी,बारामती ही अल्पसंख्यांक संस्था माहिती अधिकाराच्या कायद्यात येत नाही अशी आमची धारणा आहे. तथापि, आपण पूर्व सूचना देऊन संस्था कार्यालयात यावे म्हणजे त्यावेळी मा.अध्यक्ष व मा.सचिव उपस्थित राहून आपणास आवश्यक ती माहिती देतील याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२५.६.०९ रोजी आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा त्या पत्राप्रमाणे दि.२९.६.०९ रोजी अध्यक्ष,अनेकांत एज्युकेशन सोसायटी,बारामती यांनी त्याचप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते. अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील दाखल केल्यानंतरसुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे दि.१४.१२.०९ रोजी ३ पत्रे व्हीडीओ कॉनफरन्सींगच्या सुनावणीसंदर्भत दिलेली दिसून येतात. तसेच सदर अपिलाची सुनावणी राज्य माहिती आयोगाच्या पूर्ण खंडपीठाकडे करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती, संस्थेने दिलेल्या त्या संदर्भातील उत्तराच्या संदर्भात सदर अपिलाची सुनावणी ही पूर्ण खंडपीठाने घेण्याची

आवश्यकता नसल्यामुळे मुख्य माहिती आयुक्त यांनी ही सुनावणी दि.९.२.११ रोजी घेतलेली आहे. सुनावणीस अपिलकर्ता तसेच तु.च.महाविद्यालयाचे प्राचार्य व तु.च. महाविद्यालयाचे रजिस्ट्रार हजर होते.

३. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांना सदर संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. तसेच व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे सुनावणी घेणा-या माहिती आयुक्तांनी मुंबई उच्च न्यायालयाने(नागपूर खंडपीठ) याचिका क्र.५२९४/२००८ संदर्भात दिलेल्या निकालाचा गोषवारा देऊन सुनावणी स्थगित केली. तसेच दि.१४.१२.२००९ रोजी मा.मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे अर्जकरुन या अपिलाची सुनावणी पूर्ण पीठाकडे घेऊन युक्तीवाद करण्याची विनंती केली. तसेच या सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाचा अभ्यास केला असता त्या निर्णयामध्ये पब्लीक ट्रस्टना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होण्याकरीता अधिनियमात नमुद केलेल्या अटींपैकी एक अट(किमान) पूर्णकेल्याचे दाखवून दिल्यास सदर संस्थेस अधिनियम लागू होऊ शकतो असे प्रतिपादन केले. त्याप्रमाणे संस्थेस राज्य शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोग,विद्यापीठ यांचेकडून प्रत्यक्ष अनुदान किंवा भरघोस अर्थसहाय्य मिळत असल्याबाबत युक्तीवादाच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिल्यावरुन प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्याप्रमाणे संस्थेच्या नोंदणीकृत घटनेप्रमाणे अनेकांत एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे उद्दिष्ट राष्ट्र उभारणीकरीता विविध प्रकारचे शिक्षण देण्याकरीता शाळा,महाविद्यालय, वसतीगृह, पाठशाळा,वृत्तपत्र,ग्रंथालये व संशोधन संस्था स्थापन करणे आणि त्या चालविणे हे आहे(Appendix-I) म्हणजेच संस्थेने स्थापन केलेल्या आणि शासनाकडून दरवर्षी वेतन व वेतनेतर खर्चाकरीता भरघोस अनुदान प्राप्त करणा-या महाविद्यालयांचे संचालन व व्यवस्थापन हा संस्थेच्या नियमित कामकाजाचा एक भाग असल्याने सदर महाविद्यालयांना मिळणारे भरघोस अर्थसहाय्य हे एक प्रकारे संस्थेला मिळणारे अर्थसहाय्यच आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीतर्फे बारामती व जयसिंगपूर येथे प्रत्येकी एक अनुदानित वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय चालविले जाते. ही महाविद्यालये व त्यांचे कामकाज संस्थेच्या कारभाराचा एकात्मिक व अविभाज्य घटक असल्यानेच ही दोनही महाविद्यालये वेगवेगळया विद्यापीठांशी संलग्न असली तरी एका महाविद्यालयात नियुक्त केलेल्या कर्मचा-याची संस्था दुस-या महाविद्यालयात बदली करु शकते(Appendix-V) याचाच अर्थ संस्थेच्या महाविद्यालयातील नियुक्त कर्मचारी हे केवळ त्या महाविद्यालयाच्या नव्हे तर संस्थेच्या सेवेतील कर्मचारी असून त्यांच्या वेतनापोटी शासनाकडून मिळणारे अनुदान हे संस्थेला मिळणारे अप्रत्यक्ष अर्थसहाय्य आहे. संस्थेची उपरोक्त दोन्ही अनुदानीत महाविद्यालये सुरु करतांना शासन व विद्यापीठ यांचेकडे परवानगी व संलग्नता याकरीता

केलेले अर्ज हे संस्थेतर्फे केले गेले आहेत व नियमानुसार परवानगी संस्थेच्या नावाने आहे त्यामुळे संस्था व सदर महाविद्यालये यांना स्वतंत्र मानणे अतार्किक आहे. राज्य शासनातर्फे चेअरमन, अनेकांत एज्युकेशन सोसायटी या नावाने महाविद्यालय चालविण्याकरीता जयसिंगपूर येथे अंदाजे एक लाख चौ.मि.भुखंड रीवार्डने दिला असून त्या भुखंडावर महाविद्यालयाकरीता विविध इमारती संस्थेने उभारल्या आहेत. सदर भुखंड महावीर को.ऑप.बँक या वित्त संस्थेकडे संस्थेने महाविद्यालयाकरीता रु.२५,००,०००/- इतके कर्ज घेण्याकरीता संस्थेच्या नियामक मंडळाच्या ठरावानुसार घेतले होते. सदर कर्जाची परतफेड महाविद्यालयाकडून नियत वेळेत न झाल्याने न्यायालयीन प्रक्रिया होऊन उपरोक्त भुखंडाचा काही भाग व त्यावरील इमारत वित्त संस्थेच्या ताब्यात दिली गेली होती. यावरुन महाविद्यालय व संस्था निरनिराळे नसुन एकच आहेत(Appendix-XIII). संस्थेच्या बारामती येथील महाविद्यालयाकरीता राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ यांचे अनुदानातून बांधलेल्या सर्व इमारती संस्थेच्या नावावर असलेल्या भुखंडावर असून त्या इमारतींची मालकी संस्थेकडे आहे व या इमारतींमधून संस्थेस भाडयाचे उत्पन्न मिळते तसेच वसतीगृह विद्यार्थ्यांचे भाडेसुध्दा संस्थेकडे जमा हाते व ते संस्थेच्या उत्पनाचे साधन आहे हे भुखंडाचा सातबारा(Appendix-VI) संस्थेच्या बारामती स्थानिक समितीचे (संस्थेच्या घटनेप्रमाणे स्थापन झालेली उपसमिती) अंदाजपत्रक(Appendix-II) महाविद्यालयाचे ऑडीटेड स्टेटमेंट(Appendix-VII)यावरुन सिध्द होते. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ८६ पमाणे संलग्न महाविद्यालयाचा कारभार पाहण्याकरीता स्थापन करावयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद संस्थेच्या अध्यक्षांकडेच असते. तसेच या समितीमध्ये संस्थेच्या सचिवांचा समावेश असतो. या समितीच्या कार्यकक्षेतील तरतुदी पाहिल्या असता महाविद्यालयाकरीता आवश्यक असणा-या अध्यापक व अध्यापकेतर पदांची निर्मिती करणे, महाविद्यालयाचा दर्जा वाढविणे याकरीता केवळ शिफारसी करणे समितीच्या अखत्यारीत असून अंतिम निर्णय करण्याचे अधिकार संस्थेच्या व्यवस्थापनाकडे असल्याचे दिसून येते. हीच बाब महाविद्यालयाच्या अंदाजपत्रकासही लागू आहे(Appendix-XIV) वरील सर्व बाबींचा विचार करता संस्थेतर्फे चालविली जाणारी अनुदानित महाविद्यालये ही संस्थेच्या कारभाराचा एकात्मिक व अविभाज्य भाग असून या महाविद्यालयाचा कारभार हा संस्थेच्या प्रशासनाचाच एक भाग आहे हे स्पष्ट होते.तसेच निरनिराळया शासकीय अनुदान व अर्थसहाय्यातुन उभारण्यात आलल्या इमारती व वसतीगृहांची मालकी संस्थेकडे असून ती या संस्थेच्या उत्पन्नाचा एक प्रमुख स्त्रोत आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(ii) मधील तरतुदी तसेच उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.५२९४/२००८ संदर्भातील निर्णयातील मुद्दा क्र.७ व ८ चे विश्लेषण यांचा विचार केला असता अनेकांत एज्युकेशन

सोसायटी या ट्रस्टला माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो असे त्यांनी ठाम प्रतिपादन केले आहे.

४. त्यावर प्राचार्य तु.च.महाविद्यालय, बारामती यांनी युक्तीवाद केला. वास्तविक अपिलकर्ता यांनी महाविद्यालयाचे माहिती अधिकारी यांना माहिती मागीतली नव्हती. महाविद्यालयाचे माहिती अधिकारी हे प्राचार्य असतात परंतु अपिलकर्ता यांनी संस्थेकडे माहिती मागीतलेली होती व त्यामुळे संस्थेचे पदाधिकारी यांनी आयोगापुढे हजर रहाणे आवश्यक होते. तसे प्राचार्य यांना आयोगाने विचारले असता संस्थेने प्राचार्यांना पाठविले असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. प्राचार्यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांना शासनाचे अनुदान मिळते हे खरे आहे परंतु शासनाचे अनुदान हे प्राचार्य, महाविद्यालय यांच्याकडे वर्ग केले जाते. संस्थेला कोणत्याही प्रकारचे शासनाचे अनुदान मिळत नाही. संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०च्या अंतर्गत तसेच सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत झालेली आहे व त्यामुळे ती सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे. सार्वजनिक विश्वस्त संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान उपलब्ध होत नाही व त्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त संस्थेला शासनाचे अनुदान नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अनेकांत एज्युकेशन सोसायटी ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे असल्यामुळे व संस्थेला कोणतेही प्रत्यक्षअनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी त्यांना लागू होत नाहीत. तसेच संस्थेस अल्पसंख्यांक संस्थेचा दर्जा असल्यामुळेसुध्दा अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना लेखी प्रतिज्ञापत्रात सादर केल्याप्रमाणे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान मिळते व ते पर्यायाने संस्थेलाच मिळत असते. सदर निर्णयाच्या संदर्भात प्राचार्य यांनी पुढे युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, शिक्षण संस्था असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचे शासनाकडून अनुदान मिळत नाही. मात्र पुढे अपिलकर्ता यांनी पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की. संस्थेस विद्यापीठ अनुदान आयोगाकडून इमारतीच्याकरीता अनुदान मिळाले आहे तसेच इतर अनुदान जे मिळते ते सुध्दा संस्थेलाच मिळते याबद्दल मात्र प्राचार्यांनी तशा प्रकारची व्यवस्था आहे हे मान्य केले.

६. कोणतीही शाळा किंवा महाविद्यालय शासनाकडून मंजूर होताना माध्यमिक शाळासंहिता तसेच विद्यापीठ अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे शाळा किंवा महाविद्यालय हे संस्थांना मंजूर होते. कोणत्याही व्यक्तीला वैयक्तीकरित्या शाळा किंवा महाविद्यालय शासनाकडून मंजूर होत नाही. माध्यमिक शाळासंहिता यामध्ये शाळा मंजूर करण्याच्या

संदर्भात ज्या तरतुदी आहेत त्यामध्ये मान्यतेच्या शर्ती दिलेल्या आहेत व त्यामध्ये नवीन शाळा सुरु करणे याबाबतच्या तरतुदी केलेल्या आहेत.

७. शाळा सुरु करण्यासाठी मान्यतेच्या शर्ती, मान्यता नाकारणे, काढून घेणे या संदर्भात प्रकरण २ मध्ये तरतूद केलेली आहे त्यामध्ये २.१ मध्ये शाळा सुरु करण्यासाठी व्यवस्थापनाने अर्ज केला पाहिजे अशी तरतूद आहे.मान्यतेच्या शर्तीमध्ये मुद्दा क्र.३.२ मध्ये एकूण १६ शर्तींची व्यवस्थापनाने पूर्तता केली असली पाहिजे अशी तरतूद दिलेली आहे. त्याचप्रमाणे तात्पुरती व कायम मान्यता या बद्दलसुध्दा तरतूद करण्यात आली आहे. मान्यता नाकारणे, मान्यता काढून घेणे याबद्दलचीसुध्दा तरतूद आहे. जेव्हा शाळेच्या व्यवस्थापनात बदल करण्याचे योजले असेल तेव्हा असा बदल करण्यासाठी उपसंचालकांची पूर्व परवानगी मिळवली पाहिजे तसेच मान्यताप्राप्त शाळेचे एका व्यवस्थापनाकाडून दुस-या व्यवस्थापनाकडे हस्तांतर पोटनियमांच्या अधीन राहील. वेतन व वेतनेतर अनुदान या संदर्भात शासन व सहाय्यक अनुदानासाठी पात्रता या संदर्भात मुद्दा क्र.८६.२ मध्ये खाजगी मालकीच्या शाळा(म्हणजे १९६० चा संस्था नोंदणी अधिनियम क्र.२१ किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था १९५० किंवा शासनाने याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी न केलेल्या शाळा जातीय शाळा आणि शासनाने बिगर सहाय्यक अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा या लोकनिधीतून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असणार नाहीत अशी तरतूद आहे. मान्यताप्राप्त शाळा मंजुरी प्राधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार निधी उपलब्ध असेल तर खालीलप्रकारचे अनुदान मिळण्यास पात्र असतील. मात्र ज्या संस्था अशा शाळा चालवित असतील त्या संस्थांची वेळोवेळी दुरुस्त केलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी केलेली असली पाहिजे.१)वेतन अनुदान,२) वेतनेतर अनुदान,३)इमारत अनुदान,४) शासन वेळोवेळी मंजूर करेल अशी इतर अनुदाने त्याकरीता पात्र असतील. सहाय्यक अनुदानासाठी नोंदणीकरीता करावयाचे अर्ज मुद्दा क्र.९३.१ मध्ये विभागाकडून सहाय्यक अनुदान घेऊ इच्छिणा-या शाळांनी त्यांना ज्या वर्षी अनुदान मिळावयाचे असेल ते शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या किमान ६ महिन्यांपूर्वी समुचीत प्राधिका-यांकडे परिशिष्ट २१ मध्ये दिलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे.प्राप्तानुदानित शाळांच्या यादीमध्ये एकदा शाळा समाविष्ट करण्यात आली म्हणजे त्या शाळेस ती जोपर्यंत मान्यतेच्या अटी पूर्ण करीत राहील आणि इतर नियमांचे व विभागांतर्गत वेळोवेळी दिलेल्या सचनांचे पालन करीत राहील तोपर्यंत वर्षावर्षाला अनुदान मिळत राहील.

यावरुन अनुदानेतर शाळांच्या संदर्भात व्यवस्थापनानेच अर्ज करावयाचा असल्यामुळे अनुदान हे संस्थेलाच मिळते असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच खजगी प्राप्तानुदान शाळांच्या व्यवस्थापनाने व शाळेची इमारत बांधण्याकरीता किंवा शाळेच्या

इमारतीचा विस्तार करण्याकरीता अनुसुचित बॅकांनी देऊ केलेल्या कर्जाकरीता शासनाची हमी देण्याच्या योजनेबाबतचा नियमसुध्दा दिलेला आहे व त्याप्रमाणे शासन त्याकरीता हमी देत असते.महाविद्यालयाच्या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४च्या कलम ८२ च्या पोटकलम(३) प्रमाणे नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता व्यवस्थापनाने अर्ज करावा अशी तरतूद आहे. त्याप्रमाणे कलम ८१ मध्ये मान्यता देण्यासंदर्भात व्यवस्थापनालाच महाविद्यालय मंजुर होते अशी तरतूद आहे आणि विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय व्यवस्थापनास कोणताही बदल करता येत नाही अशीही तरतूद त्यामध्ये आहे. तसेच सदरच्या महाविद्यालयामध्ये किंवा शाळांमध्ये शिक्षक व कर्मचारी यांची नियुक्ती तसेच त्यांना काढून टाकणे किंवा पदोन्नती देणे किंवा बदली करण्याचे अधिकार हे संस्थांनाच आहेत व संस्था हे अधिकार उपभोगतात. थोडक्यात कोणतीही शैक्षणिक संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०च्या तरतुदीप्रमाणे नोंदणीकृत असल्याशिवाय शाळा किंवा महाविद्यालय मंजूर होत नाही व शाळा किंवा महाविद्यालयास शासनाचे अनुदान असले तर ते अप्रत्यक्षपणे संस्थेला शाळा किंवा महाविद्यालय चालविण्यासाठीचे अनुदान असते व त्यामळे कोणत्याही अनुदानित शैक्षणिक संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होत नाही असे म्हणता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ३(ज) मध्ये "सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ" समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे व त्यामध्ये (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्यांच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय (दोन)समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशी अशासकीय संघटना यांचा समावेश होतो.

वरील व्याख्यांप्रमाणे व अपिलकर्ता यांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे तसेच प्राचार्य यांनी मान्य केल्याप्रमाणे अनेकांत शिक्षण संस्थेस शासनाकडून विद्यापीठ अनुदान मिळते याबाबत कोणतेही मतभेद दिसून येत नाही. संस्थेतर्फे याचिका क्र.५२९४/०८ मधील निर्णय हा एका धार्मिक मठाच्या संदर्भात निर्णय आहे व सदरचा धार्मिक मठ हा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०प्रमाणे नोंदणीकृत असून सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे परंतु त्यास शासनाचे अनुदान नही व त्यामळे मा.उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी त्यास लागू होणार नहीत असा निर्णय दिलेला आहे. परंतु त्याच निर्णयामध्ये परि.८ मध्ये Any person seeking to establish that a particular trust is covered by the provisions of the

Right to Information Act will have to first prove that it is a public trust created by Government or Parliament or is substantively financed by the Government असे नमूद केलेले आहे व त्याप्रमाणे सदरच्या अनेकांत शिक्षण संस्थेस महाविद्यालय व शाळा चालविण्याकरीता शासनाकाडून अनुदान मिळते असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपूर यांच्यापुढील याचिका क्र.५०६७/०९मध्ये न्यायमूर्ती श्री.एस.ए. बोबडे आणि न्यायमूर्ती श्री.ए.बी.चौधरी यांच्या खंडपीठाने दि.१०.८.२०१० रोजी शिक्षण प्रसारक मंडळ कामठी विरुध्द स्टेट इन्फर्मेशन कमिशन नागपूर बेंच, नागपूर, श्री.भुषण केशवराव तिजारे व सहशिक्षण संचालक, नागपूर विभाग,नागपूर या याचिकेमध्ये परि.७ मध्ये खालीलप्रमाणे निरिक्षण केलले आहे.

In the instant case, it is not in dispute that the said College run by the petitioners - Society is receiving grants-in-aid and the grants-in-aid received by the College from the Government are managed by the Society and its College. We, therefore, hold that the Non-Government Schools/Colleges/institutions receiving grants-in-aid either from the State Government or the Central Government are fully covered by the definition of public authority and such Schools/Colleges are covered by the provisions of the Right to Information Act,२००५.

वरील निर्णयाप्रमाणे याचिकाकर्ता यांची याचिका फेटाळण्यात आलेली आहे याचा अर्थ संस्थेस शाळा किंवा महाविद्यालय चालविण्याकरीता अनुदान मिळते त्यामुळे अनेकांत शिक्षण संस्थेचासुध्दा सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत समावेश होतो व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. त्यामुळे संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ५(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी नियुक्त करणे तसेच कलम १९(१)प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहील व त्यानंतर अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२५.५.०९, २६.५.०९च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून अनेकांत शिक्षण संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात व हा निर्णय मिळाल्यापासून पांच दिवसांचे आत अनेकांत शिक्षण संस्था,बारामती मध्ये

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) अन्वये जन माहिती अधिकारी तसेच कलम १९(१) अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करावी.

२) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती केल्यानतर संबंधित जन माती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.२५.५.०९ व २६.५.०९च्या अर्जांच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची पत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ११.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७७/अपील क्रमांक ६३०३/२०१०

श्री. रसिकलाल रतीलाल गांधी,
द्वारा वरुन कॉंप्युटर सर्व्हीस, पांजरपोळ कंपाऊंड,
जैन देवळाजवळ, मुंबई-४. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(इ) मुंबई,
गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,
बंद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग को.ऑप.हौ.सो.,
एम.एम.आर.डी.ए. बिल्डिंग, रुम नं.३१५/३१६,
वडाळा, मुंबई-४०००३१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(पी वार्ड) यांच्याकाडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७३(IAB) व ७८, नियम १९६१ प्रमाणे नियम ५८(ए)च्या संदर्भात निवडून आलेल्या समितीने बॉंड दिलेले आहेत किंवा नाहीत याची माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३१.८.२०१० रोजी सदर कारणास्तव प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपील

अंशतः मान्य करण्यात येत असून उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग यांनी अर्जदारांना बंधपत्राची माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.१८.१.२०१० रोजी संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार योग्य ती वैधानिक कार्यवाही करण्यात येत आहे असे असे अपिलकर्ता यांना कळविले आहे. असे असले तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दि.११.१०.२०१० रोजी दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संस्थेच्या संचालक मंडळावर कारवाई झालेली असल्यामुळे आता त्यांची काहीही तक्रार राहिलेली नाही व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७५/अपील क्रमांक ६३०१/२०१०

श्री. आय.पी.योगींदरन,
सहा.अभियंता,इमारत विभाग(दक्षिण) विभाग,
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उप्रम(बृहन्मुंबई महानगरपालिका),
मुंबई सेंट्रल बस डेपो, मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा चिफ इंजिनिअर(सिव्हील),
बेस्ट उपक्रम, इलेक्ट्रीक हाऊस,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००८.

जन माहिती अधिकारी,
सिव्हील इंजिनिअर डिपार्टमेंट,
बेस्ट उपक्रम, इलेक्ट्रीक हाऊस,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.६.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, स्थापत्य यांत्रिकी विभाग, बेस्ट यांच्याकडे राज्याच्या आरक्षण धोरणाच्या संदर्भात नियुक्ती व पदोन्नतीबाबत उप अभियंता, ग्रेड जी/जी-४ च्या संदर्भात एकूण ९ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते.सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.६.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांना रु.१८४/- डॉक्युमेंट चार्ज व रु.२५/- पोस्टाचे चार्ज असे एकूण रु.२०९/-चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी भरणा केल्यानंतर त्यांना दि.१२.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.८.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व सुनावणीत ठरल्याप्रमाणे दि.२७.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तरीसुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी अपिलकर्ता यांना उपरोक्त माहिती दिली व त्याचप्रमाणे काही माहिती देतांना काही कालावधी लागेल असे त्यांना पत्राद्वारे कळविले होते. तरीसुध्दा त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतु अपिलकर्ता यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध झालेली माहिती दि.३.१२.२०१० नुसार त्यांना हस्तपोच केलेली आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपिल निकाली काढण्यात येतआहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९९७/तक्रार क्र. १६१५/का.१

श्री. वसंत आदितीरावितार,
ग्रीन हिल को.ऑप.हौ.सोसायटी, २५-बी/४०२,

नवीन दिंडोशी,गोरेगाव(पूर्व),
मुंबई-४०००६५. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,
अतिक्रमण व निष्कासन,
अतिक्रमण यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, तळमजला,
रुम नं.६८, वांद्रे(पूर्व),
मुंबई-४०००५१. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १०.१०.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी त्यांच्या अपिल क्र.५४११/०८च्या दि.३.७.२०१० च्या आयोगाच्या निर्णयाप्रमाणे व दि.२२.२.२०१० च्या अपिल क्र.५४११/०२ व तक्रार क्र.७२४/०२ मधील निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माीिती आयोगाकडे दि.११.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अपिलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.१०.०९ रोजी तक्रार केली होती. परंतु त्या तक्रारीच्या निर्णयाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी सध्याची तक्रार आयोगाकडे केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना वेळोवेळी पकरणातील सर्व माहिती उपलब्ध करुन दिलली आहे. दि.७.११.०९ च्या प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशात नमूद केल्यानुसार -

१) उपजिल्हाधिकारी(अति/निष्का)अंधेरी यांच्या दि.१८.४.०६ च्या सुनावणीच्या नोटीसीस अनुसरुन संचिका डी.नं.२५६ आढळून न आल्याने त्याच प्रकरणात श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दि.१६.३.०९ रोजी सादर केलेला अर्ज मा.अप्पर जिल्हाधिकारी(अति./निष्का.)पश्चिम उपनगरे यांजकडून दि.१०.७.०९ रोजी प्राप्त झालेल्या व त्यासोबत असलेल्या पुराव्याच्या आधारे दि.१७.११.०९ रोजी डी.नं.२५६ बाबतीत अपात्रतेचा आदेश पारीत केला व त्याची पोच तक्रारदाराने दि.१८.११.०९ रोजी स्वाक्षरीसह घेतलेली आहे. तद्नंतर सदर आदेश श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अंतर्गत मा.प्रशासन व आयुक्त कोकण विभाग यांजकडे आव्हान करुन स्लम अपिल क्र.९७३/०९ दि.६.१.२०१० रोजी दाखल केले आहे. अपिलाचा निर्णय प्रलंबित आहे.

२) अपिलार्थी यांच्या म्हणण्यानसार उपलोकआयुक्त यांजकडे आवक क्र.४९४८/२००९ दि.२७.१०.०९ व राज्य माहिती आयोग यांजकडे आवक क्र.४४७२/०९ व दि.२७.१०.०९ रोजी केलेला अर्ज व उक्त प्रकरणाबाबत या कार्यालयाकडे कोणताच पत्रव्यवहार प्राप्त झालेला दिसून येत नाही.

३) मा.राज्य माहिती आयोगाच्या दि.२२.२.२०१० च्या आदेशामध्ये अपिलार्थी यांनी केलेल्या कंटेम्ट अर्ज दि.१७.५.१० ची सुनावणी दि.२.७.२०१० रोजी झाली. त्या अनुषंगाने मा.राज्य माहिती आयोग यांनी दिलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थी यांना दि.८.७.२०१० रोजी यथा योग्य माहिती दिली व त्याची प्रत आयोगास सादर करण्यात आली आहे. सदर माहिती दिल्यानंतर पुन्हा अपिलार्थी यांना या कार्यालयातून दि.९.१२.२०१० चे पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणाची संचिका आढळून आल्याचे कळविण्यात आले व अपिलार्थी दि.३०.९.२०१० रोजी समक्ष कार्यालयात आले असता त्यांना त्यांचे माहिती व अवलोकनार्थासाठी डी.नं.२५६ बाबतची संचिका दाखविण्यात आली व त्यांना संचिकेतील कागदपत्रांची आवश्यकता असल्यास ते प्राप्त करुन घ्यावे असे दि.९.१२.२०१० चे पत्राने कळविण्यात आले आहे. माहिती करीता श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी या कार्यालयात दाखल केलेले कागदपत्रे सोबत जोडत आहे(जोडपत्र-अ)

४) या प्रकरणाची वेळोवेळी माहिती अपिलार्थी यांना या कार्यालयातून देण्यात आली आहे. दि.३०.९.२०१० रोजी संचिकेचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास आले की, अपिलार्थी आपल्या अर्जाद्वारे ज्या व्यक्तीसंदर्भात माहिती मागत आहेत त्यांना या योजनेचया परि.२ मध्ये अ.क्र.२५४५अनुषंगाने यापुर्वीच पात्र करण्यात आले आहे व श्रीम.सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी सादर केलेल्या पुराव्यातील शिधापत्रिका,मतदान ओळखपत्र,मतदान यादी, विज बिल यांचा तपशील पाहता असे आढळून आले की, श्रीम.सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांचेतर्फे त्यांचे पती श्री.मनोहर परमार हे यापूवी प्रश्नांकित झोपडीसाठी दि.२८.१२.०४ मध्ये पात्र झाले आहेत. माहिती करीता श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशिल सोबत जोडत आहे.(जोडपत्र ब)

५) अपिलार्थी यांच्या अपिल अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी या कार्यालयात तसेच इतर अन्य सतरावर केलेल्या अर्जामध्ये सदरहू प्रकरणात श्री.मनोहर परमार यांना प्रश्नांकित झोपडीची उपरोक्तपणे दाखविण्यात आलेली पात्रतेची बाब(परि.२ मध्ये अ.क्र.२५४५) शासनापासून लपवून ठेऊन यापुर्वी पात्र झालेल्या झोपडीचीच त्याच पुराव्याच्या आधारे स्वतंत्र झोपडी असल्याचे भासवून आणखी एक झोपडी पात्र करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

असे असले तरी तक्रारदार यांना दि.८.७.२०१० रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती चुकीची आहे असे पुन्हा तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामध्ये उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी(अति./निष्का.) अंधेरी यांनी दि.१८.७.२००४रोजी आपणास पाठविलेल्या नोटीसबाबतची नस्ती या कार्यालयात आढळून येत नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणले व दि.१८.७.०४ ही तारीख चुकीची आहे व त्यांनी जी माहिती मागीतली होती ती २००६ या वर्षातील असल्यामुळे त्यांना दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे व त्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे नस्ती आढळून आली नव्हती व त्याप्रमाणे तक्रारदार यांना कळविण्यात आले होते परंतु अनवधानाने त्या ठिकाणी तारीख चुकीची घालण्यात आली आहे. मात्र दौलतनगरच्या संदर्भातील नस्ती आढळून आली व त्याबद्दल तक्रारदार यांना कळविण्यात सुध्दा आले व त्यात जी टिप्पणी आहे ती टिप्पणी मान्य करण्यास कोणत्याही अधिका-याची हरकत नाही व त्यामुळे आदेश काढण्यात आले नसावेत व नस्तीमध्ये सुध्दा ते

आदेश नाहीत व याबाबतचे अवलोकन तक्रारदार यांना दिलेले आहे. त्यामुळे त्यांना जे आदेश अपेक्षित आहेत ते अद्यापही नस्ती आढळून आल्यावरसुध्दा त्यामध्ये दिसून येत नाहीत. असे असल्यास तक्रारदार यांना त्याप्रमाणे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१)तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात अपिल क्र.१५११/०२, तक्रार क्र.७२४/०२ मधील निर्णयाप्रमाणे आदेश उपलब्ध असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन द्यावी किंवा उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे त्यांना कळविण्यात यावे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यातयावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०११/८३९/तक्रार क्र. २/का.१

श्री. नवीन शामराव परब,
मुळगांवकर बिल्डिंग, १ला मजला,
७ टोपीवाला लेन,लॅमिंग्टन रोड,
मुंबई-४००००७. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,
करनिर्धारण व संकलन खाते, डी विभाग,
महापालिका कार्यालय इमारत, ४था मजला,
जोबनपुत्र आवार, ग्रँट रोड, नाना चौक आवार रोड,

मुंबई-४०० ००७. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ९.४.२०१०

तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी दि.९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दि.१५.३.२०१० च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दि.३०.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जी फीची आकारणी केलेली आहे त्या आकारणीच्या संदर्भात ती अवाजवी आहे अशी तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

तकारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, कोणत्याही कागदपत्रांचे निरिक्षण करण्याकरीता रु.२३०/-(रु.१८०/- + रु.५०/-) प्रमाणित करण्याची फी व अशाप्रकारेच प्रति प्रॉपर्टी पर इअर जी फी आकारली जाते ती अवाजवी आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे निरिक्षणकरण्याकरीता सुरुवातीच्या १ तासाला कोणत्याही प्रकारचे शुल्क नाही व त्यानंतरच्या प्रत्येक १५ मिनिटांना रु.५/- इतके शुल्क आहे असे असतांना उपलब्ध झालेली माहिती प्रमाणित करुन देण्याकरीता कोणत्याही प्रकारचे शुल्क त्या नियमात नाही व त्यामुळे प्रमाणित करण्याकरीता रु.५०/- आकारणी करणे योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने जे परिपत्रक तयार केले आहे त्या परिपत्रकाप्रमाणे फी आकारणी करण्यात येते परंतु, सदरच्या परिपत्रकाची प्रत त्यांनी सादर केलेली नाही. तसे जरी असले तरी सक्षम सार्वजनिक प्राधिकरणाशिवाय कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने महाराष्ट्र माहतीचा अधिकार अधिनियम २००५मध्ये नमूद केलेली प्रमाणित फी घेणे संयुक्तिक राहील व तसे आदेश सुध्दा मुख्य माहिती आयुक्त यांनी अपिल क्र.२१५१/०२, २९७७/०२, ३५२/०२, २७७/०२ मध्ये दि.९.७.२०१० रोजी दिले आहेत.

महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जे फी आकारणीचे नियम केले आहेत किंवा परिपत्रक काढले आहे त्या संदर्भात सर्वच अर्जदारांकडून आयोगाकडे तक्रार केली जाते. त्याकरीता पुन्हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त/उप आयुक्त यांना तक्रारीच्या संदर्भात सुनावणीस आयोगापुढे उपस्थित रहाण्याकरीता दि.२.२.२०११ रोजी आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढण्यात आली होती.परंतु त्या दिवशीसुध्दा संबंधित उपआयुक्त व अतिरिक्त आयुक्त सुनावणीस हजर न राहता त्यांनी कनिष्ठ अधिका-यांना आयोगाच्या कार्यालयात सुनावणीस उपस्थित रहाण्याकरीता पाठविले. असे असल्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये निर्णय होइपर्यंत या संबंधित तक्रारदारास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.१५.३.२०१०च्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ३०.३.२०१० रोजी जी खर्चाची आकारणी कळविली आहे ती रद्द करण्यात येऊन त्यांना त्यांच्या दि.१५.३.२०१० च्या अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी..

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३००८/तक्रार क्र. १५८४/का.१

श्री. एरॉल सिक्वेरा,
३ए, पृथ्वी निवास, पभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबइ-४०००५५. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महापालिका आयुक्त कार्यालय,
पाणी विभाग, एच/पूर्व वार्ड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २५.११.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२४.८.०९ च्या अर्जासोबत दिलेल्या परिशिष्टाच्या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही या करीता राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, ते वारंवार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित होतात परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना दि.१५.२.२००९ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु पुन्हा तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या माहितीच्या अर्जासोबत दि.२८.१२.०७ रोजी जी तक्रार केली होती त्या तक्रारीची प्रत जोडण्यात आली आहे व त्याप्रमाणे मुद्दा क्र.५ च्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. प्रत्यक्षात तक्रारदार यांना माहिती उपलब्ध होण्यापेक्षा त्यांच्या इमारतीमधील नळ जोडणीच्या संदर्भात व त्यांच्या घराच्या गच्चीवर जो पाईप दिलेला आहे तो बंद न करता तो अजूनही सुरु आहे व त्या संदर्भात काय कारवाई केली याबद्दलची त्यांना माहिती हवी आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, अवैध नळ जोडणी घेतलेली आहे व त्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता हे कोणतीही कारवाई करीत नाहीत व हीच त्यांची मूळ तक्रार आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असलली माहिती मिळवता येते परंतु कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन ती दिली जात नाही. त्यामुळे अवैध नळ जोडणीच्या संदर्भात आयोगाकडून कारवाई करुन मिळावी असे त्यांचे म्हणणे असल्यास आयोग हे तक्रार निवारण केंद्र नाही. असे असले तरी तक्रारदार यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.२४.८.०९ रोजीच्या अर्जासोबत २८.१.२००७ रोजीच्या दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात मुद्दा क्र.५ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३२६६७/तक्रार क्र. १२४४/का.१

श्री. बालचंद्र पिल्लाई जी.,
सन अँड सँड अपार्टमेंट,
२रा मजला, फ्लॅट नं.१,
जिल हिल बार जवळ, वाड चौकी,
नानी दमन, दमण-३९६ २१५. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा जनरल मॅनेजर,
महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन,
वाहन व्यवहार भवन, जेबीबी मार्ग, मुंबई. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २७.५.२००८
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१९.६.०७च्या अर्जान्वये माहिती उपलब्ध झाली नाही तसेच दि.२५.३.०८ च्या अपिल व तक्रारीच्या संदर्भातसुध्दा चुकीची माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकड दि.१३.६.०८ रोजी तक्रार केलेली आहे. तक्रारदार आज गैरहजर आहेत. गैरतक्रारदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये तक्रारदार यांना

दि.१३.३.०८ रोजी जनरल मॅनेजर(एस अँड पी) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर पुन्हा दि.२०.६.०८ रोजी मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती त्या संदर्भातच उपस्थित केले आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा दि.२०.६.०८ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.ज्या अर्थी तक्रारदार गैरहजर आहेत त्याअर्थी त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/२९९४९/तक्रार क्र. १०९८/का.१

श्री. जयेश रतिलाल गंगर,
सी-१०१, प्रभात को.ऑप हौ.सो.लि.,
एस.पी.मुखर्जी रोड, ब्राम्हण सभेसमोर,
डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त,
ठाणे शहर, ठाणे. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १२.११.२००७
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार गैरहजर आहेत,गैरतक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार यांनी दि.१२.११.०७ रोजी त्यांच्या दि.८.१२.०७च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते. सदचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पोलीस उप अधिक्षक,गृह यांनी पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्याकडे हस्तांतरीत केलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते.

गैरतक्रारदार यांनी अर्जदार यांनी केलेल्या अपील अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी/पोलीस उप अधिक्षक(गृह), ठाणे (ग्रामिण) यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी दि.८.१२.०७ रोजी माहिती अधिकारान्वये केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही पोलीस आयुक्त ठाणे यांच्या कार्यक्षेत्राशी निगडीत असल्याने सदरचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पुढील कार्यवाहीसाठी त्यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याबाबत अर्जदारास कळवून अर्ज मा.पोलीस आयुक्त कार्यालय ठाणे(शहर) यांच्याकडे पाठविला असल्याचे दि.८.१२.२०१०च्या पत्रान्वये कळविले. कार्यालयाने उपलब्ध अभिलेख पडताळून पाहिले असता अर्जदार यांचा दि.८.१२.०७

रोजीचा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही, मात्र दि.२०.१.०९ रोजी या कार्यालयात पोस्टाने पाठविलेला अर्ज दि.१२.२.०९ रोजी प्राप्त झाला, सदरची माहिती संकलीत करुन दि.३.३.०९ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा दि.१७.९.०९ रोजी रजिस्टर पोस्ट द्वारा केलेला अर्ज दि.१९.१०.०९ रोजी कार्यालयात प्राप्त झाला. तसेच अर्जदार यांनी शासकीय माहिती अधिकारी ठाणे(ग्रामिण) यांच्या कार्यालयात दि.२०.८.०९ रोजी केलेला अर्ज दि.२०.१०.०९ रोजी त्यांच्याकडे प्राप्त होऊन तो दि.२४.१०.०९ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झाला. सदरच्या दोन्ही अर्जाची माहिती सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक डोंबिवली पोलीस स्टेशन यांच्याकडून संकलीत करुन सदर माहिती अर्जदार यांनी रजिस्टर पोस्टाने मागणी केलेली असल्याने पोस्टाचे शुल्क रु.२५/- इकडील कार्यालयास भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कार्यालयाने जावक क्र.सपोआ/डों./केमाअ/२२३/२२५/०९ दि.१८.११.०९ रोजी तक्रारदारास कळविले होते. परंतु तक्रारदार अद्यापपर्यंत इकडील कार्यालयात हजर झाले नाहीत अथवा माहिती टपालाने पाठविण्यासाठी येणारा खर्च त्यांनी भरलेला नाही. त्यामुळे माहिती इकडील कार्यालयात देण्यास प्रलंबित आहे असा खुलासा आयोगाकडे त्यांनी सादर केलेला आहे. तोंडी युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारदार हे दिलेल्या पत्त्यावर रहात नाहीत त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल

झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३०२५६/तक्रार क्र. १०९७/का.१

श्री. जयेश रतिलाल गंगर,
सी-१०१, प्रभात को.ऑप हौ.सो.लि.,
एस.पी.मुखर्जी रोड, ब्राम्हण सभेसमोर,
डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहापूर विभाग, शहापूर,
जिल्हा ठाणे ग्रामिण. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २५.११.२००७
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार जयप्लास्ट यांनी दि.८.१२.०७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन दि.३.२.०५ रोजी पोलीसआयुक्त यांना दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली याबाबत माहिती मागीतलेली दिसून येते.सदरचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पोलीस उप अधिक्षक(गृह) यांनी उप विभागीय पोलीस अधिकारी शहापूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवलला दिसून यतो. अर्जाच्या अनुषंगाने दि.७.२.०८ रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मुरबाड यांनी अर्जदार यांना माहितीच्या संदर्भात रु.५५/-चा खर्च भरावा अस कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.९.२.०८ रोजी माहितीच्या संदर्भात पुन्हा रु.५५/- चा खर्च भरावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.१५.१२.०८ रोजी खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्या संदर्भातच तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.०७ रोजी तक्रार केली हाती. तक्रारीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे सादर केले असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३१२९/तक्रार क्र. ७१६/का.१

श्री. प्रद्योत गोविंद नवाथे,

राजबाग, ब्लॉक नं.२०५, दालूचंद को.ऑप.हौ.सो.,
भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एफ एन विभाग,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, मुंबई-४००००१. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २६.१०.२००९
जन माहिती अधिकारी, तक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२६.१०.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये दि.२३.६.०९ रोजी अपिल क्र.३७०५/०२ मध्ये अपील अर्जात केलेल्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी तक्रार केलेली दिसून येते. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना कलम ७८ अन्वये नोटीस दिलेली आहे त्या नोटीसच्या प्रती व प्रशासक नियुक्तीची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्दा क्र.३ च्या संदर्भात माहिती अर्जाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांकडे पाठवून अपिलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. मुद्दा क्र.४च्या संदर्भात विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग यांच्याकडे अपिलार्थी यांनी सहकार कायद्यानुसार दाद मागावी असे जे म्हटलेले आहे त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही करणे अपेक्षित नाही.त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे त्यांनी आयुक्त, सहकार यांच्याकडे तक्रार केलेली आहे परंतु सदरची तक्रार त्यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस एफ/ईन वार्ड यांच्याकडे पाठवून दिलेली आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन झालेले नाही. परंतु तक्रारदार यांनी जी कार्यवाही करावयाची आहे ती स्वतंत्रपणे सहकार अधिनियमाप्रमाणे करावयाची आहे असे नमूद केले आहे व त्याप्रमाणे सहकार अधिनियमाप्रमाणे केलेली तक्रार ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीपमाणे होत नसल्यामुळे त्याबाबत केलेल्या कारवाईबाबत कोणतेही अधिकार राज्य माहिती आयोगास नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ३.२.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३७०४७/तक्रार क्र.१२७१व १२७२/का.१

श्री. इंद्र बहादूर शर्मा,
१०, शर्मा चाळ, अंधेरी कुर्ला रोड,
कृष्णा नगर, मरोळ नाका, अंधेरी(पूर्व),
मुंबई-४०००५९. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
श्रीनिवास बगडका ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स,
श्रीनिवास बगडका माग, जे.बी. नगर,
अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ७.१२.२००८
जन माहिती अधिकारी, तक्रारदार अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी व तक्रारदार दोघेही अनुपस्थित आहेत. तक्रारदार यांनी दि.१०.१०.२००८,३.१२.०८ आणि १८.१२.०८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत परंतु तक्रारीसोबत त्यांनी माहितीच्या अर्जाची प्रत दाखल केलेली नाही किंवा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणत्या प्रकारचे उत्तर दिलेले आहे त्याबाबतही काहीही दाखल केलेले नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/ /अपील क्रमांक ६९९३/२०१०

श्री.चंदु तुलसीदास पहुजा,
सी/२०३, ॲटलांटा को.ऑप.हौ.सो.,
एव्हर शाईन नगर, मालाड मार्वे लिंक रोड,
वलनाई व्हिलेज, मालाड(प.), मुंबई-४०००६४. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,
कक्ष क्र.६९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),
मुंबई-५.

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक पी विभाग,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,
कक्ष क्र.६९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),
मुंबई-५ **.** **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ३.४.२०१०
सुनावणीचा दिनांक : १६.१२.२०१०
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी दि.२१.८.०९ व दि.१६.११.०९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात आदेश देण्याची विनंती केली आहे. राज्य माहिती आयोगाकडे अपिल क्र.२०१०/४७०३/०२ या अपिलाची सुनावणी होऊन दि.३०.४.२०१० रोजी निर्णय झाला असून उप निबंधक यांनी प्रशासकास आदेश देऊन अपिलकर्ता यांना निरिक्षणासाठी नस्ती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे दि.१९.५.२०१० रोजी उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९(२)(अ) अन्वये आदेश काढून संस्थेने श्री.सी.टी.पहुजा यांना तत्कालीन निविदांची तपासणी घेण्याकरीता दफ्तर उपलब्ध करुन द्यावे व तसे केल्याचे अर्जदार व या कार्यालयास कळविण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर पुन्हा दि.१३.७.२०१० रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) यांनी उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग यांना, राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२०१० रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन आपल्या कार्यालयाने अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केली नसल्याची तक्रार राज्य माहिती आयोगाकडे केली आहे, तरी मा.राज्य माहिती आयुक्त यांच्याकडील दि.३०.४.२०१०च्या आदेशांच्या अनुषंगाने कार्यवाही करावी असे कळविलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी ॲटलांटा कोऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटीच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या संदर्भात या पूर्वीसुध्दा बंधपत्राच्या प्रति संचालक मंडळाने दाखल केलेल्या आहेत किंवा नाहीत याबद्दलची माहिती मागीतली होती व ती माहिती त्यांना दि.५.१.०९ रोजी उपनिबंधक,सहकारी संस्था यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर सस्थेने इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जे टेंडर्स मागविलेले होते त्या टेंडर्सच्या संदर्भात निरिक्षण करुन माहिती मिळावी याबद्दलसुध्दा माहिती मागीतलेली होती व त्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाचा वर नमूद केल्याप्रमाणे निर्णय आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांनी उपनिबंधक यांच्या आदेशांचे पालन झाले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकाडे तक्रारसुध्दा केलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुन्हा उपनिबंधक

सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी त्यांच्या दि.१९.५.२०१०च्या आदेशांचे पालन संस्थेच्या संचालक मंडळाने केलेले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम ७९(१) प्रमाणे त्यांना जे अधिकार आहेत त्या अधिकाराचा वापर करुन कारवाई करणे संयुक्तिक होईल. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च)व (त्र)प्रमाणे माहिती व माहितीचा अधिकार या दोन्ही संज्ञांच्या व्याख्येप्रमाणे कार्यालयात किंवा माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध होते. कोणत्याही अन्य अधिनियमाच्या अन्वये कारवाई करावयाची असल्यास त्याबाबत राज्य माहिती आयोगास आदेश देण्याची तरतूद नाही. असे असले तरी सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग,मुंबई यांनी त्यांच्या दि.१९.५.२०१० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ७९(२)(अ) प्रमाणे आदेशांचे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करुन अपिलकर्ता तक्रारदार यांना संस्थेची कागदपत्र विशेषत: टेंडर संदर्भातील कागदरत्र निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावीत.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ११.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५५१/अपील क्रमांक ६४४२/२०१०

श्री. अजय माळतकर,
नेताजी सुभाषचंद्र नगर, रुम नं.२,
जेरबाई वाडिया रोड, परेल,भोईवाडा,
मुंबई-४०००१२. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल,
मुंबई-४०००१२.

जन माहिती अधिकारी(वसाहत),
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल,
मुंबई-४०००१२. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(मिळकत)यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते:-

i)Information require of Mr.Nagraj N.Malatkar name in Sub-Tenant occupant of shop N०.२A in Vacant Land Tenancies on Municipal Plot bearing C.S.No.७१४,७१८,७२० of Dadar Naigaon Div.Jerbai Wadia Road, Bhoiwada, Mumbai-४०००१२.

ii) The period of which the information is related from the years १९७२ to २०१०.

iii) Written and Copy of detail require of the information.

iv) Information is required by in person.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलबध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१२.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.७.१२.२०१० रोजी देण्यात आला असून वसाहत अधिकारी श्री.आर.बी.कवटे यांना मागीतलेल्या प्रकरणाच्या संदर्भात दुरुस्ती करुन अहवाल सादर करावा व माहिती आठवडयाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांची मंजुरी घेऊन उपलब्ध करुन द्यावी अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यानी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये निवासी व व्यापारी या तत्वावर जी दोन टेनामेंट्स आहेत त्यामध्ये त्यांची आजी श्रीमती सिताबाई नारायण मालतकर यांचे नाव होते परंतु एफ(द.)/८९१ च्या संदर्भात जे आदेश काढण्यात आले आहेत त्यामध्ये व्यापारी टेनामेंट्सच्या संदर्भात त्यांचे काका श्री.नागराज एन.मालतकर यांचे नाव आलेले आहे व ते कशाच्या आधारावर घेण्यात आले आहे त्याबद्दलची कागदपत्र त्यांनी मागीतलेली आहेत. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये वसाहत अधिकारी श्री.आर.बी.कवटे यांना योग्य त्या चुकांची दुरुस्ती करुन मंजुरी घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्येसुध्दा मिळकत विभागाने चुकीचे ॲनेक्स्चर निर्गमित केलेले आहे व त्यावरुनच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला असूनसुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा कोणतीही कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी ज्या मिळकतीच्या संदर्भात ही माहिती मागीतलेली आहे ती मिळकत ही एसआरए म्हणजेच झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये दि.२८.फेब्रुवारी,२०११ रोजी नष्ट करण्यात येणार आहे व त्यामुळे त्यांना ही माहिती तातडीने उपलब्ध झाल्यास योग्य ती पुढील कारवाई करता येइल असे त्यांनी पुढे सांगितले. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आज सुनावणीस गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कागदपत्र दाखल केलेली नाहीत. त्यामुळे आयोगाच्या नोटीसचा त्यांनी अवमान केलेला आहे. तत्कालीन किंवा विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली

नसल्यामुळे त्यांनी अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे ते दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु आज जन माहिती अधिकार गैरहजर असल्यामुळे व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.१०.२०१०च्या अर्जात मागीतलेली माहिती, प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे दुरुस्त करुन, व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) माहिती व्यक्तीश: उपलब्ध करुन घेण्याकरीता अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्याच्या दिवशी संबंधित विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपिलकर्ता यांच्या दि.११.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व आयोगापुढे ते सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये त्यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचे त्यांचे म्हणणे त्यांनी आयोगापुढे उपस्थित राहून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष मांडावे अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२७/अपील क्रमांक ६३४१/२०११/०२

श्री. विलास आसाराम साळवे,
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स नं.११८८२,
भांडुप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोर(पूर्व),
मुंबई-४०००७७.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोर(पूर्व),
मुंबई-४०००७७. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३०.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),एन वार्ड, घाटकोपर(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन जानेवारी-२००७ ते मार्च-२०१० पर्यंतच्या कालावधीत एकूण किती अर्थसंकल्प निधी मिळाला व त्या निधीतून कोणकोणती कामे करण्यात आली त्या कामांची नावे व पत्ते द्यावेत अशी एकूण १३ मुद्यांमधील माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.४.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी अर्थसंकल्पनिधीतून मागीतलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने व ती वार्ड क्र.१२३,१२४,१२५ मधील असल्याने या कार्यालयाशी संपर्क साधावा व त्यानंतर आपणास हवी असलेली माहिती रु.२/- प्रति प्रत याप्रमाणे पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१३.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.६.२०१०

रोजी देण्यात आला असून अपिलकर्त्यांस १५ दिवसात माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.२०.६.२०१० काही मुद्यांच्या संदर्भात माहिती व इतर माहितीच्या संदर्भातील कागदपत्रांच्या संदर्भात अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु तरीही अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही व कोणताही पत्रव्यवहार मिळालेला नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.४.२०१० रोजी खर्चाचा भरणा करावा असे कळविले व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरसुध्दा खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ही दोन्ही पत्रे त्यांना मिळालेली नाहीत. त्यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली,द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली परंतु उपरोक्त खर्चाचा भरणा करावा याबद्दलची पत्रे मात्र मिळालेली नाहीत. या चारही पत्रांवरील पत्त्याचा विचार केल्यास अपिलकर्ता यांनी दिलेल्या पत्त्यावरच खर्चाचा भरणा करावा ही पत्रेसुध्दा पाठविलेली आहेत व त्यामुळे सदरची पत्रे अपिलकर्ता यांना मिळाली नाहीत असे जरी त्यांचे म्हणणे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी जावक क्रमांक देऊन ती पत्रे दिलेली आहेत. त्यामळे त्यांनी ती पत्रे पाठविलेली आहेत असे गृहित धरावे लागते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागीतलेली असल्यामुळे व त्यास छायांकित प्रतिचा खर्च व उपरोक्त खर्च रु.३१०+ रु.२४८० इतका कळविलेला असल्यामुळे त्यांनी त्या खर्चाचा भरणा करुनच माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती कळविली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२८/अपील क्रमांक ६३४२/२०११/०२

श्री. विलास आसाराम साळवे,
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स नं.११८८२,
भांडुप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,
भांडुप(प.), मुंबई-४०००७८.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,
भांडुप(प.), मुंबई-४०००७८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण) यांच्याकडे अर्ज करुन वार्ड क्र.१०४,१०६,१०७ व १११ बाबत वर्ष २००७ ते मे-२०१० या कालावधीतील कॉंक्रिटीकरण तसेच पेव्हरच्या संदर्भात एकूण १३ मुद्यांवर माहिती पत्रव्यवहार सर्वसाधारण टपालाने करावा असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते.अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती अतिशय विस्तृत व वेळखाऊ स्वरुपाची असून ती संकलीत करुन आपणास देण्यासाठी उपलब्ध कर्मचा-यांचा कामाचा वेळ खर्च पडणार आहे. त्यामुळे एखाद्या विशिष्ट कामाविषयी माहिती हवी असल्यास माहितीचे निरिक्षण करण्यासाठी कार्यालयीन वेळेत आपण सूचना देऊन प्रत्यक्ष भेटावे व आवश्यक असल्यास माहिती सुचित करुन शुल्क भरल्यानंतर सदर माहिती आपणास उपलब्ध करुन देण्यात येइल व इतर दोन मुद्यांच्या संदर्भात प्रति पृष्ठ रु.२/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.२२.६.२०१० रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०.७.२०१० रोजी देण्यात आला असून तो पुढीलप्रमाणे आहे - जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिलेले असल्यामळे सदरचे अपील अमान्य करण्यात आले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना दि.२५.६.२०१० चे पत्र मिळालेले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना टपाल दाखला घेऊनच सदरचे पत्र दिलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना इतर पत्रे मिळतात परंतु खर्चाचा भरणा करावा असे नमूद केलेले पत्र मात्र मिळत नाही. ते आयोगात त्यांच्या सर्वच अपीलांच्याबाबत याप्रकारे सांगत आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्या उत्तराप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१३१/अपील क्रमांक ६३४५/२०११/०२

श्री. संजय अर्जून पटेल,
बस्ताव मिस्किटा चाळ, एम.आय.डी.सी. रोड नं.११,
आर.सी.मारुती शाळेसमोर, अंधेरी(पूर्व),
मंबई-४०००९३. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,के-पूर्व विभाग कार्यालय,
गुंदवली, आझाद रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,के-पूर्व विभाग कार्यालय,
गुंदवली, आझाद रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी के/ई वार्ड, अंधेरी(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन श्री.काळे हे बुधवार दि.९.६.२०१० रोजी १२ ते १.३० वा. के/पूर्व विभाग कायालयातून मुळगांव, अंधेरी प्लॉट नं.७५ या जागेवरील घर तोडण्यास आले होते त्यावेळी म.न.पा.ने कोणती नोटीस दिली व तक्रार केल्याची प्रत देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी ३ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणेही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीस

गैरहजर आहेत. मात्र त्यांचे प्रतिनिधी सुनावणीसाठी हजर आहेत. प्रतिनिधींना सदर प्रकरणाबाबत काहीही माहिती नाही व ते प्राधिकृत नाहीत व त्यांना कागदपत्रांचीसुध्दा माहिती नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. जन माहिती अधिकारी का गैरहजर आहेत याबद्दल त्यांनी आयोगापुढे काहीही कागदपत्र दिलेली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती व प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाप्रमाणे व प्रथम अपील क्र.एसीकेई/१४९३७/बीएफ दि.१७.८.२०१० च्या आदेशाप्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत व प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष करावा व तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१०६/अपील क्रमांक ६२६०/२०१०/०२

श्रीमती धवनी देसाई द्वारा तारिनीबेन देसाई,
नानिक निवास III, तळ मजला, फ्लॅट नं.२,
वार्डन रोड, मुंबई-४०००२६. ..... अपिलकर्ता

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)शहर,
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर-१,
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४०००००८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत व प्रस्ताव) शहरे-१ ई-वार्ड यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलली दिसून येते -

6. Kindly provide each and every correspondence (to and from) between Shyam CHS Ltd (at 51, Bhulabhai Desai Rd, Mumbai 400 026) and your ward office regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's, canopy and proposed Overhead Water Tank.
7. Kindly provide each and every correspondence (to and from) between your ward office and Shri Sachin Wairker (Licensed Surveyor / Architect) regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's. canopy and proposed Overhead Water Tank.
8. Kindly provide each and every correspondence (to and from) between Your ward office and any other Licensed Surveyor / Architect regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's, canopy and proposed Overhead Water Tank to be carried at side Nanik Niwas III (Shyam CHS Ltd) situated at Bhulabhai Desai Rd, Mumbai – 400 026.
9. Kindly Provide each and every correspondence (to and fro) between your ward office and any other person / persons regarding the above mentioned proposal for regularization of repairs at site Nanik Niwas III (Shyam CHS Ltd) situated at Bhulabhai Desai Rd, Mumbai – 400 026.

10. Any other information available on the above "subject matter of information"

सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरिक्षण करण्याकरीता कळविण्यात आले असून निरिक्षणाकरीता कागदपत्रांच्या संदर्भात खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यानी दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांना "S.P.I.O. and Executive Engineer&B.P.)City-१ is directed to get the papers sent to L.O., checked" अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही काही कार्यवाही झालेली नसल्यामुळे व अपिलकर्ता यांना दिलेले उत्तर हे विधी विभागाकडे पाठविण्यासाठी समाविष्ट केले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि.२९.४.२०१० च्या अर्जामध्ये जी माहिती मागीतलेली आहे त्यापैकी मुद्दा क्र.४ मध्ये वार्ड ऑफीसने विभागाबरोबर किंवा अधिका-याबरोबर झालेली दुरुस्ती नियमित करण्यासंदर्भात झालेला पत्रव्यवहार तसेच सज्जा कनापी व पाण्याची टाकी या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत अशी मागणी केली आहे व ती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी पुढे युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की. त्यांना ज्यावेळेस निरिक्षणाकरीता नस्ती उपलब्ध करुन दिली त्यावेळेस त्या नस्तीमध्ये त्यांनी स्वत: दि.३१.१.२०१० रोजी दिलेली तक्रार समाविष्ट केलेली नव्हती. विधी विभागाकडे सदरची तक्रार अभिमत घेण्याकरीता पाठविणे आवश्यक होते ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात आली होती व त्यामुळे प्रथम अपीलीयअधिकारी यांनी सदरची कागदपत्र समाविष्ट करुन विधी विभागाकडे पाठविण्याचे आदेश दिलेले होते. त्यानंतरही सदरची कागदपत्र त्यात समाविष्ट केलेली नाहीत हे निदर्शनास आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जी तक्रार करण्यात आली होती त्या तक्रारीमध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्या मुद्यांच्या संदर्भात विधी विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक होते. परंतु सदरच्या तक्रारीची प्रत ही त्या दुरुस्तीच्या संदर्भात आक्षेप घेणारी असल्यामुळे सदरची प्रत विधी विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आली नाही व हे मुद्दाम करण्यात आले आहे असे त्यांनी

आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुनच अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात त्यांनी जी माहिती मागीतलेली होती त्यामध्ये सदरच्या तक्रारीचा समावेश नसल्यामुळे त्या तक्रारीची प्रत अद्यापपर्यंत त्यांना उपलब्ध झालेली नाही. आजही त्या नस्तीमध्ये ती नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात निरिक्षणाकरीता ज्यावेळेस त्यांना नस्ती उपलब्ध करुन दिली त्यावेळेस सदरच्या तक्रारीची प्रत आढळून आली नाही असे त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले होते. वास्तविक कोणत्याही इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जी नस्ती तयार होते त्या नस्तीमध्ये त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे् ही समाविष्ट केली जातात. सदरच्या दुरुस्तीच्या संदर्भातील नस्ती ही पूर्वी तयार केलेली आहे व अपिलकर्ता यांनी दि.३१.१.२०१० रोजी जी तक्रार केलेली आहे ती तक्रार ही स्वतंत्रपणे दिलेली आहे. त्यामुळे ती त्या नस्तीमध्ये समाविष्ट झाली नसावी. परंतु त्यावर पुन्हा अपिलकर्ता यांनी सदरची तक्रार ही नस्तीमध्ये समाविष्ट झालेली आहे या संदर्भात त्यांनी महानगरपालिकंच्या कार्यालयाकडूनच पोच मिळाली आहे व त्यावरुनच सदरच्या तक्रारीची प्रत ही जाणीवपूर्वक त्या नस्तीमध्ये समाविष्ट केली गेली नाही असा त्यांचा आरोप आहे व त्याप्रमाणे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये - Missing papers to be put back - reasons/notings why they were out असा उल्लेख केलेला आहे. परंतु त्यामध्ये त्यांनी ३१.१.२०१० रोजी दिलेल्या तक्रारीचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही व तरीही त्यांनी जाणीवपूर्वक सदरची तक्रारीची प्रत नस्तीमध्ये ठेवण्यात आलेली नाही या कारणाकरीता जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी आयोगाकडे विनंती केलेली आहे. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कोणत्याही इमारतीच्या दुरुस्तीच्या संबंधीची जी नस्ती असते ती सबइंजिनिअर हाताळत असतात. माहिती अधिकारी हे असलेली माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात त्यामुळे सदरची तक्रारीची प्रत ही नस्तीत का समाविष्ट करण्यात आली नाही याबद्दल त्यांना काहीही सांगता येणार नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यावरसुध्दा दि.३१.१.२०१० च्या तक्रारीची प्रत ही विधी विभागाकडे पाठविण्यापूर्वी का समाविष्ट करण्यात आली नाही हा मुद्दा मात्र अनिर्णितच राहतो व त्याबद्दल त्यांना तसे सांगता येणार नाही. मात्र एक बाब स्पष्ट दिसून येते की, माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपील मेमोमध्ये किंवा प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये ३१.१.२०१० च्या तक्रारीचा स्पष्टपणे उल्लेख दिसून येत नाही तर फक्त कागदपत्र समाविष्ट केलेली नाहीत अशाप्रकारचा उल्लेख आहे. परंतु कोणती कागदपत्र याबाबतचे स्पष्टीकरण नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागीतल्यावर जी माहिती कागदपत्रांमध्ये,अभिलेख्यांमध्ये उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती माहिती उपलब्ध होते. जी माहिती उपलब्ध नाही ती का उपलब्ध

नाही या संदर्भात प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलामध्ये मुद्दा जरी उपस्थित केलेला असला तरी त्याबद्दलचे निश्चीत कारण जर जन माहिती अधिकारी यांना देता येत नसेल तर त्याकरीता जबाबदारी निश्चित करुनच त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देता येईल. कोणत्याही कार्यालयात कोणत्याही नस्तीबाबत एकच अधिकारी ती नस्ती हाताळत नसतात व त्यामुळे नस्तीमध्ये कागदपत्र नाहीत या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाविरुध्द राहील व त्यामुळे सदरच्या प्रकरणात जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व संबंधित विभागामध्ये ज्या ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचा नस्ती हाताळण्यामध्ये सहभाग असतो त्या सर्वांच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करण्याकरीता चौकशी करुन जबाबदारी निश्चित झाल्यावरच आयोगाने निर्णय देणे योग्य होईल.त्यामुळे आयुक्त महानगरपालिका यांनी चौकशी अधिकारी नेमून चौकशी करुन आयोगास अहवाल सादर करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपीलावर अंतरिम आदेश पारित करणे संयुक्तिक राहील.

अंतरिम आदेश

१) मा.आयुक्त महानगरपालिका यांनी सदरच्या प्रकरणामध्ये चौकशी अधिकारी नियुक्त करुन अर्जदार अपिलकर्ता यांनी तक्रार केल्याप्रमाणे फाईल क्र.ईबी/४८६०/डी/ए Regarding proposed Regularization of additions/alterations and Major repairs at Nanik Niwas ३, Bhulabhai Desai Road, Mumbai-२६ C.S.No.६८५,Malabar Hill Division, Shyam Co. Hsg. Society Ltd. च्या संदर्भात नस्तीमध्ये जाणीवपूर्वक विधी विभागाच्या अभिप्रायासाठी पाठविलेल्या नस्तीमध्ये अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारीची प्रत किंवा इतर कागदपत्र समाविष्ट न करण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करावी व आयोगाकडे अहवाल १५ दिवसाच्या आत सादर करण्यात यावा.

२) सदरच्या निर्णयाची १ प्रत आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

Gawas/feb 2011

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३२१/अपील क्रमांक ६४१५/२०१०/०२

श्री.शेख मुरादजी शाहजहाँ,
मितला धाम,जरी वर्गीस टर्मट कंपनीच्या समोर,
वॉटर टँक रोड, प्लॉट नं.२५६, मालाड(पूर्व),
मुंबई-४०००९७. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणाची सुनावणी दि.२८.२.२०११ रोजी सकाळी १०.३० वाजता ठेवण्यात आली होती परंतु त्यावेळेस कोणीही हजर नव्हते म्हणून सदर सुनावणी पुन्हा दुपारी २.०० वाजता ठेवण्यात आली. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर होते. सदर प्रकरणाची चौकशी केली असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय दि.२०.१०.२०१० रोजी दिलला दिसून येतो. त्या निर्णयाचे अवलोकन केले असता व जन माती अधिकारी यांच्याशी चर्चा करतांना अर्जदाराचे उत्तर तयार असून अपिलार्थिनी ते व्यक्तीश: मागीतले होते त्यामुळे ते पोस्टाने पाठविले नाही असे त्यांनी सांगितले. अपिलार्थिना १० दिवसाच्या आत माहिती व्यक्तीश: देण्यात यावी असे आदेश देऊन सदर अपील निकाली काढण्यात आलेले आहे असे दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने अर्जदाराने या आयोगासमोर द्वितीय अपील सादर केले. वास्तविक पहाता अर्जदाराने मागीतलेली माहिती ही जर तयार होती तर अर्जदार अपिलार्थी हे सुनावणी दरम्यान उपस्थित होते तेव्हा त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्यासमोर समक्ष माहिती का पुरविली नाही व पुन्हा १० दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असे आदेश देण्याचे कोणतेही कारण दिसत नाही.

तसेच अर्जदाराने मागीतलेली माहिती ही १७ मुद्यांमध्ये असून त्याबद्दल प्रथमअपीलीय अधिकारी यांनी सदर मुद्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण घेऊन प्रत्येक मुद्यावर मुद्देसुद माहिती देणे अपेक्षित होते. परंतु या आयोगासमोर दाखविलेल्या उत्तरावरुन निश्चितच समाधानकारक उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले नाही व ब-याच मुद्यांची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे म्हटलेले आहे. वास्तविक ही माहिती महानगरपालिकेशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्येक मुद्याबाबत स्पष्टीकरण किंवा माहितीबाबत स्पष्ट उल्लेख असावयास पाहिजे होता. म्हणून सदर पकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२०.१०.२०१० रोजी दिलेला निर्णय हा रद्दबातल ठरविण्यात येत आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, दि.१६.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सुनावणी घेण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याबाबत उपलब्ध असलेली माहिती किंवा त्याबाबतचे स्पष्टीकरण लेखी स्वरुपात प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दाखल करावे.प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याचे अवलोकन करुन दिलेली माहिती

बरोबर आहे किंवा नाही ते तपासून योग्य ते आदेश पारीत करुन त्याची प्रत अर्जदाराला उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर द्वितीय अपील ९० दिवसाच्या आत करु शकतात. यास्तव खालील आदेश पारित करुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) दि.२०.१०.२०१० रोजी पारित केलेले अपील क्रमांक २८२५४ चे आदेश रद्दबातल करण्यात येत आहेत.

२) प्रथम अपीलीय अध्किारी यांनी दि.१६.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता अर्जदाराच्या दि.२७.९.२०१० च्यामूळ अपील अर्जाच्या संदर्भात सुनावणी ठेवावी व माती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान मुद्देसुद लेखी निवेदन दाखल करावे. त्याची प्रत अपीलीय अधिका-यांसमोर अर्जदारास देण्यात यावी व अर्जदाराचे संपूर्ण म्हणणे ऐकून योग्य ते आदेश त्यानंतर ८ दिवसांच्या आत पारीत करावे व त्याची १ प्रत अर्जदाराला अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी.

३) त्यानंतरही अर्जदाराचे समाधान झाले नाही तर अर्जदार ९० दिवसाच्या आत या आयोगासमोर द्वितीय अपील दाखल करुन शकतो.

मुंबई **(भास्कर पाटील)**

दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३१६/अपील क्रमांक ६४११/२०१०/०२

श्री.महम्मद हमीद शेख(समाजसेवक सतर्क नागरीक),
नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,एमएमआरडीए,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, वांद्रे,मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,एमएमआरडीए,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, वांद्रे,मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रपत्र-अ मध्ये अर्ज करुन माहिती मागीतलेली दिसून येते. त्यात सदर प्रकरणी ठेकेदार किती आहेत, त्यांची नावे, त्यांच्या लायसेन्सच्या संबंधात माहिती इत्यादीबाबत अर्जदाराला कळविण्यात आले आहे व त्यानुसार अर्जदाराला पैशाचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अर्जदाराला दिलेल्या उत्तरास लागलेला अवधी विचारात घेता अर्जदाराला माहिती

विनाशुल्क पुरविण्याचे आदेश या आयोगाने दिले. अर्जदाराला या आधी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अर्जदारास आणखी माहितीची आवश्यकता होती व त्याबाबत अर्जदाराला माहिती अधिकारी यांनी १० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले व सदरची माहिती विनामुल्य,अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पुरविण्यात येईल असे मान्य केले आहे. यास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

यानंतरही अर्जदारास काही अडचण असल्यास ते या आयोगासमोर या अधिनियमाच्या कलम १८ खाली तकारवजा अर्ज सादर करु शकतात.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३१७/अपील क्रमांक ६४१२/२०१०/०२

श्री.महम्मद हमीद शेख(समाजसेवक सतर्क नागरीक),
नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
३रा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
३रा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १०.८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी प्रपत्र अ मध्ये दि.१०.८.२०१० रोजी अर्ज करुन माहिती मागीतलेली आहे. मागीतलेली माहिती मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ म्हाडा द्वारा होनेवाले विकास कार्यक्रम के बारेमे तसेच राज नंदिनी लेबर सहकारी संस्था,मर्यादित या संस्थेचे मुख्यप्रवर्तक वगैरे बाबतची माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जदारास कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी दि.१८.९.२०१० रोजी पत्र पाठविले व राज नंदिनी लेबर सहकारी संस्था यांनी कोणकोणती विकास कामे पूर्ण केली आहेत व कोणत्या फंडातून ती पूर्ण केली आहेत व कामे सुरु होण्याचा व संपल्याचा कालावधी याबाबतची माहिती कळविलेली दिसून येते. परंतु सदर लेबर सहकारी संस्थेचे पंजीकरण करतांना मुख्य प्रवर्तक कोण होते तसेच त्यांचे सदस्य कोण होते याबाबतची माहिती (डीडीआर) तसेच अध्यक्ष,काम वाटप

समिती तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पूर्व उपनगरे-२, कोकण भवन,सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधीत असून माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे तरी याबाबत संबंधित कार्यालयाकडे संपर्क साधावा असे अर्जदारास कळविलेले दिसून येते व त्याकरीता सदर पत्राची प्रत डीडीआर,काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पूर्व उपनगरे-२ कोकण भवन,सीबीडी बेलापूर,नवी मुंबई यांना पाठविण्यात आलेली आहे. अर्जदारास उर्वरित माहिती मिळाली असून फक्त सदर संस्थेच्या पंजीकरणाबाबत माहिती मिळालेली नाही म्हणून डीडीआर-अध्यक्ष, काम वाटप समिती यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी संबंधित संस्थेबद्दलची माहिती अर्जदारास अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर व कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी दि.१८.९.२०१० च्या पत्राच्या अनुषंगाने निर्देशित केलेली माहिती अर्जदारास हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामुल्य नोंदणीकृत डाकेने पाठवावी. माहिती उपलब्ध नसल्यास तसे अर्जदारास कळवावे. तसेच सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी कोण असतील याबाबतची माहितीही कळवावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर अधिनियमाच्या कलम १८ खाली तक्रारवजा अर्ज करु शकतात. वरील आदेश देऊन सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २८.२.२०११

(भास्कर पाटील)
प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३२७/अपील क्रमांक ६४१७/२०१०/०२

श्री. अशोक कुंचीकोरवे,
एम.पी.नगर,घोरवाडा,
रुम नं.बी.८०, धारावी क्रॉस रोड,
मुंबई-४०००१७ ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परि.६, ४था माळा,
प्रशासकीय इमारत, आरसी मार्ग,
चेंबूर, मुंबइ-४०००७१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पूर्व प्रादेशिक विभाग,
चेंबूर, मुंबई-७१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी प्रपत्र-अ नुसार दि.१२.७.२०१० रोजी प्रशासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, अप्पर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,चेंबूर, मुंबई यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन एकूण ८ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. त्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार अर्जदाराचे समाधान न झाल्याने अर्जदाराने दि.९.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,परिमंडळ-६, ४था मजला, प्रशासकीय इमारत,आरसी मार्ग, चेंबुर, मुंबई-७१ यांच्याकाडे प्रथम अपील दाखल केले. अर्जदाराचे मिळालेल्या माहितीने समाधान झालेले नाही. अर्जदारास द्यावयाची माहिती नष्ट करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.७.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व दि.९.९.२०१० रोजी आदेश पारित करण्यात आले. सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी पोलीस निरिक्षक श्री.जाधव सुनावणीस उपस्थित होते. अपीलार्थी यांना पत्रान्वये कळवूनही ते सुनावणीस गैरहजर होते. अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे शासकीय माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली आहे परंतु कागदपत्रांचा दस्तऐवज नियमाप्रमाणे नष्ट केल्यामुळे पोलीस ठाणेस मागणी केलेली कागदपत्र उपलब्ध

नसल्याचे त्यांना कळविण्यात आले आहे. अर्जदार सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांना माहिती कोणत्या नस्तीच्या आधारे दिलेली आहे ते स्पष्ट झाले नाही. अर्जदाराला उत्तर दिले असल्याच्या कारणास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात आले आहे.

त्यानंतर अर्जदाराने या आयोगासमोर दि.९.११.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्या अपिलात प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांचे अपील क्र.४३०५ /१०, दि.९.९.२०१० चे आदेश सुनावणी न घेता व चुकीचे आदेश दिले असे नमूद केले आहे व वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी दिलेली माहिती खोटी/अपुरी आहे म्हणून संबंधीतांविरुध्द कार्यवाही करुन अर्जदाराला दस्तऐवज देण्याबाबतचे आदेश द्यावेत असे म्हटले आहे.

सदर सुनावणीस अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत,जन माहिती अधिकारी हजर आहेत. त्यांनी त्यांच्यातर्फे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. दिलेल्या लेखी खुलाशानुसार अर्जदाराने विक्रोळी पार्कसाईट पोलीस ठाणे येथे दि.१३.४.०७ व दि.२५.९.०७ रोजी ज्या तक्रारी दाखल केलेल्या आहेत त्या संबंधीचा चौकशी अहवाल तसेच हस्तगत केलेली क्वालीस मोटरकार एमएच-०४ बीडी १७२१ चे दस्तऐवज व अपीलकार यांना विकलेल्या सदर गाडीच्या करारनाम्याची सत्यप्रत मिळणेबाबत नमूद केले आहे. तसेच मानवी हक्क आयोग केस क्र.बीजीएक/०४/२००८-०९ मध्ये सादर केलेला अहवाल व दस्तऐवजांची नक्कल प्रत मिळणेबाबत नमूद केले आहे. सदर निवेदनात असे सुध्दा नमूद केले आहे की, तक्रार अर्ज व चौकशीची कागदपत्र मुदत संपल्याने नष्ट करण्यात आली असल्याने व मानवी हक्क आयोगास अहवाल सादर करण्यात आल्याने व पोलीस ठाणे अभिलेखावर अहवाल उपलब्ध नसल्याने अर्जदार अपिलकर्ता यांनी मागीतलेली कागदपत्र देण्यात आलेली नाहीत.

सदर प्रकरणी अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे जर सदर कागदपत्र नियमानुसार नष्ट करण्यात आली असतील तर या संबंधीचे कागदपत्र किंवा रजिस्टर मधील नोंदी याबाबतची माहिती अर्जदाराला हवी आहे व ती देण्याची जबाबदारी संबंधीत वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस स्टेशन यांची आहे. तरी वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस स्टेशन यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी अर्जदार स्वत: निरिक्षणासाठी आल्यास या नष्ट केलेल्या अभिलेखासंबंधीची माहिती त्यांना प्राप्त करुन द्यावी. जर अशाप्रकारची मूळ अभिलेखातील रजिस्टर मधे नोंदी घेतलेल्या नसतील तर अर्जदाराला तसे लेखी कळवावे. अर्जदाराला अशाप्रकारची लेखी माहिती न मिळाल्यास अर्जदार या आयोगासमोर त्याप्रमाणे लेखी तक्रार माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १८ खाली करु शकतात.

त्याचप्रमाणे सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, अर्जदाराची तक्रार दि.१३.४.०७ व २५.९.०७ च्या अनुषंगाने चौकशी अहवाल हा मानवी हक्क आयोगाच्या

प्रकरणात दाखल करण्यात आलेला आहे. तरी या संबंधी अर्जदाराने अर्जदाराचे प्रकरण चालू असल्यास तशाप्रकारे अर्ज करुन सदर मूळ अभिलेखाचे निरिक्षण मागवावे किंवा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार माहिती मिळण्यासाठी अर्ज करावा व माहिती मिळवावी. यास्तव खालील आदेश पारित करुन सदाचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी अर्जदाराच्या दि.१३.४.०७ व २५.९.०७ च्या तक्रारीच्या संबंधाने सदरची कागदपत्र नष्ट केल्याबाबत त्यांच्याकडे नियमानुसार नोंद असल्यास, त्याबाबतची माहिती अर्जदाराने मागीतल्यास ती त्यांना पुरवावी. जर कागदपत्र नष्ट केल्याची नोंद नसेल तर तशाप्रकारे लेखी उत्तर अर्जदाराला देण्यात यावे.

वरील आदेश देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

प्रत - वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३१८/अपील क्रमांक ६४१३/२०१०/०२

श्री. महम्मद हमीद शेख(समाजसेवक-सतर्क नागरिक),
नेहरु नगर, चाळ क.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व),
मुंबई-४०००५१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
जी/उत्तर विभाग विभाग कायालय, पहिला मजला,

हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),
मुंबई-४०००२८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),
दादर, जी/उत्तर विभाग कायालय,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),
मुंबई-४०००२८. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदाराने दि.१६.८.२०१० रोजी केलेल्या अर्जानुसार मागीतलेली माहिती अर्जदाराला मिळाली परंतु खाली नमूद केलेली माहिती मिळालेली नाही-

एक) ज्या कंपन्यांची माहिती मागीतलेली आहे त्या कंपन्यांनी ए.एस.बी.भरलेली डिपॉझीट सह चलान क्रमांक

दोन) एफ.एम.डी. डिपॉझीट चलान क्रमांक व रिटर्न मनीसह चलान क्रमांक देण्यात यावे

उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार सदरची माहिती उपमुख्य अभियंता(नियोजन),बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयामार्फत जन माहिती अधिकारी हे ८-१० दिवसात विनामुल्य, अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन दतील. त्यानंतरही अर्जदाराला माहिती घेण्यासाठी काही अडचण असल्यास अर्जदाराला या आयोगासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ खाली लेखी तक्रार करता येईल. वरील आदेश देऊन सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२४३८/तक्रार क्र. १६४१/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
नगर विकास विभाग, नवि-२०,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ६.९.२०१०
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.६.९.२०१० रोजी त्यांच्या दि.२६.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/नगर विकास विभाग, मंत्रालय यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी शासन निर्णय निमसरकारी कार्यालये म्हणजे नगरपालिका आणि नगरपरिषदा व इतर मंडळे/महामंडळे याविषयी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली होती-

१) राज्य शासनाने प्रसुतीच्या संदर्भात जे नियम केलेल आहेत तेच नियम महानगरपालिका कर्मचा-यांना लागू का करण्यात आले नाहीत याबद्दलची माहिती द्यावी.

२) तसेच महानगरपालिका व नगरपालिका यांच्यामध्ये प्रतिनियुक्ती पदासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य अधिकारी तथा आयुक्त अथवा प्रशासक म्हणून आपल्या विभागातील कर्मचारी यांना पाठविण्यात येते अशा स्थितीत आयुक्त,प्रशासक,मुख्याधिकारी हे शासनाच्या निर्णयानुसार प्रशासकीय ठराव त्या त्या नगरपालिका,महानगरपालिका,नगरपरिषदेमध्ये मांडत नसल्यामुळे ते कोणत्या नियमामुळे राज्य शासनाच्या निर्णयाचा अवमान केला म्हणून शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतात त्याची माहिती द्यावी.

ही माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, सदर प्रकरण माझे पूर्व अधिकारी तथा राज्य माहिती अधिकारी श्री. आर.एस.घाडगे यांच्या काळातील असून सदर प्रकरणी तक्रारदार श्री.डोळस यांच्या ६.९.२०१०च्या अर्जास अनुसरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याचे सांगितले.

श्री.डोळस यांच्या अर्जातील सर्व मुद्यांच्या संदर्भात दि.१०.८.२०१० रोजी माहिती कळविण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी मागीतलेली माहिती ही राज्यातील २२६ नगरपरिषदा व २३ महानगरपालिका यांच्याशी संबंधीत आहे. या सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा या सार्वजनिक प्राधिकरण असल्यामळे त्यांच्याकडून ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. मंत्रालयात अशाप्रकारची कोणतीही माहिती उपलब्ध नसते. महानगरपालिकेचे कामकाज मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार चालते. या अधिनियमातील प्रकरण ४, कलम ४५ येथे नमूद केल्यापमाणे महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक व सेवेच्या शर्तीबाबत तरतूद आहे तर नगरपरिषदांचे कामकाज महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम,१९६५ नुसार चालते. या अधिनियमातील प्रकरण पाच, कलम ७५ येथे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नेमणुकीसंबंधी तरतूद आहे. सदर अधिनियमांच्या प्रती शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई येथे उपलब्ध आहेत. मुद्दा क्र.४ च्या संदभात कोणतीही बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही. मुद्दा क्र.५ रजेच्या संदर्भातील धोरण हा वित्त विभागाशी संबंधीत आहे त्यामुळे वित्त विभागाकडे तो हस्तांतरीत करण्यात आला आहे. तक्रारदार यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता तक्रारदार यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती राज्यातील महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या कायद्याप्रमाणे ज्या स्थापन झालेल्या महानगरपालिका व नगरपरिषदा आहेत त्यांच्या स्तरावरील माहिती आहे. महानगरपालिका व नगरपरिषदा या स्वायत्त संस्था आहेत. शासनाने जरी कोणतेही नियम केले असले तरी जोपर्यंत महानगरपारिला व

नगरपरिषदा त्यांच्या बैठकीत सदरच्या नियमाच्या संदर्भात निर्णय घेत नाहीत तोपर्यंत कोणतेही अधिकारी यांना तो निर्णय लागू करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी शासनाच्या प्रस्तुत नियमाच्या संदर्भात जी माहिती मागीतलेली आहे त्या संदर्भत प्रत्येक महानगरपालिका व नगरपरिषदांना ते नियम अंमलात आणण्याचा निर्णय घेतला असल्यासच अधिकारी किंवा कर्मचारी त्याबाबत अंमलबजावणी करु शकतात. त्यामुळे सदरची माहिती प्रत्येक महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्याकडे स्वतंत्रपणे मागणे संयुक्तिक राहील. यास्तव तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/१७९९/तक्रार क्र. १६५०/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रिअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
सहकार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ५.७.२०१०
तक्रारदार उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.९.२.२०१० च्या सहकार विभागात केलेल्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या दि.९.२.२०१०च्या अर्जात सहकार विभागाने बंधपत्रासंबंधी बनविलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. परंतु त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. आज सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार विभाग,मंत्रालय,मुबई हे हजर नाहीत. यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते व त्यामुळे संबंधित जन माहितीअधिकारी तथा कक्ष अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापूी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्रआहे.

आदेश

१) तक्रारदार यांच्या दि.९.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तसेच तक्रारीच्या सुनावणीससुध्दा जन माहिती अधिकारी उपस्थित राहिले नाही म्हणून अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द रु.५०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगाकडे समक्ष करावा. तसे न केल्यास रु.५०००/-ची शास्ती कायम करण्यात येऊन ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/तक्रार क्र. १६४९/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त प्रशासन,
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
ठाणे. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १५.७.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे यांच्याकडे अर्ज करुन, स्वसंरक्षणासाठी रिव्हॉल्वर/पिस्तोल परवाना नाकारतांना जी कलमे,कारणे नमूद असतात त्याची व सशुल्क पोलीस संरक्षण पुरवलेल्या व्यक्तींबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.६.२०१० रोजी मुद्दा

क्र.१च्या संदर्भात नियमावली बाजारात उपलब्ध असल्यामुळे ती पुरविण्याची आवश्यकता नाही तसेच मुद्दा क्र.२ बाबत दि.२४.१०.२००५ भाग ४(अ) अन्वये माहिती गोपनीय असल्याने ती आपणास पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच इतर मुद्यांच्या संदर्भातही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.निरंक अन्वये देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आले आहे. मात्र तक्रारदार यांनी द्वितीय अपील दाखल न करता आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्या संदर्भात शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,ठाणे यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, अर्जदार यांनी मागणी केलेले त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ व २(ब) ची माहिती पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखेशी संबंधीत असल्याने ती संकलीत करुन देण्याबाबत इकडील कार्यालयातून दि.१२.६.२०१० रोजी पत्र देण्यात आले. त्यात मुद्दा क्र.२,३,४ व ५ बाबतची माहिती विशेष शाखेशी संबंधीत असल्याने ती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले आहे. परवाना शाखा यांच्याकडील दि.१९.६.२०१० व विशेष शाखा यांच्याकडील दि.२९.६.२०१० अन्वये माहिती प्राप्त झाल्याने तक्रारदार यांना दि.३०.६.२०१० अन्वये विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आलेली होती. मात्र विशेष शाखा ही अधिनियमाच्या कलम २४(४) नुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होण्यापासून वगळण्यात आली असल्यामुळे विशेष शाखेची माहिती मात्र त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांनी कळविले होते.परंतु तरीसुध्दा अपिलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार कलेली आहे. त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, पोलीस आयुक्तालय सोलापूर यांनी मात्र विशेष शाखेच्या संदर्भात दि.२१.१.२०११ रोजी संपूर्ण माहिती त्यांना दिलेली आहे व त्यामुळेच तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, इतर सर्व पोलीस आयुक्तालये जर माहिती देत आहेत तर ठाणे पोलीस आयुक्तालय किंवा ठाणे(ग्रामिण) यांनी मात्र ती विशेष माहिती आहे म्हणून देता येत नाही हे कळविलेले आहे ते योग्य नाही. त्याकरीता तक्रारदार यांनी पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर यांच्याकडून मिळालेली माहिती आयोगाच्या निदर्शनास आणली व त्यामुळे तक्रारदार यांनी ठाणे शहरातील किती व्यक्तींना ठाणे पोलीस आयुक्त यांनी सशुल्क पोलीस संरक्षण दिले याबद्दलची माहिती व इतर अनुषंगिक माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता त्यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन ठाणे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत तक्रारदार यांना त्यांच्या दि.११.६.२०१०च्या

अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना पोलीस आयुक्त, सोलापूर यांनी ज्याप्रमाणे विशेष शाखेकडून विशिष्ट व्यक्तींना संरक्षण दिल्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्याचप्रमाणे ठाणे आयुक्त कार्यालय यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/१७६८/तक्रार क्र. १६४८/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २९.६.२०१०
तक्रारदार, गैरतक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२९.६.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.७.५.२०१० च्या आरोग्य विभागातील माहिती अधिका-यांकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील मनोरुग्णालयाच्या संदर्भात महाराष्ट्रामध्ये एकूण किती मनोरुग्णालये आहेत, ती कोठे आहेत त्या रुग्णालयातील साफसफाईचा ठेका देणे व तो ठेका मंजूर करणे यासाठी कोण

अधिकारी नियुक्त आहेत, ठेका देण्यामध्ये नियमबाह्यता असल्यास कोणत्या सक्षम अधिका-याकडे दाद मागावी याबद्दलची माहिती तसेच त्या संदर्भात एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१७.६.२०१० रोजी मुद्दा क्र.१ बाबत राज्यात एकूण ४ शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालये आहेत. सदर मनोरुग्णालये ठाणे,पुणे, रत्नागिरी आणि नागपूर येथे आहेत. तसेच मुद्दा क्र.२ ते ७ बाबतची माहिती आपण संबंधित प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांचेकडून घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याचप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.३.७.२०१० रोजी त्यांच्या एकूण ८ मुद्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,प्रादेशिक मनोरुग्णालय,ठाणे यांच्याकडून माहिती उपलब्ध झाली. परंतु पुणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयातील माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी मंत्रालयातील सार्वजनिक आरोग्य विभागात माहिती मागीतली होती. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२,३ ते ८ पर्यंतची माहिती ही त्या त्या मनोरुग्णालयाच्या स्तरावरची आहे आणि प्रत्येक मनोरुग्णालय हे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. तक्रारदार यांनी त्यांच्याकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरची तक्रार अंशत: मान्य करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यानी मनोरुग्णालये- पुणे,रत्नागिरी,नागपूर येथून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ ते ८च्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी सदरचा माहितीचा अर्ज ३ मनोरुग्णालयांना(पुणे,रत्नागिरी,नागपूर)हस्तांतरीत करावा.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना सदर आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९६४/तक्रार क्र. १६३७/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... गैरतक्रारदार

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ४.११.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.४.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या माहितीचा अर्ज दि.९.७.२०१० प्रमाणे माहिती प्राप्त झाली नाही म्हणून तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयातून तक्रारीच्या चौकशीकरीता नोटीस काढण्यात आली होती. माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.वानखेडे यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये तक्रारदार यांनी के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरीग,ठाणे(पूर्व) या संस्थेच्या अनुषंगाने माहिती मागीतली होती. सदर माहिती ही एका खाजगी शैक्षणिक संस्थेची असल्याने या माहितीशी निगडीत कागदपत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडे उपलब्ध नाही. परंतु या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या तंत्रशिक्षण संचालनालयाशी सदर माहिती निगडीत असल्यामुळे याबाबतची माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना दि.३.९.२०१० रोजी कळविण्यात आले होते. अर्जदाराने केलेल्या अपीलावर दि.२५.११.२०१० रोजी मंत्रालयात सुनावणी झाली. सदर सुनावणीस सहाय्यक जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय श्री.मोहिते उपस्थित होते. सुनावणीनंतर अर्जदार कार्यालयात आले परंतु त्यावेळी माहिती तयार नव्हती. अर्जदाराने माहिती व्यक्तीशः घेऊन जातो असे सांगितले. त्यानंतर दि.२५.११.२०१० रोजी माहिती तयार ठेवण्यात आली होती. परंतु अर्जदारास दि.१४.२.२०११ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे असा खुलासा त्यांनी आयोगापुढे दिलेला आहे. तंत्र शिक्षण संचालनालयाचे माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग हे विनाअनुदानित महाविद्यालय आहे व विनाअनुदानित महाविद्यालयांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे त्या संस्थेच्या संदर्भातील माहिती ही उपलब्ध होऊ शकत नाही. मात्र तंत्र शिक्षण संचालनालयाकडे जी माहिती आहे ती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

३) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२८१३/तक्रार क्र. १६३८/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्टीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... गैरतक्रारदार

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १६.१०.२०१०
तक्रारदार, गैरतक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१६.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,गृह विभाग यांनी त्यांच्या दि.८.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे कम १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, पोलीस विभागामार्फत ठाणे शहर भागात रहाणा-या व्यक्तीस पोलीस संरक्षण जे सशुल्क पुरविले गेले आहे त्यापोटी आजमितीपर्यंत एकूण किती थकबाकी सशुल्क पोलीस संरक्षण वापरणारे/घेणा-या व्यक्तींनी दिलेली नाही याची माहिती त्या सर्व रकमेच्यासह व इतर अनुषंगिक माहिती ८ मुद्यांमध्ये मागीतलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदर अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी मागणी केलेली माहिती ही पोलीस आयुक्त बृहन्मुंबई,पोलीस आयुक्त-ठाणे व पोलीस अधिक्षक-ठाणे(ग्रामिण) यांच्याशी संबंधीत असल्याचे आढळून आल्यामुळे अधिनियमाच्या कलम ६(३) अनुसार त्यांच्या अर्जाच्या प्रती १३.७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे उपरोक्त ३ कार्यालयांकडे पाठविण्यात आल्या. परंतु दि.२.८.२०१० रोजीच्या अर्जाद्वारे अर्जदार यांनी पोलीस आयुक्त-ठाणे यांनी आवश्यक ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे कळविले. सदर माहिती गोपनीय असल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४.१०.०५,भाग-४(अ) अन्वये ती पुरविता येत नाही असे पोलीस आयुक्त,ठाणे यांनी त्यांचे पत्र दि.३०.७.२०१० रोजी त्यांना कळविले आहे. त्यानंतर अर्जदार यांनी दि.६.९.२०१० रोजी एक स्वतंत्र अर्ज केला होता. त्यात पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई कार्यालय यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविलेली आहे. तथापी पोलीस आयुक्त ठाणे तसेच पोलीस अधीक्षक ठाणे(ग्रामिण) यांच्याकडील माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्याबाबत पुन्हा अर्जदार यांनी असे सांगितले की, पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांच्याकडुन जी माहिती प्राप्त होते ती पोलीस आयुक्त,ठाणे किंवा पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामिण यांच्याकडून प्राप्त होत नाही व ती गोपनीय आहे असे कळविले जाते हे विसंगत आहे व ती माहिती गृह विभागाकडून पुरविण्यात यावी असे त्यांनी नंतरच्या अर्जात कळविले होते. कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी पुढे युक्ती वाद करतांना सांगितले की, अर्जदाराचा अर्ज ३ कार्यालयांकडे पाठविण्यात आला होता. त्यानंतर मात्र अर्जदाराने प्रथम अपील दाखल केलेले नाही व कक्ष अधिकारी यांच्याकडे ते अर्जातील माहिती मिळावी अशी मागणी करीत आहेत. तक्रारदार यांना जी माहिती उपलब्ध झाली नाही त्या संदर्भात ठाणे अधीक्षक व पोलीस अधीक्षक-ठाणे ग्रामिण यांच्या पत्राचे अवलोकन केले असता मागीतलेली माहिती पोलीस संरक्षणाबाबतची आहे व ती इकडील जिल्हा विशेष शाखा ठाणे(ग्रामिण) यांच्याशी संबंधीत असून सदरची शाखा परिपत्रक क्र.एचडीओ-१००५/२४२४/प्रक्र/२९२/आ.१ गृह विभाग मंत्रालय, मुंबई-३२ दि.२९ ऑक्टोबर,२००५ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २४(४) अन्वये वगळण्यात आला असून तो State Intelligence Department and its subsidiaries, Special /Branch of all Police Commissionerates, District Special Branch of all District Superintendents of Police in all the Districts असा असल्यामुळे सदरच्या शाखांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२४९५/तक्रार क्र. १६१०/का.१

श्री. भुषण पांडुरंग माळगांवकर,
१२२, फ्लॅट नं.३०२, मुकेश अपार्टमेंट्स,
नाडकर्णी मार्ग, वडाळा(पूर्व),
मुंबई-४०००३७. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. **.... गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १६.९.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१६.९.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.५.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दि.१८.२.२०११ रोजी म्हणजे आज घेण्यात आली. सदरच्या माहिती अर्जात अपिलकर्ता यांना ९.२.२०१० रोजी उत्तर पाठविण्यात आले आहे असे माहिती अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. सुनावणीस तक्रारदार हजर आहेत व त्यांनीही माहिती मिळाली असे सांगितल्यावरुन सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

राज्य मुंख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००५१/अपील क्र.६२८८/२०१०

श्री.शेख अब्दुल नईम अब्दुल करीम,
यु.टी.क्र.८९९, सर्कल क्र.२/४,
मुंबई मध्यवर्ती कारागृह, ऑर्थर रोड, मुंबई ४०० ०११. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (प्रतिबंधक)
शिवाजी मंडई, पोलीस आयुक्तांचे कार्यालय,
मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे)
पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०२-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११

अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्याकडे पोलीस उपआयुक्त (प्रतिबंधक) व त्यांचे स्वीय सहाय्यक स्टेनोग्राफर यांनी दिनांक १८-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात येण्याची व कार्यालयात जाण्याची त्याची नोंद माहिती मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १७-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती संबंधित कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १५-०९-२०१० रोजी देण्यात आला असून प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिलेली माहिती अपिलीय अधिकारी यांना दाखविण्यात आली त्यांनी ती बरोबर असल्याची खात्री केली व पुन्हा सुनावणीच्या वेळी दाखविण्यात आलेली माहिती तत्काळ अपिलार्थीस पुरविण्याबाबत अधिकाऱ्यांना सुचित करण्यात आले. तसेच अपिलार्थीना माहिती पाठविल्याबाबतचा पूर्तता अहवाल कार्यालयास देण्यात सांगितले. त्यामुळे अपिल निकाली काढण्यात आलेले आहे व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दिनांक १६-०९-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व खुलाशावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरचे अपलि हे निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

३) अपिल निकाली काढण्यात येते.
४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००५०/अपील क्र.६२८७/२०१०

श्री. सुदेश सुधाकर सुळे,
१५/अ मुलुंड मृग अर्चना कॉ.हौ.सो.
एस.एन.रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२)
पूर्व उपनगरे, मुंबई कक्ष क्र. २०१, २ रा मजला,
कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२)
पूर्व उपनगरे, मुंबई कक्ष क्र. २०१, २ रा मजला,
कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०४-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०१-०६-२०१० रोजी मुलुंड मृग अर्चना कॉ.हौ.सो.च्या संदर्भामध्ये उपनिबंधक /टी. श्री. तांबे यांनी बेकायदेशीर रक्कमा थकित रक्कम कोणत्या कोणत्या महिन्यांची व वर्षांची हे आदेशात भ्रष्टतापूर्वक नमूद केले नाही त्या संदर्भामध्ये एकूण ५२ मुद्दे उपस्थित करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक २१-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी एकूण ५२ मुद्यावर मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १७-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०९-०९-२०१० रोजी देण्यात आला असून विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले आहे. त्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली हे आयोगाच्या निदर्शनास आणले. तसेच अपिलकर्ता हे उपनिबंधक यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे जे अपिल आहे त्यामध्ये ते पक्षकार आहेत असे सांगितले व त्या अपिलातील मुद्यासंदर्भातच त्यांनी विश्लेषणात्मक परंतु प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांचे मत मागण्याच्या दृष्टिने माहिती अधिकारात मुद्दे उपस्थित केलेले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(च)** प्रमाणे **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्याप्रमाणे कागदपत्रे किंवा अभिलेखांच्या साहित्याच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्यांचा समावेश होतो. **कलम २ (ञ)** अन्वंये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, कागदपत्रे यांची पाहणी करुन छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद केलेली आहे. या दोन्ही व्याख्यांमध्ये जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्राधिकरणातील निर्णय प्रक्रीयेतील गुणवत्तेच्या संदर्भातील अभिप्राय किंवा मत व्यक्त करावे अशी तरतूद नाही व त्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलकर्ता प्रथम अपिलाच्या सुनावणीस हजर झालेले नाही असेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

वरील युक्तीवादावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यात कोणतेही सार्वजनिक व्यापक हित नाही व त्यामुळे अशा प्रकारणाचे मुद्दे उपस्थित करुन माहिती मागणे व अपिल करणे व सुनावणीस उपस्थित न राहून अपिलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११

मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./५००६०/अपील क्र.६२८४/२०१०

श्रीमती शबनम अमीन मुलाणी,
एफ/२२, बांद्रा पोलीस वसाहत
दुसरा माळा, आर. के.पाटकर मार्ग,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-९, हिलरोड,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पश्चिम प्रादेशिक विभाग, बांद्रा (पश्चिम),
पश्चिम नियंत्रण कक्ष, कॉटर रोड,मुंबई. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त यांच्याकडे एकूण १५ मुद्दावर माहिती मागितलेली दिसून येते. माहितीच्या मुद्दामध्ये विनापरावानगी कर्तव्यावर गैरहजर होते या संदर्भातील त्यांच्या विरुद्ध केलेल्या कारवाईच्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२-०६-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १३-१०-२०१० रोजी

देण्यात आल असून **मुद्दा क्रमांक ५ व १०** वगळून इतर सर्व मुद्दांबाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे **मुद्दा क्रमांक ५ व १०** ची माहिती वरिष्ठ पोलीस निरिक्षक विमानतळ ठाणे, मुंबई यांनी पोलीस ठाण्यात अभिलेखे पडताळून मुळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व १० बाबत अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरिक्षक विमानतळ पोलीस ठाणे यांनी दिनांक ०९-११-२०१० रोजी सादर केलेली माहिती दिनांक १५-११-२०१० रोजी पुरविण्यात आलेली आहे. तद्पूर्वीच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले होते.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे कलम १९(५) अन्वये आयोगापुढे सिद्ध करावयाचे असते अशी तरतूद असताना सुद्धा व त्याबाबत त्यांना पूर्वीच समज दिली असताना सुद्धा आज त्या गैरहजर आहेत.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी शिक्षा प्रस्तावित केलेली आहे, त्या संदर्भामध्ये त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. त्यांनी १५ मुद्यांमध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या मुद्यांच्या संदर्भामध्ये त्यांना चूकीची व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध झालेली आहे. युक्तीवादापुढे त्यांनी निर्णय प्रक्रीयेतील गुणवत्तेबाबत युक्तीवाद केला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेल्या मुद्यां संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता यांच्या विरुद्ध **कारणे दाखवा नोटिस** दिली व शिक्षेचा निर्णय दिलेला आहे. त्यातील पुराव्याच्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मागितलेली होती. त्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध होती ती त्यांना दिलेली आहेत. तरीही अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्या विरुद्ध जी कारवाई करण्यात आली आहे ती ज्या नियमाप्रमाणे करण्यात आलेली आहे ते नियम चूकीचे आहे. यावरुन अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी त्यांच्या विरुद्ध झालेल्या कारवाईच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"** या व्याख्येमध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली आणि कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे तपासणी किंवा निरीक्षण करुन त्यातील छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे आणि **"माहिती"** या संज्ञेमध्ये **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे,अभिलेखे,दस्तऐवज, शासन निर्णय यांचा समावेश होतो. ते अधिनियम किंवा नियम शासन पद्धतीत केलेले असते. त्या अधिनियमाचे किंवा नियमाचे त्यामध्ये समावेश होत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना लागू असलेली सेवा शर्तीच्या नियमाची तरतूदीची मागणी सुद्धा योग्य नाही ते नियमात प्रसिद्ध झालेले आहे. त्या नियमाप्रमाणे जर कारवाई झालेली नसली तर अर्जदारास मा.न्यायालयामध्ये किंवा नियमाप्रमाणे योग्य शासकीय अधिकाऱ्यांकडे अपिल करुन दाद मागता येईल. परंतु त्याकरीता कागदपत्रांच्या स्वरुपात जी माहिती कार्यालयात उपलब्ध असेल ती कागदपत्रे त्यांना माहिती अधिकारात मागता येतात. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे दिनांक १४-०६-२०१० च्या अर्जात जे एकूण १५ मुद्दे उपस्थित केले त्यातील मुद्देनिहाय कागदपत्रे उपलब्ध असतील तर त्यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अभिप्राय मागितलेला असला तरी त्याप्रमाणे अभिप्राय देता येणार नाही असे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मान्य करण्यास पात्र आहे.

----आदेश----

३) **अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मान्य करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी अपिलकर्ता यांचे दिनांक १४-०६-२०१० च्या अर्जातील एकूण मुद्यां संदर्भात ज्या ज्या मुद्यांमधून कागदपत्रे उपलब्ध होऊ शकतील त्या सर्व कागदपत्रांच्या छांयाकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

४) **अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

(विलास पाटील)

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००४८/अपील क्र.६२८६/२०१०

श्री.शंभू सरन सक्सेना,
पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,
रे रोड समोर ब्रिज वर,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
'टी' वार्ड , मुलुंड,
मुंबई ४०० ०८०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
'टी' वार्ड , मुलुंड,
मुंबई ४०० ०८०. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ३०-०९-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी 'टी' वार्ड यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००८ ते दिनांक ३०-०४-२०१० या कालावधीतील श्री. महेद्र पी. सावंत सहाय्यक अभियंता इमारत विभाग टी वार्ड यांच्या कालावधीतील अवैध बांधकामाच्या संदर्भामध्ये आलेल्या तक्रारी, त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये केलेली कारवाई व कारवाई नंतर अवैध झालेले बांधकामाच्या संदर्भात माहिती पोष्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०३-०८-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती

उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता इमारत व कारखाने यांना विहित मुदतीत पत्रोत्तराने अभिलेखाची पाहणी करण्यास तसेच विहित शुल्क भरुन छायांप्रती प्राप्त करण्यास कळविलेले आहे. अपिलकर्त्यास आवश्यक असलेली कागदपत्रे विहित शुल्क भरल्यावर १ महिन्याच्या आत देण्यात यावी असा निर्णय देवून अपिल निकाली काढण्यात आले व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी ४१३ कागदपत्रे दिली आहेत ती सन २००९-२०१० या कालावधीतील आहे व त्यात आवश्यक माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. पूर्वीची माहिती त्यांना दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी कोणत्याही निश्चित एका प्रकारणातील माहिती मागितलेली नसून मोघम अशी माहिती मागितलेली आहे व त्यामुळे त्यांना दिनांक २३-०६-२०१० रोजी अशा प्रकारची माहिती कळविलेली आहे व इतर माहितीच्या संदर्भामध्ये विस्तृत प्रमाणात माहिती असल्यामुळे त्यांनी निरीक्षण करावे व आवश्यक तो माहितीचा खर्च भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले होते. परंतु त्याबाबत अपिलकर्ता यांनी निरीक्षण सुद्धा केलेले नाही व खर्चाचा भरणा सुद्धा केलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार"** म्हणजे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे व त्यामुळे विस्तृत प्रमाणात किंवा व्यापक प्रमाणात मोघम अशी माहिती मागितलेली असल्यास एकतर अंदाजे किती पृष्ठे होतात त्या प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे सुरुवातीच्या ५ दिवसांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या **कलम ७ (३)** अन्वंये कळविणे अपेक्षित असते. मोघम व विस्तृत प्रमाणात माहिती असल्यामुळे कागदपत्रांचे अंदाजे पृष्ठे संख्या कळविणे व कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे खर्च भरुन घेणे किंवा प्राप्त करणेही अपेक्षित आहे व त्याप्रमाणे निरीक्षण करुन आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे असा पर्याय आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत कळविलेले आहे. त्यापैकी अंदाजे निरीक्षण करण्यास कळविलेलेअसते तर, किंवा निरीक्षण केलेले नसले तर त्यांना अंदाजे पृष्ठ संख्या कळविणे प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे कळविणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश-----

३) अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पृष्ठ संख्या व प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा विवरण तपशील, रजिस्टर पोस्टाच्या खर्चासहित कळविण्यात यावा व असे कळविल्यानंतर कागदपत्रांच्या छांयाकित प्रती काढून उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांकःमुमाआ/नोंदणी क्र./५००४७/अपील क्र.६२८५/२०१०

श्री.शंभू सरन सक्सेना,
पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,
रे रोड समोर ब्रिज वर,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ २)
साऊथ रिजन, नागपाडा, सर जे.जे. मार्ग,
मुंबई ४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
साऊथ रिजन, नागपाडा, सर जे.जे. मार्ग,
मुंबई ४०० ००८. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ३०-०९-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे डॉ. बाबासाहेब गोपले, श्री.बीरडीचंद आझाद, श्री.शंभू सरन सक्सेना, श्री. गायकवाड आणि श्रीमती पुष्पा राजा चालवाडी आणि इतर हे किती दिवस आझाद मैदानावर आंदोलन किंवा धरणा त्यांनी धरले होते, किती वेळा मा. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महामंत्री यांना ते भेटले होते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०८-२०१० रोजी दुरध्वनीवर संर्पक साधुन तयार असलेली माहिती घेवून जाण्यास कळविलेले होते. अपिलार्थी माहिती घेण्यास या कार्यालयात न आल्याने त्यांना माहिती देता आलेली नाही. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २४-०९-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना पोस्टाने माहिती पाठविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो व त्यानंतर अपिलकर्ता यांना सहाय्य पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आझाद मैदान पोलीस ठाणे यांच्याकडून आलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न

झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगकडे द्वितीय अपिल दाखल करुन प्रथम अपिलामध्ये सुनावणी घेतली नाही असे कारण दिलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली होती ती माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही व उपलब्ध करुन दिलेली माहिती अपुर्ण आहे. त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये धरणा किंवा निदर्शन आझाद मैदान येथे डॉ.बाबासाहेब गोपले, श्री.बीरडीचंद आझाद, श्री.शंभू सरन सक्सेना, श्री. गायकवाड आणि श्रीमती पुष्पा राजा चालवाडी यांच्या संदर्भामध्ये सन २०००-२००७ मध्ये माहिती मागितलेली होती व त्या मर्यादेतच त्यांची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सर्वसाधारण आहे. त्यामुळे दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अशा प्रकारची माहिती संकलित केलेली नसते व प्रत्येक व्यक्तीच्या संदर्भामध्ये १० वर्षाच्या काळामध्ये किती निदर्शने झाली व किती वेळा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेतली याबाबतची नोंद संकलीत करुन ठेवलेली नसते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ७ (९)** प्रमाणे सदरची माहिती संकलीत करावयाची झाल्यास शासकीय यंत्रणेची साधनसामुग्री ही प्रमाणाबाहेर वळवावी लागेल, कामकाज बाजूला ठेवावे लागेल व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही, असे असले तर अपिलकर्ता यांना, जी माहिती उपलब्ध असेल ती तयार माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश-----

३) अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निणय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक २१-०७-२०१० च्या अर्जातील जी माहिती तयार उपलब्ध असेल ती छायांकित कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७२/अपील क्र.६२९९/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७३/अपील क्र.६३००/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२३५/अपील क्र.६२३०/२०१०

श्रीमती शकुंतला एस. केडीया,
केडीया कुंज, ब्लॉक नं.१०/११, २ रा माळा,
२३, जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०५९. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती,
केंद्रीय सुविधा भवन, कळंबोली, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड, नवी मुंबई ४१० २१८.
जन माहिती अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती,
केंद्रीय सुविधा भवन, कळंबोली, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड, नवी मुंबई ४१० २१८. **...उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपीलांचे दिनांक
अपिल क्र. ६२९९ दिनांक - ०९-१०-२०१०
अपिल क्र. ६३०० दिनांक - ०९-१०-२०१०
अपिल क्र. ६२३० दिनांक - २५-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०३-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी **अपिल क्रमांक ६२९९/२०१०** मध्ये दिनांक ०५-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती यांच्याकडे एकूण **६८** मुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०३-०५-२०१० रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पुर्वीच माहिती दिलेली आहे व वेअरहाउसींग सोसायटीच्या संदर्भामध्ये माहिती हवी असल्यास कार्यालयात पूर्व परवानगी घेऊन उपस्थित रहावे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी योग्य फी आकारुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश

दिलेला होता. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना पुर्वीसुद्धा याच मुद्यांवर माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना आणखी कोणत्या प्रकारची माहिती पाहिजे त्या माहिती करीता कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांनी माहिती मागितलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचा त्यावरील अभिप्राय सुद्धा मागितलेला आहे. **तसेच त्यांनी सदरच पैसे किती प्राप्त करणार** अशा प्रकारची माहिती मागितलेली आहे व त्यामुळेच गुणवत्तेबाबत माहितीच्या अधिकारामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. त्याचमुळे त्यांनी तशी माहिती दिलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या दिलेली असून त्यामध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे मिळविता येण्याजोगी **"माहिती"** आणि त्यात कागदपत्रे, दस्तऐवज अभिलेखे यांचे निरीक्षण करणे छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व **कलम २(च)** मध्ये **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या असून त्या संज्ञेमध्ये साहित्याच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज स्वरुपात इत्यादीचा समावेश होतो. यावरुन कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेबाबत माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही तर ती कार्यालयामध्ये कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>अपिल क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७३/अपील क्र.६३००/२०१०</u>

अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०४-२०१० रोजी एकून **५२** मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भामध्ये दिनांक ०३-०५-२०१० रोजी त्यांनी कार्यालयामध्ये उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक ३१-०५-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले होते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी मिळाली आहे. अपिलकर्ता यांनी दिशाभूल माहितीच्या संदर्भामध्ये जे निवेदन सादर केलेले आहे. त्या निवेदनास त्यांची ती माहिती गुणवत्तेच्या संदर्भामध्ये युक्तीवाद करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी ५२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे ते मुद्दे कागदपत्रांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली नसून कपोलकल्पीत (Hypothetical) माहिती मागितलेली आहे व त्यामुळे सदर माहितीचे उत्तर देण्यात आलेले नाही असे असले तर अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. त्या मुद्यांमधून कागदपत्रे किंवा अभिलेखाच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. ती त्यास कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु त्या मुद्यांमध्ये सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या निर्णयाबाबत किंवा प्रकरणाबाबत प्रश्न विचारलेले असतील त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय हा अपेक्षित नाही. जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध

असलेली माहिती पुरविण्याचा अधिकार आहे. त्यांच्या त्या प्रकरणातील निर्णय प्रक्रीयासंबधी असेल किंवा नसेल व त्यातील कागदपत्रांच्या स्वरुपात असेलेली माहिती छांयाकित करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२३५/अपील क्र.६२३०/२०१०

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८९ ते माहिती उपलब्ध होईपर्यंत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसुन येते.

Description of the information required :

6) Certified Audited Ledger A/c for Mrs. Shakuntala S. Kedia pertaining to Plot NO. 1192, Road No.13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay3 A/c statement to be balanced Annually.
7) Certified Policy decisions taken regarding Levy & Waivet of Delay payment charges by the Market Iron & Steel committee.
8) Certified Copy of the Rules & Regulations of the Market Iron & Steel Committee.
9) Certified copies of any recovery order passed / pending against Mrs.Shakuntala S.Kedia or pertaining to Plot NO.1192, Road NO. 13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay.
10) Certified copies of Forfeit Notice issued / pending against Mrs.Shakuntala S.Kedia or pertaining to Plot NO.1192, Road No.13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay.

सदरची माहिती स्पीडपोस्ट मार्फत घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०७-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलात त्यांनी नवीन माहिती मागितलेली दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, **मुद्दा क्र.१ व २** ची माहिती दिलेली आहे. **मुद्दा क्र.३** च्या संदर्भामध्ये खर्च भरणा करावे असे कळविलेले आहे. **मुद्दा क्रं. ४ व ५** ची माहिती दिलेली आहे. खर्च भरणा त्यांनी केलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलामध्ये नवीन माहिती मागितलेली दिसून येते व प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अर्जादाराने ते माहितीच्या अर्जात मागितलेले आहे. तसेच फक्त माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकारे नवीन माहिती प्रथम किंवा द्वितीय अपिलात मागता येत नाही. प्रथम किंवा द्वितीय अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबत कारणमिंमासा देणारी माहिती अपेक्षित असते व त्यामुळे अपिलकर्ता यांना दिनांक ०७-०७-२०१० रोजी दिलेली माहिती व खर्चाचा भरणा करण्याच्या संदर्भात योग्य असल्यामुळे सदर अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

४) अपिल क्रमांक ६२९९/२०१० व अपिल क्रमांक ६३००/२०१० ही दोन्ही अपिले अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक ०५-०४-२०१० च्या दोन्ही अर्जाच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय कागदपत्रे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्या मुद्यांमध्ये गुणवत्तेबाबत अभिप्राय किंवा विश्लेषण मागितलेले असेल ते अपेक्षित नाही परंतु ते स्पष्ट कळविणे आवश्यक आहे. सदरची माहिती उपलब्ध करुन देताना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी योग्य ते नियंत्रण यंत्राची माहिती उपलब्ध करुन द्यावी ती जबाबदारी प्रथम अपिलीय अधिकारी यांची राहील. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

५) अपिल क्रमांक ६२३०/२०१० हे निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००६४/अपील क्र.६३११/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००६१/अपील क्र.६३१२/२०१०

श्री.दिपक धयालकर,
५/४४,बि.डी.डी.चाळ,गणपत जाधव मार्ग,
वरळी नाका,मुंबई ४०० ०८६. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
खोली क्र.४६, १ मजला, जुनी इमारत,
महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१.
जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (आयुक्त),
खोली क्र.४६, १ मजला, जुनी इमारत,
महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१. **...उत्तरवादी**
प्रथम अपिलीय अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक(प्र.),
करनिर्धारक व संकलक खाते,
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालय,
जुनी इमारत, तळमजला, महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१.
जन माहिती अधिकारी तथा उप करनिर्धारक व संकलक(जकात),
बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत,
३ रा मजला, पलटन रोड,मुंबई ४०० ००१.

----निर्णय---

द्वितीय अपीलांचे दिनांक - ०८-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त तसेच उपनिर्धारक व संकलन (जकात) तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुलुंड चेकनाक्यावरील अधिकारी / कर्मचारी आणि महानगरपालिकेचे खाजगी ठेकेदारांचे कर्मचारी तसेच बृन्हमुंबई महानगरपालिका आणि प्रत्येक खाजगी ठेकदार यांच्यात करारान्वये झालेल्या निविदेच्या प्रत्येक वर्षाच्या प्रती व प्रत्येक खाजगी ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी महापालिकेला जकातीद्वारे प्राप्त करुन दिलेल्या उत्पन्नाच्या लेखाविषयक प्रतिवर्षाचा अहवाल, महानगरपालिकेने खाजगी ठेकेदाराला त्याच्या कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यासंबंधी दिलेल्या रकमांचा प्रत्येक महिन्यांच्या अहवालाच्या प्रती, खाजगी ठेकेदाराचे नांव, वास्तव्याचा पत्ता, फोन नंबर, त्यांच्या कार्यालयाचा पत्ता, फोन, व्यवसास नोंदणी दाखला प्रत,महानगरपालिकेतील जकात वसुलीचे स्थान, तसेच खाजगी ठेकेदार भरत असलेल्या विविध कराची नक्कल प्रत,बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व मुलुंड जकात नाक्यावरील प्रत्येक कार्यालयातील १) अधिकारी/कर्मचारी व खाजगी ठेकेदांराच्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण नावे,२)

पद, ३) शैक्षणिक अर्हता, ४) जकात नाक्यावर नियुक्त दिनांक, ५) त्यांचे पेस्केल, ६) पी.एफ., ७) ग्रॅज्युइटी, ८) विमा, ९) संपूर्ण पगार, १०) इतर सुविधा इत्यादीची माहिती, तसेच खाजगी ठेकेदार व चेकनाक्यावरील संबंधित अधिकारी निविदेमधील कामगारांविषयक अटी/शर्तीचा किंवा आपल्या कामगार कायदयानुसार पालन होत असल्यास त्याबाबत संबंधित कामगार कायदे ह्यांचे प्रती देऊन कोणत्या कामगार कायद्यांचे पालन झाले ते दाखवावे आणि आपल्या कोणत्या कामागार कायद्याचे पालन झाले नाही दाखवून त्यांची अंमलबजावणी करुन त्यांची भारतीय घटनेच्या अनुच्छेदाप्रमाणे पारदर्शक माहिती द्यावी. माहिती स्पीड पोस्टद्वारे मिळावी असे नमुद केलेले दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५-०४.२०१० रोजी सदर अर्ज हा उपकरनिर्धारक व संकलन (जकात) यांचेकडे हस्तांतरण केलेले आहे असे दिसून येते. अर्जाच्या संदर्भामध्ये व हस्तांतरण झालेल्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती दिलेली दिसून येते. त्यामध्ये एकूण ८७ छांयाकित प्रतीमध्ये उपलब्ध असलेली माहिती प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे एकूण रु. १७४/- जकात कार्यालयामध्ये येऊन भरल्यास सात दिवसांमध्ये छांयाकित प्रती उपलब्ध होतील त्या घेऊन जाव्यात असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक १८-०३-२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्यांचे पूर्वीच्या अपिलांच्या संदर्भामध्ये सुद्धा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १७-०५-२०१० रोजी दोन अपिले अनुक्रमे, मा.आयुक्त अपिलीय प्राधिकारी आणि करनिर्धारक व संकलक (जकात) अपिलीय अधिकारी यांचे कडे दाखल केले. पुन्हा सदरचे अपिल हे करनिर्धारक यांच्याकडे हस्तांतरित केलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १५-०६-२०१० रोजी मुलुंड येथील दोन्ही चेकनाक्यांची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक व वेळ निश्चित करुन अपिलार्थीनी उपस्थित प्रतीचे निरीक्षण करुन त्यांचे त्यास दिलेले दिसून येते व त्याबाबत विहित शुल्क आकारावेत असाही आदेश दिलेला दिसून येतों. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, आयुक्त कार्यालयातील अर्ज हे मुदतीत हस्तांतरण केलेले नाही व हस्तांतरण करताना सहाय्य वगैरे घेतलेले नाही अशी तक्रार द्वितीय अपिलामध्ये नमुद केलेले आहे व तसे दिशाभूल करणारी अशी उत्तरे दिलेली आहेत. त्यांच्याविरुद्ध शास्ती करावी अशी विनंती केली. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिल मेमोमध्ये जी कारणे दिलेली आहेत त्या कारणांमध्ये माहिती उपलब्ध झाली किंवा नाही त्याऐवजी विश्लेषण केलेले आहे. युक्तीवाद करताना त्यांनी आयोगापुढे माहिती उपलब्ध झाली नाही अशा प्रकारचा युक्तीवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगपुढे असे सांगितले की, सर्वात प्रथम माहिती जर करनिर्धारक या कार्यालयात उपलब्ध आहे तर अपिलकर्ता यांनी आयुक्त यांच्याकडे माहितीसाठी अर्ज करणे योग्य नव्हते. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ६** प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना अर्ज करणे अपेक्षित असते व त्यामुळे आयुक्तांकडे अर्ज करावयाचे व योग्य रीतीने हस्तांतरित केलेले नाही. असे अर्ज करावयाचे हे योग्य नव्हते याचा अर्थ अपिलकर्ता माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा कार्यालयातील अधिकाऱ्यांना वेठीस कसे धरता येईल याबाबत तत्पर दिसून येतात.

तसेच अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. मुळातच अर्जामध्ये ठेकेदारानी जकात किती वसूल केले याबाबत विचारणा केलेली आहे. त्या संबंधात खाजगी ठेकेदार जर नेमले असतील तर ते जकात वसूलीकरीता नेमलेले असतात. जकात वसूलीही महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनाकडूनच केली जाते. जकातनाका ठेकेदाराची नियुक्ती केली जातात ते त्याला किती किंवा इतर साफसपाईच्या संदर्भामध्ये जे नियुक्ती केले जातात तसेच ठेकेदाराला नियुक्त केल्यानंतर ठेकेदारांचे त्यांनी घेतलेल्या कर्मचाऱ्यांना किती वेतन देतात व कोणकोणत्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती करीता याबाबतची माहिती ही कार्यालयामध्ये उपलब्ध नसते व त्यामुळे तशी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. अपिलकर्ता यांना जी बदली झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे दिली त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जकातनाका कोणत्याही कर्मचाऱ्यांना ३-४ महिन्यांनंतर ठेवले जात नाही

तर बदली केले जाते व त्यामुळे बदली केलेल्यांची यादी त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ती ८७ प्रती छांयाकित प्रती उपलब्ध आहे त्याबद्दल त्यांना खर्च द्यावयाचे म्हणून कळविलेले आहे व त्याप्रमाणे त्यांनी खर्च भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावयास पाहिजे होती ती घेतलेली नाही. तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, यापूर्वी सुद्धा अपिलकर्ता यांना दिनांक १८-०३-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. महापालिकेने जकात नाक्यावर नेमलेले ठेकेदार मे.क्रिस्टल ट्रेड कॉम.प्रा.लि. हे नाक्यावरील साफसफाईच्या कामाशी संबंधित असून मे.एस.टेलिव्हॉइस अँड सर्व्हिसेस प्रा.लि. हे जकात नाक्यावरील कॉम्प्यूटर सिस्टमशी संबंधित असून मे.विमान एंटरप्राईझेस हे वजनकाटयाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या कर्मचाऱ्यांची माहिती जकात खात्याने जतन करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे सदरहू माहिती मुख्यालयाकडे नाही असे उप के.वस.(ज) व जन माहिती अधिकारी म्हणाले. तसेच अपिलकर्ता यांना ठेकेदाराच्या कामाचे स्वरुप समजावून सांगितले होते व त्यामुळे त्यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे ८७ पृष्ठांच्या छांयाकित प्रती हव्या असतील तर त्यांनी रु.१७४/- भरणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६६/अपिलक्र ६३०९/२०१०

येरळवाडी विकास मंडळ,
द्वारा, चंद्रकांत सी. बागल,
५ सी, अव्वल बाग इस्टेट, ९४ सी, डी.एस.पी रोड,
दादर(पूर्व),मुंबई - ४०० ०१४. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हा अधिकारी कार्यालय (पुर्नवसन शाखा),
सातारा, जिल्हा - सातारा.

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तथा पुर्नवसन अधिकारी,
सातारा, जिल्हा - सातारा. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक :०७.०२.२०११
अपिलकर्ता - उशिरा उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०४-०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी (पुनर्वसन) कार्यालय, सातारा यांच्याकडे येरळवाडी पुनर्वसनाच्या संदर्भामध्ये एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.०६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे पुन्हा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्ता हे उशिराने उपस्थित झाले व त्यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने आतापर्यंत त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचे दिनांक ०७.०४.२०१० च्या अर्जाची दखल घेतली नव्हती व त्या संदर्भामध्ये संबंधित लिपिकास नोटीस देण्यात आलेली आहे. परंतु प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. वास्तविक प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या मेमोचे अवलोकन केले असते तर त्यात त्यांना अपिलकर्ता यांनी दिनांक ०५.०४.२०१० रोजीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये संदर्भ आढळून आला असता व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देता आले असते. परंतु तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्याबाबत कोणतीही कर्तव्य तत्परता दाखविलेली नाही व अपिलकर्ता गैरहजर या कारणास्तव अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. म्हणजे त्यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना कार्यकारी अभियंता, धोम पाटबंधारे विभाग यांची माहिती त्यास दिनांक ०३.०२.२०१० रोजी जानेवारी २०१० च्या अर्जाप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु काही माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे तसे आयोगापुढे सांगितले. परंतु त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये पाटबंधारे खात्याने माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा मुद्दा क्र. १, २ व ३ इत्यादीच्या बाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना त्या संदर्भामध्ये एकूण १० मुद्यांमध्ये मुद्देनिहाय माहिती छांयाकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी तथा पुर्नवसन सातारा यांनी मंडळ अधिकारी श्री.पी.एम. दगडे यांना कारणे दाखवा नोटीस जर दिली असेल तर त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे **कलम २०(१)** अन्वये शास्ती लादणे आवश्यक राहील. जेणे करुन माहितीचा अर्ज हा अशा पद्धतीने गहाळ करणे किंवा संबंधित जन माहिती अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून न देण्याच्या वृतीस आळा बसेल व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

---आदेश---

४) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक ०५.०४.२०१०(०७.०४.२०१०) च्या अर्जामधील एकूण १० मुद्यांच्या संदर्भात मुद्देनिहाय माहिती उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

५) अपिलकर्ता यांचे दिनांक ०५.०४.२०१०(०७.०४.२०१०) च्या माहिती अर्ज हा कार्यवाही साठी न घेतल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास न आणल्यामुळे तत्कालीन अव्वल कारकून श्री.पी.एम.दगडे यांच्याविरुद्ध रु.१००००/- शास्ती लादण्यात येईल. सदर शास्तीची वसूली ही त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यात येवून " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)." या लेखाशिर्षा मध्ये जमा करण्यात यावी. सदरची वसूली ही जिल्हाधिकारी कार्यालयात होण्यासाठी निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२१३/अपील क्र.६२११/२०१०

श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला,
काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड,
घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६. ...अपिलकर्ता

----विरुद्ध----

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७.
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७. **...उत्तरवादी**

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - २६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सहाय्यक आयुक्त (इमारत व कारखाने) एन वार्ड यांच्याकडे, काकुभाई रंगवाला बिल्डीगच्या संदर्भामध्ये पावसाळी छप्पर लावण्याची परवानगी देण्याच्या संदर्भामध्ये एकूण ८मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०६-०९-२०१० रोजी अपिलकर्ता यांना सर्व मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामध्ये संबंधित नस्तीचे निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ०९-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १७-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कळविलेले असल्यामुळे अपिल निकाली काढण्यात आले असे दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी त्यांचे माहितीचा अर्जामध्ये Bootlegger Family पावसाळी छप्पर टाकण्याचा अर्जा संदर्भामध्ये झालेली कार्यवाहीची संपुर्ण कागदपत्रांची छायंकित प्रती मागितलेली होती असे असताना नस्तीचे निरीक्षण करावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी कळवायाची आवश्यक नव्हती. त्या संपूर्ण नस्ती मध्ये जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्या सर्व कागदपत्रांची छायांकित प्रतीचा खर्च तयार आहे. इतर मुद्यांच्या संदर्भामध्ये सुद्धा त्यांच्याकडे कागदपत्रे जी उपलब्ध आहे त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित होते. त्यांनी मागितलेले मंजूर नकाशा सदंर्भामध्ये दिनांक ०८-०५-१९८० चा नकाशा उपलब्ध नाही. हे म्हणणे म्हणजे माहिती उपलब्ध असून सुद्धा देण्याची टाळाटाळ करणे असे म्हणावे लागते. अपुर्ण माहिती दिलेली असताना सुद्धा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी न घेता निर्णय दिलेला

आहे व ते अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अधिकार २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या त्यांनी दिलेली आहे व त्या व्याख्येमध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व मिळविता येण्याजोगी माहिती त्यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेखे, कागदपत्रे यांचे निरीक्षण करुन व त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व त्यामुळेच अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात आलेले होते. प्रत्येक नस्तीमध्ये आवश्यक कागदपत्रे व अनावश्यक कागदपत्रे असतात. त्यातील कागदपत्रे अर्जदारास आवश्यक असतील त्या कागदपत्रांचे छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते. असे असल्याने जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकरली असे होत नाही. परंतु त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी सर्वच कागदपत्रांची माहिती मागितलेली आहे आवश्यक व अनावश्यक कागदपत्रांचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्याबाबत आपण खर्चाचा भरणा केला असता व तसे ही त्यांना दिनांक ०६-०९-२०१० चे पत्र मिळाले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र आयोगाकडे सादर केलेले आहे. त्यावर कार्यालयतून सदरचे पत्र निर्गमित केल्याचे दिसून येते. त्यावरील पत्ता श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला, काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड, घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६ असे दिलेले आहे व त्यावरुन सदरचे पत्र हे निर्गमित केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की,अशा प्रकारचे पत्र हे साध्या टपालाने पाठविले जाते व तसे त्यांनी करण्याची पद्धत आहे. दिनांक ०६-०९-२०१० रोजीचे पत्र त्यांना निर्गमित करण्यात आलेले आहे. राज्य माहिती आयोगाची सुनावणीची नोटीस सुद्धा अपिलकर्ता यांना त्याच दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आलेली आहे व ती त्यांना उपलब्ध झालेली आहे व जन माहिती आधिकारी किंवा अपिलीय अधिकारी यांनी पाठविलेल्या पत्रात त्यांचा पत्ता पाठविलेले पत्र त्यांना उपलब्ध झालेले नाही असा निर्ष्कष काढता येणार नाही असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक असल्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक १०-०८-२०१० रोजी अर्जांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०९-२०१० चे पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे असून सुद्धा युक्तीवाद करताना त्यांनी मुद्दा क्रमांक ४ मधील sanction plan उपलब्ध नाही याबद्दल मात्र आयोगापुढे असे सांगितले की, यापूर्वी sanction plan पाहिलेले आहे व ते आता उपलब्ध नाही असे जे म्हणतात ते योग्य नाही. परंतु त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पुन्हा शोध घेऊन sanction plan उपलब्ध झाल्यास दिला जाईल. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

३) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक १०-०८-२०१० च्या अर्जामध्ये मुद्देनिहाय मागितलेली माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय माहिती उपलब्ध असलेल्या

कागदपत्रांच्या छांयाकित प्रतीच्या स्वरुपामध्ये Sanction plan उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२१२/अपील क्र.६२१२/२०१०

श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला,
काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड,
घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६. ...अपिलकर्ता

----विरुद्ध----

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७. **...उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपीलाचा दिनांक - २६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२०१० (०९-०८-२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य) एन वार्ड यांच्याकडे मे. वसंत भेलपुरी व थंडपेय यांच्याकरीता दिलेले अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये एकूण ८ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ०९-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला असल्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती उपलब्ध करुन देत नाही व माहिती लपविण्याचा प्रयत्न करतात व त्यांचे अर्जाच्या संदर्भामध्ये काही कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दिनांक ११-०८-२०१० रोजी हॉटेल मालकाकडून हॉटेल संबंधित माहिती न पुरविण्याचे कळविलेले असल्याने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसे अपिलकर्ता यांना दिनांक ३१-०८-२०१० रोजी कळविलेले आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये सुद्धा निर्णय दिलेला दिसून येत नाही मात्र आता आयोगापुढे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांना मागितलेली सर्व कागदपत्रे देण्यात येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १३-०१-२०११ रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आतापर्यंत कोणतेही तपशील किंवा माहिती किंवा पत्रव्यवहार मिळालेला नाही. त्यावर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती

जरी उपलब्ध करुन दिलेली नसेल तर आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक १३-०१-२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

हॉटेल मालकांनी हरकत घेतली म्हणून माहिती उपलब्ध करुन देता आली नाही हे म्हणणे म्हणजे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निर्कष काढावा लागतो. कोणत्या नियमाप्रमाणे अनुज्ञाप्ती दिलेली असेल तर ते सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होतो. अनुज्ञाप्ती प्रत्येकाची वैयक्तिक माहिती होत नाही व त्यामुळे अनुज्ञाप्तीच्या संबंधित सर्व कागदपत्रे ही सार्वजनिक अभिलेखे असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे व त्यामुळे तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध **कलम २०(२)** अन्वये शिस्तभंगाची शिफारस करणे आवश्यक राहील. आयोगापुढे सुद्धा गांभीर्याने उपस्थित न होता खुलासा सादर न करता जन माहिती अधिकारी हजर झालेले आहेत. जन माहिती अधिकारी हजर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी जर माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल तर ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय कागदपत्रे छायांकित प्रती देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

४) **अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक १०-०८-२०१० च्या अर्जामध्ये व अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये मागितलेली मुद्देनिहाय माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

५) **अपिलकर्ता यांचे दिनांक १०-०८-२०१० अर्जाच्या अनुषंगाने तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ११(१) अन्वये कोणतीही कारवाई न करता हॉटेल मालकांनी हरकत घेतल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही असे कळविल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निर्ष्कष काढावा लागतो व त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते. सदर शिस्तभंगाची कारवाई त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे सक्षम अधिकारी यांना करावयाची असल्यामुळे सदरच्या**

निर्णयाची एक प्रत आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६५/अपिलक्र ६३१३/२०१०

श्री. प्रकाश पा.कटके,
१०२/३, अे विजया वैशाली नगर,
के.के. मार्ग, महालक्ष्मी (पूर्व),
मुंबई - ४०० ०११. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद - ४३१ ००४. महाराष्ट्र.

जन माहिती अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद - ४३१ ००४. महाराष्ट्र. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०१.०२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडे, duplicate Migration Certificate and Merit Certificate मिळावे असा माहिती अर्ज केला होता. माहितीचा कालावधी ०९.०१.१९९१ ते २५.०१.२०१० असून त्याकरीता त्यांनी फी सुध्दा भरलेली आहे. त्याप्रमाणे DO99549 for MERIT CERTIFICATE AND MIGRATION CERTIFICATE OF M.A. (Eco.) examination held in April 1983 under Seat No.10760 उपलब्ध करुन द्यावी म्हणून माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०५.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी duplicate Migration Certificate उपलब्ध करुन देण्याकरीता Original Migration Certificate हे गहाळ झालेले आहे व पुढील शिक्षणासाठी आवश्यक आहे असे बॉण्ड पेपर द्यावे लागेल. तसेच Merit Certificate च्या संदर्भामध्ये जे जे विद्यार्थी परीक्षा with exemption पास झालेले आहेत त्यांना दिले जात नाही व त्यामुळे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०३.०८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०६.०९.२०१० रोजी दिलेला आहे व त्यामध्ये त्या कार्यालयाने Statement of Marks, Migration Certificate, अर्थशास्त्रामध्ये जे गुणवत्ता यादीत आहेत व Ordinance ची छांयाप्रत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे दिलेले आहे. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांनी राज्य माहती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. द्वितीय अपिलाच्या सुनावणीमध्ये अपिलकर्ता यांनी त्यांना Migration Certificate माहिती अधिकारात करुन द्यावे असे मागितलेले असून सुध्दा अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेले नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, Merit Certificate सुध्दा त्यांनी पूर्वी उपलब्ध करुन दिलेले नव्हते व Migration Certificate मात्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले होते. तरी सुध्दा त्यांनी आयोगापुढे शपथपत्र दाखल केलेले आहे व त्यामध्ये Merit Certificate उपलब्ध करुन द्यावे. या सदंर्भात Ordinance 101 व 102 च्या प्रती विश्लेषण केलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, Merit Certificate हे त्यामुळेच उपलब्ध करुन दिलेलेच नाही असे दिसून येते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे त्यांना Merit Certificate उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्यामध्ये **सार्वजनिक प्राधिकरणात** असलेली व अधिनियमाने मिळविता येण्याजोगी माहिती त्यात एखादे काम, कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे यांची पाहणी करुन व त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे तसेच **"माहिती"** या संज्ञेचा अर्थ **सार्वजनिक प्राधिकरणामध्ये** साहित्यांच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, दस्तऐवज,अभिलेखे इत्यादींचा समावेश

होतो. यावरुन उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा होतो. त्याप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध नाही ती तयार करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक ०५.०३.२०१० रोजी त्यांचे दिनांक ०१.०२.२०१० रोजीच्या अनुषंगाने उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिलाच्या मेमोचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांना उपलब्ध असेलेली कागदपत्रे, दस्तऐवज किंवा अभिलेखे यांच्या छांयाकित प्रतीच्या ऐवजी त्यांनी Merit Certificate च्या संदर्भामध्ये गुणवत्ता निकाषावर कारवाई करुन मुळ Merit Certificate अपेक्षित दिसून येते. ती बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या वर नमुद केल्याप्रमाणे तरतुदीमध्ये येत नाही. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

जन माहिती अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीची माहिती आहे असे दिसून येत नाही. माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही बाब सिद्ध करण्याची जबाबदारी अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची आहे. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केलेले नाहीत व त्यामुळे मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ तरतुदीचे योग्य रीतीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांना सुनावणीसाठी उपस्थित राहण्याकरीता त्यांनी समज देणे अपेक्षित आहे.त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

४) अपिल निकाली काढण्यात येते.

५) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

६) सदर निर्णयाची एक प्रत मा. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना स्वतंत्रपणे उचित कारवाईसाठी पाठविण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६७/अपिलक्र ६३१०/२०१०

येरळवाडी विकास मंडळ,
द्वारा, चंद्रकांत सी. बागल,
५ सी, अव्वल भंग इस्टेट, ९४ सी, डी.एस.पी रोड,
दादर(पूर्व),मुंबई - ४०० ०१४. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
मु.पो.वडुज आणि येरळवाडी
ता.खटाव, जिल्हा - सातारा- ४१५ ००६.

२) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत
येरळवाडी, ता.खटाव, जिल्हा - सातारा- ४१५ ००६.

३) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
उप विभागीय कार्यालय, वडुज, जिल्हा परिषद,
सार्वजनिक बांधकाम विभाग, वडुज, जिल्हा - सातारा. ...उत्तरवादी

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.

जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०५.०४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, खटाव यांच्याकडे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या संदर्भामध्ये धारीकेतील गाव खटाव, जिल्हा सातारा, व मु.पो.येरळवाडी या संदर्भात दिनांक ०१.०४.२००५ ते ३१.०३.२०१० या कालावधीतील माहिती व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नियुक्त केलेले अधिकारी यांची माहिती द्यावी. तसेच येरळवाडी ग्रामपंचायत सभागृहासाठी येणाऱ्या प्रकल्पाच्या संदर्भामध्ये एकूण ५ विषयांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक ०७.०४.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या मागणीनूसार माहिती ही जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जिल्हा सातारा यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने सदरचा अर्ज ग्रामसेवक, ग्रामपंचायत येरळवाडी यांच्याकडे वर्ग करण्यात येत आहे. त्यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर ग्रामपंचायत येरळवाडी दिनांक ११.०५.२०१० रोजी मागितलेली संपुर्ण माहिती इंग्रजी या भाषेत असल्याने इंग्रजी भाषेचा अर्थ कळत नसल्यामुळे मराठी या भाषेतून मागवावी. ग्रामपंचायतीकडील उपलब्ध माहिती समक्ष पहाण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये वेळ व दिनांक कळवून उपस्थित राहील्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते.त्यावर दिनांक १६.०५.२०१० रोजी तुम्ही स्वतः diploma धारक आहे व त्यामुळे भाषेची काही अडचण असल्यास काही कारण नाही तसे अर्जामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती द्यावयाची आहे व कार्यालयात भेट दऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन जावी असे त्यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २१.०६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १९.०७. २०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय माहिती उपअभियंता सातारा जि.प.(बां.) उपविभाग खटाव वडूज यांना कळविलेले दिसून येते व तसेच दिनांक १९.०७.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरचा अर्ज हा इंग्रजी भाषेत असल्यामुळे त्याबाबत अर्थ कळत नसल्यामुळे तसे अपिलकर्ता यांनी कळविलेले होते. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही एकूण १४ विभागांच्या विषयी आहे व त्या विभागांना कळविलेले आहे व अर्जदारास ज्या विभगाने कळविलेले आहे व यातील काही विभाग उप अभियंता सातारा, जि.प. बांधकाम उपविभाग वडूज यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १९.०७.२०१० च्या अन्वये माहिती तयार असून रक्कम भरणेकामी कळविलेली आहे व गट विकास अधिकारी पंचायत समिती खटाव (वडूज) यांचे पत्र दिनांक १०.०८.२०१०अन्वये मुद्दा क्र. १ ते ७ बाबतची माहिती तयार असून त्याचे रु.१२/- भरणेकामी कळविलेले होते. परंतु अर्जदार यांनी रक्कम भरलेली नाही. तसेच दिनांक १९.०७.२०१०च्या अर्जामध्ये सुद्धा या सुंदर्भामध्ये रु.१२/- भरणे आवश्यक आहे व तसेच पुरविण्यात येणारी माहिती एकूण पाने संख्या २०४/- इतकी आहे. प्रती पाने रु.२/- प्रमाणे रु.४०८/- व पोस्टेज खर्च अंदाजे रु.१००/- अशी एकूण रक्कम या कार्यालयाकडे जमा करण्यात यावी. माहिती शुल्क पुरविल्यानंतर माहिती सत्वर देण्यात येईल. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी खर्च भरणा केलेला आहे. परंतु त्यांना येरळवाडी बहुउद्देशीय सार्वजनिक सभागृह बांधण्याचा व

दलितवस्ती अंतर्गत रस्ता खडीकरण व डांबरीकरण संदर्भामध्ये Voucher देयके इत्यादी बाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. प्राप्त खर्च भरणा एकत्रित करण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी ग्रामसेवक ग्रामपंचायत उपअभियंता या संदर्भामध्ये नियम असलेले संपुर्ण कागदपत्रे, Voucher,अभिलेख व इतर कागदपत्रांची छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

अपिलकर्ता यांनी अर्जदार म्हणून माहिती मागताना कोणतेही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अनेक विषय असल्यास व त्या विषयाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त केले असते त्या संबंधित जन माहिती अधिकारी यांचे त्याच विषयाच्या संदर्भामध्ये माहिती मागणे ही अपेक्षित असते. जनेकरुन अशी माहिती ३० दिवसामध्ये उपलब्ध होवू शकते. एखाद्या अर्जामध्ये अनेक विषयी माहिती मागितलेली असल्यास तो अर्ज हस्तांतरीत करुन त्याप्रमाणे ३० दिवसात माहिती मिळेल त्याबाबत खात्री देता येत नाही व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती ३० दिवसात उपलब्ध होवू शकते असे असले तरी अपिलकर्ता यांचे दिनांक ०५.०४.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने उर्वरीत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्या करीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश---

३) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना येरळवाडी बहुउद्देशीय बांधकामाच्या संदर्भामध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भामध्ये Voucher देयके प्रमाणपत्रे यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच येरळवाडी रस्ते खडीकरण व डांबरीकरणाच्या संदर्भामध्ये Voucher देयके, अंदाज पत्रके वगैरे कागदपत्रांच्या स्वरुपात छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक तसेच उपअभियंता हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./४९६४३/अपिलक्र ६३३३/२०१०

श्री.विजय एच.जयस्वाल,
३५, कांता निवास, डी.जे.रोड,
विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
मु.पो.रत्नागिरी,
जिल्हा - रत्नागिरी.

जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,
मालगुंड पोलीस स्टेशन, मु.पो. मालगुंड,
जिल्हा - रत्नागिरी. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०१.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - प्रतिनिधी उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०.०६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक यांच्याकडे दिनांक ११.०२.२००९ रोजी दाखल केलेली FIR कलम ३६३, ३६४,५०६ आणि ३४ श्री. जगदीश कदम आणि इतर यांच्या विरुद्ध तसेच दिनांक ०९.०२.२००९ चे श्री. सिद्धार्थ जयस्वाल यांनी दिलेले पत्रांच्या संदर्भामध्ये तपासाबद्दलची माहिती व तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेली कार्यवाहीची माहिती सन २००८ पासून ते आतापर्यंतची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी सदर अर्ज हा दिनांक २४.०६.२०१० रोजी उप विभागीय पोलीस अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०६.०७.२०१० रोजी माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त खर्च रु.३१/- इतका आहे व शुल्क कार्यालयाकडे प्रदान करण्यात यावे किंवा Money order किंवा शासकीस कोषागरे

यांच्याकडे करावे. चलनाची प्रत पाठवून व माहिती ३० दिवसांत घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २३.०७.२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २३.०९.२०१० रोजी देण्यात आला असून अतिरिक्त खर्च भरणा केला नसल्यामुळे सदर अपिल हे फेटाळण्यात ओलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. द्वितीय अपिल मेमोमध्ये जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे नमुद केलेले आहे. जन माहिती माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जो अर्ज केलेला आहे तो जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता पोलीस निरीक्षक यांच्याकडे केलेले आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर अर्ज दिनांक २४.०६.२०१० रोजी प्राप्त झालेले आहे. अर्जात मागितलेली माहितीच्या संदर्भात दिनांक ०६.०७.२०१० रोजी म्हणजे विहित मुदतीत अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भात अतिरिक्त खर्च भरणा रु.३१/- करावा असा तपशीलात कळविलेले होते. तसेच मुद्दां क्र.१, २ व ३ च्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय उत्तर दिलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांनी खर्च भरणा सुद्धा केलेला नाही व माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असूनही केव्हाही माहिती घेण्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित झालेले नाही व त्यामुळे प्रथम अपिल याच कारणास्तव फेटाळण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे बरोबर असून अपिलकर्ता यांनी स्वतः अर्ज करताना जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेले नाही व त्यामुळे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हा मुद्दा निकाली निघतो. अर्जातच अपिलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांनी दिनांक ०६.०७.२०१० रोजी कळविल्यानंतर त्यांनी खर्च भरणा करुन व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते तसे न करता त्यांनी प्रथम अपिल व द्वितीय अपिल दाखल केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५०१६२/अपिलक्र ६३३७/२०१०

श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले,
सिध्दिविनायक प्रसार डॉ. शामा प्रसाद,
मुखर्जी रोड, डोंबिवली (पूर्व), ४२१ २०१. ...अपिलकर्ता
ता.कल्याण,जि.ठाणे.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव),
शहर बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई' विभाग, ३ रा मजला,
१० शेख हफिअुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर -२,
बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई' विभाग, ३ रा मजला,
१० शेख हफिअुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २०-०७-२०१० (२२-०७-२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई'विभाग यांच्याकडे मुंबई उच्च न्यायालयाची इमारतीच्या संदर्भामध्ये ऐतिहासिक वास्तू म्हणून कोणत्या तारेखस, कोणत्या महिन्यास, कोणत्या वर्षी घोषित करण्यात आली, त्या भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ किती चौरस मीटर आहे, तसेच

भुखंडावर एकूण क्षेत्रफळ किती चौरस मीटर बांधकाम करण्यात आलेले आहे, संबंधीत नव्याने करण्यात येणाऱ्या बांधकामाबाबत जी नियमावली आहे, अेनॅक्स बिल्डिंगवर नव्याने चौथा मजला बांधण्यात आला तसेच संबंधित अेनॅक्स बिल्डिंगच्या दोन्ही बाजूस जुनी बांधकाम तोडून (जे पूर्वी तळ अधिक एक मजल्याचे) नव्याने चौथा मजला पर्यंतचे बांधकाम करण्यात आले सदर बांधकामामुळे एकूण किती चौरस मीटर बांधकाम नव्याने करण्यात आले, नव्याने करण्यात येणाऱ्या बांधकामाबाबत राज्य शासनाच्या वतीने जो प्रस्ताव दाखल करण्यात आला त्या प्रस्तावाची छायांकित प्रत, नवीन बांधकामास मान्यता देताना मुंबई संस्कृती वारसा जतन समिती कोणकोणत्या निकषात शिथिलता प्रदान केली, मुंबई संस्कृती वारसा जतन समितीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रती, तसेच बांधकाम मंजूरीच्या छाननीपत्रकाची तसेच धारिकेची सत्यप्रत मिळावी अशी माहिती एकूण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती कालावधी सन २०००-२०१० आहे. माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १३-०८-२०१० रोजी मागितलेली माहिती बाबतची धरणी कार्यालयात उपलब्ध आहे. संबंधित धरणी चे अवलोकन हवे असलेले आराखडे व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती खालील शुल्क भरुन आपणांस उपलब्ध करुन घेवू शकता. झेरॉक्स प्रतीसाठी लागणारा खर्च आपणांस करावा लागेल व त्याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.मंजूर आराखड्याच्या व कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसाठी व त्यासाठी जाण्यायेण्यासाठी लागणारा खर्च अर्जदारास करावा लागणार आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २५-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २९-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी खर्च भरावे असे कळविलेले असल्यामुळे व अपिलकर्ता यांनी खर्च भरणा केला नसल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिला सोबत त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे व जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न देता अर्ज निकाली कसा निघू शकतो याचा अर्थबोध होत नाही. अर्जदाराने आपल्या अर्जात स्पष्टपणे कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतींची मागणी केलेली आहे ती पोस्टाने पूर्वसुचना देवून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत संबंधित धारिणीची अवलोकन करुन हवी असलेले आराखडे व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती खालील शुल्क भरुन आपणांस उपलब्ध करुन घेवू शकता. झेरॉक्स प्रतीसाठी लागणारा खर्च आपणांस करावा लागेल. प्रमाणित प्रती हव्या असल्यास खालील शुल्क आकरण्यात येईल या गोष्टीचा संबंधच येत नाही कारण अर्जदाराने अर्जात कुठेही कागदपत्रे बघण्याबाबत वेळ व दिवस याची मागणी केलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्याची टाळाटाळ करीत आहेत. तसेच अर्जदाराने ज्या कागदपत्रांची मागणी केली आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रमाणित प्रतीसाठी रु.२५/- एका बाजूस हे शुल्क कोणत्या हिशोबाने नमुद केले आहे याचा अर्थबोध होत नाही. कारण एका पानांच्या दोन्ही बाजूच्या झेरॉक्स प्रत काढण्यासाठी रु.२/- खर्च येतो व प्रमाणित करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे. तसेच अर्जदाराने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसाठी जो खर्च येतो त्याची एकूण रक्कम नमुद करणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी तसा खर्च नमुद केला असता तर अर्जदाराने व्यक्तीश: किंवा मनीआर्डरने शुल्क पाठविले असते व त्यामुळे तपशीलात नमुद केलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतूदी अन्वये नि:शुल्क देण्याचा आदेशीत व्हावेत व दंडात्मक कारवाई व्हावी असे नमुद केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती अधिकारी २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"**या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येमध्ये कोणत्याही **सार्वजनिक प्राधिकरणाकडे** असलेली किंवा त्याच्या नियत्रंणात असेलेली व अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे व त्यामध्ये १) एखादे काम, दस्तऐवज,अभिलेख यांची पहाणी करणे; २) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखाच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे; ३) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे; ४) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉलिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्ट आऊट) मार्फत माहिती मिळविणे याबाबतचा अधिकाराचा समावेश होतो. त्याप्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५ चे **नियम ४** मधील तरतुदीप्रमाणे निरीक्षण करण्याकरीता अपिलकर्ता यांना कळविलेले होते. माहिती जर व्यापक प्रमाणात असेल व जुनी असेल तर निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांची माहिती उपलब्ध करुन घेणे असे त्यांची तरतुद आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्यावे लागते. छायांकित प्रतीच्या संदर्भामध्ये महानगरपालिका यांनी खालील नियमाच्या अनुषंगाने त्यांनी खर्च भरणा व खर्चासंदर्भामध्ये आकरणी कळविण्यात आली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही वैयक्तिक आकरणी करण्यात आलेली नाही. मात्र छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरीता कार्यालयात झेरॉक्स मशीन उपलब्ध नसेल तर त्याकरीता बाजारात जाऊन छायांकित प्रती काढून उपलब्ध करुन द्यावी लागते. त्याकरीता संपुर्ण नस्ती देण्याकरीता कोणत्याही प्रकारच्या वाहतूक वाहन महापालिकेने पुरविलेली नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी महापालिकेतील कर्मचाऱ्यास वाहतूक वाहनाचा खर्च करावा लागतो व वाहतूक वाहनाचा खर्च करण्यासाठी कळविण्यात आले होते. परंतु असे असले तरी महापालिकेस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरीता स्वतंत्रपणे नियम करण्याचा अधिकार नाही. महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या **नियम ४** प्रमाणे प्रत्येक विभागाने नकाशे व आरखडा उपलब्ध करुन देण्याकरीता खर्चाची आकरणी करण्याकरीता नियम केले असतील त्याप्रमाणे नकाशे व आराखड्या करीता खर्चाची आकारणी करणे तसेच A साईज आकाराचे कागदापेक्षा मोठा आकार असेल तर प्रत्यक्ष झेरॉक्स आकरणी खर्च व टपाल खर्च व नेहमीच्या आकाराचा कागद असेल व माहिती तयार असेल रु.२/- प्रती पृष्ठे आकरण्यात यावी अशी तरतूद आहे व त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्याच प्रमाणे आकारणी करणे आवश्यक होते. प्रमाणित करणे व सांक्षाकित करणे यामध्ये निश्चित फरक आहे. प्रमाणित करुन द्यावयची असेल तर पुर्वीच्या नियमाप्रमाणे आकरणी करणे आवश्यक असते. परंतु सांक्षाकित करण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे अतिरिक्त शुल्क घेणे अपेक्षित नाही. सांक्षाकित करणे यांचा अर्थ **"माहिती अधिकारात"** छायांकित प्रती उपलब्ध करुन दिली व प्रत्येक अशाप्रकारे स्वाक्षरी करुन देणे व त्याप्रमाणे अतिरिक्त खर्च पुन्हा भरणे आवश्यक नाही. अपिलकर्ता यांनी निरीक्षण करावे असे जे कळविलेले आहे ते राज्याच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे असल्याने माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे असे निकष काढण्यात येत नाही. त्यांनी वरील युक्तीवादाप्रमाणे त्यांना जी माहिती हवी आहे ती प्रती पृष्ठे संख्या कळवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्या अधिनियमाचे **कलम ७(३)** प्रमाणे मागितलेली माहितीचे मुद्देनिहाय संदर्भामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांची संख्या व प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे व तसे टपाल खर्च अपिलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते व त्याप्रमाणे कळविल्यावर अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश-----

३) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांनी मागितलेली माहिती एकूण ८ मुद्यांच्या संदर्भामध्ये जी धारिणी असेल त्या धारिणीमध्ये असलेले एकूण कागदपत्रांची संख्या विवरण व प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे खर्चाची आकारणी तसेच नकाश किंवा आराखडा असेल त्याप्रमाणे आकारण्यात यावयाची फी व टपालखर्च आकारण्यात यावा. तसे कळविल्यानंतर अपिलकर्ता यांनी संबंधित खर्चाचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांना कळविल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्या छायांकित प्रती काढून अपिलकर्ता यांना नोंदणीकृत टपालाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५०१४४/अपिलक्र ६३३६/२०१०

श्री.दिलीप बी. नेवाटिया,
शशी दीप, ५-A, वरळी सीफेस,
मुंबई ३ ४०० ०३०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३.

जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३. ..उत्तरवादी

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उद्योग भवन, प्लॉट नं.२५०-D, S.No.१६२९, वरळी इस्टेट, मुंबई च्या संदर्भामध्ये असलेली कागदपत्रे देयके, नोटीस, अभिलेखे, पत्रव्यवहार च्या संदर्भामध्ये निरीक्षण करुन आवश्यक असेलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देण्याबद्दल तसेच वर्षनिहाय निरीक्षण व मजले निहाय निरीक्षण दिनांक ०१-०४-२००४ व ३१-०३-२०१० काळावधीतील तसेच अर्ध वर्षिक देयके दिनांक ०१-०४-२००४ तसेच एकूण १५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २३-०४-२०१० रोजी दिनांक ०६-०५-२०१० रोजी वेळ ११.०० ते ५.०० काळावधीत आपण मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये निरीक्षणाची फी भरुन माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर निरीक्षणाअंती दिनांक २१-०५-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी त्यांना आवश्यक असेलेली कागदपत्रांच्या प्रमाणित छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी जी य़ादी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिली. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक ०२-०६-

२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला नाही. अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. मात्र दिनांक १९-०६-२०१० रोजी अपिलकर्ता यांना संपुर्ण माहितीचा अतिरिक्त खर्च रु.१११४६/- (रु.२३०/- प्रत्येक मालमत्ता प्रत्येक वर्षाकरीता व त्यानंतर रु.२/- छायांकित प्रती व रु.५०/- प्रमाणित प्रती करीता) कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २८-०७-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. दिनांक ११-०८-२०१० रोजी पुन्हा अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलीय अधिकारी च्या संदर्भात --- कळवून मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग यांचे दिनांक ०९-०७-२०१० चा निर्णय देण्याचे निदर्शनास आणण्यात आले व त्याप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी प्रथम अपिलाचा निर्णय देवून माहिती अधिकारातंर्गत प्रती देण्याबाबत करनिर्धारक व संकलन खात्याच्या परिपत्राकानुसार अपिलकारास पाठविलेले उत्तर बरोबर आहे. त्यानुसार करनिर्धारक व संकलन खात्याकडील माहिती अधिकारांर्गत द्यावयाच्या प्रतीबाबत प्रसारित करण्यात आलेल्या परिपत्रकाची प्रत अपिलकारास देण्यात यावी. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या बाबीबाबत अपिलकार समाधानी असल्यामुळे अपिल निकीलात काढण्यात येत आहे असे सुनावणी दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी जी आकारणी केलेली आहे ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे केलेली नाही व त्यामुळे त्यांनी आकारणी रक्कमेची भरणा केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास येणाऱ्या खर्चाकरीता नियम केलेले आहे व त्या नियमाप्रमाणे / परिपत्रकाप्रमाणेच आकारणी करण्यात आलेली आहे. परंतु सदरची आकारणी ही अवाजवी आहे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असे नियमात म्हटले असल्यामुळे त्याप्रमाणे आकारणी करणे संयुक्तिक राहील. तसे प्रमाणित करण्याकरीता खर्च आकारणी ही सुद्धा योग्य नाही. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे पुन्हा युक्तीवाद केला, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी, कलम ६ अन्वये माहिती मिळवण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणतीही परिस्थितीत

विनंती केल्यापासून ३० दिवसांच्या आत, एकतर विहित करण्यात येईल अशा फीचे प्रदान केल्यावर माहिती देईल, तसेच पोटकलम (३) मध्ये माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असेल त्याबाबतीत राज्य जन माहिती अधिकारी यांनी पोटकलम (१) अन्वये विहित केलेली फी नुसार जादा रक्कम त्याने कशाच्या आधारे ठरविली त्या हिशेबासह, माहिती पुरविण्याचा त्यांने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशील व त्याद्वारे त्यांना फी भरण्याची विनंती करेल अशी तरतुद आहे. पोटकलम (१) प्रमाणे विहित करण्यात आलेली अशी फी आकरण्याचा आर्थिक देय कलम २७(२) अन्वये पोटकलम २ (--) अन्वये फी च्या संदर्भामध्ये समुचित शासनाला नियम करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे समुचित शासनाने महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ हे पारित केलेले आहे व त्या नियमाचे कलम ४ प्रमाणे खालील प्रमाणे तरतूद आहे. ‘‘----------’’

वरील तरतुदीप्रमाणे महापालिकेने नकाशे व आराखड्या करीता जर खर्च आकारणी करण्याकरीता नियम केले असतील त्या नियमाप्रमाणे फी आकारणे संयुक्तिक राहील. त्या नंतर कोणत्याही प्रकारचे नियम माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे करण्याचा अधिकार हा महापालिकेस नाही. त्याचप्रमाणे माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात प्रत्यक्ष तयार आहे त्या करीता प्रति पृष्ठ रु.२/-, परंतु जर कागदाचा आकार A ४ पेक्षा जास्त असेल प्रत्यक्ष छायांकित प्रतीच्या खर्च व आकरणी खर्च अशी तरतूद आहे. प्रमाणित करुन देण्याकरीता कोणत्याही प्रकारचे आकारणीची तरतूद नियमात नाही व त्यामुळे A४ आकाराचा कागदप्रतीच्या स्वरुपात जर माहिती उपलब्ध असेलतर प्रति पृष्ठे रु.२/- व त्यापेक्षा मोठ्या आकाराचा कागद असेल त्या छायांकित प्रतीचा खर्च, टपाल खर्च व नकाशा व आराखडा आकारण्यात येणारा खर्च करणे संयुक्तिक राहील. प्रमाणित करण्याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारात छायांकित प्रती उपलब्ध करुन दिली व धारिका यांची सांक्षाकित करुन देणे आवश्यक आहे व त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त खर्च आकारणे योग्य होणार नाही. तसेच वाहतुक वाहनाचा खर्च सुद्धा आकारण्यात येणार नाही. सांक्षाकित करण्याकरीता महापालिकेच्या नियमाप्रमाणे आकारणी केली असेल तर आयोगाच्या नियमात म्हटले असेल तर महापालिकेने आकारणी केलेला खर्च हा अवाजवी दिसून येतो. प्रमाणित करणे व सांक्षाकित करणे यामध्ये निश्चितच फरक आहे. प्रमाणित करुन द्यावयाची असल्यास खर्च आकरणी करणे योग्य आहे. परंतु सांक्षाकित करण्याच्या

संदर्भाम्ध्ये वर नमुद केल्याप्रमाणे धारिकेची आकारणी करणे आवश्यक नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

३) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांनी आवश्यक असलेल्या कागदपत्रांचा खर्च हा वर विवेचन केल्याप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६२/अपिलक्र ६३३५/२०१०

श्री.सुभाष यशवंत मोरे,
सी-६०३, विनस अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि.,

चोगले नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. **..उत्तरवादी**

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वैद्यकीय अधिकारी गट-ब पदे सामान्य प्रशासन विभाग निर्णयानुसार गट-अ अंतभूत केल्याबाबतची प्रत मिळणे, सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय क्र.संघट-१०९६/२८३/२६९६/सेवा-६, दिनांक १७ जुलै १९९६ ची माहिती समक्ष घेणार, तसेच दिनांक १३-०७-२०१० रोजीच्या अर्जावर काय कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे अशी माहिती मागितलेली दिसून येते.विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथमअपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अर्जदाराने दाखल केलेला अर्ज हा दिनांक १३-०७-२०१० रोजी जर दाखल केला असेल तर तो वेगवेगळया शाखामधुन माहितीचा अधिकार म्हणून दिनांक १५-०९-२०१० रोजी प्राप्त झाला व त्यानुसार दिनांक १०-१०-२०१० च्या पत्रान्वये अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच पुन्हा माहितीची छायांकित प्रत अस्पष्ट असल्याबाबत त्यांनी पुन्हा दिनांक २३-११-२०१० रोजी सदर शासन निर्णयाची

स्वच्छप्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव कार्यासन सेवा - १ यांच्याकडे अद्याप प्राप्त झालेला नाही व अपिलावर निर्णय देता आलेला नाही. सदर अपिलाच्या सुनावणीची नोटीस शाखेच्य चुकीमुळे अन्य अपिलीय प्राधिकारी व उप सचिव यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व अपिलकर्ता आज गैरहजर असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६३/अपिलक्र ६३३४/२०१०

श्री.संतोष कुमार तिवारी,
सी-०४, न्यु मीरा पॅराडाईज,
गिता नगर, मिरा-भाईंदर रोड,
मिरा रोड (पूर्व), ठाणे. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कस्तुरबा क्रॉस रोड नं. २, कस्तुरबा म्युनिसिपल स्कुल नं.२,
सभागृह,तळमजला, बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कस्तुरबा क्रॉस रोड नं. २, कस्तुरबा म्युनिसिपल स्कुल नं.२,
सभागृह,तळमजला, बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :२९.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

अपिलकर्ता यांनी दिनांक १६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे आतापर्यंत प्रकल्प जातीच्या संदर्भातील किती प्रमाणेपत्र निर्गमित केले व सर्व जातीच्या प्रमाणप्रत्रांची छायांकित प्रती व श्री. किशोर संखे यांनी सही केलेल्या प्रमाणपत्रांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच श्री. किशोर संखे यांनी सही अधिकारी असल्याने प्रमाणपत्र सुद्धा उपलब्ध करुन देण्यात यावी. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०२-०८-२०१० रोजी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये एकूण जातीचे प्रमाणपत्रे नस्तीचे १३०० x १० कागदपत्रे झेरॉक्स प्रती एकूण १३००० व प्रत्येक प्रतीसाठी प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे रु २६०००/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव दिनांक २४-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक ०२-०८-२०१० चे पत्र आहे ते १० व्या महिन्यात प्राप्त झालेले आहे. परंतु त्यांनी दाखविलेले स्टॅम्प चे अवलोकन केले असता १० आकडा हा वर्षाचा असून महिना ८ च दिसून येतो व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी जावक नोंद वहीची तपासणी केली असता त्यामध्ये ऑगस्ट महिन्यात जावक नोंदणी क्रमांक घेऊन निर्गमित केलेले दिसून

येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्च भरणा करावा असे केलेले दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही केलेली असून माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली नाही असा निकष काढावा लागतो. त्याकरीता अपिलकर्ता यांचे हित सदरचा खर्च भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/१५३२/तक्रार क्र.८

श्रीमती विशाखा विनायक इंगळे,
बी/६, अलंकार को.ऑ.हौ.सोसा.(लि.),
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),
मुंबई -४०० ०८९. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१.
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),

एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

तक्रारदार यांनी त्यांचे दिनांक ११-०५-२०१० रोजीच्या प्रशासकीय अधिकारी (शाळा) एम/ पश्चिम तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाचे कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या संदर्भामध्ये दिनांक ०५-०१-२०११ रोजी आयोगाच्या कार्यालयातून सुनावणीची नोटीस देण्यात आली होती त्या तक्रारीची आज सुनावणी देण्यात आली.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी त्यांच्या स्वत:च्या सेवा पुस्तकाची छायांकित प्रमाणित सत्यप्रत मागितलेली होती. सदरची छायांकित प्रती व्यक्तीश: घेणार असे नमुद केलेले होते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२०१० रोजी कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका हा वैयक्तिक स्वरुपाची कार्यालयीन अभिलेखे असल्यामुळे याबाबतच्या नोंदी, उतारे ह्या कागदपत्रांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती देणे शक्य नाही. परंतु त्यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. परंतु त्यांनी स्वत:ची सेवा पुस्तिकेची प्रत मागितलेली असल्यामुळे ते कोणत्याही प्रकारे गोपनीय असू शकत नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीचे **कलम ८** मधील माहिती प्रकट करण्याचा अपवादामधील मुद्यां संदर्भामध्ये समाविष्ठ होत नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका ही त्यांची वैयक्तिक बाब असल्यामुळे ती गोपनीय असते व त्यामुळे ती उपलब्ध करुन देणे ते योग्य नाही.

परंतु कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी हा सार्वजनिक सेवक असल्यामुळे व सार्वजनिक सेवा करीता असल्यामुळे त्यांची स्वत:ची सेवा पुस्तिका ही सार्वजनिक अभिलेखांची भाग होते व त्यामुळे सदरची सेवा पुस्तिका ही गोपनीय नाही व ती त्यांच्या कर्मचाऱ्यांची किंवा अधिकाऱ्यास ऐरवी सुद्धा उपलब्ध करुन दिली जाते व त्यामुळे तक्रारदारास त्यांनी मागितलेली स्वत:ची सेवा पुस्तिकेची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ११-०५-२०१० रोजीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती व्यक्तिश: उपलब्ध करण्यात येईल. त्याकरीता हा निर्णय मिळाल्यापासून १०

दिवसांच्या आत तक्रारदार यांनी व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२१०७/तक्रार क्र.९

श्रीमती विशाखा विनायक इंगळे,
बी/६, अलंकार को.ऑ.हौ.सोसा.(लि.),
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),
मुंबई -४०० ०८९. ----तक्रारदार

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक महापालिका आयुक्त,
एम/पश्चिम विभाग, एम विभाग कार्यालय इमारत,
शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१.
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),
एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

तक्रारदार यांनी दिनांक २६-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा) एम/पश्चिम यांच्याकडे, स्टेशन चेंबूर मनपा मराठी शाळा क्रमांक २ येथील शिक्षक कर्मचारी यांचे वार्षिक मुल्यमापन तसेच वार्षिक तपासणी अहवाल (inspection) अहवाल इत्यादी तुलनात्मक तक्ता यांच्या छायांकित प्रती मागितलेली असून माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ११-०५-२०१० रोजी सहाय्यक आयुक्त यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय माहिती दिली असल्यामुळे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु तक्रारदार यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयाविरुद्ध द्वितीय अपिल दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. वास्तविक तक्रारदार यांनी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे द्वितीय अपिल दाखल करणे आवश्यक होते.

तक्रारदार यांनी आयोगाच्या सुनावणीस असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना कुरिअर ने माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला होता व त्याबाबतचा पत्र क्रमांक एम /प / ९३४५ दिनांक २०-०४-२०१० आहे व माहिती त्यांनी कुरिअर मार्फत घेतली नाही. कुरिअर परत आलेले आहे. तरीही सदरची माहिती ही प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्याकडे उपलब्ध नसते. प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्याकडे तपासून दिलेली आहे किंवा याबद्दलची माहिती मिळू शकते. परंतु अहवाल हा त्या त्या शाळेतच उपलब्ध असतो व त्या शाळेचे मुख्यध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी सदरची तपासणी अहवाल हा त्या शाळेच्या मुख्यध्यापकाकडे मागणे संयुक्तिक झाले असते व त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी संबंधित शाळेकडेच जाणे आवश्यक असल्याने माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
Gawas/feb 2011

मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२९८९/तक्रार क्र.३३

श्री.दिगंबर शंकर गिरमे,
सिटी सर्व्हे नं. ४२२, कसबा पेठ,
पुणे -४११ ०११. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,
गृह विभाग (पोल-१३),
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पोल-१३),
गृह विभाग (पोल-१३),
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.

जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

तक्ररदार यांनी त्यांचे अपिल क्रमांक २००९/५५२२/०२ चे दिनांक २०-०८-२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे तक्रार दाखल केलेली दिसून येते.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी गृहविभाग यांनी तक्रारदार यांना दिनांक ०९-०९-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे, विधी व न्याय विभाग यांनी सामान्य प्रशासन विभाग यांना दिलेल्या अर्जाबाबत गृहविभागाने माहिती द्यावी असा आग्रह धरलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे अन्वये माहिती ज्या विभागाशी संबंधित आहे त्याच विभागाशी अर्जदाराने संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे असे असले तरी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२९९०/तक्रार क्र.३४

श्री.दिगंबर शंकर गिरमे,
सिटी सर्व्हे नं. ४२२, कसबा पेठ,
पुणे -४११ ०११. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस संचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा उप-सहाय्यक पोलीस महानिरिक्षक (गोप.),
पोलीस संचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

तक्ररदार यांनी त्यांचे अपिल क्रमांक २००९/५५०३/०२ चे दिनांक १८-०८-२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली दिसून येते.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना आतापर्यंत संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु तक्रारदार यांची गुणवत्तेच्या संदर्भामध्ये व निर्णय प्रक्रीयेच्या संदर्भामध्ये तक्रार आहे.

तक्रारदार यांनी सुद्धा युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये योग्यरीत्या तपास कार्यवाही केलेली नाही. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती दिल्यास, दिलेली माहिती ही कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेबाबत किंवा निर्णय प्रक्रीयेबाबत आयोगाकडे मुद्दे उपस्थित करता येते नाही. आयोग हे न्यायालय किंवा तक्रार निवारण केंद्र सुद्धा नाही व त्यामुळे तक्रारदार यांना अपिलाचा निर्णयाप्रमाणे पोलीस आयुक्त पुणे यांच्याकडून आलेल्या उत्तराची प्रत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदर तक्रार ही निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००५६/अपिलक्र ६२९२/२०१०

श्री.जगजीतसिंग काहलोन,
सचिव-सोसायटी फॉर अवेरनेस ऑफ सिव्हील राईटस्,
जे-२२०,अन्सा, साकी विहार रोड,
साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त (मुख्यालय),
अन्न आणि औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांचे कार्यालय,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (मुख्यालय),
अन्न आणि औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांचे कार्यालय,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०२.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी अन्न व औषध यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

d. Please provide access to the copies of the licenses issued by the competent authority under the NDPS Act 1985 and Maharashtra NDPS rules 1985 in Form OP-I,!! including sub sections of various allottees of codeine Phosphate in above period. Provide Xerox copies of requested info thereafter.
e. Provide access to the reports of the inspection carried our by the Officers of FDA who have inspected the consignments of the Narcotic Drugs under the Maharashtra NDPS rules 1985 section 79(4) at various establishments in the said period.
f. Provide access and inspection of file on the letter of intimation received from the Superintendent of Factories Govt. Opium and Alkloid factories to the state Drugs Controller on despatch of material codeine phosphate to the Mfgrers (allotees) as required under section 79(4) of the MNDPS rules 1985.

सदर अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०४-०८-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २४-०९-२०१० रोजी दिलेला असून त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचे विश्लेषण करुन निर्णय दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुख्यालयासह राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयाशी निगडीत आहे. अर्जदारास मुख्यालयाशी निगडीत ७ पृष्ठे दिनांक ०४-०८-२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दिनांक ०६-०९-२००८ चे आधारे प्रशासनाचे महाराष्ट्रातील इतर जिल्हा कार्यालयाकडे माहितीसाठी संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक होते व तसे त्यांनी कळविलेले असून सर्व कार्यालयाचे पत्ते दिलेले आहे. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती मुख्यालयामध्ये उपलब्ध नसते. ती त्या त्या जिल्हा कार्यालयात उपलब्ध असते व ती त्या त्या जिल्हा कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. सर्व महाराष्ट्रातील कार्यालयातील माहिती ती संकलित करुन देणे सुद्धा अशक्य आहे व तसे त्यांनी कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलाचा निर्णयामध्ये सुद्धा त्याबाबत अपिलकर्ता यांना विवेचन करुन निर्णय दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अन्न व औषध प्रशासनातील सर्व जन माहिती अधिकारी हे मुख्यालय या एकाच प्राधिकरणात येतात. त्यामुळे प्रशासनाच्या महाराष्ट्रातील सर्व कार्यालयाची माहिती प्रतिवादी यांनी देणे आवश्यक आहे. इतर कार्यालयांना माहिती देण्यासाठी अर्ज करण्यास सुचविणे योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा सांगितले की, राज्यातील विविध कार्यालयातुन या विषयाच्या धारीका मागवून अर्जदारास तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे व अभिलेखाच्या छायांकित प्रती अर्जदारास उपलब्ध करुन देणे हे अव्यवहारर्य आहे व निश्चितच माहितीचा अधिकार कक्षेत येत नाही. माहितीचा अधिकार कायदा कलम २(एच) मधील सार्वजनिक प्राधिकरणाची व्याख्या पाहता या कायद्यासाठी बांद्रा पूर्व मुंबई ५१ येथील प्रशासनाचे मुख्यालय हे एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे.

विभागीय कार्यालये व जिल्हा कार्यालये हे सुद्धा शासनाचे आदेशानुसार स्थापीत / गठीत करण्यात आलेली आहेत. शासनद्वारे त्या त्या कार्यालयासाठी स्वतंत्र निधी, मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जाते. त्यामुळे प्रशासनाची सर्व विभागीय व जिल्हा कार्यालयेसुद्धा संबंधित कार्यक्षेत्रासाठी माहितीचा अधिकार कायद्यासाठी स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहेत. मुख्यालयातील जन माहिती अधिकारी हे औषध विभागासाठी जन माहिती अधिकारी आहेत. राज्यातील इतर जन माहिती अधिकारी हे त्यांच्या कार्यकक्षेत व अधिपत्याखाली येत नाहीत. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दिनांक ०६-०९-२००८ मध्ये अर्ज केवळ एकाच सार्वजनिक प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची बाब स्पष्ट केली आहे. कलम ६(३) मध्ये अन्य संबंधित प्राधिकरण याबाबत असणारा उल्लेख एकवचनी आहे. जेथे अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित असेल, तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरित करणे आवश्यक नाही. तसेच अर्जदाराचा अर्ज मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एनडीपीएस अॅक्ट व नियमांतर्गत माहितीचा तपशील असून प्रशासनाचे विविध कार्यालयाने (अनेक कार्यालय) दिलेले परवाने, केलेल्या तपासणी इत्यादिंशी निगडीत आहे. महाराष्ट्र एनडीपीएस नियम १९८५ अतंर्गत जिल्हा कार्यालयातील सहाय्यक आयुक्त हे अनुज्ञाप्ती प्राधिकारी असून अशा अनुज्ञाप्ती सादर करणाऱ्या संस्थांच्या तपासणी त्यात्या कार्यालयातील अधिकारी करतात. त्यामुळे संबंधित कागदपत्रे धारीका त्या त्या जिल्हा व विभागीय कार्यालयाकडेच असतात. नियमितपणे अशा धारिका अथवा त्यांच्या प्रती मुख्यालयात ठेवल्या जात नाहीत. तशी आवश्यकताही नाही व असे कागदपत्र मुख्यालयात ठेवणेही अव्यवहार्य, अनावश्यक व शासकीय यंत्रणेचा वेळ व पैसा खर्च करणारी बाब आहे. त्यामुळे अर्जदाराने मागणी केलेली संपुर्ण राज्यातील जिल्हा कार्यालयीची माहिती मुख्यालयाकडे उपलब्ध नसते.

वरील युक्तीवादा प्रमाणे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अन्न व औषध प्रशासनाच्या मुख्यलायामध्ये निश्चितपणे उपलब्ध नसते. तसेच अन्न व औषध प्रशासन हे जर एकाच विषयाकरीता सार्वजनिक प्राधिकारण असले तर मुख्यालयामध्ये नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी त्या मुख्यालयातील उपलब्ध असलेल्या माहिती करीता जन माहिती अधिकारी आहेत. कोणत्याही विभागात कोणत्याही कायाद्याची अंमलबजावणी करावयाची असल्यास मुख्यालय तसेच त्या विभागातील अन्य प्रशासकीस विभाग व जिल्हा कार्यालये यांच्यातील अधिकारी किंवा कर्मचारी यांना त्या कायद्याची अंमलबजावणीच्या संदर्भामध्ये अधिकार दिलेले असतात व त्यात्या कार्यक्षेत्रामध्ये त्याप्रमाणे त्या अधिनियांमाच्या तरतुदीची अंमलबजावणीचे अधिकार हे स्वतंत्र असते व त्यामुळे त्यांनी केलेली स्वतंत्र कार्यवाही ही त्या कार्यालयाची माहिती होते. ती कार्यालयाच्या नियत्रंणात खालील माहिती आहे व त्यामुळे त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणे संयुक्तिक असते. सर्व राज्य व्यापी माहिती एकाच जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे ही बाब सर्वस्वी अव्यवहार्य व अशक्य आहे. याची संसदेन अधिनियम करताना सुद्धा विचारात घेऊनच ३० दिवसांची मुदत दिलेली आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (१) अन्वये जन माहिती अधिकारी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकारणामध्ये माहिती देण्यासाठी त्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना, राज्य जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील अशी तरतूद आहे. ही तरतुद वरीलप्रमाणे गृहित

धरण्याकरीता आलेली आहे. अन्यथा प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणात एकच जन माहिती अधिकारी नियुक्त करावे असे संसदेने पारित केले असते व त्या तरतुदीप्रमाणेच जन माहिती अधिकारी यांनी अन्न व औषध प्रशासनाची अखत्यारीतील निरनिराळ्या जन माहिती अधिकारी त्या त्या स्तरावर नियुक्त केलेले आहेत व त्यांच्याकडे माहिती मागावी असे जे कळविलेले आहे ते योग्य आहे.पुढे जाऊन अधिनियमाचे कलम ६ (१) मध्ये माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीने संबंधित सार्वजनिक प्राधिकारणाच्या राज्य जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे व असा अर्ज सादर केल्यानंतर अधिनियम ७ (१) प्रमाणे ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे व कलम ५(१), कलम ६(१) व कलम ७ (१) यांचे एकत्रित विचार केल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यास ती ३० दिवसामध्ये उपलब्ध होवू शकेल असा अर्जाचा अर्थ लावावा लागतो. अन्यथा सर्व राज्यातील वेगवेगळ्या कार्यालयातील माहिती ही एकत्रित करुन किंवा संकलित करुन ३० दिवसांमध्ये उपलब्ध करुन देणे शक्य नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांच्या मुख्यालयातील कार्यासनाकडुन उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणजे त्यांना माहिती योग्यरीत्या पुरविलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जी उर्वरित माहिती ही त्या त्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/४६४/तक्रार क्र.१६४२

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक २०-०३-२०१० रोजी त्यांचे दिनांक २५-०१-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलबध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार २००५ चे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी त्यांचे दिनांक २५-०१-२०१० च्या अर्जामध्ये, १) महाराष्ट्र राज्याच्या अंतर्गत कोणतेही आयोग स्थापन केले आणि त्या आयोगाचे अधिसुचना अथवा शासन निर्णय न करता त्या आयोगाचे कामकाज सुरु झाले व त्या आयोगांच्या मार्फत न्यायदान सुध्दा चालूच राहिले तर त्या आयोगांचे स्थापना अधिसुचने शिवाय कामकाज कायदेशीर आहे ही कोणत्या नियमाने ठरले त्या नियमांची सविस्तर माहिती, २) राज्य माहिती आयोगाची स्थापनेची अधिसुचना काढण्याबाबत कोणा कर्मचाऱ्यांस नियुक्त केले होते व त्यांनी सदर राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची अधिसुचना जी काढली नाही त्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत घ्याची माहिती, ३) अधिसुचना काढण्याबाबतचे कार्य ज्या संबंधित कर्मचाऱ्यांचे असते ते कार्य त्या संबंधित कर्मचारी ह्यांनी केले नाही, ४) कोणत्याही आयोगाची अधिसुचना काढल्यामुळे नेमक्या कशा प्रकारची प्रशासकीय कामकाज सुधारणा व सुलभता होते ह्याची माहिती.,५) राज्य माहिती आयोग बाबतची अधिसुचना अजूनपर्यंत काढलेली नाही म्हणून आता राज्य माहिती आयोगाच्या स्थापने संबंधीची अधिसुचना काढण्याचे प्रस्तावित अथवा ठरलेले आहे काय ह्याची माहिती, ६) राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची व त्या अनुषंगाने त्याने केलेले कार्य अधिसुचना न काढता अथवा अधिसुचना त्याच्या अंतर्गत जो कारभार चालू आहे ती कायदेशीर व अधिकृत कोणत्या नियमामुळे ठरले ह्याची माहिती, ७) राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची अधिसुचना काढण्यात आलेली नाही व विना अधिसुचनेचे शिवाय राज्य माहिती आयोग कामकाज गैरकामकाज म्हणजे बेकायदेशीर कामकाज त्या आयोगाचे ठरावे म्हणून कोणा समक्ष दाद मागावयाची आहे ह्याची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने दिनांक ०६-०३-२०१० रोजी आपल्या अर्जातील इतर मुद्यांद्वारे आपण विविध बाबींवर निम्नस्वाक्षरीतांचे भाष्य अपेक्षिली असून माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २

(च) मधील माहितीच्या व्याख्येत ते मोडत नाही. त्यामुळे त्याबाबत आपणांस माहिती देता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे माहितीचाअधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, राज्य माहिती आयोगाचे मुख्य आयुक्त यांची नियुक्ती झाली परंतु राज्य माहिती आयोगाची स्थापना अधिसुचना अद्याप काढण्यात आलेली नाही व त्यामुळेच एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांचे भाष्य माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे अपेक्षित नाही. माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अधिसुचना काढण्यात आलेली नाही हे खरे आहे. परंतु या संदर्भातील कायदेशीर व बेकायदेशीर परिणामाच्या संदर्भातील तक्रारदार यांचे मत विचारलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) (ञ) प्रमाणे **" माहिती"** व **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे मिळविता येण्याजोगी **"माहिती"** आणि त्यात कागदपत्रे, दस्तऐवज अभिलेखे यांचे निरीक्षण करणे छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व **कलम २(च)** मध्ये **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या असून त्या संज्ञेमध्ये साहित्याच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज स्वरुपात इत्यादीचा समावेश होतो यांचे निरीक्षण करुन छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे. परंतु तक्रारदार यांनी जर माहिती अधिकारी यांचा जो अभिप्राय मागितलेला आहे तो वरील दोन्ही व्याख्येमध्ये अपेक्षित नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही व तसे त्यांनी कळविलेले आहे असे असेल तर तक्रारदार यांचे दिनांक २५-०१-२०१० चा माहिती अर्जामध्ये मुद्या क्र. २ मध्ये राज्य माहिती आयोगाची स्थापनेची अधिसुचना काढण्याबाबत कोण कर्मचाऱ्यांस नियुक्त केले होते व त्यांनी सदर राज्य माहिती आयोगाची स्थापनेची अधिसुचना जी काढली नाही त्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहे याची माहिती मात्र उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. राज्य माहिती आयोगाची स्थापना किंवा राज्य मुख्य आयुक्तांची नियुक्तीची तारीख दिलेली असेल त्या तारखेस सदर विषयांच्या संदर्भामध्ये ज्या अधिकाऱ्यांने कार्यवाही करणे आवश्यक होते अशा अधिकाऱ्यांने माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्याप्रमाणे उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याप्रमाणे तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत तक्रारदार यांचे दिनांक २५-०१-२०१० च्या अर्जातील मुद्या क्र. २ च्या संदर्भामध्ये माहिती ही विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२४१७/तक्रार क्र.१६३९

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन,
बॅकबे रेक्लमेशन, विधानभवन मार्ग, मुंबई ४०० ०३२.
जन माहिती अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधान मंडळ सचिवालय यांच्याकडे, चालू पावसाळी अधिवेशनामध्ये जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती व तालुका स्तरीय भ्रष्टाचार समितीच्या संबंधी कोणासदस्याने सभागृहापुढे प्रश्न उपस्थित केला ह्याची माहिती द्यावी. चालू पावसाळी अधिवेशनामध्ये सरकारी कर्मचारी त्याच्या सरकारी कार्यालयामध्ये खाजगी सेवक ठेवून कामकाज करतात म्हणून ह्या संबंधी कोणासदस्याने प्रश्न उपस्थित सभागृहात केला व त्यावर कोणी कशा प्रकारे खुलासा केला ह्याची माहिती, महाराष्ट्र विधानसभा मधील सदस्यांची पक्षनिहाय यादी आज रोजीपर्यंतची अर्जदारास हवी आहे त्याचा दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांकासह, महाराष्ट्र विधानसभेचे जे सदस्य आहेत त्याच्या निवडीचे नियम आणि त्यांनी सभेच्यामध्ये कोणते नियम पाळायचे आहेत ह्या सर्वाची सविस्तर माहिती, महाराष्ट्र विधानसभेचे जे नियम व कामकाज नियम जे आहेत त्या नियमावली अर्जदारास हवी आहे, महाराष्ट्र विधानसभेमध्ये महाराष्ट्र विधान सभा चालू झाल्यापासून आजपर्यंत कोणा सदस्याने पिटीशन कमिटी समोर पिटीशन दाखल केलेली आहेत त्या सदस्याची नावे व एकूण किती पिटीशन आजपर्यंत सदर कमिटी समोर दाखल झालेली होते व यापैकी किती प्रलंबित आहेत याबद्दलची सविस्तर माहिती,सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र विधानसभा / मंडळाच्यामध्ये पिटीशन कमिटीचे कोण सदस्य आहेत व किती आहेत त्यांची नावे काय आहेत यांची सविस्तर माहिती, महाराष्ट्र विधान परिषदेच्या पिटिशन कमिटी पुढे आलेल्या पिटीशनचे किती कालावधीमध्ये त्या पिटिशनवर निर्णय होतो त्या कालावधीची माहिती, माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी दिनांक २६-०८-२०१० रोजीच्या मागणी केलेल्या माहितीसंदर्भात पाठवावयाच्या माहितीच्या प्रती व पुस्तिका यांचा खर्च रु.१९५/- तसेच रजिस्टर टपालखर्च रु.१८०/- असे एकूण रु.३७५/- (रक्कम रुपये तीनशे पंच्याहत्तर फक्त) खालील स्वाक्षरी करणारे शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे रोखीने जमा करावेत अथवा उक्त रकमेचा ''कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी'' महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (Section Officer and Drawing and Disbursing Officer, Maharashtra Legislature Secretariat) यांना देय असलेला धनादेश वा धनाकर्ष पाठवावा, जेनेकरुन आपणांस हवी असलेली माहिती नोंदणीकृत टपालद्वारे पाठविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. तसेच मुद्या क्र. ३ च्या संदर्भामध्ये माहिती ही सामान्य प्रशासन विभागात असल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले होते. गैरतक्रारदार यांनी आयोगापढे असे सांगितले की, अर्जदाराने मागितलेली माहिती ही विधानमंडळ सचिवालयाच्या विविध ७ कक्षांशी संबंधित होती व त्या कक्षांकडुन दिनांक २५-०८-२०१० माहिती प्राप्त झाली. त्यानंतर लगेच माहिती तयार असून ती विहित शुल्क अदा करुन प्राप्त करुन घ्यावी असे अर्जदारास दिनांक २६-०८-२०१० रोजी म्हणजेच विहित मुदतीत माहिती घेऊन जाण्यास कळविण्यात आले. इतकेच नव्हेतर अर्जादाराशी त्यांचे भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधुन माहिती घेऊन जाण्याची विनंती केल्यावर ''मी विधान भवन कार्यालयात येऊन माहिती घेऊन जातो'' असे सांगुन सुद्धा दिनांक १८-०९-२०१० च्या पत्रान्वये माहिती अधिकाराच्या विहित कालावधीत माहिती पुरवलेली नाही, प्रयत्न केला आहे म्हणून आपण मला सदरची माहिती नि:शुल्क द्यावी. त्यावर या सचिवालयाने अर्जदारास, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे विहित कालावधीतच म्हणजे ३० दिवसांत कळविलेले असल्यामुळे नि:शुल्क माहिती मिळण्याबाबतची आपली मागणी मान्य करता येत नाही असे कळवून पूर्वी कळविल्यानुसार विहीत शुल्क अदा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविल्याचे दिसुन येते. त्यानंतर अर्जदाराने दिनांक ०४-११-२०१० रोजी शुल्क फी अदा करुन माहिती घेतलेली आहे. त्यानंतर विधानमंडळ सचिवालाच्या अपिलीय अधिकाऱ्यांकडे प्रथम वा कोणतेही अपिल दाखल केलेले नाही. सामान्य प्रशासन विभागाची माहिती सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २६-०८-२०१० रोजी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सुद्धा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे मात्र तक्रार दाखल केलेली आहे. त्या तक्रारीमध्ये त्यांनी शुल्कांचे पत्र विलंबाने मिळाले व त्यामुळे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्यामुळे शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केली.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ७(३)** प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी खर्च विवरण ज्या तारखेला अर्जदारास कळविलेले असेल त्या तारखेपासून खर्चाचा भरणा होईपर्यंतचा कालावधी हा ३० दिवसातुन वगळून मिळतो व त्यामुळे विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाने माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२९६२/तक्रार क्र.१६३५

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,

ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी महसूल व वन विभाग यांच्याकडे, ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये विभागामार्फत CRZ-II व ५० मीटर मॅन्ग्रोव्हजच्या बफर क्षेत्राने बाधीत होणाऱ्या जमीनीवर बांधकाम परवानगी कोणत्या निकाषावर दिली जाते या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात त्यांनी एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी दिनांक १८-१०-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी मागितलेली माहिती ही महसूल विभागाशी संबंधित नाही व तो नगरविकास विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांचा मूळ अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(३) (२) अन्वंये जन माहिती अधिकारी, नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांचे दिनांक १७-०८-२०१० रोजी हस्तांतरीत केला होता व तसे अर्जदारास सुद्धा कळविण्यात आले होते. परंतु दिनांक १८-१०-२०१० रोजीच्या पत्रांन्वये माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमुद करुन माहिती लवकरात लवकर पुरवावी, अशी विनंती केली. त्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक २७-१०-२०१० अन्वये उपरोक्त नमूद वस्तूस्थिती पुन्हा अर्जदारास कळविण्यात आली आहे. अर्जदाराने माहिती अप्राप्त झाल्याचे नमुद करुन उप सचिव तथा अपिलीय अधिकारी (ज-४) यांचेकडे दिनांक ०४-११-२०१० च्या अर्जान्वये अपिलअर्ज दाखल केला होता. परंतु अपिलाच्या सुनावणीस दिनांक २०-११-२०१० रोजी उपस्थित राहिलेले नाही. त्यामुळे अपिलीय अधिंकारी यांनी सदर प्रकरणामध्ये अर्जदारास कोणतेही स्वारस्य नसल्याचे निष्कर्ष काढून त्यांचे अपिल अमान्य केला आहे.

तक्रारदार यांनी वास्तविक माहिती मागताना ती कोणत्या विभागाची आहे याबद्दलची निश्चित माहिती घेऊनच त्या संबंधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणे अपेक्षित असते. परंतु ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागितलेली आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणाशी माहिती संबंधीत नसेल तर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहितीशी संबंधित विभागाकडे जर नियमाप्रमाणे अर्ज हस्तांतरीत केला असेल तर अशा हस्तांतरीत झालेल्या विभागातील जन माहिती अधिकारी यांच्याशी संर्पक साधने आवश्यक असते व त्या विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी जर माहिती दिली नाही तर हस्तांतरीत विभागातील प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल करणे अपेक्षित असते. जेणेकरुन माहिती उपलब्ध करणे सोपे होते व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा आदेश दिल्यानंतर माहिती जर उपलब्ध झाली नाही तर हस्तांतरीत विभागाचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे तक्रार किंवा अपिल दाखल करणे अपेक्षित असते. अन्यथा पूर्वीचे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील अर्जावर व

प्रथम अपिलावर कार्यवाही केली व राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या विरुद्ध द्वितीय अपिल किंवा तक्रार दाखल केली तर त्यांच्याकडील कारवाई ही मुदतीत झाली आहे, या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल व तक्रार ही निकाली काढावी लागते. कारण अपिलकर्ता किंवा तक्रारदार यांनी हस्तांतरीत विभागाचे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचे द्वितीय अपिलात किंवा तक्रारीत पक्षकार केलेले नसते व त्यामुळे त्यांना सुनावणीची नोटीस काढता येत नाही व तक्रार किंवा अपिलांची सुनावणी मध्ये हस्तांतरीत विभागाचे अधिकाऱ्यांच्या संदर्भात कोणताही आदेश देता येत नाही यामध्ये अपिलकर्ता / तक्रारदार यांचाच कालापव्यय होतो माहितीसुद्धा मिळत नाही व त्यामुळे या प्रकरणतासुद्धा तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२९६३/तक्रार क्र.१६३६

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा कोस्टल ऑफिसर(MCZMA),
पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी पर्यावरण विभाग यांच्याकडे, CRZ-II व ५० मीटर मॅन्ग्रोव्हजच्या बफर क्षेत्राने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या जमीनीमध्ये बांधकामसंबंधी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती मिळाली नाही तक्रारदार यांचे दिनांक १८-१०-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी यांचे कार्यालयात त्यांची नेमणूक कंत्राटी पदावर कोस्टल अधिकारी म्हणून करण्यात आलेली आहे व जन माहिती अधिकारी म्हणून माझी नेमणूक दिनांक १५-१०-२०१० रोजीच्या आदेशान्वये करण्यात आलेली आहे. तक्रारदार यांचा माहिती अर्ज नियुक्तीपुर्वीच्या आहे व त्यामुळे त्यांच्या निदर्शनास आणण्यात आलेले नाही. परंतु राज्य माहिती आयोगाची नोटीशी नंतर व्यक्तिश: सर्व आवश्यक माहिती गोळा करुन अर्जदारास दिनांक २५-०२-२०११ रोजी देण्यात आलेली आहे. तसे त्यांनी दुरध्वनीवरुन माहिती घेण्याविषयी सुचित केले व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याचा कोणताही प्रयत्न नाही. यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००७६/अपिल क्र ६३०२/२०१०

श्री.नैनेश सुरेश डोळस,
द्वारा, माहिती अधिकारी महासंघ,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानगरपालिका चिटणीस (प्रभारी),
महानगरपालिका मुख्य कार्यालय,
विस्तारित इमारत, १ माळा, खोली क्र.१००,
महानगरपालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा महानगरपालिका उप - चिटणीस,
महानगरपालिका मुख्य कार्यालय,
विस्तारित इमारत, १ माळा, खोली क्र.१००,
महानगरपालिका मार्ग, मुंबई ४०० ००१. **...उत्तरवादी**

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०३.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित. (उशिराने हजर)
जन माहिती अधिकारी - उपस्थित.(तत्कालीन)
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त कार्यालय यांच्याकडे, आपल्या महानगरपालिकेत गेली १० वर्षापेक्षा अधिक कालावधी on deputation वर आलेल्या अधिकाऱ्यांची माहिती एकूण ७ मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जांच्या अनुषंगाने सदर अर्जांतील (तीन) येथील अनुक्रमांक १ व २ येथे विचारणा केलेली माहिती स्थायी समितीच्या अखत्यारित असेलेल्या महानगरपालिका चिटणीस कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे कार्यालय अधिक्षक (आयुक्त), जन माहिती अधिकारी ह्यांनी सदर अर्जांची छांयाकित प्रत दिनांक १३-०८-२०१० रोजी परस्पर कार्यवाहीकरीता चिटणीस कार्यालयाकडे पाठविलेली आहे. पुन्हा ती आस्थापना विभागांशी संबंधित असल्यामुळे सदर अर्ज दिनांक १६-०८-२०१० रोजी त्यांच्याकडे अग्रेषित करण्यात आला. त्याप्रमाणे अर्जदारास दिनांक २६-०८-२०१० रोजी प्राप्त झालेली माहिती पुरविण्यात आली व त्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती नाकरण्यात आलेली आहे. या कारणास्तव प्रथम अपिल दाखल केले. परंतु प्रथम अपिलाच्या सुनावणीस तक्रारदार / अपिलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेतील, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १२-०९-२००८ रोजी निगर्मित केलेले परिपत्रानुसार अपिलीय प्राधिकारी ह्यांनी, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकण्यात येऊन अपिलांची सुनावणी केली व त्याप्रमाणे निर्णयाची प्रत अपिलकर्ता यांना पाठविण्यात आली. परंतु तक्रारदार/ अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिकेमध्ये जे आयुक्त, सहआयुक्त, उप आयुक्त किंवा इतर पदावर जे अधिकारी शासनाकडून नियुक्त केले जातात ते शासकीय अधिकारीच असतात असे असुन सुद्धा महानगरपालिकामध्ये शासकीय अधिकारी नियुक्त केले नाही असे दिशाभूल करणारी खोटी उत्तरे महानगरपालिकेचे चिटणीस विभगाचे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. त्यांनी कोणत्याही एका विभागात शासकीय अधिकारी किती आहेत अशी माहिती मागितलेली नाही तर संपुर्ण महानगरपालिकेमध्ये किती शासकीय अधिकारी deputation वर आहेत ही माहिती आवश्यक असल्यामुळे त्यांनी आयुक्त कार्यालयाचे जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली होती. सर्वसाधरण समज असा आहे की, कोणत्याही मोठ्या आस्थापनातील सर्व अधिकारी किंवा कर्मचारी यांची माहिती ती सार्वजनिक प्राधिकरणातील सामान्य प्रशासन विभागकडे उपलब्ध असणे अपेक्षित असते व त्यामुळे आयुक्त कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज हा सामान्य प्रशासन विभागाचे माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरण करणे अपेक्षित होते. परंतु अर्ज लहानश्या चिटणीस विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला व चिटणीस विभागात कोणताही शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर नाही असे त्यांनी उत्तर दिले. मात्र आयुक्तासहित अतिरिक्त उप आयुक्त याबाबतीवरील काही अधिकारी हे शासकीय माहिती अधिकारी आहेत व त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. यावरुन आयुक्त कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी मुळातच माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने टाळाटाळ केलेली आहे. तसेच त्यांनी मुद्येनिहाय माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हे सुद्धा चिटणीस विभागाचे होते तर त्यांनी कोणतेही उत्तर कळविलेले नव्हते म्हणून ते प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहिलेले नव्हते.

अपिलकर्ता आणि उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावर सादर केलेला पत्रावरुन असे दिसुन येते की, सदर अर्जांच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली आहे. कोणत्याही माहितीच्या अर्जांमध्ये मुद्येनिहाय माहिती मागितलेली असेल तर ती उपलब्ध असेल त्याप्रमाणे, उपलब्ध नसेल त्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला असेल त्याप्रमाणे मुद्येनिहाय उत्तर देणे आवश्यक असते. परंतु अर्जांचे वाचन न करताच उत्तर दिले जाते किंवा प्रथम अपिलाचा निर्णय केला जातो व त्यामुळे अर्जदार हे वारंवार माहिती लपविली किंवा खोटी माहिती दिली अशा प्रकारची तक्रार करत असतात. सध्याच्या प्रकरणात सुद्धा वर नमुद केल्याप्रमाणे आयुक्त कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज योग्य त्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत करणे संयुक्तिक होते. चिटणीस कार्यालयसुद्धा आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी संपुर्ण महानगरपालिकेतील अधिकारी किंवा कर्मचारी यांची माहिती ती सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे उपलब्ध असते व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरीत केले त्यांच्याविरुद्ध शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापुर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक राहील व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

५) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ०२-०७-२०१० अर्जांच्या अनुषंगाने मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

६) **अपिलकर्ता यांचे दिनांक ०२-०७-२०१० चा अर्ज हा ज्या जन माहिती अधिकारी यांनी चिटणीस कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत केला त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती कां करण्यात येवू नये याबद्दलचा खुलासा त्यांनी समक्ष आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत करण्यात यावा अन्यथा त्यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यात येईल.**

७) सदर निर्णयाची एक प्रत महानगरपालिकेतील आयुक्त यांनी माहितीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

८) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२४३९/तक्रार क्र.१६४०

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा मास्टर व सहायक प्रोथोनोटरी (प्रशा.),
उच्च न्यायालय,
मुंबई -४०० ०३२. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.

जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे एकूण १२ मुद्यांमध्ये वेगवेगळी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना दिनांक २५-०८-२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले की, त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये त्यांनी निरीक्षण करावे व मुद्या क्र.२ ते ७,८,९,१० आणि १२ ह्या संबंधित विभागाकडुन माहिती मागितलेली आहे. जेव्हा ती मिळेल तेव्हा उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु संबंधित विभागाकडुन अद्यापही सदर माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे ती पुरविण्यात आलेली नाही. तसेच अपिलकर्ता यांनी प्रथम अपिल दाखल केलेले नाही.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माननीय उच्च न्यायालयामध्ये अनेक विभाग आहेत व तक्रारदार यांनी माहितीच्या अर्जामध्ये अनेक विभागातील अनेक विषयांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे. वास्तविक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भातील माहिती माननीय उच्च न्यायालय यांच्याकडे माहिती मागण्याची अपेक्षित नाही व तसेच इतर विभागाकडे सुद्धा जी माहिती मागितलेली आहे ते सर्व विभाग ते एकाच इमारतीत नाहीत व माहिती उपलब्ध करुन घेणे व ती मुदतीत देणेही शक्य होत नाही. तसेच माननीय उच्च न्यायालयातील माहिती उपलब्ध करुन माहिती पुरवावयाची असेल तर सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक असते. तसेच तक्रारदार यांनी माहिती मागितलेली आहे ती माहिती स्वरुपात अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी मागितलेली माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांनी विश्लेषण स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु तशी माहिती मागितलेली असेल तर जन माहिती अधिकारी यांनी त्या मुद्या संदर्भामध्ये अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती मागता येत नाही किंवा याबद्दलचे उत्तर देणे अपेक्षित असते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हे संसदेन पारित करताना ३० दिवसांमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असे मुदत घालून दिलेली आहे व माहितीचा अर्ज कलम ६ (१) प्रमाणे केल्यानंतर त्याबाबत संपूर्ण प्रकीया कलम ११ पर्यंत ३० दिवसांत पुर्ण करावे अशी अपेक्षा संसदेची दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वच माहिती उपलब्ध नसते ही बाब सुद्धा संसदेला माहीत होती व त्याप्रमाणे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे ज्या कर्मचारी वा अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असेल त्यांच्याकडून माहिती संकलीत करुन ३० दिवसांत पुरविणे अपेक्षित असते. ज्या अधिकारी किंवा कर्मचारी याचे सहाय्य जन माहिती अधिकारी यांनी मागितले अशा कर्मचारी व अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे समजण्यात येते व एकदा जन माहिती अधिकारी समजण्यात आल्यावर विलंबास असे अधिकारी जबाबदार असल्यास ते शास्तीस पात्र असतात अशाप्रकारची तरतुद ही अधिनियमात आहे. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता मान्यता घेणे अशी तरतुद अधिनियमात नाही. परंतु तशाप्रकारचे नियम सक्षम प्राधिकारी यांनी केले असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्याची ३० दिवसांची मुदत ही

बंधनकारक आहे. त्यात कोणत्याही प्रकारचे शिथिलता देता येणार नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये अर्जदार यांनी मागितलेले माहितीचे स्वरुप हे तपासुन बघणे आवश्यक असते व माहिती जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे शक्य आहे किंवा नाही ही बाब सुद्धा तपासून बघणे आवश्यक असते व त्याकरीता अर्जदाराने सुद्धा सार्वजनिक प्राधिकरण जरी एकच असले तरी त्यामध्ये अनेक विभाग / उपविभाग / विषयानुसार असतात व त्यामुळे एकच अर्जात वेगवेगळ्या विषयांची / विभागांची / शाखांची माहिती मागितल्यास ती ३० दिवसांत पुरविताच येईल असे नाही व त्यामुळे एका अर्जात एका शाखा किंवा विषयांचीच माहिती मागणे संयुक्तीक असते. अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यावर सुरुवातीचे ५ दिवसांमध्ये संबंधित अर्जात मागितलेली माहिती ही इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास त्यांना असा आदेश द्यावा लागतो. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आदेश विलंबाने दिल्यास त्या अधिकारी वा कर्मचाऱ्यांकडुन माहिती ही ३० दिवसांच्या आत पुरविण्याचे दृष्टिने विलंब होतो व त्यास सर्वस्वी जन माहिती अधिकारी जबाबदार असतात व सुरुवातीच्या ५ दिवसांत माहिती पुरविण्याचा आदेश दिलेला असेल तर असे सहाय्य घेतलेले अधिकारी व कर्मचारी हे विलंबास जबाबदार असतात. या अर्जाच्या संदर्भामध्ये अद्यापही त्या अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त झाली किंवा नाही याबद्दलचा कोणताही खुलासा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे अद्यापपर्यंत दिलेला नाही व त्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे जर ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देता येईल. अधिनियम ७(६) प्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी लागते व त्यामुळे सदरचा अर्जाच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मुद्या क्र. १ च्या संदर्भात मात्र मुदत कळविलेली असल्यामुळे तक्रारदार यांनी निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे व त्या करीता खर्च भरणा हा आवश्यक आहे. तक्रारदार यांनी एकाच अर्जात अनेक विषयांची / शाखांची विभागांची माहिती मागितली असल्याने विलंबास शास्ती लादणे योग्य होणार नाही.

----- आदेश -----

३) तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ०९-०८-२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुद्येनिहाय विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०११३/अपिलक्र ६३४९

श्री.जयप्रकाश मामचंद बगोरिया, ...अपिलकर्ता
१/३५, श्रीराम को.हौ.सो.,खेर नगर,
बांद्रा(पूर्व) मुंबई ४०० ०५१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा कार्यालय, प्रशासकीय इमारत,
९वा मजला,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, अंधेरी,
दादाभाई नवरोजी रोड,
अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१३.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तहसीलदार अंधेरी यांच्याकडे प्लॉट सर्व्हे नं. ३४१(पार्ट), बांद्रा (ईस्ट) अंदाजे ३१७ चौ.फुट हि मिळकत श्री.मामचंद सुखराम बगोरीया यांना १९५७ साली भाडेपट्टयाने दिलेल्या बाबतची अंदाजे जुनी फाईल क्र.NAE SR १४८ च्या संदर्भामध्ये निरीक्षण द्यावे आणि निरीक्षणा अंती प्रती द्यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा काळावधी १९५७-१४ जुन,२०१० माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १४-०७-२०१०रोजीचे पत्र दिनांक २६-०७-२०१० देण्यात आलेले दिसून येते. त्यात नस्ती आढळून येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १५-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०६-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिल अंशत: मान्य करण्यात येवून तहसीलदार अंधेरी यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या संचिकेचा अभिलेख कक्षात तपास घेऊन सदरची माहिती १५ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगपुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जुनी फाईल आहे व जुन्या फाईलचे अभिलेखाकारकामध्ये उपलब्ध असणे आवश्यक होते. परंतु अद्यापपर्यंत त्यांना माहिती दिलेली नाही व त्यामुळे निरीक्षण करता आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची नस्ती तलाठी यांनी शोधण्याचा प्रयत्न केला. तहसीलदार अंधेरी विभागाने नस्ती शोधण्याचा प्रयत्न केला परंतु उपलब्ध झाली नाही. परंतु सदरच्या नस्ती संदर्भामध्ये सन २००० मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एक अहवाल पाठविलेला आढळून येतो व त्यामुळे सदर प्रकरणाची मूळ नस्ती जिल्हाधिकारी कार्यालय शाखेकडे उपलब्ध असल्याने त्यांच्या कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. अर्जदाराने अर्जासोबत पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने या कार्यालर्यात दिनांक २७-१०-२०१० अन्वये मा. जिल्हाधिकारी, मुंऊजि यांचे कार्यालयात सदर जमीनीबाबतच्या माहिती संदर्भात नस्तीची मागणी केली त्यानंतर स्मरणपत्र-१ अन्वये दिनांक २५-०१-२०११ अन्वये पाठपुरावा केला. सदर प्रत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, मुंऊजि यांनी श्री.मामचंद सुखाराम बगोरिया मौजे-बांद्रा स.नं.३४१ मधील भाडेपट्टाने प्रदान केलेल्या जमीनीबाबत अभिलेखात उपलब्ध नस्ती दिनांक १५-०२-२०११ रोजी या कार्यालयास सुपूर्द करण्यात आली आहे. सदर नस्तीत अर्जदाराने अर्जासोबत पाठविलेले पत्राचे उल्लेख असून या कार्यालयाची नस्ती आणि १ ते ४७ चा समावेश आहे. सदर नस्तीचे परीक्षण घेऊन आज रोजी सदर अर्जदार यांस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याची तजविज ठेवली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तहसीलदार कार्यालयातुन त्यांना माहिती उपलब्ध करणे अपेक्षित आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तहसीलदार कार्यालयातून नस्ती ही जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दाखल झालेली असावी व त्यामुळे ती त्या ठिकाणी उपलब्ध झाली. नस्तीचा शोध हा सर्वच कार्यालयातून घेण्यात आलेला आहे असे असेल तर अपिलकर्ता यांनी तहसीलदार कार्यालयात पुन्हा नस्तीचा शोध घेऊन पुन्हा उपलब्ध झाल्यास किंवा उपलब्ध न झाल्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तीक राहील.

----आदेश----

३) अपिलकर्ता यांचा नस्तीचा शोध तहसीलदार कार्यालयातील जन माहिती अधिकारी तहसीलदार कार्यालयात घेणे व उपलब्ध झाल्यास किंवा न झाल्यास अपिलकर्ता यांना तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक :१७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०११५/अपिलक्र ६३४८

श्री.ओनिल अँथनी किनी, ...अपिलकर्ता
५३, कालिना, कोलिव्हरी व्हिलेज,
संताक्रूझ(पूर्व) मुंबई ४०० ०९८.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,
मुख्य सचिवांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
मुख्य सचिवांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी मुख्य सचिवांचे कार्यालयात त्यांच्ये दिनांक ०५-१२-२००९ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या, 'Memorandam of

request on behalf of 'Mool East Indian Sanghatna Trust',for poor and underprivileged East-Indian community. च्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२०१० रोजी आपल्या पत्रातील दिनांक ०५-१२-२००९ चा संदर्भ या कार्यालयाच्या क्रमांक : मुसका २००९/जनरल/१७१५८, दिनांक २२-१२-२००९ अन्वये अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना अग्रेषित करण्यात आलेला आहे. याबाबत माहितीच्या अधिकारात अधिक माहितीसाठी विभागाच्या माहिती अधिकाऱ्यांकडे (जसे,अवर सचिव तथा राज्य जन माहिती अधिकारी, महसूल व वन विभाग (वने), मंत्रालय, मुंबई ४०००३२) परस्पर संपर्क करणे उचित ठरेल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०६-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी मुख्य सचिव यांच्या कार्यालयामध्ये प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून सदर अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्ज हा मुख्य सचिवांकडे या करता दिला होता की, त्यांच्या अर्जात मागितल्याप्रमाणे त्यांना न्याय मिळू शकेल. परंतु त्या अर्जाची कोणतीही दखल न घेता माननीय सचिव कार्यालयाने ते अतिरिक्त मुख्य सचिव (वने), यांच्याकडे हस्तांतरीत केला. परंतु त्यांच्या कार्यालयामध्ये चौकशी केली असता अशा प्रकारची कोणतीही नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाली नाही असे त्यांना कळविण्यात आले व त्यामुळे त्यांनी पुन्हा त्यांचे अर्जाचा शोध घेण्याकरीता मुख्य सचिवाच्या कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु त्यांचे कार्यालयातील कार्यवाही संपली असे कळवून त्यांनी प्रथम अपिल निकाली काढले. मात्र त्यांचे दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्जाच्या संदर्भामध्ये पुढे काय झाले हे कळून येण्यास कोणताही मार्ग नव्हता. उलटपक्षी त्यांनी प्रथम अपिलाचा निर्णयामध्ये अर्जदाराने योग्य माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज किंवा पाठपुरावा केला पाहिजे व प्रस्तुत प्रकरणी वन विभागामार्फत कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे अपिलार्थीस ज्ञात असूनही मुख्य सचिव कार्यालयाच्या माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध केली नाही हे अपिलार्थीचे म्हणणे विसंगत आहे असे नमुद केले. वास्तविक वन विभागामध्ये त्यांनी चौकशी केली होती. त्यावर मुख्य सचिव यांच्या कार्यालयास वन विभाग संबंधित कार्यालयाना बोलवून अर्ज हस्तांतरीत झाल्यावर ते मिळून कसे येतात त्याबाबत जाब विचारणे आवश्यक होते. परंतु तसे न करता त्यांनी अपिल फेटाळेले व पुन्हा त्यांचे दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्जाच्या संदर्भात काहीही आढळ झालेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुख्य सचिव यांच्या कार्यालयात जे अर्ज येतात त्यावर तशी कार्यवाही होत नाही व ती कार्यवाही होण्याकरीता त्यात्या संबंधित कार्यालयाकडे सदरचा अर्ज किंवा तक्रार ही हस्तांतरीत केली जातात व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांचे दिनांक ०५-१२-२००९ अर्ज सुद्धा संबंधित विभागात हस्तांतरीत केलेला आहे. असे असेल तर त्यावेळेस एखाद्या व्यक्तीचा हस्तांतरीत केलेला अर्ज सुद्धा संबंधित विभाग नाकारते त्यावेळेस मुख्य सचिव कार्यालयही जबाबदार आहे की, त्या संदर्भामध्ये चौकशी करुन तो अर्ज निश्चितपणे त्या कार्यालयामध्ये आवक नोंदवही मध्ये अथवा संबंधित कार्यालयात आस्थापनाकडे चौकशी करुन मागविताना योग्य ते

मार्गदर्शन करणे योग्य ठरेल व त्यामुळे मुख्य सचिवांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरीत केलेला अर्ज हा कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठविला त्याची खात्री करुन अपिलकर्ता यांना तसे कळविणे संयुक्तिक राहील.अर्जाचे हस्तांतरण झाल्यानंतर त्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही तर त्या कार्यालयात प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल करावे असे कळविल्यास अपिलकर्ता यांना संबंधित अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध होवू शकेल. अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

---आदेश---

३) अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक २२-१२-२००९ रोजी हस्तांतरण केलेला अर्जाच्या संदर्भामध्ये दिनांक १०-०५-२०१० रोजी कळविल्याप्रमाणे हस्तांतरण केलेला माहितीचा अर्जाच्या संदर्भामध्ये अप्पर सचिव, मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलकर्ता यांना कळवावे.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक :१७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००५४/अपिलक्र ६३९४

श्री.तुषार गो.जाधव, ...अपिलकर्ता
७२, गांधीनगर,दै.शिबनेर मार्ग,
वरळी, मुंबई ४०० ०१८.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर,
जिल्हाधिकारी व जिल्हादंडधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,
जुने जकात घर, श.भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, महसूल शाखा, मुबई शहर,
जिल्हाधिकारी व जिल्हादंडधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,
जुने जकात घर, श.भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०८.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक तथा शासकीय माहिती अधिकारी यांच्यातर्फे श्रीमती श्रद्धा विनय सांरग हे हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सदर प्रकरणात परिपत्रक दिनांक ०१-०२-२०१० नुसार अर्जदार अपिलार्थीने खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

वरळी योजना क्र.५२ मधील सोबतच्या नकाशा मध्ये दर्शविलेल्या चिंचोळया पट्टीला भूकर (सर्वे नंबर) क्रमांक दिलले नाहीत. परंतू त्यातील काही जमीन वरळी सागर, पिरामल ब्रदर्स,शुभदा, सुखदा व पौर्णिमा गृहनिर्माण संस्था ह्यांना शासनाने भाडेपट्टयाने दिलेली आहे. तसेच उर्वरीत जमिनीवर, शिवाजी व कृष्ण नगर ह्या झोपड्यांत बृहन्मुंबई महानगरपालिके कडून फोटोपास वितरीत केलेले आहेत. सबब ही जमीन शासनाची आहे किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे ह्याबाबत माहिती देण्यात यावी.

अर्जदाराने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अर्जदाराने वरळी योजना क्र.५२ मधील भूखंडाविषयी विश्लेषण केलेले आहे. जमीन ही शासनाची मालकीची आहे किंवा बृहन्मुंबई महानगर पालिकेची याबाबत विचारणा करण्यात आली होती व सदरची मिळकत कोणाच्या नांवे आहेत याबाबतची माहिती कळविण्यात यावी.

सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला आवश्यक असलेले कागदपत्रे पुरविलेले आहेत. तसेच दिनांक २३-०७-२०१० च्या पत्राने अर्जदाराने ज्या भूखंडाविषयी माहिती मागितलेली आहे त्या विषयी सदर भूखंडाबाबत मालकी हक्का संबंधित ती शासनाची आहे किंवा महानगरपालिकेची आहे ह्याबाबत उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने निषिद्ध मालकी हक्काबद्दल सांगता येत नाही.

त्यानंतरही अर्जदाराच्या म्हणण्यानूसार अर्जदाराने या आधी महानगरपालिकेकडे अर्ज दाखल केला होता व त्यात त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे म्हटले आहे. दिनांक ०५-१२-२०१० रोजी जन माहिती अधिकारी वसाहत अधिकारी, जी /दक्षिण विभाग यांच्या कार्यालयाने अर्जदाराला सदरची माहिती जिल्हाधिकारी तथा माहिती अधिकारी कार्यासन क्रमांक २, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, बृहन्मुंबई महानगरपालिका जर जागेचा मालकी हक्क सांगत असेल तर त्यांच्याकडे संपुर्ण माहिती असणे अपेक्षित व आवश्यक आहे व तसे नसल्यास त्यांनी त्यांच्याकडे या जागेसंबंधी जी कागदपत्रे उपलब्ध आहेत आणि त्या कागदपत्रांच्या आधारे ते मालकी हक्क सांगत आहेत. त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती प्रमाणित करुन अर्जदाराला विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. तर कुठल्याही प्रकारचे कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास तसे पत्र (कागदपत्र नसल्याबाबतचे) अर्जदाराला लेखी पत्र द्यावयाचे आहे व तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी याबाबत नगर भूमापन क्र.२ जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन कुठलाही पत्रव्यवहार झाले असल्यास त्या प्रतीच्या छायांकित प्रती सुद्धा अर्जदाराला पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्यानंतर मालकी हक्क जर बृहन्मुंबई

दाखवत असेल तर ती त्यांनी योग्य पाठपुरावा करुन सदर कागदपत्रे मिळावीत व त्यानुसार अर्जदाराला मिळाल्यानंतर पत्रव्यवहार करावा. वरील आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

३) जन माहिती अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका जी/दक्षिण कार्यालय यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी अर्जदाराने जी माहिती मागितलेली वरळी योजना क्र.५२ मधील सोबत नकाशा मध्ये दर्शविलेल्या चिंचोळया पट्टयालगतच्या वरळी सागर, पिरामल ब्रदर्स, शुभदा, सुखदा व पौर्णिमा यांना शासनाने भाडेपट्टीवर दिलेले आहे या संबंधित माहिती अर्जदाराला आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क पाठविण्यात यावी. मागितलेली माहिती उपलब्ध नसल्यास तशा प्रकारचा पत्रव्यवहार करावा. तरी काहीही उपलब्ध नसल्यास तसे लेखी पत्र द्यावे.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०१६७/अपिलक्र ६३९७

श्री.गौरंग सी.शहा,
जी-१०१, पंचशील गार्डन्स को.हौ.सो.
महावीर नगर, कांदीवली (पश्चिम), **...अपिलकर्ता**
मुंबई ४०० ०६७.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ.-दोन, ...उत्तरवादी
बृहन्मुंबई महापालिका, महापालिका इमारत, सी विंग,
संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फूट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,
कांदीवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), आर विभाग,
बृहन्मुंबई महापालिका, महापालिका इमारत, सी विंग,
संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फूट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,
कांदीवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :२०.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. उत्तरवादी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.बा.वे.शिंदे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की अर्जदाराला माहिती पुरवण्याची जन माहिती अधिकारी यांची तयारी आहे. ह्या आधी माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे नेमकी कोणती

माहिती पाहिजे त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला माहिती घेऊन जाण्याबद्दल सांगितले होते. परंतु मागितलेली नकाशे हे बहुतांश बंडलामध्ये बांधले होते व ते ओळखता येवू शकले नाहीत म्हणून ते अर्जदाराला देता आले नाही. सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी यांनी सदर प्रकरणात दिनांक ०३-०३-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दुपारी १२ नंतर संर्पक साधल्यास अर्जदाराने प.पत्र **अ** नुसार मागितलेली तिन्ही संस्थेबाबतची माहिती (Occupation finance Plan) हे पुरविण्यात येतील. सदरची माहिती ही विनाशुल्क पुरविल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी ह्या आयोगासमोर कबूल केले. त्यावरुन अर्जदाराचे समाधान झाले व अर्जदाराने दिनांक ०३-०३-२०११ रोजीची माहिती उपलब्ध करुन घेण्यास तयारी दर्शविली. त्यानंतर ही अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

५) अपिल निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०१६१/अपिलक्र ६३९६

श्री. प्रभाकर विष्णू सुरते,
१७८, संत तुकाराम मार्ग, सी.के. बिल्डींग, २ रा मजला, ...अपिलकर्ता
रु.नं.४७, दाणबंदर, मस्जिद बंदर (पूर्व),
मुंबई ४०० ००९.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन),
वरळी विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
१० मजला, इ विंग,नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगाव, मुंबई ४०० ०१०.

जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन),
वरळी विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
१० मजला, इ विंग,नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१८.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. उत्तरवादी जन माहिती अधिकारी श्री.जिवातोडे, सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन), कार्यालय वरळी विभाग हे हजर आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी श्री. एस.ए.के. काझी विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई हजर आहेत व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.जे.चन्ने विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई हे सुद्धा हजर आहेत.

अर्जाचे प्रथम अपिलाचे परिपत्रक Annexture A अवलोकन केले असता अर्जदाराने मागितलेली बरीचशी माहिती मिळालेली नाही व त्यामुळे अर्जदाराने या आयोगासमोर द्वितीय

अपिल दाखल करावे लागले. सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी यांना श्री. गंवडी ह्यांनी निरीक्षण देण्याचे कबूल केलेले आहे व त्यानुसार अर्जदाराला निरीक्षण देऊन, अर्जाला त्या फाईलमधून जे कागदपत्रे पाहिजे ते विनाशुल्क देण्यात येतील असेही कबूल केले आहे. त्यामुळे अर्जदाराचे / अपिलार्थीचे समाधान झाले असून अपिल निकाली काढण्यात येते. त्यानंतर ही अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार अर्जदार ह्या आयोगासमोर करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

७) अपिल निकाली काढण्यात येते.

८) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ२०१०/तक्रार क्र.४८

श्री.संदीप प्रकाश केदारे, **---तक्रारदार**
१७,१३६०, जुनी एम.एच.बी.कॉलनी,
गोराई रोड, (बोरिवली (पश्चिम),
मुंबई ४०० ०९१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,
अनुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक व माहविद्यालय,
आकुर्ली रोड, कांदिवली (पश्चिम),मुंबई

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
अनुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक व माहविद्यालय,
आकुर्ली रोड, कांदिवली (पश्चिम),मुंबई **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. अर्जदाराला ह्या आधी माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच या आयोगासमोर बरीचशी माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच प्रती या आयोगाच्या रेकॉर्डवर लावलेले आहे. तसेच अर्जातील मागासवर्गीय कर्मचारी शिक्षक हे जर त्या कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्याबाबत शाळेकडे असलेले जाती विषयक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती पाहिजे आहेत व त्यासाठी सदर संस्थेचे प्राचार्य ह्यांनी त्यांच्या या कार्यालयात उचित कार्यवाहीसाठी देण्याचे कबूल केले आहे. ह्या आयोगासमोर अर्जदाराला मागितलेली माहिती देण्याचे कबूल केलेले आहे व अर्जदाराने हे मान्य केलेले आहे म्हणून तक्रार क्रमांक ४८/०१ हे निकाली काढण्यात येते व अर्जदाराचे समाधान न झाल्यास ह्या आयोगासमोर तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२१०६/तक्रार क्र.१०

श्रीमती विशाखा विनायक इंगळे, **--तक्रारदार**
बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सोसायटी,
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),मुंबई ४०० ०८९.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (शिक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ.आंबेडकर मार्ग,
परेल, मुंबई ४०० ०१२.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण खाते,
लखमजी नप्पू रोड, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व),
मुंबई ४०० ०१४. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदाराने ३० जुलै, २०१० रोजी ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे व त्यातही आयोगाने आदेश करुन सुद्धा अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. सदर आदेशाला निर्गमित करुन १ महिन्याचा कालावधी उलटुन गेलेला आहे. संबंधिताना माहिती देण्याविषयी निर्देश देण्यात यावेत अशी विनंती केलेली आहे. त्या विषयांच्या अनुषंगाने ह्या आयोगासमोर श्रीमती जयश्री यादव प्रशासकीय शाळा हे हजर आहेत व अर्जदाराला ३० पेजेसची माहिती ह्या आयोगासमोर पुरविण्यात आलेली आहे. तरी अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येवुन अर्जदाराला ह्या आयोगासमोर माहिती उपलब्ध दिल्यानंतर अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

३) तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४६/०१

श्री.जगदीश देवराम टोरपे, **---तक्रारदार**
२५-अे, टोरने हाऊस, पहिला मजला,
फ्लॅट क्र.२, तेजपाल स्कीम, ५ वा रस्ता,

विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),
बृहन्मुंबई महानगरपालिका पश्चिम उपनगरे,
के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम,मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प),
बृहन्मुंबई महानगरपालिका पश्चिम उपनगरे,
के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम,मुंबई. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी हजर आहेत. ह्या आयोगाने दिनांक ३१-१०-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला होता. सदर प्रकरणात अर्जदार / अपिलार्थी यांनी दिनांक २०-०८-२००९ तक्रार दाखल केलेली आहे व त्यात अर्जदाराला माहिती मिळालेली नाही, संबंधिता विरुद्ध योग्य कारवाई करण्यात यावी. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत व अर्जदाराला माहिती पुरविलेली किंवा नाही कुठलाही उल्लेख अथवा उत्तर जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे दाखल केलेला नाही. तसेच या आयोगाने दिनांक ०५-०२-२०११ रोजी सुनावणीची तारीख ठेवल्यानंतर ह्या प्रकरणात दिनांक २१-०२-२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली व ह्या अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबत लेखी खुलासा सादर करावा असे म्हटले होते. जर उपस्थित न राहिल्यास ह्या अधिनियमाचे कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व निर्णय एकतर्फी देण्यात येईल अशी सुनावणीची नोटीस देवून सुद्धा आज २१-०२-२०११ रोजी जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे,के व एव वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई हे गैरहजर आहेत व कुठलेही उत्तर दाखल केलेले नाही. या आयोगासमोर अर्जदाराने माहिती न मिळाल्याबद्दल तक्रार सुनावणी दरम्यान अशी तक्रार दाखल केलेली आहे. अर्जदाराला आजपर्यंत माहिती मिळालेली नाही. अर्जदाराचे म्हणणे ग्राह्य धरुन ह्या आयोगाला असलेले कलम १८ च्या अधिकारानुसार सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांना दोषी ठरविण्यात येते व त्यांच्याविरुद्ध लागू असलेले सेवा विषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते व वरील आदेश पारित करुन अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

४) आयुक्त महानगरपालिका बृहन्मुंबई यांना असा आदेश देण्यात येतो व शिफारस केल्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प) बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे, के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई यांच्या विरुद्ध व शिफारस ह्या नियमाचे कलम २०(२) नूसार शिफारस केल्याप्रमाणे कारवाई करुन ३ महिन्याच्या आत अहवाल हा आयोगाला पाठवावा.

५) तसेच सध्या कार्यरत असेलेले जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प) त्यांनी अर्जदाराला आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क म्हणजे पंजीबद्ध डाकेने ह्या आयोगाचा निर्णय दिनांक ३१-१०-२००८ नुसार अर्जदाराला माहिती पाठवावी.

६) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४७/०१

श्री.सुरेश भिमसेन कागिनकर, ---तक्रारदार
३/१०१, योगेश्वर गृहनिर्माण संस्था,
ना.म.जोशी मार्ग,
मुंबई ४०० ०१३.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी / संगा,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार /अपिलार्थीने ह्या आयोगासमोर दिनांक ३०-०८-२०१० रोजी खालील तक्रार दाखल केलेली आहे.

दिनांक ३०-०६-२०१० रोजीच्या ऑर्डरनुसार मा.माहिती अधिकारी (उपमुख्य अधिकारी) सं.गा, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गुहनिर्माण भवन बांद्रा,मुंबई ह्यांच्याकडून अद्यापपर्यंत मी मागणी केलेली माहिती मला मिळाली नाही आहे ह्याची आपण नोंद घ्यावी. सदर प्रकरणी संबधीत अधिकारी ह्यांच्यावर शासन नियमानुसार योग्य ती उचित कारवाई करण्यात यावी हि नम्र विनंती.

सदर प्रकरणात ह्या आयोगाने तक्रार नं.२०१०/१०१४/०२ ह्या तक्रारी संबंधित दिनांक २३-०३-२०१० रोजीचा आदेश पारित केला होता. त्यानुसार अर्जदाराने Rent विषयीच्या प्रती मागितलेल्या होत्या. सदर Rent विषयीच्या प्रती रुम नं. ६४, बिल्डीग नं. २, जिजामाता ट्रान्झिट कॅम्प, काळाचौकी, मुंबई या संबधी होती. सदर प्रकरणात अर्जदाराने ह्या आयोगासमोर द्वितीय अपिल दाखल केले होते व दिनांक २३-०३-२०१० रोजी ह्या आयोगाने आदेश पारित केला होता की, अर्जादाराला १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी आणि त्यानुसार ह्या प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अर्जदार / अपिलार्थी हजर होते व प्रतिवादी श्री. सुर्यवंशी हजर होते आणि अर्जदाराला माहिती पुरविण्यात आलेली नव्हती म्हणून उत्तरवादी यांना आदेश सुचना दिले होते की, १५ दिवसांच्या आत अर्जदाराला माहिती पुरवावी. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार हे जन माहिती अधिकारी यांना भेटला परंतु अर्जदाराला माहिती देण्यात आलेली नाही आणि म्हणून आयोग निष्कर्षाप्रती पोहचले की, उत्तरवादी ह्या अधिनियमाच्या तरतुदीचा भंग केलेला आहे म्हणून रु.२५०००/- दंड करण्यात येवू नये अशाप्रकारचे कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. कारणे दाखवा नोटीस सदर प्रकरणी आदेश पारित करुन देण्यात आलेली आहे. या अनुषंगाने सदर प्रकरणी ह्या आयोगाने दिनांक ०४-०२-२०११ रोजी सुनावणीची नोटीस जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी, उप मुख्य अधिकारी मुंबई, मुंबई इमारत दुरस्ती व पुनर्रचना मंडळ,गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना सदर प्रकरणाची नोटीस देवुन सुनावणीची आज म्हणजे दिनांक २१-०२-२०११ रोजी दुपारी २.०० वाजता ठेवण्यात आली आहे.

सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी हजर होते. परंतु उत्तरवादी यांच्यातर्फे डॉ.अविनाश गोटे उपमुख्य अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. ह्यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणी अर्जदाराने त्यांचे अपिल दाखल केलेले नाही. तसेच ह्या प्रकरणात जन माहिती अधिकारी हे इस्टेट मॅनेजर श्री. संजय सुर्यवंशी हे हजर होते. सदर प्रकरणी कागदपत्राचे अवलोकन केले असता दिनांक १४-०६-२०१० रोजी श्री. सुर्यवंशी (मिळकत व्यवस्थापक) हे हजर होते. परंतु अर्जदाराला माहिती देण्याबाबत कुठलीही तसदी घेतल्याचे दिसत नाही. तसेच ह्या प्रकरणात श्री. सुर्यवंशी हे दिनांक १४-०६-२०१० रोजी सुद्धा हजर होते. अपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार श्री.सुर्यवंशी हे सुद्धा मागील तारखेला हजर होते. तसेच त्यांच्या म्हणण्यानुसार सदर माहिती ही कार्यकारी अभियंता यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यांनी ह्या आयोगासमोर दिनांक १८-०२-२०११ रोजी जे लेखी जबाब दाखल केलेले आहे. त्या संबंधीत मूळ अर्ज पुढील कार्यवाहीसाठी कार्यकारी अभियंता ''इ विभाग'' यांना दिनांक १२-११-२००९ रोजी जा.क्र.४६००/०९ अन्वये पाठविण्यात आला होता. परंतु कार्यकारी अभियंता ''इ-१'' या कार्यालयाने कार्यकारी अभियंता ''फ/ दक्षिण'' या कार्यालयाशी संबंधीत असल्याने दिनांक ०२-१२-२००९ रोजी जा.क्र.७२५/०९ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे. तसेच संक्रमण गाळ्याविषयक कार्यभाराचे जन माहिती अधिकारी हे मिळकत व्यवस्थापक श्री.संजय सुर्यवंशी हे आहेत. दिनांक ०४-०९-२००९ पासून संक्रमण गाळे विषयक सर्व कामकाज हे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडे प्राधिकरणाचे व मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचे आदेशानुसार वर्ग केले आहे. त्यामुळे अर्जदार / अपिलार्थी यांनी उप मुख्य अधिकारी / संक्रमण गाळे यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले असते तर अर्जदाराचे मुद्या निकाली निघाला असता. त्या अनुषंगाने ह्या आयोगाने अर्जदाराला तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांना सदर प्रकरणी अर्जदाराचे प्रथम अपिल निकाली काढण्याच्या दृष्टिने तोंडी सूचना व आदेश दिलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या प्रती ह्या आयोगाकडून घेऊन दिनांक २८-०२-२०११ ला सकाळी ११ वाजता सुनावणी घ्यावी व जन माहिती अधिकारी किंवा कार्यकारी अभियंता यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन अर्जदाराला विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची माहिती ही विनाशुल्क पुरविण्यात यावी.

हे काहीही असले तरी सदर प्रकरणात निश्चितच अर्जदाराला माहिती पुरविण्याच्या दृष्टिने व प्रथम अपिल निकाली काढल्याचे दृष्टिने नियमानुसार कार्यवाही झालेली नाही व ह्या प्रकरणी मुख्य अधिकारी (Chief Officer), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी एखाद्या सक्षम अधिका-यामार्फत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्या विरुद्ध अधिनियमानुसार चौकशी करुन माहिती उशिरा देण्याबाबत जबाबदारी निश्चित करावी व जबाबदार आढळल्यास त्यांना लागू असलेला सेवा विषयक नियमाचे भंग केल्याच्या कारणावरुन शिफारस केल्याचे गृहित धरुन योग्य ती कारवाई करावी. तसेच ह्या आयोगाने दिनांक **३०-०६-२०१०** रोजी पारित केलेला आदेशाच्या अनुषंगाने उत्तरवादी श्री. संजय सुर्यवंशी तथा जन माहिती अधिकारी यांच्याविरुद्ध अर्जदाराचा अर्ज ह्या अधिनियमाचे कलम ७(१) नूसार निकाली न काढल्यामुळे व अर्जदाराला माहिती न पुरविल्यामुळे रु.५०००/- चा दंड बसविण्यात येतो व सदरचा दंड हा त्यांनी २ मासिक हप्त्यात संबंधित संस्थेकडे भरणा करावे. सदर लेखाशिर्षा, ''००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)''. या

सार्वजनिक लेखाशिर्षा खाली जमा करण्यात यावी. वरील आदेश व सुचना देवुन तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

३) तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४५/०१

श्री.मंगेश गोविंद घोरपडे, ---तक्रारदार
५०, पेरीन नरीमन स्ट्रीट, दुसरा माळा,
रुम नं. ११, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य नियोजकार, ---गैरतक्रारदार
सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
नियोजन व वास्तुशास्त्र विभाग,
सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार गैरहजर आहेत. अर्जदाराने दिनांक ०७-०२-२००८ रोजी आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे. त्यात अर्जदाराने दिनांक ०३-१२-२००७ रोजी अर्जावर जन माहिती अधिकारी सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई या कार्यालयाकडून माहिती मागितलेली आहे. मागितलेली माहिती ही ६ मुद्यांमध्ये आहे. अर्जदाराचे म्हणण्यानुसार ३ मुद्यांची माहिती दिलेली आहे व ३ मुद्यांची माहिती बाकी आहे. मुद्या क्र. २,३,६ ची माहिती बाकी आहे. अर्जदाराने प्रथम अपिल दिनांक २९-०१-२००८ अपिलीय अधिकारी सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे पोस्टाने (डाक नोंद पोच द्वारे) अपिल अर्ज पाठविलेले आहे व स्वीकृत न करताच परत पाठविलेले आहे. त्यामुळे अर्जदाराने तशी तक्रार केलेली आहे. अपिल अर्ज स्वीकरण्यात आलेला नाही. तरी सदर प्रकरणात पुढील कार्यवाही कशा प्रकारे करणे योग्य होईल ह्या बाबत मार्गदर्शन करावे.

सुनावणी दरम्यान अतिरिक्त मुख्य नियोजनकार विभागाचे श्री किरण शिंदे हजर आहेत. व्यवस्थापक (पणन - १) श्री. राजेंद्र मोरे हजर आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदारास दिनांक ०३-१२-२००७ च्या अर्जानुसार परिपत्रक Annexture A नूसार माहिती नियोजनकार यांच्याकडे उपलब्ध असुन मुद्या क्रमांक १,४ व ५ या मुद्यांची माहिती दिलेली आहे. मुद्या क्रमांक २ व ६ पणन विभागाशी संबंधित आहे व त्यांच्या म्हणण्यानूसार त्यांना वरील सुचना अभिप्रेत नसल्यामुळे माहिती पाठवू शकले नाही व अर्जातील माहिती शोधुन घेऊन पाठविण्यास तयार आहेत. तरी अर्जदाराने मुद्या क्रमांक २ व ६ ची माहिती पंजीबद्ध डाकेने आजपासून १० दिवसांच्या आत पाठवयाची आहे. आयोगापुढे तसा मुद्या क्रमांक ३ अभियांत्रिकी विभागाशी संबंधित आहे व त्यासाठी सेवा पुरविण्यासंबंधी बाबत सत्य परिस्थिती अर्जदाराने आज पासून १० दिवसांच्या आत पंजीबद्ध डाकेने पाठवावयाची आहे. त्या संबंधित मुद्यांबाबतचे स्पष्टिकरण अर्जदाराला लेखी स्वरुपात कळवावे. तसेच मुद्या क्रमांक ४ व ५ ची माहिती देण्यात आलेली आहे. अर्जदार गैरहजर

असल्यामुळे वरील बाबींचे आणखी शहानिशा होवू शकली नाही. तरी वरील दिलेल्या सुचनेनुसार अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

३) तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००७४/अपिलक्र ६३९३

श्री.जितेंद्र एच.प्रसाद, ...अपिलकर्ता
बायोटेक्नो लॅब, २८८/९०, डॉ.सी.एच.स्ट्रीट,
चार्टर हाऊस समोर, धोबीतलाव,
मरीन लाईन्स,मुंबई ४०० ००२.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३)मुंबई,
गृहनिर्माण भवन,कक्ष क्र.६९, तळमजला,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पी-विभाग,
३१५, ए/१ इमारत, वडाळा ट्रक टर्मिनल, आरटीओ जवळ,
वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार / अपिलार्थी हजर आहे. दोघांचे म्हणणे ऐकूण घेतलेले आहे. दोघांच्या म्हणणे ऐकल्यानंतर अर्जदाराला परिपत्रक नुसार जी माहिती पाहिजे आहे ती सहकारी गृहनिर्माण संस्था पी-विभाग, मालाड (पश्चिम) या संस्थेची पंजी बद्दलची माहिती पाहिजे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर संस्था ही नियमानुसार पंजीबद्ध करण्यात आलेली नाही अशी अर्जदाराची तक्रार आहे. सदर प्रकरणी सुनावणी दरम्यान या संबंधित अर्जदाराने जनविकास को.ऑप.सो.लि.,मालाड वेस्ट या संस्था संबधातील जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक मुंबई यांच्या आख्यारित असेलेली सर्व कागदपत्रांचे निरीक्षण दिनांक २३-०२-२०११ रोजी दुपारी २.०० नंतर द्यावयाची ठरली आहे. तसेच माहिती संबंधित संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावयची असेल तशा प्रकाराची इच्छा व्यक्त केल्यास ती सुद्धा माहिती जन माहिती अधिकारी यांनी शक्य तितक्या लवकर मिळवून अर्जदाराला उपलब्ध करुन द्यावयाची आहे व त्यानंतर अर्जदार हा महाराष्ट्र राज्य सहकार अधिनियम १९६० चे कलम १५४ नुसार अपिल करावयाचे झाल्यास अर्जदार तसे अपिल करील. माहिती संबंधीत कुठलीही तक्रार असल्यास त्या संबंधित अर्जदार हा अधिनियमाचे कलम १९(१) प्रमाणे वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रार करु शकतो. वरील आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

३) अर्जदार व जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी आता कबूल केल्यामुळे दिनांक २३-०२-२०११ तारखेला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी २ नंतर संबंधित संस्थेविषयीची जी माहिती आवश्यक आहे ती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे ठरल्यावरुन अर्जदाराचे अपिल निकाली काढले आहे.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./४९३१४/अपिलक्र ६३९५

श्री.सी.पी.सिंग (ॲडव्होकेट), ...अपिलकर्ता
०२, क्लासिक पॉवर रेसिडेन्सी, गुरु निवास सबवे रोड नं.२ समोर,
टी.पी.एस-VI, सांताक्रुझ (पश्चिम),मुंबई ४०० ०५४.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नवि-१०),
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-१०),
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी सुनावणी दरम्यान गैरहजर आहे. अर्जदाराचा मुळ अर्ज परिपत्रक दिनांक २४-०९-२००९ रोजीच्या अर्जानूसार जन माहिती अधिकारी यांच्या सांगण्यानुसार माहिती पुरविण्यात आलेली आहे. तरी सुद्धा अर्जदाराने परिपत्रक **ब** नुसार प्रथम अपिल दिनांक ०९-०३-२०१० रोजी दाखल केलेले आहे. उप सचिव, नगर विकास यांच्याकडे दिनांक ०३-०४-२०१० रोजी सुनावणी झाली. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला दिनांक १२-०४-२०१० रोजी कागदपत्राचे अवलोकन करुन माहिती पुरविण्यात आलेली आहे.

तसेच जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अर्जाच्या मूळ प्रपत्र Annexture A नुसार दिनांक ३०-११-२०१० रोजी अपिल क्रमांक ६०९२ ह्या आधीच निर्णय दिलेला आहे व त्या अनुषंगाने स्वत: दिनांक २४-१२-२०१० रोजी पुन्हा माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यांनी ह्या आयोगासमोर असे निदर्शनास आणले की, दिनांक ३०-११-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे लिहून दिले की, स्वत: माहितीसाठी येतील परंतु ते न आल्यामुळे शेवटी दिनांक १५-०४-२०१० रोजी अर्जदाराला शीघ्र टपालाने माहिती पाठविण्यात आलेली आहे. तसेच अर्जदाराने असे निदर्शनास आणले की, अर्जदाराने पत्र दिलेल्या पत्त्यावरुन पत्रव्यवहार हा Unclaim म्हणून परत येत आहे. दिनांक ०५-०४-२०१० रोजीच्या निर्णयानुसार अपिल निकाली काढण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक २४-१२-२०१० रोजी उत्तर दिले व माहिती पाठविण्यात आली. सदर माहिती शीघ्र डाकेने पाठविली व ती परत आलेली नाही ती स्वीकारली असावी. यावरुन असा निकष काढण्यात येतो की, सदरची माहिती स्वीकारलेली आहे. तसेच अपिलकर्ता यांचे समाधान झाले असावे असा निकष काढण्यात येत असून अर्जदाराचे अपिल हे खारीज करण्यात येते.

----आदेश----

३) अपिल खारीज करण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)

Gawas/feb 2011

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४९/०१/११

श्रीमती शैलजा भालचंद्र सुभेदार, **---तक्रारदार**
अंबिका को.ऑ.हौ.सो.लि.,
बिल्डींग नं.७, रुम नं.१७८,
सिद्धार्थ नगर नं.३,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०० १०४.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१. **----गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / तक्रारदार गैरहजर आहेत. ह्या प्रकरणी अपिल क्रमांक २०१०/५०८७/०२ वर आयोगाने अर्जदाराचे अपिल मान्य करुन दिनांक २८-१२-२००६ रोजी सादर केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी असे म्हटले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्री. बी.एम.काकड हे हजर आहेत. यांच्या म्हणण्यानुसार मा. राज्य माहिती आयुक्त यांनी दिनांक २३-०६-२०१० रोजी दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी म्हणून जा.क्र. २२५२ नूसार दिनांक १३-०७-२०१० चे पत्राद्वारे माहिती पाठविण्यात आली होती. त्यानंतर दिनांक १२-०८-२०१० रोजी अर्जदार / तक्रारदार यांनी पुन्हा तक्रार अशी तक्रार केली की, मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार माहिती पुरविण्यात आलेली नाही. दिनांक १४-१२-२०१० रोजी सदर प्रकरणी ह्या आयोगासमोर सुनावणी झाली व त्यात मौखिक आदेश देण्यात आले. दिनांक ०७-१२-२०१० रोजी झालेल्या रोजनाम्याची प्रत मिळावी अशी विनंती केली व ती सुद्धा मान्य करण्यात येवून दिनांक २०-१२-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अर्जदार हजर झाले. परंतु नकार दिल्यामुळे सदरची माहिती साध्या पोस्टाने अर्जदाराला पाठविण्यात आली. त्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले असेल असा निकष काढल्यामुळे अर्जदाराची तक्रार ही निकाली काढण्यात येते. अर्जदाराला सदर माहिती पोस्टद्वारे पाठविलेली आहे. माहिती न प्राप्त झाल्यास स्वत: जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी प्रथम श्रेणी - १, यांच्याकडुन विनाशुल्क उपलब्ध करुन घ्यावी.

----आदेश----

३) तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.५०/०१

श्री.विश्वास वसंत ताम्हणकर, ---तक्रारदार
टागोर नगर, चाळ क्र. १५६,
खो.क्र.२५८५, ग्रुप क्र.५/ब,
विक्राळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
(मुख्यालय -१), पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,
बृहन्मुंबई, मुख्यालय-१,तळमजला, क्रॉफर्ड मार्केटसमार,
डी.एन.रोड,मुंबई ४०० ००१. ----गैरतक्रारदार

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / अपिलाथी गैरहजर आहेत. अर्जदाराने दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या अनुषंगाने ह्या आयोगाने ह्या प्रकरणी ह्या आधी दिनांक ०४-१०-२०१० सुनावणी झाली. अर्जदार हजर होते व उत्तरवादी हजर होते. सदर प्रकरणी कुठल्याही प्रकारचे लेखी अथवा मौखिक आदेश पारित करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे सदर प्रकरण प्रलंबित होते. त्या प्रकरणी ह्या आयोगाने आज दिनांक २२-०२-२०११ रोजी सुनावणी ठरविली असताना अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय - १ श्री.बी.वाय.जंजाळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस

आयुक्त, मुख्यालय-१ श्री.एच.झेड.राठोड हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, मुख्यालय -१ श्री.विजयसिंह जाधव हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी या आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दिनांक ०४-१०-२०१० अर्जदाराची तक्रार क्रमांक रामाआ-२०१०/ त.क्र.९७३/०२ ह्या आयोगाला लेखी उत्तर दाखल केलेले आहे व त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय -१), मुंबई यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयाच्या अभिलेखानुसार संबंधित कार्यसनाकडुन प्राप्त झालेली माहिती अर्जदारास जावक क्र. ६११/सपोआ/मुख्या-०१/माअअ/०९ दिनांक १२-०१-२००९ रोजी अन्वये पाठविण्यात आलेली आहे.

अर्जदाराने सदर प्रकरणात सह.पोलीस आयुक्त श्री. हिरा राठोड यांनी सत्य पडताळणी न करता त्यांना माहिती तशीच दिली त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन झालेले नाही असे म्हटले आहे. तरी अर्जदार गैरहजर असल्यामुळे कुठल्या कागदपत्रांची पडताळणी झाली नाही व कुठल्या आदेशाबद्दल पालन झाले नाही त्याबाबत अर्जदाराची तक्रार आहे. अर्जदार गैरहजर असल्यामुळे हे समजू शकले नाही. अर्जदार गैरहजर असल्यामुळे अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येते. तसेच सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी असे सांगितले की, अर्जदार हा वारंवार जुनी व जास्त प्रमाणात माहिती मागुन व त्यावर प्रश्न व उपप्रश्न विचारणे. त्या अनुषंगाने अर्जदाराने प्रकरणात माहिती मागितलेली आहे. सन २००७ या वर्षात नस्ती क्रमांक ११८ द्वारे माहिती मागितलेली आहे. सन २००८ या वर्षात ७ अर्ज दाखल केले, सन २००९ या वर्षात ८ अर्ज दाखल केले,सन २०१० मध्ये ५ अर्ज दाखल केले व त्यात बहूतेक अर्ज त्याच प्रकारच्या माहिती संबंधित आहे. त्यामुळे अर्जदाराला ह्या पूर्वी उपलब्ध असलेली संपुर्ण माहिती प्राप्त करुन देण्याबाबत प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार मागितलेली माहिती वास्तविक पाहता कलम ७(९) खाली निकाली काढण्यात येवू शकते कारण मागितलेली माहिती ही २५ मुद्दे व त्यापेक्षा अधिक प्रमाणात मागविण्यात आली आहे. सदरची माहिती ही वारंवार मागितली जाते. तरीसुद्धा अर्जदाराला माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे अर्जदाराने केलेली तक्रार ही सत्यावर आधारित नसून चूकीची केली म्हणून सदर माहिती अधिकाराच्या गैरवापरातुन तक्रार घडत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तरी अर्जदाराची तक्रार ही खारीज करण्यात यावी ही विनंती केली आहे. उत्तरवादी यांनी दाखल केलेले उत्तर दिनांक ०४-१०-२०१० रोजीचे अवलोकन तसेच दिनांक २२-०२-२०१० अर्जदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने उत्तरवादी यांनी दाखल केले उत्तर मान्य करुन अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येते.

----आदेश----

३) तक्रार खारीज करण्यात येते.

४) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.५२/०१

श्री.अब्दुल गफूर का.हुणशाळ, **---तक्रारदार**
हॉटेल प्रेसिडेंन्ट, महाराष्ट्र नगर,
बांद्रा(पूर्व), मुंबई ४०० ०५१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला,गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला,गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१. **----गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / तक्रारदार गैरहजर आहेत. अर्जदार यांनी ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे व त्यात ह्या आयोगाने आदेश देवून संबंधित अधिकारीने माहिती आजतागायत दिली नाही व ती देण्याची टाळाटाळ करीत आहेत. त्यावर संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व अर्जदाराला लवकरात लवकर माहिती देण्याचा आदेश देण्यात येवून या अनुषंगाने ह्या आयोगाने सुनावणी ठेवली होती व आज दिनांक २२-०२-२०११ रोजी अर्जदार गैरहजर आहेत. अर्जदाराला दिनांक २०-०३-२०१० रोजीच्या पत्रासोबत मागितलेली माहिती अर्जदाराला पाठविण्यात आलेली आहे व त्याची एक प्रत ह्या आयोगासमोर दाखल करण्यात आलेली आहे व त्यामुळे अर्जदाराला माहिती मिळाल्यामुळे अर्जदार आज दिनांक

२२-०२-२०११ रोजी गैरहजर राहिल्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले असावे असा निकष काढण्यात येवून अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

३) तक्रार निकाली काढण्यात येते.

४) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०२९९/अपिलक्र ६४०८

क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०२९९-ब/अपिलक्र ६४०९

श्री.आनंद सोपान पारगावकर, ...अपिलकर्ता
१३५/३६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,
पंतनगर, घाटकोपर (पूर्व),मुंबई ४०० ०७५.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड,
ब्रांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०.
जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी (प्रकल्प),
एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड,
ब्रांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०१.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २३.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी हे हजर आहेत. दोन्ही प्रकरणात मागितलेली माहिती ही खेतवाडी, टीपीएसए-६,फायनल प्लॉट नं.- १०६, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०० ०५४ ह्या संबंधित माहिती आहे. अर्जदाराने सुनावणी दरम्यान अपिल क्र.६४०८/२०११ ची माहिती मागितलेली आहे. ती २ मुद्यांमध्ये आहे व त्यात १९९२ पासून ते दिनांक ११-०३-२०१० पर्यंत कॉलनी अधिकारी यांनी जो काही पत्रव्यवहार मनपा मुख्यालय, एम.एस.आर.डी.ए. कार्यालयातून आलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या नक्कल प्रती पाहिजे आहेत तसेच सदर कालावधीत कॉलनी ऑफिसर यांना मनपा मुख्यालय, एम.एस.आर.डी.ए. कार्यालयातून आलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या मूळ प्रती पाहिजे आहे. अर्जदार हा दारिद्रय रेषेखाली नाही आहे. यासंबंधित सार्वजनिक माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी (प्रकल्प) एच/पश्चिम विभाग यांनी अर्जदाराला दिनांक १२-०३-२०१० रोजीच्या अर्जानुसार पत्र दिले व त्यात दिनांक २०-०३-२०१० रोजी अर्जदाराला ह्या आधी कळविण्यात आले आहे की, सदर कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्याकरीता तयार ठेवण्यात आलेली असून माहितीचा अधिकार अधिनियमातंर्गतचे आकार पालिकेकडे भरणा केल्यानंतर आपणांस देण्यात येईल. त्यानंतर अर्जदाराने प्रथम अपिल अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०६-२०१० रोजी दाखल केले व त्यात माहिती दिलेली नाही आवश्यक असलेली माहितीच्या स्वरुपात खेतवाडी नकाशाबाबतचे अर्जदाराला जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ वसाहत अधिकारी यांनी दिनांक २२-०३-२०१०अर्जदाराला पत्र दिले व अर्जदाराला असे कळविले की, माहिती संदर्भात सदर पत्र प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी कार्यालयाीन वेळेत प्रत्यक्ष

संर्पक साधावा. आपणांकडून विलंब झाल्यास अर्जदाराचे अपिल निकाली काढुन दप्तरी दाखल करण्यात येईल.

या अनुषंगाने अर्जदाराला दिनांक ०८-०७-२०१० रोजी दुसरे पत्र देण्यात आले व त्यात दिनांक ३०-०६-२०१० रोजी अर्जदार गैरहजर होते. त्यामुळे पुन्हा सुनावणी दिनांक २१-०७-२०१० रोजी दुपारी ३.१० वाजता सहायक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर तारखेला सुनावणी घेण्यात आली. परंतु अर्जदाराला त्याबाबतची प्रत देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी श्री.आत्माराम धुरी, कॉलनी ऑफीसर हजर आहेत व त्यांनी या आयोगासमोर प्रथम अपिल दिनांक २९-०७-२०१० रोजीचा आदेश दाखल केलेला आहे. सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी एच/पश्चिम विभाग यांनी अपिलकारास आवश्यक असलेली माहिती माहिती अधिकारातंर्गत देण्यात यावी असे म्हटले आहे. त्यानुसार अर्जदाराला दोन्ही अपिलांबाबत दिनांक ०३-०३-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांची त्या दिवशी भेट न झाल्यास फोनवर संर्पक साधुन (फोन नं. ८९७६३२७०४४/९२२४६३७२९७) व जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्यास श्री.माळवणकर यांच्याशी संर्पक साधुन अर्जदाराला दोन्ही अपिलांचे पपत्र अ नूसार मागितलेली माहिती विनाशुल्क त्या तारखेला पुरविण्यात येईल.अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार अर्जदार ह्या आयोगासमोर करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

अर्जदार / अपिलार्थी पपत्र अ नुसार दिनांक १२-०३-२०१० रोजी नुसार मुद्या क्र.१ व २ ची माहिती पाहिजे आहे.

----आदेश----

३) अपिल निकाली काढण्यात येते.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/तक्रार क्र.२१/०१

श्री.रामानंद शर्मा, **---तक्रारदार**

५ वा मजला, पोटिया इंडस्ट्रीयल इस्टेट,
दारुखाना, मुंबई ४०० ०१०.

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९,
३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे. ----गैरतक्रारदार

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२३.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी यांनी दिनांक ०१-१०-२००९ रोजी जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता, एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९, ३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे यांच्याकडे, ''Total list of load sanctioned but not yet released as on this date 1st oct, 2009 with details such as Name of the Party, Contract demand sanctioned, date of sanction, and feeder on which the load is proposed to be given.'' अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अर्जदाराने दुसऱ्या अर्जात दिनांक ०१-१०-२००९ रोजी नुसार, ''1) Name of the feeder 2) Current rating capacity of the conductior, 3) Actual current at which the feeders are operating, 4) Number of times the feeder has tripped due to over load (current) in the past two months.'' अशी एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जदाराचा अर्ज कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., ओ. ॲण्ड एम डिव्हीजन, वसई यांना दिनांक २१-१०-२००९ रोजी पाठवून त्यांना अशी विनंती करण्यात आली होती की, अर्जदाराला पाहिजे असलेली माहिती परस्पर अर्जदाराला पाठवून त्या संबंधीची माहिती ह्या कार्यालयात द्यावी.

वरील सुचनेनुसार कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डिव्हीजन, वसई यांनी कुठल्याही प्रकारची माहिती अर्जदाराला दिली नाही अशी तक्रार ह्या आयोगासमोर दाखल केलेल्या तक्रारीत केली आहे व ह्या संबंधी त्यांनी वारंवार कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठपुरावा स्वत: जावून त्यास संबंधित अध्यक्ष सचिव यांच्याकडे विचारणा केली असता तसेच फोनवर संर्पक साधुन सुद्धा अर्जदाराला माहिती पुरविलेली नाही किंवा कुठल्याही प्रकाराचा पत्रव्यवहार केलेला नाही व त्यामुळे अर्जदाराने ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केली आहे.

सदर प्रकरणात अर्जदाराने जर प्रथम अपिल दाखल केले नसेल तर जन माहिती अधिकारी किंवा कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डीएन, वसई यांनी अर्जदाराला माहिती उपलब्ध केली किंवा नाही, कसे कोणाकडून उपलब्ध होईल किंवा प्रथम अपिल कोणाकडे करावयाचे ह्याबाबत कायद्याने सांगणे बंधनकारक होते पण कुठलीही तसदी घेतली नाही. सदर प्रकरणात उत्तरवादी गैरहजर असल्यामुळे या घडीला शहानिशा होवू शकली नाही. या आयोगासमोर अर्जदाराने २ वेळा पत्रव्यवहार करण्याबाबत निदर्शनास आणले होते. सदरचे पत्र अर्जदाराला दिनांक १८-११-२००९ रोजी मिळाले आहे व दुसरे पत्र दिनांक २१-१०-२००९ चे दिसते. तर वरील बाबतीत कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डिव्हीजन, वसई,जिल्हा-ठाणे यांनी अर्जदाराला कुठलीही माहिती पुरविण्याची तसदी घेतली

नाही किंवा पत्रव्यवहार केला नाही. तरीही ह्याबाबत अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९, ३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे यांनी सदर प्रकरणात स्वत: किंवा संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा सक्षम अधिकाऱ्याला सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत व अर्जदाराला माहिती का देण्यात आली नाही किंवा विलंब का लावला याबाबत त्यांच्या विरुद्ध नियमानूसार कारवाई करावी.

कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डीएन, वसई यांना शेवटी पुन्हा एकवेळ संधी देवून असा आदेश करण्यात येतो की, दिनांक २१-१०-२००९ चे पत्र क्रमांक १३०८४ व संदर्भ क्र. मुअ/कपक/तांत्रिक/५०९२ दिनांक ०६-१०-२००९ अर्जदाराला हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पंजीबद्ध डाकेने माहिती पुरवावी. सदर माहिती अर्जदाराला या आदेशानुसार न मिळाल्यास अर्जदार ह्या आयोगासमोर कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

४) तक्रार निकाली काढण्यात येते.

५) सदर निर्णयाची एक प्रत कार्यकारी अभियंता, ओ ॲण्ड एम, वसई, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि., रामदास नगर, साईबाब मंदिर जवळ, वसई (पूर्व). जिल्हा-ठाणे यांना देण्यात येत आहे.

६) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४०/अपील क्रमांक ६२८३/२०१०

श्रीमती फातिमा तय्यबजी ढोलकवाला,
१०४, पुष्पांजली,एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०००५४. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिक आयुक्त
बी अँड एफ, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिक आयुक्त
बी अँड एफ, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-५०. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी सहाय्यक अभियंता,इमारत व कारखाने यांच्याकडे टेनंट कोपार्टनरशीप हौसिंग सोसायटी, सीटीएस नं.२१०,जी वार्ड नं.३१९१ प्लॉट नं.७८ च्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.७.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी पत्ता दिला नाही असे कारण कळवून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, महानगरपालिकेतील इमारत विभागात सीटीएस क्रमांक दिला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही व सीटीएस क्रमांक दिला तर पत्ता दिला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. वास्तविक महानगरपालिकेच्या अभिलेख विभागात कोणत्याही इमारतीच्या संदर्भात प्रकरण शोधावयाचे असल्यास त्याबाबत योग्य ती अभिलेख जतन करण्याची पध्दत वापरणे आवश्यक आहे परंतु कोणत्याही पकारे त्यांना माहिती मागीतली तर नस्ती आढळून येत नाही अशाप्रकारचे उत्तर दिले जाते. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच करण्यात येते असे दिसून येते. या प्रकरणीसुध्दा अपिलकर्ता यांनी इमारतीचा सव्हे क्रमांक दिला असूनसुध्दा पत्ता दिला नाही या कारणास्तव त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीही कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे या कारणास्तव प्रथम अपील निकाली काढणे याचा अर्थ प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा

माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच केली असे असा निष्कर्ष काढावा लागतो. यास्तव त्यांनी अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे.प्रथम अपीलीय अधिकारी हे त्यांच्या शाखेतील किंवा विभागातील वरिष्ठ अधिकारी असतात याचे कारणच मुळात असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसेल तर वरिष्ठ अधिका-यांनी ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु कोणतेही प्रथम अपीलीय अधिकारी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती चौकशी करीत नाहीत व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपीलांची संख्या वाढत आहे. त्यामुळे आयुक्त, महानगरपालिका यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना कमीतकमी योग्य तो निर्णय देऊन माहिती उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने चौकशी करणे आवश्यक आहे असे आदेश देणे आवश्यक आहे. सदरच्या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांच्याविरुध्दही शास्ती लादणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु आज ते आयोगापुढे हजर नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.२०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष खुलासा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास शास्ती कायम करण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४१/अपील क्रमांक ६२८२/२०१०

श्रीमती फातिमा तय्यबजी ढोलकवाला,
१०४, पुष्पांजली,एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०००५४. ..... **अपिलकर्ता**

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,

इमारत प्रस्ताव, डब्ल्यू.एस.एच वार्ड, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०

जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,
इमारत प्रस्ताव, डब्ल्यू.एस.एच वार्ड, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी (इमारत प्रस्ताव),उपमुख्य अभियंता(W/S) यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Particulars of Bldg. on plot bearing C.T.S.No.२१०,T.P.S.-III,Santacurz(W)S.V.Rd.,Mumbai-४०००५४,Pushpanjali Tenant Co-Operative Housing Society- Kindly provie me the following information- Sanctioned(approved plan-year १९७८) builder-M/S Raja Construction co.

o) Number of Stilts Car Parking Space-Area-Direction-South-East-West,North
p) Number of enclosed portios-area-direction.
q) Open plot-Garden-area-direction
r) Number of servant's toilets
s) If there is a passage from the interior of the building to go from front to back or (vise versa)
t) No. of underground tanks for the society.
u) Number of flats first floor and their areas, area of the flats on ३rd floor ३०१ & ३०२(carpet area)

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.७.२०१० रोजी काही माहिती उपलब्ध आहे परंतु मूळ नस्ती आढळून येत नाही.

मात्र मूळ नस्ती शोधण्याचा प्रयत्न चालू आहे व संबंधीत वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपिलकर्ता यानी दि.२.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन, फाइल वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन फाईल पुर्नगठीत करण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे ती १९७८ सालातली आहे व जोपर्यंत इमारत आहे तोपर्यंत त्या संदर्भातील संपूर्ण नकाशे, कागदपत्र इत्यादी गोष्टी जतन करणे आवश्यक असते. परंत प्रत्येक वेळेस नस्ती आढळून येत नाही अशाप्रकारचे उत्तर इमारत विभागाकडून दिले जाते असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात काही माहिती उपलब्ध आहे परंतु मूळ नस्ती उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे संबंधीत नस्ती जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा पुर्नगठीत करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. दरम्यान संबंधीत फाईल उपलब्ध झालेली आहे व निरिक्षणाकरीता उपलब्ध आहे असे आयोगापुढे खुलासा करतांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती/छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून१० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रमाणित करुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१५/अपील क्रमांक ६२१३/२०१०

डॉ.मुकेश बैजनाथ शुक्ल,
सी-०१, ओम चामुंडा को.ऑप.हौ.सोसायटी,
वाकोला ब्रीज,दत्तमंदीर रोड, सांताक्रूझ(पूर्व),
मुंबई-४०००५५. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा निबंधक,
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट कँपस, महात्मा गांधी रोड,
मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट कँपस, महात्मा गांधी रोड,

मुंबई-४०००३२. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी द.१३.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Subject of Information - Faculty of Ayurveda - Kayachikitsa(final year B.A.M.S. Course) and M.D. Ayurveda Kaya Chikitsa. The subject of Panchkarma is part of Kayachikitsa ४th paper first Section in under graduate (B.A.M.S. course)and also in Postgraduate Course(M.D. Ayurveda Kayachikitsa)

The Period to which the information relates -Since the date of inception of faculty of Ayurveda in the University till date

Description of the information required - As Panchakarma is a part of Kayachikitsa- ४th paper first section and is not a separate subject in Mumbai University:

७. Whether it is to be construed that the recognized post graduate students of M.D. Kayachikitsa are also having knowledge of Panchakarma?
८. Whether the experience of approved Undergraduate and Postgraduate Teacher who are teaching Kayachikitsa-४th paper first section= Panchakarma, will be counted also as teaching experience in Panchakarma&ref.dated June ०६,२००५-Post Graduate Lecture for the Ayurved Vachaspati-M.D. Degree for the first and second term of academic year २००५-२००६)?
९. Whether the approved Postgraduate Teacher and Guide in Kayachikitsa will also be considered as the approved Postgraduate Teacher and Guide in Panchakarma?

अर्जाच्या अनूषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.४.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी चेअरमन,ॲडहॉक बोर्ड ऑफ स्टडीज,कायाचिकित्सा यांच्याशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. तत्पूर्वी दि.२१.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१,२,३ संदर्भात अभिप्रायात्मक प्रश्न असल्यामुळे माहितीच्या अधिकारात येत नाही असे उत्तर त्यांना दिले होते व त्याबाबत संबंधीत प्राधिकरणाशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन घेता येईल असेही कळविण्यात आले होते. त्यानंतर दि.२७.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात आले होते व त्यानंतर दि.१५.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या त्यांच्या मुद्यांच्या संदर्भत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेसुध्दा

समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये ३ प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या प्रश्नांच्या माध्यमातून संबंधीत प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे मत मागितलेले आहे. त्यामुळे संबंधीत अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. महितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी हे सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेले अभिलेखे, कागदपत्र किंवा दस्तऐवज यांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत माहिती अधिका-यांनी अभिप्राय देणे अपेक्षित नाही. राज्य माहिती आयोग हे कोणत्याही प्रकारचे तक्रार निवारण न्यायालय नाही त्यामुळे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत चौकशी करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(त्र) प्रमाणे 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेल्या तसेच अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मिळविता येण्याजोगी माहिती देणे अपेक्षित आहे व त्यात कागदपत्र,दस्तऐवज,अभिलेखे यांचे निरिक्षण करुन छायांकित पती उपलब्ध करुन घेणे किंवा संगणकात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. व त्याकरीता माहिती या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. या संज्ञेच्या व्याख्येत सार्वजनिक प्राधिकरणाकडे साहित्याच्या स्वरुपात उदा.कागदपत्र, दस्तऐवज,परिपत्रके इत्यादींच्या संदर्भात असलेल्या माहितीचा समावेश होतो व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे अभिमत मागणे अपेक्षित नाही व तसे त्यांना कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे विलंबाच्या संदर्भात सदर प्रश्नाबाबतचे स्पष्टीकरण डॉ.सुरेखा देवाईकर(चेअरपरसन)आयुर्वेद फॅकल्टी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर त्यांचे स्पष्टीकरण अर्जदारास देणे शक्य व्हावे. या सर्व बाबींची पूर्तता करतांना त्यासाठी काही काळ विलंब झाला असा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही,उलटपक्षी जी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही ती सुध्दा देण्याचा प्रयत्न केलेला आहे व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

५) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४६/अपील क्रमांक ६२८१/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी(इ.व का.),
मुंबई महानगरपालिका पी नॉथ कार्यालय, मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी(इ.व का.),
मुंबई महानगरपालिका पी नॉथ कार्यालय, मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३१.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारती व कारखाने),पी नॉर्थ,महानगरपालिका कार्यालय, लिबर्टी गार्डन, मालाड(प.) यांच्याकडे अर्ज करुन पुढीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते- **अवैध बांधकामोंकी लिखित शिकायत पर इमारत विभाग द्वारा की गई कारवाई के संदर्भमें जानकारी.** सदर अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी १५.३.२०१०,२४,५,२०१० रोजी केलेल्या अर्जांच्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते.काही मुद्यांमध्ये अपिलकर्ता यांनी मोघम माहिती मागीतलेली आहे,काही मुद्यांमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे मत विचारलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी २१.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.७.२०१० रोजी देण्यात आला असून उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री.एस.एच. असीफ,कनिष्ठ अभियंता उपस्थित आहेत. त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली ती अतिशय मोघम स्वरुपाची आहे. असे असले तरी त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात मात्र कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली दिसून येत नाही व त्याबाबत त्यांना काहीही कळविण्यात आलेले नाही. अर्जदाराने अर्ज केल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्या अर्जात मागितलेल्या माहितीची छाननी करुन त्याप्रमाणे त्यांना उत्तर किंवा कागदपत्र उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु सदरच्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व यास्तव त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी आज सुनावणीस उपस्थित नाहीत व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.३१.५.२०१० च्या अर्जातील नमूद केलेल्या तक्रारींच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती तसेच इतर मुद्यांमधील

कागदपत्र उपलब्ध असतील तर ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती अपिलकर्ता यांना व्यक्तीश: जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता यांच्या दि.३१.५.१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसात माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे व आज ते आयोगापुढे सुनावणीससुध्दा हजर झाले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.५०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत करावा तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती कायम करण्यात येईल व सदर शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश दिले जातील याची नोंद घ्यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१४८/अपील क्रमांक ६२७९/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
पी/उत्तर विभाग,बृहन्मुंबई मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी,
पी/उत्तर विभाग,बृहन्मुंबई मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुंबई महानगरपालिका,पी(उत्तर) विभाग यांच्याकडे मालाड(नॉर्थ) विभागातील **इमारत**

विभागमें कार्यरत अभियंताओंकेसंबंधमें जानकारी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.७.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांच्या आत देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी २२.६.२०१० रोजी मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे व ती त्यांनी घेऊन जावी असे कळविण्यात आले होते. परंतु माहिती घेऊन न जाता त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरसुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती निरनिराळया विभागांची असून कोणत्याही कागदपत्रांच्या संदभात निश्चित अशी माहिती मागीतलेली नाही.सर्व माहिती मोघम स्वरुपात मागीतलेली दिसून येते. अपिलकर्ता यांच्या दि.२४.५.२०१० च्या अर्जातील मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(त्र) प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमाच्या तरतुदीपमाणे मिळविता येण्याजोगी असलेली कागदपत्र,अभिलेखे,दस्तऐवज यांचे निरिक्षण करणे व निरिक्षणाअंती छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे. तसेच अधिनियमाच्या कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्र,अभिलेखे,दस्तऐवज,परिपत्रके, शासन निर्णय,संविधा इत्यादीच्या स्वरुपात असलेली माहिती याचा समावेश होतो. या दोन्हीही व्याख्यांवरुन कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते.त्यामुळे अर्जदाराने कागदपत्राचे वर्णन करुन माहिती मागणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारची माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात ती सर्व माहिती मोघम स्वरुपाची आहे व कोणत्याही कागदपत्राचे निश्चित वर्णन केलेले नाही व ती तयार करुन द्यावयाचे झाल्यास सावजनिक प्राधिकरणाची यंत्रणा मोठया प्रमाणावर वळवून व तयार करुन द्यावी लागेल व तसे अधिनियमाच्या कलम ७(९)प्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे जी माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध आहे ती माहिती अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी

संपर्क साधून कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी कारण माहितीच्या अर्जात त्यांनी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे व तसे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी याना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/४९३५१/अपील क्रमांक ६२१८/२०१०

श्री.अशोक बन्सोड,
फ्लॅट नं.७०३, जमुना अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.,
६८,एस.व्ही.रोड, शॉपर्स स्टॉप समोर,अंधेरी(प.),
मुंबई-४०००५८. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)(प.उ.)१,
बृहन्मुंबई महानगरपालिका के विभाग कार्यालय,
भाभा हॉस्पीटल जवळ, आर.के. पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)(प.उ.)१ ,
बृहन्मुंबई महानगरपालिका के विभाग कार्यालय,
भाभा हॉस्पीटल जवळ, आर.के. पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.७.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.६.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव)यांच्याकडे फाईल क्र.CE/७३५५/BSII/३A-K located at Jamuna Apartment C.H.S.Ltd.,६८,S.V. Rd.,Opposite to Shopper's stop, Andheri(West), Registration No. BOM /HSG/ KW/७३८२/१९८४ च्या संदर्भात सी.सी., आय.ओ.डी., ओ.सी., लेआऊट प्लॅन,बिल्डिंग कंप्लीशन सर्टिफिकीट,तसेच इमारतीच्या संदर्भातील इतर कागदपत्र प्रत्यक्ष

घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.११.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदभात दि.१२.६.२००९ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की,त्यांनी दि.६.३.२००९ रोजी जी माहिती मागीतली त्या माहितीच्या संदर्भात नस्ती आढळून येत नाही असे त्यांना दत्तर देण्यात आले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्येसुध्दा नस्ती आढळून येत नाही व त्या नस्तीचा शोध घेण्यात यावा असे कळविण्यात आले होते. मात्र अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्या इमारतीच्या संदर्भात माहिती मागीतलेली आहे त्या इमारतीच्या संदर्भातील नस्ती क्रमांक आढळून येत नसल्यामुळे माहितीचा शोध घेता येत नाही. तरी सर्व कार्यालयामध्ये व भांडूप कॉंप्लेक्स येथील गोडाऊनमध्ये शोध घेतला तरी सदरची नस्ती आढळून आलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जर पाण्याचे देयक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिले तर त्या देयकावर नस्ती क्रमांक असतो व त्या क्रमांकाप्रमाणे शोध घेणे सुलभ होईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी पाण्याचे देयक उपलब्ध करुन दिले जाईल असे सांगितले. परंतु एकूणच महानगरपालिकेतील इमारत व कारखाने या विभागातून नस्त्या आढळून येत नाहीत अशाप्रकारचे उत्तर अर्जदारांना दिले जाते असे सर्वसाधारणत: दिसून येते. त्यावरुन अभिलेख्यांचे योग्यरित्या जतन महापालिकेमार्फत केलेले दिसून येत नाही व ती महापालिकेतील वरिष्ठ अधिका-यांची अकार्यक्षमता आहे असे म्हणावयास हरकत नाही. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दि.१४.४.०४ रोजीसुध्दा बेकायदेशीर वापराच्या संदर्भात तक्रार केलेली होती व त्या तक्रारीबाबत कोणतीही चौकशी झालेली नाही. त्यानंतर दि.९.१२.०५ रोजीसुध्दा एक तक्रार केली होती व त्या तक्रारीच्या संदर्भातही कोणत्याही पकारे चौकशी करण्यात आलेली नाही. दि.१७.७.०९ रोजी पुन्हा त्यांनी त्यांच्या केलेल्या तक्रारींवर काय कार्यवाही झाली याबद्दल माहिती अधिकारात माहिती मागीतली परंतु त्याबाबतही कोणतेही उत्तर दिलेले नाही. दि.२७.१०.०९ रोजीसुध्दा त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन कार्यवाहीची माहिती विचारली परंतु त्याबाबतही उत्तर दिले जात नाही व यावरुन माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे असे म्हणावे लागते असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

वरील दोन्हीही विभागांमध्ये अभिलेख्यांचे जतन योग्यरितीने केलेले नाही असे आढळून येत असल्यामुळे यापुढे आयुक्त, महानगरपालिका यांनी इमारतींच्या संदर्भातील

ज्या नस्त्या आहेत त्या नस्त्यांचे जतन करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र अभिलेखे अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे अभिलेख्यांचे जतन करण्याची प्रक्रिया मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी सुरु करणे आवश्यक आहे अन्यथा इमारतीस ७५ वर्षे पूर्ण झाली असली तरी त्याबाबतची कागदपत्र उपलब्ध होणे आवश्यक असते व तीच महानगरपालिकेत उपलब्ध होत नाहीत किंवा आढळून येत नाहीत अशाप्रकारचे उत्तर दिले जाते. सदर प्रकरणी माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी त्यांच्याकडील पाण्याचे देयक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावे जेणेकरुन त्यावरुन तरी नस्तीचा शोध घेणे सुलभ होइल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी इमारतीच्या वास्तुशास्त्रज्ञांकडे संपर्क साधून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांपमाणे नवीन नस्ती पुर्नगठीत करावी व अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने सर्व कागदपत्र उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००५७/अपील क्रमांक ६२९१/२०१०

श्री. आर.पी.यजुर्वेदी,
जे-२२०, अन्सा साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-९, बांद्रा(प.),
मुंबइ-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पश्चिम नियंत्रण कक्ष, कारख रोड,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे अर्ज करुन copy of the charge sheet filed at Hon.Court No.३९ Vile Parle OW ५४३६ dt.२६.६.२००९ as per letter addressed to the SRA Bandra(E) against developer Amroo Khan under MR & TP Act u/s ५३(७) एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण पोस्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना २७.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदार यांना समाधानकारक

उत्तर दिले असल्याने सदरचे अपील दि.७.१.२०१० रोजी दफ्तरी दाखल करण्यात येत असल्याचे आदेश दिले हाते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी अर्ज केला त्यावेळेस माहितीशी संबंधीत गुन्हयात दोषारोपपत्र न्यायालयात सादरकेल्याने व ते प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही परंतु आता आरोपपत्र सादर झाले असेल तर त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आरोपपत्राची कागदपत्र एकाच प्रतीत असतात व ती न्यायालयात दाखल झालेली असतात व त्यामुळे त्यांच्याकडे आरोपपत्राच्या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध नाहीत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आरोपपत्राची प्रत उपलब्ध असली पाहिजे असे आयोगापुढे सांगितले व त्यामुळे जन माहिती अधिकारी व पोलीस निरिक्षक यांच्यात या मुद्याच्या संदर्भात मतभेद दिसून आले. मात्र दि.२७.१.२०११ रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांना अर्जदार यांनी मागणी केलेल्या मुद्याचा तपास पूर्ण करुन दोषारोपपत्र मा.रेल्वे मोबाईल न्यायालय,कोर्ट केस क्र.४३/पीडब्ल्यू/०९ अन्वये मा.३९ वे न्यायालय, विलेपार्ले येथे दाखल करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे, तरी अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती मा.न्यायालयाकडून घेण्याबाबत अर्जदार यांना अवगत करावे असे नमूद केलेले दिसून येते. त्यावर अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले असले तरी त्या संबंधातील नस्ती ही पोलीस कार्यालयात उपलब्ध असली पाहिजे त्याशिवाय न्यायालयामध्ये सरकारीपक्षातर्फे कोणत्याही प्रकारे त्या प्रकरणाच्या संदर्भात पुढील कार्यवाही करता येणार नाही. यावरुन ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक आहे. असे असल्यास अपिलकर्ता यांना दोषारोपपत्राच्या संदर्भातील कागदपत्रांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील किंवा दोषारोपपत्राच्या संदर्भातील कोणतेही कागदपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत असे स्पष्टपणे अपिलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना १० दिवसाच्या आत दोषारोपपत्राची प्रत

विनामुल्य रजिस्टरपोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी व दोषारोपपत्राची प्रत उपलब्ध नसेल तर ती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविण्यात यावे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००५५/अपील क्रमांक ६२९०/२०१०

श्री. आर.पी.यजुर्वेदी,
जे-२२०, अन्सा साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या शेजारी,
एल्फीस्टन कंपाऊंड, मुंबई.

जन माहिती अधिकारी,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या शेजारी,
एल्फीस्टन कंपाऊंड, मुंबई. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडे अर्ज करुन List of Educational institutes not approved by AICTE flouting regulations and norms and action taken thereon: Information and Inspection of records अशी माहिती मागीतलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २००९ एप्रिल ते अर्जाच्या तारखेपर्यंतचा असून माहिती एकूण A ते F या मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमूद करुन त्याकरीता त्यांनी मोबाईल नंबरही दिलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना पत्र क्रमांक ११/तंशिसं/ मा.अ./ २०१०/१२१८, दि.७.८.२०१० अन्वये माहिती देण्यात आली होती. परंतु अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी दि.२५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही. परंतु काल १.२.२०११ रोजी त्यांना कार्यालयाकडून एक पत्र

मिळाले आहे व ते त्यांनी अद्यापपर्यंत फोडलेले नाही. त्यामुळे त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.७.८.२०१० रोजी माहिती दिलेली होती परंतु त्याबाबतचे कोणतेही पत्र त्यांनी आयोगापुढे सादर केलेले नाही. मात्र खुलासा दाखल करतांना व तोंडी युक्तीवाद करतांना सदर कालावधीमध्ये कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेचे काम तातडीने व तात्काळ करणे आवश्यक होते व या प्रवेश प्रक्रियेसाठी कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी व्यस्त होते. तसेच या कार्यालयात अतिशय अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास विलंब झाला. याबद्दल दिलगीर आहेत, भविष्यामध्ये याबाबत दक्षता घेण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. परंतु प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर ती माहिाती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व ती उपलब्ध करुन दिलेली नाही व सहा महिन्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे मात्र आयोगापुढे दाखविण्यात आले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही ते आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुन तंत्रशिक्षण संचालनालय या कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत उदासिनता आहे असे दिसून येते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहितीचा अर्ज हाताळणे आवश्यक आहे. माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर संबंधित शाखेकडे किंवा अधिका-यांकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांचे सहाय्य अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे घेणे आवश्यक आहे. परंतु तसेही त्यांनी केलेले दिसून येत नाही. परंतु त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, संबंधीत अधिका-यांनी/कर्मचा-यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते.वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी व कर्तव्य आहे व तो आता सेवेचा एक भाग झाला आहे. त्यामुळे विभाग प्रमुखांना याबाबत योग्य ती यंत्रणा देणे आवश्यक आहे.प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा पथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते.मात्र अपिलकर्ता यांना माहिती देण्यास विलंब झालेला असल्यामुळे संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे इतर कर्मचारी व अधिकारी यांचे सहाय्यक घेणे आवश्यक असते व असे अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असेल तर त्यांना माहिती अधिकारी समजण्याज येते व त्या अधिकारी/कर्मचारी यांनी सदरच्या अर्जावर प्रक्रिया केली नसेल तर त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.१९.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने A ते F अशी मुद्देनिहाय माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात सहाय्य घेणे आवश्यक

असते व ज्यांनी ज्यांनी सहाय्य केलेले नसेल त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही विभाग प्रमुख यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक २.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१७/अपील क्रमांक ६२२२/२०१०

श्री. निलेश सहदेव टोपले द्वारा आनंद दगडू इंगळे,
के.डब्ल्यू.पी.आय. म्युनिसिपल कॉलनी, दादाभाई क्रॉस रोड,

टेप व्हिलेज, अंधेरी(पश्चिम),
मुंबई-४०००५८. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, पालिराम रस्ता,
अंधेरी(पश्चिम), मुंबई-४०००५८.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, पालिराम रस्ता,
अंधेरी(पश्चिम), मुंबई-४०००५८. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२८.७.२०१० रोजीजन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),बृहन्मुंबई महानगरपालिका, के(प.)विभाग यांच्याकडे अर्ज करुन बाँबे कॅम्बरीज स्कुल अंबोली, अंधेरी(प.) या शाळेची वर्ष १९९० ते २०१० या कालावधीतील एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून यते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.३०.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना के/पूव विभाग अंधेरी या शाळेची माहिाती मिळाली आहे परंतु त्यांच संस्थेची शाळा के(पश्चिम) विभाग यांच्याकडून मात्र माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, दिनांक १.९.२०१० रोजी विभाग निरिक्षक(शाळा) यांनी मुख्याध्यापिका बाँबे कॅम्बरीज स्कुल,अंधेरी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच तत्कालीन माहिती अधिकारी आकस्मिक आजारी पडल्यामुळे व त्या कालावधीचा कार्यभार कोणालाही न दिल्यामुळे अर्जदारास माहिती देता आली नाही व ही बाब अर्जदार श्री.निलेश टोपले यांना व्यक्तीशः बोलवून सांगण्यात आली होती. तसेच अर्जदाराने अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त, के/पश्चिम विभाग यांचेकडे अपील न करता

३०.८.२०१० रोजी अपीलीय अधिकारी प्रशासकीय अधिकारी/शाळा यांच्या नावे अर्ज केला व त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नाही. तसेच अपिलकर्ता यांना बोलावून विना अनुदानित शाळेचे दस्तऐवज व माहिती परिरक्षीत केली जात नाही असे तोंडी सांगीतले होते व तरीसुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी बाँबे केम्बरीज स्कुल,अंबोली यांचेकडे लेखी पत्र दिले होते. परंतु त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विनाअनुदानित शाळा असल्यामळे त्यांना लागू होत नसल्यामुळे माहिती देण्यास नकार दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मान्यता दिली आहे त्या संदर्भातील माहिती त्यांनी मागीतली होती व ती माहिती कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदरच्या तक्रार क्र.२०१०/४१५/०२ च्या संदर्भात आयोगाचा निर्णय झालेला आहे व त्यामध्ये खाजगी विनाअनुदानित शाळांची माहिती देता येणार नाही असा हा निर्णय आहे. ही बाब अपिलकर्ता यांना कळविण्यात आली होती. असे असले तरी अपिलकर्ता यांनी त्यांच्या शाळेच्या मान्यतेच्या संदर्भात के(पूर्व) विभाग यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी के(पश्चिम) विभाग यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तसेच मुख्य कार्यालयात जर शाळेच्या संदर्भातील प्रस्ताव उपलब्ध असेल तर त्या प्रस्तावाची कागदपत्र अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. यास्तव सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात यत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत कार्यालयात शाळेच्या मान्यतेविषयी व अपिलकर्ता यांच्या अर्जातील १ ते ६ मुद्यांच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध असेल ती मुद्देनिहाय कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता यांच्या दि.२८.७.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष करावा. शास्तीच्या संदर्भातील माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अवगत करावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक २.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१६/अपील क्रमांक ६२१४/२०१०

श्री. निलेश सहदेव टोपले द्वारा आनंद दगडू इंगळे,
के.डब्ल्यू.पी.आय. म्युनिसिपल कॉलनी, दादाभाई क्रॉस रोड,
टेप व्हिलेज, अंधेरी(पश्चिम),
मुंबई-४०००५८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,गुंदवली,

अंधेरी, मुंबई-४०००९३.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,गुंदवली,
अंधेरी, मुंबई-४०००९३. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा), बृहन्मुंबई महानगरपालिका, के(पूर्व) विभाग यांच्याकडे दि.२८.७.२०१० रोजी अर्ज करुन बाँबे कॅम्बरीज स्कुल, चकाला,अंधेरी पूर्व या शाळेची वर्ष १९९० ते २०१० या कालावधीतील माहिती प्रथम मान्यतेपासून मान्यताप्राप्त तुकडयांची संख्या तसेच मान्यताप्राप्त नसलेल्या तुकडयांची संख्या अशी एकूण ६ मुद्यांमध्ये शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय झालेल्या नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा देण्यात आलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता विभाग निरिक्षक(शाळा) यांनी दि.२३.८.२०१० रोजी संबंधित शाळेला भेट दिली. संबंधित शाळेने त्यांच्या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही व शाळा अनएडेड असून ती सरकारी संस्थेत मोडत नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अधिनियमाप्रमाणे मागीतलेली माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले व त्याकरीता मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.५१३२/०८ मध्ये दिलेल्या आदेशाची प्रत व माहिती आयुक्तांनी श्री.लिओ मसकरांस विरुध्द माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री. रॉड्रीग्ज,इंजिनिअरींग कॉलेज यांच्या अपीलांच्या आदेशाची प्रत जोडली आहे.परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर सदर माहिती पब्लीक अॅथॉरिटी म्हणजे प्रशासकीय अधिकारी (शाळा), के(पूर्व) विभाग यांच्याकडे असलेली माहिती एकूण ४६२ पृष्ठे अर्जदारास विनामुल्य दि.७.९.२०१० रोजी पुरविण्यात आली आहे. अर्जदाराची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोचपावतीदेखील घेण्यात आलेली आहे. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी शाळेची माहिती असल्यामुळे संबंधित शाळेकडून माहिती घेण्याचा सुरुवातीला प्रयत्न केला व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देतांना विलंब झालेला

आहे असे सांगितले. परंतु अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे व त्याबाबतची पोचसुध्दा त्यांनी दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०००७०/अपील क्रमांक ६३०४/२०१०

श्री. विकास सुधाकर हरियाण,
लखमा जानु खोत चाळ, न्यु आग्रिपाडा,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमहासमादेशक,
महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालय,
जुने सचिवालय जोड इमारत, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ प्रशासिक अधिकारी(प्रशाःधोरण),
महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालय,

जुने सचिवालय जोड इमारत, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०००३२. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.१५.१.२०११ रोजी सदर अपिलाची माहिती त्यांना प्राप्त झाली असून मिळालेल्या माहितीशी ते सहमत असल्याबाबतचे लेखी पत्र दिले असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७१/अपील क्रमांक ६३०५/२०१०

श्री. अनिल लक्ष्मण कांबळी,
बी.एम.सी. स्टॉल लायसन्स क्र.१२४२७,
चुनाम लेन, पंडित बिल्डिंगजवळ, डॉ.भडकरकम मार्ग,
ग्रँट रोड, मुंबई-४००००१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
अे विभाग कार्यालय, १३४ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी,
अे विभाग कार्यालय, १३४ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई-४००००१. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक, अनुज्ञाप्ती, ए वार्ड यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते-

१) Transfer of Stall No.१०८३ in the name of Yasmin Shaikh and allotting place for doing business in A ward dated ३०.३.२००७.

२) All documents received from Licensee Mr. Muzzaffar Rahimattulla Shaikh to transfer of Sq.Stall Lic.No.१०८३ in the name of Yasmin Shaikh.

३) SL/०००५२५/LEA dated १७.४.२००७

४) Papers U/a LOP/१४३९ dtd १७.३.२००७

५) Total Nos. of transfer applications received before and after dated १२.२.२००७ pending and cleared till this application in A ward.

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून दि.१७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.७.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपलि अंशत: मान्य करण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या पत्रात म्हटल्याप्रमाणे विहित शुल्क आकारुन त्यांना ७ दिवसांच्या आत माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु.८०/- चा भरणा करावा असे कळविले व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.८.१०.२०१० रोजी रु.८०/- च्या खर्चाचा भरणा केलेला आहे.त्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना मुद्दा क्र.१,२ व ५ च्या संदर्भात अपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांच्या अजाच्या अनुषंगाने दि.२३.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध आहे व त्याबाबत खर्चाचा भरणा करावा असे

रजिस्टर पोस्टाने कळविण्यात आले होते. परंतु रजिस्टर पत्र परत आलेले आहे. अपिलकर्ता यांनीसुध्दा आयोगापुढे असे सांगितले की. ते मुंबई बाहेर होते व त्यामुळे सदरचे पत्र परत गेलेले होते. मात्र ज्या नस्तीच्या संदर्भात माहिती मागीतली होती त्यातील संपूण माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की, सदरच्या नस्तीतील संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यास कोणतीही हरकत नाही. यापूर्वी आवश्यक तेवढीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु अपिलकर्ता यांना संपूर्ण नस्तीतील प्रत्येक पृष्ठाच्या संदर्भात खर्चाचा भरणा करण्यास संमती दिलेली असल्यामुळे त्यांना नस्तीमधील संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील व त्याकरीता सदरचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीतील दिलेल्या माहितीपेक्षा उर्वरीत कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा केल्यानतर व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्याकरीता अपिलकर्ता यांनी व्यक्तीश: जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००६९/अपील क्रमांक ६३०६/२०१०

श्री. शंकर नागेश कविलकर,
टी/४५/३०४, प्रतिक्ष नगर, सायन कोळीवाडा,
मुंबई-४०००२२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता(रस्ते वाह. व पुल),
मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(रस्ते) शहर,
कमर को.ऑप.हौ.सो.,१ला मजला, पट्ठे बापूराव मार्ग,
ग्रँट रोड, मुंबई-४००००७. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(रस्ते)शहर यांच्याकडे अर्ज करुन सायन रोड क्र.२८ व २९ मुख्य रस्त्याच्या

काँक्रीटीकरणाच्या संदर्भात सन २०१० या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसनू येते.

१)महापालिकेच्या कोणत्या अधिका-यांच्या देखरेखीखाली काम निर्देशित केले गेले त्यांची नावे देण्यात यावी.

२)सदर कामाची जी तपासणी ज्या प्रयोगशाळेत करण्यात आली त्या प्रयोगशाळेचा पत्ता देण्यात यावा.

३) सदर कामासाठी ज्या तपासण्या केल्या गेल्या त्या किती व कोत्या प्रकारच्या होत्या, त्याची तारखेसहीत माहिती देण्यात यावी.

४) सदर कामाचे प्रयोगशाळेत वरील तपासण्या केल्या गेलेल्या अहवालाची छायांकित प्रत देण्यात यावी

माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१२.८.२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात तपासणी अहवाल उपलब्ध करुन दिलेला दिसून येतो. मुद्दा क्र.४ च्या संदर्भात तपासणी अहवालाच्या एकूण १०६ इतक्या छायांकित प्रतिंसाठी प्रति प्रत रु.२/- प्रमाणे एकूण रु.२१२/- इतके शुल्क कार्यालयात जमा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६.९.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीपेक्षा अधिक माहिती उपलब्ध असल्यास ती १५ दिवसाच्या आत द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सुरुवातीला युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याअर्जाप्रमाणे त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि.१२.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपिलकर्ता यांनी माहिती अपुर्ण व मागीतलेल्या माहितीपेक्षा वेगळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे सांगितले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये अपिलकर्ता यांनी मागीतलेलीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दाखविले. तरीही अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, काँक्रीटच्या रस्त्याला तडे गेल्यानंतर जी तपासणी प्रयोगशाळेत केलेली आहे त्या तपासणीच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलली नाही. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या बद्दल तोंडी स्पष्टीकरणात ते दाखवून दिले व यावरुन अपिलकर्ता

यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, दि.२९.९.२०१० रोजीसुध्दा या कार्यालयाच्या दस्तऐवजात उपलब्ध असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यापेक्षा अधिक माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांना कळविलेले होते. असे जरी दिसून येत असले तरी तडे गेल्यानंतर प्रयोगशाळेत तपासणी केलेली आहे किंवा नाही याबद्दलची माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना त्यांनी मागीतलेल्या सायन रोड क्र.२८,२९ मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या संदर्भात तडा गेल्यानंतर प्रयोगशाळेमध्ये तपासणी केली गेली असल्यास त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा तशा प्रकरची तपासणी केली गेली नसल्यास तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००६८/अपील क्रमांक ६३०७/२०१०

श्री. अशोक वसंतराव दळवी,
२२, मोहन अपार्टमेंट, रमेश नगर, अंबोली,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग-१, ६वा मजला मल्होत्रा हाऊस,
जनरल पोस्ट ऑफीससमोर, मुबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग-१, ६वा मजला मल्होत्रा हाऊस,
जनरल पोस्ट ऑफीससमोर, मुबई-४००००१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१८.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे त्यांनी दि.१.१२.२००९ रोजी अपना सहकारी बँकेच्या विरोधाम त्यांचे सभासदत्व रद्द केल्याबद्दल अप्पर आयुक्त व विशेष निबंधक पुणे यांना तक्रार केली होती त्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली दिसून येते. तसेच मुद्दा क्र.२मध्ये त्यांनी काही मागण्या केलेल्या आहेत व त्या मान्य कराव्यात असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१०.६.२०१० रोजी आपला तक्रार अर्ज कार्यालयाकडील दि.४.६.२०१० रोजीच्या

पत्राने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,एफ/एस विभाग, मुंबई यांच्याकडे तक्रारीतील मुद्यांवर चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी पाठविण्यात आलेला आहे. सदरचा अहवाल अद्यापपर्यंत या कार्यालयास प्राप्त झलेला नाही. अहवाल प्राप्त होताच आपल्या तक्रारीचे संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई(१) शहर यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.८.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयात दि.९.८.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही व त्यांना त्या संदर्भात ३० दिवसांच्या आत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी तक्रार केलली आहे त्या तक्रारीच्या संदर्भात योग्य त्या चौकशीसाठी संबंधित अधिकारी यांच्याकडे ती तक्रार हस्तांतरीत केलेली आहे असे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले होते. त्यानंतर त्या तक्रारीच्या चौकशीच्या संदर्भात स्मरणपत्रसुध्दा उपलब्ध करुन दिलेले आहे परंतु त्याबाबत अहवाल प्राप्त झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. पुढे युक्तीवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च) प्रमाणे व २(त्र) प्रमाणे **माहिती** व **माहितीचा अधिकार** या दोन्ही संज्ञांच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत व त्याप्रमाणे अर्जदाराच्या अर्जासंदर्भात ज्यावेळेस कार्यालयात कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणाची चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे म्हणजेच कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे त्यांच्या तक्रारअर्जावरील तक्रारीची चौकशी करुन ज्यावेळेस अहवाल प्राप्त होईल त्यावेळेस तो उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना कळविण्यात आले होते. व तशाच प्रकारचे विश्लेषण हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयामधील विवेचनाच्या अंतिम परिच्छेदात केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहितीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी झाल्यावर अहवाल उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००४३/अपील क्रमांक ६३०८/२०१०

श्री. प्रकाश गोविंद नवाथे,
२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप. हौ.सो.लि.,
२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई-१९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. म.न.पा. आयुक्त,
एफ उत्तर विभाग,
माटुंगा, मुंबई-१९.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,
म.न.पा. एफ उत्तरन विभाग, ९६ भाऊ दाजी मार्ग,
माटुंगा, मुंबई-१९. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२७.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिधारक व संकलक यांच्याकडे अर्ज करुन राजबागला ऑक्युपेशन सर्टिफिकेट प्राप्त झाल्यावर वरील प्रापर्टी टॅक्स कमी होणार/जास्त होणार याबाबत माहिती देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.६.९.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे मागीतलेली माहिती **माहिती** या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही व त्यामुळे ती आपणास देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.८.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे ती सांप्रदायिक म्हणजेच कपोलकल्पीत स्वरुपाची

असून भविष्यात काय घडेल अशा प्रकारची माहिती मागीतलेली आहे व माहिती या संज्ञेत मात्र कार्यालयातील अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात अशी तरतूद असल्यामुळे सदरची माहिती नाकारली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक आहे तसेच प्रथम अपीलाचा निर्णयही संयुक्तिक असल्याने अपिलकर्ता यांना निवासी वापराचे प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यानंतर आकारण्यात आलेल्या कराच्या संदर्भात नियम उपलब्ध असल्यास त्या नियमाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांच्या दिनांक २७.८.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने निवासी वापराचे प्रमाणपत्र इमारतीस उपलब्ध करुन दिल्यानंतर कर आकारण्या संदर्भात नियम असल्यास त्याबद्दलची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व नसल्यास त्यांना स्पष्टपणे तसे कळविण्यात यावे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२०/अपील क्रमांक ६२१५/२०१०

श्रीमती विशाखा वि.इंगळे,
बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळकनगर, चेंबूर(प.),
मुंबई-४०००८९. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एम/पश्चिम विभाग,
एम विभाग कार्यालय इमारत, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर-४०००७१.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एम/पश्चिम विभाग,
एम विभाग कार्यालय इमारत, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर-४०००७१. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा, एम/पश्चिम, पालिका विभाग कार्यालय, चेंबूर(पूर्व) यांच्याकडे संदर्भ क्र.MW/OD/११९१ दि.९.३.२००९ रोजीच्या पत्राची छायांकित प्रमाणित प्रत व त्या संदर्भात आपले कार्यालयीन संदर्भीय पत्र दि.१६.३.०९ व २१.३.०९ यामध्ये नमूद केलेले पालिका सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील क्र.एलसीपी/२२३२/०८ दि.१६.१२.०८ च्या संदर्भीय पत्राची छायांकित प्रमाणित प्रत व्यक्तीश: देण्यात यावी असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२६.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्ण दि.१७.९.२०१० रोजी देण्यात आला आहे व अपिलकर्ता यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे व त्या व्यतिक्ति आणखी काही माहिती अवी असेल तर जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क करावा अशाप्रकारचा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दि.४.१०.२०१०

रोजी पुन्हा अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना ३ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली असून रु.६/- इतका खर्चाचा भरणा त्यांच्याकडून घेतलेला आहे. त्यापैकी त्यांनी मागीतलेली दि.९.३.०९च्या पत्राची छायांकित प्रत या पृष्ठाची एकच बाजू दिलेली असून त्यावर पीटीओ लिहिलेले असूनसुध्दा पाठपोट छायांकित प्रत दिलेली नाही. तसेच दि.१६.३.०९ व दि.२१.३.०९या पत्रांच्या प्रती मागितलेल्या नसुनसुध्दा त्यांना २ प्रती विनाकारण उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. या दोन्ही पत्रांमध्ये सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील क्र.LCP/२२३२/०८ दि.१६.१२.०८ या संदर्भांकित पत्राची छायांकित प्रत त्यांनी मागीतली होती व ती मात्र त्यांना देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिलेली आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी या नुकत्याच रुजु झालेल्या आहेत व त्यामुळे अपिलकर्ता यांना जर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नसेल तर त्यांना त्या पत्रांची माहिती उपलब्ध करुन देता येईल,यास्तव सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० विसाच्या आत अपिलकर्ता यांना दि.९.३.२००९ च्या पत्राची पाठपोट छायांकित प्रत तसेच सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील संदर्भ क्रमांक LCP/२२३२/०८ दि.१६.१२.०८च्या पत्राची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२२/अपील क्रमांक ६२१९/२०१०

श्री. इंगळे व्ही.एस.,
बी/६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,

नवीन टिळक नगर, चेंबूर(प.),
मुंबई-८९. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक,
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मंबई-४०००१८.

जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मंबई-४०००१८. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग,चाळी तथा जन माहिती अधिकारी, व्यवस्थापक,मुंबई विभाग विकास चाळी यांच्याकडे अर्ज करुन दि.११.५.२००९ व ३१.३.२०१० रोजी श्री.प्रकाश इंगळे यांना अनुक्रमे संदर्भ क्र.इव्हिएन/१३०३/२००९ व क्र.इव्हीएन/१२८४/२०१० या खाली पत्रे पाठवून उचित कारवाई प्रस्तावित करण्यासंबंधात त्यांना सुचित करण्यात आले आहे त्यावर आपण तयार केलेल्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रमाणित प्रत सादर करण्यात यावी त्याचबरोबर दि.३१.३.२०१०,२०.४.२०१०,७.५.२०१० आणि दि.१४.७.२०१० रोजी पत्रे पाठवून त्यामध्ये उल्लेखिलेला दस्तऐवज पुरविण्यात यावा अशाप्रकारची माहिती तसेच समेट घडवून आणल्या संदर्भात अहवालाची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय दिलेला नाही परंतु आदेशाची नोंद घेतलेल्या नोंदवहीच्या पृष्ठाची छायांकित प्रत दाखल केली आहे. त्यामुळेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता वारंवार माहितीचा अर्ज करतात व त्या सर्व अर्जांना वेळोवेळी त्यांनी उत्तरेही दिलेली आहेत. अपिलकर्ता एकाच विषयाची माहिती वेगळया पध्दतीने मागवतात व ती पुरवूनही त्यांचे समाधान होत नाही. अपिलकर्ता यांनी सादर केलेले अर्ज व त्यांना कार्यालयाकडून देण्यात आलेली

उत्तरे याची सुची त्यांनी आयोगाच्या अवलोकनार्थ जोडलेलीआहे. अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्यांमध्ये काही तथ्य नसते. बीडीडी चाळीतील दोन भावांचा वाद असून त्या वादाच्या सदर्भात अपिलकर्ता वारंवार मिळकत व्यवस्थापक तसेच पोलीस यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करीत आहेत. पोलीसांनीसुध्दा अपिलकर्ता यांना दिवाणी वाद असल्यामुळे हस्तक्षेप करता येत नाही असे वारंवार सांगितलेले आहे. त्यांना आत्तापर्यंत सर्व कागदत्रांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच पोलसांनीसुध्दा त्याना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अर्जदार यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नाही व त्यांच्या स्वत:च्या हिताकरीता ते सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिका-यांना वेठीस धरत आहेत असे दिसून येते, तरीही त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२१/अपील क्रमांक ६२१७/२०१०

श्री. विनायक एस.इंगळे,
द्वारा- बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळक नगर, चेंबूर(प.), मुंबई-८९. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-३, बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड,
भायखळा(पूर्व), मुंबई-४०००३३.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,
बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड,
भायखळा(पूर्व), मुंबई-४०००३३. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरिक्षक वरळी पोलीस ठाणे यांच्याकडे अर्ज करुन भविष्यात अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने आपण आणि श्री.आर.पी.वैती,सहाय्यक व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग,वरळी यांनी संयुक्तिकपणे केलेले उपाय इत्यादी अहवालाची झेराक्स प्रमाणित पुरविण्याबाबत तसेच त्यांच्या कार्यालयात उपरोक्त क्रमांकाचेआपणास प्राप्त झालेल्या पत्राचा सद्यस्थितीपर्यंतचा अहवाल अवगत करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांचा सहभाग घेऊन कोणत्याही प्रकारचा अहवाल तयार केलेला नाही. मात्र व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग चाळी,

वरळी व अपिलकर्ता यांचे बंधू यांच्या संदर्भात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न पोलीसांनी वेळोवेळी केलेला आहे. अपिलकर्ता व त्यांचे बंधू यांच्यामध्ये बीडीडी चाळीत रहाण्यासंदर्भात वाद आहे. अपिलकर्ता हे बीडीडी चाळीत रहात नसून ते चेंबूर येथे राहतात व बीडीडी चाळीतील जागा ही त्यांचे बंधू श्री.प्रकाश इंगळे यांच्या कब्जात आहे व विषयांकित खोलीची भाडेदारी श्री.प्रकाश इंगळे यांच्या नावावर हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे श्री.विनायक इंगळे यांचे वास्तव्य तेथे होते परंतु त्यांचे भाऊ त्यांना सदरच्या खोलीत राहू देत नाहीत व त्याबाबत त्यांची तक्रार आहे. मुंबई विकास विभाग चाळीची इमारत ही शासनाची मालमत्ता असून इमारतीमधील गाळे भाडेकरुंना भाडेतत्वावर वाटप केलेले आहेत. मंबई विकास विभाग चाळीच्या इमारतीमधील गाळे कोणाही व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नाही. श्री.प्रकाश इंगळे यांनी श्री.विनायक इंगळे यांना सदरच्या खोलीत रहाण्यास सौजन्य व सहकार्य दाखविण्यासाठी व सामोपचाराने समेट घडविण्यासाठी तसेच भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडून पेचप्रसंग निर्माण होऊ नये यास्तव सदरचे वादग्रस्त प्रकरण आपल्या विभागाकडे पाठविण्यात येत आहे. तरी सदर प्रकरणी दोन्ही व्यक्तींमध्ये योग्य तो समेट घडवून या कार्यालयास अहवाल पाठवावा असे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना लिहिले असल्यामळे त्या अहवालाची माहिती अपिलकर्ता यांनी मागीतलेली दिसून येते. त्या संदर्भात अपिलकर्ता यांना एकूण १ ते ३१ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली आहेत व त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरिक्षक यांनी समेट घडविलेला असून त्याबद्दलची कागदपत्र दिलेली दिसून येतात. मात्र अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, समेट घडवतांना त्यांना कधीही बोलावण्यात आलेले नाही. या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील कारवाईच्या संदर्भात हस्तक्षेप करता येत नाही किंवा हस्तक्षेप करणे अपेक्षित नाही व त्यामुळे कागदपत्रांच्या स्वरुपात जेवढी माहिती उपलब्ध असेल ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे अपिलकर्ता यांना ती सर्व कागदपत्र उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००८६/अपील क्रमांक ६३२३/२०१०

श्री. भास्कर विश्राम गावडे,
बी.डी.कदम चाळ, एक्सेल कंपनी शेजारी,
वीरा देसाई रोड, अंधेरी(प.), मुंबई-५३. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,

बृहन्मुंबई महानगरपालिका,
परिरक्षण विभाग, के/पश्चिम विभाग,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५३.

जन माहिती अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
परिरक्षण विभाग, के/पश्चिम विभाग,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५३. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी सी.टी.सर्व्हे क्र.७२० मधील प्रमोद नवलकर उद्यानाबाबत विरा देसाई मार्ग, कवारी रोड,विलाल मजिद समोर, अंधेरी(प.) च्या संदर्भात अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतली आहे.

१) शौचालय स्थलांतर करण्याकरीता पास केलेल्या प्रस्तावाची प्रत, सक्षम प्राधिकरणाने म.न.पा. कार्यालयात दिलेली प्रत मिळावी

२) १३.४.२०१० रोजी सहाय्यक अभियंता श्री.जाधव यांनी केलेल्या परिक्षण(तपासणी)चा रस्ता नियमित रेषेमध्ये पूर्वस्थायी शौचालय येतात किंवानाही याचा तपासणीअहवाल सादर करावा

३) विकासकाने ५% ॲमिनिटी म्हणून देण्यात येणारा भुखंड हा कोणाच्या अखत्यारीत असणार याचा लेखी खुलासा करावा व त्याचा उपयोग(एसआरए) किंवा सेल बिल्डिंगमधील रहिवाशांकरीता असेल व तो मोफत असेल कि शुल्क भरावा लागणार याचा खुलासा करावा,

माहिती प्रत्यक्ष घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३.६.२०१० रोजी एकूण ३ मुद्यांवर माहितीच्या संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी/सहाय्यक अभियंता(परि.)उत्तर यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलकर्त्यांस स्थळ पाहणीच्या अहवालाची प्रत सात दिवसांचे आत देण्यात यावी. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेलेआहे.

सुनावणीस अपिलकर्ता हजर आहेत, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्र दाखल केलेली नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या नोटीसचा अवमान केलेला आहे

व त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे त्या संदर्भात युक्तीवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना प्रस्तावाची संपूर्ण माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत याबद्दलचा अहवालही त्यांना दिलेला नाही. मात्र दि.३.६.२०१० च्या पत्रामध्ये स्पष्टपणे रु.२/- प्रति प्रत भरणा केलनंतर सदर प्रस्तावाची छायांकित प्रत आपल्याला उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले आहे. अहवालाच्या संदर्भात कार्यालयामधून हातोहात अहवालाची प्रत देण्यात आली आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच विकासकाकडून ५०% च्या संदर्भातसुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे पुन्हा असे म्हणणे आहे की, प्रस्तावाच्या छायांकित प्रतीचा खर्च ते भरण्यास तयार होते परंतु जन माहिती अधिकारी यांनी ३०व्या दिवशी खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. वास्तविक माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ५-७ दिवसात खर्चाचा भरणा करण्यास कळविणे आवश्यक असते, जेणेकरुन अर्जदारास खर्चाचा भरणा करुन मुदतीत माहिती प्राप्त करुन घेता येते. परंतु ३०व्या दिवशी खर्चाचा भरणा करण्यास कळविणे याचा अर्थ माहिती देण्यास टाळाटाळच करण्याचा उद्देश दिसून येतो व मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल तर विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ७(६) मध्ये आहे. त्याप्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत याबाबतच्या अहवालाची प्रत किंवा नकाशे उपलब्ध करुन द्यावेत असे त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना सांगितले. उत्तरवादी गैरहजर असल्यामुळे व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्दल काहीही कागदपत्र सादर केलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरुन असा निर्णय देण्यात येतो की, सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.३.५.२०१० च्या अर्जात मागितलेल्या ३ मुद्यांच्या संदर्भात मुद्देनिहाय संपूर्ण प्रस्तावाची तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत त्या अहवालाची प्रत तसेच नकाशाची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१५७/अपील क्रमांक ६३२०/२०१०

श्री. अण्णाजी शामराव अडबोल,
१६/२५२, कन्नमवार नगर नं.१,
विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
दर्यापूर, जि.अमरावती.

जन माहिती अधिकारी,
दर्यापूर, जि.अमरावती. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११

अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.६.२०१० रोजी मौजे लोहिजखेडा येथे गट क्र.१४ व १५च्या दुरुस्ती करण्यासाठी दि.१८.१२.०९ रोजी दिलल्या अर्जाच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.७.२०१० रोजी त्यांच्या दुरुस्ती तक्रार अर्जाच्या संदर्भात गुणवत्तेच्याबाबत नायबतहसिलदार यांनी कळविलेले दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीनुसार मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२३.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना एकूण ३४ पानांची माहिती पुरविण्यात आलेली दिसून येते तसेच अपिलार्थी यांनी अपिलामध्ये मागीतलेली माहिती, माहिती या संज्ञेत बसत नसल्यामुळे अपिल फेटाळण्यात आले आहे असा निर्णय दिल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यांनी गट नं.१४ व १५करीता दुरुस्ती अर्ज केलेला आहे परंतु सदरच्या दुरुस्ती अर्जाच्या संदर्भात त्यांना मागीतलेली माहिती देण्यास दुर्लक्ष करण्यात आले आहे. परंतु नायब तहसिलदार, दर्यापूर यांनी असे सांगितले की, त्यांच्या अर्जाची सुनावणी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता-६६च्या तरतुदीप्रमाणे सुरु आहे व तेथे प्रत्येक तारखेस हजर रहाण्याकरीता त्यांना २९.७.२०१० रोजी कळविण्यात आले होते. तसेच त्याबाबतची सर्व माहिती अपिलकर्ता यांना १ ते ३४ कागदपत्रांमध्ये देण्यात आलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यातील फक्त ३ कागदपत्र नवीन असून ३० कागदपत्र त्यांनीच दाखल केलेली आहेत. परंतु त्यावर नायबतहसिलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की जी सुनावणी आहे ती महसूल कायद्याप्रमाणे असल्यामुळे व ती आरटीएस अपिलाची सुनावणी असल्यामुळे माहितीच्या अधिकारात त्याबद्दल कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही किंवा त्या अपील अर्जाच्या सुनावणीसंदर्भात कार्यवाही का करण्यात येत नाही याबाबतही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांनी मूळ माहिती अर्ज व प्रथम अपील या दोन्ही कारवाया या त्या कार्यालयाच्या क्षेत्रातील नसल्याने प्रतिवादी म्हणून सदर अपिल अर्जाविरुध्द दोन्ही पक्षांना नोटीस पाठवून सुनावणीसाठी हजर रहाण्यास कळविण्यात आले आहे. सुनावणीच्यावेळी असे आढळून आले की, सदर अपील तहसिलदार, दर्यापूर यांच्या अधिकारक्षेत्रातील आहे. म्हणून उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांचे नाव प्रकरणातून वगळण्यात यावे असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. थोडक्यात अपिलकर्ता यांच्या दुरुस्ती अर्जाच्या संदर्भात तातडीने निर्णय होणे अपेक्षित आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्र उपलब्ध होत नाहीत व कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात राज्य माहिती आयोगास आदेश देता येत नाहीत व त्यामुळे त्यांना पृष्ठ १ ते ३४ उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१५८/अपील क्रमांक ६३१९/२०१०

श्री. शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली, मुंबई-१०१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
पी-नॉर्थ, बृहन्मुबई महानगरपालिका,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.),
मुंबई.

जन माहिती अधिकारी,
इमारत विभाग, पी-नॉर्थ, बृहन्मुबई महानगरपालिका,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.),
मुंबई. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान झाले व मी संतुष्ट आहे असे अपिलकर्ता यांनी लेखी लिहून दिले आहे असे जावक नोंद वहीवरील नोंद दाखवून प्रतिपादन केले. सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचे अपील **निकाली** काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१५६/अपील क्रमांक ६३२१/२०१०

श्री. राजेश कृष्णाजी घडशी,
विजय कर्पे चाळ नं.३बी, रुम नं.१०,
ज्यु जिम्मी बाग, कल्याण तिसगाव रोड, कल्याण(पूर्व),
ठाणे. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता(स्थापत्य),
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
घाटकोपर. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्यातर्फे श्री.महेश गावडे यांनी दि.२०.१.२०१० रोजी माहिती अधिकारी(म्हाडा) यांच्याकडून मला सर्व माहिती मिळाली असल्याने माझी काहीही तक्रार नाही असे लेखी सादर केलेले निवेदन आयोगासमोर सादर केले. यास्तव सदरचे अपील **निकाली** काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/४२२०६/अपील क्रमांक ५८४०/२०१०

श्री. डॉ.शहा बाहुबली हिरालाल,
हिरानगर, होमिओपॅथी क्लिनीक, रणवरे टॉवर्स,
सिनेमा टॉवर्स, बारामती-४३३१०२. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
अनेकांत एज्यूकेशन सोसायटी,
तुळजाराम चतंररंग कॉलेज कँपस,
बारामती-४३३१०२, जि.पुणे.

जन माहिती अधिकारी,
अनेकांत एज्यूकेशन सोसायटी,
तुळजाराम चतंररंग कॉलेज कँपस,
बारामती-४३३१०२, जि.पुणे. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ३.७.२००९
सुनावणीचा दिनांक : ९.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२५.५.०९ व २६.५.०९ रोजी जन माहिती अधिकारी अनेकांत एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे संस्थेच्या कार्यालयातील कर्मचा-यांची नावे,

त्यांनी धारण केलेले पद व शैक्षणिक अर्हता, नियुक्तीचा दिनांक व त्यांचे वय इत्यादी माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५प्रमाणे नियुक्त केलेले माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे व हुद्दा, माहितीच्या वेबसाईटचे नाव व अधिनियमाप्रमाणे आवश्यक असलेली सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे काय तसेच संस्थेचे कामकाज व घटनात्मक रचनेच्या संदर्भात सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि.६.४.२०६२ रोजी नोंदणीकरीता दाखल केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत व इतर ६ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते.

२. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२२.६.२००९ रोजी सचिव, अनेकांत एज्युकेशन सोसायटी,बारामती ही अल्पसंख्यांक संस्था माहिती अधिकाराच्या कायद्यात येत नाही अशी आमची धारणा आहे. तथापि, आपण पूर्व सूचना देऊन संस्था कार्यालयात यावे म्हणजे त्यावेळी मा.अध्यक्ष व मा.सचिव उपस्थित राहून आपणास आवश्यक ती माहिती देतील याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२५.६.०९ रोजी आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा त्या पत्राप्रमाणे दि.२९.६.०९ रोजी अध्यक्ष,अनेकांत एज्युकेशन सोसायटी,बारामती यांनी त्याचप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते. अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील दाखल केल्यानंतरसुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे दि.१४.१२.०९ रोजी ३ पत्रे व्हीडीओ कॉनफरन्सींगच्या सुनावणीसंदर्भत दिलेली दिसून येतात. तसेच सदर अपिलाची सुनावणी राज्य माहिती आयोगाच्या पूर्ण खंडपीठाकडे करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती, संस्थेने दिलेल्या त्या संदर्भातील उत्तराच्या संदर्भात सदर अपिलाची सुनावणी ही पूर्ण खंडपीठाने घेण्याची आवश्यकता नसल्यामुळे मुख्य माहिती आयुक्त यांनी ही सुनावणी दि.९.२.११ रोजी घेतलेली आहे. सुनावणीस अपिलकर्ता तसेच तु.च.महाविद्यालयाचे प्राचार्य व तु.च. महाविद्यालयाचे रजिस्ट्रार हजर होते.

३. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांना सदर संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. तसेच व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे सुनावणी घेणा-या माहिती आयुक्तांनी मुंबई उच्च न्यायालयाने(नागपूर खंडपीठ) याचिका क्र.५२९४/२००८ संदर्भात दिलेल्या निकालाचा गोषवारा देऊन सुनावणी स्थगित केली. तसेच दि.१४.१२.२००९ रोजी मा.मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे अर्जकरुन या अपिलाची सुनावणी पूर्ण पीठाकडे घेऊन युक्तीवाद करण्याची विनंती केली. तसेच या सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाचा अभ्यास केला असता त्या निर्णयामध्ये पब्लीक ट्रस्टना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होण्याकरीता

अधिनियमात नमुद केलेल्या अटींपैकी एक अट(किमान) पूर्णकेल्याचे दाखवून दिल्यास सदर संस्थेस अधिनियम लागू होऊ शकतो असे प्रतिपादन केले. त्याप्रमाणे संस्थेस राज्य शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोग,विद्यापीठ यांचेकडून प्रत्यक्ष अनुदान किंवा भरघोस अर्थसहाय्य मिळत असल्याबाबत युक्तीवादाच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिल्यावरुन प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्याप्रमाणे संस्थेच्या नोंदणीकृत घटनेप्रमाणे अनेकांत एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे उद्दिष्ट राष्ट्र उभारणीकरीता विविध प्रकारचे शिक्षण देण्याकरीता शाळा,महाविद्यालय, वसतीगृह, पाठशाळा,वृत्तपत्र,ग्रंथालये व संशोधन संस्था स्थापन करणे आणि त्या चालविणे हे आहे(Appendix-I) म्हणजेच संस्थेने स्थापन केलेल्या आणि शासनाकडून दरवर्षी वेतन व वेतनेतर खर्चाकरीता भरघोस अनुदान प्राप्त करणा-या महाविद्यालयांचे संचालन व व्यवस्थापन हा संस्थेच्या नियमित कामकाजाचा एक भाग असल्याने सदर महाविद्यालयांना मिळणारे भरघोस अर्थसहाय्य हे एक प्रकारे संस्थेला मिळणारे अर्थसहाय्यच आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीतर्फे बारामती व जयसिंगपूर येथे प्रत्येकी एक अनुदानित वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय चालविले जाते. ही महाविद्यालये व त्यांचे कामकाज संस्थेच्या कारभाराचा एकात्मिक व अविभाज्य घटक असल्यानेच ही दोनही महाविद्यालये वेगवेगळया विद्यापीठांशी संलग्न असली तरी एका महाविद्यालयात नियुक्त केलेल्या कर्मचा-याची संस्था दुस-या महाविद्यालयात बदली करु शकते(Appendix-V) याचाच अर्थ संस्थेच्या महाविद्यालयातील नियुक्त कर्मचारी हे केवळ त्या महाविद्यालयाच्या नव्हे तर संस्थेच्या सेवेतील कर्मचारी असून त्यांच्या वेतनापोटी शासनाकडून मिळणारे अनुदान हे संस्थेला मिळणारे अप्रत्यक्ष अर्थसहाय्य आहे. संस्थेची उपरोक्त दोन्ही अनुदानीत महाविद्यालये सुरु करतांना शासन व विद्यापीठ यांचेकडे परवानगी व संलग्नता याकरीता केलेले अर्ज हे संस्थेतर्फे केले गेले आहेत व नियमानुसार परवानगी संस्थेच्या नावाने आहे त्यामुळे संस्था व सदर महाविद्यालये यांना स्वतंत्र मानणे अतार्किक आहे. राज्य शासनातर्फे चेअरमन, अनेकांत एज्युकेशन सोसायटी या नावाने महाविद्यालय चालविण्याकरीता जयसिंगपूर येथे अंदाजे एक लाख चौ.मि.भुखंड रीवार्डने दिला असून त्या भुखंडावर महाविद्यालयाकरीता विविध इमारती संस्थेने उभारल्या आहेत. सदर भुखंड महावीर को.ऑप.बँक या वित्त संस्थेकडे संस्थेने महाविद्यालयाकरीता रु.२५,००,०००/- इतके कर्ज घेण्याकरीता संस्थेच्या नियामक मंडळाच्या ठरावानुसार घेतले होते. सदर कर्जाची परतफेड महाविद्यालयाकडून नियत वेळेत न झाल्याने न्यायालयीन प्रक्रिया होऊन उपरोक्त भुखंडाचा काही भाग व त्यावरील इमारत वित्त संस्थेच्या ताब्यात दिली गेली होती. यावरुन महाविद्यालय व संस्था निरनिराळे नसुन एकच आहेत(Appendix-XIII). संस्थेच्या बारामती येथील महाविद्यालयाकरीता राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ यांचे अनुदानातून बांधलेल्या सर्व इमारती संस्थेच्या नावावर असलेल्या

भुखंडावर असून त्या इमारतींची मालकी संस्थेकडे आहे व या इमारतींमधून संस्थेस भाडयाचे उत्पन्न मिळते तसेच वसतीगृह विद्यार्थ्यांचे भाडेसुध्दा संस्थेकडे जमा हाते व ते संस्थेच्या उत्पनाचे साधन आहे हे भुखंडाचा सातबारा(Appendix-VI) संस्थेच्या बारामती स्थानिक समितीचे (संस्थेच्या घटनेप्रमाणे स्थापन झालेली उपसमिती) अंदाजपत्रक(Appendix-II) महाविद्यालयाचे ऑडीटेड स्टेटमेंट(Appendix-VII)यावरुन सिध्द होते. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ८६ पमाणे संलग्न महाविद्यालयाचा कारभार पाहण्याकरीता स्थापन करावयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद संस्थेच्या अध्यक्षांकडेच असते. तसेच या समितीमध्ये संस्थेच्या सचिवांचा समावेश असतो. या समितीच्या कार्यकक्षेतील तरतुदी पाहिल्या असता महाविद्यालयाकरीता आवश्यक असणा-या अध्यापक व अध्यापकेतर पदांची निर्मिती करणे, महाविद्यालयाचा दर्जा वाढविणे याकरीता केवळ शिफारसी करणे समितीच्या अखत्यारीत असून अंतिम निर्णय करण्याचे अधिकार संस्थेच्या व्यवस्थापनाकडे असल्याचे दिसून येते. हीच बाब महाविद्यालयाच्या अंदाजपत्रकासही लागू आहे(Appendix-XIV) वरील सर्व बाबींचा विचार करता संस्थेतर्फे चालविली जाणारी अनुदानित महाविद्यालये ही संस्थेच्या कारभाराचा एकात्मिक व अविभाज्य भाग असून या महाविद्यालयाचा कारभार हा संस्थेच्या प्रशासनाचाच एक भाग आहे हे स्पष्ट होते.तसेच निरनिराळया शासकीय अनुदान व अर्थसहाय्यातुन उभारण्यात आलल्या इमारती व वसतीगृहांची मालकी संस्थेकडे असून ती या संस्थेच्या उत्पन्नाचा एक प्रमुख स्त्रोत आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(ii) मधील तरतुदी तसेच उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.५२९४/२००८ संदर्भातील निर्णयातील मुद्दा क्र.७ व ८ चे विश्लेषण यांचा विचार केला असता अनेकांत एज्युकेशन सोसायटी या ट्रस्टला माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो असे त्यांनी ठाम प्रतिपादन केले आहे.

४. त्यावर प्राचार्य तु.च.महाविद्यालय, बारामती यांनी युक्तीवाद केला. वास्तविक अपिलकर्ता यांनी महाविद्यालयाचे माहिती अधिकारी यांना माहिती मागीतली नव्हती. महाविद्यालयाचे माहिती अधिकारी हे प्राचार्य असतात परंतु अपिलकर्ता यांनी संस्थेकडे माहिती मागीतलेली होती व त्यामुळे संस्थेचे पदाधिकारी यांनी आयोगापुढे हजर रहाणे आवश्यक होते. तसे प्राचार्य यांना आयोगाने विचारले असता संस्थेने प्राचार्यांना पाठविले असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. प्राचार्यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांना शासनाचे अनुदान मिळते हे खरे आहे परंतु शासनाचे अनुदान हे प्राचार्य, महाविद्यालय यांच्याकडे वर्ग केले जाते. संस्थेला कोणत्याही प्रकारचे शासनाचे अनुदान मिळत नाही. संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०च्या अंतर्गत

तसेच सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत झालेली आहे व त्यामुळे ती सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे. सार्वजनिक विश्वस्त संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान उपलब्ध होत नाही व त्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त संस्थेला शासनाचे अनुदान नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अनेकांत एज्युकेशन सोसायटी ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे असल्यामुळे व संस्थेला कोणतेही प्रत्यक्षअनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी त्यांना लागू होत नाहीत. तसेच संस्थेस अल्पसंख्यांक संस्थेचा दर्जा असल्यामुळेसुध्दा अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना लेखी प्रतिज्ञापत्रात सादर केल्याप्रमाणे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान मिळते व ते पर्यायाने संस्थेलाच मिळत असते. सदर निर्णयाच्या संदर्भात प्राचार्य यांनी पुढे युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, शिक्षण संस्था असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचे शासनाकडून अनुदान मिळत नाही. मात्र पुढे अपिलकर्ता यांनी पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की. संस्थेस विद्यापीठ अनुदान आयोगाकडून इमारतीच्याकरीता अनुदान मिळाले आहे तसेच इतर अनुदान जे मिळते ते सुध्दा संस्थेलाच मिळते याबद्दल मात्र प्राचार्यांनी तशा प्रकारची व्यवस्था आहे हे मान्य केले.

६. कोणतीही शाळा किंवा महाविद्यालय शासनाकडून मंजूर होताना माध्यमिक शाळासंहिता तसेच विद्यापीठ अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे शाळा किंवा महाविद्यालय हे संस्थांना मंजूर होते. कोणत्याही व्यक्तीला वैयक्तीकरित्या शाळा किंवा महाविद्यालय शासनाकडून मंजूर होत नाही. माध्यमिक शाळासंहिता यामध्ये शाळा मंजूर करण्याच्या संदर्भात ज्या तरतुदी आहेत त्यामध्ये मान्यतेच्या शर्ती दिलेल्या आहेत व त्यामध्ये नवीन शाळा सुरु करणे याबाबतच्या तरतुदी केलेल्या आहेत.

७. शाळा सुरु करण्यासाठी मान्यतेच्या शर्ती, मान्यता नाकारणे, काढून घेणे या संदर्भात प्रकरण २ मध्ये तरतूद केलेली आहे त्यामध्ये २.१ मध्ये शाळा सुरु करण्यासाठी व्यवस्थापनाने अर्ज केला पाहिजे अशी तरतूद आहे.मान्यतेच्या शर्तीमध्ये मुद्दा क्र.३.२ मध्ये एकूण १६ शर्तींची व्यवस्थापनाने पूर्तता केली असली पाहिजे अशी तरतूद दिलेली आहे. त्याचप्रमाणे तात्पुरती व कायम मान्यता या बद्दलसुध्दा तरतूद करण्यात आली आहे. मान्यता नाकारणे, मान्यता काढून घेणे याबद्दलचीसुध्दा तरतूद आहे. जेव्हा शाळेच्या व्यवस्थापनात बदल करण्याचे योजले असेल तेव्हा असा बदल करण्यासाठी उपसंचालकांची पूर्व परवानगी मिळवली पाहिजे तसेच मान्यताप्राप्त शाळेचे एका व्यवस्थापनाकाडून दुस-या व्यवस्थापनाकडे हस्तांतर पोटनियमांच्या अधीन राहील. वेतन व वेतनेतर अनुदान या संदर्भात शासन व सहाय्यक अनुदानासाठी पात्रता या संदर्भात मुद्दा

क्र.८६.२ मध्ये खाजगी मालकीच्या शाळा(म्हणजे १९६० चा संस्था नोंदणी अधिनियम क्र.२१ किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था १९५० किंवा शासनाने याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी न केलेल्या शाळा जातीय शाळा आणि शासनाने बिगर सहाय्यक अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा या लोकनिधीतून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असणार नाहीत अशी तरतूद आहे. मान्यताप्राप्त शाळा मंजुरी प्राधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार निधी उपलब्ध असेल तर खालीलप्रकारचे अनुदान मिळण्यास पात्र असतील. मात्र ज्या संस्था अशा शाळा चालवित असतील त्या संस्थांची वेळोवेळी दुरुस्त केलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी केलेली असली पाहिजे.१)वेतन अनुदान,२) वेतनेतर अनुदान,३)इमारत अनुदान,४) शासन वेळोवेळी मंजूर करेल अशी इतर अनुदाने त्याकरीता पात्र असतील. सहाय्यक अनुदानासाठी नोंदणीकरीता करावयाचे अर्ज मुद्दा क्र.९३.१ मध्ये विभागाकडून सहाय्यक अनुदान घेऊ इच्छिणा-या शाळांनी त्यांना ज्या वर्षी अनुदान मिळावयाचे असेल ते शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या किमान ६ महिन्यांपूर्वी समुचीत प्राधिका-यांकडे परिशिष्ट २१ मध्ये दिलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे.प्राप्तानुदानित शाळांच्या यादीमध्ये एकदा शाळा समाविष्ट करण्यात आली म्हणजे त्या शाळेस ती जोपर्यंत मान्यतेच्या अटी पूर्ण करीत राहील आणि इतर नियमांचे व विभागांतर्गत वेळोवेळी दिलेल्या सचनांचे पालन करीत राहील तोपर्यंत वर्षावर्षाला अनुदान मिळत राहील.

यावरुन अनुदानेतर शाळांच्या संदर्भात व्यवस्थापनानेच अर्ज करावयाचा असल्यामुळे अनुदान हे संस्थेलाच मिळते असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच खजगी प्राप्तानुदान शाळांच्या व्यवस्थापनाने व शाळेची इमारत बांधण्याकरीता किंवा शाळेच्या इमारतीचा विस्तार करण्याकरीता अनुसुचित बॅकांनी देऊ केलेल्या कर्जाकरीता शासनाची हमी देण्याच्या योजनेबाबतचा नियमसुध्दा दिलेला आहे व त्याप्रमाणे शासन त्याकरीता हमी देत असते.महाविद्यालयाच्या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४च्या कलम ८२ च्या पोटकलम(३) प्रमाणे नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता व्यवस्थापनाने अर्ज करावा अशी तरतूद आहे. त्याप्रमाणे कलम ८१ मध्ये मान्यता देण्यासंदर्भात व्यवस्थापनालाच महाविद्यालय मंजुर होते अशी तरतूद आहे आणि विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय व्यवस्थापनास कोणताही बदल करता येत नाही अशीही तरतूद त्यामध्ये आहे. तसेच सदरच्या महाविद्यालयामध्ये किंवा शाळांमध्ये शिक्षक व कर्मचारी यांची नियुक्ती तसेच त्यांना काढून टाकणे किंवा पदोन्नती देणे किंवा बदली करण्याचे अधिकार हे संस्थांनाच आहेत व संस्था हे अधिकार उपभोगतात. थोडक्यात कोणतीही शैक्षणिक संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०च्या तरतुदीप्रमाणे नोंदणीकृत असल्याशिवाय शाळा किंवा महाविद्यालय मंजूर होत

नाही व शाळा किंवा महाविद्यालयास शासनाचे अनुदान असले तर ते अप्रत्यक्षपणे संस्थेला शाळा किंवा महाविद्यालय चालविण्यासाठीचे अनुदान असते व त्यामळे कोणत्याही अनुदानित शैक्षणिक संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होत नाही असे म्हणता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ३(ज) मध्ये "सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ" समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे व त्यामध्ये (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्यांच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय (दोन)समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशी अशासकीय संघटना यांचा समावेश होतो.

वरील व्याख्यांप्रमाणे व अपिलकर्ता यांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे तसेच प्राचार्य यांनी मान्य केल्याप्रमाणे अनेकांत शिक्षण संस्थेस शासनाकडून विद्यापीठ अनुदान मिळते याबाबत कोणतेही मतभेद दिसून येत नाही. संस्थेतर्फे याचिका क्र.५२९४/०८ मधील निर्णय हा एका धार्मिक मठाच्या संदर्भात निर्णय आहे व सदरचा धार्मिक मठ हा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०प्रमाणे नोंदणीकृत असून सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे परंतु त्यास शासनाचे अनुदान नही व त्यामळे मा.उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी त्यास लागू होणार नहीत असा निर्णय दिलेला आहे. परंतु त्याच निर्णयामध्ये परि.८ मध्ये Any person seeking to establish that a particular trust is covered by the provisions of the Right to Information Act will have to first prove that it is a public trust created by Government or Parliament or is substantively financed by the Government असे नमूद केलेले आहे व त्याप्रमाणे सदरच्या अनेकांत शिक्षण संस्थेस महाविद्यालय व शाळा चालविण्याकरीता शासनाकाडून अनुदान मिळते असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपूर यांच्यापुढील याचिका क्र.५०६७/०९मध्ये न्यायमूर्ती श्री.एस.ए. बोबडे आणि न्यायमूर्ती श्री.ए.बी.चौधरी यांच्या खंडपीठाने दि.१०.८.२०१० रोजी शिक्षण प्रसारक मंडळ कामठी विरुध्द स्टेट इन्फर्मेशन कमिशन नागपूर बेंच, नागपूर, श्री.भुषण केशवराव तिजारे व सहशिक्षण संचालक, नागपूर विभाग,नागपूर या याचिकेमध्ये परि.७ मध्ये खालीलप्रमाणे निरिक्षण केलले आहे.

In the instant case, it is not in dispute that the said College run by the petitioners - Society is receiving grants-in-aid and the

grants-in-aid received by the College from the Government are managed by the Society and its College. We, therefore, hold that the Non-Government Schools/Colleges/institutions receiving grants-in-aid either from the State Government or the Central Government are fully covered by the definition of public authority and such Schools/Colleges are covered by the provisions of the Right to Information Act,२००५.

वरील निर्णयाप्रमाणे याचिकाकर्ता यांची याचिका फेटाळण्यात आलेली आहे याचा अर्थ संस्थेस शाळा किंवा महाविद्यालय चालविण्याकरीता अनुदान मिळते त्यामुळे अनेकांत शिक्षण संस्थेचासुध्दा सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत समावेश होतो व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. त्यामुळे संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ५(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी नियुक्त करणे तसेच कलम १९(१)प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहील व त्यानंतर अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२५.५.०९, २६.५.०९च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून अनेकांत शिक्षण संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात व हा निर्णय मिळाल्यापासून पांच दिवसांचे आत अनेकांत शिक्षण संस्था,बारामती मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) अन्वये जन माहिती अधिकारी तसेच कलम १९(१) अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करावी.

२) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती केल्यानतर संबंधित जन माती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.२५.५.०९ व २६.५.०९च्या अर्जांच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची पत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ११.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७७/अपील क्रमांक ६३०३/२०१०

श्री. रसिकलाल रतीलाल गांधी,
द्वारा वरुन कॉंप्युटर सर्व्हीस, पांजरपोळ कंपाऊंड,
जैन देवळाजवळ, मुंबई-४. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(इ) मुंबई,
गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,
बंद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग को.ऑप.हौ.सो.,
एम.एम.आर.डी.ए. बिल्डिंग, रुम नं.३१५/३१६,
वडाळा, मुंबई-४०००३१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(पी वार्ड) यांच्याकाडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७३(IAB) व ७८, नियम १९६१ प्रमाणे नियम ५८(ए)च्या संदर्भात निवडून आलेल्या समितीने बॉंड दिलेले आहेत किंवा नाहीत याची माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत

माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३१.८.२०१० रोजी सदर कारणास्तव प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपील अंशत: मान्य करण्यात येत असून उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग यांनी अर्जदारांना बंधपत्राची माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.१८.१.२०१० रोजी संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार योग्य ती वैधानिक कार्यवाही करण्यात येत आहे असे असे अपिलकर्ता यांना कळविले आहे. असे असले तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दि.११.१०.२०१० रोजी दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संस्थेच्या संचालक मंडळावर कारवाई झालेली असल्यामुळे आता त्यांची काहीही तक्रार राहिलेली नाही व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७५/अपील क्रमांक ६३०१/२०१०

श्री. आय.पी.योगींदरन,
सहा.अभियंता,इमारत विभाग(दक्षिण) विभाग,
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उप्रम(बृहन्मुंबई महानगरपालिका),
मुंबई सेंट्रल बस डेपो, मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा चिफ इंजिनिअर(सिव्हील),
बेस्ट उपक्रम, इलेक्ट्रीक हाऊस,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००८.

जन माहिती अधिकारी,
सिव्हील इंजिनिअर डिपार्टमेंट,
बेस्ट उपक्रम, इलेक्ट्रीक हाऊस,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.६.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, स्थापत्य यांत्रिकी विभाग, बेस्ट यांच्याकडे राज्याच्या आरक्षण धोरणाच्या संदर्भात नियुक्ती व पदोन्नतीबाबत उप अभियंता, ग्रेड जी/जी-४ च्या संदर्भात एकूण ९ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते.सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.६.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांना रु.१८४/- डॉक्युमेंट चार्ज व रु.२५/- पोस्टाचे चार्ज असे एकूण रु.२०९/-चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी भरणा केल्यानंतर त्यांना दि.१२.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.८.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व

सुनावणीत ठरल्याप्रमाणे दि.२७.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तरीसुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी अपिलकर्ता यांना उपरोक्त माहिती दिली व त्याचप्रमाणे काही माहिती देतांना काही कालावधी लागेल असे त्यांना पत्राद्वारे कळविले होते. तरीसुध्दा त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतु अपिलकर्ता यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध झालेली माहिती दि.३.१२.२०१० नुसार त्यांना हस्तपोच केलेली आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपिल निकाली काढण्यात येतआहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल

झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९९७/तक्रार क्र. १६१५/का.१

श्री. वसंत आदितीरावितार,
ग्रीन हिल को.ऑप.हौ.सोसायटी, २५-बी/४०२,
नवीन दिंडोशी,गोरेगाव(पूर्व),
मुंबई-४०००६५. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,
अतिक्रमण व निष्कासन,
अतिक्रमण यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, तळमजला,
रुम नं.६८, वांद्रे(पूर्व),
मुंबई-४०००५१. .... **उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १०.१०.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी त्यांच्या अपिल क्र.५४११/०८च्या दि.३.७.२०१० च्या आयोगाच्या निर्णयाप्रमाणे व दि.२२.२.२०१० च्या अपिल क्र.५४११/०२ व तक्रार क्र.७२४/०२ मधील निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माीति आयोगाकडे दि.११.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अपिलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.१०.०९ रोजी तक्रार केली होती. परंतु त्या तक्रारीच्या निर्णयाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी सध्याची तक्रार आयोगाकडे केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना वेळोवेळी पकरणातील सर्व माहिती उपलब्ध करुन दिलली आहे. दि.७.११.०९ च्या प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशात नमूद केल्यानुसार -

१) उपजिल्हाधिकारी(अति/निष्का)अंधेरी यांच्या दि.१८.४.०६ च्या सुनावणीच्या नोटीसीस अनुसरुन संचिका डी.नं.२५६ आढळून न आल्याने त्याच प्रकरणात श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दि.१६.३.०९ रोजी सादर केलेला अर्ज मा.अप्पर जिल्हाधिकारी(अति./निष्का.)पश्चिम उपनगरे यांजकडून दि.१०.७.०९ रोजी प्राप्त झालेल्या व त्यासोबत असलेल्या पुराव्याच्या आधारे दि.१७.११.०९ रोजी डी.नं.२५६ बाबतीत अपात्रतेचा आदेश पारीत केला व त्याची पोच तक्रारदाराने दि.१८.११.०९ रोजी स्वाक्षरीसह घेतलेली आहे. तद्नंतर सदर आदेश श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अंतर्गत मा.प्रशासन व आयुक्त कोकण विभाग यांजकडे आव्हान करुन स्लम अपिल क्र.९७३/०९ दि.६.१.२०१० रोजी दाखल केले आहे. अपिलाचा निर्णय प्रलंबित आहे.

२) अपिलार्थी यांच्या म्हणण्यानसार उपलोकआयुक्त यांजकडे आवक क्र.४९४८/२००९ दि.२७.१०.०९ व राज्य माहिती आयोग यांजकडे आवक क्र.४४७२/०९ व दि.२७.१०.०९ रोजी केलेला अर्ज व उक्त प्रकरणाबाबत या कार्यालयाकडे कोणताच पत्रव्यवहार प्राप्त झालेला दिसून येत नाही.

३) मा.राज्य माहिती आयोगाच्या दि.२२.२.२०१० च्या आदेशामध्ये अपिलार्थी यांनी केलेल्या कंटेम्ट अर्ज दि.१७.५.१० ची सुनावणी दि.२.७.२०१० रोजी झाली. त्या अनुषंगाने मा.राज्य माहिती आयोग यांनी दिलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थी यांना दि.८.७.२०१० रोजी यथा योग्य माहिती दिली व त्याची प्रत आयोगास सादर करण्यात आली आहे. सदर माहिती दिल्यानंतर पुन्हा अपिलार्थी यांना या कार्यालयातून दि.९.१२.२०१० चे पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणाची संचिका आढळून आल्याचे कळविण्यात आले व अपिलार्थी दि.३०.९.२०१० रोजी समक्ष कार्यालयात आले असता त्यांना त्यांचे माहिती व अवलोकनार्थासाठी डी.नं.२५६ बाबतची संचिका दाखविण्यात आली व त्यांना संचिकेतील कागदपत्रांची आवश्यकता असल्यास ते प्राप्त करुन घ्यावे असे दि.९.१२.२०१० चे पत्राने कळविण्यात आले आहे. माहिती करीता श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी या कार्यालयात दाखल केलेले कागदपत्रे सोबत जोडत आहे(जोडपत्र-अ)

४) या प्रकरणाची वेळोवेळी माहिती अपिलार्थी यांना या कार्यालयातून देण्यात आली आहे. दि.३०.९.२०१० रोजी संचिकेचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास आले की, अपिलार्थी आपल्या अर्जाद्वारे ज्या व्यक्तीसंदर्भात माहिती मागत आहेत त्यांना या योजनेचया परि.२ मध्ये अ.क्र.२५४५अनुषंगाने यापुर्वीच पात्र करण्यात आले आहे व श्रीम.सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी सादर केलेल्या पुराव्यातील शिधापत्रिका,मतदान ओळखपत्र,मतदान यादी, विज बिल यांचा तपशील पाहता असे आढळून आले की, श्रीम.सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांचेतर्फे त्यांचे पती श्री.मनोहर परमार हे यापूवी प्रश्नांकित झोपडीसाठी दि.२८.१२.०४ मध्ये पात्र झाले आहेत. माहिती करीता श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशिल सोबत जोडत आहे.(जोडपत्र ब)

५) अपिलार्थी यांच्या अपिल अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी या कार्यालयात तसेच इतर अन्य सतरावर केलेल्या अर्जामध्ये सदरहू प्रकरणात श्री.मनोहर परमार यांना प्रश्नांकित झोपडीची उपरोक्तपणे दाखविण्यात आलेली पात्रतेची बाब(परि.२ मध्ये अ.क्र.२५४५) शासनापासून लपवून ठेऊन यापुर्वी पात्र झालेल्या झोपडीचीच त्याच पुराव्याच्या आधारे स्वतंत्र झोपडी असल्याचे भासवून आणखी एक झोपडी पात्र करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

असे असले तरी तक्रारदार यांना दि.८.७.२०१० रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती चुकीची आहे असे पुन्हा तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामध्ये उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी(अति./निष्का.) अंधेरी यांनी दि.१८.७.२००४रोजी आपणास पाठविलेल्या नोटीसबाबतची नस्ती या कार्यालयात आढळून येत नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणले व दि.१८.७.०४ ही तारीख चुकीची आहे व त्यांनी जी माहिती मागीतली होती ती २००६ या वर्षातील असल्यामुळे त्यांना दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे व त्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे नस्ती आढळून आली नव्हती व त्याप्रमाणे तक्रारदार

यांना कळविण्यात आले होते परंतु अनवधानाने त्या ठिकाणी तारीख चुकीची घालण्यात आली आहे. मात्र दौलतनगरच्या संदर्भातील नस्ती आढळून आली व त्याबद्दल तक्रारदार यांना कळविण्यात सुध्दा आले व त्यात जी टिप्पणी आहे ती टिप्पणी मान्य करण्यास कोणत्याही अधिका-याची हरकत नाही व त्यामुळे आदेश काढण्यात आले नसावेत व नस्तीमध्ये सुध्दा ते आदेश नाहीत व याबाबतचे अवलोकन तक्रारदार यांना दिलेले आहे. त्यामुळे त्यांना जे आदेश अपेक्षित आहेत ते अद्यापही नस्ती आढळून आल्यावरसुध्दा त्यामध्ये दिसून येत नाहीत. असे असल्यास तक्रारदार यांना त्याप्रमाणे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१)तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात अपिल क्र.१५११/०२, तक्रार क्र.७२४/०२ मधील निर्णयाप्रमाणे आदेश उपलब्ध असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन द्यावी किंवा उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे त्यांना कळविण्यात यावे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यातयावी.

मुंबई
दिनांक ३.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०११/८३९/तक्रार क्र. २/का.१

श्री. नवीन शामराव परब,

मुळगांवकर बिल्डिंग, १ला मजला,
७ टोपीवाला लेन,लॅमिंग्टन रोड,
मुंबई-४००००७. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,
करनिर्धारण व संकलन खाते, डी विभाग,
महापालिका कार्यालय इमारत, ४था मजला,
जोबनपुत्र आवार, ग्रँट रोड, नाना चौक आवार रोड,
मुंबई-४०० ००७. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ९.४.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी दि.९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दि.१५.३.२०१० च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दि.३०.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जी फीची आकारणी केलेली आहे त्या आकारणीच्या संदर्भात ती अवाजवी आहे अशी तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

तकारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, कोणत्याही कागदपत्रांचे निरिक्षण करण्याकरीता रु.२३०/-(रु.१८०/- + रु.५०/-) प्रमाणित करण्याची फी व अशाप्रकारेच प्रति प्रॉपर्टी पर इअर जी फी आकारली जाते ती अवाजवी आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे निरिक्षणकरण्याकरीता सुरुवातीच्या १ तासाला कोणत्याही प्रकारचे शुल्क नाही व त्यानंतरच्या प्रत्येक १५ मिनिटांना रु.५/- इतके शुल्क आहे असे असतांना उपलब्ध झालेली माहिती प्रमाणित करुन देण्याकरीता कोणत्याही प्रकारचे शुल्क त्या नियमात नाही व त्यामुळे प्रमाणित करण्याकरीता रु.५०/- आकारणी करणे योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने जे परिपत्रक तयार केले आहे त्या परिपत्रकाप्रमाणे फी आकारणी करण्यात येते परंतु, सदरच्या परिपत्रकाची प्रत त्यांनी सादर केलेली नाही. तसे जरी असले तरी सक्षम सार्वजनिक प्राधिकरणाशिवाय कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने महाराष्ट्र माहतीचा अधिकार अधिनियम २००५मध्ये नमूद केलेली प्रमाणित फी घेणे संयुक्तिक राहील व तसे आदेश सुध्दा मुख्य माहिती आयुक्त यांनी अपिल क्र.२१५१/०२, २९७७/०२, ३५२/०२, २७७/०२ मध्ये दि.९.७.२०१० रोजी दिले आहेत.

महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जे फी आकारणीचे नियम केले आहेत किंवा परिपत्रक काढले आहे त्या संदर्भात सर्वच अर्जदारांकडून आयोगाकडे तक्रार केली जाते. त्याकरीता पुन्हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त/उप आयुक्त यांना तक्रारीच्या संदर्भात सुनावणीस आयोगापुढे उपस्थित रहाण्याकरीता दि.२.२.२०११ रोजी आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढण्यात आली होती.परंतु

त्या दिवशीसुध्दा संबंधित उपआयुक्त व अतिरिक्त आयुक्त सुनावणीस हजर न राहता त्यांनी कनिष्ठ अधिका-यांना आयोगाच्या कार्यालयात सुनावणीस उपस्थित रहाण्याकरीता पाठविले. असे असल्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये निर्णय होइपर्यंत या संबंधित तक्रारदारास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.१५.३.२०१०च्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ३०.३.२०१० रोजी जी खर्चाची आकारणी कळविली आहे ती रद्द करण्यात येऊन त्यांना त्यांच्या दि.१५.३.२०१० च्या अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी..

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३००८/तक्रार क्र. १५८४/का.१

श्री. एरॉल सिक्वेरा,
३ए, पृथ्वी निवास, पभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबइ-४०००५५. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महापालिका आयुक्त कार्यालय,
पाणी विभाग, एच/पूर्व वार्ड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २५.११.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२४.८.०९ च्या अर्जासोबत दिलेल्या परिशिष्टाच्या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही या करीता राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, ते वारंवार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित होतात परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना दि.१५.२.२००९ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु पुन्हा तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या माहितीच्या अर्जासोबत दि.२८.१२.०७ रोजी जी तक्रार केली होती त्या तक्रारीची प्रत जोडण्यात आली आहे व त्याप्रमाणे मुद्दा क्र.५ च्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. प्रत्यक्षात तक्रारदार यांना माहिती उपलब्ध होण्यापेक्षा त्यांच्या इमारतीमधील नळ जोडणीच्या संदर्भात व त्यांच्या घराच्या गच्चीवर जो पाईप दिलेला आहे तो बंद न करता तो अजूनही सुरु आहे व त्या संदर्भात काय कारवाई केली याबद्दलची त्यांना माहिती हवी आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, अवैध नळ जोडणी घेतलेली आहे व त्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता हे कोणतीही कारवाई करीत नाहीत व हीच त्यांची मूळ तक्रार आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असलली माहिती मिळवता येते परंतु कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन ती दिली जात नाही. त्यामुळे अवैध नळ जोडणीच्या संदर्भात आयोगाकडून कारवाई करुन मिळावी असे त्यांचे म्हणणे असल्यास आयोग हे तक्रार निवारण केंद्र नाही. असे असले तरी तक्रारदार यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.२४.८.०९ रोजीच्या अर्जासोबत २८.१.२००७ रोजीच्या दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात मुद्दा क्र.५ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ३.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३२६६७/तक्रार क्र. १२४४/का.१

श्री. बालचंद्र पिल्लाई जी.,
सन अँड सँड अपार्टमेंट,
२रा मजला, फ्लॅट नं.१,
जिल हिल बार जवळ, वाड चौकी,
नानी दमन, दमण-३९६ २१५. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा जनरल मॅनेजर,
महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन,
वाहन व्यवहार भवन, जेबीबी मार्ग, मुंबई. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २७.५.२००८
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१९.६.०७च्या अर्जान्वये माहिती उपलब्ध झाली नाही तसेच दि.२५.३.०८ च्या अपिल व तक्रारीच्या संदर्भातसुध्दा चुकीची माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकड दि.१३.६.०८ रोजी तक्रार केलेली आहे. तक्रारदार आज गैरहजर आहेत. गैरतक्रारदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये तक्रारदार यांना दि.१३.३.०८ रोजी जनरल मॅनेजर(एस अँड पी) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर पुन्हा दि.२०.६.०८ रोजी मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती त्या संदर्भातच उपस्थित केले आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा दि.२०.६.०८ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.ज्या अर्थी तक्रारदार गैरहजर आहेत त्याअर्थी त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ३.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/२९९४९/तक्रार क्र. १०९८/का.१

श्री. जयेश रतिलाल गंगर,
सी-१०१, प्रभात को.ऑप हौ.सो.लि.,
एस.पी.मुखर्जी रोड, ब्राम्हण सभेसमोर,
डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त,
ठाणे शहर, ठाणे. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १२.११.२००७
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार गैरहजर आहेत,गैरतक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार यांनी दि.१२.११.०७ रोजी त्यांच्या दि.८.१२.०७च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते. सदचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पोलीस उप अधिक्षक,गृह यांनी पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्याकडे हस्तांतरीत केलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते.

गैरतक्रारदार यांनी अर्जदार यांनी केलेल्या अपील अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी/पोलीस उप अधिक्षक(गृह), ठाणे (ग्रामिण) यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी दि.८.१२.०७ रोजी माहिती अधिकारान्वये केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही पोलीस आयुक्त ठाणे यांच्या कार्यक्षेत्राशी निगडीत असल्याने सदरचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पुढील कार्यवाहीसाठी त्यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याबाबत अर्जदारास कळवून अर्ज मा.पोलीस आयुक्त कार्यालय ठाणे(शहर) यांच्याकडे पाठविला असल्याचे दि.८.१२.२०१०च्या पत्रान्वये कळविले. कार्यालयाने उपलब्ध अभिलेख पडताळून पाहिले असता अर्जदार यांचा दि.८.१२.०७ रोजीचा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही, मात्र दि.२०.१.०९ रोाजी या कार्यालयात पोस्टाने पाठविलेला अर्ज दि.१२.२.०९ रोजी प्राप्त झाला, सदरची माहिती संकलीत करुन दि.३.३.०९ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा दि.१७.९.०९ रोजी रजिस्टर पोस्ट द्वारा केलेला अर्ज दि.१९.१०.०९ रोजी कार्यालयात प्राप्त झाला. तसेच अर्जदार यांनी शासकीय माहिती अधिकारी ठाणे(ग्रामिण) यांच्या कार्यालयात दि.२०.८.०९ रोजी केलेला अर्ज दि.२०.१०.०९ रोजी त्यांच्याकडे प्राप्त होऊन तो दि.२४.१०.०९ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झ ाला. सदरच्या दोन्ही अर्जाची माहिती सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक डोंबिवली पोलीस स्टेशन यांच्याकडून संकलीत करुन सदर माहिती अर्जदार यांनी रजिस्टर पोस्टाने मागणी केलेली असल्याने पोस्टाचे शुल्क रु.२५/- इकडील कार्यालयास भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कार्यालयाने जावक क्र.सपोआ/डों./केमाअ/२२३/२२५/०९ दि.१८.११.०९ रोजी तक्रारदारास कळविले होते. परंतु तक्रारदार अद्यापपर्यंत इकडील कार्यालयात हजर झाले नाहीत अथवा माहिती टपालाने पाठविण्यासाठी येणारा खर्च त्यांनी भरलेला नाही. त्यामुळे माहिती इकडील कार्यालयात देण्यास प्रलंबित आहे असा खुलासा आयोगाकडे त्यांनी सादर केलेला आहे. तोंडी युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारदार हे दिलेल्या पत्त्यावर रहात नाहीत त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३०२५६/तक्रार क्र. १०९७/का.१

श्री. जयेश रतिलाल गंगर,
सी-१०१, प्रभात को.ऑप हौ.सो.लि.,
एस.पी.मुखर्जी रोड, ब्राम्हण सभेसमोर,
डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१. **.... तक्रारदार**

<u>विरुध्द</u>

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहापूर विभाग, शहापूर,
जिल्हा ठाणे ग्रामिण. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २५.११.२००७
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार जयप्लास्ट यांनी दि.८.१२.०७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन दि.३.२.०५ रोजी पोलीसआयुक्त यांना दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली याबाबत माहिती मागीतलेली दिसून येते.सदरचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पोलीस उप अधिक्षक(गृह) यांनी उप विभागीय पोलीस अधिकारी शहापूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवलला दिसून यतो. अर्जाच्या अनुषंगाने दि.७.२.०८ रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मुरबाड यांनी अर्जदार यांना माहितीच्या संदर्भात रु.५५/-चा खर्च भरावा अस कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.९.२.०८ रोजी माहितीच्या संदर्भात पुन्हा रु.५५/- चा खर्च भरावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.१५.१२.०८ रोजी खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्या संदर्भातच तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.०७ रोजी तक्रार केली हाती. तक्रारीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे सादर केले असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३१२९/तक्रार क्र. ७१६/का.१

श्री. प्रद्योत गोविंद नवाथे,
राजबाग, ब्लॉक नं.२०५, दालूचंद को.ऑप.हौ.सो.,
भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एफ एन विभाग,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, मुंबई-४००००१. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २६.१०.२००९

जन माहिती अधिकारी, तक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२६.१०.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये दि.२३.६.०९ रोजी अपिल क्र.३७०५/०२ मध्ये अपील अर्जात केलेल्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी तक्रार केलेली दिसून येते. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना कलम ७८ अन्वये नोटीस दिलेली आहे त्या नोटीसच्या प्रती व प्रशासक नियुक्तीची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्दा क्र.३ च्या संदर्भात माहिती अर्जाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांकडे पाठवून अपिलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. मुद्दा क्र.४च्या संदर्भात विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग यांच्याकडे अपिलार्थी यांनी सहकार कायद्यानुसार दाद मागावी असे जे म्हटलेले आहे त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही करणे अपेक्षित नाही.त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे त्यांनी आयुक्त, सहकार यांच्याकडे तक्रार केलेली आहे परंतु सदरची तक्रार त्यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस एफ/ईन वार्ड यांच्याकडे पाठवून दिलेली आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन झालेले नाही. परंतु तक्रारदार यांनी जी कार्यवाही करावयाची आहे ती स्वतंत्रपणे सहकार अधिनियमाप्रमाणे करावयाची आहे असे नमूद केले आहे व त्याप्रमाणे सहकार अधिनियमाप्रमाणे केलेली तक्रार ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीपमाणे होत नसल्यामुळे त्याबाबत केलेल्या कारवाईबाबत कोणतेही अधिकार राज्य माहिती आयोगास नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३७०४७/तक्रार क्र.१२७१व १२७२/का.१

श्री. इंद्र बहादूर शर्मा,
१०, शर्मा चाळ, अंधेरी कुर्ला रोड,
कृष्णा नगर, मरोळ नाका, अंधेरी(पूर्व),
मुंबई-४०००५९. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
श्रीनिवास बगडका ज्युनियर कॉलेज ऑफ आट्र्स अँड कॉमर्स,
श्रीनिवास बगडका माग, जे.बी. नगर,
अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. .... **उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ७.१२.२००८
जन माहिती अधिकारी, तक्रारदार अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी व तक्रारदार दोघेही अनुपस्थित आहेत. तक्रारदार यांनी दि.१०.१०.२००८,३.१२.०८ आणि १८.१२.०८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत परंतु तक्रारीसोबत त्यांनी माहितीच्या अर्जाची प्रत दाखल केलेली नाही किंवा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणत्या प्रकारचे उत्तर दिलेले आहे त्याबाबतही काहीही दाखल केलेले नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/ /अपील क्रमांक ६९९३/२०१०

श्री.चंदु तुलसीदास पहुजा,
सी/२०३, ॲटलांटा को.ऑप.हौ.सो.,
एव्हर शाईन नगर, मालाड मार्वे लिंक रोड,
वलनाई व्हिलेज, मालाड(प.), मुंबई-४०००६४. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,
कक्ष क्र.६९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),
मुंबई-५.

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक पी विभाग,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,
कक्ष क्र.६९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),
मुंबई-५ **.** **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ३.४.२०१०
सुनावणीचा दिनांक : १६.१२.२०१०
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी दि.२१.८.०९ व दि.१६.११.०९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात आदेश देण्याची विनंती केली आहे. राज्य माहिती आयोगाकडे अपिल क्र.२०१०/४७०३/०२ या अपिलाची सुनावणी होऊन दि.३०.४.२०१० रोजी निर्णय झाला असून उप निबंधक यांनी प्रशासकास आदेश देऊन अपिलकर्ता यांना निरिक्षणासाठी नस्ती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे दि.१९.५.२०१० रोजी उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९(२)(अ) अन्वये आदेश काढून संस्थेने श्री.सी.टी.पहुजा यांना तत्कालीन निविदांची तपासणी घेण्याकरीता दफ्तर उपलब्ध करुन द्यावे व तसे केल्याचे अर्जदार व या कार्यालयास कळविण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर पुन्हा दि.१३.७.२०१० रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) यांनी उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग यांना, राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२०१० रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन आपल्या कार्यालयाने अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केली नसल्याची तक्रार राज्य माहिती आयोगाकडे केली आहे, तरी मा.राज्य माहिती आयुक्त यांच्याकडील दि.३०.४.२०१०च्या आदेशांच्या अनुषंगाने कार्यवाही करावी असे कळविलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी ॲटलांटा कोऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटीच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या संदर्भात या पूर्वीसुध्दा बंधपत्राच्या प्रति संचालक मंडळाने दाखल केलेल्या आहेत किंवा नाहीत याबद्दलची माहिती मागीतली होती व ती माहिती त्यांना दि.५.१.०९ रोजी उपनिबंधक,सहकारी संस्था यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर सस्थेने इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जे टेंडर्स मागविलेले होते त्या टेंडर्सच्या संदर्भात निरिक्षण करुन माहिती मिळावी याबद्दलसुध्दा माहिती मागीतलेली होती व त्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाचा वर नमूद केल्याप्रमाणे निर्णय आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांनी उपनिबंधक यांच्या आदेशांचे पालन झाले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकाडे तक्रारसुध्दा केलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुन्हा उपनिबंधक

सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी त्यांच्या दि.१९.५.२०१०च्या आदेशांचे पालन संस्थेच्या संचालक मंडळाने केलेले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम ७९(१) प्रमाणे त्यांना जे अधिकार आहेत त्या अधिकाराचा वापर करुन कारवाई करणे संयुक्तिक होईल. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च)व (त्र)प्रमाणे माहिती व माहितीचा अधिकार या दोन्ही संज्ञांच्या व्याख्येप्रमाणे कार्यालयात किंवा माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध होते. कोणत्याही अन्य अधिनियमाच्या अन्वये कारवाई करावयाची असल्यास त्याबाबत राज्य माहिती आयोगास आदेश देण्याची तरतूद नाही. असे असले तरी सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग,मुंबई यांनी त्यांच्या दि.१९.५.२०१० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ७९(२)(अ) प्रमाणे आदेशांचे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करुन अपिलकर्ता तक्रारदार यांना संस्थेची कागदपत्र विशेषत: टेंडर संदर्भातील कागदरत्र निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावीत.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ११.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५५१/अपील क्रमांक ६४४२/२०१०

श्री. अजय माळतकर,
नेताजी सुभाषचंद्र नगर, रुम नं.२,
जेरबाई वाडिया रोड, परेल,भोईवाडा,
मुंबई-४०००१२. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल,
मुंबई-४०००१२.

जन माहिती अधिकारी(वसाहत),
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल,
मुंबई-४०००१२. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(मिळकत)यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते:-

i)Information require of Mr.Nagraj N.Malatkar name in Sub-Tenant occupant of shop N०.२A in Vacant Land Tenancies on Municipal

Plot bearing C.S.No.७१४,७१८,७२० of Dadar Naigaon Div.Jerbai Wadia Road, Bhoiwada, Mumbai-४०००१२.

ii) The period of which the information is related from the years १९७२ to २०१०.

iii) Written and Copy of detail require of the information.

iv) Information is required by in person.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलबध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१२.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.७.१२.२०१० रोजी देण्यात आला असून वसाहत अधिकारी श्री.आर.बी.कवटे यांना मागीतलेल्या प्रकरणाच्या संदर्भात दुरुस्ती करुन अहवाल सादर करावा व माहिती आठवडयाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांची मंजुरी घेऊन उपलब्ध करुन द्यावी अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यानी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये निवासी व व्यापारी या तत्वावर जी दोन टेनामेंट्स आहेत त्यामध्ये त्यांची आजी श्रीमती सिताबाई नारायण मालतकर यांचे नाव होते परंतु एफ(द.)/८९१ च्या संदर्भात जे आदेश काढण्यात आले आहेत त्यामध्ये व्यापारी टेनामेंट्सच्या संदर्भात त्यांचे काका श्री.नागराज एन.मालतकर यांचे नाव आलेले आहे व ते कशाच्या आधारावर घेण्यात आले आहे त्याबद्दलची कागदपत्र त्यांनी मागीतलेली आहेत. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये वसाहत अधिकारी श्री.आर.बी.कवटे यांना योग्य त्या चुकांची दुरुस्ती करुन मंजुरी घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्येसुध्दा मिळकत विभागाने चुकीचे ॲनेक्स्चर निर्गमित केलेले आहे व त्यावरुनच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला असूनसुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा कोणतीही कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी ज्या मिळकतीच्या संदर्भात ही माहिती मागीतलेली आहे ती मिळकत ही एसआरए म्हणजेच झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये दि.२८.फेब्रुवारी,२०११ रोजी नष्ट करण्यात येणार आहे व त्यामुळे त्यांना ही माहिती तातडीने उपलब्ध झाल्यास योग्य ती पुढील कारवाई करता येइल असे त्यांनी पुढे सांगितले. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आज सुनावणीस गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कागदपत्र दाखल केलेली नाहीत. त्यामुळे आयोगाच्या नोटीसचा त्यांनी अवमान केलेला आहे. तत्कालीन किंवा विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे ते दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु आज जन माहिती

अधिकार गैरहजर असल्यामुळे व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.१०.२०१०च्या अर्जात मागीतलेली माहिती, प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे दुरुस्त करुन, व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) माहिती व्यक्तीश: उपलब्ध करुन घेण्याकरीता अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्याच्या दिवशी संबंधित विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपिलकर्ता यांच्या दि.११.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व आयोगापुढे ते सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये त्यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचे त्यांचे म्हणणे त्यांनी आयोगापुढे उपस्थित राहून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष मांडावे अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२७/अपील क्रमांक ६३४१/२०११/०२

श्री. विलास आसाराम साळवे,
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स नं.११८८२,
भांडुप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोर(पूर्व),
मुंबई-४०००७७.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोर(पूर्व),
मुंबई-४०००७७. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३०.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),एन वार्ड, घाटकोपर(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन जानेवारी-२००७ ते मार्च-२०१० पर्यंतच्या कालावधीत एकूण किती अर्थसंकल्प निधी मिळाला व त्या निधीतून कोणकोणती कामे करण्यात आली त्या कामांची नावे व पत्ते द्यावेत अशी एकूण १३ मुद्यांमधील माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.४.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी अर्थसंकल्पनिधीतून मागीतलेली माहिती ही विस्तृत

स्वरुपाची असल्याने व ती वार्ड क्र.१२३,१२४,१२५ मधील असल्याने या कार्यालयाशी संपर्क साधावा व त्यानंतर आपणास हवी असलेली माहिती रु.२/- प्रति प्रत याप्रमाणे पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१३.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.६.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्त्यांस १५ दिवसात माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.२०.६.२०१० काही मुद्यांच्या संदर्भात माहिती व इतर माहितीच्या संदर्भातील कागदपत्रांच्या संदर्भात अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु तरीही अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही व कोणताही पत्रव्यवहार मिळालेला नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.४.२०१० रोजी खर्चाचा भरणा करावा असे कळविले व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरसुध्दा खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ही दोन्ही पत्रे त्यांना मिळालेली नाहीत. त्यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली,द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली परंतु उपरोक्त खर्चाचा भरणा करावा याबद्दलची पत्रे मात्र मिळालेली नाहीत. या चारही पत्रांवरील पत्त्याचा विचार केल्यास अपिलकर्ता यांनी दिलेल्या पत्त्यावरच खर्चाचा भरणा करावा ही पत्रेसुध्दा पाठविलेली आहेत व त्यामुळे सदरची पत्रे अपिलकर्ता यांना मिळाली नाहीत असे जरी त्यांचे म्हणणे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी जावक क्रमांक देऊन ती पत्रे दिलेली आहेत. त्यामळे त्यांनी ती पत्रे पाठविलेली आहेत असे गृहित धरावे लागते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागीतलेली असल्यामुळे व त्यास छायांकित प्रतिचा खर्च व उपरोक्त खर्च रु.३१०+ रु.२४८० इतका कळविलेला असल्यामुळे त्यांनी त्या खर्चाचा भरणा करुनच माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती कळविली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२८/अपील क्रमांक ६३४२/२०११/०२

श्री. विलास आसाराम साळवे,
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स नं.११८८२,
भांडुप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,
भांडुप(प.), मुंबई-४०००७८.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,
भांडुप(प.), मुंबई-४०००७८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण) यांच्याकडे अर्ज करुन वार्ड क्र.१०४,१०६,१०७ व १११ बाबत वर्ष २००७ ते मे-२०१० या कालावधीतील कॉंक्रिटीकरण तसेच पेव्हरच्या संदर्भात एकूण १३ मुद्यांवर माहिती पत्रव्यवहार सर्वसाधारण टपालाने करावा असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते.अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती अतिशय विस्तृत व वेळखाऊ स्वरुपाची असून ती संकलीत करुन आपणास देण्यासाठी उपलब्ध कर्मचा-यांचा कामाचा वेळ खर्च पडणार आहे. त्यामुळे एखाद्या विशिष्ट कामाविषयी माहिती हवी असल्यास माहितीचे निरिक्षण करण्यासाठी कार्यालयीन वेळेत आपण सूचना देऊन प्रत्यक्ष भेटावे व आवश्यक

असल्यास माहिती सुचित करुन शुल्क भरल्यानंतर सदर माहिती आपणास उपलब्ध करुन देण्यात येइल व इतर दोन मुद्यांच्या संदर्भात प्रति पृष्ठ रु.२/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.२२.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०.७.२०१० रोजी देण्यात आला असून तो पुढीलप्रमाणे आहे - जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिलेले असल्यामळे सदरचे अपील अमान्य करण्यात आले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना दि.२५.६.२०१० चे पत्र मिळालेले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना टपाल दाखला घेऊनच सदरचे पत्र दिलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना इतर पत्रे मिळतात परंतु खर्चाचा भरणा करावा असे नमूद केलेले पत्र मात्र मिळत नाही. ते आयोगात त्यांच्या सर्वच अपीलांच्याबाबत याप्रकारे सांगत आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्या उत्तराप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१३१/अपील क्रमांक ६३४५/२०११/०२

श्री. संजय अर्जून पटेल,
बस्ताव मिस्किटा चाळ, एम.आय.डी.सी. रोड नं.११,
आर.सी.मारुती शाळेसमोर, अंधेरी(पूर्व),
मंबई-४०००९३. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,के-पूर्व विभाग कार्यालय,
गुंदवली, आझाद रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,के-पूर्व विभाग कार्यालय,
गुंदवली, आझाद रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी के/ई वार्ड, अंधेरी(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन श्री.काळे हे बुधवार दि.९.६.२०१० रोजी १२ ते १.३० वा. के/पूर्व विभाग कायालयातून मुळगांव, अंधेरी प्लॉट नं.७५ या जागेवरील घर तोडण्यास आले होते त्यावेळी म.न.पा.ने कोणती नोटीस दिली व तक्रार केल्याची प्रत देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी ३ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे

आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणेही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीस गैरहजर आहेत. मात्र त्यांचे प्रतिनिधी सुनावणीसाठी हजर आहेत. प्रतिनिधींना सदर प्रकरणाबाबत काहीही माहिती नाही व ते प्राधिकृत नाहीत व त्यांना कागदपत्रांचीसुध्दा माहिती नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. जन माहिती अधिकारी का गैरहजर आहेत याबद्दल त्यांनी आयोगापुढे काहीही कागदपत्र दिलेली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती व प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाप्रमाणे व प्रथम अपील क्र.एसीकेई/१४९३७/बीएफ दि.१७.८.२०१० च्या आदेशाप्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत व प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष करावा व तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १७.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१०६/अपील क्रमांक ६२६०/२०१०/०२

श्रीमती धवनी देसाई द्वारा तारिनीबेन देसाई,

नानिक निवास III, तळ मजला, फ्लॅट नं.२,
वार्डन रोड, मुंबई-४०००२६. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)शहर,
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४०००००८.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर-१,
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४०००००८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत व प्रस्ताव) शहरे-१ ई-वार्ड यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलली दिसून येते -

11. Kindly provide each and every correspondence (to and from) between Shyam CHS Ltd (at 51, Bhulabhai Desai Rd, Mumbai 400 026) and your ward office regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's, canopy and proposed Overhead Water Tank.
12. Kindly provide each and every correspondence (to and from) between your ward office and Shri Sachin Wairker (Licensed Surveyor / Architect) regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's. canopy and proposed Overhead Water Tank.
13. Kindly provide each and every correspondence (to and from) between Your ward office and any other Licensed Surveyor / Architect regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's, canopy and

proposed Overhead Water Tank to be carried at side Nanik Niwas III (Shyam CHS Ltd) situated at Bhulabhai Desai Rd, Mumbai – 400 026.

14. Kindly Provide each and every correspondence (to and fro) between your ward office and any other person / persons regarding the above mentioned proposal for regularization of repairs at site Nanik Niwas III (Shyam CHS Ltd) situated at Bhulabhai Desai Rd, Mumbai – 400 026.

15. Any other information available on the above "subject matter of information"

सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरिक्षण करण्याकरीता कळविण्यात आले असून निरिक्षणाकरीता कागदपत्रांच्या संदर्भात खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यानी दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांना "S.P.I.O. and Executive Engineer&B.P.)City-१ is directed to get the papers sent to L.O., checked" अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही काही कार्यवाही झालेली नसल्यामुळे व अपिलकर्ता यांना दिलेले उत्तर हे विधी विभागाकडे पाठविण्यासाठी समाविष्ट केले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि.२९.४.२०१० च्या अर्जामध्ये जी माहिती मागीतलेली आहे त्यापैकी मुद्दा क्र.४ मध्ये वार्ड ऑफीसने विभागाबरोबर किंवा अधिका-याबरोबर झालेली दुरुस्ती नियमित करण्यासंदर्भात झालेला पत्रव्यवहार तसेच सज्जा कनापी व पाण्याची टाकी या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत अशी मागणी केली आहे व ती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी पुढे युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की. त्यांना ज्यावेळेस निरिक्षणाकरीता नस्ती उपलब्ध करुन दिली त्यावेळेस त्या नस्तीमध्ये त्यांनी स्वत: दि.३१.१.२०१० रोजी दिलेली तक्रार समाविष्ट केलेली नव्हती. विधी विभागाकडे सदरची तक्रार अभिमत घेण्याकरीता पाठविणे आवश्यक होते ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात आली होती व त्यामुळे प्रथम अपीलीयअधिकारी यांनी सदरची कागदपत्र समाविष्ट करुन

विधी विभागाकडे पाठविण्याचे आदेश दिलेले होते. त्यानंतरही सदरची कागदपत्र त्यात समाविष्ट केलेली नाहीत हे निदर्शनास आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जी तक्रार करण्यात आली होती त्या तक्रारीमध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्या मुद्यांच्या संदर्भात विधी विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक होते. परंतु सदरच्या तक्रारीची प्रत ही त्या दुरुस्तीच्या संदर्भात आक्षेप घेणारी असल्यामुळे सदरची प्रत विधी विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आली नाही व हे मुद्दाम करण्यात आले आहे असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुनच अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात त्यांनी जी माहिती मागीतलेली होती त्यामध्ये सदरच्या तक्रारीचा समावेश नसल्यामुळे त्या तक्रारीची प्रत अद्यापपर्यंत त्यांना उपलब्ध झालेली नाही. आजही त्या नस्तीमध्ये ती नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात निरिक्षणाकरीता ज्यावेळेस त्यांना नस्ती उपलब्ध करुन दिली त्यावेळेस सदरच्या तक्रारीची प्रत आढळून आली नाही असे त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले होते. वास्तविक कोणत्याही इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जी नस्ती तयार होते त्या नस्तीमध्ये त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे ही समाविष्ट केली जातात. सदरच्या दुरुस्तीच्या संदर्भातील नस्ती ही पूर्वी तयार केलेली आहे व अपिलकर्ता यांनी दि.३१.१.२०१० रोजी जी तक्रार केलेली आहे ती तक्रार ही स्वतंत्रपणे दिलेली आहे. त्यामुळे ती त्या नस्तीमध्ये समाविष्ट झाली नसावी. परंतु त्यावर पुन्हा अपिलकर्ता यांनी सदरची तक्रार ही नस्तीमध्ये समाविष्ट झालेली आहे या संदर्भात त्यांनी महानगरपालिकंच्या कार्यालयाकडूनच पोच मिळाली आहे व त्यावरुनच सदरच्या तक्रारीची प्रत ही जाणीवपूर्वक त्या नस्तीमध्ये समाविष्ट केली गेली नाही असा त्यांचा आरोप आहे व त्याप्रमाणे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये - Missing papers to be put back - reasons/notings why they were out असा उल्लेख केलेला आहे. परंतु त्यामध्ये त्यांनी ३१.१.२०१० रोजी दिलेल्या तक्रारीचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही व तरीही त्यांनी जाणीवपूर्वक सदरची तक्रारीची प्रत नस्तीमध्ये ठेवण्यात आलेली नाही या कारणाकरीता जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी आयोगाकडे विनंती केलेली आहे. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कोणत्याही इमारतीच्या दुरुस्तीच्या संबंधीची जी नस्ती असते ती सबइंजिनिअर हाताळत असतात. माहिती अधिकारी हे असलेली माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात त्यामुळे सदरची तक्रारीची प्रत ही नस्तीत का समाविष्ट करण्यात आली नाही याबद्दल त्यांना काहीही सांगता येणार नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यावरसुध्दा दि.३१.१.२०१० च्या तक्रारीची प्रत ही विधी विभागाकडे पाठविण्यापूर्वी का समाविष्ट करण्यात आली नाही हा मुद्दा मात्र

अनिर्णितच राहतो व त्याबद्दल त्यांना तसे सांगता येणार नाही. मात्र एक बाब स्पष्ट दिसून येते की, माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपील मेमोमध्ये किंवा प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये ३१.१.२०१० च्या तक्रारीचा स्पष्टपणे उल्लेख दिसून येत नाही तर फक्त कागदपत्र समाविष्ट केलेली नाहीत अशाप्रकारचा उल्लेख आहे. परंतु कोणती कागदपत्र याबाबतचे स्पष्टीकरण नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागीतल्यावर जी माहिती कागदपत्रांमध्ये,अभिलेख्यांमध्ये उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती माहिती उपलब्ध होते. जी माहिती उपलब्ध नाही ती का उपलब्ध नाही या संदर्भात प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलामध्ये मुद्दा जरी उपस्थित केलेला असला तरी त्याबद्दलचे निश्चीत कारण जर जन माहिती अधिकारी यांना देता येत नसेल तर त्याकरीता जबाबदारी निश्चित करुनच त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देता येईल. कोणत्याही कार्यालयात कोणत्याही नस्तीबाबत एकच अधिकारी ती नस्ती हाताळत नसतात व त्यामुळे नस्तीमध्ये कागदपत्र नाहीत या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाविरुध्द राहील व त्यामुळे सदरच्या प्रकरणात जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व संबंधित विभागामध्ये ज्या ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचा नस्ती हाताळण्यामध्ये सहभाग असतो त्या सर्वांच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करण्याकरीता चौकशी करुन जबाबदारी निश्चित झाल्यावरच आयोगाने निर्णय देणे योग्य होईल.त्यामुळे आयुक्त महानगरपालिका यांनी चौकशी अधिकारी नेमून चौकशी करुन आयोगास अहवाल सादर करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपीलावर अंतरिम आदेश पारित करणे संयुक्तिक राहील.

अंतरिम आदेश

१) मा.आयुक्त महानगरपालिका यांनी सदरच्या प्रकरणामध्ये चौकशी अधिकारी नियुक्त करुन अर्जदार अपिलकर्ता यांनी तक्रार केल्याप्रमाणे फाईल क्र.ईबी/४८६०/डी/ए Regarding proposed Regularization of additions/alterations and Major repairs at Nanik Niwas ३, Bhulabhai Desai Road, Mumbai-२६ C.S.No.६८५,Malabar Hill Division, Shyam Co. Hsg. Society Ltd. च्या संदर्भात नस्तीमध्ये जाणीवपूर्वक विधी विभागाच्या अभिप्रायासाठी पाठविलेल्या नस्तीमध्ये अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारीची प्रत किंवा इतर कागदपत्र समाविष्ट न करण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करावी व आयोगाकडे अहवाल १५ दिवसाच्या आत सादर करण्यात यावा.

२) सदरच्या निर्णयाची १ प्रत आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३२१/अपील क्रमांक ६४१५/२०१०/०२

श्री.शेख मुरादजी शाहजहाँ,
मितला धाम,जरी वर्गीस टर्मट कंपनीच्या समोर,
वॉटर टँक रोड, प्लॉट नं.२५६, मालाड(पूर्व),
मुंबई-४०००९७. **.....** **अपिलकर्ता**

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,

बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणाची सुनावणी दि.२८.२.२०११ रोजी सकाळी १०.३० वाजता ठेवण्यात आली होती परंतु त्यावेळेस कोणीही हजर नव्हते म्हणून सदर सुनावणी पुन्हा दुपारी २.०० वाजता ठेवण्यात आली. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर होते. सदर प्रकरणाची चौकशी केली असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय दि.२०.१०.२०१० रोजी दिलला दिसून येतो. त्या निर्णयाचे अवलोकन केले असता व जन माती अधिकारी यांच्याशी चर्चा करतांना अर्जदाराचे उत्तर तयार असून अपिलार्थिनी ते व्यक्तीश: मागीतले होते त्यामुळे ते पोस्टाने पाठविले नाही असे त्यांनी सांगितले. अपिलार्थिना १० दिवसाच्या आत माहिती व्यक्तीश: देण्यात यावी असे आदेश देऊन सदर अपील निकाली काढण्यात आलेले आहे असे दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने अर्जदाराने या आयोगासमोर द्वितीय अपील सादर केले. वास्तविक पहाता अर्जदाराने मागीतलेली माहिती ही जर तयार होती तर अर्जदार अपिलार्थी हे सुनावणी दरम्यान उपस्थित होते तेव्हा त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्यासमोर समक्ष माहिती का पुरविली नाही व पुन्हा १० दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असे आदेश देण्याचे कोणतेही कारण दिसत नाही.

तसेच अर्जदाराने मागीतलेली माहिती ही १७ मुद्यांमध्ये असून त्याबद्दल प्रथमअपीलीय अधिकारी यांनी सदर मुद्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण घेऊन प्रत्येक मुद्यावर मुद्देसुद माहिती देणे अपेक्षित होते. परंतु या आयोगासमोर दाखविलेल्या उत्तरावरुन निश्चितच समाधानकारक उत्तर जन माहिती

अधिकारी यांनी दिलेले नाही व ब-याच मुद्यांची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे म्हटलेले आहे. वास्तविक ही माहिती महानगरपालिकेशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्येक मुद्याबाबत स्पष्टीकरण किंवा माहितीबाबत स्पष्ट उल्लेख असावयास पाहिजे होता. म्हणून सदर पकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२०.१०.२०१० रोजी दिलेला निर्णय हा रद्दबातल ठरविण्यात येत आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, दि.१६.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सुनावणी घेण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याबाबत उपलब्ध असलेली माहिती किंवा त्याबाबतचे स्पष्टीकरण लेखी स्वरुपात प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दाखल करावे.प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याचे अवलोकन करुन दिलेली माहिती बरोबर आहे किंवा नाही ते तपासून योग्य ते आदेश पारीत करुन त्याची प्रत अर्जदाराला उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर द्वितीय अपील ९० दिवसाच्या आत करु शकतात. यास्तव खालील आदेश पारित करुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) दि.२०.१०.२०१० रोजी पारित केलेले अपील क्रमांक २८२५४ चे आदेश रद्दबातल करण्यात येत आहेत.

२) प्रथम अपीलीय अध्किारी यांनी दि.१६.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता अर्जदाराच्या दि.२७.९.२०१० च्यामूळ अपील अर्जाच्या संदर्भात सुनावणी ठेवावी व माति अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान मुद्देसुद लेखी निवेदन दाखल करावे. त्याची प्रत अपीलीय अधिका-यांसमोर अर्जदारास देण्यात यावी व अर्जदाराचे संपूर्ण म्हणणे ऐकून योग्य ते आदेश त्यानंतर ८ दिवसांच्या आत पारीत करावे व त्याची १ प्रत अर्जदाराला अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी.

३) त्यानंतरही अर्जदाराचे समाधान झाले नाही तर अर्जदार ९० दिवसाच्या आत या आयोगासमोर द्वितीय अपील दाखल करुन शकतो.

मुंबई **(भास्कर पाटील)**

दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३१६/अपील क्रमांक ६४११/२०१०/०२

श्री.महम्मद हमीद शेख(समाजसेवक सतर्क नागरीक),
नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,एमएमआरडीए,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, वांद्रे,मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,एमएमआरडीए,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, वांद्रे,मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रपत्र-अ मध्ये अर्ज करुन माहिती मागीतलेली दिसून येते. त्यात सदर प्रकरणी ठेकेदार किती आहेत, त्यांची नावे, त्यांच्या लायसेन्सच्या संबंधात माहिती इत्यादीबाबत अर्जदाराला कळविण्यात आले आहे व त्यानुसार अर्जदाराला पैशाचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अर्जदाराला दिलेल्या उत्तरास लागलेला अवधी विचारात घेता अर्जदाराला माहिती विनाशुल्क पुरविण्याचे आदेश या आयोगाने दिले. अर्जदाराला या आधी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अर्जदारास आणखी माहितीची आवश्यकता होती व त्याबाबत अर्जदाराला माहिती अधिकारी यांनी १० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले व सदरची माहिती विनामुल्य,अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पुरविण्यात येईल असे मान्य केले आहे. यास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

यानंतरही अर्जदारास काही अडचण असल्यास ते या आयोगासमोर या अधिनियमाच्या कलम १८ खाली तकारवजा अर्ज सादर करु शकतात.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३१७/अपील क्रमांक ६४१२/२०१०/०२

श्री.महम्मद हमीद शेख(समाजसेवक सतर्क नागरीक),
नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
३रा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
३रा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १०.८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी प्रपत्र अ मध्ये दि.१०.८.२०१० रोजी अर्ज करुन माहिती मागीतलेली आहे. मागीतलेली माहिती मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ म्हाडा द्वारा होनेवाले विकास कार्यक्रम के बारेमे तसेच राज नंदिनी लेबर सहकारी संस्था,मर्यादित या संस्थेचे मुख्यप्रवर्तक वगैरे बाबतची माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जदारास कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी दि.१८.९.२०१० रोजी पत्र पाठविले व राज नंदिनी लेबर सहकारी संस्था यांनी कोणकोणती विकास कामे पूर्ण केली आहेत व कोणत्या फंडातून ती पूर्ण केली आहेत व कामे सुरु होण्याचा व संपल्याचा कालावधी याबाबतची माहिती कळविलेली दिसून येते. परंतु सदर लेबर सहकारी संस्थेचे पंजीकरण करतांना मुख्य प्रवर्तक कोण होते तसेच त्यांचे सदस्य कोण होते याबाबतची माहिती (डीडीआर) तसेच अध्यक्ष,काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पूर्व उपनगरे-२, कोकण भवन,सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधीत असून माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे तरी याबाबत संबंधित कार्यालयाकडे संपर्क साधावा असे अर्जदारास कळविलेले दिसून येते व त्याकरीता सदर पत्राची प्रत डीडीआर,काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पूर्व उपनगरे-२ कोकण भवन,सीबीडी बेलापूर,नवी मुंबई यांना पाठविण्यात आलेली आहे. अर्जदारास उर्वरित माहिती मिळाली असून फक्त सदर संस्थेच्या पंजीकरणाबाबत माहिती मिळालेली नाही म्हणून डीडीआर-अध्यक्ष, काम वाटप समिती यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी संबंधित संस्थेबद्दलची माहिती अर्जदारास अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर व कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी दि.१८.९.२०१० च्या पत्राच्या अनुषंगाने निर्देशित केलेली माहिती अर्जदारास हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामुल्य नोंदणीकृत डाकेने पाठवावी. माहिती उपलब्ध नसल्यास तसे अर्जदारास कळवावे. तसेच सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी कोण असतील याबाबतची माहितीही कळवावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर अधिनियमाच्या कलम १८ खाली तक्रारवजा अर्ज करु शकतात. वरील आदेश देऊन सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २८.२.२०११

(भास्कर पाटील)
प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३२७/अपील क्रमांक ६४१७/२०१०/०२

श्री. अशोक कुंचीकोरवे,
एम.पी.नगर,घोरवाडा,
रुम नं.बी.८०, धारावी क्रॉस रोड,
मुंबई-४०००१७ ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परि.६, ४था माळा,
प्रशासकीय इमारत, आरसी मार्ग,
चेंबूर, मुंबइ-४०००७१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पूर्व प्रादेशिक विभाग,
चेंबूर, मुंबई-७१. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११

अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी प्रपत्र-अ नुसार दि.१२.७.२०१० रोजी प्रशासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, अप्पर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,चेंबूर, मुंबई यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन एकूण ८ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. त्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार अर्जदाराचे समाधान न झाल्याने अर्जदाराने दि.९.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,परिमंडळ-६, ४था मजला, प्रशासकीय इमारत,आरसी मार्ग, चेंबुर, मुंबई-७१ यांच्याकाडे प्रथम अपील दाखल केले. अर्जदाराचे मिळालेल्या माहितीने समाधान झालेले नाही. अर्जदारास द्यावयाची माहिती नष्ट करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.७.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व दि.९.९.२०१० रोजी आदेश पारित करण्यात आले. सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी पोलीस निरिक्षक श्री.जाधव सुनावणीस उपस्थित होते. अपीलार्थी यांना पत्रान्वये कळवूनही ते सुनावणीस गैरहजर होते. अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे शासकीय माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली आहे परंतु कागदपत्रांचा दस्तऐवज नियमाप्रमाणे नष्ट केल्यामुळे पोलीस ठाणेस मागणी केलेली कागदपत्र उपलब्ध नसल्याचे त्यांना कळविण्यात आले आहे. अर्जदार सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांना माहिती कोणत्या नस्तीच्या आधारे दिलेली आहे ते स्पष्ट झाले नाही. अर्जदाराला उत्तर दिले असल्याच्या कारणास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात आले आहे.

त्यानंतर अर्जदाराने या आयोगासमोर दि.९.११.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्या अपिलात प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांचे अपील क्र.४३०५ /१०, दि.९.९.२०१० चे आदेश सुनावणी न घेता व चुकीचे आदेश दिले असे नमूद केले आहे व वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी दिलेली माहिती खोटी/अपुरी आहे म्हणून संबंधीतांविरुध्द कार्यवाही करुन अर्जदाराला दस्तऐवज देण्याबाबतचे आदेश द्यावेत असे म्हटले आहे.

सदर सुनावणीस अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत,जन माहिती अधिकारी हजर आहेत. त्यांनी त्यांच्यातर्फे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. दिलेल्या लेखी खुलाशानुसार अर्जदाराने विक्रोळी पार्कसाईट पोलीस ठाणे येथे दि.१३.४.०७ व दि.२५.९.०७ रोजी ज्या तक्रारी दाखल केलेल्या आहेत त्या संबंधीचा चौकशी अहवाल तसेच हस्तगत केलेली क्वालीस मोटरकार एमएच-०४ बीडी १७२१ चे दस्तऐवज व अपीलकार यांना विकलेल्या सदर गाडीच्या करारनाम्याची सत्यप्रत मिळणेबाबत नमूद केले आहे. तसेच मानवी हक्क आयोग केस क्र.बीजीएक/०४/२००८-०९ मध्ये सादर

केलेला अहवाल व दस्तऐवजांची नक्कल प्रत मिळणेबाबत नमूद केले आहे. सदर निवेदनात असे सुध्दा नमूद केले आहे की, तक्रार अर्ज व चौकशीची कागदपत्र मुदत संपल्याने नष्ट करण्यात आली असल्याने व मानवी हक्क आयोगास अहवाल सादर करण्यात आल्याने व पोलीस ठाणे अभिलेखावर अहवाल उपलब्ध नसल्याने अर्जदार अपिलकर्ता यांनी मागीतलेली कागदपत्र देण्यात आलेली नाहीत.

सदर प्रकरणी अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे जर सदर कागदपत्र नियमानुसार नष्ट करण्यात आली असतील तर या संबंधीचे कागदपत्र किंवा रजिस्टर मधील नोंदी याबाबतची माहिती अर्जदाराला हवी आहे व ती देण्याची जबाबदारी संबंधीत वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस स्टेशन यांची आहे. तरी वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस स्टेशन यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी अर्जदार स्वत: निरिक्षणासाठी आल्यास या नष्ट केलेल्या अभिलेखासंबंधीची माहिती त्यांना प्राप्त करुन द्यावी. जर अशाप्रकारची मूळ अभिलेखातील रजिस्टर मधे नोंदी घेतलेल्या नसतील तर अर्जदाराला तसे लेखी कळवावे. अर्जदाराला अशाप्रकारची लेखी माहिती न मिळाल्यास अर्जदार या आयोगासमोर त्याप्रमाणे लेखी तक्रार माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १८ खाली करु शकतात.

त्याचप्रमाणे सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, अर्जदाराची तक्रार दि.१३.४.०७ व २५.९.०७ च्या अनुषंगाने चौकशी अहवाल हा मानवी हक्क आयोगाच्या प्रकरणात दाखल करण्यात आलेला आहे. तरी या संबंधी अर्जदाराने अर्जदाराचे प्रकरण चालू असल्यास तशाप्रकारे अर्ज करुन सदर मूळ अभिलेखाचे निरिक्षण मागवावे किंवा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार माहिती मिळण्यासाठी अर्ज करावा व माहिती मिळवावी. यास्तव खालील आदेश पारित करुन सदाचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी अर्जदाराच्या दि.१३.४.०७ व २५.९.०७ च्या तक्रारीच्या संबंधाने सदरची कागदपत्र नष्ट केल्याबाबत त्यांच्याकडे नियमानुसार नोंद असल्यास, त्याबाबतची माहिती अर्जदाराने मागीतल्यास ती त्यांना पुरवावी. जर कागदपत्र नष्ट केल्याची नोंद नसेल तर तशाप्रकारे लेखी उत्तर अर्जदाराला देण्यात यावे.

वरील आदेश देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(भास्कर पाटील)**

Gawas/feb 2011

दिनांक २८.२.२०११ प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

प्रत - वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३१८/अपील क्रमांक ६४१३/२०१०/०२

श्री. महम्मद हमीद शेख(समाजसेवक-सतर्क नागरिक),
नेहरु नगर, चाळ क.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व),
मुंबई-४०००५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
जी/उत्तर विभाग विभाग कायालय, पहिला मजला,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),
मुंबई-४०००२८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),
दादर, जी/उत्तर विभाग कायालय,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),
मुंबई-४०००२८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदाराने दि.१६.८.२०१० रोजी केलेल्या अर्जानुसार मागीतलेली माहिती अर्जदाराला मिळाली परंतु खाली नमूद केलेली माहिती मिळालेली नाही-

एक) ज्या कंपन्यांची माहिती मागीतलेली आहे त्या कंपन्यांनी ए.एस.बी.भरलेली डिपॉझीट सह चलान क्रमांक

दोन) एफ.एम.डी. डिपॉझीट चलान क्रमांक व रिटर्न मनीसह चलान क्रमांक देण्यात यावे

उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार सदरची माहिती उपमुख्य अभियंता(नियोजन),बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयामार्फत जन माहिती अधिकारी हे ८-१० दिवसात विनामुल्य, अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन दतील. त्यानंतरही अर्जदाराला माहिती घेण्यासाठी काही अडचण असल्यास अर्जदाराला या आयोगासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ खाली लेखी तक्रार करता येईल. वरील आदेश देऊन सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(भास्कर पाटील)**

दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२४३८/तक्रार क्र. १६४१/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
नगर विकास विभाग, नवि-२०,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ६.९.२०१०
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.६.९.२०१० रोजी त्यांच्या दि.२६.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/नगर विकास विभाग, मंत्रालय यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी शासन निर्णय निमसरकारी कार्यालये म्हणजे नगरपालिका आणि नगरपरिषदा व इतर मंडळे/महामंडळे याविषयी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली होती-

१) राज्य शासनाने प्रसुतीच्या संदर्भात जे नियम केलेल आहेत तेच नियम महानगरपालिका कर्मचा-यांना लागू का करण्यात आले नाहीत याबद्दलची माहिती द्यावी.

२) तसेच महानगरपालिका व नगरपालिका यांच्यामध्ये प्रतिनियुक्ती पदासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य अधिकारी तथा आयुक्त अथवा प्रशासक म्हणून आपल्या विभागातील कर्मचारी यांना पाठविण्यात येते अशा स्थितीत आयुक्त,प्रशासक,मुख्याधिकारी हे शासनाच्या निर्णयानुसार प्रशासकीय ठराव त्या त्या नगरपालिका,महानगरपालिका,नगरपरिषदेमध्ये मांडत नसल्यामुळे ते कोणत्या नियमामुळे राज्य शासनाच्या निर्णयाचा अवमान केला म्हणून शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतात त्याची माहिती द्यावी.

ही माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, सदर प्रकरण माझे पूर्व अधिकारी तथा राज्य माहिती अधिकारी श्री. आर.एस.घाडगे यांच्या काळातील असून सदर प्रकरणी तक्रारदार श्री.डोळस यांच्या ६.९.२०१०च्या अर्जास अनुसरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याचे सांगितले.

श्री.डोळस यांच्या अर्जातील सर्व मुद्यांच्या संदर्भात दि.१०.८.२०१० रोजी माहिती कळविण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी मागीतलेली माहिती ही राज्यातील २२६ नगरपरिषदा व २३ महानगरपालिका यांच्याशी संबंधीत आहे. या सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा या सार्वजनिक प्राधिकरण असल्यामळे त्यांच्याकडून ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. मंत्रालयात अशाप्रकारची कोणतीही माहिती उपलब्ध नसते. महानगरपालिकेचे कामकाज मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार चालते. या अधिनियमातील प्रकरण ४, कलम ४५ येथे नमूद केल्यापमाणे महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक व सेवेच्या शर्तीबाबत तरतूद आहे तर नगरपरिषदांचे कामकाज महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम,१९६५ नुसार चालते. या अधिनियमातील प्रकरण पाच, कलम ७५ येथे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नेमणुकीसंबंधी तरतूद आहे. सदर अधिनियमांच्या प्रती शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई येथे उपलब्ध आहेत. मुद्दा क्र.४ च्या संदभात कोणतीही बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही. मुद्दा क्र.५ रजेच्या संदर्भातील धोरण हा वित्त विभागाशी संबंधीत आहे त्यामुळे वित्त विभागाकडे तो हस्तांतरीत करण्यात आला आहे. तक्रारदार यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता तक्रारदार यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती राज्यातील महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या कायद्याप्रमाणे ज्या स्थापन झालेल्या महानगरपालिका व नगरपरिषदा आहेत त्यांच्या स्तरावरील माहिती आहे. महानगरपालिका व नगरपरिषदा या स्वायत्त संस्था आहेत. शासनाने जरी कोणतेही नियम केले असले तरी जोपर्यंत महानगरपारिला व नगरपरिषदा त्यांच्या बैठकीत सदरच्या नियमाच्या संदर्भात निर्णय घेत नाहीत तोपर्यंत कोणतेही अधिकारी यांना तो निर्णय लागू करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे तक्रारदार

यांनी शासनाच्या प्रस्तुत नियमाच्या संदर्भात जी माहिती मागीतलेली आहे त्या संदर्भत प्रत्येक महानगरपालिका व नगरपरिषदांना ते नियम अंमलात आणण्याचा निर्णय घेतला असल्यासच अधिकारी किंवा कर्मचारी त्याबाबत अंमलबजावणी करु शकतात. त्यामुळे सदरची माहिती प्रत्येक महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्याकडे स्वतंत्रपणे मागणे संयुक्तिक राहील. यास्तव तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/१७९९/तक्रार क्र. १६५०/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रिअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
सहकार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ५.७.२०१०
तक्रारदार उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.९.२.२०१० च्या सहकार विभागात केलेल्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या दि.९.२.२०१०च्या अर्जात सहकार विभागाने बंधपत्रासंबंधी बनविलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. परंतु त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. आज सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार विभाग,मंत्रालय,मुबई हे हजर नाहीत. यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते व त्यामुळे संबंधित जन माहितीअधिकारी तथा कक्ष अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापूी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्रआहे.

आदेश

१) तक्रारदार यांच्या दि.९.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तसेच तक्रारीच्या सुनावणीससुध्दा जन माहिती अधिकारी उपस्थित राहिले नाही म्हणून अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द रु.५०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगाकडे समक्ष करावा. तसे न केल्यास रु.५०००/-ची शास्ती कायम करण्यात येऊन ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/तक्रार क्र. १६४९/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त प्रशासन,
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
ठाणे. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १५.७.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे यांच्याकडे अर्ज करुन, स्वसंरक्षणासाठी रिव्हॉल्वर/पिस्तोल परवाना नाकारतांना जी कलमे,कारणे नमूद असतात त्याची व सशुल्क पोलीस संरक्षण पुरवलेल्या व्यक्तींबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.६.२०१० रोजी मुद्दा क्र.१च्या संदर्भात नियमावली बाजारात उपलब्ध असल्यामुळे ती पुरविण्याची आवश्यकता नाही तसेच मुद्दा क्र.२ बाबत दि.२४.१०.२००५ भाग ४(अ) अन्वये माहिती गोपनीय असल्याने ती आपणास पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच इतर मुद्यांच्या संदर्भातही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.निरंक अन्वये देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आले आहे. मात्र तक्रारदार यांनी द्वितीय अपील दाखल न करता आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्या संदर्भात शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,ठाणे यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, अर्जदार यांनी

मागणी केलेले त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ व २(ब) ची माहिती पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखेशी संबंधीत असल्याने ती संकलीत करुन देण्याबाबत इकडील कार्यालयातून दि.१२.६.२०१० रोजी पत्र देण्यात आले. त्यात मुद्दा क्र.२,३,४ व ५ बाबतची माहिती विशेष शाखेशी संबंधीत असल्याने ती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले आहे. परवाना शाखा यांच्याकडील दि.१९.६.२०१० व विशेष शाखा यांच्याकडील दि.२९.६.२०१० अन्वये माहिती प्राप्त झाल्याने तक्रारदार यांना दि.३०.६.२०१० अन्वये विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आलेली होती. मात्र विशेष शाखा ही अधिनियमाच्या कलम २४(४) नुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होण्यापासून वगळण्यात आली असल्यामुळे विशेष शाखेची माहिती मात्र त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांनी कळविले होते.परंतु तरीसुध्दा अपिलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार कलेली आहे. त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, पोलीस आयुक्तालय सोलापूर यांनी मात्र विशेष शाखेच्या संदर्भात दि.२१.१.२०११ रोजी संपूर्ण माहिती त्यांना दिलेली आहे व त्यामुळेच तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, इतर सर्व पोलीस आयुक्तालये जर माहिती देत आहेत तर ठाणे पोलीस आयुक्तालय किंवा ठाणे(ग्रामिण) यांनी मात्र ती विशेष माहिती आहे म्हणून देता येत नाही हे कळविलेले आहे ते योग्य नाही. त्याकरीता तक्रारदार यांनी पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर यांच्याकडून मिळालेली माहिती आयोगाच्या निदर्शनास आणली व त्यामुळे तक्रारदार यांनी ठाणे शहरातील किती व्यक्तींना ठाणे पोलीस आयुक्त यांनी सशुल्क पोलीस संरक्षण दिले याबद्दलची माहिती व इतर अनुषंगिक माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता त्यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन ठाणे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत तक्रारदार यांना त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना पोलीस आयुक्त, सोलापूर यांनी ज्याप्रमाणे विशेष शाखेकडून विशिष्ट व्यक्तींना संरक्षण दिल्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्याचप्रमाणे ठाणे आयुक्त कार्यालय यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/१७६८/तक्रार क्र. १६४८/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २९.६.२०१०
तक्रारदार, गैरतक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२९.६.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.७.५.२०१० च्या आरोग्य विभागातील माहिती अधिका-यांकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील मनोरुग्णालयाच्या संदर्भात महाराष्ट्रामध्ये एकूण किती मनोरुग्णालये आहेत, ती कोठे आहेत त्या रुग्णालयातील साफसफाईचा ठेका देणे व तो ठेका मंजूर करणे यासाठी कोण अधिकारी नियुक्त आहेत, ठेका देण्यामध्ये नियमबाह्यता असल्यास कोणत्या सक्षम अधिका-याकडे दाद मागावी याबद्दलची माहिती तसेच त्या संदर्भात एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१७.६.२०१० रोजी मुद्दा क्र.१ बाबत राज्यात एकूण ४ शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालये आहेत. सदर मनोरुग्णालये ठाणे,पुणे, रत्नागिरी आणि नागपूर येथे आहेत. तसेच मुद्दा क्र.२ ते ७ बाबतची माहिती आपण संबंधित प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांचेकडून घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याचप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.३.७.२०१० रोजी त्यांच्या एकूण ८ मुद्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,प्रादेशिक मनोरुग्णालय,ठाणे यांच्याकडून माहिती उपलब्ध झाली. परंतु पुणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयातील माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी मंत्रालयातील सार्वजनिक आरोग्य विभागात माहिती मागीतली होती. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२,३ ते ८ पर्यंतची माहिती ही त्या त्या मनोरुग्णालयाच्या स्तरावरची आहे आणि प्रत्येक मनोरुग्णालय हे सार्वजनिक प्राधिकरण

असल्यामुळे त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. तक्रारदार यांनी त्यांच्याकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरची तक्रार अंशत: मान्य करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यानी मनोरुग्णालये- पुणे,रत्नागिरी,नागपूर येथून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ ते ८च्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी सदरचा माहितीचा अर्ज ३ मनोरुग्णालयांना(पुणे,रत्नागिरी,नागपूर)हस्तांतरीत करावा.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना सदर आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९६४/तक्रार क्र. १६३७/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,

जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. **.... गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ४.११.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.४.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या माहितीचा अर्ज दि.९.७.२०१० प्रमाणे माहिती प्राप्त झाली नाही म्हणून तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयातून तक्रारीच्या चौकशीकरीता नोटीस काढण्यात आली होती. माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.वानखेडे यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये तक्रारदार यांनी के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरीग,ठाणे(पूर्व) या संस्थेच्या अनुषंगाने माहिती मागीतली होती. सदर माहिती ही एका खाजगी शैक्षणिक संस्थेची असल्याने या माहितीशी निगडीत कागदपत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडे उपलब्ध नाही. परंतु या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या तंत्रशिक्षण संचालनालयाशी सदर माहिती निगडीत असल्यामुळे याबाबतची माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना दि.३.९.२०१० रोजी कळविण्यात आले होते. अर्जदाराने केलेल्या अपीलावर दि.२५.११.२०१० रोजी मंत्रालयात सुनावणी झाली. सदर सुनावणीस सहाय्यक जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय श्री.मोहिते उपस्थित होते. सुनावणीनंतर अर्जदार कार्यालयात आले परंतु त्यावेळी माहिती तयार नव्हती. अर्जदाराने माहिती व्यक्तीशः घेऊन जातो असे सांगितले. त्यानंतर दि.२५.११.२०१० रोजी माहिती तयार ठेवण्यात आली होती. परंतु अर्जदारास दि.१४.२.२०११ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे असा खुलासा त्यांनी आयोगापुढे दिलेला आहे. तंत्र शिक्षण संचालनालयाचे माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग हे विनाअनुदानित महाविद्यालय आहे व विनाअनुदानित महाविद्यालयांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे त्या संस्थेच्या संदर्भातील माहिती ही उपलब्ध होऊ शकत नाही. मात्र तंत्र शिक्षण संचालनालयाकडे जी माहिती आहे ती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

५) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२८१३/तक्रार क्र. १६३८/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्टीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.)

पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १६.१०.२०१०
तक्रारदार, गैरतक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१६.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,गृह विभाग यांनी त्यांच्या दि.८.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे कम १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, पोलीस विभागामार्फत ठाणे शहर भागात रहाणा-या व्यक्तीस पोलीस संरक्षण जे सशुल्क पुरविले गेले आहे त्यापोटी आजमितीपर्यंत एकूण किती थकबाकी सशुल्क पोलीस संरक्षण वापरणारे/घेणा-या व्यक्तींनी दिलेली नाही याची माहिती त्या सर्व रकमेच्यासह व इतर अनुषंगिक माहिती ८ मुद्यांमध्ये मागीतलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदर अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी मागणी केलेली माहिती ही पोलीस आयुक्त बृहन्मुंबई,पोलीस आयुक्त-ठाणे व पोलीस अधिक्षक-ठाणे(ग्रामिण) यांच्याशी संबंधीत असल्याचे आढळून आल्यामुळे अधिनियमाच्या कलम ६(३) अनुसार त्यांच्या अर्जाच्या प्रती १३.७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे उपरोक्त ३ कार्यालयांकडे पाठविण्यात आल्या. परंतु दि.२.८.२०१० रोजीच्या अर्जाद्वारे अर्जदार यांनी पोलीस आयुक्त-ठाणे यांनी आवश्यक ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे कळविले. सदर माहिती गोपनीय असल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४.१०.०५,भाग-४(अ) अन्वये ती पुरविता येत नाही असे पोलीस आयुक्त,ठाणे यांनी त्यांचे पत्र दि.३०.७.२०१० रोजी त्यांना कळविले आहे. त्यानंतर अर्जदार यांनी दि.६.९.२०१० रोजी एक स्वतंत्र अर्ज केला होता. त्यात पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई कार्यालय यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविलेली आहे. तथापी पोलीस आयुक्त ठाणे तसेच पोलीस अधीक्षक ठाणे(ग्रामिण) यांच्याकडील माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्याबाबत पुन्हा अर्जदार यांनी असे सांगितले की, पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांच्याकडुन जी माहिती प्राप्त होते ती पोलीस आयुक्त,ठाणे किंवा पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामिण यांच्याकडून प्राप्त होत नाही व ती गोपनीय आहे असे कळविले जाते हे विसंगत आहे व ती माहिती गृह विभागाकडून पुरविण्यात यावी असे त्यांनी नंतरच्या अर्जात कळविले होते. कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी पुढे युक्ती वाद करतांना सांगितले की, अर्जदाराचा अर्ज ३ कार्यालयांकडे पाठविण्यात आला होता. त्यानंतर मात्र अर्जदाराने प्रथम अपील दाखल केलेले नाही व कक्ष अधिकारी यांच्याकडे ते अर्जातील माहिती मिळावी अशी मागणी करीत आहेत. तक्रारदार यांना जी माहिती उपलब्ध झाली नाही त्या संदर्भात ठाणे अधीक्षक व पोलीस अधीक्षक-ठाणे ग्रामिण यांच्या पत्राचे अवलोकन केले असता मागीतलेली माहिती पोलीस संरक्षणाबाबतची आहे व ती इकडील जिल्हा विशेष शाखा ठाणे(ग्रामिण) यांच्याशी संबंधीत असून सदरची शाखा परिपत्रक क्र.एचडीओ-

१००५/२४२४/प्रक्र/२९२/आ.१ गृह विभाग मंत्रालय, मुंबई-३२ दि.२९ ऑक्टोबर,२००५ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २४(४) अन्वये वगळण्यात आला असून तो State Intelligence Department and its subsidiaries, Special /Branch of all Police Commissionerates, District Special Branch of all District Superintendents of Police in all the Districts असा असल्यामुळे सदरच्या शाखांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२४९५/तक्रार क्र. १६१०/का.१

श्री. भुषण पांडुरंग माळगांवकर,
१२२, फ्लॅट नं.३०२, मुकेश अपार्टमेंट्स,
नाडकर्णी मार्ग, वडाळा(पूर्व),
मुंबई-४०००३७. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. **.... गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १६.९.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१६.९.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.५.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दि.१८.२.२०११ रोजी म्हणजे आज घेण्यात आली. सदरच्या माहिती अर्जात अपिलकर्ता यांना ९.२.२०१० रोजी उत्तर पाठविण्यात आले आहे असे माहिती अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. सुनावणीस तक्रारदार हजर आहेत व त्यांनीही माहिती मिळाली असे सांगितल्यावरुन सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५३/अपील क्र.६२७६/२०१०

सौ.वनिता रविंद्र निकम **अपीलार्थी**
३५६/११, चेंबूर इलेव्हन हेवन को.ऑ.सोसायटी,
सहकार नगर ३, आदर्श विद्यालयाचे समोर,
चेंबूर पूर्व, मुंबई ७१

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त परिमंडळ-३
बावला कपाऊंड, भायखळा, मुंबई ३३

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई.

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.११.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्याकडे अर्जदार व त्यांचे पती श्री.रविंद्र आबाजी निकम यांना धारावी पोलिस ठाणे गु.नो.क्र.३४२/१० या गुन्हयात दि.२९.७.२०१० रोजी अटक करण्यांत आली होती. त्यांना अटक करण्यांत आल्यापासून जामिनावर मुक्त होईपर्यत धारावी पोलिस ठाणेकडून त्यांचे लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन, मुंबई येथे करण्यांत आलेल्या वैद्यकिय तपासणीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती व्यक्तिश:घेणार असे नमूद करुन मागितल्याचे दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.३.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक धारावी पोलिस ठाणे यांनी सहाय्यक माहिती अधिकारी यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यासोबत कागदपत्र सुध्दा उपलब्ध करुन दिलेले असल्याचे दिसून येत असले तरी दि.२.८.२०१० रोजी सायन रुग्णालयामध्ये वैद्यकिय तपासणी केलेल्या तपासणीचे कागदपत्र मिळाले म्हणून प्रथम अपिल दाखल केलेले असल्याचे दिसून येते. परंतू प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, धारावी पोलिस ठाणे यांचेकडे दि.११.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र दिले होते व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यावर अपिलकर्ता यांना दि.३.९.२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली होती. परंतू दि.२.८.२०१० रोजीचा वैद्यकिय तपासणी अहवाल प्राप्त झाला नव्हता व त्यामुळे तो उपलब्ध करुन देता आलेला नव्हता. प्रथम अपिलाच्या संदर्भात दि.११.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यांत आली व त्याचा निर्णय दि.१२.१०.२०१० रोजी देण्यांत आला व दि.१९.१०.२०१० रोजी युपीसी पोस्टाने अर्जदाराच्या निवासस्थानी माहिती पाठविण्यांत आलेली होती. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे आयोगापुढे सांगितले.

४. वरील प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळेच सुनावणीच्या दिवशी ते हजर राहिले नाहीत असे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

७. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.
२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२१८/अपील क्र.६२१६/२०१०

श्री.विशाल वासुदेव परब **अपीलार्थी**
४७/अ, ३ रा मजला, बोटावाला बिलिडंग नं.२
प्रभादेवी, मुंबई ४०००२५

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त परिमंडळ-३
बावला कपाऊंड, भायखळा, मुंबई ३३

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई.

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २९.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक १/२/२०११.

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलार्थी यांनी दि.२५.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्याकडे दि.१०.१२.२००७ रोजी दादर पोलिस ठाणे येथे आरोपी श्री.विराज सावंत, मनसे उपशाखा, अध्यक्ष यांचे विरोधात एफ.आय.आर.४१८ अंतर्गत केस दाखल करण्यांत आली. सदर केसबाबत ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरील माहिती स्वत: घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांना चारही मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याचे दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने दि.१७.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचे आदेश दि.३०.७.२०१० रोजी देण्यात आले असून वरिष्ठ पोलिस निरिक्षक, दादर पोलिस ठाणे यांच्याकडून जा.क्र.७९८०/१० दि.२९.७.२०१० अन्वये प्राप्त झाली असल्याने त्यांनी सांगितले. प्राप्त माहिती सदरच्या अंतिम आदेश पत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत युपिसी पोष्टामार्फत अपिलार्थीस पाठवून देण्याबाबत आदेशित करुन अपिल निकाली काढण्यांत आले असल्याचे दिसून येते. परंतू त्यामुळेही समाधान झाल्यामुळे अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना दि.२५.६.२०१० रोजी जी माहिती प्राप्त झाली त्यामध्ये जामिनदाराचा नाव व पत्ता दिलेला नाही तसेच आरोपीचा पत्ता चुकीचा दिलेला आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आरोपी श्री.विराज सावंत यांनी रु.५०००/- रोख रक्कमेचा जामिन दिलेला आहे. त्यामुळे जामिनदाराचे नाव देण्याचे कारण नाही. तसेच अभिलेख्यावर जो पत्ता दिलेलाआहे तोच पत्ता उपलब्ध करुन दिलेला आहे. यावरुन अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

८. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.१/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५२/अपील क्र.६२७४/२०१०

श्री.राजेश कृष्णा घडशी **अपीलार्थी**
विजय कर्पे चाळ नं.३ बी रुम नं.१०
न्यू निम्म बाग कल्याण, तिसगांव रोड,
कल्याण पूर्व, ठाणे

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वास्तुशास्त्रज्ञ मुंबई मंडळ,
म्हाडा, बांद्रा पूर्व, मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार **उत्तरवादी**
म्हाडा, बांद्रा पूर्व, मुंबई ५१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.
अपीलार्थी अनुपस्थित. अपिलीय अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी उशिरा उपस्थित.

२. अपिलार्थी यांनी दि.१३.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार यांचेकडे ईस्टर्न एकस्प्रेस हायवेलगतअसलेल्या विक्रोळी (पू) व कांजूरमार्ग (पू) च्या सिमेवरील जमिन

कोणाच्या मालकीची आहे त्याबाबतचा तपशिल मागितलेला दिसून येतो. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय सुध्दा झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जन माहती अधिकारी यांनी असे सौंगितले की, सदरील माहिती ही त्यांच्या कार्यालयातील नसलयामुळे त्यांचा अर्ज हा सहाय्यक भुव्यवस्थापक, कुर्ला मुंबई मंडळ यांच्याकडे दि.३.७.२०१० रोजी हस्तांतर केलेला होता. परंतू त्यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेले नाही. मात्रअपिलकता र्यांनी दिलेल्या नकाशाच्या आधारे भुमापन क्रमांक दिलेला नसल्यामुळे जमिनीचा मालकी हक्काबाबत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे अपिलार्थी यांना दि.३१.१.२०११ रोजी कळविण्यांत आलेले आहे. पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचा अर्ज ज्यावेळी प्राप्त झाला त्यावेळी सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ हे रजेवर होते व त्यामुळे सदरचा अर्ज हा विलंबाने हस्तांतरीत झालेला आहे.परंतू अर्ज हस्तांतर झाल्यावर सहा.भुव्यवस्थापक, कुर्ला मुंबई मंडळ तथा माहिती अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व राज्य माहिती आयोगाकडे अपिल सुनावणी असल्याने सुनावणीच्या आदल्या दिवशी म्हणजे दि.३१.१.२०११ रोजी अपिलकर्ता यांना पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही व त्याकरिता नव्याने अर्ज सादर करावा अशा प्रकारे कळविलेले आहे.

४. माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम ६(३)प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध नसेल तर त्यांनी तो अर्ज हा संबंधित जन माहती अधिकारी यांचेकडे सुरुवातीच्या ५ दिवसांत हस्तांतरीत करणे आवयक असते. परंतू या प्रकरणामध्ये हस्तांतरण सुध्दा ३ महिन्यानी केलेले असल्याचे दिसून येते व त्यानंतर सुध्दा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करताना जन माहिती अधिकारी हे २० दिवसाचे अर्जित रजेवर होते व त्या संदर्भातील रजा मंजूरीचे आदेश सोबत जोडलेले आहे तसेच वास्तुशास्त्रज्ञ,मुबई मंडळ विभागात म्हाडाच्या वसाहतीच्या जुन्या इमारतीची पुनर्विकासासंबंधी संवेदनशिल प्रकरणे प्राधान्याने हाताळावी लागतात. तसेच या संबंधी संवेदनशिल तक्रारीचा, न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा प्राधान्याने करावा लागत असतो.यामुळे कामाचा आवाका जास्त आहे. याकरिता या विभागात कर्मचा-यांची संख्या अगदीच कमी असल्यामुळे अर्जदाराच्या अर्जावर विहित मुदतीत कारवाई करणे अनावधानाने राहून केले असे असले तरी अर्ज हस्तांतरीत केल्यानंतर सुध्दा तत्कालीन सहमुख्य अधिकारी, कुर्ला मुंबई मंडळ यांनी हस्तांतर केल्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम २० चे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत.

५. आयोगाकडे अपिल सुनावणी ज्या दिवशी आहे त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे दि.३१.१.२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. अन्यथा ती सुध्दा संबधितांना उपलब्ध करुन दिली नस्ती अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.भुव्यवस्थापक कुर्ला मुंबई मंडळ यांच्या विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

९. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.भुव्यवस्थापक मुंबई मंडळ यांच्या विरुध्द अधिनियमाच्या कलम २० (१)अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यांत येते. सदरच्या शिस्तभंगाची कारवाई ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य अधिकारी. मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन,मुंबई यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

Gawas/feb 2011

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५१/अपील क्र.६२७५/२०१०

श्री.राजेश कृष्णा घडशी **अपीलार्थी**
विजय कर्पे चाळ नं.३ बी रुम नं.१०
न्यू निम्म बाग कल्याण, तिसगांव रोड,
कल्याण पूर्व, ठाणे

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक पणन
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, बांद्रा पूर्व मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक **उत्तरवादी**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, बांद्रा पूर्व मुंबई ५१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.
अपीलार्थी,अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलार्थी यांनी दि.१२.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,उपसंचालक पणन, मुंबई, क्षेत्रविकास यांच्याकडे जानेवारी २००९ मधील सदनिका विक्रिसाठी काढलेल्या जाहिरातीस अनुसरुन करण्यांत आलेले गाळेवाटप संदर्भामध्ये ३मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपिलाच्या संदर्भात दि.२५.६.२०१० रोजी मागितलेली माहिती संकेत क्र. २०१ मधील कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती तयार असून त्याची एकूण ३ पृष्ठे असून त्याची एकूण रक्कम रु.६ मंडळाच्या खाती जमा केल्यानंतरच सदर माहिती देण्यांत येईल तसेच संकेत क्र.२०७ मधील नस्त्याची पाहणी करुन आपणांस हवी असलेली माहिती आपण घेऊ शकता तेव्हा सदर नस्त्या निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यांत येतील असे कळविले असल्याचे दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांना माहिती विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे दि.२६.७.२०१० रोजी संचालक, पणन मंडळ यांनी कळविलेले दिसून येते व त्यानंतर पुन्हा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी व्दितीय अपीलामध्ये अपील करण्याचे कारण स्पष्टपणे दिलेले आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे उपस्थित नव्हते व त्यांनी कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. आयोगाने कार्यालयातून दि.१.१.२०११ रोजी सुनावणीची नोटीस काढलेली असून सुध्दा जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे उपस्थित राहिलेले नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी उपसंचालक, पणन हे दोषी आढळून येतात. दि.२७.६.२०१० रोजी पत्र दिलेले असले तरी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यास ती अधिनियामाच्या कलम ७ (३) अन्वये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद असताना सुध्दा अपिलकर्ता यांचेकडून २ महिन्यानंतर माहितीच्या अधिकारात खर्चाची मागणी केली जाते व यावरुन जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतूदीची काहीही माहिती आहे असे दिसून येते नाही व त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत. परंतू शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरील अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१२.४.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी तस न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे दि.१२.४.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमांच्या कलम २०(१)अन्वये रुपये १००००/- एवढी शास्ती का लादण्यांत येऊन नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत आयोगापुढे समक्ष येऊन करावा अन्यथा रु.१००००/-ची शास्ती कायम करण्यांत येईल याची नोंद घ्यावी

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.१/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५०/अपील क्र.६२७७/२०१०
क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१४९/अपील क्र.६२७८/२०१०
क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१४७/अपील क्र.६२८०/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव **अपीलार्थी**
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोमस्तर, कांदिवली पूर्व मुंबई १०१

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय
बृहन्मुंबई महानगरपालिका सं.व प. तरण तलावाजवळ
महात्मा बांधी छेद क्र.२ कांदिवली पश्चिम मुंबई ६७

२. जन माहिती अधिकारी तथा आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय **उत्तरवादी**
बृहन्मुंबई महानगरपालिका सं.व प. तरण तलावाजवळ
महात्मा बांधी छेद क्र.२ कांदिवली पश्चिम मुंबई ६७

---निर्णय---

व्दितीय तिन्ही अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १/२/२०११.

अपीलार्थी अनुपस्थित. तिन्ही अपिलामध्ये अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित

वरील तिन्ही अपिलांमध्ये अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याबाबतचे पत्र सादर केलेले असल्याने वरील तिन्ही अपीले निकाली काढण्यांत आलेली आहेत.

मुंबई
दि.१/२/२०११ **(विलास पाटील)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२३१//अपील क्र.६२९८/२०१०

श्री.शिवरामन वासुदेवन मुदलियार **अपीलार्थी**
१८९/५२६२, सन्मती को.हौ.सोायटी,
पंतनगर, घाटकोपर पूर्व, मुंबई ४०००७५

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वास्तुविशारद,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, ३ रा मजला,
गृहनिर्माण भवन, म्हाडा, बांद्रा पूर्व, मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा वास्तुशास्त्रज्ञ कार्यालय **उत्तरवादी**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, ३ रा मजला,
गृहनिर्माण भवन, म्हाडा, बांद्रा पूर्व, मुंबई ५१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी तसेच अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित

२. अपिलकर्ता यांनी दि.२.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी म्हाडा यांचेकडे दि.३.९.२००५ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये अतिरिक्त एफ.एस.आय.च्या संदर्भामध्ये काय निर्णय झाला, अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. सदरील माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी संबंधित नस्तीची पाहणी करुन त्यातून आवश्यकत्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यांत आलेल्या आहेत. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१५.४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. सदरच्या अपिलाच्या संदर्भामध्ये दि.१२.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी आवश्यकता असलेली माहिती उपलब्ध करुन

देण्यांत आलेली होती. परंतू त्यानंतरही समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, दि.३.९.२००५ च्या अर्जाचा व आगाऊ भरणा केलेल्या खर्चाच्या संदर्भामध्ये अतिरिक्त एफ.एस.आय मिळण्याच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती त्यांनी मागितलेली होती. परंतु त्या संदर्भामध्ये त्यांनी देकार पत्राच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतू पुढे त्याबाबत कोणती कार्यवाही झाली व ती विलंबाने कां होत आहे, याबद्दल काहीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या दि.३.९.२००५ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये नस्तीमध्ये जे कागदपत्र उपलब्ध होते ते सर्व कागदपत्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. परंतू अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे त्याबाबत कोणतेही आदेश उपलब्ध नाहीत. यावरुन त्यामध्ये अंतिम निर्णय झालेला नाही, असा निष्कर्ष काढता येतो. परंतू तरी सुध्दा **अपिलकर्ता यांचे म्हणणे आहे की, निर्णय झालेला नसेल तर ते स्पष्टपणे कळविणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी निर्णय संबंधितांस स्पष्टपणे कळविण्यास कोणतीही अडचण नाही**, असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे अंशत मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

३. अपिलकर्ता यांचे अपील अशंतः मंजूर करण्यांत येत असून हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपिलकर्ता यांनी दि.३.९.२००५च्या आगाऊ भरणाच्या संदर्भामध्ये व अतिरिक्त एफ.एस.आय.च्या संदर्भामध्ये अंतिम निर्णय दिलेला आहे किंवा नाही ही बाब अपिलकर्ता यांना स्पष्टपणे पोस्टाने कळविण्यांत यावे.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२१९//अपील क्र.६२९६/२०१०

श्री.नरेंद्र भिकाजी सावंत **अपीलार्थी**
११/३४५,सहकार नगर-३
चेंबूर, मुंबई ४०००७१

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त, परिमंडळ-६
नविन प्रशासकिय इमारत. आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई ७१

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,
चेंबूर, मुंबई ४०००७१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त यांचेकडे दि.६.१०.२००७ रोजी अपिलकर्ता यांनी त्यांच्यावर व त्यांचे मित्रावर नेहरुनगर पोलिस ठाणे कुर्ला सी.आर.नं.३९१/०७ येथे अंतर्गत गुन्हा नोंदविण्यांत आलेला आहे. तसेच दि.२०.११.२००६ व २८.११.२००६ रोजी अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यांत आलेला आहे. त्या संदर्भामध्ये एकूण ३ मुद्यांमध्ये त्यांनी माहिती मागितलेली असल्याचे दिसून येते. तसेच पोलिस अधिका-यांचे डयुटी आदेश बुकची प्रत पोलिस डायरीच्या प्रमाणित प्रती इत्यादि मागितलेले दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२५.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. परंतू त्यामध्ये दि.२०.११.२००६ व दि.२८.११.२००६ रोजीच्या पोलिस अधिका-याच्या डयुटी आदेश बुक अभिलेख्यावर स्वतंत्रपणे मिळून येत नाही असेही अपिलार्थीस कळविलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.३१.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये आदेश बुकची ठाणे दैनंदिनीची प्रत प्राप्त करुन घेऊन

अपिलार्थीस देण्यांबाबत दि.२९.९.२०१० रोजी आदेश देण्यांत आलेले आहेत व त्याप्रमाणे दि.१३.१०.२०१० अन्वये दि.६.१०.२००७ व दि.७.१०.२००६ रोजीच्या पोलिस ठाणे गुन्हे दैनंदिनी नोंद असलेल्या प्राप्त झालेल्या प्रती तसेच दि.२८.११.२००६ रोजीच्या आदेश बुकाची पोलिस ठाणे अभिलेखावर पुनश्च शोध घेतला असता सदरचे बुक मिळून आलेले नाही असा अहवाल प्राप्त झाल्याने त्याप्रमाणे अपिलार्थीस दि.१५.१०.२०१० रोजी कळविण्यांत आलेले आहे व त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे असे सांगितले की, दि.२७.१.२०११ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पोलिस ठाणेमधील स्टोअर्स मध्ये लेखन सामुग्रीची तपासणी केली असता काही लेखन सामुग्री, रजिस्टर्स वाळवीने खाऊन नष्ट झाले असल्याचे निदर्शनास आले असल्याबाबत दोन पंचासमोर पंचनामा करण्यांत आला व ठाणे दैनंदिनीत नोंद करण्यांत आलेली आहे. त्यात २००६-२००७ चे आदेश बुक वाळवीने खाऊन नष्ट झालेले आहेत. त्यामुळे दि.२८.११.२००६चे आदेश बुक अभिलेख्यावर उपलब्ध नाहीत असा अहवाल प्राप्त झाल्याने अपिलार्थीस दि.२८.१.२०११ रोजी कळविण्यांत आलेआहे. परंतू त्यानंतर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे समाधान झालेले आहे त्यामुळे सदरचे अपिली निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१०. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र-मुमाआ/२०११/२९२७/तक्रार क्र.२९/२०१०

श्री.नरेंद्र भिकाजी सावंत **अपीलार्थी**
११/३४५,सहकार नगर-३
चेंबूर, मुंबई ४०००७१

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस आयुक्त,
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष, चेंबूर, मुंबई ४०००७१

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
पूर्व प्रादेशिक विभाग, नियंत्रण कक्ष,चेंबूर, मुंबई ४०००७१

---निर्णय---

तक्रारीचा दिनांक २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे क्र.मुमाआ/२००८/४७४५६/अपिल क्र.५८५२/०२ दि.५.७.२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम १८(१)प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जी माहिती प्राप्त झाली त्यामध्ये सदरची लेखनसामुग्री कक्षाचे बाहेर नाला असल्याने त्यात पावसाचे पाणी आंत शिरुन लेखनसामुग्री पाण्याच्या ओलाव्यामुळे नष्ट झालेली आहे असे उत्तर दिले. मात्र त्यांनी दाखल केलेल्या गुन्हया संदर्भातील माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू तक्रारदार यांनी पोलिस ठाण्यामधून जन माहिती अधिकारी यांचेकडे जो अहवाल आलेला आहे त्या अहवालाची प्रत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

२. तक्रारदार यांची तक्रार अशंत: मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत तक्रारदार यांचे तक्रारीच्या संदर्भात पोलिस ठाणे यांचेकडून जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्या अहवालाची प्रत विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत यावी.

२ . तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११ **(विलास पाटील)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२३०//अपील क्र.६२९७/२०१०

श्रीमती सकिना तैयबजी ढोलकावाला **अपीलार्थी**
१०४,पुष्पांजली को.हौ.सो.एस.व्ही.रोड,
बावरी समोर, सांताक्रुझ पश्चिम मुंबई ४०००५४

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त, परिमंडळ-९
हिलरोड, बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त **उत्तरवादी**
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड, बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, सहाय्यक पोलिस आयुक्त यांचेकडे दि.२४.५.२०१० रोजी दिलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१६.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये ७ दिवसांत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, सांताक्रुझ पोलिस ठाणे यांनी माहिती द्यावी असे आदेश दिलेले आहेत असे दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.२९.१०.२०१० रोजीच्या पत्रानुसार दि.२.११.२०१० रोजी माहिती पोष्टाने पाठविण्यांत आली. तत्पूर्वी अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले होते.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असेही सांगितले की, त्यांनी दि.२४.५.२०१० रोजी जे पत्र दिले होते त्या पत्राच्या संदर्भामध्ये सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्याकडे दि.१७.६.२०१० रोजी पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आले होते. परंतू त्या पत्राच्या संदर्भामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पत्राच्या संदर्भामध्ये अदखलपात्र गुन्हा दाखल केलेला होता व त्याबाबत पुढील कार्यवाही झालेली नाही व याबाबत अपिलार्थीसही कळविण्यांत आलेले होते. अपिलकर्ता यांनी पुढे युक्तीवाद करताना पोलिस कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नाहीत अशा प्रकारची तक्रार आयोगापुढे केली. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे उपलब्ध असलेल्या

कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध होते परंतू एखाद्या प्रकारणामध्ये गुणवत्तेबाबत कार्यवाही झाली किंवा नाही याबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी करण्याची तरतूद अधिनियमात नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या तक्रारीबाबत आयोगास कोणत्याही प्रकारचा निर्णय देता येणार नाही मात्र जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये महानगरपालिकेकडे चौकशी करण्यांत आली होती व त्याबाबतचे कागदपत्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्यामुळे जे कागदपत्र अपिलकर्ता यांना उपलब्ध झालेले आहेत त्यावरुन त्यांनी योग्यत्या प्राधिकरणाकडे तक्रार करणे आवश्यक राहिल. माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

२. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.३/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९८५७//अपील क्र.६२९४/२०१०

श्री.विद्याभुषण मानिक **अपीलार्थी**
२४, बारावे रोड, बेतुरकर पाडा,काला तलाव,
कल्याण पश्चिम जिल्हा ठाणा

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभाग कार्यालय,
७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मुंबई ४००००२

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इवका) **उत्तरवादी**
बृहन्मुंबई महानगरपालिका सी विभाग कार्यालय,
७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मुंबई ४००००२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक निरंक
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.३१.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, महानगरपालिका मुख्यालय,मुंबई यांचेकडे दि.१जानेवारी २००८ ते ३१ मार्च २०१० पर्यत अवैध उपक्रमाच्या संदर्भामध्ये एकूण १० मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे कार्यालयीन दिवशी (शनिवार)सोडून दुपारी ३.३० ते ५.०० वाजेपर्यत हे पत्र मिळाल्यापासून ७ दिवसाचे आत माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले असल्याचे दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१०रोजी काही मुद्यामध्ये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.३.५.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.२३.६.२०१० रोजी देण्यांत आला असून अर्जदाराच्या मुद्या क्र.५ बाबतच्या माहितीच्या छायांकित प्रतीसाठी लागणा-या शुल्काबाबत अपिलकर्ता यांना सदर आदेश मिळाल्यानंतर दोन दिवसांत शुल्क भरण्याबाबत कळविण्यांत आलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी सुरुवातीला युक्तीवाद करताना असे सांगितले की, अद्यापपर्यत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती मागितली म्हणून माहिती घेऊन जावे असे कळविले त्याप्रमाणे त्यांना दि.३.५.२०१० रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतू त्यांच्या मुद्या क्र.५ हा मुळातच मोघम असल्यामुळे त्याबाबत त्यांना तसे कळविण्यांत आले होते. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर मात्र मुद्या क्र.५ च्या संदर्भामध्ये त्यांना माहिती द्यावी असा निर्णय दिलेला होता. त्यावर पुन्हा त्या संदर्भात सर्व कागदपत्रांच्या प्रती

अपिलकर्ता यांना दि.२.३.२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना त्या संदर्भातील छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत तसे असल्यास अपिलकर्ता यांना महानगरपालिकेने कलम ३५१ प्रमाणे ज्या नोटीस दिलेल्या आहेत त्या संदर्भातील छायांकित प्रती कलम ३५१ व ३५४(अ)अन्वये पाठविण्यांत आलेल्या छायांकित प्रतीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे व त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

४. अपिलकर्ता यांचे अपील अशंत: मंजूर करण्यांत येत असून प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.१ जानेवारी २३००८ ते ३१ जानेवारी २०१० या कालावधीतील महापालिकेकडे मागितलेल्या कलम ३५१ अन्वये व ३५४ (अ)अन्वयग बजावण्यांत आलेल्या १० नोटीसाच्या संदर्भामध्ये प्रती पेज रुपये २/- प्रमाणे भरणा करुन त्याच्या छायांकित प्रती व्यक्तिश: उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. त्याकरिता अपिलकर्ता यांनी व्यक्शि: जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन घ्याव्यात.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९८९०/अपील क्र.६२९५/२०१०

श्रीमती लता विठ्ठल सुकाळे, **अपीलार्थी**
गोरखनाथ पांडे चाळ, ५ वा रोड,

गोळीबार, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०००५५

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,
हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी आचार्य दोंदे मार्ग,
परळ, मुंबई ४०००१२

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकिय अधिकारी **उत्तरवादी**
हाफकिन प्रशिक्षण संशोधन व चाचणी आचार्य दोंदे मार्ग,
परळ, मुंबई ४०००१२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २३.९.२०१०
सुनावणीचा दिनांक ३/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, हाफकिन प्रशिक्षण संस्था यांचेकडे **लॅब अटेंडंट पद लेखी परिक्षा निकाला संदर्भात कोणत्या निकषांवर ७ उमेदवारांची नियुक्ती करण्यांत आली व कोणत्या निकषांवर त्यांना डावलण्यांत आले या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते.**

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३०.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.६.९.२०१० रोजी देण्यांत आला असून **अपिलकर्ता यांनी विचारलेल्या मुद्यांबाबत अपिलीय अधिकारी यांचेसमोर माहिती देण्यांत आली आणि त्यांना संबंधित कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यांत आले. दिलेल्या माहितीने आणि कागदपत्रांच्या अवलोकनानंतर त्यांचे समाधान झाले, अशा प्रकारचा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येतो**. परंतू त्यामुळेही समाधान झाले नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये त्यांना कोणत्या आधारावर गुण दिलेले आहेत, याबद्दलची माहिती त्यांना दिलेली नाही. तसेच इतर उमेदवाराच्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. **त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असे सांगितले की, उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती त्यांना मिळू शकतील परंतू इतर उमेदवारांच्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती या त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्यांना उपलब्ध होऊ शकणार नाही**. तसेच तोंडी मुलाखतीमध्ये प्रत्येक उमेवारांस प्रत्येक अधिका-याने कोणते गुण दिलेले आहेत त्याबद्दलची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असली तरी परिक्षेच्या संदर्भामध्ये

जर निकष तयार केलेले असतील तर ते निकष वाचून त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतू **अपिलकर्ता यांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे त्यांना गुणपत्रिका देणे योग्य वाटते.**

५. **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (त्र)प्रमाणे माहितीचा अधिकार या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये त्यांचे नियंत्रण असलेले कागदपत्र,दस्तऐवज, अभिलेखे यांचे निरिक्षण करुन त्यांच्या छायाकित प्रती घेणे अशी तरतूद आहे व ' माहिती ' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सुध्दा कागदपत्रांचा समावेश होतो, अशी तरतूद आहे** व त्यामुळे कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेबाबत चौकशी करुन निर्णय देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना निकषाच्या संदर्भात हव्या असलेल्या नियमाच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास हरकत नाही.

आदेश

४. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून, जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यात पुन्हा परिक्षेच्या सदंर्भातील निकष असतील तर त्या निकषांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००५३/अपील क्र.६२८९/२०१०

श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले, **अपीलार्थी**
सिध्दीविनायक प्रसाद,डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली पूर्व ४२१ २०१, ता.कल्याण जि.ठाणे

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव(का-६)
सामान्य प्रशासन विभाग मंत्रालयासमोर,मुंबई ३२

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (का-६) उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग मंत्रालयासमोर,मुंबई ३२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक २/२/२०११.
अपीलार्थी अनपुस्थित. अपिलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग कार्यासन -६ यांचेकडे दि.१०.७.२०१० रोजीच्या अर्जान्वये **मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या नियुक्तीच्या धारिकेच्या प्रती व एकूण ३ मुद्यांबाबत माहिती मागितलेली दिसून येते**. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३१.७.२०१० रोजी मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या संदर्भातील नस्तीच्या छायांकित प्रती या कार्यासनाकडे उपलब्ध आहेत मात्र त्यातील कागदपत्रांची संख्या जास्त असल्याने विहित कालावधीत त्यांच्या छायांकित प्रती आपणांस पुरविणे शक्य नाही. मात्र निम्न स्वाक्षरीतास क्र.२२०४९५४३ या दूरध्वनीवर आगाऊ सूचना देऊन भेट दिल्यास आपणांस संबंधित धारिकेतील कागदपत्रांच्या निरिक्षणांची संधी देण्यांत येईल व अशा निरिक्षणाअंती आपणांस आवश्यक असणा-या कागदपत्रांच्या प्रती संख्या कमी असल्यास पुरविण्याचा प्रयतन करण्यांत येईल असे कळविलेले असल्याचे दिसून येते. प्रथम अपिलाची सुनावणी दि.६.९.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेली होती परंतू अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे निर्णय दिलेले नाही. परंतू त्याने समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दि.१०.८.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपिलकर्ता हे व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अनुपस्थित होते. **जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, राज्य माहिती आयोगावर नियुक्ती मिळण्यासाठी त्यांच्याकडे शेकडो अर्ज दाखल होतात व त्यामध्ये या सर्व अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे सर्वस्वी अशक्य आहे.** त्याकरिता अपिलकर्ता यांनी सुध्दा निरिक्षण करावे व त्यांना हवी असलेली माहिती त्यांनी उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले होते. परंतू त्यानंतर अपिलकर्ता हे त्यांचे कार्यालयात निरिक्षणासाठी उपस्थित राहिलेले नाहीत. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीसही ते उपस्थित राहिलेले नाहीत व त्यामुळे त्यांना निरिक्षणाची संधी देऊनही त्यांनी ती माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१.अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.
२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००५९/अपील क्र.६२९३/२०१०

श्री.दत्ताराम कृष्णा पेडामकर **अपीलार्थी**
मरी अम्मा नगर, रुम नं.एम-२२३
नेहरु सेंटर मागे, डॉ.एस.बी.रोड, वरळी,
मुंबई ४०००१८

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी
मुंबई शहर जिल्हा यांचे कार्यालय, जुने जकात घर शहीद भगतसिंग मार्ग,
फोट, मुंबई ४०० ००१

२. जन माहिती अधिकारी तथा **उत्तरवादी**
मुंबई शहर जिल्हा यांचे कार्यालय, जुने जकात घर शहीद भगतसिंग मार्ग,
फोट, मुंबई ४०० ००१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक २/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनपुस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.६.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालयात मरी अम्मा नगर/भैय्यासाहेब आंबेडकर नगर परिसरात ६९९४ रोजी आगीत बेघर झाल्याने अनुदान वाटप करण्यांत आले त्यांच्या प्रती. तसेच किती झोपडीधारकांना अनुदान वाटप करण्यांत आले त्यांची यादी इ. माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दि.१५.७.२००९ रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता उपलब्ध कागदपत्राच्या शुल्काच्या खर्चाबाबत कळविण्यांत आलेले होते. परंतू त्या खर्चाचा भरणा न केल्यामुळे त्यांना दि.२४.७.२०१० रोजी माहिती उपलबध करुन दिलेली होती. तरी सुध्दा त्यांनी दि.९.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या दि.१०.८.२०१० रोजीच्या निर्णय आदेशाने अपिलार्थीस विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. तरी सुध्दा त्यांने समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. परंतू दि.२८.१.२००११ रोजी अपिलकर्ता यांनी दि.२.२.२०११ च्या अपिलाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यांत यावे असे आयोगास लेखी कळविलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१.अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.
२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.३/२/२०११ **(विलास पाटील)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००४४/अपील क्र.६३१४/२०१०

श्री.प्रकाश गोविंद नवाथे, **अपीलार्थी**
२०४, राजबाग, दलुचंद को.हौ.सो.लि.
२७१, सर भालचंद्र मार्ग, माटूंगा, मुंबई १९

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, इमारत प्रस्ताव शहर ई विभाग महापालिका कार्यालय, ३ रा मजला, शेख हाफीझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ४०००८

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव शहर ई विभाग महापालिका कार्यालय, ३ रा मजला, शेख हाफीझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ४०००८ **उत्तरवादी**

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ७.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक ८/२/२०११.

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित..

अपिलकर्ता यांनी दि.४.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, इमारत व प्रस्ताव शहर, ई विभाग, भायखळा यांचेकडे राजबागसाठी देण्यांत आलेले दि.१६.९.२००४ चे बी.सी.सी आणि दि.१४.७.२००५ चे २७० चे प्रमाणपत्र. त्या संदर्भामध्ये बेकायदेशीर असताना इमारत प्रस्ताव शहर विभागाने दिलेल्या इमारतीना बी.सी.सी व्हॅलिड आहे किंवा कसे याबाबतची माहिती देण्यांत यावी.

१. अर्जाच्या अनुषंगाने दि.९.८.२०१० रोजी मुंबई महानगरपालिका कायदा कलम २७० 'अ ' अन्वये दिलेले प्रमाणपत्र कायदेशीर आहेत किंवा कसे ही बाब जलअभियंता यांच्या अखत्यारित येत असल्याने अपिल अर्ज योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यांत येत आहे असे कळविलेले असल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे दि.१३.९.२०१० रोजी बी.सी.सी. व्हॅलिड आहे किंवा नाही याबाबत विचारलेली माहिती जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव शहर-२ यांचेकडून उपलब्ध होईल, असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू तत्पूर्वी अपिलकर्ता यांनी दि.१८.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले होते. प्रथम अपिलाचा निर्णय दि.९.८.२०१० रोजी देण्यांत आला असून, कोणत्याही प्रमाणपत्रांची कायदेशीर आहे किंवा कसे याबाबतची माहिती ही संबंधित विभागाच्या अंतर्गत येत नसल्यामुळे जलअभियंता, महानगरपालिका मुख्यालय फोर्ट,मुंबई यांचेकडे संपर्क साधावा असे कळवून सदरचे अपील निकाली काढण्यांत आले. त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलार्थी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, बी.सी.सी. व्हॅलिड आहे किंवा कसे याबाबतची माहिती त्यांनी हवी होती. परंतू अद्यापपर्यत ती माहिती देण्यांत आलेली नाही व या विभागाकडून त्या विभागाकडे ती हस्तांतरीत करण्यापलिकडे आतापर्यत काहीही पत्रव्यवहार झालेला नाही किंवा प्रथम अपिलामध्ये सुध्दा त्याबाबत कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी त्या संदर्भात पूर्वी माहिती उपलब्ध करुन दिलेले होती असे असले तरी अपिलकर्ता यांचे दि.४.८.२०१० च्या अर्जाप्रमाणे प्रथम अपिलाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कारणमीमांसा देऊन उत्तर व प्रथम अपिलाचा निर्णय देणे आवश्यक होते. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलामध्ये तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. यावरुन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार २००५ च्या तरतूदीबाबत काही माहिती आहे असे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च)(ञ) मध्ये माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे व त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपलब्ध असलेले कागदपत्रे,अभिलेखे,दस्तऐवज,परिपत्रके, संविदा शासन निर्णय इत्यादिंच्या छायाकिंत प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांचे प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेबाबतचे अभिप्राय मागितलेले आहेत. परंतू जन माहिती अधिकारी हयांना माहिती कागदपत्राच्या स्वरुपात जशी आहे तशी उपलब्ध करुन देण्याचा अधिकार आहे परंतू कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्याबाबत

अभिप्राय अपेक्षित नसल्यामुळे त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना उत्तर देणे आवश्यक होते. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदीची माहिती करुन घेऊन त्याप्रमाणे प्रथम अपिलाचा निर्णय देणे आवश्यक असते. परंतू या विभागाकडून त्या विभागाकडे कोणत्याही प्रकारची विचारलेल्या माहितीचे आकलन करुन न घेता हस्तांतर करीत राहणे म्हणजे कालापव्यय करणे असा अर्थ होतो.

५. यापुढे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमांच्या तरतूदीप्रमाणे अर्जावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही वर विवेचन केल्याप्रमणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे सदरील अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१.अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००४९/अपील क्र.६३१५/२०१०

श्री.प्रकाश गोविंद नवाथे, **अपीलार्थी**
२०४, राजबाग, दलुचंद को.हौ.सो.लि.
२७१, सर भालचंद्र मार्ग, माटूंगा, मुंबई १९

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता,
मनपा एफ/उत्तर विभाग ९६ भाऊदाजी मार्ग, माटूंगा, मुंबई-१९

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) **उत्तरवादी**
मनपा एफ/उत्तर विभाग ९६ भाऊदाजी मार्ग, माटूंगा, मुंबई-१९

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ४/२/२०११.
अपीलार्थी,अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.२५.६.२०१० व दि.१५.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे ते राजबागच्या ग्राऊंड फ्लोअरवर पंप रुमच्या बाजुला, अंडरग्राऊंड पाण्याच्या टाकीजवळ

जीचे मॅनहोल टॉयलेटच्या दारापुढे एक फुट अंतरावर आहे. असा २००३ मध्ये बांधलेला टॉयलेट जा.ता.२९.४.२००२ च्या सॅक्शंड प्लॅनमध्ये नाही आणि ता.१६.९.२००४ च्या कम्प्लिशन प्लॅनध्येही नाही असा आज अस्तित्वात असलेला टॉयलेट कायदेशीर आहे किंवा कसे याची माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.७.७.२०१० रोजी विचारलेली माहिती सहा.अभियंता इमारत व कारखाने,एफ/उत्तर विभागाशी संबंधित असून अपिल अर्जाच्या छायांकित प्रती सदर विभागाकडे पुढील कार्यवाही करिता पाठविण्यांत आलेले आहेत, असेही कळविले असल्याचे दिसून येते व त्यानंतर दि.१०.८.२०१० नुसार विचारलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ च्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे विचारलेली माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले आहे. त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.११.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.३.९.२०१० रोजी देण्यांत आला असून, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इवका)एफ/उत्तर यांनी बांधकामाच्या अनधिकृतपणाबद्दल माहिती गोळा करुन कारवाई करणे उचित ठरले असते. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता इवका,एफ/उत्तर, महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे कार्यवाही करुन कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या प्रती अपिलकर्ता यांना विनामूल्य पुरविण्यांत याव्यात असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळेच अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना, या कार्यालयाकडून एम.आर.टी.पी.खाली कलम ५३ (१)अन्वये नोटीस बजावण्यांत आली असून त्यावर पक्षकाराने न्यायालयातून स्थगिती आणलेली दिसून येते. त्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

५. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये प्रकरणांत निर्णय प्रक्रियेसाठी कारवाई केली नाही म्हणून कारवाई किंवा कार्यवाही करुन अधिका-याने करुन माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. माहिती ही उपलब्ध कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध होते. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेबाबत संबंधित अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे सक्षम अधिकरी यांचेकडे तक्रार करुन योग्यतो न्याय मिळवून घेत येतो. सदरच्या प्रकरणी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.

२ . अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००३८/अपील क्र.६३१६/२०१०

श्री.मो.हसीम शेख **अपीलार्थी**
६६, शौकत मंझिल, ३३ रोड,
खार पश्चिम,मुंबई ४०० ०५२

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, प.ऊ-१
एमसीसीएप, एच आणि के वॉर्ड, आर.के.पाटकार मार्ग,
वांद्रा पश्चिम, मुंबई ४०००५०

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता **उत्तरवादी**
एमसीसीएप, एच आणि के वॉर्ड, आर.के.पाटकार मार्ग,
वांद्रा पश्चिम, मुंबई ४०००५०

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ४/२/२०११.

अपीलार्थी, व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.२२.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकड **Demarcation** of the plot bearing CTS no.F/1508 1510 **TPS-३ village Bandra, s.v.road Khar west व** इतर Tikka sheets ३० ते ७५ च्या संदर्भामध्ये निरिक्षण घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे मागितलेली दिसून येते. परंतू माहिती अधिकारी यांनी दि.१७.५.२०१० रोजी **survey deptt. च्या CE** 2458 WS/AH & CE 2468/WS/AH च्या नस्ती निरिक्षण करुन माहिती चा भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२४.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.१७.६.२०१० रोजी देण्यांत आला असून, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे. तसेच सर्व्हे डिपार्टमेंटकडे निरिक्षणाकरिता दि.१५.६.२०१० रोजी ३.०० वाजता उपस्थित राहून कागदपत्र उपलब्ध करुन घ्यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतू त्यामुळेही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.३०.७.२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे एक पत्र दिलेले असल्याचे दिसून येते व त्यांनी काय माहिती मागितलेली आहे याबद्दल त्यामध्ये विश्लेषण केलेले आहे. तसेच आदेशाप्रमाणे निरिक्षणाकरिता उपस्थित झाल्यानंतर त्यांना टिक्का शिट नं. ३० ते ६० च्या कापडी शिट्स उपलब्ध करुन दिल्या. सदरच्या शिट्स हया खराब झालेल्या व फाटलेल्या आहेत अशा प्रकारच्या तक्रारी त्यांनी केलेल्या आहेत. परंतू ज्या स्वरुपात जशी माहिती उपलब्ध आहे तशीच्या तशी ती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना सांगण्यांत आले. अपिलार्थी यांनी अशीही तक्रार केली की, कार्यालयात अभिलेख्याचे व रेकॉर्डचे योग्यरितीने जतन केलेले नाही व त्याप्रमाणे आदेश द्यावेत अशी विनंतीही त्यांनी केलेली होती. परंतू त्याने समाधान न झाल्याने अपिलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये स्पष्टपणे महानगरपालिकेच्या AEBP(S)H&K ward यांनी प्रत्यक्ष डिमार्कटेड आराखडयामध्ये संदर्भाधीन पत्र क्र. AE/43-D/WS/Sur/H&K dt.12.11.2007, AB/32-D/WS/Sur/H&K dt. 16 oct.2009 प्रमाणे निरिक्षण द्यावे व संबंधित कागदपत्रे तसेच टिक्का शिट्स ३०-७५ पर्यत उपलब्ध करुन द्यावेत व त्यांच्या छायांकित प्रतीची माहिती मागितलेली दिली नाही. सदरची माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. परंतू उत्तर देताना त्यांनी ज्या नस्ती मागितलेल्या नाहीत त्या नस्तीचे निरिक्षण घ्यावे असे कळविलेले असलयाचे दिसून येते व टिक्का शिट्स ज्या कापडावर असून त्या अतिशय जिर्ण व कोणत्याही प्रकारे त्याचा संदर्भात लागत नाही अशा परिस्थितीत ठेवण्यांत आलेल्या आहेत. त्यांनी निरिक्षण घेताना त्यांना ३०-६० पर्यत नोंदी घेतलेल्या आहेत. परंतू ६० ते ७५ या सर्व टिक्का शिट्स त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, टिक्का शिट्स हया ज्या स्वरुपात उपलब्ध आहेत त्याच स्वरुपामध्ये त्यांना उपलब्ध करुन देण्यांत येतील त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नविन टिक्का शिट्स तयार करण्यांत आलेल्या नाहीत. तसेच हया कार्यपध्दतीप्रमाणे संपूर्ण नस्ती जशी उपलब्ध आहे त्याचप्रमाणे त्यांना ती उपलब्ध करुन देण्यांत येतील. त्यामुळे नविन टिक्का शिट्स बाबतची माहिती उपलब्ध करुन देणे हे सर्वस्वी अशक्य आहे. ज्या पध्दतीने रेकॉर्ड जतन केलेले आहे त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतील व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

५. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यांत येत असून, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कामकाजाच्या दिवशी व वेळ देऊन त्यांना हव्या असणा-या ६१ ते ७५ हया टिक्का शिट्सच्या छायांकित प्रती विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५००३५/अपील क्र.६३१७/२०१०

श्री.ए.एस.पाटील **अपीलार्थी**
१०१, विशाल अपार्टमेंट, माणिकलाल मेहता रोड,
टेलिफोन एक्स्चेंज समोर, घाटकोपर पश्चिम मुंबई ४०००८६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मनपा मार्ग,
पत्र पेटी क्र.१९६७ मुंबई ४०००१

२. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक **उत्तरवादी**
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मनपा मार्ग,
पत्र पेटी क्र.१९६७ मुंबई ४०००१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक ८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ८/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी, तंत्र शिक्षण संचालनालयाकडे मागितलेली माहिती प्राप्त झालेली असल्याने सदर अपिलाची **सुनावणी रद्द करण्याबाबत** राज्य माहिती आयोगाकडे दि.५.२.२०११ रोजी विनंती केलेली आहे.

मुंबई
दि.८/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०१५९/अपील क्र.६३१८/२०१०

श्री.विजय राठोड **अपीलार्थी**
रुम नं.३६-३७ शासकिय महा.मुलांचे वसतीगृह
सी रोड, चर्चगेट मुंबई ४०००२०

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव
सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई ३२

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी **उत्तरवादी**
सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई ३२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ८/२/२०११.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

१. अपिलकर्ता यांनी दि.१३.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडे प्रतिभा शिक्षण संस्था,अकोला व्दारा संचलित बंद वसंतराव नाईक विजाभज आश्रमशाळा, लालखेड, ता.चांदूर रेल्वे, जि. अमरावती ही बंद शाळा अष्टविनायक शिक्षण प्रसारक मंडळ, अहेरी यांना हस्तांतरीत केल्याचे आदेशाची प्रत संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे का, त्याचा ई-नंबर व दिनांक, तसेच शासन स्तरावरुन बंद संस्था इतर संस्थेस हस्तांतरण व स्थलांतरण करण्याबाबत सूचना/मागणी प्रसार माध्यमातून वर्तमानपत्रातून प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्राचे नांव व दिनांकाची माहिती. तसेच सदर प्रस्ताव

हस्तांतरीत व स्थलांतरीत करुन मंजूर केलेल्या संस्थेचे समाजकल्याण अधिकारी व विभागीय समाज कल्याण अधिकारी व संचालक वि.जा.भ.ज. पुणे यांचेमार्फत सदर प्रस्ताव मंजूर व हस्तांतरीत संस्थेचे प्रस्ताव शिफारस केलेल्या व शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची दिनांकासह आवक क्रमांकासह पुर्ण प्रस्तावाच्या छायांकित प्रती. मा.सचिव यांनी बंद शाळा हस्तांतरीत व स्थलांतरीत व मंजूर संस्थांस दिलेल्या प्रस्तावात केलेल्या टिप्पणीची प्रत इ. माहिती ३० दिवसांत मिळावी. सदर माहिती टपालाव्दारे घेणार असे नमूद केले.

२. अर्जाच्या अनुषंगाने दि.४.९.२०१० रोजी माहितीचा खर्च रु.४/- अधिक रजिस्टर पोस्टाचा टपाल खर्च रु.३५/- असे एकूण रु.३९ इतकी रक्कम चलनाने शासकिय कोषगारात भरण्यांत यावी. चलनाची प्रत सादर केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यांत येईल, असे कळविण्यांत आल्याचे दिसून येते. अपिलकर्ता यांनी दि. १४.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले, प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दि.११.१०.२०१० रोजी सर्व माहिती देण्याचे आदेशित केले. परंतू प्रत्यक्ष माहिती दोन दिवसांत उपलब्ध करुन देण्यांत येईल असे सहाय्यकानी सांगितले आहे. करिता त्यांना दि.१८.१०.२०१० रोजी कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र लिहून त्यात अपिलार्थीनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीसाठी प्रति पेज रु.२/- प्रमाणे ७३ पृष्ठासाठी रु.१४६/- इतकी रक्कम चलनाने शासकिय कोषागारात भरण्यांत यावी,असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. त्याने समाधान झाल्यामुळे अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

३. सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. **प्रथम अपिलाच्या आदेशामध्ये अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले असले तरी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही** असे अपिलार्थी यांनी नमूद केलेले दिसून येते व सोबत संपूर्ण पत्रव्यवहार दाखल केलेला आहे

४. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम **अपिलीय अधिकारी हे आयोगापुढे सुनावणी अनुपस्थित होते. आयोगाने दि.७.१.२०११ रोजी सुनावणीची नोटीस काढलेली आहे ती मंत्रालयातील सामाजिक न्याय विभागास मिळालेली असेल असे गृहीत धरणे आवश्यक आहे** व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगाच्या पुढे सुनावणीस हजर न राहिल्यामुळे आयोगाचा अवमान केलेला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत, कागदपत्र आयोगापुढे दाखल केलेले नाहीत. अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, **जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी सुरुवातीस माहितीचा खर्च रु-४/- प्रमाणे भरावा असे कळविले आहे व त्यानंतर प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या आदेशानंतर रु.२/-प्रमाणे ७३ पृष्ठांचे रु.१४६/- खर्च भरावा असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपिलार्थी यांना सुरुवातीला माहिती उपलब्ध असून सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली दिसून येते** व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत आहेत. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला आहे किंवा नाही याबाबतची कोणतेही कागदपत्र आयोगापुढे सादर केलेली नाहीत व ते राज्य माहिती आयोगासाठी ही गंभीर आहे असे दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास हरकत नाही.

आदेश

४. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात, तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी हे शास्तीस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

५. तत्कालीन जन माहितीअधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना योग्य रित्या माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये शास्ती का लादण्यांत येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत करावा अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यांत येईल व त्यांचे दरमहाच्या वेतनातून वसुल करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

६. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव,सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

४ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०११४/अपील क्र.६३३८/२०१०

श्रीमती वीणा सीप्पी, **अपीलार्थी**
ब्लॉक ५४, प्लॅट ३१, ३ रा मजला,
श्याम निवास, वॉर्डन रोड,मुंबई ४०००२६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुंबई १, शहर
मल्होत्रा हाऊस ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुबई ४००००१

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक **उत्तरवादी**
सहकारी संस्था, डी. विभाग, मुंबई.

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक १२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक ९/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

१. अपिलकर्ता यांनी दि.३०.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था, डी. वॉर्ड यांचेकडे मे २००८ ते अर्जाच्या तारखेपर्यतच्या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

1.Description of the information required certified true copies of all notices issued under section 101 where the notices have not been signed by you but by somebody else.
2. in respect of which of these notice have orders been issued 2 i.e.recovers certificate.
3. The respective amounts of the recovery certificate alongwith the name of the members and their addresse be furnished to me.
4. whether information is required by past or in person information is required in person

सदरची माहिती पोष्टाने किंवा स्वत: घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि.१८.८.२०१० रोजी विचारणा केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते. आपणांस निश्चित कोणत्या संस्थेविषयी माहिती हवी आहे ते दिसून येत नाही तसेच विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने माहितीच्या अधिकारात ती देता येत नाही व मुद्या क्र.३ च्या संदर्भात सुध्दा विचारणा केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येत

नाही. आपणांस कोणत्या संस्थेविषयी माहिती हवी आहे ते नमूद नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२३.३.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये दि.१३.९.२०१० रोजी देण्यांत आला असून अपिल अंशत: मंजूर करण्यांत आले असून माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई यांनी अर्जदार याचे दिनांक ३०.७.२०१० चे अर्जातील मुद्या क्र.१ व २,३ ची माहिती उपरोक्त उल्लेखित केल्याप्रमाणे विहित शुल्क आकारुन देण्यांत यावी. प्रथम अपिलाच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.८.२०१० रोजी जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करणारेच आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारांनी अर्जामध्ये मोघम स्वरुपाची माहिती मागितली असल्याचे दिसून येते असे म्हटलेले आहे. परंतू मुद्या क्र.१ च्या संदर्भामध्ये त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये निश्चित अशी मे २००८ हा कालावधी दिलेला आहे व त्या कालावधीपासून पुढे ज्या कलम १०१ खाली नोटीसेस जारी केलेल्या आहेत त्या सर्व नोटीशीच्या प्रमाणित प्रतीची उपनिबंधक यांनी सांक्षाकित केलेल्या आहे व इतर कर्मचा-यांनी सहया केलेल्या आहेत त्यांच्या प्रमाणित प्रती विचारलेल्या आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची मोघम स्वरुपाची माहिती आहे असे म्हणता येणार नाही. त्यात त्यांनी कोणत्याही प्रकारचे प्रश्न विचारुन जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले नाहीत. मुद्या क्र.१ मध्ये मागितलेल्या नोटीसेसच्या संदर्भामध्ये रिक्वरी सेलचे आदेश निर्गमित केलेले आहेत त्याची प्रत मागितलेली आहे. तसेच रिक्वरी सर्टिफिकेटप्रमाणे प्रत्येकाची किती रक्क्म आहे त्यांची नावे व पत्ते त्यांनी विचारलेले आहेत. याममध्ये कोणतीही मोघम माहिती मागितलेली आहे असे म्हणता येत नाही. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन द्यावी असे त्यांच्या अपील अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई १ शहर यांनी निर्णय दिलेला असल्यामुळे सदरची माहिती मोघत मागितलेली नव्हती हे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांनी मोघम विचारलेली माहिती ही प्रथम अपिलीय अधिकारी यांना मोघम वाटली नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही निश्चित स्वरुपाची असून ती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व तशी ती उपलब्ध करुन न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कलम ७ (१)प्रमाणे ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनिमयांच्या कलम २० प्रमाणे त्यांचे विरुध्द शास्ती कां लादण्यांत येऊ नये अशी विनंती केली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती विशिष्ट कोणतयाी संस्थेची अशी माहिती मागितलेली नाही. तसेच त्यांची वसुली काढलेली असल्यामुळे त्यांनी तशा प्रकारची माहिती मागितलेली आहे. त्यामुळे त्यात कोणतेही व्यापक जन हित नाही. सन २००८ मे पासून जर सर्व नोटीसेस काढून त्यांच्या छायांकित प्रती द्यावयाच्या झाल्या तरी सुध्दा त्या अतिशय व्यापक प्रमाणात नोटीसेस असतात. त्यामुळे ती मोघम आहे असे म्हटलेले आहे. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मोघम आहे असा मुद्या किंवा प्रश्नार्थक माहिती मागितलेली आहे असे विचारात न घेता माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलाचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन ती माहिती मोघम आणि प्रश्नार्थक नाही असेही पुन्हा सिध्द होते. तसेच त्यांनी पुढे

असेही सांगितले आहे की, त्यांनी दि.१६.११.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे व प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये कलम १०१ च्या प्रकरणांची तपासणी घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे जे म्हटलेले आहे त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी तपासणी करुन घेतलेली नाही व त्यामळे ही माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. तपासणीकरिता अपिलार्थी या सुध्दा हया हजर झालेल्या नाहीत परंतू त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तपासणीकरिता यावे, असे लेखी कळविलेले नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे माहिती उपलब्ध असेल तर ती ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. जन माहिती अधिकारी यांनी विशिष्ट नोटीसेसबद्दलची तपासणी करुन त्या अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक झाले असते. परंतू तसे न करता तपासणी करुन घ्यावी व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे पुन्हा प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये आदेश दिलेले आहेत ते सुध्दा योग्य आहेत असे दिसून येते नाही. कारण प्रत्येक प्रकरणामध्ये कलम १०१ प्रमाणे ज्या नोटीसेस दिलेल्या आहेत त्या प्रत्येक प्रकरणांची तपासणी ही अपिलकर्ता यांना करावी लागेल त्यापेक्षा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातून त्या प्रकारच्या नोटीसेसची तपासणी करुन त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे जास्त सोयीचे आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत आहेत व त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द अधिनियमांच्या कलम २० (१) व २०(२)अन्वये शास्ती लादणे हे आवश्यक आहे असे म्हटलेले आहे. परंतू शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१)च्या परंतूकाप्रमाणे उपस्थित जन माहिती अधिकारी यांना शास्ती बाबत खुलासा विचारला असे आयोगापुढे असे सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही मोघम आहे ती विशिष्ट संस्थेच्या संदर्भामध्ये माहिती मागणे आवश्यक होते तशी ती मागितली असती तर ती काढून देता आली असती. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे समाधानकारक नसल्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

४. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मे २००८ पासून अर्जाच्या तारखेपर्यतच्या कालावधीतील त्यांनी सही केलेल्या कलम १०१ च्या नोटीशीच्या छायांकित प्रत व इतर दोन मुद्यांबाबत मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

५. जन माहितीअधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचे दि.३०.७.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमांच्या कलम २०(१)रुपये ५०००/- इतक्या रक्कमेची शास्ती लादण्यांत येत आहे.सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसूल करण्यांत यावी व पुढील लेखाशिर्षाखाली जमा करण्यांत यावी.

" लेखाशिर्ष क्र.००७- इतर प्रशासनिक सेवा

६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)
माहितीचा अधिकार (००७००१६-१) "

६. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

४ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.९/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०७८८/अपील क्र.६३४०/२०१०

श्री.शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष **अपीलार्थी**
समाजवादी पार्टी, हिंगोली,
नविन पाण्याच्या टाकीजवळ, पलटण,
ता.जि.हिंगोली.

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ३२

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी **उत्तरवादी**
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई ३२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २०.११.२०१०
सुनावणीचा दिनांक ९/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

१. अपिलकर्ता यांनी दि.९.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, नगर विकास विभाग, यांचेकडे नगरपरिषद, हिंगोली व्दारा नगर विकास आराखडयामध्ये एन.टी.सी.च्या मालकीची खाजगी जागा ज्याचा आरक्षण क्र.८६ असून सर्व्हे क्र.१४३ व १५४ मधील ३.८० हे.आर. जमिन म्हाडासाठी आरक्षित करण्यांत आली होती. ते आरक्षण महाराष्ट्र शासनातर्फे उठविण्यांत आलेले आहे त्याची प्रत देण्यांत ावी तसेच या आरक्षण उठविण्याकरिता नगर परिषद हिंगोलीने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रांची व घेतलेल्या ठरावाची तसेच वरील सबंधी सर्व टिप्पण्यांची व कागदपत्राच्या सत्यप्रती इ. माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे घेणार असे नमूद केलेले आहे.

२. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१५.१०.२०१०रोजी व दि.२१.१०.२०१० रोजी देण्यांत आला असून, अपिलकर्ता उपस्थित राहिले नाहीत म्हणून मात्र अर्जदाराने पैस न भरल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच कार्यासनातून नोंदणी शाखेत सदरचे पत्र दि.१९.९.२०१० रोजी निर्गमित करण्यासाठी केले व नोंदणी शाखेतून

सदरचे पत्र मात्र दि.३०.९.२०१० रोजी निर्गमित करण्यांत आले. त्यामुळे दि.९.९.२०१० व दि.३०.९.२०१० रोजी हा विलंब नोंदणी शाखेत झालेला आहे. विलंबाबाबत संबंधितांवर कार्यवाही होणे आवयक आहे व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करावा तसेच सदरचे पत्र नोंदणी शाखेतून विलंबाने निर्गति झालेले आहे याबाबत नोंदणी शाखेतील संबंधित लिपिकाविरुध्द नियमानुसार कार्यवाही सुरु करण्यांत यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, आरक्षण नोंदविण्याच्या संदर्भामध्ये जी कार्यवाही झालेली असेल त्या कार्यवाहीची माहिती त्यांना उपलब्ध होणे आवश्यक होते. जन माहिती अधिकीर यांनी दि.९.९.२०१० रोजी पाठविलेले पत्र दि.६.१०.२०१० रोजी उपलब्ध झालेले आहे परंतू ते विहित कालावधीतच्या मुदतीनंतर उपलब्ध झालेले आहे व माहिती मात्र त्यांना मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपिलाचा निर्णय हा विहित मुदतीत दिलेला आहे त्यामुळे नोंदणी शाखेत अपिलार्थीस विलंबाने पत्र निर्गमित केल्यामुळे या कार्यालयातील नोंदणी लिपिका विरुध्द कार्यवाही करण्यांत आलेली आहे. परंतू त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र आयोगापुढे दाखल केलेले नाहीत व त्यामुळे संबंधित लिपिकामुळे ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात विलंब झालेला असल्यामुळे त्यांना अधिनियमाच्या कलम ५ (४) व (५)प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यांत येते व ते अधिनियमाच्या कलम २०(२)अन्वये शास्तीस पात्र आहेत.

३. जन माहिती अधिकारी यांनी पुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, हिंगोली शाळेच्या विकास योजनेमध्ये स.न..१४३ (भाग) प १४४(भाग)मधील एकूण ३.८० हे. खाजगी जमिनीवर म्हाडाचे आरक्षण आहे. सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण या नातयाने म्हाडाने ठराव पारित करुन आरक्षणाखलील जमिनीपैकी ३०टक्के् विना बोजा/विना अतिक्रमण जमीन विनामूलय महाडास हस्तांतरीत करण्याच्या अटीवर उव्ररित ७० टक्के जमिनीवरील आरक्षण वगळण्यास मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे म्ळाडाने दि.२६.४.२००७ च्या पत्रान्वये आरक्षण वगळण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. परंतू हिंगोली नगरपरिषद 'ब' वर्ग नगरपरिषद असल्याने आणि 'ब'व'क 'नगरपरिषदेबाबत समुचित प्राधिकरणाने आरक्षण वगळण्याबाबत विनंती केल्यास त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार संचालक, नगर रचना महाराष्अ्र राज्य,पुणे यांना असल्याने म्हाडाचा सदरचा दि.२६.४.२००७ चा प्रस्ताव शासन नत्र दि.९.७.२००७ अन्वये संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडे पाठविण्यांत आला आहे. त्यावर पुढील कार्यवाही त्याचेमार्फत सुरु आहे. अद्यापपावेतो सदरचे म्हाडाचे आरक्षण वगळण्यांत आलेले नाही व त्यामुळेच मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यासनात मूळ संचिका उपलब्ध नसल्याने संचालक,नगर रचना महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागवून पुर्नबांधणी करण्यांत आलेल्या दुय्यम संचिकेतील संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना म्हाडाच्याआरक्षणाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत कळविणारे शासन पत्र दि.९.७.२००७ ची प्रत देण्यास उपलब्ध असल्याबाबत अपिलकर्ते यांना विहित

कालावधीत दि.९.९.२०१० रोजी कळविण्यांत आले. असे असले तरी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या नस्तीतील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

३. अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील पुर्नबांधणी करण्यांत आलेल्या दुय्यम संचिकेतील म्हाडाच्या आरक्षणा संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या छायाकिंत प्रती विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

४. अपिलकर्ता यांना जन माती अधिकारी यांनी निर्गमित केलेले पत्र ३० दिवसाचे आत उपलब्ध होण्याच्या विलंबास जबाबदार असलेले नोंदणी लिपिक हे अधिनियमाच्या कलम ५(४) (५)प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमांच्या कलम २० (२)अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यांत येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही नगर विकास विभागातील सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

६. सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

४ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.९/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०७८९/अपील क्र.६३३९/२०१०

श्री.शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष **अपीलार्थी**
समाजवादी पार्टी, हिंगोली,
नविन पाण्याच्या टाकीजवळ, पलटण,
ता.जि.हिंगोली.

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी **उत्तरवादी**
अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २०.११.२०१०
सुनावणीचा दिनांक ९/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अपिलीय अधिकारी उपस्थित.

१. अपिलकर्ता यांना दि.९.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी अल्पसंख्याक, विकास विभाग यांच्याकडे क्र.वक्फ-१०/प्र. क्र.३६/भाग-१/कार्य-१० दि.२६.७.२०१० रोजीच्या पत्राव्दारे कळविले होते की, वरील प्रकरणात चौकशी सुरु असून त्याबाबत यथावकाश माहिती कळविण्यांत येईल. त्या केलेल्या चौकशीची व कार्यवाहीची व या संबंधीच्या टिप्पण्यांची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाहीत म्हणून दि.११.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दि.४.१०.२०१० रोजी सदर अपिलीय अधिकारी, अल्पसंख्याक विभाग, यांनी सुनावणी घेतली व प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१२.११.२०१० रोजी देण्यांत आला असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दि.१८.१०.२०१० रोजी दिलेली माहिती तपासण्यांत आली त्या अनुषंगाने नमूद करण्यांत येते की, सदर प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. तथापि अद्याप निर्णय झालेला नाही व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांत आलेले असल्याचे दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलार्थी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी तक्रार अर्ज देऊन एक वर्ष झालेले आहे व त्या संदर्भात अद्यापपर्यत निर्णय दिलेला नाही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा सांगितले की, याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही त्यामुळे कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतू अपिलकर्ता यांनी त्या संदर्भात टिप्पणी उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केलेली आहे परंतू अपिलकर्ता यांची तक्रार व त्यावरील टिप्पणी व इतर कागदपत्र तसेच अहवाल अंतिम निर्णय उपलब्ध झाल्याशिवाय देता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले त्यामुळे सदरचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

२. अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यांत येत असून हया प्रकरणी अंतिम निर्णय झाल्यानंतर त्या निर्णयाच्या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या विनामूल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत याव्यात.

२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.९/२/२०११ **(विलास पाटील)**

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५०/अपील क्र.६२०३/२०१०

श्री.विलासराव देशमुख **अपीलार्थी**
खो. क्र.ए/१, गुरुकृपा चाळ,
हनुमान टेकडी, काजूपाडा, बोरीवली, पूर्व, मुंबई ६६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रबंधक
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, दुसरा मजला,
जुने सचिवालय,विस्तार गृह, महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुबंई ३२

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक **उत्तरवादी**
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, दुसरा मजला,
जुने सचिवालय,विस्तार गृह, महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुबंई ३२

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १०/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.८.२०१० रोजी जन माहिती अधिकार तथा उपप्रबंधक महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे श्रीमती सरस्वती गजानन भावरचे वारसदार व श्री. गजानन शंकर भवर, राहणार सायन, मुंबई या अर्जदाराने आपल्या कार्यालयात (एमआरटी) अर्ज क्र.टीएनसी/१०३४/बी/२००३ दाखल केला होता त्याीच सुनावणी होऊन दि.७.७.२००४ रोजी न्यायाधिकरणाने आदेश देऊन 'जैसे थे ' स्थिती राखण्यास प्रतिवादी मे. विकेयलाल इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि.मुंबई व तहसिलदार ए.एल.टी.बोरीवली, यांना आदेशित केले होते. त्यानंतर वेळोवेळी या प्रकरणी सुनावणी होऊन (एमआरटी)न्यायाधिकरणाने उचित आदेशाची प्रत मागितल्याचे दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१५.९.२०१० रोजी आपणांस कळविण्यांत येते की, आपण संदर्भाधीन मागितलेली माहिती कार्यालयीन वेळेत माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून समक्ष येऊन घेऊन जावे असे कळविलेले असल्याचे दिसून येते. अपिलकर्ता यांनी दि.२०.९.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्या संदर्भामध्ये दि.१५.१०.२०१० रोजी या कार्यालयात दाखल असलेली केस क्र.टीएनसी/१०३४/बी/२००३ मध्ये एमआरटी न्यायाधिकरणाने अद्याप कोणताही आदेश पारित केलेला नाही. सदरची केस कोर्टात अद्याप चालू आहे अशा प्रकारे कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, एमआरटी न्यायाधिकरणाने उचित आदेश काढले आहेत असे त्यांना समजले व त्यामुळे त्यांनी सदरची माहिती मागितली परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यात स्थगिती दिलेली होती व ही बाब

अपिलकर्ता यांना सुध्दा माहिती आहे व त्यांना अंतिम स्थगिती आदेशाची प्रत सुध्दा मिळालेली आहे. परंतू अद्यापपर्यत न्यायाधिकरणाने अंतिम निर्णय दिलेला नाही त्यामुळे त्याची प्रत उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यानी सांगितले. परंतू ज्यावेळी या प्रकरणी अंतिम निर्णय होईल त्यावेळी त्यांची प्रत त्यांना देण्यांत येईल. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांस पात्र आहे.

आदेश

११. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.
२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१०/२/२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२५४/अपील क्र.६२०७/२०१०

श्री.चेतन कोठारी **अपीलार्थी**
५२ ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाबली पटेल लेन ऑफ बी.देसाई रोड,
मुंबई ४०००२६

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त (मुख्यालय)

अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य,
३४१,वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स, वांद्रे पूर्व मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त औषधी विभाग **उत्तरवादी**
अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य,
३४१,वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स, वांद्रे पूर्व मुंबई ५१

---निर्णय---

व्दितीय अपीलाचा दिनांक २३.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक १०/२/२०११.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी. अपिलीय अधिकारी उपस्थित

१. अपिलकर्ता यांनी दि.९.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, आयुक्त, अन्न व औषधी प्रशासन यांचे कार्यालयामध्ये गेल्या १० वर्षामध्ये किती नोटीसेस इश्यूड केल्या. तसेच संपूर्ण किती व कोणत्या कंपन्यांकरिता नोटीसेस इश्यूड केल्या व किती कंपन्यावर शास्ती लागली, गेल्या १० वर्षात किती केसेस झालेल्या आहेत अशी माहिती मागितलेली दिसून येते.

२. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.७.९.२०१० रोजी विषयांति प्रकरणी त्यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल म्हणजे माहिती विस्तृत स्वरुपाची आहे त्यामुळे कार्यालयातील मनुष्यबळ विचार करता कार्यालयाने या माहितीची मागणी प्रमाणाबाहेर व वेळ खर्च होणार आहे त्यामुळे त्यांचा कार्यालयीन कामकाजावर परिणाम होणार असल्याचे कळवून सोबत कार्यासन क्र.२०,१०,११,१२ च्या पत्राच्या प्रती जोडण्यांत आलेल्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम ७(१) व ७(९)चा संदर्भ देऊन माहिती विहित मुदतीत पुरविणे अशक्य असल्याचे कळवून आवश्यक असल्यास माहितीची तपासणी करुन आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविण्यांत येईल असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.१३.१०.२०१० रोजी ज्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यांत आले असून अपिल मान्य केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्या माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती पूर्ण मिळालेली नाही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अतिशय मोघम स्वरुपाची व संपूर्ण राज्यातील कार्यालयातील माहिती आहे व गेल्या १० वर्षातील माहिती आहे. सदरील माहिती ही मुंबई कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनाउपलब्ध करुन देणे अशक्य आहे. संपूर्ण राज्यामध्ये प्रत्येक कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. तरी त्यांच्या कडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक झाले असते. तरी सुध्दा केल्या १० वर्षातील माहिती या कार्यालयाकडे संकलित केलेली नाही व ती उपलब्ध करुन देणे सर्वस्वी अशक्य आहे. तसेच मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देण्याकरिता कार्यालयाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होईल. त्यामुळे सदाची माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य होणार नाही व त्यामूळे प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये दिलेला निर्णय हा बरोबर असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१२. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.
२ .अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१०/२/२०११ **(विलास पाटील)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००५१/अपील क्र.६२८८/२०१०

श्री.शेख अब्दुल नईम अब्दुल करीम,
यु.टी.क्र.८९९, सर्कल क्र.२/४,
मुंबई मध्यवर्ती कारागृह, ऑर्थर रोड, मुंबई ४०० ०११. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (प्रतिबंधक)
शिवाजी मंडई, पोलीस आयुक्तांचे कार्यालय,
मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे)
पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई. **...उत्तरवादी**

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०२-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्याकडे पोलीस उपआयुक्त (प्रतिबंधक) व त्यांचे स्वीय सहाय्यक स्टेनोग्राफर यांनी दिनांक १८-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात येण्याची व कार्यालयात जाण्याची त्याची नोंद माहिती मागितलेली दिसून येते.

सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १७-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती संबंधित कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ३०-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १५-०९-२०१० रोजी देण्यात आला असून प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिलेली माहिती अपिलीय अधिकारी यांना दाखविण्यात आली त्यांनी ती बरोबर असल्याची खात्री केली व पुन्हा सुनावणीच्या वेळी दाखविण्यात आलेली माहिती तत्काळ अपिलार्थीस पुरविण्याबाबत अधिकाऱ्यांना सुचित करण्यात आले. तसेच अपिलार्थीना माहिती पाठविल्याबाबतचा पूर्तता अहवाल कार्यालयास देण्यात सांगितले. त्यामुळे अपिल निकाली काढण्यात आलेले आहे व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दिनांक १६-०९-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व खुलाशावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरचे अपलि हे निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

५) अपिल निकाली काढण्यात येते.
६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई

Gawas/feb 2011

दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००५०/अपील क्र.६२८७/२०१०

श्री. सुदेश सुधाकर सुळे,
१५/अ मुलुंड मृग अर्चना कॉ.हौ.सो.
एस.एन.रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२)
पूर्व उपनगरे, मुंबई कक्ष क्र. २०१, २ रा मजला,
कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२)
पूर्व उपनगरे, मुंबई कक्ष क्र. २०१, २ रा मजला,
कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०४-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०१-०६-२०१० रोजी मुलुंड मृग अर्चना कॉ.हौ.सो.च्या संदर्भामध्ये उपनिबंधक /टी. श्री. तांबे यांनी बेकायदेशीर रक्कमा थकित रक्कम कोणत्या कोणत्या महिन्यांची व वर्षांची हे आदेशात भ्रष्टतापूर्वक नमूद केले नाही त्या संदर्भामध्ये एकूण ५२ मुद्दे उपस्थित करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक २१-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी एकूण ५२ मुद्यावर मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १७-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०९-०९-२०१० रोजी देण्यात आला असून विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यात आलेले आहे. त्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली हे आयोगाच्या निदर्शनास आणले. तसेच अपिलकर्ता हे उपनिबंधक यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे जे अपिल आहे त्यामध्ये ते पक्षकार आहेत असे सांगितले व त्या अपिलातील मुद्यासंदर्भातच त्यांनी विश्लेषणात्मक परंतु प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांचे मत मागण्याच्या दृष्टिने माहिती अधिकारात मुद्दे उपस्थित केलेले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २(च)** प्रमाणे **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्याप्रमाणे कागदपत्रे किंवा अभिलेखांच्या साहित्याच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्यांचा समावेश होतो. **कलम २ (ञ)** अन्वंये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, कागदपत्रे यांची पाहणी करुन छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद केलेली आहे. या दोन्ही व्याख्यांमध्ये जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्राधिकरणातील निर्णय प्रक्रीयेतील गुणवत्तेच्या संदर्भातील अभिप्राय किंवा मत व्यक्त करावे अशी तरतूद नाही व त्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलकर्ता प्रथम अपिलाच्या सुनावणीस हजर झालेले नाही असेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

वरील युक्तीवादावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यात कोणतेही सार्वजनिक व्यापक हित नाही व त्यामुळे अशा प्रकारणाचे मुद्दे उपस्थित करुन माहिती मागणे व अपिल करणे व सुनावणीस उपस्थित न राहून अपिलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

५) अपिल निकाली काढण्यात येते.
६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००६०/अपील क्र.६२८४/२०१०

श्रीमती शबनम अमीन मुलाणी,
एफ/२२, बांद्रा पोलीस वसाहत
दुसरा माळा, आर. के.पाटकर मार्ग,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-९, हिलरोड,
बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पश्चिम प्रादेशिक विभाग, बांद्रा (पश्चिम),
पश्चिम नियंत्रण कक्ष, कॉटर रोड,मुंबई. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ०६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त यांच्याकडे एकूण १५ मुद्दावर माहिती मागितलेली दिसून येते. माहितीच्या मुद्दामध्ये विनापरावानगी कर्तव्यावर गैरहजर होते या संदर्भातील त्यांच्या विरुद्ध केलेल्या कारवाईच्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२-०६-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १३-१०-२०१० रोजी देण्यात आल असून **मुद्दा क्रमांक ५ व १०** वगळून इतर सर्व मुद्दांबाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे **मुद्दा क्रमांक ५ व १०** ची माहिती वरिष्ठ पोलीस निरिक्षक विमानतळ ठाणे, मुंबई यांनी पोलीस ठाण्यात अभिलेखे पडताळून मुळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व १० बाबत अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरिक्षक विमानतळ पोलीस ठाणे यांनी दिनांक ०९-११-२०१० रोजी सादर केलेली माहिती दिनांक १५-११-२०१० रोजी पुरविण्यात आलेली आहे. तद्पूर्वीच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले होते.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे कलम १९(५) अन्वये आयोगापुढे सिद्ध करावयाचे असते अशी तरतूद असताना सुद्धा व त्याबाबत त्यांना पूर्वीच समज दिली असताना सुद्धा आज त्या गैरहजर आहेत.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी शिक्षा प्रस्तावित केलेली आहे, त्या संदर्भामध्ये त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. त्यांनी १५ मुद्यांमध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या मुद्यांच्या संदर्भामध्ये त्यांना चूकीची व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध झालेली आहे. युक्तीवादापुढे त्यांनी निर्णय प्रक्रीयेतील गुणवत्तेबाबत युक्तीवाद केला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेल्या मुद्यां संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता यांच्या विरुद्ध **कारणे दाखवा नोटिस** दिली व शिक्षेचा निर्णय दिलेला आहे. त्यातील पुराव्याच्या संदर्भामध्ये त्यांनी माहिती मागितलेली होती. त्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध होती ती त्यांना दिलेली आहेत. तरीही अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्या विरुद्ध जी कारवाई करण्यात आली आहे ती ज्या नियमाप्रमाणे करण्यात आलेली आहे ते नियम चूकीचे आहे. यावरुन अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी त्यांच्या विरुद्ध झालेल्या कारवाईच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"** या व्याख्येमध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली आणि कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे तपासणी किंवा निरीक्षण करुन त्यातील छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे आणि **"माहिती"** या संज्ञेमध्ये **सार्वजनिक प्राधिकरणात** साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे,अभिलेखे,दस्तऐवज, शासन निर्णय यांचा समावेश होतो. ते अधिनियम किंवा नियम शासन पद्धतीत केलेले असते. त्या अधिनियमाचे किंवा नियमाचे त्यामध्ये समावेश होत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना लागू असलेली सेवा शर्तीच्या नियमाची तरतूदीची मागणी सुद्धा योग्य नाही ते नियमात प्रसिद्ध झालेले आहे. त्या नियमाप्रमाणे जर कारवाई झालेली नसली तर अर्जदारास मा.न्यायालयामध्ये किंवा नियमाप्रमाणे योग्य शासकीय अधिकाऱ्यांकडे अपिल करुन दाद मागता येईल. परंतु त्याकरीता कागदपत्रांच्या स्वरुपात जी माहिती कार्यालयात उपलब्ध असेल ती कागदपत्रे त्यांना माहिती अधिकारात मागता येतात. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे दिनांक १४-०६-२०१० च्या अर्जात जे एकूण १५ मुद्दे उपस्थित केले त्यातील मुद्देनिहाय कागदपत्रे उपलब्ध असतील तर त्यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अभिप्राय मागितलेला असला तरी त्याप्रमाणे अभिप्राय देता येणार नाही असे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मान्य करण्यास पात्र आहे.

----आदेश----

५) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मान्य करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी अपिलकर्ता यांचे

दिनांक १४-०६-२०१० च्या अर्जातील एकूण मुद्यां संदर्भात ज्या ज्या मुद्यांमधून कागदपत्रे उपलब्ध होऊ शकतील त्या सर्व कागदपत्रांच्या छांयाकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००४८/अपील क्र.६२८६/२०१०

श्री.शंभू सरन सक्सेना,
पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,
रे रोड समोर ब्रिज वर,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
'टी' वार्ड , मुलुंड,
मुंबई ४०० ०८०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
'टी' वार्ड , मुलुंड,
मुंबई ४०० ०८०. ...उत्तरवादी

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ३०-०९-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी 'टी' वार्ड यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००८ ते दिनांक ३०-०४-२०१० या कालावधीतील श्री. महेद्र पी. सावंत सहाय्यक अभियंता इमारत विभाग टी वार्ड यांच्या कालावधीतील अवैध बांधकामाच्या संदर्भामध्ये आलेल्या तक्रारी, त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये केलेली कारवाई व कारवाई नंतर अवैध झालेले बांधकामाच्या संदर्भात माहिती पोष्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०३-०८-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता इमारत व कारखाने यांना विहित मुदतीत पत्रोत्तराने अभिलेखाची पाहणी करण्यास तसेच विहित शुल्क भरुन छायांप्रती प्राप्त करण्यास कळविलेले आहे. अपिलकर्त्यास आवश्यक असलेली कागदपत्रे विहित शुल्क भरल्यावर १ महिन्याच्या आत देण्यात यावी असा निर्णय देवून अपिल निकाली काढण्यात आले व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी ४१३ कागदपत्रे दिली आहेत ती सन २००९-२०१० या कालावधीतील आहे व त्यात आवश्यक माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. पूर्वीची माहिती त्यांना दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी कोणत्याही निश्चित एका प्रकारणातील माहिती मागितलेली नसून मोघम अशी माहिती मागितलेली आहे व त्यामुळे त्यांना दिनांक २३-०६-२०१० रोजी अशा प्रकारची माहिती कळविलेली आहे व इतर माहितीच्या संदर्भामध्ये विस्तृत प्रमाणात माहिती असल्यामुळे त्यांनी निरीक्षण करावे व आवश्यक तो माहितीचा खर्च भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले होते. परंतु त्याबाबत अपिलकर्ता यांनी निरीक्षण सुद्धा केलेले नाही व खर्चाचा भरणा सुद्धा केलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार"** म्हणजे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे व त्यामुळे विस्तृत प्रमाणात किंवा व्यापक प्रमाणात मोघम अशी माहिती मागितलेली असल्यास एकतर अंदाजे किती पृष्ठे होतात त्या प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे सुरुवातीच्या ५ दिवसांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या **कलम ७ (३)** अन्वंये कळविणे अपेक्षित असते. मोघम व विस्तृत प्रमाणात माहिती असल्यामुळे कागदपत्रांचे अंदाजे पृष्ठे संख्या कळविणे व कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे खर्च भरुन घेणे किंवा प्राप्त करणेही अपेक्षित आहे व त्याप्रमाणे निरीक्षण करुन आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे असा पर्याय आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत कळविलेले आहे. त्यापैकी अंदाजे निरीक्षण करण्यास कळविलेलेअसते तर, किंवा निरीक्षण केलेले नसले तर त्यांना अंदाजे पृष्ठ संख्या कळविणे प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे कळविणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश-----

५) अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पृष्ठ संख्या व प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे खर्चाचा भरणा विवरण तपशील, रजिस्टर पोस्टाच्या खर्चासहित कळविण्यात यावा व असे कळविल्यानंतर कागदपत्रांच्या छांयाकित प्रती काढून उपलब्ध करुन देण्यात यावी.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)

Gawas/feb 2011

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००४७/अपील क्र.६२८५/२०१०

श्री.शंभू सरन सक्सेना,
पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,
रे रोड समोर ब्रिज वर,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ २)
साऊथ रिजन, नागपाडा, सर जे.जे. मार्ग,
मुंबई ४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
साऊथ रिजन, नागपाडा, सर जे.जे. मार्ग,
मुंबई ४०० ००८. **...उत्तरवादी**

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - ३०-०९-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०२-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २१-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे डॉ. बाबासाहेब गोपले, श्री.बीरडीचंद आझाद, श्री.शंभू सरन सक्सेना, श्री. गायकवाड आणि श्रीमती पुष्पा राजा चालवाडी आणि इतर हे किती दिवस आझाद मैदानावर आंदोलन किंवा धरणा त्यांनी धरले होते, किती वेळा मा. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महामंत्री यांना ते भेटले होते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०८-२०१० रोजी दुरध्वनीवर संर्पक साधुन तयार असलेली माहिती घेवून जाण्यास कळविलेले होते. अपिलार्थी माहिती घेण्यास या कार्यालयात न आल्याने त्यांना माहिती देता आलेली नाही. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २४-०९-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना पोस्टाने माहिती पाठविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो व त्यानंतर अपिलकर्ता यांना सहाय्य पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आझाद मैदान पोलीस ठाणे यांच्याकडून आलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगकडे द्वितीय अपिल दाखल करुन प्रथम अपिलामध्ये सुनावणी घेतली नाही असे कारण दिलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली होती ती माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही व उपलब्ध करुन दिलेली माहिती अपुर्ण आहे. त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये धरणा किंवा निदर्शन आझाद मैदान येथे डॉ.बाबासाहेब गोपले, श्री.बीरडीचंद आझाद, श्री.शंभू सरन सक्सेना, श्री. गायकवाड आणि श्रीमती पुष्पा राजा चालवाडी यांच्या संदर्भामध्ये सन २०००-२००७ मध्ये माहिती मागितलेली होती व त्या मर्यादेतच त्यांची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सर्वसाधारण आहे. त्यामुळे दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अशा प्रकारची माहिती संर्कालत केलेली नसते व प्रत्येक व्यक्तीच्या संदर्भामध्ये १० वर्षाच्या काळामध्ये किती निदर्शने झाली व किती वेळा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेतली याबाबतची नोंद संकलीत करुन ठेवलेली नसते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ७ (९)** प्रमाणे सदरची माहिती संकलीत करावयाची झाल्यास शासकीय यंत्रणेची साधनसामुग्री ही प्रमाणाबाहेर वळवावी लागेल, कामकाज बाजूला ठेवावे लागेल व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही, असे असले तर अपिलकर्ता यांना, जी माहिती उपलब्ध असेल ती तयार माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश-----

५) अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निणय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक २१-०७-२०१० च्या अर्जातील जी माहिती तयार उपलब्ध असेल ती छायांकित कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७२/अपील क्र.६२९९/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७३/अपील क्र.६३००/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२३५/अपील क्र.६२३०/२०१०

श्रीमती शकुंतला एस. केडीया,
केडीया कुंज, ब्लॉक नं.१०/११, २ रा माळा,
२३, जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०५९. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती,
केंद्रीय सुविधा भवन, कळंबोली, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड, नवी मुंबई ४१० २१८.
जन माहिती अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती,
केंद्रीय सुविधा भवन, कळंबोली, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड, नवी मुंबई ४१० २१८. **...उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपीलांचे दिनांक
अपिल क्र. ६२९९ दिनांक - ०९-१०-२०१०
अपिल क्र. ६३०० दिनांक - ०९-१०-२०१०
अपिल क्र. ६२३० दिनांक - २५-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०३-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी **अपिल क्रमांक ६२९९/२०१०** मध्ये दिनांक ०५-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती यांच्याकडे एकूण **६८** मुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०३-०५-२०१० रोजी

मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पुर्वीच माहिती दिलेली आहे व वेअरहाउसींग सोसायटीच्या संदर्भामध्ये माहिती हवी असल्यास कार्यालयात पूर्व परवानगी घेऊन उपस्थित रहावे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी योग्य फी आकारुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला होता. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना पुर्वीसुद्धा याच मुद्यांवर माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना आणखी कोणत्या प्रकारची माहिती पाहिजे त्या माहिती करीता कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांनी माहिती मागितलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचा त्यावरील अभिप्राय सुद्धा मागितलेला आहे. **तसेच त्यांनी सदरच पैसे किती प्राप्त करणार** अशा प्रकारची माहिती मागितलेली आहे व त्यामुळेच गुणवत्तेबाबत माहितीच्या अधिकारामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. त्याचमुळे त्यांनी तशी माहिती दिलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या दिलेली असून त्यामध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे मिळविता येण्याजोगी **"माहिती"** आणि त्यात कागदपत्रे, दस्तऐवज अभिलेखे यांचे निरीक्षण करणे छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व **कलम २(च)** मध्ये **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या असून त्या संज्ञेमध्ये साहित्याच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज स्वरुपात इत्यादीचा समावेश होतो. यावरुन कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेबाबत माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही तर ती कार्यालयामध्ये कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>अपिल क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००७३/अपील क्र.६३००/२०१०</u>

अपिलकर्ता यांनी दिनांक ०३-०४-२०१० रोजी एकून **५२** मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भामध्ये दिनांक ०३-०५-२०१० रोजी त्यांनी कार्यालयामध्ये उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक ३१-०५-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले होते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी मिळाली आहे. अपिलकर्ता यांनी दिशाभूल माहितीच्या संदर्भामध्ये जे निवेदन सादर केलेले आहे. त्या निवेदनास त्यांची ती माहिती गुणवत्तेच्या संदर्भामध्ये युक्तीवाद करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी ५२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे ते मुद्दे कागदपत्रांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली नसून कपोलकल्पीत (Hypothetical) माहिती मागितलेली आहे व त्यामुळे सदर माहितीचे उत्तर देण्यात आलेले नाही असे असले तर अपिलकर्ता यांना

त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. त्या मुद्यांमधून कागदपत्रे किंवा अभिलेखाच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. ती त्यास कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु त्या मुद्यांमध्ये सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या निर्णयाबाबत किंवा प्रकरणाबाबत प्रश्न विचारलेले असतील त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय हा अपेक्षित नाही. जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याचा अधिकार आहे. त्यांच्या त्या प्रकरणातील निर्णय प्रक्रीयासंबधी असेल किंवा नसेल व त्यातील कागदपत्रांच्या स्वरुपात असेलेली माहिती छांयाकित करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२३५/अपील क्र.६२३०/२०१०

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८९ ते माहिती उपलब्ध होईपर्यंत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसुन येते.

Description of the information required :

11) Certified Audited Ledger A/c for Mrs. Shakuntala S. Kedia pertaining to Plot NO. 1192, Road No.13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay3 A/c statement to be balanced Annually.
12) Certified Policy decisions taken regarding Levy & Waivet of Delay payment charges by the Market Iron & Steel committee.
13) Certified Copy of the Rules & Regulations of the Market Iron & Steel Committee.
14) Certified copies of any recovery order passed / pending against Mrs.Shakuntala S.Kedia or pertaining to Plot NO.1192, Road NO. 13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay.
15) Certified copies of Forfeit Notice issued / pending against Mrs.Shakuntala S.Kedia or pertaining to Plot NO.1192, Road No.13, Kalamboli, Iron & Steel Warehousing Complex, New Bombay.

सदरची माहिती स्पीडपोस्ट मार्फत घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०७-०७-२०१० रोजी अपिलकर्ता यांना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलात त्यांनी नवीन माहिती मागितलेली दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, **मुद्दा क्र.१ व २** ची माहिती दिलेली आहे. **मुद्दा क्र.३** च्या संदर्भामध्ये खर्च भरणा करावे असे कळविलेले आहे. **मुद्दा क्रं. ४ व ५** ची माहिती दिलेली आहे. खर्च भरणा त्यांनी केलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलामध्ये नवीन माहिती मागितलेली दिसून येते व प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अर्जादाराने ते माहितीच्या अर्जात मागितलेले आहे. तसेच फक्त माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकारे नवीन

माहिती प्रथम किंवा द्वितीय अपिलात मागता येत नाही. प्रथम किंवा द्वितीय अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबत कारणमिंमासा देणारी माहिती अपेक्षित असते व त्यामुळे अपिलकर्ता यांना दिनांक ०७-०७-२०१० रोजी दिलेली माहिती व खर्चाचा भरणा करण्याच्या संदर्भात योग्य असल्यामुळे सदर अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

७) अपिल क्रमांक ६२९९/२०१० व अपिल क्रमांक ६३००/२०१० ही दोन्ही अपिले अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक ०५-०४-२०१० च्या दोन्ही अर्जाच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय कागदपत्रे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्या मुद्यांमध्ये गुणवत्तेबाबत अभिप्राय किंवा विश्लेषण मागितलेले असेल ते अपेक्षित नाही परंतु ते स्पष्ट कळविणे आवश्यक आहे. सदरची माहिती उपलब्ध करुन देताना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी योग्य ते नियंत्रण यंत्राची माहिती उपलब्ध करुन द्यावी ती जबाबदारी प्रथम अपिलीय अधिकारी यांची राहील. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

८) अपिल क्रमांक ६२३०/२०१० हे निकाली काढण्यात येते.

९) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००६४/अपील क्र.६३११/२०१०
क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५००६१/अपील क्र.६३१२/२०१०

श्री.दिपक धयालकर,
५/४४,बि.डी.डी.चाळ,गणपत जाधव मार्ग,
वरळी नाका,मुंबई ४०० ०८६. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
खोली क्र.४६, १ मजला, जुनी इमारत,
महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१.
जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक (आयुक्त),
खोली क्र.४६, १ मजला, जुनी इमारत,
महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१. ...उत्तरवादी
प्रथम अपिलीय अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक(प्र.),
करनिर्धारक व संकलक खाते,
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालय,
जुनी इमारत, तळमजला, महापालिका मार्ग,
मुंबई ४०० ००१.
जन माहिती अधिकारी तथा उप करनिर्धारक व संकलक(जकात),
बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत,
३ रा मजला, पलटन रोड,मुंबई ४०० ००१.

----निर्णय---

द्वितीय अपीलांचे दिनांक - ०८-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त तसेच उपनिर्धारक व संकलन (जकात) तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुलुंड चेकनाक्यावरील अधिकारी / कर्मचारी आणि महानगरपालिकेचे खाजगी ठेकेदारांचे कर्मचारी तसेच बृन्हमुंबई महानगरपालिका आणि प्रत्येक खाजगी ठेकदार यांच्यात करारान्वये झालेल्या निविदेच्या प्रत्येक वर्षाच्या प्रती व प्रत्येक खाजगी ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी महापालिकेला जकातीद्वारे प्राप्त करुन दिलेल्या उत्पन्नाच्या लेखाविषयक प्रतिवर्षाचा

अहवाल, महानगरपालिकेने खाजगी ठेकेदाराला त्याच्या कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यासंबंधी दिलेल्या रकमांचा प्रत्येक महिन्यांच्या अहवालाच्या प्रती, खाजगी ठेकेदाराचे नांव, वास्तव्याचा पत्ता, फोन नंबर, त्यांच्या कार्यालयाचा पत्ता, फोन, व्यवसास नोंदणी दाखला प्रत,महानगरपालिकेतील जकात वसुलीचे स्थान, तसेच खाजगी ठेकेदार भरत असलेल्या विविध कराची नक्कल प्रत,बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व मुलुंड जकात नाक्यावरील प्रत्येक कार्यालयातील १) अधिकारी/कर्मचारी व खाजगी ठेकेदांराच्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण नावे,२) पद, ३) शैक्षणिक अर्हता, ४) जकात नाक्यावर नियुक्त दिनांक, ५) त्यांचे पेस्केल, ६) पी.एफ., ७) ग्रॅज्युइटी, ८) विमा, ९) संपूर्ण पगार, १०) इतर सुविधा इत्यांदीची माहिती, तसेच खाजगी ठेकेदार व चेकनाक्यावरील संबंधित अधिकारी निविदेमधील कामगारांविषयक अटी/शर्तीचा किंवा आपल्या कामगार कायदयानुसार पालन होत असल्यास त्याबाबत संबंधित कामगार कायदे ह्यांचे प्रती देऊन कोणत्या कामगार कायद्यांचे पालन झाले ते दाखवावे आणि आपल्या कोणत्या कामागार कायद्याचे पालन झाले नाही दाखवून त्यांची अंमलबजावणी करुन त्यांची भारतीय घटनेच्या अनुच्छेदाप्रमाणे पारदर्शक माहिती द्यावी. माहिती स्पीड पोस्टद्वारे मिळावी असे नमुद केलेले दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५-०४.२०१० रोजी सदर अर्ज हा उपकरनिर्धारक व संकलन (जकात) यांचेकडे हस्तांतरण केलेले आहे असे दिसून येते. अर्जाच्या संदर्भामध्ये व हस्तांतरण झालेल्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती दिलेली दिसून येते. त्यामध्ये एकूण ८७ छांयाकित प्रतीमध्ये उपलब्ध असलेली माहिती प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे एकूण रु. १७४/- जकात कार्यालयामध्ये येऊन भरल्यास सात दिवसांमध्ये छांयाकित प्रती उपलब्ध होतील त्या घेऊन जाव्यात असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक १८-०३-२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्यांचे पूर्वीच्या अपिलांच्या संदर्भामध्ये सुद्धा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १७-०५-२०१० रोजी दोन अपिले अनुक्रमे, मा.आयुक्त अपिलीय प्राधिकारी आणि करनिर्धारक व संकलक (जकात) अपिलीय अधिकारी यांचे कडे दाखल केले. पुन्हा सदरचे अपिल हे करनिर्धारक यांच्याकडे हस्तांतरित केलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १५-०६-२०१० रोजी मुलुंड येथील दोन्ही चेकनाक्यांची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक व वेळ निश्चित करुन अपिलार्थीनी उपस्थित प्रतीचे निरीक्षण करुन त्यांचे त्यास दिलेले दिसून येते व त्याबाबत विहित शुल्क आकारावेत असाही आदेश दिलेला दिसून येतों. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, आयुक्त कार्यालयातील अर्ज हे मुदतीत हस्तांतरण केलेले नाही व हस्तांतरण करताना सहाय्य वगैरे घेतलेले नाही अशी तक्रार द्वितीय अपिलामध्ये नमुद केलेले आहे व तसे दिशाभूल करणारी अशी उत्तरे दिलेली आहेत. त्यांच्याविरुद्ध शास्ती करावी अशी विनंती केली. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिल मेमोमध्ये जी कारणे दिलेली आहेत त्या कारणांमध्ये माहिती उपलब्ध झाली किंवा नाही त्याऐवजी विश्लेषण केलेले आहे. युक्तीवाद करताना त्यांनी आयोगापुढे माहिती उपलब्ध झाली नाही अशा प्रकारचा युक्तीवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगपुढे असे सांगितले की, सर्वात प्रथम माहिती जर करनिर्धारक या कार्यालयात उपलब्ध आहे तर अपिलकर्ता यांनी आयुक्त यांच्याकडे माहितीसाठी अर्ज करणे योग्य नव्हते. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ६** प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना अर्ज करणे अपेक्षित असते व त्यामुळे आयुक्तांकडे अर्ज करावयाचे व योग्य रीतीने हस्तांतरित केलेले नाही. असे अर्ज करावयाचे हे योग्य नव्हते याचा अर्थ अपिलकर्ता माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा कार्यालयातील अधिकाऱ्यांना वेठीस कसे धरता येईल याबाबत तत्पर दिसून येतात.

तसेच अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५-२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. मुळातच अर्जामध्ये ठेकेदारानी जकात किती वसूल केले याबाबत विचारणा केलेली आहे. त्या संबंधात खाजगी ठेकेदार जर नेमले असतील तर ते जकात वसूलीकरीता नेमलेले असतात. जकात वसूलीही महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनाकडूनच केली जाते. जकातनाका ठेकेदाराची नियुक्ती केली

जातात ते त्याला किती किंवा इतर साफसपाईच्या संदर्भामध्ये जे नियुक्ती केले जातात तसेच ठेकेदाराला नियुक्त केल्यानंतर ठेकेदारांचे त्यांनी घेतलेल्या कर्मचाऱ्यांना किती वेतन देतात व कोणकोणत्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती करीता याबाबतची माहिती ही कार्यालयामध्ये उपलब्ध नसते व त्यामुळे तशी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. अपिलकर्ता यांना जी बदली झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे दिली त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जकातनाका कोणत्याही कर्मचाऱ्यांना ३-४ महिन्यांनंतर ठेवले जात नाही तर बदली केले जाते व त्यामुळे बदली केलेल्यांची यादी त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ती ८७ प्रती छांयाकित प्रती उपलब्ध आहे त्याबद्दल त्यांना खर्च द्यावयाचे म्हणून कळविलेले आहे व त्याप्रमाणे त्यांनी खर्च भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावयास पाहिजे होती ती घेतलेली नाही. तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, यापूर्वी सुद्धा अपिलकर्ता यांना दिनांक १८-०३-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. महापालिकेने जकात नाक्यावर नेमलेले ठेकेदार मे.क्रिस्टल ट्रेड कॉम.प्रा.लि. हे नाक्यावरील साफसफाईच्या कामाशी संबंधित असून मे.एस.टेलिव्हॉइस अँड सर्व्हिसेस प्रा.लि. हे जकात नाक्यावरील कॉम्प्यूटर सिस्टमशी संबंधित असून मे.विमान एंटरप्राईझेस हे वजनकाटयाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या कर्मचाऱ्यांची माहिती जकात खात्याने जतन करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे सदरहू माहिती मुख्यालयाकडे नाही असे उप के.वस.(ज) व जन माहिती अधिकारी म्हणाले. तसेच अपिलकर्ता यांना ठेकेदाराच्या कामाचे स्वरुप समजावून सांगितले होते व त्यामुळे त्यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांना दिनांक ०६-०५.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे ८७ पृष्ठांच्या छांयाकित प्रती हव्या असतील तर त्यांनी रु.१७४/- भरणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----आदेश----

५) अपिल निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६६/अपिलक्र ६३०९/२०१०

येरळवाडी विकास मंडळ,
द्वारा, चंद्रकांत सी. बागल,
५ सी, अव्वल बाग इस्टेट, ९४ सी, डी.एस.पी रोड,
दादर(पूर्व),मुंबई - ४०० ०१४. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हा अधिकारी कार्यालय (पुर्नवसन शाखा),
सातारा, जिल्हा - सातारा.

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तथा पुर्नवसन अधिकारी,
सातारा, जिल्हा - सातारा. **..उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक :०७.०२.२०११
अपिलकर्ता - उशिरा उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०७-०४-०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी (पुनर्वसन) कार्यालय, सातारा यांच्याकडे येरळवाडी पुनर्वसनाच्या संदर्भामध्ये एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.०६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे पुन्हा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्ता हे उशिराने उपस्थित झाले व त्यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने आतापर्यंत त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचे दिनांक ०७.०४.२०१० च्या अर्जाची दखल घेतली नव्हती व त्या संदर्भामध्ये संबंधित लिपिकास नोटीस देण्यात आलेली आहे. परंतु प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. वास्तविक प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या मेमोचे अवलोकन केले असते तर त्यात त्यांना अपिलकर्ता यांनी दिनांक ०५.०४.२०१० रोजीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये संदर्भ आढळून आला असता व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देता आले असते. परंतु तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्याबाबत कोणतीही कर्तव्य तत्परता दाखविलेली नाही व अपिलकर्ता गैरहजर या कारणास्तव अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. म्हणजे त्यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना कार्यकारी अभियंता, धोम पाटबंधारे विभाग यांची माहिती त्यास दिनांक ०३.०२.२०१० रोजी जानेवारी २०१० च्या अर्जाप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु काही माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे तसे आयोगापुढे सांगितले. परंतु त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये पाटबंधारे खात्याने माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा मुद्दा क्र. १, २ व ३ इत्यादीच्या बाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना त्या संदर्भामध्ये एकूण १० मुद्यांमध्ये मुद्देनिहाय माहिती छांयाकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी तथा पुर्नवसन सातारा यांनी मंडळ अधिकारी श्री.पी.एम. दगडे यांना कारणे दाखवा नोटीस जर दिली असेल तर त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे **कलम २०(१)** अन्वये शास्ती लादणे

आवश्यक राहील. जेणे करुन माहितीचा अर्ज हा अशा पद्धतीने गहाळ करणे किंवा संबंधित जन माहिती अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून न देण्याच्या वृतीस आळा बसेल व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

---आदेश---

७) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक ०५.०४.२०१०(०७.०४.२०१०) च्या अर्जामधील एकूण १० मुद्यांच्या संदर्भात मुद्देनिहाय माहिती उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

८) अपिलकर्ता यांचे दिनांक ०५.०४.२०१०(०७.०४.२०१०) च्या माहिती अर्ज हा कार्यवाही साठी न घेतल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास न आणल्यामुळे तत्कालीन अव्वल कारकून श्री.पी.एम.दगडे यांच्याविरुद्ध रु.१००००/- शास्ती लादण्यात येईल. सदर शास्तीची वसूली ही त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यात येवून " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)." या लेखाशिर्षा मध्ये जमा करण्यात यावी. सदरची वसूली ही जिल्हाधिकारी कार्यालयात होण्यासाठी निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

९) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२१३/अपील क्र.६२११/२०१०

श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला,
काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड,

घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६. **...अपिलकर्ता**

----विरुद्ध----

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७.
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७. **...उत्तरवादी**

----निर्णय---

द्वितीय अपीलाचा दिनांक - २६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सहाय्यक आयुक्त (इमारत व कारखाने) एन वार्ड यांच्याकडे, काकुभाई रंगवाला बिल्डीगच्या संदर्भामध्ये पावसाळी छप्पर लावण्याची परवानगी देण्याच्या संदर्भामध्ये एकूण ८मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०६-०९-२०१० रोजी अपिलकर्ता यांना सर्व मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामध्ये संबंधित नस्तीचे निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ०९-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १७-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कळविलेले असल्यामुळे अपिल निकाली काढण्यात आले असे दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी त्यांचे माहितीचा अर्जामध्ये Bootlegger Family पावसाळी छप्पर टाकण्याचा अर्जा संदर्भामध्ये झालेली कार्यवाहीची संपुर्ण कागदपत्रांची छायंकित प्रती मागितलेली होती असे असताना नस्तीचे निरीक्षण करावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी कळवायाची आवश्यक नव्हती. त्या संपूर्ण नस्ती मध्ये जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्या सर्व कागदपत्रांची छायांकित प्रतीचा खर्च तयार आहे. इतर मुद्यांच्या संदर्भामध्ये सुद्धा त्यांच्याकडे कागदपत्रे जी

उपलब्ध आहे त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित होते. त्यांनी मागितलेले मंजूर नकाशा सदंर्भामध्ये दिनांक ०८-०५-१९८० चा नकाशा उपलब्ध नाही. हे म्हणणे म्हणजे माहिती उपलब्ध असून सुद्धा देण्याची टाळाटाळ करणे असे म्हणावे लागते. अपुर्ण माहिती दिलेली असताना सुद्धा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी न घेता निर्णय दिलेला आहे व ते अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अधिकार २००५ चे **कलम २ (ञ)** प्रमाणे **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या त्यांनी दिलेली आहे व त्या व्याख्येमध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व मिळविता येण्याजोगी माहिती त्यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेखे, कागदपत्रे यांचे निरीक्षण करुन व त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व त्यामुळेच अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात आलेले होते. प्रत्येक नस्तीमध्ये आवश्यक कागदपत्रे व अनावश्यक कागदपत्रे असतात. त्यातील कागदपत्रे अर्जदारास आवश्यक असतील त्या कागदपत्रांचे छांयाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते. असे असल्याने जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकरली असे होत नाही. परंतु त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी सर्वच कागदपत्रांची माहिती मागितलेली आहे आवश्यक व अनावश्यक कागदपत्रांचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्याबाबत आपण खर्चाचा भरणा केला असता व तसे ही त्यांना दिनांक ०६-०९-२०१० चे पत्र मिळाले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र आयोगाकडे सादर केलेले आहे. त्यावर कार्यालयतून सदरचे पत्र निर्गमित केल्याचे दिसून येते. त्यावरील पत्ता श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला, काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड, घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६ असे दिलेले आहे व त्यावरुन सदरचे पत्र हे निर्गमित केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की,अशा प्रकारचे पत्र हे साध्या टपालाने पाठविले जाते व तसे त्यांनी करण्याची पद्धत आहे. दिनांक ०६-०९-२०१० रोजीचे पत्र त्यांना निर्गमित करण्यात आलेले आहे. राज्य माहिती आयोगाची सुनावणीची नोटीस सुद्धा अपिलकर्ता यांना त्याच दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आलेली आहे व ती त्यांना उपलब्ध झालेली आहे व जन माहिती अधिकारी किंवा अपिलीय अधिकारी यांनी पाठविलेल्या पत्रात त्यांचा पत्ता पाठविलेले पत्र त्यांना उपलब्ध झालेले नाही असा निष्कर्ष काढता येणार नाही असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक असल्यामुळे अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक १०-०८-२०१० रोजी अर्जांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०९-२०१० चे पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे असून सुद्धा युक्तीवाद करताना त्यांनी मुद्दा क्रमांक ४ मधील sanction plan उपलब्ध नाही याबद्दल मात्र आयोगापुढे असे सांगितले की, यापूर्वी sanction plan पाहिलेले आहे व ते आता उपलब्ध नाही असे जे म्हणतात ते योग्य नाही. परंतु त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पुन्हा शोध घेऊन sanction plan उपलब्ध झाल्यास दिला जाईल. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

५) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक १०-०८-२०१० च्या अर्जामध्ये मुद्देनिहाय मागितलेली माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय माहिती उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रतीच्या स्वरुपामध्ये **Sanction plan** उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./५०२१२/अपील क्र.६२१२/२०१०

श्री.प्रकाश काकुभाई रंगवाला,
काकुभाई रंगवाला बंगलो, १७-ए, हिराचंद देसाई रोड,
घाटकोपर (पश्चिम),मुंबई ४०० ०८६. ...अपिलकर्ता

----विरुद्ध----

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,

एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७.

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन विभाग कार्यालय,
घाटकोपर, मुंबई ४०० ०७७. **...उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपीलाचा दिनांक - २६-१०-२०१०
सुनावणीचा दिनांक - ०७-०२-२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०-०८-२०१० (०९-०८-२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (आरोग्य) एन वार्ड यांच्याकडे मे. वसंत भेलपुरी व थंडपेय यांच्याकरीता दिलेले अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये एकूण ८ मुद्दांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ०९-०९-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला असल्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती उपलब्ध करुन देत नाही व माहिती लपविण्याचा प्रयत्न करतात व त्यांचे अर्जाच्या संदर्भामध्ये काही कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दिनांक ११-०८-२०१० रोजी हॉटेल मालकाकडून हॉटेल संबंधित माहिती न पुरविण्याचे कळविलेले असल्याने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसे अपिलकर्ता यांना दिनांक ३१-०८-२०१० रोजी कळविलेले आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये सुद्धा निर्णय दिलेला दिसून येत नाही मात्र आता आयोगापुढे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलकर्ता यांना मागितलेली सर्व कागदपत्रे देण्यात येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक १३-०१-२०११ रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आतापर्यंत कोणतेही तपशील किंवा माहिती किंवा पत्रव्यवहार मिळालेला नाही. त्यावर विद्यमान जन

माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती जरी उपलब्ध करुन दिलेली नसेल तर आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक १३-०१-२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

हॉटेल मालकांनी हरकत घेतली म्हणून माहिती उपलब्ध करुन देता आली नाही हे म्हणणे म्हणजे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निर्कष काढावा लागतो. कोणत्या नियमाप्रमाणे अनुज्ञाप्ती दिलेली असेल तर ते सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होतो. अनुज्ञाप्ती प्रत्येकाची वैयक्तिक माहिती होत नाही व त्यामुळे अनुज्ञाप्तीच्या संबंधित सर्व कागदपत्रे ही सार्वजनिक अभिलेखे असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे व त्यामुळे तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध **कलम २०(२)** अन्वये शिस्तभंगाची शिफारस करणे आवश्यक राहील. आयोगापुढे सुद्धा गांभीर्याने उपस्थित न होता खुलासा सादर न करता जन माहिती अधिकारी हजर झालेले आहेत. जन माहिती अधिकारी हजर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी जर माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल तर ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय कागदपत्रे छायांकित प्रती देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

७) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांनी त्यांचे दिनांक १०-०८-२०१० च्या अर्जामध्ये व अनुज्ञाप्तीच्या संदर्भामध्ये मागितलेली मुद्देनिहाय माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

८) अपिलकर्ता यांचे दिनांक १०-०८-२०१० अर्जाच्या अनुषंगाने तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ११(१) अन्वये कोणतीही कारवाई न करता हॉटेल मालकांनी हरकत घेतल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही असे कळविल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निर्ष्कष काढावा लागतो व त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते. सदर शिस्तभंगाची कारवाई त्यांना लागू

असलेल्या सेवा नियमाप्रमाणे सक्षम अधिकारी यांना करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

९) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक:मुमाआ/नोंदणी क्र./ /अपील क्र.१६४०/२०१०

तक्रारदार यांनी दिनांक ०८-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे आलेल्या माहितीचा अर्जा संबंधामध्ये व तसेच इतर वेगवेगळया विषयासंबधीत माहिती एकूण १२ मुद्दांमध्ये मागितलेली दिसून येते. विहित मुदतील माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१) अन्वये तक्रार केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपिलकर्ता यांना जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही त्या माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक २५-०८-२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहितीचा अर्ज हा शेकडो असल्यामुळे आवक नोंद वहीचे inspection घेणे म्हणजे त्यांना माहिती उपलब्ध करुन घेता येईल तसेच मुद्दा क्र. २ ते ७, ८,९,१०,१२ च्या संदर्भामध्ये वेगवेगळया विभागाकडून माहिती मागविण्यात आलेली आहे व ती माहिती उपलब्ध झाल्यावर पुरविण्यात आलेली आहे अस कळविलेले आहे. तसेच अपिलकर्ता यांनी सदर अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपिल दाखल केलेले नाही. मा.उच्च न्यायालयामध्ये अनेक प्रकारचे विभाग आहे व वेगवेगळया विषय त्यांच्याकडे दिलेले आहे व त्यामुळे त्यांच्याकडून माहिती संकंलीत करुन घेण्यासाठी विलंब होणे अपरिहार्य

आहे तसेच मा.उच्च न्यायालयतील माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची आवश्यक असते.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६५/अपिलक्र ६३१३/२०१०

श्री. प्रकाश पा.कटके,
१०२/३, अे विजया वैशाली नगर,
के.के. मार्ग, महालक्ष्मी (पूर्व),
मुंबई - ४०० ०११. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद - ४३१ ००४. महाराष्ट्र.

जन माहिती अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद - ४३१ ००४. महाराष्ट्र. **..उत्तरवादी**

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०१.०२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडे, duplicate Migration Certificate and Merit Certificate मिळावे असा माहिती अर्ज केला होता. माहितीचा कालावधी ०९.०१.१९९१ ते २५.०१.२०१० असून त्याकरीता त्यांनी फी सुध्दा भरलेली आहे. त्याप्रमाणे DO99549 for MERIT CERTIFICATE AND MIGRATION CERTIFICATE OF M.A. (Eco.) examination held in April 1983 under Seat No.10760 उपलब्ध करुन द्यावी म्हणून माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०५.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी duplicate Migration Certificate उपलब्ध करुन देण्याकरीता Original Migration Certificate हे गहाळ झालेले आहे व पुढील शिक्षणासाठी आवश्यक आहे असे बॉण्ड पेपर द्यावे लागेल. तसेच Merit Certificate च्या संदर्भामध्ये जे जे विद्यार्थी परीक्षा with exemption पास झालेले आहेत त्यांना दिले जात नाही व त्यामुळे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ०३.०८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०६.०९.२०१० रोजी दिलेला आहे व त्यामध्ये त्या कार्यालयाने Statement of Marks, Migration Certificate, अर्थशास्त्रामध्ये जे गुणवत्ता यादीत आहेत व Ordinance ची छांयाप्रत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे दिलेले आहे. परंतु त्यानंतर अपिलकर्ता यांनी राज्य माहती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. द्वितीय अपिलाच्या सुनावणीमध्ये अपिलकर्ता यांनी त्यांना Migration Certificate माहिती अधिकारात करुन द्यावे असे मागितलेले असून सुध्दा अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेले नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, Merit Certificate सुध्दा त्यांनी पूर्वी उपलब्ध करुन दिलेले नव्हते व Migration Certificate मात्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले होते. तरी सुध्दा त्यांनी आयोगापुढे शपथपत्र दाखल केलेले आहे व त्यामध्ये Merit Certificate उपलब्ध करुन द्यावे. या सदंर्भात Ordinance 101 व 102 च्या प्रती विश्लेषण केलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, Merit Certificate हे त्यामुळेच उपलब्ध करुन दिलेलेच नाही असे दिसून येते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे त्यांना Merit Certificate उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्यामध्ये **सार्वजनिक प्राधिकरणात** असलेली व अधिनियमाने मिळविता येण्याजोगी माहिती त्यात एखादे काम, कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे यांची पाहणी करुन व त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे तसेच **"माहिती"** या संज्ञेचा अर्थ **सार्वजनिक**

प्राधिकरणामध्ये साहित्यांच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, दस्तऐवज,अभिलेखे इत्यादींचा समावेश होतो. यावरुन उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा होतो. त्याप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध नाही ती तयार करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक ०५.०३.२०१० रोजी त्यांचे दिनांक ०१.०२.२०१० रोजीच्या अनुषंगाने उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य आहे असे दिसून येते. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिलाच्या मेमोचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकर्ता यांना उपलब्ध असेलेली कागदपत्रे, दस्तऐवज किंवा अभिलेखे यांच्या छांयाकित प्रतीच्या ऐवजी त्यांनी Merit Certificate च्या संदर्भामध्ये गुणवत्ता निकाषावर कारवाई करुन मुळ Merit Certificate अपेक्षित दिसून येते. ती बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या वर नमुद केल्याप्रमाणे तरतुदीमध्ये येत नाही. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

जन माहिती अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीची माहिती आहे असे दिसून येत नाही. माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही बाब सिद्ध करण्याची जबाबदारी अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची आहे. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केलेले नाहीत व त्यामुळे मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ तरतुदीचे योग्य रीतीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांना सुनावणीसाठी उपस्थित राहण्याकरीता त्यांनी समज देणे अपेक्षित आहे.त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

७) अपिल निकाली काढण्यात येते.

८) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

९) सदर निर्णयाची एक प्रत मा. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना स्वतंत्रपणे उचित कारवाईसाठी पाठविण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६७/अपिलक्र ६३१०/२०१०

येरळवाडी विकास मंडळ,
द्वारा, चंद्रकांत सी. बागल,
५ सी, अव्वल भंग इस्टेट, ९४ सी, डी.एस.पी रोड,
दादर(पूर्व),मुंबई - ४०० ०१४. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
मु.पो.वडुज आणि येरळवाडी
ता.खटाव, जिल्हा - सातारा- ४१५ ००६.

२) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत
येरळवाडी, ता.खटाव, जिल्हा - सातारा- ४१५ ००६.

३) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
उप विभागीय कार्यालय, वडुज, जिल्हा परिषद,
सार्वजनिक बांधकाम विभाग, वडुज, जिल्हा - सातारा. **...उत्तरवादी**

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०५.०४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, खटाव यांच्याकडे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या संदर्भामध्ये धारीकेतील गाव खटाव, जिल्हा सातारा, व मु.पो.येरळवाडी या संदर्भात दिनांक ०१.०४.२००५ ते ३१.०३.२०१० या कालावधीतील माहिती व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे नियुक्त केलेले अधिकारी यांची माहिती द्यावी. तसेच येरळवाडी ग्रामपंचायत सभागृहासाठी येणाऱ्या प्रकल्पाच्या संदर्भामध्ये एकूण ५ विषयांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक ०७.०४.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या मागणीनूसार माहिती ही जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जिल्हा सातारा यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने सदरचा अर्ज ग्रामसेवक, ग्रामपंचायत येरळवाडी यांच्याकडे वर्ग करण्यात येत आहे. त्यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर ग्रामपंचायत येरळवाडी दिनांक ११.०५.२०१० रोजी मागितलेली संपुर्ण माहिती इंग्रजी या भाषेत असल्याने इंग्रजी भाषेचा अर्थ कळत नसल्यामुळे मराठी या भाषेतून मागवावी. ग्रामपंचायतीकडील उपलब्ध माहिती समक्ष पहाण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये वेळ व दिनांक कळवून उपस्थित राहील्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते.त्यावर दिनांक १६.०५.२०१० रोजी तुम्ही स्वतः diploma धारक आहे व त्यामुळे भाषेची काही अडचण असल्यास काही कारण नाही तसे अर्जामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती द्यावयाची आहे व कार्यालयात भेट दऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन जावी असे त्यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २१.०६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक १९.०७. २०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय माहिती उपअभियंता सातारा जि.प.(बां.) उपविभाग खटाव वडूज यांना कळविलेले दिसून येते व तसेच दिनांक १९.०७.२०१० रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरचा अर्ज हा इंग्रजी भाषेत असल्यामुळे त्याबाबत अर्थ कळत नसल्यामुळे तसे अपिलकर्ता यांनी कळविलेले होते. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही एकूण १४ विभागांच्या विषयी आहे व त्या विभागांना कळविलेले आहे व अर्जदारास ज्या विभगाने कळविलेले आहे व यातील काही विभाग उप अभियंता सातारा, जि.प. बांधकाम उपविभाग वडूज यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १९.०७.२०१० च्या अन्वये माहिती तयार असून रक्कम भरणेकामी कळविलेली आहे व गट विकास अधिकारी पंचायत समिती खटाव (वडूज) यांचे पत्र दिनांक १०.०८.२०१०अन्वये मुद्दा क्र. १ ते ७ बाबतची माहिती तयार असून त्याचे रु.१२/- भरणेकामी कळविलेले होते. परंतु अर्जदार यांनी रक्कम भरलेली नाही. तसेच दिनांक १९.०७.२०१०च्या अर्जामध्ये सुद्धा या सुंदर्भामध्ये रु.१२/- भरणे आवश्यक आहे व तसेच पुरविण्यात

येणारी माहिती एकूण पाने संख्या २०४/- इतकी आहे. प्रती पाने रु.२/- प्रमाणे रु.४०८/- व पोस्टेज खर्च अंदाजे रु.१००/- अशी एकूण रक्कम या कार्यालयाकडे जमा करण्यात यावी. माहिती शुल्क पुरविल्यानंतर माहिती सत्वर देण्यात येईल. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी खर्च भरणा केलेला आहे. परंतु त्यांना येरळवाडी बहुउद्देशीय सार्वजनिक सभागृह बांधण्याचा व दलितवस्ती अंतर्गत रस्ता खडीकरण व डांबरीकरण संदर्भामध्ये Voucher देयके इत्यादी बाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. प्राप्त खर्च भरणा एकत्रित करण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी ग्रामसेवक ग्रामपंचायत उपअभियंता या संदर्भामध्ये नियम असलेले संपुर्ण कागदपत्रे, Voucher,अभिलेख व इतर कागदपत्रांची छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

अपिलकर्ता यांनी अर्जदार म्हणून माहिती मागताना कोणतेही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अनेक विषय असल्यास व त्या विषयाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त केले असते त्या संबंधित जन माहिती अधिकारी यांचे त्याच विषयाच्या संदर्भामध्ये माहिती मागणे ही अपेक्षित असते. जनेकरुन अशी माहिती ३० दिवसामध्ये उपलब्ध होवू शकते. एखाद्या अर्जामध्ये अनेक विषयी माहिती मागितलेली असल्यास तो अर्ज हस्तांतरीत करुन त्याप्रमाणे ३० दिवसात माहिती मिळेल त्याबाबत खात्री देता येत नाही व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती ३० दिवसात उपलब्ध होवू शकते असे असले तरी अपिलकर्ता यांचे दिनांक ०५.०४.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने उर्वरीत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्या करीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

----आदेश---

५) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना येरळवाडी बहुउद्देशीय बांधकामाच्या संदर्भामध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भामध्ये Voucher देयके प्रमाणपत्रे यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच येरळवाडी रस्ते खडीकरण व डांबरीकरणाच्या संदर्भामध्ये Voucher देयके, अंदाज पत्रके वगैरे कागदपत्रांच्या स्वरुपात छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक तसेच उपअभियंता हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./४९६४३/अपिलक्र ६३३३/२०१०

श्री.विजय एच.जयस्वाल,
३५, कांता निवास, डी.जे.रोड,
विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
मु.पो.रत्नागिरी,
जिल्हा - रत्नागिरी.

जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,
मालगुंड पोलीस स्टेशन, मु.पो. मालगुंड,
जिल्हा - रत्नागिरी. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : ०१.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - प्रतिनिधी उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १०.०६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक यांच्याकडे दिनांक ११.०२.२००९ रोजी दाखल केलेली FIR कलम ३६३, ३६४,५०६ आणि ३४ श्री. जगदीश कदम आणि इतर यांच्या विरुद्ध तसेच दिनांक ०९.०२.२००९ चे श्री. सिद्धार्थ जयस्वाल यांनी दिलेले पत्रांच्या संदर्भामध्ये तपासाबद्दलची माहिती व तक्रारीच्या संदर्भामध्ये झालेली कार्यवाहीची माहिती सन २००८ पासून ते आतापर्यंतची माहिती व्यक्तिश: घेणार असे

नमुद केलेले दिसून येते. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी सदर अर्ज हा दिनांक २४.०६.२०१० रोजी उप विभागीय पोलीस अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०६.०७.२०१० रोजी माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त खर्च रु.३१/- इतका आहे व शुल्क कार्यालयाकडे प्रदान करण्यात यावे किंवा Money order किंवा शासकीस कोषागरे यांच्याकडे करावे. चलनाची प्रत पाठवून व माहिती ३० दिवसांत घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २३.०७.२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २३.०९.२०१० रोजी देण्यात आला असून अतिरिक्त खर्च भरणा केला नसल्यामुळे सदर अपिल हे फेटाळण्यात ओलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता गैरहजर आहे. द्वितीय अपिल मेमोमध्ये जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे नमुद केलेले आहे. जन माहिती माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जो अर्ज केलेला आहे तो जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता पोलीस निरीक्षक यांच्याकडे केलेले आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर अर्ज दिनांक २४.०६.२०१० रोजी प्राप्त झालेले आहे. अर्जात मागितलेली माहितीच्या संदर्भात दिनांक ०६.०७.२०१० रोजी म्हणजे विहित मुदतीत अपिलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भात अतिरिक्त खर्च भरणा रु.३१/- करावा असा तपशीलात कळविलेले होते. तसेच मुद्दां क्र.१, २ व ३ च्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्देनिहाय उत्तर दिलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांनी खर्च भरणा सुद्धा केलेला नाही व माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असूनही केव्हाही माहिती घेण्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित झालेले नाही व त्यामुळे प्रथम अपिल याच कारणास्तव फेटाळण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे बरोबर असून अपिलकर्ता यांनी स्वतः अर्ज करताना जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेले नाही व त्यामुळे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हा मुद्दा निकाली निघतो. अर्जातच अपिलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांनी दिनांक ०६.०७.२०१० रोजी कळविल्यानंतर त्यांनी खर्च भरणा करुन व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते तसे न करता त्यांनी प्रथम अपिल व द्वितीय अपिल दाखल केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

५) अपिल निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५०१६२/अपिलक्र ६३३७/२०१०

श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले,
सिध्दिविनायक प्रसार डॉ. शामा प्रसाद,
मुखर्जी रोड, डोंबिवली (पूर्व), ४२१ २०१. ...अपिलकर्ता
ता.कल्याण,जि.ठाणे.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव),
शहर बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई' विभाग, ३ रा मजला,
१० शेख हफिअुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर -२,
बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई' विभाग, ३ रा मजला,
१० शेख हफिअुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई ४०० ००८. ..उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २०-०७-२०१० (२२-०७-२०१०) रोजी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर बृहन्मुंबई महानगरपालिका 'ई'विभाग यांच्याकडे मुंबई उच्च न्यायालयाची इमारतीच्या संदर्भामध्ये ऐतिहासिक वास्तू म्हणून कोणत्या तारेखस, कोणत्या महिन्यास, कोणत्या वर्षी घोषित करण्यात आली, त्या भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ किती चौरस मीटर आहे, तसेच भुखंडावर एकूण क्षेत्रफळ किती चौरस मीटर बांधकाम करण्यात आलेले आहे, संबंधीत नव्याने करण्यात येणाऱ्या बांधकामाबाबत जी नियमावली आहे, अेनॅक्स बिल्डिंगवर नव्याने चौथा मजला बांधण्यात आला तसेच संबंधित अेनॅक्स बिल्डिंगच्या दोन्ही बाजूस जुनी बांधकाम तोडून (जे पूर्वी तळ अधिक एक मजल्याचे) नव्याने चौथा मजला पर्यंतचे बांधकाम करण्यात आले सदर बांधकामामुळे एकूण किती चौरस मीटर बांधकाम नव्याने करण्यात आले, नव्याने करण्यात येणाऱ्या बांधकामाबाबत राज्य शासनाच्या वतीने जो प्रस्ताव दाखल करण्यात आला त्या प्रस्तावाची छायांकित प्रत, नवीन बांधकामास मान्यता देताना मुंबई संस्कृती वारसा जतन समिती कोणकोणत्या निकषात शिथिलता प्रदान केली, मुंबई संस्कृती वारसा जतन समितीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रती, तसेच बांधकाम मंजूरीच्या छाननीपत्रकाची तसेच धारिकेची सत्यप्रत मिळावी अशी माहिती एकूण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती कालावधी सन २०००-२०१० आहे. माहिती शीघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १३-०८-२०१० रोजी मागितलेली माहिती बाबतची धरणी कार्यालयात उपलब्ध आहे. संबंधित धरणी चे अवलोकन हवे असलेले आराखडे व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती खालील शुल्क भरुन आपणांस उपलब्ध करुन घेवू शकता. झेरॉक्स प्रतीसाठी लागणारा खर्च आपणांस करावा लागेल व त्याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.मंजूर आराखड्याच्या व कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसाठी व त्यासाठी जाण्यायेण्यासाठी लागणारा खर्च अर्जदारास करावा लागणार आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दिनांक २५-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २९-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी खर्च भरावे असे कळविलेले असल्यामुळे व अपिलकर्ता यांनी खर्च भरणा केला नसल्यामुळे सदर अपिल हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी द्वितीय अपिला सोबत त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे व जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न देता अर्ज निकाली कसा निघू शकतो याचा अर्थबोध होत नाही. अर्जदाराने आपल्या अर्जात स्पष्टपणे कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतींची मागणी केलेली आहे ती पोस्टाने पूर्वसुचना देवून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत संबंधित धारिणीची अवलोकन करुन हवी असलेले आराखडे व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती खालील शुल्क भरुन आपणांस उपलब्ध करुन घेवू शकता. झेरॉक्स प्रतीसाठी लागणारा खर्च आपणांस करावा लागेल. प्रमाणित प्रती हव्या असल्यास खालील शुल्क आकरण्यात येईल या गोष्टीचा संबंधच येत नाही कारण अर्जदाराने अर्जात कुठेही कागदपत्रे बघण्याबाबत वेळ व दिवस याची मागणी केलेली नाही. सबब

जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्याची टाळाटाळ करीत आहेत. तसेच अर्जदाराने ज्या कागदपत्रांची मागणी केली आहे त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रमाणित प्रतीसाठी रु.२५/- एका बाजूस हे शुल्क कोणत्या हिशोबाने नमुद केले आहे याचा अर्थबोध होत नाही. कारण एका पानांच्या दोन्ही बाजूच्या झेरॉक्स प्रत काढण्यासाठी रु.२/- खर्च येतो व प्रमाणित करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे. तसेच अर्जदाराने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसाठी जो खर्च येतो त्याची एकूण रक्कम नमुद करणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी तसा खर्च नमुद केला असता तर अर्जदाराने व्यक्तीश: किंवा मनीआर्डरने शुल्क पाठविले असते व त्यामुळे तपशीलात नमुद केलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतूदी अन्वये नि:शुल्क देण्याचा आदेशीत व्हावेत व दंडात्मक कारवाई व्हावी असे नमुद केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती अधिकारी २००५ चे **कलम २ (ञ)** अन्वये **"माहितीचा अधिकार"**या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येमध्ये कोणत्याही **सार्वजनिक प्राधिकरणाकडे** असलेली किंवा त्याच्या नियत्रंणात असेलेली व अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे व त्यामध्ये १) एखादे काम, दस्तऐवज,अभिलेख यांची पहाणी करणे; २) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखाच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे; ३) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे; ४) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉलिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्ट आऊट) मार्फत माहिती मिळविणे याबाबतचा अधिकाराचा समावेश होतो. त्याप्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५ चे **नियम ४** मधील तरतुदीप्रमाणे निरीक्षण करण्याकरीता अपिलकर्ता यांना कळविलेले होते. माहिती जर व्यापक प्रमाणात असेल व जुनी असेल तर निरीक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांची माहिती उपलब्ध करुन घेणे असे त्यांची तरतुद आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्यावे लागते. छायांकित प्रतीच्या संदर्भामध्ये महानगरपालिका यांनी खालील नियमाच्या अनुषंगाने त्यांनी खर्च भरणा व खर्चासंदर्भामध्ये आकरणी कळविण्यात आली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही वैयक्तिक आकरणी करण्यात आलेली नाही. मात्र छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरीता कार्यालयात झेरॉक्स मशीन उपलब्ध नसेल तर त्याकरीता बाजारात जाऊन छायांकित प्रती काढून उपलब्ध करुन द्यावी लागते. त्याकरीता संपुर्ण नस्ती देण्याकरीता कोणत्याही प्रकारच्या वाहतूक वाहन महापालिकेने पुरविलेली नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी महापालिकेतील कर्मचाऱ्यास वाहतूक वाहनाचा खर्च करावा लागतो व वाहतूक वाहनाचा खर्च करण्यासाठी कळविण्यात आले होते. परंतु असे असले तरी महापालिकेस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे छांयाकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरीता स्वतंत्रपणे नियम करण्याचा अधिकार नाही. महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या **नियम ४** प्रमाणे प्रत्येक विभागाने नकाशे व आरखडा उपलब्ध करुन देण्याकरीता खर्चाची आकरणी करण्याकरीता नियम केले असतील त्याप्रमाणे नकाशे व आराखड्या करीता खर्चाची आकारणी करणे तसेच A साईज आकाराचे कागदापेक्षा मोठा आकार असेल तर प्रत्यक्ष झेरॉक्स आकरणी खर्च व टपाल खर्च व नेहमीच्या आकाराचा कागद असेल व माहिती तयार असेल रु.२/- प्रती पृष्ठे आकरण्यात यावी अशी तरतूद आहे व त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्याच प्रमाणे आकारणी करणे आवश्यक होते. प्रमाणित करणे व सांक्षाकित करणे यामध्ये निश्चित फरक आहे. प्रमाणित करुन द्यावयची असेल तर पुर्वीच्या नियमाप्रमाणे आकरणी करणे आवश्यक असते. परंतु सांक्षाकित करण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे अतिरिक्त शुल्क घेणे अपेक्षित नाही. सांक्षाकित करणे यांचा अर्थ **"माहिती अधिकारात"** छायांकित प्रती उपलब्ध

करुन दिली व प्रत्येक अशाप्रकारे स्वाक्षरी करुन देणे व त्याप्रमाणे अतिरिक्त खर्च पुन्हा भरणे आवश्यक नाही. अपिलकर्ता यांनी निरीक्षण करावे असे जे कळविलेले आहे ते राज्याच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे असल्याने माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे असे निकष काढण्यात येत नाही. त्यांनी वरील युक्तीवादाप्रमाणे त्यांना जी माहिती हवी आहे ती प्रती पृष्ठे संख्या कळवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्या अधिनियमाचे **कलम ७(३)** प्रमाणे मागितलेली माहितीचे मुद्देनिहाय संदर्भामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्रांची संख्या व प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे व तसे टपाल खर्च अपिलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते व त्याप्रमाणे कळविल्यावर अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश-----

५) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांनी मागितलेली माहिती एकूण ८ मुद्यांच्या संदर्भामध्ये जी धारिणी असेल त्या धारिणीमध्ये असलेले एकूण कागदपत्रांची संख्या विवरण व प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे खर्चाची आकारणी तसेच नकाश किंवा आराखडा असेल त्याप्रमाणे आकारण्यात यावयाची फी व टपालखर्च आकारण्यात यावा. तसे कळविल्यानंतर अपिलकर्ता यांनी संबंधित खर्चाचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांना कळविल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्या छायांकित प्रती काढून अपिलकर्ता यांना नोंदणीकृत टपालाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ/नोंदणी क्र./५०१४४/अपिलक्र ६३३६/२०१०

श्री.दिलीप बी. नेवाटिया,
शशी दीप, ५-A, वरळी सीफेस,
मुंबई ३ ४०० ०३०. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३.

जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,
ना.म.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३. **..उत्तरवादी**

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०६-०४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उद्योग भवन, प्लॉट नं.२५०-D, S.No.१६२९, वरळी इस्टेट, मुंबई च्या संदर्भामध्ये असलेली कागदपत्रे देयके, नोटीस, अभिलेखे, पत्रव्यवहार च्या संदर्भामध्ये निरीक्षण करुन आवश्यक असेलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देण्याबद्दल तसेच वर्षनिहाय निरीक्षण व मजले निहाय निरीक्षण दिनांक ०१-०४-२००४ व ३१-०३-२०१० काळावधीतील तसेच अर्ध वर्षिक देयके दिनांक ०१-०४-२००४ तसेच एकूण १५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दिनांक २३-०४-२०१० रोजी दिनांक ०६-०५-२०१० रोजी वेळ ११.०० ते ५.०० काळावधीत आपण मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये निरीक्षणाची फी भरुन माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर निरीक्षणाअंती दिनांक २१-०५-२०१० रोजी अपिलकर्ता यांनी त्यांना आवश्यक असेलेली कागदपत्रांच्या प्रमाणित छायांकित प्रती उपलब्ध

करुन देण्यासाठी जी य़ादी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिली. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक ०२-०६-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला नाही. अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. मात्र दिनांक १९-०६-२०१० रोजी अपिलकर्ता यांना संपुर्ण माहितीचा अतिरिक्त खर्च रु.१११४६/- (रु.२३०/- प्रत्येक मालमत्ता प्रत्येक वर्षाकरीता व त्यानंतर रु.२/- छायांकित प्रती व रु.५०/- प्रमाणित प्रती करीता) कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक २८-०७-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. दिनांक ११-०८-२०१० रोजी पुन्हा अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलीय अधिकारी च्या संदर्भात --- कळवून मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग यांचे दिनांक ०९-०७-२०१० चा निर्णय देण्याचे निदर्शनास आणण्यात आले व त्याप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०८-२०१० रोजी प्रथम अपिलाचा निर्णय देवून माहिती अधिकारातंर्गत प्रती देण्याबाबत करनिर्धारक व संकलन खात्याच्या परिपत्राकानुसार अपिलकारास पाठविलेले उत्तर बरोबर आहे. त्यानुसार करनिर्धारक व संकलन खात्याकडील माहिती अधिकारांर्गत द्यावयाच्या प्रतीबाबत प्रसारित करण्यात आलेल्या परिपत्रकाची प्रत अपिलकारास देण्यात यावी. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या बाबीबाबत अपिलकार समाधानी असल्यामुळे अपिल निकीलात काढण्यात येत आहे असे सुनावणी दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी जी आकारणी केलेली आहे ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे केलेली नाही व त्यामुळे त्यांनी आकारणी रक्कमेची भरणा केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास येणाऱ्या खर्चाकरीता नियम केलेले आहे व त्या नियमाप्रमाणे / परिपत्रकाप्रमाणेच आकारणी करण्यात आलेली आहे. परंतु सदरची आकारणी ही अवाजवी आहे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असे नियमात म्हटले असल्यामुळे त्याप्रमाणे आकारणी करणे संयुक्तिक राहील. तसे प्रमाणित करण्याकरीता खर्च आकारणी ही सुद्धा योग्य नाही. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे पुन्हा युक्तीवाद केला, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी, कलम ६ अन्वये माहिती

मिळवण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणतीही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसांच्या आत, एकतर विहित करण्यात येईल अशा फीचे प्रदान केल्यावर माहिती देईल, तसेच पोटकलम (३) मध्ये माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असेल त्याबाबतीत राज्य जन माहिती अधिकारी यांनी पोटकलम (१) अन्वये विहित केलेली फी नुसार जादा रक्कम त्याने कशाच्या आधारे ठरविली त्या हिशेबासह, माहिती पुरविण्याचा त्यांने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशील व त्याद्वारे त्यांना फी भरण्याची विनंती करेल अशी तरतुद आहे. पोटकलम (१) प्रमाणे विहित करण्यात आलेली अशी फी आकरण्याचा आर्थिक देय कलम २७(२) अन्वये पोटकलम २ (--) अन्वये फी च्या संदर्भामध्ये समुचित शासनाला नियम करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे समुचित शासनाने महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ हे पारित केलेले आहे व त्या नियमाचे कलम ४ प्रमाणे खालील प्रमाणे तरतूद आहे. ‘‘----------’’

वरील तरतुदीप्रमाणे महापालिकेने नकाशे व आराखड्या करीता जर खर्च आकारणी करण्याकरीता नियम केले असतील त्या नियमाप्रमाणे फी आकारणे संयुक्तिक राहील. त्या नंतर कोणत्याही प्रकारचे नियम माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे करण्याचा अधिकार हा महापालिकेस नाही. त्याचप्रमाणे माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात प्रत्यक्ष तयार आहे त्या करीता प्रति पृष्ठ रु.२/-, परंतु जर कागदाचा आकार A ४ पेक्षा जास्त असेल प्रत्यक्ष छायांकित प्रतीच्या खर्च व आकरणी खर्च अशी तरतूद आहे. प्रमाणित करुन देण्याकरीता कोणत्याही प्रकारचे आकारणीची तरतूद नियमात नाही व त्यामुळे A४ आकाराचा कागदप्रतीच्या स्वरुपात जर माहिती उपलब्ध असेलतर प्रति पृष्ठे रु.२/- व त्यापेक्षा मोठ्या आकाराचा कागद असेल त्या छायांकित प्रतीचा खर्च, टपाल खर्च व नकाशा व आराखडा आकारण्यात येणारा खर्च करणे संयुक्तिक राहील. प्रमाणित करण्याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारात छायांकित प्रती उपलब्ध करुन दिली व धारिका यांची सांक्षाकित करुन देणे आवश्यक आहे व त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त खर्च आकारणे योग्य होणार नाही. तसेच वाहतुक वाहनाचा खर्च सुद्धा आकारण्यात येणार नाही. सांक्षाकित करण्याकरीता महापालिकेच्या नियमाप्रमाणे आकारणी केली असेल तर आयोगाच्या नियमात म्हटले असेल तर महापालिकेने आकारणी केलेला खर्च हा अवाजवी दिसून येतो. प्रमाणित करणे व सांक्षाकित करणे यामध्ये निश्चितच फरक आहे. प्रमाणित करुन द्यावयाची असल्यास खर्च आकरणी करणे योग्य आहे. परंतु सांक्षाकित करण्याच्या

संदर्भाम्ध्ये वर नमुद केल्याप्रमाणे धारिकेची आकारणी करणे आवश्यक नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

५) अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांनी आवश्यक असलेल्या कागदपत्रांचा खर्च हा वर विवेचन केल्याप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६२/अपिलक्र ६३३५/२०१०

श्री.सुभाष यशवंत मोरे,

सी-६०३, विनस अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि.,
चोगले नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ..उत्तरवादी

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०९-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वैद्यकीय अधिकारी गट-ब पदे सामान्य प्रशासन विभाग निर्णयानुसार गट-अ अंतभूत केल्याबाबतची प्रत मिळणे, सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय क्र.संघट-१०९६/२८३/२६९६/सेवा-६, दिनांक १७ जुलै १९९६ ची माहिती समक्ष घेणार, तसेच दिनांक १३-०७-२०१० रोजीच्या अर्जावर काय कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे अशी माहिती मागितलेली दिसून येते.विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २७-०८-२०१० रोजी प्रथमअपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अर्जदाराने दाखल केलेला अर्ज हा दिनांक १३-०७-२०१० रोजी जर दाखल केला असेल तर तो वेगवेगळया शाखामधुन माहितीचा अधिकार म्हणून दिनांक १५-०९-२०१० रोजी प्राप्त झाला व त्यानुसार दिनांक १०-१०-२०१० च्या पत्रान्वये अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच पुन्हा माहितीची छायांकित प्रत अस्पष्ट असल्याबाबत त्यांनी पुन्हा दिनांक २३-११-२०१० रोजी सदर शासन निर्णयाची

स्वच्छप्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव कार्यासन सेवा - १ यांच्याकडे अद्याप प्राप्त झालेला नाही व अपिलावर निर्णय देता आलेला नाही. सदर अपिलाच्या सुनावणीची नोटीस शाखेच्य चुकीमुळे अन्य अपिलीय प्राधिकारी व उप सचिव यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व अपिलकर्ता आज गैरहजर असल्यामुळे सदरचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

५) अपिल निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००६३/अपिलक्र ६३३४/२०१०

श्री.संतोष कुमार तिवारी,
सी-०४, न्यु मीरा पॅराडाईज,
गिता नगर, मिरा-भाईंदर रोड,
मिरा रोड (पूर्व), ठाणे. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कस्तुरबा क्रॉस रोड नं. २, कस्तुरबा म्युनिसिपल स्कुल नं.२,
सभागृह,तळमजला, बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कस्तुरबा क्रॉस रोड नं. २, कस्तुरबा म्युनिसिपल स्कुल नं.२,
सभागृह,तळमजला, बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :२९.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०९.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

अपिलकर्ता यांनी दिनांक १६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे आतापर्यंत प्रकल्प जातीच्या संदर्भातील किती प्रमाणेपत्र निर्गमित केले व सर्व जातीच्या प्रमाणप्रत्रांची छायांकित प्रती व श्री. किशोर संखे यांनी सही केलेल्या प्रमाणपत्रांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच श्री. किशोर संखे यांनी सही अधिकारी असल्याने प्रमाणपत्र सुद्धा उपलब्ध करुन देण्यात यावी. अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०२-०८-२०१० रोजी मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये एकूण जातीचे प्रमाणपत्रे नस्तीचे १३०० x १० कागदपत्रे झेरॉक्स प्रती एकूण १३००० व प्रत्येक प्रतीसाठी प्रती पृष्ठे रु.२/- प्रमाणे रु २६०००/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव दिनांक २४-०६-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलाचा निर्णय न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक ०२-०८-२०१० चे पत्र आहे ते १० व्या महिन्यात प्राप्त झालेले आहे. परंतु त्यांनी दाखविलेले स्टॅम्प चे अवलोकन केले असता १० आकडा हा वर्षाचा असून महिना ८ च दिसून येतो व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी जावक नोंद वहीची तपासणी केली असता त्यामध्ये ऑगस्ट महिन्यात जावक नोंदणी क्रमांक घेऊन निर्गमित केलेले दिसून

येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्च भरणा करावा असे केलेले दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही केलेली असून माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली नाही असा निकष काढावा लागतो. त्याकरीता अपिलकर्ता यांचे हित सदरचा खर्च भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) अपिल निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०९-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/१५३२/तक्रार क्र.८

श्रीमती विशाखा विनायक इंगळे,
बी/६, अलंकार को.ऑ.हौ.सोसा.(लि.),
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),
मुंबई -४०० ०८९. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१.
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),

एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

तक्रारदार यांनी त्यांचे दिनांक ११-०५-२०१० रोजीच्या प्रशासकीय अधिकारी (शाळा) एम/ पश्चिम तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाचे कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या संदर्भामध्ये दिनांक ०५-०१-२०११ रोजी आयोगाच्या कार्यालयातून सुनावणीची नोटीस देण्यात आली होती त्या तक्रारीची आज सुनावणी देण्यात आली.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी त्यांच्या स्वत:च्या सेवा पुस्तकाची छायांकित प्रमाणित सत्यप्रत मागितलेली होती. सदरची छायांकित प्रती व्यक्तीश: घेणार असे नमुद केलेले होते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२०१० रोजी कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका हा वैयक्तिक स्वरुपाची कार्यालयीन अभिलेखे असल्यामुळे याबाबतच्या नोंदी, उतारे ह्या कागदपत्रांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती देणे शक्य नाही. परंतु त्यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. परंतु त्यांनी स्वत:ची सेवा पुस्तिकेची प्रत मागितलेली असल्यामुळे ते कोणत्याही प्रकारे गोपनीय असू शकत नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीचे **कलम ८** मधील माहिती प्रकट करण्याचा अपवादामधील मुद्यां संदर्भामध्ये समाविष्ठ होत नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका ही त्यांची वैयक्तिक बाब असल्यामुळे ती गोपनीय असते व त्यामुळे ती उपलब्ध करुन देणे ते योग्य नाही.

परंतु कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी हा सार्वजनिक सेवक असल्यामुळे व सार्वजनिक सेवा करीता असल्यामुळे त्यांची स्वत:ची सेवा पुस्तिका ही सार्वजनिक अभिलेखांची भाग होते व त्यामुळे सदरची सेवा पुस्तिका ही गोपनीय नाही व ती त्यांच्या कर्मचाऱ्यांची किंवा अधिकाऱ्यास ऐरवी सुद्धा उपलब्ध करुन दिली जाते व त्यामुळे तक्रारदारास त्यांनी मागितलेली स्वत:ची सेवा पुस्तिकेची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ११-०५-२०१० रोजीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती व्यक्तिश: उपलब्ध करण्यात येईल. त्याकरीता हा निर्णय मिळाल्यापासून १०

दिवसांच्या आत तक्रारदार यांनी व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२१०७/तक्रार क्र.९

श्रीमती विशाखा विनायक इंगळे,
बी/६, अलंकार को.ऑ.हौ.सोसा.(लि.),
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),
मुंबई -४०० ०८९. ----तक्रारदार

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक महापालिका आयुक्त,
एम/पश्चिम विभाग, एम विभाग कार्यालय इमारत,
शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१.
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),
एम/पश्चिम महानगरपालिका विभाग कार्यालय,

चेंबूर (पूर्व),मुंबई -४०० ०७१. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित

तक्रारदार यांनी दिनांक २६-०३-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा) एम/पश्चिम यांच्याकडे, स्टेशन चेंबूर मनपा मराठी शाळा क्रमांक २ येथील शिक्षक कर्मचारी यांचे वार्षिक मुल्यमापन तसेच वार्षिक तपासणी अहवाल (inspection) अहवाल इत्यादी तुलनात्मक तक्ता यांच्या छायांकित प्रती मागितलेली असून माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक ११-०५-२०१० रोजी सहाय्यक आयुक्त यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय माहिती दिली असल्यामुळे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु तक्रारदार यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयाविरुद्ध द्वितीय अपिल दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. वास्तविक तक्रारदार यांनी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे द्वितीय अपिल दाखल करणे आवश्यक होते.

तक्रारदार यांनी आयोगाच्या सुनावणीस असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना कुरिअर ने माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला होता व त्याबाबतचा पत्र क्रमांक एम /प / ९३४५ दिनांक २०-०४-२०१० आहे व माहिती त्यांनी कुरिअर मार्फत घेतली नाही. कुरिअर परत आलेले आहे. तरीही सदरची माहिती ही प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्याकडे उपलब्ध नसते. प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्याकडे तपासून दिलेली आहे किंवा याबद्दलची माहिती मिळू शकते. परंतु अहवाल हा त्या त्या शाळेतच उपलब्ध असतो व त्या शाळेचे मुख्यध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी सदरची तपासणी अहवाल हा त्या शाळेच्या मुख्यध्यापकाकडे मागणे संयुक्तिक झाले असते व त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी संबंधित शाळेकडेच जाणे आवश्यक असल्याने माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
Gawas/feb 2011

दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२९८९/तक्रार क्र.३३

श्री.दिगंबर शंकर गिरमे,
सिटी सर्व्हे नं. ४२२, कसबा पेठ,
पुणे -४११ ०११. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,
गृह विभाग (पोल-१३),
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पोल-१३),
गृह विभाग (पोल-१३),
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११

तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

तक्ररदार यांनी त्यांचे अपिल क्रमांक २००९/५५२२/०२ चे दिनांक २०-०८-२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे तक्रार दाखल केलेली दिसून येते.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी गृहविभाग यांनी तक्रारदार यांना दिनांक ०९-०९-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे, विधी व न्याय विभाग यांनी सामान्य प्रशासन विभाग यांना दिलेल्या अर्जाबाबत गृहविभागाने माहिती द्यावी असा आग्रह धरलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे अन्वये माहिती ज्या विभागाशी संबंधित आहे त्याच विभागाशी अर्जदाराने संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे असे असले तरी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२९९०/तक्रार क्र.३४

श्री.दिगंबर शंकर गिरमे,
सिटी सर्व्हे नं. ४२२, कसबा पेठ,
पुणे -४११ ०११. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस संचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा उप-सहाय्यक पोलीस महानिरिक्षक (गोप.),
पोलीस संचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :१०.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.

जन माहिती अधिकारी - उपस्थित.
तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

तक्ररदार यांनी त्यांचे अपिल क्रमांक २००९/५५०३/०२ चे दिनांक १८-०८-२०१० च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली दिसून येते.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना आतापर्यंत संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु तक्रारदार यांची गुणवत्तेच्या संदर्भामध्ये व निर्णय प्रक्रीयेच्या संदर्भामध्ये तक्रार आहे.

तक्रारदार यांनी सुद्धा युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये योग्यरीत्या तपास कार्यवाही केलेली नाही. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती दिल्यास, दिलेली माहिती ही कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेबाबत किंवा निर्णय प्रक्रीयेबाबत आयोगाकडे मुद्दे उपस्थित करता येते नाही. आयोग हे न्यायालय किंवा तक्रार निवारण केंद्र सुद्धा नाही व त्यामुळे तक्रारदार यांना अपिलाचा निर्णयाप्रमाणे पोलीस आयुक्त पुणे यांच्याकडून आलेल्या उत्तराची प्रत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदर तक्रार ही निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १०-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ/नोंदणी क्र./५००५६/अपिलक्र ६२९२/२०१०

श्री.जगजीतसिंग काहलोन,
सचिव-सोसायटी फॉर अवेरनेस ऑफ सिव्हील राईटस्,
जे-२२०,अन्सा, साकी विहार रोड,
साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९. ...अपिलकर्ता

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त (मुख्यालय),
अन्न आणि औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांचे कार्यालय,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (मुख्यालय),
अन्न आणि औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांचे कार्यालय,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०२.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी अन्न व औषध यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

g. Please provide access to the copies of the licenses issued by the competent authority under the NDPS Act 1985 and Maharashtra NDPS rules 1985 in Form OP-I,!! including sub sections of various allottees of codeine Phosphate in above period. Provide Xerox copies of requested info thereafter.
h. Provide access to the reports of the inspection carried our by the Officers of FDA who have inspected the consignments of the Narcotic Drugs under the Maharashtra NDPS rules 1985 section 79(4) at various establishments in the said period.
i. Provide access and inspection of file on the letter of intimation received from the Superintendent of Factories Govt. Opium and Alkloid factories to the state Drugs Controller on despatch of material codeine phosphate to the Mfgrers (allotees) as required under section 79(4) of the MNDPS rules 1985.

सदर अर्जांच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक ०४-०८-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १२-०८-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक २४-०९-२०१० रोजी दिलेला असून त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीचे विश्लेषण करुन निर्णय दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुख्यालयासह राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयाशी निगडीत आहे. अर्जदारास मुख्यालयाशी निगडीत ७ पृष्ठे दिनांक ०४-०८-२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दिनांक ०६-०९-२००८ चे आधारे प्रशासनाचे महाराष्ट्रातील इतर जिल्हा कार्यालयाकडे माहितीसाठी संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक होते व तसे त्यांनी कळविलेले असून सर्व कार्यालयाचे पत्ते दिलेले आहे. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती मुख्यालयामध्ये उपलब्ध नसते. ती त्या त्या जिल्हा कार्यालयात उपलब्ध असते व ती त्या त्या जिल्हा कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. सर्व महाराष्ट्रातील कार्यालयातील माहिती ती संकलित करुन देणे सुद्धा अशक्य आहे व तसे त्यांनी कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलाचा निर्णयामध्ये सुद्धा त्याबाबत अपिलकर्ता यांना विवेचन करुन निर्णय दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अन्न व औषध प्रशासनातील सर्व जन माहिती अधिकारी हे मुख्यालय या एकाच प्राधिकरणात येतात. त्यामुळे प्रशासनाच्या महाराष्ट्रातील सर्व कार्यालयाची माहिती प्रतिवादी यांनी देणे आवश्यक आहे. इतर कार्यालयांना माहिती देण्यासाठी अर्ज करण्यास सुचविणे योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा सांगितले की, राज्यातील विविध कार्यालयातुन या विषयाच्या धारीका मागवून अर्जदारास तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे व अभिलेखाच्या छायांकित प्रती अर्जदारास उपलब्ध करुन देणे हे अव्यवहारर्य आहे व निश्चितच माहितीचा अधिकार कक्षेत येत नाही. माहितीचा अधिकार कायदा कलम २(एच) मधील सार्वजनिक प्राधिकरणाची व्याख्या पाहता या कायद्यासाठी

बांद्रा पूर्व मुंबई ५१ येथील प्रशासनाचे मुख्यालय हे एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे. विभागीय कार्यालये व जिल्हा कार्यालये हे सुद्धा शासनाचे आदेशानुसार स्थापीत / गठीत करण्यात आलेली आहेत. शासनद्वारे त्या त्या कार्यालयासाठी स्वतंत्र निधी, मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जाते. त्यामुळे प्रशासनाची सर्व विभागीय व जिल्हा कार्यालयेसुद्धा संबंधित कार्यक्षेत्रासाठी माहितीचा अधिकार कायद्यासाठी स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहेत. मुख्यालयातील जन माहिती अधिकारी हे औषध विभागासाठी जन माहिती अधिकारी आहेत. राज्यातील इतर जन माहिती अधिकारी हे त्यांच्या कार्यकक्षेत व अधिपत्याखाली येत नाहीत. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक दिनांक ०६-०९-२००८ मध्ये अर्ज केवळ एकाच सार्वजनिक प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची बाब स्पष्ट केली आहे. कलम ६(३) मध्ये अन्य संबंधित प्राधिकरण याबाबत असणारा उल्लेख एकवचनी आहे. जेथे अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित असेल, तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरित करणे आवश्यक नाही. तसेच अर्जदाराचा अर्ज मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये एनडीपीएस ॲक्ट व नियमांतर्गत माहितीचा तपशील असून प्रशासनाचे विविध कार्यालयाने (अनेक कार्यालय) दिलेले परवाने, केलेल्या तपासणी इत्यादिंशी निगडीत आहे. महाराष्ट्र एनडीपीएस नियम १९८५ अतंर्गत जिल्हा कार्यालयातील सहाय्यक आयुक्त हे अनुज्ञाप्ती प्राधिकारी असून अशा अनुज्ञाप्ती सादर करणाऱ्या संस्थांच्या तपासणी त्यात्या कार्यालयातील अधिकारी करतात. त्यामुळे संबंधित कागदपत्रे धारीका त्या त्या जिल्हा व विभागीय कार्यालयाकडेच असतात. नियमितपणे अशा धारिका अथवा त्यांच्या प्रती मुख्यालयात ठेवल्या जात नाहीत. तशी आवश्यकताही नाही व असे कागदपत्र मुख्यालयात ठेवणेही अव्यवहार्य, अनावश्यक व शासकीय यंत्रणेचा वेळ व पैसा खर्च करणारी बाब आहे. त्यामुळे अर्जदाराने मागणी केलेली संपुर्ण राज्यातील जिल्हा कार्यालयीची माहिती मुख्यालयाकडे उपलब्ध नसते.

वरील युक्तीवादा प्रमाणे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अन्न व औषध प्रशासनाच्या मुख्यलायामध्ये निश्चितपणे उपलब्ध नसते. तसेच अन्न व औषध प्रशासन हे जर एकाच विषयाकरीता सार्वजनिक प्राधिकारण असले तर मुख्यालयामध्ये नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी त्या मुख्यालयातील उपलब्ध असलेल्या माहिती करीता जन माहिती अधिकारी आहेत. कोणत्याही विभागात कोणत्याही कायाद्याची अंमलबजावणी करावयाची असल्यास मुख्यालय तसेच त्या विभागातील अन्य प्रशासकीस विभाग व जिल्हा कार्यालये यांच्यातील अधिकारी किंवा कर्मचारी यांना त्या कायद्याची अंमलबजावणीच्या संदर्भामध्ये अधिकार दिलेले असतात व त्यात्या कार्यक्षेत्रामध्ये त्याप्रमाणे त्या अधिनियांमाच्या तरतुदीची अंमलबजावणीचे अधिकार हे स्वतंत्र असते व त्यामुळे त्यांनी केलेली स्वतंत्र कार्यवाही ही त्या कार्यालयाची माहिती होते. ती कार्यालयाच्या नियत्रंणात खालील माहिती आहे व त्यामुळे त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणे संयुक्तिक असते. सर्व राज्य व्यापी माहिती एकाच जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे ही बाब सर्वस्वी अव्यवहार्य व अशक्य आहे. याची संसदेन अधिनियम करताना सुद्धा विचारात घेऊनच ३० दिवसांची मुदत दिलेली आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (१) अन्वये जन माहिती अधिकारी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकारणामध्ये माहिती देण्यासाठी त्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना, राज्य

जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील अशी तरतूद आहे. ही तरतुद वरीलप्रमाणे गृहित धरण्याकरीता आलेली आहे. अन्यथा प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणात एकच जन माहिती अधिकारी नियुक्त करावे असे संसदेने पारित केले असते व त्या तरतुदीप्रमाणेच जन माहिती अधिकारी यांनी अन्न व औषध प्रशासनाची अखत्यारीतील निरनिराळ्या जन माहिती अधिकारी त्या त्या स्तरावर नियुक्त केलेले आहेत व त्यांच्याकडे माहिती मागावी असे जे कळविलेले आहे ते योग्य आहे.पुढे जाऊन अधिनियमाचे कलम ६ (१) मध्ये माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीने संबंधित सार्वजनिक प्राधिकारणाच्या राज्य जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे व असा अर्ज सादर केल्यानंतर अधिनियम ७ (१) प्रमाणे ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे व कलम ५(१), कलम ६(१) व कलम ७ (१) यांचे एकत्रित विचार केल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यास ती ३० दिवसामध्ये उपलब्ध होवू शकेल असा अर्जाचा अर्थ लावावा लागतो. अन्यथा सर्व राज्यातील वेगवेगळ्या कार्यालयातील माहिती ही एकत्रित करुन किंवा संकलित करुन ३० दिवसांमध्ये उपलब्ध करुन देणे शक्य नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांच्या मुख्यालयातील कार्यासनाकडुन उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणजे त्यांना माहिती योग्यरीत्या पुरविलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जी उर्वरित माहिती ही त्या त्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल हे निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) अपिल निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/४६४/तक्रार क्र.१६४२

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक २०-०३-२०१० रोजी त्यांचे दिनांक २५-०१-२०१० रोजी जन माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलबध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार २००५ चे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी त्यांचे दिनांक २५-०१-२०१० च्या अर्जामध्ये, १) महाराष्ट्र राज्याच्या अंतर्गत कोणतेही आयोग स्थापन केले आणि त्या आयोगाचे अधिसुचना अथवा शासन निर्णय न करता त्या आयोगाचे कामकाज सुरु झाले व त्या आयोगांच्या मार्फत न्यायदान सुध्दा चालूच राहिले तर त्या आयोगांचे स्थापना अधिसुचने शिवाय कामकाज कायदेशीर आहे ही कोणत्या नियमाने ठरले त्या नियमांची सविस्तर माहिती, २) राज्य माहिती आयोगाची स्थापनेची अधिसुचना काढण्याबाबत कोणा कर्मचाऱ्यांस नियुक्त केले होते व त्यांनी सदर राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची अधिसुचना जी काढली नाही त्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत घ्याची माहिती, ३) अधिसुचना काढण्याबाबतचे कार्य ज्या संबंधित कर्मचाऱ्यांचे असते ते कार्य त्या संबंधित कर्मचारी ह्यांनी केले नाही, ४) कोणत्याही आयोगाची अधिसुचना काढल्यामुळे नेमक्या कशा प्रकारची प्रशासकीय कामकाज सुधारणा व सुलभता होते ह्याची माहिती.,५) राज्य माहिती आयोग बाबतची अधिसुचना अजूनपर्यंत काढलेली नाही म्हणून आता राज्य माहिती आयोगाच्या स्थापने संबंधीची अधिसुचना काढण्याचे प्रस्तावित अथवा ठरलेले आहे काय ह्याची माहिती, ६) राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची व त्या अनुषंगाने त्याने केलेले कार्य अधिसुचना न काढता अथवा अधिसुचना त्याच्या अंतर्गत जो कारभार चालू आहे ती कायदेशीर व अधिकृत कोणत्या नियमामुळे ठरले ह्याची माहिती, ७) राज्य माहिती आयोगाच्या स्थापनेची अधिसुचना काढण्यात आलेली नाही व विना अधिसुचनेचे शिवाय राज्य माहिती आयोग कामकाज गैरकामकाज म्हणजे बेकायदेशीर कामकाज त्या आयोगाचे ठरावे म्हणून कोणा समक्ष दाद मागावयाची आहे ह्याची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने दिनांक ०६-०३-२०१० रोजी आपल्या अर्जातील इतर मुद्यांद्वारे आपण विविध बाबींवर निम्नस्वाक्षरीतांचे भाष्य अपेक्षिली असून माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २

(च) मधील माहितीच्या व्याख्येत ते मोडत नाही. त्यामुळे त्याबाबत आपणांस माहिती देता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे माहितीचाअधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, राज्य माहिती आयोगाचे मुख्य आयुक्त यांची नियुक्ती झाली परंतु राज्य माहिती आयोगाची स्थापना अधिसुचना अद्याप काढण्यात आलेली नाही व त्यामुळेच एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांचे भाष्य माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे अपेक्षित नाही. माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अधिसुचना काढण्यात आलेली नाही हे खरे आहे. परंतु या संदर्भातील कायदेशीर व बेकायदेशीर परिणामाच्या संदर्भातील तक्रारदार यांचे मत विचारलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) (ञ) प्रमाणे **" माहिती"** व **"माहितीचा अधिकार"** या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये **"सार्वजनिक प्राधिकरणाच्या"** नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे मिळविता येण्याजोगी **"माहिती"** आणि त्यात कागदपत्रे, दस्तऐवज अभिलेखे यांचे निरीक्षण करणे छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे व **कलम २(च)** मध्ये **"माहिती"** या संज्ञेची व्याख्या असून त्या संज्ञेमध्ये साहित्याच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज स्वरुपात इत्यादीचा समावेश होतो यांचे निरीक्षण करुन छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा आहे. परंतु तक्रारदार यांनी जर माहिती अधिकारी यांचा जो अभिप्राय मागितलेला आहे तो वरील दोन्ही व्याख्येमध्ये अपेक्षित नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही व तसे त्यांनी कळविलेले आहे असे असेल तर तक्रारदार यांचे दिनांक २५-०१-२०१० चा माहिती अर्जामध्ये मुद्या क्र. २ मध्ये राज्य माहिती आयोगाची स्थापनेची अधिसुचना काढण्याबाबत कोण कर्मचाऱ्यांस नियुक्त केले होते व त्यांनी सदर राज्य माहिती आयोगाची स्थापनेची अधिसुचना जी काढली नाही त्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहे याची माहिती मात्र उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. राज्य माहिती आयोगाची स्थापना किंवा राज्य मुख्य आयुक्तांची नियुक्तीची तारीख दिलेली असेल त्या तारखेस सदर विषयांच्या संदर्भामध्ये ज्या अधिकाऱ्यांने कार्यवाही करणे आवश्यक होते अशा अधिकाऱ्यांने माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्याप्रमाणे उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याप्रमाणे तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत तक्रारदार यांचे दिनांक २५-०१-२०१० च्या अर्जातील मुद्या क्र. २ च्या संदर्भामध्ये माहिती ही विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२४१७/तक्रार क्र.१६३९

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन,
बॅकबे रेक्लमेशन, विधानभवन मार्ग, मुंबई ४०० ०३२.
जन माहिती अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधान मंडळ सचिवालय यांच्याकडे, चालू पावसाळी अधिवेशनामध्ये जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती व तालुका स्तरीय भ्रष्टाचार समितीच्या संबंधी कोणासदस्याने सभागृहापुढे प्रश्न उपस्थित केला ह्याची माहिती द्यावी. चालू पावसाळी अधिवेशनामध्ये सरकारी कर्मचारी त्याच्या सरकारी कार्यालयामध्ये खाजगी सेवक ठेवून कामकाज करतात म्हणून ह्या संबंधी कोणासदस्याने प्रश्न उपस्थित सभागृहात केला व त्यावर कोणी कशा प्रकारे खुलासा केला ह्याची माहिती, महाराष्ट्र विधानसभा मधील सदस्यांची पक्षनिहाय यादी आज रोजीपर्यंतची अर्जदारास हवी आहे त्याचा दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांकासह, महाराष्ट्र विधानसभेचे जे सदस्य आहेत त्याच्या निवडीचे नियम आणि त्यांनी सभेच्यामध्ये कोणते नियम पाळायचे आहेत ह्या सर्वाची सविस्तर माहिती, महाराष्ट्र विधानसभेचे जे नियम व कामकाज नियम जे आहेत त्या नियमावली अर्जदारास हवी आहे, महाराष्ट्र विधानसभेमध्ये महाराष्ट्र विधान सभा चालू झाल्यापासून आजपर्यंत कोणा सदस्याने पिटीशन कमिटी समोर पिटीशन दाखल केलेली आहेत त्या सदस्याची नावे व एकूण किती पिटीशन आजपर्यंत सदर कमिटी समोर दाखल झालेली होते व यापैकी किती प्रलंबित आहेत याबद्दलची सविस्तर माहिती,सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र विधानसभा / मंडळाच्यामध्ये पिटीशन कमिटीचे कोण सदस्य आहेत व किती आहेत त्यांची नावे काय आहेत यांची सविस्तर माहिती, महाराष्ट्र विधान परिषदेच्या पिटिशन कमिटी पुढे आलेल्या

पिटीशनचे किती कालावधीमध्ये त्या पिटिशनवर निर्णय होतो त्या कालावधीची माहिती, माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी दिनांक २६-०८-२०१० रोजीच्या मागणी केलेल्या माहितीसंदर्भात पाठवावयाच्या माहितीच्या प्रती व पुस्तिका यांचा खर्च रु.१९५/- तसेच रजिस्टर टपालखर्च रु.१८०/- असे एकूण रु.३७५/- (रक्कम रुपये तीनशे पंच्याहत्तर फक्त) खालील स्वाक्षरी करणारे शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे रोखीने जमा करावेत अथवा उक्त रकमेचा ''कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी'' महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (Section Officer and Drawing and Disbursing Officer, Maharashtra Legislature Secretariat) यांना देय असलेला धनादेश वा धनाकर्ष पाठवावा, जेनेकरुन आपणांस हवी असलेली माहिती नोंदणीकृत टपालद्वारे पाठविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. तसेच मुद्या क्र. ३ च्या संदर्भामध्ये माहिती ही सामान्य प्रशासन विभागात असल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले होते. गैरतक्रारदार यांनी आयोगापढे असे सांगितले की, अर्जदाराने मागितलेली माहिती ही विधानमंडळ सचिवालयाच्या विविध ७ कक्षांशी संबंधित होती व त्या कक्षांकडुन दिनांक २५-०८-२०१० माहिती प्राप्त झाली. त्यानंतर लगेच माहिती तयार असून ती विहित शुल्क अदा करुन प्राप्त करुन घ्यावी असे अर्जदारास दिनांक २६-०८-२०१० रोजी म्हणजेच विहित मुदतीत माहिती घेऊन जाण्यास कळविण्यात आले. इतकेच नव्हेतर अर्जादाराशी त्यांचे भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधुन माहिती घेऊन जाण्याची विनंती केल्यावर ''मी विधान भवन कार्यालयात येऊन माहिती घेऊन जातो'' असे सांगुन सुद्धा दिनांक १८-०९-२०१० च्या पत्रान्वये माहिती अधिकाराच्या विहित कालावधीत माहिती पुरवलेली नाही, प्रयत्न केला आहे म्हणून आपण मला सदरची माहिती नि:शुल्क द्यावी. त्यावर या सचिवालयाने अर्जदारास, त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे विहित कालावधीतच म्हणजे ३० दिवसांत कळविलेले असल्यामुळे नि:शुल्क माहिती मिळण्याबाबतची आपली मागणी मान्य करता येत नाही असे कळवून पूर्वी कळविल्यानुसार विहीत शुल्क अदा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविल्याचे दिसुन येते. त्यानंतर अर्जदाराने दिनांक ०४-११-२०१० रोजी शुल्क फी अदा करुन माहिती घेतलेली आहे. त्यानंतर विधानमंडळ सचिवालाच्या अपिलीय अधिका-यांकडे प्रथम वा कोणतेही अपिल दाखल केलेले नाही. सामान्य प्रशासन विभागाची माहिती सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २६-०८-२०१० रोजी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सुद्धा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे मात्र तक्रार दाखल केलेली आहे. त्या तक्रारीमध्ये त्यांनी शुल्कांचे पत्र विलंबाने मिळाले व त्यामुळे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्यामुळे शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केली.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे **कलम ७(३)** प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी खर्च विवरण ज्या तारखेला अर्जदारास कळविलेले असेल त्या तारखेपासून खर्चाचा भरणा होईपर्यंतचा कालावधी हा ३० दिवसातुन वगळून मिळतो व त्यामुळे विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. तसेच सामान्य प्रशासन

विभागाने माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२९६२/तक्रार क्र.१६३५

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी महसूल व वन विभाग यांच्याकडे, ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये विभागामार्फत CRZ-II व ५० मीटर मॅन्ग्रोव्हजच्या बफर क्षेत्राने बाधीत होणाऱ्या जमीनीवर बांधकाम परवानगी कोणत्या निकाषावर दिली जाते या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात त्यांनी एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी दिनांक १८-१०-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी मागितलेली माहिती ही महसूल विभागाशी संबंधित नाही व तो नगरविकास विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांचा मूळ अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(३) (२) अन्वंये जन माहिती अधिकारी, नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांचे दिनांक १७-०८-२०१० रोजी हस्तांतरीत केला होता व तसे अर्जदारास सुद्धा कळविण्यात आले होते. परंतु दिनांक १८-१०-२०१० रोजीच्या पत्रांन्वये माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमुद करुन माहिती लवकरात लवकर पुरवावी, अशी विनंती केली. त्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक २७-१०-२०१० अन्वये उपरोक्त नमूद वस्तूस्थिती पुन्हा अर्जदारास कळविण्यात आली आहे. अर्जदाराने माहिती अप्राप्त झाल्याचे नमुद करुन उप सचिव तथा अपिलीय अधिकारी (ज-४) यांचेकडे दिनांक ०४-११-२०१० च्या अर्जान्वये अपिलअर्ज दाखल केला होता. परंतु अपिलाच्या सुनावणीस दिनांक २०-११-२०१० रोजी उपस्थित राहिलेले नाही. त्यामुळे अपिलीय अधिंकारी यांनी सदर प्रकरणामध्ये अर्जदारास कोणतेही स्वारस्य नसल्याचे निष्कर्ष काढून त्यांचे अपिल अमान्य केला आहे.

तक्रारदार यांनी वास्तविक माहिती मागताना ती कोणत्या विभागाची आहे याबद्दलची निश्चित माहिती घेऊनच त्या संबंधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणे अपेक्षित असते. परंतु ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागितलेली आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणाशी माहिती संबंधीत नसेल तर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहितीशी संबंधित विभागाकडे जर नियमाप्रमाणे अर्ज हस्तांतरीत केला असेल तर अशा हस्तांतरीत झालेल्या विभागातील जन माहिती अधिकारी यांच्याशी संर्पक साधने आवश्यक असते व त्या विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी जर माहिती दिली नाही तर हस्तांतरीत विभागातील प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल करणे अपेक्षित असते. जेणेकरुन माहिती उपलब्ध करणे सोपे होते व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुद्धा आदेश दिल्यानंतर

माहिती जर उपलब्ध झाली नाही तर हस्तांतरीत विभागाचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे तक्रार किंवा अपिल दाखल करणे अपेक्षित असते. अन्यथा पूर्वीचे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील अर्जावर व प्रथम अपिलावर कार्यवाही केली व राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या विरुद्ध द्वितीय अपिल किंवा तक्रार दाखल केली तर त्यांच्याकडील कारवाई ही मुदतीत झाली आहे, या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल व तक्रार ही निकाली काढावी लागते. कारण अपिलकर्ता किंवा तक्रारदार यांनी हस्तांतरीत विभागाचे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचे द्वितीय अपिलात किंवा तक्रारीत पक्षकार केलेले नसते व त्यामुळे त्यांना सुनावणीची नोटीस काढता येत नाही व तक्रार किंवा अपिलांची सुनावणी मध्ये हस्तांतरीत विभागाचे अधिकाऱ्यांच्या संदर्भात कोणताही आदेश देता येत नाही यामध्ये अपिलकर्ता / तक्रारदार यांचाच कालापव्यय होतो माहितीसुद्धा मिळत नाही व त्यामुळे या प्रकरणतासुद्धा तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२९६३/तक्रार क्र.१६३६

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **----तक्रारदार**

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा कोस्टल ऑफिसर(MCZMA),
पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. **----गैरतक्रारदार**

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी पर्यावरण विभाग यांच्याकडे, CRZ-II व ५० मीटर मॅन्ग्रोव्हजच्या बफर क्षेत्राने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या जमीनीमध्ये बांधकामसंबंधी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती मिळाली नाही तक्रारदार यांचे दिनांक १८-१०-२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी यांचे कार्यालयात त्यांची नेमणूक कंत्राटी पदावर कोस्टल अधिकारी म्हणून करण्यात आलेली आहे व जन माहिती अधिकारी म्हणून माझी नेमणूक दिनांक १५-१०-२०१० रोजीच्या आदेशान्वये करण्यात आलेली आहे. तक्रारदार यांचा माहिती अर्ज नियुक्तीपुर्वीच्या आहे व त्यामुळे त्यांच्या निदर्शनास आणण्यात आलेले नाही. परंतु राज्य माहिती आयोगाची नोटीशी नंतर व्यक्तिश: सर्व आवश्यक माहिती गोळा करुन अर्जदारास दिनांक २५-०२-२०११ रोजी देण्यात आलेली आहे. तसे त्यांनी दुरध्वनीवरुन माहिती घेण्याविषयी सुचित केले व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याचा कोणताही प्रयत्न नाही. यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००७६/अपिल क्र ६३०२/२०१०

श्री.नैनेश सुरेश डोळस,
द्वारा, माहिती अधिकारी महासंघ,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. **...अपिलकर्ता**

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानगरपालिका चिटणीस (प्रभारी),
महानगरपालिका मुख्य कार्यालय,

विस्तारित इमारत, १ माळा, खोली क्र.१००,
महानगरपालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा महानगरपालिका उप - चिटणीस,
महानगरपालिका मुख्य कार्यालय,
विस्तारित इमारत, १ माळा, खोली क्र.१००,
महानगरपालिका मार्ग, मुंबई ४०० ००१. **...उत्तरवादी**

---निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ०३.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित. (उशिराने हजर)
जन माहिती अधिकारी - उपस्थित.(तत्कालीन)
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक ०२-०७-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त कार्यालय यांच्याकडे, आपल्या महानगरपालिकेत गेली १० वर्षापेक्षा अधिक कालावधी on deputation वर आलेल्या अधिकाऱ्यांची माहिती एकूण ७ मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जांच्या अनुषंगाने सदर अर्जांतील (तीन) येथील अनुक्रमांक १ व २ येथे विचारणा केलेली माहिती स्थायी समितीच्या अखत्यारित असेलेल्या महानगरपालिका चिटणीस कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे कार्यालय अधिक्षक (आयुक्त), जन माहिती अधिकारी ह्यांनी सदर अर्जांची छांयाकित प्रत दिनांक १३-०८-२०१० रोजी परस्पर कार्यवाहीकरीता चिटणीस कार्यालयाकडे पाठविलेली आहे. पुन्हा ती आस्थापना विभागांशी संबंधित असल्यामुळे सदर अर्ज दिनांक १६-०८-२०१० रोजी त्यांच्याकडे अग्रेषित करण्यात आला. त्याप्रमाणे अर्जदारास दिनांक २६-०८-२०१० रोजी प्राप्त झालेली माहिती पुरविण्यात आली व त्यामुळे अपिलकर्ता यांनी माहिती नाकरण्यात आलेली आहे. या कारणास्तव प्रथम अपिल दाखल केले. परंतु प्रथम अपिलाच्या सुनावणीस तक्रारदार / अपिलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेतील, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १२-०९-२००८ रोजी निर्गमित केलेले परिपत्रानुसार अपिलीय प्राधिकारी ह्यांनी, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकण्यात येऊन अपिलांची सुनावणी केली व त्याप्रमाणे निर्णयाची प्रत अपिलकर्ता यांना पाठविण्यात आली. परंतु तक्रारदार/ अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महानगरपालिकेमध्ये जे आयुक्त, सहआयुक्त, उप आयुक्त किंवा इतर पदावर जे अधिकारी शासनाकडून नियुक्त केले जातात ते शासकीय अधिकारीच असतात असे असुन सुद्धा महानगरपालिकामध्ये शासकीय अधिकारी नियुक्त केले नाही असे दिशाभूल करणारी खोटी उत्तरे महानगरपालिकेचे चिटणीस विभगाचे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. त्यांनी कोणत्याही एका विभागात शासकीय अधिकारी किती

आहेत अशी माहिती मागितलेली नाही तर संपुर्ण महानगरपालिकेमध्ये किती शासकीय अधिकारी deputation वर आहेत ही माहिती आवश्यक असल्यामुळे त्यांनी आयुक्त कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली होती. सर्वसाधरण समज असा आहे की, कोणत्याही मोठ्या आस्थापनातील सर्व अधिकारी किंवा कर्मचारी यांची माहिती ती सार्वजनिक प्राधिकरणातील सामान्य प्रशासन विभागकडे उपलब्ध असणे अपेक्षित असते व त्यामुळे आयुक्त कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज हा सामान्य प्रशासन विभागाचे माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरण करणे अपेक्षित होते. परंतु अर्ज लहानश्या चिटणीस विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला व चिटणीस विभागात कोणताही शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर नाही असे त्यांनी उत्तर दिले. मात्र आयुक्तासहित अतिरिक्त उप आयुक्त याबाबतीवरील काही अधिकारी हे शासकीय माहिती अधिकारी आहेत व त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. यावरुन आयुक्त कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी मुळातच माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने टाळाटाळ केलेली आहे. तसेच त्यांनी मुद्येनिहाय माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हे सुद्धा चिटणीस विभागाचे होते तर त्यांनी कोणतेही उत्तर कळविलेले नव्हते म्हणून ते प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहिलेले नव्हते.

अपिलकर्ता आणि उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावर सादर केलेला पत्रावरुन असे दिसुन येते की, सदर अर्जांच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली आहे. कोणत्याही माहितीच्या अर्जांमध्ये मुद्येनिहाय माहिती मागितलेली असेल तर ती उपलब्ध असेल त्याप्रमाणे, उपलब्ध नसेल त्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय मागितलेला असेल त्याप्रमाणे मुद्येनिहाय उत्तर देणे आवश्यक असते. परंतु अर्जांचे वाचन न करताच उत्तर दिले जाते किंवा प्रथम अपिलाचा निर्णय केला जातो व त्यामुळे अर्जदार हे वारंवार माहिती लपविली किंवा खोटी माहिती दिली अशा प्रकारची तक्रार करत असतात. सध्याच्या प्रकरणात सुद्धा वर नमुद केल्याप्रमाणे आयुक्त कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज योग्य त्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत करणे संयुक्तिक होते. चिटणीस कार्यालयसुद्धा आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी संपुर्ण महानगरपालिकेतील अधिकारी किंवा कर्मचारी यांची माहिती ती सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे उपलब्ध असते व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरीत केले त्यांच्याविरुद्ध शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापुर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक राहील व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

-----आदेश----

९) अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ०२-०७-२०१० अर्जांच्या अनुषंगाने मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

१०) **अपिलकर्ता यांचे दिनांक ०२-०७-२०१० चा अर्ज हा ज्या जन माहिती अधिकारी यांनी चिटणीस कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत केला त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती कां करण्यात येवू नये**

याबद्दलचा खुलासा त्यांनी समक्ष आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत करण्यात यावा अन्यथा त्यांच्या विरुद्ध शास्ती लादण्यात येईल.

११) सदर निर्णयाची एक प्रत महानगरपालिकेतील आयुक्त यांनी माहितीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

१२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०१०/२४३९/तक्रार क्र.१६४०

श्री.नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को-ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीयल कंपाऊंड, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम), पिन -४०० ६०२. जिल्हा ठाणे. ----तक्रारदार

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा मास्टर व सहायक प्रोथोनोटरी (प्रशा.),
उच्च न्यायालय,
मुंबई -४०० ०३२. ----गैरतक्रारदार

---निर्णय----

सुनावणीचा दिनांक :३१.०१.२०११

तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे एकूण १२ मुद्यांमध्ये वेगवेगळी माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना दिनांक २५-०८-२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले की, त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये त्यांनी निरीक्षण करावे व मुद्या क्र.२ ते ७,८,९,१० आणि १२ ह्या संबंधित विभागाकडुन माहिती मागितलेली आहे. जेव्हा ती मिळेल तेव्हा उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु संबंधित विभागाकडुन अद्यापही सदर माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे ती पुरविण्यात आलेली नाही. तसेच अपिलकर्ता यांनी प्रथम अपिल दाखल केलेले नाही.

गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माननीय उच्च न्यायालयामध्ये अनेक विभाग आहेत व तक्रारदार यांनी माहितीच्या अर्जामध्ये अनेक विभागातील अनेक विषयांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे. वास्तविक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भातील माहिती माननीय उच्च न्यायालय यांच्याकडे माहिती मागण्याची अपेक्षित नाही व तसेच इतर विभागाकडे सुद्धा जी माहिती मागितलेली आहे ते सर्व विभाग ते एकाच इमारतीत नाहीत व माहिती उपलब्ध करुन घेणे व ती मुदतीत देणेही शक्य होत नाही. तसेच माननीय उच्च न्यायालयातील माहिती उपलब्ध करुन माहिती पुरवावयाची असेल तर सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक असते. तसेच तक्रारदार यांनी माहिती मागितलेली आहे ती माहिती स्वरुपात अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी मागितलेली माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांनी विश्लेषण स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु तशी माहिती मागितलेली असेल तर जन माहिती अधिकारी यांनी त्या मुद्या संदर्भामध्ये अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती मागता येत नाही किंवा याबद्दलचे उत्तर देणे अपेक्षित असते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हे संसदेन पारित करताना ३० दिवसांमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असे मुदत घालून दिलेली आहे व माहितीचा अर्ज कलम ६ (१) प्रमाणे केल्यानंतर त्याबाबत संपूर्ण प्रकीया कलम ११ पर्यंत ३० दिवसांत पुर्ण करावे अशी अपेक्षा संसदेची दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वच माहिती उपलब्ध नसते ही बाब सुद्धा संसदेला माहीत होती व त्याप्रमाणे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे ज्या कर्मचारी वा अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असेल त्यांच्याकडून माहिती संकलीत करुन ३० दिवसांत पुरविणे अपेक्षित असते. ज्या अधिकारी किंवा कर्मचारी याचे सहाय्य जन माहिती अधिकारी यांनी मागितले अशा कर्मचारी व अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे समजण्यात येते व एकदा जन माहिती अधिकारी समजण्यात आल्यावर विलंबास असे अधिकारी जबाबदार असल्यास ते शास्तीस पात्र असतात अशाप्रकारची तरतुद ही अधिनियमात आहे. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता मान्यता घेणे अशी तरतुद अधिनियमात नाही. परंतु तशाप्रकारचे नियम

सक्षम प्राधिकारी यांनी केले असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्याची ३० दिवसांची मुदत ही बंधनकारक आहे. त्यात कोणत्याही प्रकारचे शिथिलता देता येणार नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये अर्जदार यांनी मागितलेले माहितीचे स्वरुप हे तपासुन बघणे आवश्यक असते व माहिती जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे शक्य आहे किंवा नाही ही बाब सुद्धा तपासून बघणे आवश्यक असते व त्याकरीता अर्जदाराने सुद्धा सार्वजनिक प्राधिकरण जरी एकच असले तरी त्यामध्ये अनेक विभाग / उपविभाग / विषयानुसार असतात व त्यामुळे एकच अर्जात वेगवेगळ्या विषयांची / विभागांची / शाखांची माहिती मागितल्यास ती ३० दिवसांत पुरविताच येईल असे नाही व त्यामुळे एका अर्जात एका शाखा किंवा विषयांचीच माहिती मागणे संयुक्तीक असते. अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यावर सुरुवातीचे ५ दिवसांमध्ये संबंधित अर्जात मागितलेली माहिती ही इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास त्यांना असा आदेश द्यावा लागतो. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आदेश विलंबाने दिल्यास त्या अधिकारी वा कर्मचाऱ्यांकडुन माहिती ही ३० दिवसांच्या आत पुरविण्याचे दृष्टिने विलंब होतो व त्यास सर्वस्वी जन माहिती अधिकारी जबाबदार असतात व सुरुवातीच्या ५ दिवसांत माहिती पुरविण्याचा आदेश दिलेला असेल तर असे सहाय्य घेतलेले अधिकारी व कर्मचारी हे विलंबास जबाबदार असतात. या अर्जाच्या संदर्भामध्ये अद्यापही त्या अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त झाली किंवा नाही याबद्दलचा कोणताही खुलासा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे अद्यापपर्यंत दिलेला नाही व त्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे जर ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन देता येईल. अधिनियम ७(६) प्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी लागते व त्यामुळे सदरचा अर्जाच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मुद्या क्र. १ च्या संदर्भात मात्र मुदत कळविलेली असल्यामुळे तक्रारदार यांनी निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे व त्या करीता खर्च भरणा हा आवश्यक आहे. तक्रारदार यांनी एकाच अर्जात अनेक विषयांची / शाखांची विभागांची माहिती मागितली असल्याने विलंबास शास्ती लादणे योग्य होणार नाही.

----- आदेश -----

५) तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांचे दिनांक ०९-०८-२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुद्येनिहाय विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

६) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ३१-०१-२०११

Gawas/feb 2011

मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०११३/अपिलक्र ६३४९

श्री.जयप्रकाश मामचंद बगोरिया, ...अपिलकर्ता
१/३५, श्रीराम को.हौ.सो.,खेर नगर,
बांद्रा(पूर्व) मुंबई ४०० ०५१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा कार्यालय, प्रशासकीय इमारत,
९वा मजला,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, अंधेरी,
दादाभाई नवरोजी रोड,
अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१३.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तहसीलदार अंधेरी यांच्याकडे प्लॉट सर्व्हे नं. ३४१(पार्ट), बांद्रा (ईस्ट) अंदाजे ३१७ चौ.फुट हि मिळकत श्री.मामचंद सुखराम बगोरीया यांना १९५७ साली भाडेपट्टयाने दिलेल्या बाबतची अंदाजे जुनी फाईल क्र.NAE SR १४८ च्या संदर्भामध्ये निरीक्षण द्यावे आणि निरीक्षणा अंती प्रती द्यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा काळावधी १९५७-१४ जुन,२०१० माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दिनांक १४-०७-२०१०रोजीचे पत्र दिनांक २६-०७-२०१० देण्यात आलेले दिसून येते. त्यात नस्ती आढळून येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक १५-०७-२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०६-०९-२०१० रोजी देण्यात आला असून अपिल अंशत: मान्य करण्यात येवून तहसीलदार अंधेरी यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या संचिकेचा अभिलेख कक्षात तपास घेऊन सदरची माहिती १५ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगपुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जुनी फाईल आहे व जुन्या फाईलचे अभिलेखाकारकामध्ये उपलब्ध असणे आवश्यक होते. परंतु अद्यापपर्यंत त्यांना माहिती दिलेली नाही व त्यामुळे निरीक्षण करता आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची नस्ती तलाठी यांनी शोधण्याचा प्रयत्न केला. तहसीलदार अंधेरी विभागाने नस्ती शोधण्याचा प्रयत्न केला परंतु उपलब्ध झाली नाही. परंतु सदरच्या नस्ती संदर्भामध्ये सन २००० मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एक अहवाल पाठविलेला आढळून येतो व त्यामुळे सदर प्रकरणाची मूळ नस्ती जिल्हाधिकारी कार्यालय शाखेकडे उपलब्ध असल्याने त्यांच्या कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. अर्जदाराने अर्जासोबत पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने या कार्यालर्यात दिनांक २७-१०-२०१० अन्वये मा. जिल्हाधिकारी, मुंऊजि यांचे कार्यालयात सदर जमीनीबाबतच्या माहिती संदर्भात नस्तीची मागणी केली त्यानंतर स्मरणपत्र-१ अन्वये दिनांक २५-०१-२०११ अन्वये पाठपुरावा केला. सदर प्रत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, मुंऊजि यांनी श्री.मामचंद सुखाराम बगोरिया मौजे-बांद्रा स.नं.३४१ मधील भाडेपट्टाने प्रदान केलेल्या जमीनीबाबत अभिलेखात उपलब्ध नस्ती दिनांक १५-०२-२०११ रोजी या कार्यालयास सुपूर्द करण्यात आली आहे. सदर नस्तीत अर्जदाराने अर्जासोबत पाठविलेले पत्राचे उल्लेख असून या कार्यालयाची नस्ती आणि १ ते ४७ चा समावेश आहे. सदर नस्तीचे परीक्षण घेऊन आज रोजी सदर अर्जदार यांस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याची तजविज ठेवली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तहसीलदार कार्यालयातुन त्यांना माहिती उपलब्ध करणे अपेक्षित आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तहसीलदार कार्यालयातून नस्ती ही जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दाखल झालेली असावी व त्यामुळे ती त्या ठिकाणी उपलब्ध झाली. नस्तीचा शोध हा सर्वच कार्यालयातून घेण्यात आलेला आहे असे असेल तर अपिलकर्ता यांनी तहसीलदार कार्यालयात पुन्हा नस्तीचा शोध घेऊन पुन्हा उपलब्ध झाल्यास किंवा उपलब्ध न झाल्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तीक राहील.

----आदेश----

५) अपिलकर्ता यांचा नस्तीचा शोध तहसीलदार कार्यालयातील जन माहिती अधिकारी तहसीलदार कार्यालयात घेणे व उपलब्ध झाल्यास किंवा न झाल्यास अपिलकर्ता यांना तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक :१७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०११५/अपिलक्र ६३४८

श्री.ओनिल अँथनी किनी, ...अपिलकर्ता
५३, कालिना, कोलिव्हरी व्हिलेज,
सांताक्रूझ(पूर्व) मुंबई ४०० ०९८.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,
मुख्य सचिवांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
मुख्य सचिवांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दिनांक २९-०४-२०१० रोजी जन माहिती अधिकारी मुख्य सचिवांचे कार्यालयात त्यांच्ये दिनांक ०५-१२-२००९ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या, 'Memorandam of request on behalf of 'Mool East Indian Sanghatna Trust',for poor and underprivileged East-Indian community. च्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदर अर्जांच्या अनुषंगाने अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२०१० रोजी आपल्या पत्रातील दिनांक ०५-१२-२००९ चा संदर्भ या कार्यालयाच्या क्रमांक : मुसका २००९/जनरल/१७१५८, दिनांक २२-१२-२००९ अन्वये अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना अग्रेषित करण्यात आलेला आहे. याबाबत माहितीच्या अधिकारात अधिक माहितीसाठी विभागाच्या माहिती अधिकाऱ्यांकडे (जसे,अवर सचिव तथा राज्य जन माहिती अधिकारी, महसूल व वन विभाग (वने), मंत्रालय, मुंबई ४०००३२) परस्पर संर्पक करणे उचित ठरेल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक २२-०६-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी मुख्य सचिव यांच्या कार्यालयामध्ये प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक ०१-०७-२०१० रोजी देण्यात आला असून सदर अपिल निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्ज हा मुख्य सचिवांकडे या करता दिला होता की, त्यांच्या अर्जात मागितल्याप्रमाणे त्यांना न्याय मिळू शकेल. परंतु त्या अर्जाची कोणतीही दखल न घेता माननीय सचिव कार्यालयाने ते अतिरिक्त मुख्य सचिव (वने), यांच्याकडे हस्तांतरीत केला. परंतु त्यांच्या कार्यालयामध्ये चौकशी केली असता अशा प्रकारची कोणतीही नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाली नाही असे त्यांना कळविण्यात आले व त्यामुळे त्यांनी पुन्हा त्यांचे अर्जाचा शोध घेण्याकरीता मुख्य सचिवाच्या कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु त्यांचे कार्यालयातील कार्यवाही संपली असे कळवून त्यांनी प्रथम अपिल निकाली काढले. मात्र त्यांचे दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्जाच्या संदर्भामध्ये पुढे काय झाले हे कळून येण्यास कोणताही मार्ग नव्हता. उलटपक्षी त्यांनी प्रथम अपिलाचा निर्णयामध्ये अर्जदाराने योग्य माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज किंवा पाठपुरावा केला पाहिजे व प्रस्तुत प्रकरणी वन विभागामार्फत कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे अपिलार्थीस ज्ञात असूनही मुख्य सचिव कार्यालयाच्या माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध केली नाही हे अपिलार्थीचे म्हणणे विसंगत आहे असे नमुद केले. वास्तविक वन विभागामध्ये त्यांनी चौकशी केली होती. त्यावर मुख्य सचिव यांच्या कार्यालयास वन विभाग संबंधित कार्यालयाना बोलवून अर्ज हस्तांतरीत झाल्यावर ते मिळून कसे येतात त्याबाबत जाब विचारणे आवश्यक होते. परंतु तसे न करता त्यांनी अपिल फेटाळेले व पुन्हा त्यांचे दिनांक ०५-१२-२००९ रोजीचा अर्जाच्या संदर्भात काहीही आढळ झालेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुख्य सचिव यांच्या कार्यालयात जे अर्ज येतात त्यावर तशी कार्यवाही होत नाही व ती कार्यवाही होण्याकरीता त्यात्या संबंधित कार्यालयाकडे सदरचा अर्ज किंवा तक्रार ही हस्तांतरीत केली जातात व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांचे दिनांक ०५-१२-२००९ अर्ज सुद्धा संबंधित विभागात हस्तांतरीत केलेला आहे. असे असेल तर त्यावेळेस एखाद्या व्यक्तीचा

हस्तांतरीत केलेला अर्ज सुद्धा संबंधित विभाग नाकारते त्यावेळेस मुख्य सचिव कार्यालयही जबाबदार आहे की, त्या संदर्भामध्ये चौकशी करुन तो अर्ज निश्चितपणे त्या कार्यालयामध्ये आवक नोंदवही मध्ये अथवा संबंधित कार्यालयात आस्थापनाकडे चौकशी करुन मागविताना योग्य ते मार्गदर्शन करणे योग्य ठरेल व त्यामुळे मुख्य सचिवांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरीत केलेला अर्ज हा कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठविला त्याची खात्री करुन अपिलकर्ता यांना तसे कळविणे संयुक्तिक राहील.अर्जाचे हस्तांतरण झाल्यानंतर त्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही तर त्या कार्यालयात प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल करावे असे कळविल्यास अपिलकर्ता यांना संबंधित अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध होवू शकेल. अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

---आदेश---

५) अपिलकर्ता यांचे अपिल अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांचे दिनांक २२-१२-२००९ रोजी हस्तांतरण केलेला अर्जाच्या संदर्भामध्ये दिनांक १०-०५-२०१० रोजी कळविल्याप्रमाणे हस्तांतरण केलेला माहितीचा अर्जाच्या संदर्भामध्ये अप्पर सचिव, मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलकर्ता यांना कळवावे.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक :१७-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००५४/अपिलक्र ६३९४

श्री.तुषार गो.जाधव, ...अपिलकर्ता
७२, गांधीनगर,दै.शिबनेर मार्ग,
वरळी, मुंबई ४०० ०१८.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर,
जिल्हाधिकारी व जिल्हादंडधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,
जुने जकात घर, श.भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, महसूल शाखा, मुबई शहर,
जिल्हाधिकारी व जिल्हादंडधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,
जुने जकात घर, श.भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१. ...उत्तरवादी

----निर्णय----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०८.०९.२०१०
सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक तथा शासकीय माहिती अधिकारी यांच्यातर्फे श्रीमती श्रद्धा विनय सांरग हे हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सदर प्रकरणात परिपत्रक दिनांक ०१-०२-२०१० नुसार अर्जदार अपिलार्थीने खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

वरळी योजना क्र.५२ मधील सोबतच्या नकाशा मध्ये दर्शविलेल्या चिंचोळया पट्टीला भूकर (सर्वे नंबर) क्रमांक दिलले नाहीत. परंतू त्यातील काही जमीन वरळी सागर, पिरामल ब्रदर्स,शुभदा, सुखदा व पौर्णिमा गृहनिर्माण संस्था ह्यांना शासनाने भाडेपट्टयाने दिलेली आहे. तसेच उर्वरीत जमिनीवर, शिवाजी व कृष्ण नगर ह्या झोपड्यांत बृहन्मुंबई महानगरपालिके कडून फोटोपास वितरीत केलेले आहेत. सबब ही जमीन शासनाची आहे किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे ह्याबाबत माहिती देण्यात यावी.

अर्जदाराने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अर्जदाराने वरळी योजना क्र.५२ मधील भूखंडाविषयी विश्लेषण केलेले आहे. जमीन ही शासनाची मालकीची आहे किंवा बृहन्मुंबई महानगर पालिकेची याबाबत विचारणा करण्यात आली होती व सदरची मिळकत कोणाच्या नांवे आहेत याबाबतची माहिती कळविण्यात यावी.

सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला आवश्यक असलेले कागदपत्रे पुरविलेले आहेत. तसेच दिनांक २३-०७-२०१० च्या पत्राने अर्जदाराने ज्या भूखंडाविषयी माहिती मागितलेली आहे त्या विषयी सदर भूखंडाबाबत मालकी हक्का संबंधित ती शासनाची आहे किंवा महानगरपालिकेची आहे ह्याबाबत उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने निषिद्ध मालकी हक्काबद्दल सांगता येत नाही.

त्यानंतरही अर्जदाराच्या म्हणण्यानूसार अर्जदाराने या आधी महानगरपालिकेकडे अर्ज दाखल केला होता व त्यात त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे म्हटले आहे. दिनांक ०५-१२-२०१० रोजी जन माहिती अधिकारी वसाहत अधिकारी, जी /दक्षिण विभाग यांच्या कार्यालयाने अर्जदाराला सदरची माहिती जिल्हाधिकारी तथा माहिती अधिकारी कार्यासन क्रमांक २, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांच्याशी संर्पक साधुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, बृहन्मुंबई महानगरपालिका जर जागेचा मालकी हक्क सांगत असेल तर त्यांच्याकडे संपुर्ण माहिती असणे अपेक्षित व आवश्यक आहे व तसे नसल्यास त्यांनी त्यांच्याकडे या जागेसंबंधी जी कागदपत्रे उपलब्ध आहेत आणि त्या कागदपत्रांच्या आधारे ते मालकी हक्क सांगत आहेत. त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती प्रमाणित करुन अर्जदाराला विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. तर कुठल्याही प्रकारचे कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास तसे पत्र (कागदपत्र नसल्याबाबतचे) अर्जदाराला लेखी पत्र द्यावयाचे आहे व तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी याबाबत नगर भूमापन क्र.२

जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन कुठलाही पत्रव्यवहार झाले असल्यास त्या प्रतीच्या छायांकित प्रती सुद्धा अर्जदाराला पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्यानंतर मालकी हक्क जर बृहन्मुंबई दाखवत असेल तर ती त्यांनी योग्य पाठपुरावा करुन सदर कागदपत्रे मिळावीत व त्यानुसार अर्जदाराला मिळाल्यानंतर पत्रव्यवहार करावा. वरील आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

५) जन माहिती अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका जी/दक्षिण कार्यालय यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी अर्जदाराने जी माहिती मागितलेली वरळी योजना क्र.५२ मधील सोबत नकाशा मध्ये दर्शविलेल्या चिंचोळया पट्टयालगतच्या वरळी सागर, पिरामल ब्रदर्स, शुभदा, सुखदा व पौर्णिमा यांना शासनाने भाडेपट्टीवर दिलेले आहे या संबंधित माहिती अर्जदाराला आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क पाठविण्यात यावी. मागितलेली माहिती उपलब्ध नसल्यास तशा प्रकारचा पत्रव्यवहार करावा. तरी काहीही उपलब्ध नसल्यास तसे लेखी पत्र द्यावे.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०१६७/अपिलक्र ६३९७

श्री.गौरंग सी.शहा,
जी-१०१, पंचशील गार्डन्स को.हौ.सो.
महावीर नगर, कांदीवली (पश्चिम), **...अपिलकर्ता**
मुंबई ४०० ०६७.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ.-दोन, ...उत्तरवादी
बृहन्मुंबई महापालिका, महापालिका इमारत, सी विंग,
संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फूट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,
कांदीवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), आर विभाग,
बृहन्मुंबई महापालिका, महापालिका इमारत, सी विंग,
संस्कृती कॉम्प्लेक्स, ९० फूट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,
कांदीवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :२०.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. उत्तरवादी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.बा.वे.शिंदे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की अर्जदाराला माहिती पुरवण्याची जन माहिती अधिकारी यांची तयारी आहे. ह्या आधी माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे नेमकी कोणती माहिती पाहिजे त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला माहिती घेऊन जाण्याबद्दल सांगितले होते. परंतु मागितलेली नकाशे हे बहुतांश बंडलामध्ये बांधले होते व ते ओळखता येवू शकले नाहीत म्हणून ते अर्जदाराला देता आले नाही. सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी यांनी सदर प्रकरणात दिनांक ०३-०३-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दुपारी १२ नंतर संर्पक साधल्यास अर्जदाराने प.पत्र **अ** नुसार मागितलेली तिन्ही संस्थेबाबतची माहिती (Occupation finance Plan) हे पुरविण्यात येतील. सदरची माहिती ही विनाशुल्क पुरविल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी ह्या आयोगासमोर कबूल केले. त्यावरुन अर्जदाराचे समाधान झाले व अर्जदाराने दिनांक ०३-०३-२०११ रोजीची माहिती उपलब्ध करुन घेण्यास तयारी दर्शविली. त्यानंतर ही अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

९) अपिल निकाली काढण्यात येते.

१०) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०१६१/अपिलक्र ६३९६

श्री. प्रभाकर विष्णू सुरते,
१७८, संत तुकाराम मार्ग, सी.के. बिल्डींग, २ रा मजला, ...अपिलकर्ता
रु.नं.४७, दाणबंदर, मस्जिद बंदर (पूर्व),
मुंबई ४०० ००९.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन),
वरळी विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
१० मजला, इ विंग,नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगाव, मुंबई ४०० ०१०.

जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन),
वरळी विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
१० मजला, इ विंग,नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगाव, मुंबई ४०० ०१०. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :१८.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. उत्तरवादी जन माहिती अधिकारी श्री.जिवातोडे, सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन), कार्यालय वरळी विभाग हे हजर आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी श्री. एस.ए.के. काझी विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई हजर आहेत

व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.जे.चन्ने विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन), वरळी विभाग, मुंबई हे सुद्धा हजर आहेत.

अर्जाचे प्रथम अपिलाचे परिपत्रक Annexture A अवलोकन केले असता अर्जदाराने मागितलेली बरीचशी माहिती मिळालेली नाही व त्यामुळे अर्जदाराने या आयोगासमोर द्वितीय अपिल दाखल करावे लागले. सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी यांना श्री. गंवडी ह्यांनी निरीक्षण देण्याचे कबूल केलेले आहे व त्यानुसार अर्जदाराला निरीक्षण देऊन, अर्जाला त्या फाईलमधून जे कागदपत्रे पाहिजे ते विनाशुल्क देण्यात येतील असेही कबूल केले आहे. त्यामुळे अर्जदाराचे / अपिलार्थीचे समाधान झाले असून अपिल निकाली काढण्यात येते. त्यानंतर ही अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार अर्जदार ह्या आयोगासमोर करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

११)अपिल निकाली काढण्यात येते.

१२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ२०१०/तक्रार क्र.४८

श्री.संदीप प्रकाश केदारे, **---तक्रारदार**
१७,१३६०, जुनी एम.एच.बी.कॉलनी,
गोराई रोड, (बोरिवली (पश्चिम),
मुंबई ४०० ०९१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,
अनुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक व माहविद्यालय,
आकुर्ली रोड, कांदिवली (पश्चिम),मुंबई

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
अनुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक व माहविद्यालय,
आकुर्ली रोड, कांदिवली (पश्चिम),मुंबई **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार अपिलार्थी हजर आहेत. अर्जदाराला ह्या आधी माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच या आयोगासमोर बरीचशी माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच प्रती या आयोगाच्या रेकॉर्डवर लावलेले आहे. तसेच अर्जातील मागासवर्गीय कर्मचारी शिक्षक हे जर त्या कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्याबाबत शाळेकडे असलेले जाती विषयक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती पाहिजे आहेत व त्यासाठी सदर संस्थेचे प्राचार्य ह्यांनी त्यांच्या या कार्यालयात उचित कार्यवाहीसाठी देण्याचे कबूल केले आहे. ह्या आयोगासमोर अर्जदाराला मागितलेली माहिती देण्याचे कबूल केलेले आहे व

अर्जदाराने हे मान्य केलेले आहे म्हणून तक्रार क्रमांक ४८/०१ हे निकाली काढण्यात येते व अर्जदाराचे समाधान न झाल्यास ह्या आयोगासमोर तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

५) अपिल निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/२१०६/तक्रार क्र.१०

श्रीमती विशाखा विनायक इंगळे, **--तक्रारदार**
बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सोसायटी,
नवीन टिळक नगर, चेंबूर (पश्चिम),मुंबई ४०० ०८९.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (शिक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ.आंबेडकर मार्ग,
परेल, मुंबई ४०० ०१२.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण खाते,
लखमजी नप्पू रोड, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व),
मुंबई ४०० ०१४. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदाराने ३० जुलै, २०१० रोजी ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे व त्यातही आयोगाने आदेश करुन सुद्धा अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. सदर आदेशाला निर्गमित करुन १ महिन्याचा कालावधी उलटुन गेलेला आहे. संबंधिताना माहिती देण्याविषयी निर्देश देण्यात यावेत अशी विनंती केलेली आहे. त्या विषयांच्या अनुषंगाने ह्या आयोगासमोर श्रीमती जयश्री यादव

प्रशासकीय शाळा हे हजर आहेत व अर्जदाराला ३० पेजेसची माहिती ह्या आयोगासमोर पुरविण्यात आलेली आहे. तरी अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येवुन अर्जदाराला ह्या आयोगासमोर माहिती उपलब्ध दिल्यानंतर अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

५) तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४६/०१

श्री.जगदीश देवराम टोरपे, **---तक्रारदार**
२५-अे, टोरने हाऊस, पहिला मजला,
फ्लॅट क्र.२, तेजपाल स्कीम, ५ वा रस्ता,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),
बृहन्मुंबई महानगरपालिका पश्चिम उपनगरे,
के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम,मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प),
बृहन्मुंबई महानगरपालिका पश्चिम उपनगरे,
के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम,मुंबई. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी हजर आहेत. ह्या आयोगाने दिनांक ३१-१०-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा त्यांच्या विरुद्ध अधिनियमाचे कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला होता. सदर प्रकरणात अर्जदार / अपिलार्थी यांनी दिनांक २०-०८-२००९ तक्रार दाखल केलेली आहे व त्यात अर्जदाराला माहिती मिळालेली नाही, संबंधिता विरुद्ध योग्य कारवाई करण्यात यावी. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत व अर्जदाराला माहिती पुरविलेली किंवा नाही कुठलाही उल्लेख अथवा उत्तर जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे दाखल केलेला नाही. तसेच या आयोगाने दिनांक ०५-०२-२०११ रोजी सुनावणीची तारीख ठेवल्यानंतर ह्या प्रकरणात दिनांक २१-०२-२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली व ह्या अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबत लेखी खुलासा सादर करावा असे म्हटले होते. जर उपस्थित न राहिल्यास ह्या अधिनियमाचे कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व निर्णय एकतर्फी देण्यात येईल अशी सुनावणीची नोटीस देवून सुद्धा आज २१-०२-२०११ रोजी जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प),

बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे,के व एव वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई हे गैरहजर आहेत व कुठलेही उत्तर दाखल केलेले नाही. या आयोगासमोर अर्जदाराने माहिती न मिळाल्याबद्दल तक्रार सुनावणी दरम्यान अशी तक्रार दाखल केलेली आहे. अर्जदाराला आजपर्यत माहिती मिळालेली नाही. अर्जदाराचे म्हणणे ग्राह्य धरुन ह्या आयोगाला असलेले कलम १८ च्या अधिकारानुसार सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांना दोषी ठरविण्यात येते व त्यांच्याविरुद्ध लागू असलेले सेवा विषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते व वरील आदेश पारित करुन अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

७) आयुक्त महानगरपालिका बृहन्मुंबई यांना असा आदेश देण्यात येतो व शिफारस केल्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प) बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम उपनगरे, के व एच वॉर्ड, पूर्व व पश्चिम, मुंबई यांच्या विरुद्ध व शिफारस ह्या नियमाचे कलम २०(२) नूसार शिफारस केल्याप्रमाणे कारवाई करुन ३ महिन्याच्या आत अहवाल हा आयोगाला पाठवावा.

८) तसेच सध्या कार्यरत असेलेले जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता (इमारत प्रकल्प) त्यांनी अर्जदाराला आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क म्हणजे पंजीबद्ध डाकेने ह्या आयोगाचा निर्णय दिनांक ३१-१०-२००८ नुसार अर्जदाराला माहिती पाठवावी.

९) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४७/०१

श्री.सुरेश भिमसेन कागिनकर, **---तक्रारदार**
३/१०१, योगेश्वर गृहनिर्माण संस्था,
ना.म.जोशी मार्ग,
मुंबई ४०० ०१३.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी / संगा,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१. **---गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार /अपिलार्थीने ह्या आयोगासमोर दिनांक ३०-०८-२०१० रोजी खालील तक्रार दाखल केलेली आहे.

दिनांक ३०-०६-२०१० रोजीच्या ऑर्डरनुसार मा.माहिती अधिकारी (उपमुख्य अधिकारी) सं.गा, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गुहनिर्माण भवन बांद्रा,मुंबई ह्यांच्याकडून अद्यापपर्यंत मी मागणी केलेली माहिती मला मिळाली नाही आहे ह्याची आपण नोंद घ्यावी. सदर प्रकरणी संबधीत अधिकारी ह्यांच्यावर शासन नियमानुसार योग्य ती उचित कारवाई करण्यात यावी हि नम्र विनंती.

सदर प्रकरणात ह्या आयोगाने तक्रार नं.२०१०/१०१४/०२ ह्या तक्रारी संबंधित दिनांक २३-०३-२०१० रोजीचा आदेश पारित केला होता. त्यानुसार अर्जदाराने Rent विषयीच्या प्रती मागितलेल्या होत्या. सदर Rent विषयीच्या प्रती रुम नं. ६४, बिल्डीग नं. २, जिजामाता ट्रान्झिट कॅम्प, काळाचौकी, मुंबई या संबधी होती. सदर प्रकरणात अर्जदाराने ह्या आयोगासमोर द्वितीय अपिल दाखल केले होते व दिनांक २३-०३-२०१० रोजी ह्या आयोगाने आदेश पारित केला होता की, अर्जादाराला १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी आणि त्यानुसार ह्या प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अर्जदार / अपिलार्थी हजर होते व प्रतिवादी श्री. सुर्यवंशी हजर होते आणि अर्जदाराला माहिती पुरविण्यात आलेली

नव्हती म्हणून उत्तरवादी यांना आदेश सुचना दिले होते की, १५ दिवसांच्या आत अर्जदाराला माहिती पुरवावी. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार हे जन माहिती अधिकारी यांना भेटला परंतु अर्जदाराला माहिती देण्यात आलेली नाही आणि म्हणून आयोग निष्कर्षाप्रती पोहचले की, उत्तरवादी ह्या अधिनियमाच्या तरतुदीचा भंग केलेला आहे म्हणून रु.२५०००/- दंड करण्यात येवू नये अशाप्रकारचे कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. कारणे दाखवा नोटीस सदर प्रकरणी आदेश पारित करुन देण्यात आलेली आहे. या अनुषंगाने सदर प्रकरणी ह्या आयोगाने दिनांक ०४-०२-२०११ रोजी सुनावणीची नोटीस जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी, उप मुख्य अधिकारी मुंबई, मुंबई इमारत दुरस्ती व पुनर्रचना मंडळ,गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना सदर प्रकरणाची नोटीस देवुन सुनावणीची आज म्हणजे दिनांक २१-०२-२०११ रोजी दुपारी २.०० वाजता ठेवण्यात आली आहे.

सुनावणी दरम्यान अर्जदार / अपिलार्थी हजर होते. परंतु उत्तरवादी यांच्यातर्फे डॉ.अविनाश गोटे उपमुख्य अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. ह्यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणी अर्जदाराने त्यांचे अपिल दाखल केलेले नाही. तसेच ह्या प्रकरणात जन माहिती अधिकारी हे इस्टेट मॅनेजर श्री. संजय सुर्यवंशी हे हजर होते. सदर प्रकरणी कागदपत्राचे अवलोकन केले असता दिनांक १४-०६-२०१० रोजी श्री. सुर्यवंशी (मिळकत व्यवस्थापक) हे हजर होते. परंतु अर्जदाराला माहिती देण्याबाबत कुठलीही तसदी घेतल्याचे दिसत नाही. तसेच ह्या प्रकरणात श्री. सुर्यवंशी हे दिनांक १४-०६-२०१० रोजी सुद्धा हजर होते. अपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार श्री.सुर्यवंशी हे सुद्धा मागील तारखेला हजर होते. तसेच त्यांच्या म्हणण्यानुसार सदर माहिती ही कार्यकारी अभियंता यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यांनी ह्या आयोगासमोर दिनांक १८-०२-२०११ रोजी जे लेखी जबाब दाखल केलेले आहे. त्या संबंधीत मूळ अर्ज पुढील कार्यवाहीसाठी कार्यकारी अभियंता ''इ विभाग'' यांना दिनांक १२-११-२००९ रोजी जा.क्र.४६००/०९ अन्वये पाठविण्यात आला होता. परंतु कार्यकारी अभियंता ''इ-१'' या कार्यालयाने कार्यकारी अभियंता ''फ/ दक्षिण'' या कार्यालयाशी संबंधीत असल्याने दिनांक ०२-१२-२००९ रोजी जा.क्र.७२५/०९ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे. तसेच संक्रमण गाळ्याविषयक कार्यभाराचे जन माहिती अधिकारी हे मिळकत व्यवस्थापक श्री.संजय सुर्यवंशी हे आहेत. दिनांक ०४-०९-२००९ पासून संक्रमण गाळे विषयक सर्व कामकाज हे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडे प्राधिकरणाचे व मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचे आदेशानुसार वर्ग केले आहे. त्यामुळे अर्जदार / अपिलार्थी यांनी उप मुख्य अधिकारी / संक्रमण गाळे यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले असते तर अर्जदाराचे मुद्या निकाली निघाला असता. त्या अनुषंगाने ह्या आयोगाने अर्जदाराला तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांना सदर प्रकरणी अर्जदाराचे प्रथम अपिल निकाली काढण्याच्या दृष्टिने तोंडी सूचना व आदेश दिलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या प्रती ह्या आयोगाकडून घेऊन दिनांक २८-०२-२०११ ला सकाळी ११ वाजता सुनावणी घ्यावी व जन माहिती अधिकारी किंवा कार्यकारी अभियंता यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन अर्जदाराला विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची माहिती ही विनाशुल्क पुरविण्यात यावी.

हे काहीही असले तरी सदर प्रकरणात निश्चितच अर्जदाराला माहिती पुरविण्याच्या दृष्टिने व प्रथम अपिल निकाली काढल्याचे दृष्टिने नियमानुसार कार्यवाही झालेली नाही व ह्या प्रकरणी मुख्य अधिकारी (Chief Officer), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी एखाद्या सक्षम

अधिकाऱ्यामार्फत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्या विरुद्ध अधिनियमानुसार चौकशी करुन माहिती उशिरा देण्याबाबत जबाबदारी निश्चित करावी व जबाबदार आढळल्यास त्यांना लागू असलेला सेवा विषयक नियमाचे भंग केल्याच्या कारणावरुन शिफारस केल्याचे गृहित धरुन योग्य ती कारवाई करावी. तसेच ह्या आयोगाने दिनांक **३०-०६-२०१०** रोजी पारित केलेला आदेशाच्या अनुषंगाने उत्तरवादी श्री. संजय सुर्यवंशी तथा जन माहिती अधिकारी यांच्याविरुद्ध अर्जदाराचा अर्ज ह्या अधिनियमाचे कलम ७(१) नूसार निकाली न काढल्यामुळे व अर्जदाराला माहिती न पुरविल्यामुळे रु.५०००/- चा दंड बसविण्यात येतो व सदरचा दंड हा त्यांनी २ मासिक हप्त्यात संबंधित संस्थेकडे भरणा करावे. सदर लेखाशिर्षा, ''००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)''. या सार्वजनिक लेखाशिर्षा खाली जमा करण्यात यावी. वरील आदेश व सुचना देवुन तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

५) तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४५/०१

श्री.मंगेश गोविंद घोरपडे, **---तक्रारदार**
५०, पेरीन नरीमन स्ट्रीट, दुसरा माळा,
रुम नं. ११, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य नियोजकार, **---गैरतक्रारदार**
सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
नियोजन व वास्तुशास्त्र विभाग,
सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२१.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

तक्रारदार गैरहजर आहेत. अर्जदाराने दिनांक ०७-०२-२००८ रोजी आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे. त्यात अर्जदाराने दिनांक ०३-१२-२००७ रोजी अर्जावर जन माहिती अधिकारी सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई या कार्यालयाकडून माहिती मागितलेली आहे. मागितलेली माहिती ही ६ मुद्यांमध्ये आहे. अर्जदाराचे म्हणण्यानुसार ३ मुद्यांची माहिती दिलेली आहे व ३ मुद्यांची माहिती बाकी आहे. मुद्या क्र. २,३,६ ची माहिती बाकी आहे. अर्जदाराने प्रथम अपिल दिनांक २९-०१-२००८ अपिलीय अधिकारी सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे पोस्टाने (डाक नोंद पोच द्वारे) अपिल अर्ज पाठविलेले आहे व स्वीकृत न करताच परत पाठविलेले आहे. त्यामुळे अर्जदाराने तशी तक्रार केलेली आहे. अपिल अर्ज स्वीकरण्यात आलेला नाही. तरी सदर प्रकरणात पुढील कार्यवाही कशा प्रकारे करणे योग्य होईल ह्या बाबत मार्गदर्शन करावे.

सुनावणी दरम्यान अतिरिक्त मुख्य नियोजनकार विभागाचे श्री किरण शिंदे हजर आहेत. व्यवस्थापक (पणन - १) श्री. राजेंद्र मोरे हजर आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदारास दिनांक ०३-१२-२००७ च्या अर्जानुसार परिपत्रक Annexture A नूसार माहिती नियोजनकार यांच्याकडे उपलब्ध असुन मुद्या क्रमांक १,४ व ५ या मुद्यांची माहिती दिलेली आहे. मुद्या क्रमांक २ व ६ पणन विभागाशी संबंधित आहे व त्यांच्या म्हणण्यानूसार त्यांना वरील सुचना अभिप्रेत नसल्यामुळे माहिती पाठवू शकले नाही व अर्जातील माहिती शोधुन घेऊन पाठविण्यास तयार आहेत. तरी अर्जदाराने मुद्या क्रमांक २ व ६ ची माहिती पंजीबद्ध डाकेने आजपासून १० दिवसांच्या आत

पाठवयाची आहे. आयोगापुढे तसा मुद्या क्रमांक ३ अभियांत्रिकी विभागाशी संबंधित आहे व त्यासाठी सेवा पुरविण्यासंबंधी बाबत सत्य परिस्थिती अर्जदाराने आज पासून १० दिवसांच्या आत पंजीबद्ध डाकेने पाठवावयाची आहे. त्या संबंधित मुद्यांबाबतचे स्पष्टिकरण अर्जदाराला लेखी स्वरुपात कळवावे. तसेच मुद्या क्रमांक ४ व ५ ची माहिती देण्यात आलेली आहे. अर्जदार गैरहजर असल्यामुळे वरील बाबींचे आणखी शहानिशा होवू शकली नाही. तरी वरील दिलेल्या सुचनेनुसार अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

५) तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५००७४/अपिलक्र ६३९३

श्री.जितेंद्र एच.प्रसाद, ...अपिलकर्ता
बायोटेक्नो लॅब, २८८/९०, डॉ.सी.एच.स्ट्रीट,
चार्टर हाऊस समोर, धोबीतलाव,
मरीन लाईन्स,मुंबई ४०० ००२.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३)मुंबई,
गृहनिर्माण भवन,कक्ष क्र.६९, तळमजला,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पी-विभाग,
३१५, ए/१ इमारत, वडाळा ट्रक टर्मिनल, आरटीओ जवळ,
वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७. **...उत्तरवादी**

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०

सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११

अर्जदार / अपिलार्थी हजर आहे. दोघांचे म्हणणे ऐकूण घेतलेले आहे. दोघांच्या म्हणणे ऐकल्यानंतर अर्जदाराला परिपत्रक नुसार जी माहिती पाहिजे आहे ती सहकारी गृहनिर्माण संस्था पी-विभाग, मालाड (पश्चिम) या संस्थेची पंजी बद्दलची माहिती पाहिजे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर संस्था ही नियमानुसार पंजीबद्ध करण्यात आलेली नाही अशी अर्जदाराची तक्रार आहे. सदर प्रकरणी सुनावणी दरम्यान या संबंधित अर्जदाराने जनविकास को.ऑप.सो.लि.,मालाड वेस्ट या संस्था संबधातील जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक मुंबई यांच्या आख्यारित असेलेली सर्व कागदपत्रांचे निरीक्षण दिनांक २३-०२-२०११ रोजी दुपारी २.०० नंतर द्यावयाची ठरली आहे. तसेच माहिती संबंधित संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावयची असेल तशा प्रकाराची इच्छा व्यक्त केल्यास ती सुद्धा माहिती जन माहिती अधिकारी यांनी शक्य तितक्या लवकर मिळवून अर्जदाराला उपलब्ध करुन द्यावयाची आहे व त्यानंतर अर्जदार हा महाराष्ट्र राज्य सहकार अधिनियम १९६० चे कलम १५४ नुसार अपिल करावयाचे झाल्यास अर्जदार तसे अपिल करील. माहिती संबंधीत कुठलीही तक्रार असल्यास त्या संबंधित अर्जदार हा अधिनियमाचे कलम १९(१) प्रमाणे वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रार करु शकतो. वरील आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

५) अर्जदार व जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी आता कबूल केल्यामुळे दिनांक २३-०२-२०११ तारखेला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी २ नंतर संबंधित संस्थेविषयीची जी माहिती आवश्यक आहे ती हा

आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे ठरल्यावरुन अर्जदाराचे अपिल निकाली काढले आहे.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमाक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./४९३१४/अपिलक्र ६३९५

श्री.सी.पी.सिंग (ॲडव्होकेट), ...अपिलकर्ता
०२, क्लासिक पॉवर रेसिडेन्सी, गुरु निवास सबवे रोड नं.२ समोर,
टी.पी.एस-VI, सांताक्रुझ (पश्चिम),मुंबई ४०० ०५४.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नवि-१०),
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-१०),
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. **...उत्तरवादी**

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २१.०२.२०११
अपिलकर्ता - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी सुनावणी दरम्यान गैरहजर आहे. अर्जदाराचा मुळ अर्ज परिपत्रक दिनांक २४-०९-२००९ रोजीच्या अर्जानूसार जन माहिती अधिकारी यांच्या सांगण्यानुसार माहिती पुरविण्यात आलेली आहे. तरी सुद्धा अर्जदाराने परिपत्रक **ब** नुसार प्रथम अपिल दिनांक ०९-०३-२०१० रोजी दाखल केलेले आहे. उप सचिव, नगर विकास यांच्याकडे दिनांक ०३-०४-२०१० रोजी सुनावणी झाली. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला दिनांक १२-०४-२०१० रोजी कागदपत्राचे अवलोकन करुन माहिती पुरविण्यात आलेली आहे.

तसेच जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अर्जाच्या मूळ प्रपत्र Annexture A नुसार दिनांक ३०-११-२०१० रोजी अपिल क्रमांक ६०९२ ह्या आधीच निर्णय दिलेला आहे व त्या अनुषंगाने स्वत: दिनांक २४-१२-२०१० रोजी पुन्हा माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यांनी ह्या आयोगासमोर असे निदर्शनास आणले की, दिनांक ३०-११-२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे लिहून दिले की, स्वत: माहितीसाठी येतील परंतु ते न आल्यामुळे शेवटी दिनांक १५-०४-२०१० रोजी अर्जदाराला शीघ्र टपालाने माहिती पाठविण्यात आलेली आहे. तसेच अर्जदाराने असे निदर्शनास आणले की, अर्जदाराने पत्र दिलेल्या पत्त्यावरुन पत्रव्यवहार हा Unclaim म्हणून परत येत आहे. दिनांक ०५-०४-२०१० रोजीच्या निर्णयानुसार अपिल निकाली काढण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक २४-१२-२०१० रोजी उत्तर दिले व माहिती पाठविण्यात आली. सदर माहिती शीघ्र डाकेने पाठविली व ती परत आलेली नाही ती स्वीकारली असावी. यावरुन असा निकष काढण्यात येतो की, सदरची माहिती स्वीकारलेली आहे. तसेच

अपिलकर्ता यांचे समाधान झाले असावे असा निकष काढण्यात येत असून अर्जदाराचे अपिल हे खारीज करण्यात येते.

----आदेश----

५) अपिल खारीज करण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २१-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.४९/०१/११

श्रीमती शैलजा भालचंद्र सुभेदार, **---तक्रारदार**
अंबिका को.ऑ.हौ.सो.लि.,
बिल्डींग नं.७, रुम नं.१७८,
सिद्धार्थ नगर नं.३,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०० १०४.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,

मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१. **----गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / तक्रारदार गैरहजर आहेत. ह्या प्रकरणी अपिल क्रमांक २०१०/५०८७/०२ वर आयोगाने अर्जदाराचे अपिल मान्य करुन दिनांक २८-१२-२००६ रोजी सादर केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी असे म्हटले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्री. बी.एम.काकड हे हजर आहेत. यांच्या म्हणण्यानुसार मा. राज्य माहिती आयुक्त यांनी दिनांक २३-०६-२०१० रोजी दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी म्हणून जा.क्र. २२५२ नूसार दिनांक १३-०७-२०१० चे पत्राद्वारे माहिती पाठविण्यात आली होती. त्यानंतर दिनांक १२-०८-२०१० रोजी अर्जदार / तक्रारदार यांनी पुन्हा तक्रार अशी तक्रार केली की, मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार माहिती पुरविण्यात आलेली नाही. दिनांक १४-१२-२०१० रोजी सदर प्रकरणी ह्या आयोगासमोर सुनावणी झाली व त्यात मौखिक आदेश देण्यात आले. दिनांक ०७-१२-२०१० रोजी झालेल्या रोजनाम्याची प्रत मिळावी अशी विनंती केली व ती सुद्धा मान्य करण्यात येवून दिनांक २०-१२-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अर्जदार हजर झाले. परंतु नकार दिल्यामुळे सदरची माहिती साध्या पोस्टाने अर्जदाराला पाठविण्यात आली. त्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले असेल असा निकष काढल्यामुळे अर्जदाराची तक्रार ही निकाली काढण्यात येते. अर्जदाराला सदर माहिती पोस्टद्वारे पाठविलेली आहे. माहिती न प्राप्त झाल्यास स्वत: जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी प्रथम श्रेणी - १, यांच्याकडुन विनाशुल्क उपलब्ध करुन घ्यावी.

----आदेश----

५) तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.५०/०१

श्री.विश्वास वसंत ताम्हणकर, ---तक्रारदार
टागोर नगर, चाळ क्र. १५६,
खो.क्र.२५८५, ग्रुप क्र.५/ब,
विक्राळी (पूर्व), मुंबई ४०० ०८३.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,
उपनिबंधक (म्हाडा) यांचे कार्यालय,
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
(मुख्यालय -१), पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,
बृहन्मुंबई, मुख्यालय-१,तळमजला, क्रॉफर्ड मार्केटसमार,
डी.एन.रोड,मुंबई ४०० ००१. -----गैरतक्रारदार

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११

तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / अपिलाथी गैरहजर आहेत. अर्जदाराने दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या अनुषंगाने ह्या आयोगाने ह्या प्रकरणी ह्या आधी दिनांक ०४-१०-२०१० सुनावणी झाली. अर्जदार हजर होते व उत्तरवादी हजर होते. सदर प्रकरणी कुठल्याही प्रकारचे लेखी अथवा मौखिक आदेश पारित करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे सदर प्रकरण प्रलंबित होते. त्या प्रकरणी ह्या आयोगाने आज दिनांक २२-०२-२०११ रोजी सुनावणी ठरविली असताना अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय - १ श्री.बी.वाय.जंजाळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय-१ श्री.एच.झेड.राठोड हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, मुख्यालय -१ श्री.विजयसिंह जाधव हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी या आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दिनांक ०४-१०-२०१० अर्जदाराची तक्रार क्रमांक रामाआ-२०१०/ त.क्र.९७३/०२ ह्या आयोगाला लेखी उत्तर दाखल केलेले आहे व त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय -१), मुंबई यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयाच्या अभिलेखानुसार संबंधित कार्यसनाकडुन प्राप्त झालेली माहिती अर्जदारास जावक क्र. ६११/सपोआ/मुख्या-०१/माअअ/०९ दिनांक १२-०१-२००९ रोजी अन्वये पाठविण्यात आलेली आहे.

अर्जदाराने सदर प्रकरणात सह.पोलीस आयुक्त श्री. हिरा राठोड यांनी सत्य पडताळणी न करता त्यांना माहिती तशीच दिली त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन झालेले नाही असे म्हटले आहे. तरी अर्जदार गैरहजर असल्यामुळे कुठल्या कागदपत्रांची पडताळणी झाली नाही व कुठल्या आदेशाबद्दल पालन झाले नाही त्याबाबत अर्जदाराची तक्रार आहे. अर्जदार गैरहजर असल्यामुळे हे समजू शकले नाही. अर्जदार गैरहजर असल्यामुळे अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येते. तसेच सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी असे सांगितले की, अर्जदार हा वारंवार जुनी व जास्त प्रमाणात माहिती मागुन व त्यावर प्रश्न व उपप्रश्न विचारणे. त्या अनुषंगाने अर्जदाराने प्रकरणात माहिती मागितलेली आहे. सन २००७ या वर्षात नस्ती क्रमांक ११८ द्वारे माहिती मागितलेली आहे. सन २००८ या वर्षात ७ अर्ज दाखल केले, सन २००९ या वर्षात ८ अर्ज दाखल केले,सन २०१० मध्ये ५ अर्ज दाखल केले व त्यात बहूतेक अर्ज त्याच प्रकारच्या माहिती संबंधित आहे. त्यामुळे अर्जदाराला ह्या पूर्वी उपलब्ध असलेली संपुर्ण माहिती प्राप्त करुन देण्याबाबत प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार मागितलेली माहिती वास्तविक पाहता कलम ७(९) खाली निकाली काढण्यात येवू शकते कारण मागितलेली माहिती ही २५ मुद्दे व त्यापेक्षा अधिक प्रमाणात मागविण्यात आली आहे. सदरची माहिती ही वारंवार मागितली जाते. तरीसुद्धा अर्जदाराला माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे अर्जदाराने केलेली तक्रार ही सत्यावर आधारित नसून चूकीची केली म्हणून सदर माहिती अधिकाराच्या गैरवापरातुन तक्रार घडत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तरी अर्जदाराची तक्रार ही खारीज करण्यात यावी ही विनंती केली आहे. उत्तरवादी यांनी दाखल केलेले उत्तर दिनांक ०४-१०-२०१० रोजीचे अवलोकन तसेच दिनांक २२-०२-२०१० अर्जदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने उत्तरवादी यांनी दाखल केले उत्तर मान्य करुन अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येते.

----आदेश----

५) तक्रार खारीज करण्यात येते.

६) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : रामुमाआ/तक्रार क्र.५२/०१

श्री.अब्दुल गफूर का.हुणशाळ, **---तक्रारदार**
हॉटेल प्रेसिडेंन्ट, महाराष्ट्र नगर,
बांद्रा(पूर्व), मुंबई ४०० ०५१.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला,गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला,गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१. **----गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२२.०२.२०११
तक्रारदार - अनुपस्थित.
जन माहिती अधिकारी - उपस्थित.

अर्जदार / तक्रारदार गैरहजर आहेत. अर्जदार यांनी ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केलेली आहे व त्यात ह्या आयोगाने आदेश देवून संबंधित अधिकारीने माहिती आजतागायत दिली नाही व ती देण्याची

टाळाटाळ करीत आहेत. त्यावर संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व अर्जदाराला लवकरात लवकर माहिती देण्याचा आदेश देण्यात येवून या अनुषंगाने ह्या आयोगाने सुनावणी ठेवली होती व आज दिनांक २२-०२-२०११ रोजी अर्जदार गैरहजर आहेत. अर्जदाराला दिनांक २०-०३-२०१० रोजीच्या पत्रासोबत मागितलेली माहिती अर्जदाराला पाठविण्यात आलेली आहे व त्याची एक प्रत ह्या आयोगासमोर दाखल करण्यात आलेली आहे व त्यामुळे अर्जदाराला माहिती मिळाल्यामुळे अर्जदार आज दिनांक २२-०२-२०११ रोजी गैरहजर राहिल्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले असावे असा निकष काढण्यात येवून अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येते.

----आदेश----

५) तक्रार निकाली काढण्यात येते.

६) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २२-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०२९९/अपिलक्र ६४०८

क्रमांक : मुमाआ २०११/नोंदणी क्र./५०२९९-ब/अपिलक्र ६४०९

श्री.आनंद सोपान पारगावकर, ...अपिलकर्ता
१३५/३६४, विशाल को.ऑप.हौ.सो.,
पंतनगर, घाटकोपर (पूर्व),मुंबई ४०० ०७५.

---विरुद्ध---

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड,
ब्रांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०.
जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी (प्रकल्प),
एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड,
ब्रांद्रा (पश्चिम),मुंबई ४०० ०५०. ...उत्तरवादी

----विवेचन----

द्वितीय अपिलाचा दिनांक :०१.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २३.०२.२०११
अपिलकर्ता - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.
प्रथम अपिलीय अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी हे हजर आहेत. दोन्ही प्रकरणात मागितलेली माहिती ही खेतवाडी, टीपीएसए-६,फायनल प्लॉट नं.- १०६, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०० ०५४ ह्या संबंधित माहिती आहे. अर्जदाराने सुनावणी दरम्यान अपिल क्र.६४०८/२०११ ची माहिती मागितलेली आहे. ती २ मुद्यांमध्ये आहे व त्यात १९९२ पासून ते दिनांक ११-०३-२०१० पर्यंत कॉलनी अधिकारी यांनी जो काही पत्रव्यवहार मनपा मुख्यालय, एम.एस.आर.डी.ए. कार्यालयातून आलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या नक्कल प्रती पाहिजे आहेत तसेच सदर कालावधीत कॉलनी ऑफिसर यांना मनपा मुख्यालय, एम.एस.आर.डी.ए. कार्यालयातून आलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या मूळ प्रती पाहिजे आहे. अर्जदार हा दारिद्रय रेषेखाली नाही आहे. यासंबंधित सार्वजनिक माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी (प्रकल्प) एच/पश्चिम विभाग

यांनी अर्जदाराला दिनांक १२-०३-२०१० रोजीच्या अर्जानुसार पत्र दिले व त्यात दिनांक २०-०३-२०१० रोजी अर्जदाराला ह्या आधी कळविण्यात आले आहे की, सदर कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्याकरीता तयार ठेवण्यात आलेली असून माहितीचा अधिकार अधिनियमातंर्गतचे आकार पालिकेकडे भरणा केल्यानंतर आपणांस देण्यात येईल. त्यानंतर अर्जदाराने प्रथम अपिल अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०६-२०१० रोजी दाखल केले व त्यात माहिती दिलेली नाही आवश्यक असलेली माहितीच्या स्वरुपात खेतवाडी नकाशाबाबतचे अर्जदाराला जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ वसाहत अधिकारी यांनी दिनांक २२-०३-२०१०अर्जदाराला पत्र दिले व अर्जदाराला असे कळविले की, माहिती संदर्भात सदर पत्र प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष संर्पक साधावा. आपणांकडून विलंब झाल्यास अर्जदाराचे अपिल निकाली काढुन दप्तरी दाखल करण्यात येईल.

या अनुषंगाने अर्जदाराला दिनांक ०८-०७-२०१० रोजी दुसरे पत्र देण्यात आले व त्यात दिनांक ३०-०६-२०१० रोजी अर्जदार गैरहजर होते. त्यामुळे पुन्हा सुनावणी दिनांक २१-०७-२०१० रोजी दुपारी ३.१० वाजता सहायक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर तारखेला सुनावणी घेण्यात आली. परंतु अर्जदाराला त्याबाबतची प्रत देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी श्री.आत्माराम धुरी, कॉलनी ऑफीसर हजर आहेत व त्यांनी या आयोगासमोर प्रथम अपिल दिनांक २९-०७-२०१० रोजीचा आदेश दाखल केलेला आहे. सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी एच/पश्चिम विभाग यांनी अपिलकारास आवश्यक असलेली माहिती माहिती अधिकारातंर्गत देण्यात यावी असे म्हटले आहे. त्यानुसार अर्जदाराला दोन्ही अपिलांबाबत दिनांक ०३-०३-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांची त्या दिवशी भेट न झाल्यास फोनवर संर्पक साधुन (फोन नं. ८९७६३२७०४४/९२२४६३७२९७) व जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्यास श्री.माळवणकर यांच्याशी संर्पक साधुन अर्जदाराला दोन्ही अपिलांचे पपत्र अ नूसार मागितलेली माहिती विनाशुल्क त्या तारखेला पुरविण्यात येईल.अर्जदाराला माहिती मिळण्यासंबंधी कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार अर्जदार ह्या आयोगासमोर करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

अर्जदार / अपिलार्थी पपत्र अ नुसार दिनांक १२-०३-२०१० रोजी नुसार मुद्या क्र.१ व २ ची माहिती पाहिजे आहे.

----आदेश----

५) अपिल निकाली काढण्यात येते.

६) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये दाखल करण्यात आलेली तक्रार.

क्रमांक : मुमाआ२०११/तक्रार क्र.२१/०१

श्री.रामानंद शर्मा, **---तक्रारदार**
५ वा मजला, पोटिया इंडस्ट्रीयल इस्टेट,
दारुखाना, मुंबई ४०० ०१०.

---विरुद्ध---

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९,
३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे. **----गैरतक्रारदार**

----विवेचन----

सुनावणीचा दिनांक :२३.०२.२०११
तक्रारदार - उपस्थित.
जन माहिती अधिकारी - अनुपस्थित.

अर्जदार / अपिलार्थी यांनी दिनांक ०१-१०-२००९ रोजी जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता, एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९, ३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे यांच्याकडे, "Total list of load sanctioned but not yet released as on this date 1st oct, 2009 with details such as Name of the Party, Contract demand sanctioned, date of sanction, and feeder on which the load is proposed to be given." अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अर्जदाराने दुसऱ्या अर्जात दिनांक ०१-१०-२००९ रोजी नुसार, "1) Name of the feeder 2) Current rating capacity of the conductior, 3) Actual current at which the feeders are operating, 4) Number of times the feeder has tripped due to over load (current) in the past two months." अशी एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जदाराचा अर्ज कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., ओ. ॲण्ड एम डिव्हीजन, वसई यांना दिनांक २१-१०-२००९ रोजी पाठवून त्यांना अशी विनंती करण्यात आली होती की, अर्जदाराला पाहिजे असलेली माहिती परस्पर अर्जदाराला पाठवून त्या संबंधीची माहिती ह्या कार्यालयात द्यावी.

वरील सुचनेनुसार कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डिव्हीजन, वसई यांनी कुठल्याही प्रकारची माहिती अर्जदाराला दिली नाही अशी तक्रार ह्या आयोगासमोर दाखल केलेल्या तक्रारीत केली आहे व ह्या संबंधी त्यांनी वारंवार कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठपुरावा स्वत: जावून त्यास संबंधित अध्यक्ष सचिव यांच्याकडे विचारणा केली असता तसेच फोनवर संर्पक साधुन सुद्धा अर्जदाराला माहिती पुरविलेली नाही किंवा कुठल्याही प्रकाराचा पत्रव्यवहार केलेला नाही व त्यामुळे अर्जदाराने ह्या आयोगासमोर तक्रार दाखल केली आहे.

सदर प्रकरणात अर्जदाराने जर प्रथम अपिल दाखल केले नसेल तर जन माहिती अधिकारी किंवा कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डीएन, वसई यांनी अर्जदाराला माहिती उपलब्ध केली किंवा नाही, कसे कोणाकडून उपलब्ध होईल किंवा प्रथम अपिल कोणाकडे करावयाचे ह्याबाबत कायद्याने सांगणे बंधनकारक होते पण कुठलीही तसदी घेतली नाही. सदर प्रकरणात उत्तरवादी गैरहजर असल्यामुळे या घडीला शहानिशा होवू शकली नाही. या आयोगासमोर अर्जदाराने २ वेळा पत्रव्यवहार करण्याबाबत निदर्शनास आणले होते. सदरचे पत्र अर्जदाराला दिनांक १८-११-२००९ रोजी मिळाले आहे व दुसरे पत्र दिनांक २१-१०-२००९ चे दिसते. तर वरील बाबतीत कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डिव्हीजन, वसई,जिल्हा-ठाणे यांनी अर्जदाराला कुठलीही माहिती पुरविण्याची तसदी घेतली नाही किंवा पत्रव्यवहार केला नाही. तरीही ह्याबाबत अधिक्षक अभियंता, एमएसईडीसीएल लि.एमएसईडीसीएल कॉलनी बिल्डींग १९, ३ रा मजला, वसई (पूर्व),जिल्हा - ठाणे यांनी सदर प्रकरणात स्वत: किंवा संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा सक्षम अधिकाऱ्याला सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत व अर्जदाराला माहिती का देण्यात आली नाही किंवा विलंब का लावला याबाबत त्यांच्या विरुद्ध नियमानूसार कारवाई करावी.

कार्यकारी अभियंता, एमएसईडीसीएल, ओ ॲण्ड एम डीएन, वसई यांना शेवटी पुन्हा एकवेळ संधी देवून असा आदेश करण्यात येतो की, दिनांक २१-१०-२००९ चे पत्र क्रमांक १३०८४ व संदर्भ क्र. मुअ/कपक/तांत्रिक/५०९२ दिनांक ०६-१०-२००९ अर्जदाराला हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पंजीबद्ध डाकेने माहिती पुरवावी. सदर माहिती अर्जदाराला या आदेशानुसार न मिळाल्यास अर्जदार ह्या आयोगासमोर कुठलीही तक्रार असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ खाली तशी तक्रार करु शकतो. वरील आदेश व सुचना देवून सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

----आदेश----

७) तक्रार निकाली काढण्यात येते.

८) सदर निर्णयाची एक प्रत कार्यकारी अभियंता, ओ ॲण्ड एम, वसई, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि., रामदास नगर, साईबाब मंदिर जवळ, वसई (पूर्व). जिल्हा-ठाणे यांना देण्यात येत आहे.

९) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

(भास्कर पाटील)
प्रभारी, राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २३-०२-२०११
मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४०/अपील क्रमांक ६२८३/२०१०

श्रीमती फातिमा तय्यबजी ढोलकवाला,
१०४, पुष्पांजली,एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०००५४. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिक आयुक्त
बी अँड एफ, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महानगरपालिक आयुक्त
बी अँड एफ, एच/पश्चिम विभाग,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.), मुंबई-५०. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी सहाय्यक अभियंता,इमारत व कारखाने यांच्याकडे टेनंट कोपार्टनरशीप हौसिंग सोसायटी, सीटीएस नं.२१०,जी वार्ड नं.३१९१ प्लॉट नं.७८ च्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.७.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी पत्ता दिला नाही असे कारण कळवून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, महानगरपालिकेतील इमारत विभागात सीटीएस क्रमांक दिला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही व सीटीएस क्रमांक दिला तर पत्ता दिला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. वास्तविक महानगरपालिकेच्या अभिलेख विभागात कोणत्याही इमारतीच्या संदर्भात प्रकरण शोधावयाचे

असल्यास त्याबाबत योग्य ती अभिलेख जतन करण्याची पध्दत वापरणे आवश्यक आहे परंतु कोणत्याही पकारे त्यांना माहिती मागीतली तर नस्ती आढळून येत नाही अशाप्रकारचे उत्तर दिले जाते. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच करण्यात येते असे दिसून येते. या प्रकरणीसुध्दा अपिलकर्ता यांनी इमारतीचा सव्हे क्रमांक दिला असूनसुध्दा पत्ता दिला नाही या कारणास्तव त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीही कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे या कारणास्तव प्रथम अपील निकाली काढणे याचा अर्थ प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच केली असे असा निष्कर्ष काढावा लागतो. यास्तव त्यांनी अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे.प्रथम अपीलीय अधिकारी हे त्यांच्या शाखेतील किंवा विभागातील वरिष्ठ अधिकारी असतात याचे कारणच मुळात असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसेल तर वरिष्ठ अधिका-यांनी ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. परंतु कोणतेही प्रथम अपीलीय अधिकारी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती चौकशी करीत नाहीत व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपीलांची संख्या वाढत आहे. त्यामुळे आयुक्त, महानगरपालिका यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना कमीतकमी योग्य तो निर्णय देऊन माहिती उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने चौकशी करणे आवश्यक आहे असे आदेश देणे आवश्यक आहे. सदरच्या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांच्याविरुध्दही शास्ती लादणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु आज ते आयोगापुढे हजर नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.२०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष खुलासा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास शास्ती कायम करण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील क्रमांक-मुमाआ/५०१४१/अपील क्रमांक ६२८२/२०१०

श्रीमती फातिमा तय्यबजी ढोलकवाला,
१०४, पुष्पांजली,एस.व्ही.रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०००५४. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,
इमारत प्रस्ताव, डब्ल्यू.एस.एच वार्ड, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०

जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता,
इमारत प्रस्ताव, डब्ल्यू.एस.एच वार्ड, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबइ-४०००५०. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी (इमारत प्रस्ताव),उपमुख्य अभियंता(W/S) यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Particulars of Bldg. on plot bearing C.T.S.No.२१०,T.P.S.-III,Santacurz(W)S.V.Rd.,Mumbai-४०००५४,Pushpanjali Tenant Co-Operative Housing Society- Kindly provie me the following information- Sanctioned(approved plan-year १९७८) builder-M/S Raja Construction co.

v) Number of Stilts Car Parking Space-Area-Direction-South-East-West,North
w)Number of enclosed portios-area-direction.
x) Open plot-Garden-area-direction
y) Number of servant's toilets

z) If there is a passage from the interior of the building to go from front to back or (vise versa)

aa) No. of underground tanks for the society.

bb) Number of flats first floor and their areas, area of the flats on ३rd floor ३०१ & ३०२(carpet area)

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.७.२०१० रोजी काही माहिती उपलब्ध आहे परंतु मूळ नस्ती आढळून येत नाही. मात्र मूळ नस्ती शोधण्याचा प्रयत्न चालू आहे व संबंधीत वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून अपिलकर्ता यानी दि.२.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन, फाइल वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून कागदपत्र उपलब्ध करुन घेऊन फाईल पुर्नगठीत करण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतली आहे ती १९७८ सालातली आहे व जोपर्यंत इमारत आहे तोपर्यंत त्या संदर्भातील संपूर्ण नकाशे, कागदपत्र इत्यादी गोष्टी जतन करणे आवश्यक असते. परंत प्रत्येक वेळेस नस्ती आढळून येत नाही अशाप्रकारचे उत्तर इमारत विभागाकडून दिले जाते असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात काही माहिती उपलब्ध आहे परंतु मूळ नस्ती उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे संबंधीत नस्ती जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा पुर्नगठीत करुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. दरम्यान संबंधीत फाईल उपलब्ध झालेली आहे व निरिक्षणाकरीता उपलब्ध आहे असे आयोगापुढे खुलासा करतांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जात मागीतलेली माहिती/छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून१० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.१९.६.२०१० च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रमाणित करुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०२१५/अपील क्रमांक ६२१३/२०१०

डॉ.मुकेश बैजनाथ शुक्ल,
सी-०१, ओम चामुंडा को.ऑप.हौ.सोसायटी,

वाकोला ब्रीज,दत्तमंदीर रोड, सांताक्रूझ(पूर्व),
मुंबई-४०००५५. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा निबंधक,
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट कँपस, महात्मा गांधी रोड,
मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ इमारत,
फोर्ट कँपस, महात्मा गांधी रोड,
मुंबई-४०००३२. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी द.१३.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Subject of Information - Faculty of Ayurveda - Kayachikitsa(final year B.A.M.S. Course) and M.D. Ayurveda Kaya Chikitsa. The subject of Panchkarma is part of Kayachikitsa ४th paper first Section in under graduate (B.A.M.S. course)and also in Postgraduate Course(M.D. Ayurveda Kayachikitsa)

The Period to which the information relates -Since the date of inception of faculty of Ayurveda in the University till date

Description of the information required - As Panchakarma is a part of Kayachikitsa- ४th paper first section and is not a separate subject in Mumbai University:

१०. Whether it is to be construed that the recognized post graduate students of M.D. Kayachikitsa are also having knowledge of Panchakarma?

११. Whether the experience of approved Undergraduate and Postgraduate Teacher who are teaching Kayachikitsa-४th paper first section= Panchakarma, will be counted also as teaching experience in Panchakarma&ref.dated June ०६,२००५-Post Graduate Lecture for the Ayurved Vachaspati-M.D. Degree for the first and second term of academic year २००५-२००६)?

१२. Whether the approved Postgraduate Teacher and Guide in Kayachikitsa will also be considered as the approved Postgraduate Teacher and Guide in Panchakarma?

अर्जाच्या अनूषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.४.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.१०.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी चेअरमन,ॲडहॉक बोर्ड ऑफ स्टडीज,कायाचिकित्सा यांच्याशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. तत्पूर्वी दि.२१.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१,२,३ संदर्भात अभिप्रायात्मक प्रश्न असल्यामुळे माहितीच्या अधिकारात येत नाही असे उत्तर त्यांना दिले होते व त्याबाबत संबंधीत प्राधिकरणाशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन घेता येईल असेही कळविण्यात आले होते. त्यानंतर दि.२७.९.२०१० रोजी अपिलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात आले होते व त्यानंतर दि.१५.१०.२०१० रोजी अपिलकर्ता यांच्या त्यांच्या मुद्यांच्या संदर्भत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेसुध्दा समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये ३ प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या प्रश्नांच्या माध्यमातून संबंधीत प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे मत मागितलेले आहे. त्यामुळे संबंधीत अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. महितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी हे सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेले अभिलेखे, कागदपत्र किंवा दस्तऐवज यांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत माहिती अधिका-यांनी अभिप्राय देणे अपेक्षित नाही. राज्य माहिती आयोग हे कोणत्याही प्रकारचे तक्रार निवारण न्यायालय नाही त्यामुळे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत चौकशी करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(त्र) प्रमाणे 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेल्या तसेच अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मिळविता येण्याजोगी माहिती देणे अपेक्षित आहे व त्यात कागदपत्र,दस्तऐवज,अभिलेखे यांचे निरिक्षण करुन छायांकित पती उपलब्ध करुन घेणे किंवा संगणकात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. व त्याकरीता माहिती या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. या संज्ञेच्या व्याख्येत सार्वजनिक प्राधिकरणाकडे साहित्याच्या स्वरुपात उदा.कागदपत्र, दस्तऐवज,परिपत्रके इत्यादींच्या संदर्भात असलेल्या माहितीचा समावेश होतो व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे अभिमत मागणे अपेक्षित नाही व तसे त्यांना कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे विलंबाच्या संदर्भात सदर प्रश्नाबाबतचे स्पष्टीकरण डॉ.सुरेखा देवाईकर(चेअरपरसन)आयुर्वेद फॅकल्टी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर त्यांचे स्पष्टीकरण अर्जदारास देणे शक्य व्हावे. या सर्व बाबींची पूर्तता करतांना त्यासाठी काही काळ विलंब झाला असा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे. यावरुन माहिती

उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही,उलटपक्षी जी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही ती सुध्दा देण्याचा प्रयत्न केलेला आहे व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

७) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

८) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१४६/अपील क्रमांक ६२८१/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी(इ.व का.),
मुंबई महानगरपालिका पी नॉथ कार्यालय, मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी(इ.व का.),
मुंबई महानगरपालिका पी नॉथ कार्यालय, मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३१.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारती व कारखाने),पी नॉर्थ,महानगरपालिका कार्यालय, लिबर्टी गार्डन, मालाड(प.) यांच्याकडे अर्ज करुन पुढीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते- **अवैध बांधकामोंकी लिखित शिकायत पर इमारत विभाग द्वारा की गई कारवाई के संदर्भमें जानकारी.** सदर अर्जाच्या संदर्भात अपिलकर्ता यांनी १५.३.२०१०,२४,५,२०१० रोजी केलेल्या अर्जांच्या संदर्भात माहिती मागीतलेली दिसून येते.काही मुद्यांमध्ये अपिलकर्ता यांनी मोघम माहिती मागीतलेली आहे,काही मुद्यांमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे मत विचारलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी २१.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.७.२०१० रोजी देण्यात आला असून उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री.एस.एच. असीफ,कनिष्ठ अभियंता उपस्थित आहेत. त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली ती अतिशय मोघम स्वरुपाची आहे. असे असले तरी त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात मात्र कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली दिसून येत नाही व त्याबाबत त्यांना काहीही कळविण्यात आलेले नाही.

अर्जदाराने अर्ज केल्यानंतर ३० दिवसांच्या आत त्या अर्जात मागितलेल्या माहितीची छाननी करुन त्याप्रमाणे त्यांना उत्तर किंवा कागदपत्र उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु सदरच्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व यास्तव त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी आज सुनावणीस उपस्थित नाहीत व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.३१.५.२०१० च्या अर्जातील नमूद केलेल्या तक्रारींच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती तसेच इतर मुद्यांमधील कागदपत्र उपलब्ध असतील तर ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती अपिलकर्ता यांना व्यक्तीश: जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता यांच्या दि.३१.५.१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसात माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे व आज ते आयोगापुढे सुनावणीससुध्दा हजर झाले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु.५०००/-ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत करावा तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती कायम करण्यात येईल व सदर शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश दिले जातील याची नोंद घ्यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१४८/अपील क्रमांक ६२७९/२०१०

श्री.शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली(पूर्व), मुंबई-१०१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,

पी/उत्तर विभाग,बृहन्मुंबई मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी,
पी/उत्तर विभाग,बृहन्मुंबई मामलेदार वाडी,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, अपिलकर्ता अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, मुंबई महानगरपालिका,पी(उत्तर) विभाग यांच्याकडे मालाड(नॉर्थ) विभागातील **इमारत विभागमें कार्यरत अभियंताओंकेसंबंधमें जानकारी** अशी माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२१.७.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांच्या आत देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहत. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी २२.६.२०१० रोजी मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे व ती त्यांनी घेऊन जावी असे कळविण्यात आले होते. परंतु माहिती घेऊन न जाता त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरसुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती निरनिराळया विभागांची असून कोणत्याही कागदपत्रांच्या संदभात निश्चित अशी माहिती मागीतलेली नाही.सर्व माहिती मोघम स्वरुपात मागीतलेली दिसून येते. अपिलकर्ता यांच्या दि.२४.५.२०१० च्या अर्जातील मागीतलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(त्र) प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली व अधिनियमाच्या तरतुदीपमाणे मिळविता येण्याजोगी असलेली

कागदपत्र,अभिलेखे,दस्तऐवज यांचे निरिक्षण करणे व निरिक्षणाअंती छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे. तसेच अधिनियमाच्या कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्र,अभिलेखे,दस्तऐवज,परिपत्रके, शासन निर्णय,संविधा इत्यादीच्या स्वरुपात असलेली माहिती याचा समावेश होतो. या दोन्हीही व्याख्यांवरुन कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित असते.त्यामुळे अर्जदाराने कागदपत्राचे वर्णन करुन माहिती मागणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारची माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात ती सर्व माहिती मोघम स्वरुपाची आहे व कोणत्याही कागदपत्राचे निश्चित वर्णन केलेले नाही व ती तयार करुन द्यावयाचे झाल्यास सावजनिक प्राधिकरणाची यंत्रणा मोठया प्रमाणावर वळवून व तयार करुन द्यावी लागेल व तसे अधिनियमाच्या कलम ७(९)प्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे जी माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध आहे ती माहिती अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी कारण माहितीच्या अर्जात त्यांनी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे व तसे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी याना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/४९३५१/अपील क्रमांक ६२१८/२०१०

श्री.अशोक बन्सोड,
फ्लॅट नं.७०३, जमुना अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.,
६८,एस.व्ही.रोड, शॉपर्स स्टॉप समोर,अंधेरी(प.),
मुंबई-४०००५८. **.....** **अपिलकर्ता**

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)(प.उ.)१,
बृहन्मुंबई महानगरपालिका के विभाग कार्यालय,
भाभा हॉस्पीटल जवळ, आर.के. पाटकर मार्ग,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)(प.उ.)१ ,
बृहन्मुंबई महानगरपालिका के विभाग कार्यालय,
भाभा हॉस्पीटल जवळ, आर.के. पाटकर मार्ग,

बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २२.७.२०१०
सुनावणीचा दिनांक : १.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.६.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव)यांच्याकडे फाईल क्र.CE/७३५५/BSII/३A-K located at Jamuna Apartment C.H.S.Ltd.,६८,S.V. Rd.,Opposite to Shopper's stop, Andheri(West), Registration No. BOM /HSG/ KW/७३८२/१९८४ च्या संदर्भात सी.सी., आय.ओ.डी., ओ.सी., लेआऊट प्लॅन,बिल्डिंग कंप्लीशन सर्टिफिकीट,तसेच इमारतीच्या संदर्भातील इतर कागदपत्र प्रत्यक्ष घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.११.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदभात दि.१२.६.२००९ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की,त्यांनी दि.६.३.२००९ रोजी जी माहिती मागीतली त्या माहितीच्या संदर्भात नस्ती आढळून येत नाही असे त्यांना दत्तर देण्यात आले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्येसुध्दा नस्ती आढळून येत नाही व त्या नस्तीचा शोध घेण्यात यावा असे कळविण्यात आले होते. मात्र अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी ज्या इमारतीच्या संदर्भात माहिती मागीतलेली आहे त्या इमारतीच्या संदर्भातील नस्ती क्रमांक आढळून येत नसल्यामुळे माहितीचा शोध घेता येत नाही. तरी सर्व कार्यालयामध्ये व भांडूप कॉंप्लेक्स येथील गोडाऊनमध्ये शोध घेतला तरी सदरची नस्ती आढळून आलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांनी जर पाण्याचे देयक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिले तर त्या देयकावर नस्ती क्रमांक असतो व त्या क्रमांकाप्रमाणे शोध घेणे सुलभ होईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी पाण्याचे देयक उपलब्ध करुन दिले जाईल असे सांगितले. परंतु एकूणच महानगरपालिकेतील इमारत व कारखाने या विभागातून नस्त्या आढळून येत नाहीत अशाप्रकारचे उत्तर अर्जदारांना दिले जाते असे सर्वसाधारणत: दिसून येते. त्यावरुन अभिलेख्यांचे योग्यरित्या जतन महापालिकेमार्फत केलेले दिसून येत नाही व ती

महापालिकेतील वरिष्ठ अधिका-यांची अकार्यक्षमता आहे असे म्हणावयास हरकत नाही. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दि.१४.४.०४ रोजीसुध्दा बेकायदेशीर वापराच्या संदर्भात तक्रार केलेली होती व त्या तक्रारीबाबत कोणतीही चौकशी झालेली नाही. त्यानंतर दि.९.१२.०५ रोजीसुध्दा एक तक्रार केली होती व त्या तक्रारीच्या संदर्भातही कोणत्याही पकारे चौकशी करण्यात आलेली नाही. दि.१७.७.०९ रोजी पुन्हा त्यांनी त्यांच्या केलेल्या तक्रारींवर काय कार्यवाही झाली याबद्दल माहिती अधिकारात माहिती मागीतली परंतु त्याबाबतही कोणतेही उत्तर दिलेले नाही. दि.२७.१०.०९ रोजीसुध्दा त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन कार्यवाहीची माहिती विचारली परंतु त्याबाबतही उत्तर दिले जात नाही व यावरुन माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे असे म्हणावे लागते असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

वरील दोन्हीही विभागांमध्ये अभिलेख्यांचे जतन योग्यरितीने केलेले नाही असे आढळून येत असल्यामुळे यापुढे आयुक्त, महानगरपालिका यांनी इमारतींच्या संदर्भातील ज्या नस्त्या आहेत त्या नस्त्यांचे जतन करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र अभिलेखे अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे अभिलेख्यांचे जतन करण्याची प्रक्रिया मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी सुरु करणे आवश्यक आहे अन्यथा इमारतीस ७५ वर्षे पूर्ण झाली असली तरी त्याबाबतची कागदपत्र उपलब्ध होणे आवश्यक असते व तीच महानगरपालिकेत उपलब्ध होत नाहीत किंवा आढळून येत नाहीत अशाप्रकारचे उत्तर दिले जाते. सदर प्रकरणी माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी त्यांच्याकडील पाण्याचे देयक जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावे जेणेकरुन त्यावरुन तरी नस्तीचा शोध घेणे सुलभ होइल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी इमारतीच्या वास्तुशास्त्रज्ञांकडे संपर्क साधून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांपमाणे नवीन नस्ती पुर्नगठीत करावी व अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने सर्व कागदपत्र उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

Gawas/feb 2011

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००५७/अपील क्रमांक ६२९१/२०१०

श्री. आर.पी.यजुर्वेदी,
जे-२२०, अन्सा साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-९, बांद्रा(प.),
मुंबइ-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पश्चिम नियंत्रण कक्ष, कारख रोड,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११

अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्याकडे अर्ज करुन copy of the charge sheet filed at Hon.Court No.३९ Vile Parle OW ५४३६ dt.२६.६.२००९ as per letter addressed to the SRA Bandra(E) against developer Amroo Khan under MR & TP Act u/s ५३(७) एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण पोस्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना २७.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदार यांना समाधानकारक उत्तर दिले असल्याने सदरचे अपील दि.७.१.२०१० रोजी दफ्तरी दाखल करण्यात येत असल्याचे आदेश दिले हाते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी अर्ज केला त्यावेळेस माहितीशी संबंधीत गुन्हयात दोषारोपपत्र न्यायालयात सादरकेल्याने व ते प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही परंतु आता आरोपपत्र सादर झाले असेल तर त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आरोपपत्राची कागदपत्र एकाच प्रतीत असतात व ती न्यायालयात दाखल झालेली असतात व त्यामुळे त्यांच्याकडे आरोपपत्राच्या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध नाहीत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आरोपपत्राची प्रत उपलब्ध असली पाहिजे असे आयोगापुढे सांगितले व त्यामुळे जन माहिती अधिकारी व पोलीस निरिक्षक यांच्यात या मुद्याच्या संदर्भात मतभेद दिसून आले. मात्र दि.२७.१.२०११ रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांना अर्जदार यांनी मागणी केलेल्या मुद्याचा तपास पूर्ण करुन दोषारोपपत्र मा.रेल्वे मोबाईल न्यायालय,कोर्ट केस क्र.४३/पीडब्ल्यू/०९ अन्वये मा.३९ वे न्यायालय, विलेपार्ले येथे दाखल करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे, तरी अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती मा.न्यायालयाकडून घेण्याबाबत अर्जदार यांना अवगत करावे असे नमूद केलेले दिसून येते. त्यावर अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले असले तरी त्या संबंधातील नस्ती ही पोलीस कार्यालयात उपलब्ध असली पाहिजे त्याशिवाय न्यायालयामध्ये सरकारीपक्षातर्फे कोणत्याही प्रकारे त्या प्रकरणाच्या संदर्भात पुढील कार्यवाही करता येणार नाही. यावरुन ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक आहे. असे

असल्यास अपिलकर्ता यांना दोषारोपपत्राच्या संदर्भातील कागदपत्रांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील किंवा दोषारोपपत्राच्या संदर्भातील कोणतेही कागदपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत असे स्पष्टपणे अपिलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचेपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना १० दिवसाच्या आत दोषारोपपत्राची प्रत विनामुल्य रजिस्टरपोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी व दोषारोपपत्राची प्रत उपलब्ध नसेल तर ती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविण्यात यावे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००५५/अपील क्रमांक ६२९०/२०१०

श्री. आर.पी.यजुर्वेदी,
जे-२२०, अन्सा साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या शेजारी,
एल्फीस्टन कंपाऊंड, मुंबई.

जन माहिती अधिकारी,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
जे.जे. स्कुल ऑफ आर्टच्या शेजारी,
एल्फीस्टन कंपाऊंड, मुंबई. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ४.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडे अर्ज करुन List of Educational institutes not approved by AICTE flouting regulations and norms and action taken thereon: Information and Inspection of records अशी माहिती मागीतलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २००९ एप्रिल ते अर्जाच्या तारखेपर्यंतचा असून माहिती एकूण A ते F या मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने किंवा व्यक्तीश: घेणार असे नमूद करुन त्याकरीता त्यांनी मोबाईल नंबरही दिलेला आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना पत्र क्रमांक ११/तंशिसं/ मा.अ./ २०१०/१२१८, दि.७.८.२०१० अन्वये माहिती देण्यात आली होती. परंतु अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी दि.२५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही. परंतु काल १.२.२०११ रोजी त्यांना कार्यालयाकडून एक पत्र मिळाले आहे व ते त्यांनी अद्यापपर्यंत फोडलेले नाही. त्यामुळे त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि.७.८.२०१० रोजी माहिती दिलेली होती परंतु त्याबाबतचे कोणतेही पत्र त्यांनी आयोगापुढे सादर केलेले नाही. मात्र खुलासा दाखल करतांना व तोंडी युक्तीवाद करतांना सदर कालावधीमध्ये कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेचे काम तातडीने व तात्काळ करणे आवश्यक होते व या प्रवेश प्रक्रियेसाठी कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी व्यस्त होते. तसेच या कार्यालयात अतिशय अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास विलंब झाला. याबद्दल दिलगीर आहेत, भविष्यामध्ये याबाबत दक्षता घेण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. परंतु प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व ती उपलब्ध करुन दिलेली नाही व सहा महिन्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे मात्र आयोगापुढे दाखविण्यात आले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही ते आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुन तंत्रशिक्षण संचालनालय या कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत उदासिनता आहे असे दिसून येते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहितीचा अर्ज हाताळणे आवश्यक आहे. माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर संबंधित शाखेकडे किंवा अधिका-यांकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांचे सहाय्य अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे घेणे आवश्यक आहे. परंतु तसेही त्यांनी केलेले दिसून येत नाही. परंतु त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, संबंधीत अधिका-यांनी/कर्मचा-यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते.वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करणे ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाची जबाबदारी व कर्तव्य आहे व तो आता सेवेचा एक भाग झाला आहे. त्यामुळे विभाग प्रमुखांना याबाबत योग्य ती यंत्रणा देणे आवश्यक आहे.प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा पथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते.मात्र अपिलकर्ता यांना माहिती देण्यास विलंब झालेला असल्यामुळे संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी हे दोषी आढळून

येत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे इतर कर्मचारी व अधिकारी यांचे सहाय्यक घेणे आवश्यक असते व असे अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्य घेतले असेल तर त्यांना माहिती अधिकारी समजण्याज येते व त्या अधिकारी/कर्मचारी यांनी सदरच्या अर्जावर प्रक्रिया केली नसेल तर त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.१९.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने A ते F अशी मुद्देनिहाय माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे अधिनियमाच्या कलम ५(४) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात सहाय्य घेणे आवश्यक असते व ज्यांनी ज्यांनी सहाय्य केलेले नसेल त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही विभाग प्रमुख यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१७/अपील क्रमांक ६२२२/२०१०

श्री. निलेश सहदेव टोपले द्वारा आनंद दगडू इंगळे,
के.डब्ल्यू.पी.आय. म्युनिसिपल कॉलनी, दादाभाई क्रॉस रोड,
टेप व्हिलेज, अंधेरी(पश्चिम),
मुंबई-४०००५८. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, पालिराम रस्ता,
अंधेरी(पश्चिम), मुंबई-४०००५८.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, पालिराम रस्ता,
अंधेरी(पश्चिम), मुंबई-४०००५८. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२८.७.२०१० रोजीजन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा),बृहन्मुंबई महानगरपालिका, के(प.)विभाग यांच्याकडे अर्ज करुन बाँबे कॅम्बरीज स्कुल अंबोली, अंधेरी(प.) या शाळेची वर्ष १९९० ते २०१० या कालावधीतील एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून यते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.३०.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना के/पूव विभाग अंधेरी या शाळेची माहिाती मिळाली आहे परंतु त्यांच संस्थेची शाळा के(पश्चिम) विभाग यांच्याकडून मात्र

माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, दिनांक १.९.२०१० रोजी विभाग निरिक्षक(शाळा) यांनी मुख्याध्यापिका बाँबे कॅम्बरीज स्कुल,अंधेरी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच तत्कालीन माहिती अधिकारी आकस्मिक आजारी पडल्यामुळे व त्या कालावधीचा कार्यभार कोणालाही न दिल्यामुळे अर्जदारास माहिती देता आली नाही व ही बाब अर्जदार श्री.निलेश टोपले यांना व्यक्तीशः बोलवून सांगण्यात आली होती. तसेच अर्जदाराने अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त, के/पश्चिम विभाग यांचेकडे अपील न करता ३०.८.२०१० रोजी अपीलीय अधिकारी प्रशासकीय अधिकारी/शाळा यांच्या नावे अर्ज केला व त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नाही. तसेच अपिलकर्ता यांना बोलावून विना अनुदानित शाळेचे दस्तऐवज व माहिती परिरक्षीत केली जात नाही असे तोंडी सांगीतले होते व तरीसुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी बाँबे केम्बरीज स्कुल,अंबोली यांचेकडे लेखी पत्र दिले होते. परंतु त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विनाअनुदानित शाळा असल्यामळे त्यांना लागू होत नसल्यामुळे माहिती देण्यास नकार दिलेला आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मान्यता दिली आहे त्या संदर्भातील माहिती त्यांनी मागीतली होती व ती माहिती कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदरच्या तक्रार क्र.२०१०/४१५/०२ च्या संदर्भात आयोगाचा निर्णय झालेला आहे व त्यामध्ये खाजगी विनाअनुदानित शाळांची माहिती देता येणार नाही असा हा निर्णय आहे. ही बाब अपिलकर्ता यांना कळविण्यात आली होती. असे असले तरी अपिलकर्ता यांनी त्यांच्या शाळेच्या मान्यतेच्या संदर्भात के(पूर्व) विभाग यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी के(पश्चिम) विभाग यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तसेच मुख्य कार्यालयात जर शाळेच्या संदर्भातील प्रस्ताव उपलब्ध असेल तर त्या प्रस्तावाची कागदपत्र अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. यास्तव सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात यत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत कार्यालयात शाळेच्या मान्यतेविषयी व अपिलकर्ता यांच्या अर्जातील १ ते ६ मुद्यांच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध असेल ती मुद्देनिहाय कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता यांच्या दि.२८.७.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी आयोगापुढे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष करावा. शास्तीच्या संदर्भातील

माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अवगत करावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२१६/अपील क्रमांक ६२१४/२०१०

श्री. निलेश सहदेव टोपले द्वारा आनंद दगडू इंगळे,
के.डब्ल्यू.पी.आय. म्युनिसिपल कॉलनी, दादाभाई क्रॉस रोड,
टेप व्हिलेज, अंधेरी(पश्चिम),
मुंबई-४०००५८. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,गुंदवली,
अंधेरी, मुंबई-४०००९३.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पूर्व विभाग, आझाद रोड,गुंदवली,
अंधेरी, मुंबई-४०००९३. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : २.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा), बृहन्मुंबई महानगरपालिका, के(पूर्व) विभाग यांच्याकडे दि.२८.७.२०१० रोजी अर्ज करुन बाँबे कॅम्बरीज स्कुल, चकाला,अंधेरी पूर्व या शाळेची वर्ष १९९० ते २०१० या कालावधीतील माहिती प्रथम मान्यतेपासून मान्यताप्राप्त तुकडयांची संख्या तसेच मान्यताप्राप्त नसलेल्या तुकडयांची संख्या अशी एकूण ६ मुद्यांमध्ये शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय झालेल्या नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा देण्यात आलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता विभाग

निरिक्षक(शाळा) यांनी दि.२३.८.२०१० रोजी संबंधित शाळेला भेट दिली. संबंधित शाळेने त्यांच्या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही व शाळा अनएडेड असून ती सरकारी संस्थेत मोडत नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या अधिनियमाप्रमाणे मागीतलेली माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले व त्याकरीता मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.५१३२/०८ मध्ये दिलेल्या आदेशाची प्रत व माहिती आयुक्तांनी श्री.लिओ मसकरांस विरुध्द माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री. रॉड्रीग्ज,इंजिनिअरींग कॉलेज यांच्या अपीलांच्या आदेशाची प्रत जोडली आहे.परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर सदर माहिती पब्लीक अॅथॉरिटी म्हणजे प्रशासकीय अधिकारी (शाळा), के(पूर्व) विभाग यांच्याकडे असलेली माहिती एकूण ४६२ पृष्ठे अर्जदारास विनामुल्य दि.७.९.२०१० रोजी पुरविण्यात आली आहे. अर्जदाराची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोचपावतीदेखील घेण्यात आलेली आहे. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी शाळेची माहिती असल्यामुळे संबंधित शाळेकडून माहिती घेण्याचा सुरुवातीला प्रयत्न केला व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देतांना विलंब झालेला आहे असे सांगितले. परंतु अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे व त्याबाबतची पोचसुध्दा त्यांनी दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक २.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**
मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०००७०/अपील क्रमांक ६३०४/२०१०

श्री. विकास सुधाकर हरियाण,
लखमा जानु खोत चाळ, न्यु आग्रिपाडा,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमहासमादेशक,
महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालय,
जुने सचिवालय जोड इमारत, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ प्रशासिक अधिकारी(प्रशा:धोरण),
महासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालय,
जुने सचिवालय जोड इमारत, महात्मा गांधी मार्ग,
मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.१५.१.२०११ रोजी सदर अपिलाची माहिती त्यांना प्राप्त झाली असून मिळालेल्या माहितीशी ते सहमत असल्याबाबतचे लेखी पत्र दिले असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७१/अपील क्रमांक ६३०५/२०१०

श्री. अनिल लक्ष्मण कांबळी,
बी.एम.सी. स्टॉल लायसन्स क्र.१२४२७,
चुनाम लेन, पंडित बिल्डिंगजवळ, डॉ.भडकरकम मार्ग,
ग्रँट रोड, मुंबई-४००००१. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
अे विभाग कार्यालय, १३४ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी,
अे विभाग कार्यालय, १३४ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई-४००००१. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक, अनुज्ञाप्ती, ए वार्ड यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते-

१) Transfer of Stall No.१०८३ in the name of Yasmin Shaikh and allotting place for doing business in A ward dated ३०.३.२००७.

२) All documents received from Licensee Mr. Muzzaffar Rahimattulla Shaikh to transfer of Sq.Stall Lic.No.१०८३ in the name of Yasmin Shaikh.

३) SL/०००५२५/LEA dated १७.४.२००७

४) Papers U/a LOP/१४३९ dtd १७.३.२००७

५) Total Nos. of transfer applications received before and after dated १२.२.२००७ pending and cleared till this application in A ward.

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून दि.१७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.७.१०.२०१० रोजी देण्यात

आला असून अपलि अंशत: मान्य करण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या पत्रात म्हटल्याप्रमाणे विहित शुल्क आकारुन त्यांना ७ दिवसांच्या आत माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु.८०/- चा भरणा करावा असे कळविले व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी दि.८.१०.२०१० रोजी रु.८०/- च्या खर्चाचा भरणा केलेला आहे.त्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना मुद्दा क्र.१,२ व ५ च्या संदर्भात अपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना त्यांच्या अजाच्या अनुषंगाने दि.२३.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध आहे व त्याबाबत खर्चाचा भरणा करावा असे रजिस्टर पोस्टाने कळविण्यात आले होते. परंतु रजिस्टर पत्र परत आलेले आहे. अपिलकर्ता यांनीसुध्दा आयोगापुढे असे सांगितले की. ते मुंबई बाहेर होते व त्यामुळे सदरचे पत्र परत गेलेले होते. मात्र ज्या नस्तीच्या संदर्भात माहिती मागीतली होती त्यातील संपूण माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुन्हा असे सांगितले की, सदरच्या नस्तीतील संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यास कोणतीही हरकत नाही. यापूर्वी आवश्यक तेवढीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु अपिलकर्ता यांना संपूर्ण नस्तीतील प्रत्येक पृष्ठाच्या संदर्भात खर्चाचा भरणा करण्यास संमती दिलेली असल्यामुळे त्यांना नस्तीमधील संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील व त्याकरीता सदरचे अपिल अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीतील दिलेल्या माहितीपेक्षा उर्वरीत कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा केल्यानतर व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्याकरीता अपिलकर्ता यांनी व्यक्तीश: जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ७.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००६९/अपील क्रमांक ६३०६/२०१०

श्री. शंकर नागेश कविलकर,
टी/४५/३०४, प्रतिक्ष नगर, सायन कोळीवाडा,
मुंबई-४०००२२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता(रस्ते वाह. व पुल),

मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
मुंबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(रस्ते) शहर,
कमर को.ऑप.हौ.सो.,१ला मजला, पट्ठे बापूराव मार्ग,
ग्रँट रोड, मुंबई-४००००७. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(रस्ते)शहर यांच्याकडे अर्ज करुन सायन रोड क्र.२८ व २९ मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या संदर्भात सन २०१० या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसनू येते.

१)महापालिकेच्या कोणत्या अधिका-यांच्या देखरेखीखाली काम निर्देशित केले गेले त्यांची नावे देण्यात यावी.

२)सदर कामाची जी तपासणी ज्या प्रयोगशाळेत करण्यात आली त्या प्रयोगशाळेचा पत्ता देण्यात यावा.

३) सदर कामासाठी ज्या तपासण्या केल्या गेल्या त्या किती व कोत्या प्रकारच्या होत्या, त्याची तारखेसहीत माहिती देण्यात यावी.

४) सदर कामाचे प्रयोगशाळेत वरील तपासण्या केल्या गेलेल्या अहवालाची छायांकित प्रत देण्यात यावी

माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१२.८.२०१० रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात तपासणी अहवाल उपलब्ध करुन दिलेला दिसून येतो. मुद्दा क्र.४ च्या संदर्भात तपासणी अहवालाच्या एकूण १०६ इतक्या छायांकित प्रतिंसाठी प्रति प्रत रु.२/- प्रमाणे एकूण रु.२१२/- इतके शुल्क कार्यालयात जमा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.३०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१६.९.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीपेक्षा अधिक माहिती उपलब्ध असल्यास ती १५ दिवसाच्या आत द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सुरुवातीला युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याअर्जाप्रमाणे त्यांना काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि.१२.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपिलकर्ता यांनी माहिती अपुर्ण व मागीतलेल्या माहितीपेक्षा वेगळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे सांगितले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये अपिलकर्ता यांनी मागीतलेलीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दाखविले. तरीही अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, काँक्रीटच्या रस्त्याला तडे गेल्यानंतर जी तपासणी प्रयोगशाळेत केलेली आहे त्या तपासणीच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलली नाही. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या बद्दल तोंडी स्पष्टीकरणात ते दाखवून दिले व यावरुन अपिलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भातच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, दि.२९.९.२०१० रोजीसुध्दा या कार्यालयाच्या दस्तऐवजात उपलब्ध असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यापेक्षा अधिक माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांना कळविलेले होते. असे जरी दिसून येत असले तरी तडे गेल्यानंतर प्रयोगशाळेत तपासणी केलेली आहे किंवा नाही याबद्दलची माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपिलकर्ता यांना त्यांनी मागीतलेल्या सायन रोड क्र.२८,२९ मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या संदर्भात तडा गेल्यानंतर प्रयोगशाळेमध्ये तपासणी केली गेली असल्यास त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा तशा प्रकरची तपासणी केली गेली नसल्यास तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००६८/अपील क्रमांक ६३०७/२०१०

श्री. अशोक वसंतराव दळवी,
२२, मोहन अपार्टमेंट, रमेश नगर, अंबोली,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग-१, ६वा मजला मल्होत्रा हाऊस,
जनरल पोस्ट ऑफीससमोर, मुबई-४००००१.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग-१, ६वा मजला मल्होत्रा हाऊस,
जनरल पोस्ट ऑफीससमोर, मुबई-४००००१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.१८.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे त्यांनी दि.१.१२.२००९ रोजी अपना सहकारी बँकेच्या विरोधाम त्यांचे सभासदत्व रद्द केल्याबद्दल अप्पर आयुक्त व विशेष निबंधक पुणे यांना तक्रार केली होती त्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती मागीतलेली दिसून येते. तसेच मुद्दा क्र.२मध्ये त्यांनी काही मागण्या केलेल्या आहेत व त्या मान्य कराव्यात असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१०.६.२०१० रोजी आपला तक्रार अर्ज कार्यालयाकडील दि.४.६.२०१० रोजीच्या पत्राने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,एफ/एस विभाग, मुंबई यांच्याकडे तक्रारीतील मुद्यांवर चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी पाठविण्यात आलेला आहे. सदरचा अहवाल अद्यापपर्यंत या कार्यालयास प्राप्त झलेला नाही. अहवाल प्राप्त होताच आपल्या तक्रारीचे संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई(१) शहर यांनी कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.८.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयात दि.९.८.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही व त्यांना त्या संदर्भात ३० दिवसांच्या आत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी तक्रार केलली आहे त्या तक्रारीच्या संदर्भात योग्य त्या चौकशीसाठी संबंधित अधिकारी यांच्याकडे ती तक्रार हस्तांतरीत केलेली आहे असे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले होते. त्यानंतर त्या तक्रारीच्या चौकशीच्या संदर्भात स्मरणपत्रसुध्दा उपलब्ध करुन दिलेले आहे परंतु त्याबाबत अहवाल प्राप्त झालेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. पुढे युक्तीवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च) प्रमाणे व २(त्र) प्रमाणे **माहिती** व **माहितीचा अधिकार** या दोन्ही संज्ञांच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत व त्याप्रमाणे अर्जदाराच्या अर्जासंदर्भात ज्यावेळेस कार्यालयात कागदपत्रांच्या

स्वरुपात माहिती उपलब्ध असते ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणाची चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे म्हणजेच कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे त्यांच्या तक्रारअर्जावरील तक्रारीची चौकशी करुन ज्यावेळेस अहवाल प्राप्त होईल त्यावेळेस तो उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना कळविण्यात आले होते. व तशाच प्रकारचे विश्लेषण हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयामधील विवेचनाच्या अंतिम परिच्छेदात केलेले आहे व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहितीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी झाल्यावर अहवाल उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.यास्तव सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००४३/अपील क्रमांक ६३०८/२०१०

श्री. प्रकाश गोविंद नवाथे,
२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप. हौ.सो.लि.,
२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई-१९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. म.न.पा. आयुक्त,
एफ उत्तर विभाग,
माटुंगा, मुंबई-१९.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,
म.न.पा. एफ उत्तरन विभाग, ९६ भाऊ दाजी मार्ग,
माटुंगा, मुंबई-१९. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ७.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२७.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिधारक व संकलक यांच्याकडे अर्ज करुन राजबागला ऑक्युपेशन सर्टिफिकेट प्राप्त झाल्यावर वरील प्रापर्टी टॅक्स कमी होणार/जास्त होणार याबाबत माहिती देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.६.९.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे मागीतलेली माहिती **माहिती** या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही व त्यामुळे ती आपणास देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.८.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिल निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे ती सांप्रदायिक म्हणजेच कपोलकल्पीत स्वरुपाची असून भविष्यात काय घडेल अशा प्रकारची माहिती मागीतलेली आहे व माहिती या संज्ञेत मात्र कार्यालयातील अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात अशी तरतूद असल्यामुळे सदरची माहिती नाकारली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक आहे तसेच प्रथम अपीलाचा निर्णयही संयुक्तिक असल्याने अपिलकर्ता यांना निवासी वापराचे प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यानंतर आकारण्यात आलेल्या कराच्या संदर्भात नियम उपलब्ध असल्यास त्या नियमाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांच्या दिनांक २७.८.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने निवासी वापराचे प्रमाणपत्र इमारतीस उपलब्ध करुन दिल्यानंतर कर आकारण्या संदर्भात नियम असल्यास त्याबद्दलची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी व नसल्यास त्यांना स्पष्टपणे तसे कळविण्यात यावे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
निवड नस्ती.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२०/अपील क्रमांक ६२१५/२०१०

श्रीमती विशाखा वि.इंगळे,
बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळकनगर, चेंबूर(प.),
मुंबई-४०००८९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एम/पश्चिम विभाग,
एम विभाग कार्यालय इमारत, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर-४०००७१.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एम/पश्चिम विभाग,
एम विभाग कार्यालय इमारत, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर-४०००७१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : निरंक
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(शाळा, एम/पश्चिम, पालिका विभाग कार्यालय, चेंबूर(पूर्व) यांच्याकडे संदर्भ क्र.MW/OD/११९१ दि.९.३.२००९ रोजीच्या पत्राची छायांकित प्रमाणित प्रत व त्या संदर्भात आपले कार्यालयीन संदर्भीय पत्र दि.१६.३.०९ व २१.३.०९ यामध्ये नमूद केलेले पालिका सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील क्र.एलसीपी/२२३२/०८ दि.१६.१२.०८ च्या संदर्भीय पत्राची छायांकित प्रमाणित प्रत व्यक्तीशः देण्यात यावी असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२१.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दि.२६.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्ण दि.१७.९.२०१० रोजी देण्यात आला आहे व अपिलकर्ता यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे व त्या व्यतिक्ति आणखी काही माहिती अवी असेल तर जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क करावा अशाप्रकारचा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दि.४.१०.२०१० रोजी पुन्हा अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना ३ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली असून रु.६/- इतका खर्चाचा भरणा त्यांच्याकडून घेतलेला आहे. त्यापैकी त्यांनी मागीतलेली दि.९.३.०९च्या पत्राची छायांकित प्रत या पृष्ठाची एकच बाजू दिलेली असून त्यावर पीटीओ लिहिलेले असूनसुध्दा पाठपोट छायांकित प्रत दिलेली नाही. तसेच दि.१६.३.०९ व दि.२१.३.०९या पत्रांच्या प्रती मागितलेल्या नसुनसुध्दा त्यांना २ प्रती विनाकारण उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. या दोन्ही पत्रांमध्ये सहाय्यक विधी अधिकारी याांच्याकडील क्र.LCP/२२३२/०८ दि.१६.१२.०८ या संदर्भांकित पत्राची छायांकित प्रत त्यांनी मागीतली होती व ती मात्र त्यांना देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिलेली आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी या नुकत्याच रुजु झालेल्या आहेत व त्यामुळे अपिलकर्ता यांना जर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नसेल तर त्यांना त्या पत्रांची माहिती उपलब्ध करुन देता येईल,यास्तव सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० विसाच्या आत अपिलकर्ता यांना दि.९.३.२००९ च्या पत्राची पाठपोट छायांकित प्रत तसेच सहाय्यक विधी अधिकारी यांच्याकडील संदर्भ क्रमांक LCP/२२३२/०८ दि.१६.१२.०८च्या पत्राची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक ८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२२/अपील क्रमांक ६२१९/२०१०

श्री. इंगळे व्ही.एस.,
बी/६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळक नगर, चेंबूर(प.),
मुंबई-८९. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक,
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मंबई-४०००१८.

जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मंबई-४०००१८. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग,चाळी तथा जन माहिती अधिकारी, व्यवस्थापक,मुंबई विभाग विकास चाळी यांच्याकडे अर्ज करुन दि.११.५.२००९ व ३१.३.२०१० रोजी श्री.प्रकाश इंगळे यांना अनुक्रमे संदर्भ क्र.इव्हिएन/१३०३/२००९ व क्र.इव्हीएन/१२८४/२०१० या खाली पत्रे पाठवून उचित कारवाई प्रस्तावित करण्यासंबंधात त्यांना सुचित करण्यात आले आहे त्यावर आपण तयार केलेल्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रमाणित प्रत सादर करण्यात यावी त्याचबरोबर दि.३१.३.२०१०,२०.४.२०१०,७.५.२०१० आणि दि.१४.७.२०१० रोजी पत्रे पाठवून त्यामध्ये उल्लेखिलेला दस्तऐवज पुरविण्यात यावा अशाप्रकारची माहिती तसेच समेट घडवून आणल्या संदर्भात अहवालाची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.९.९.२०१०

रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय दिलेला नाही परंतु आदेशाची नोंद घेतलेल्या नोंदवहीच्या पृष्ठाची छायांकित प्रत दाखल केली आहे. त्यामुळेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता वारंवार माहितीचा अर्ज करतात व त्या सर्व अर्जांना वेळोवेळी त्यांनी उत्तरेही दिलेली आहेत. अपिलकर्ता एकाच विषयाची माहिती वेगळया पध्दतीने मागवतात व ती पुरवूनही त्यांचे समाधान होत नाही. अपिलकर्ता यांनी सादर केलेले अर्ज व त्यांना कार्यालयाकडून देण्यात आलेली उत्तरे याची सुची त्यांनी आयोगाच्या अवलोकनार्थ जोडलेलीआहे. अपिलकर्ता यांच्या अर्जातील मुद्यांमध्ये काही तथ्य नसते. बीडीडी चाळीतील दोन भावांचा वाद असून त्या वादाच्या सदर्भात अपिलकर्ता वारंवार मिळकत व्यवस्थापक तसेच पोलीस यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करीत आहेत. पोलीसांनीसुध्दा अपिलकर्ता यांना दिवाणी वाद असल्यामुळे हस्तक्षेप करता येत नाही असे वारंवार सांगितलेले आहे. त्यांना आत्तापर्यंत सर्व कागदत्रांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच पोलसांनीसुध्दा त्याना माहिाती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अर्जदार यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नाही व त्यांच्या स्वत:च्या हिताकरीता ते सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिका-यांना वेठीस धरत आहेत असे दिसून येते, तरीही त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०२२१/अपील क्रमांक ६२१७/२०१०

श्री. विनायक एस.इंगळे,
द्वारा- बी-६, अलंकार को.ऑप.हौ.सो.,
नवीन टिळक नगर, चेंबूर(प.), मुंबई-८९. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-३, बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड,
भायखळा(पूर्व), मुंबई-४०००३३.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,
बावला कंपाऊंड, डॉ.बी.ए. रोड,
भायखळा(पूर्व), मुंबई-४०००३३. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : २९.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.८.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरिक्षक वरळी पोलीस ठाणे यांच्याकडे अर्ज करुन भविष्यात अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने आपण आणि श्री.आर.पी.वैती,सहाय्यक व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग,वरळी यांनी संयुक्तिकपणे केलेले उपाय इत्यादी अहवालाची झेराक्स प्रमाणित पुरविण्याबाबत तसेच त्यांच्या कार्यालयात उपरोक्त क्रमांकाचेआपणास प्राप्त झालेल्या पत्राचा सद्यस्थितीपर्यंतचा अहवाल अवगत करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना

माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागीतलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलकर्ता यांचा सहभाग घेऊन कोणत्याही प्रकारचा अहवाल तयार केलेला नाही. मात्र व्यवस्थापक,मुंबई विकास विभाग चाळी, वरळी व अपिलकर्ता यांचे बंधू यांच्या संदर्भात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न पोलीसांनी वेळोवेळी केलेला आहे. अपिलकर्ता व त्यांचे बंधू यांच्यामध्ये बीडीडी चाळीत रहाण्यासंदर्भात वाद आहे. अपिलकर्ता हे बीडीडी चाळीत रहात नसून ते चेंबूर येथे राहतात व बीडीडी चाळीतील जागा ही त्यांचे बंधू श्री.प्रकाश इंगळे यांच्या कब्जात आहे व विषयांकित खोलीची भाडेदारी श्री.प्रकाश इंगळे यांच्या नावावर हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे श्री.विनायक इंगळे यांचे वास्तव्य तेथे होते परंतु त्यांचे भाऊ त्यांना सदरच्या खोलीत राहू देत नाहीत व त्याबाबत त्यांची तक्रार आहे. मुंबई विकास विभाग चाळीची इमारत ही शासनाची मालमत्ता असून इमारतीमधील गाळे भाडेकरुंना भाडेतत्वावर वाटप केलेले आहेत. मंबई विकास विभाग चाळीच्या इमारतीमधील गाळे कोणाही व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नाही. श्री.प्रकाश इंगळे यांनी श्री.विनायक इंगळे यांना सदरच्या खोलीत रहाण्यास सौजन्य व सहकार्य दाखविण्यासाठी व सामोपचाराने समेट घडविण्यासाठी तसेच भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडून पेचप्रसंग निर्माण होऊ नये यास्तव सदरचे वादग्रस्त प्रकरण आपल्या विभागाकडे पाठविण्यात येत आहे. तरी सदर प्रकरणी दोन्ही व्यक्तींमध्ये योग्य तो समेट घडवून या कार्यालयास अहवाल पाठवावा असे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना लिहिले असल्यामळे त्या अहवालाची माहिती अपिलकर्ता यांनी मागीतलेली दिसून येते. त्या संदर्भात अपिलकर्ता यांना एकूण १ ते ३१ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली आहेत व त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरिक्षक यांनी समेट घडविलेला असून त्याबद्दलची कागदपत्र दिलेली दिसून येतात. मात्र अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, समेट घडवतांना त्यांना कधीही बोलावण्यात आलेले नाही. या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील कारवाईच्या संदर्भात हस्तक्षेप करता येत नाही किंवा हस्तक्षेप करणे अपेक्षित नाही व त्यामुळे कागदपत्रांच्या स्वरुपात जेवढी माहिती उपलब्ध असेल ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे अपिलकर्ता यांना ती सर्व कागदपत्र उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००८६/अपील क्रमांक ६३२३/२०१०

श्री. भास्कर विश्राम गावडे,
बी.डी.कदम चाळ, एक्सेल कंपनी शेजारी,
वीरा देसाई रोड, अंधेरी(प.), मुंबई-५३. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
परिरक्षण विभाग, के/पश्चिम विभाग,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५३.

जन माहिती अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
परिरक्षण विभाग, के/पश्चिम विभाग,
अंधेरी(प.), मुंबई-४०००५३. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १२.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी सी.टी.सर्व्हे क्र.७२० मधील प्रमोद नवलकर उद्यानाबाबत विरा देसाई मार्ग, कवारी रोड,विलाल मजिद समोर, अंधेरी(प.) च्या संदर्भात अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतली आहे.

१) शौचालय स्थलांतर करण्याकरीता पास केलेल्या प्रस्तावाची प्रत, सक्षम प्राधिकरणाने म.न.पा. कार्यालयात दिलेली प्रत मिळावी

२) १३.४.२०१० रोजी सहाय्यक अभियंता श्री.जाधव यांनी केलेल्या परिक्षण(तपासणी)चा रस्ता नियमित रेषेमध्ये पूर्वस्थायी शौचालय येतात किंवानाही याचा तपासणीअहवाल सादर करावा

३) विकासकाने ५% ॲमिनिटी म्हणून देण्यात येणारा भुखंड हा कोणाच्या अखत्यारीत असणार याचा लेखी खुलासा करावा व त्याचा उपयोग(एसआरए) किंवा सेल बिल्डिंगमधील रहिवाशांकरीता असेल व तो मोफत असेल कि शुल्क भरावा लागणार याचा खुलासा करावा,

माहिती प्रत्यक्ष घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.३.६.२०१० रोजी एकूण ३ मुद्यांवर माहितीच्या संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले

दिसते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी/सहाय्यक अभियंता(परि.)उत्तर यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलकर्त्यांस स्थळ पाहणीच्या अहवालाची प्रत सात दिवसांचे आत देण्यात यावी. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेलेआहे.

सुनावणीस अपिलकर्ता हजर आहेत, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्र दाखल केलेली नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या नोटीसचा अवमान केलेला आहे व त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागीतली आहे त्या संदर्भात युक्तीवाद करतांना त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना प्रस्तावाची संपूर्ण माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत याबद्दलचा अहवालही त्यांना दिलेला नाही. मात्र दि.३.६.२०१० च्या पत्रामध्ये स्पष्टपणे रु.२/- प्रति प्रत भरणा केलनंतर सदर प्रस्तावाची छायांकित प्रत आपल्याला उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले आहे. अहवालाच्या संदर्भात कार्यालयामधून हातोहात अहवालाची प्रत देण्यात आली आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच विकासकाकडून ५०% च्या संदर्भातसुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे पुन्हा असे म्हणणे आहे की, प्रस्तावाच्या छायांकित प्रतीचा खर्च ते भरण्यास तयार होते परंतु जन माहिती अधिकारी यांनी ३०व्या दिवशी खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. वास्तविक माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ५-७ दिवसात खर्चाचा भरणा करण्यास कळविणे आवश्यक असते, जेणेकरुन अर्जदारास खर्चाचा भरणा करुन मुदतीत माहिती प्राप्त करुन घेता येते. परंतु ३०व्या दिवशी खर्चाचा भरणा करण्यास कळविणे याचा अर्थ माहिती देण्यास टाळाटाळच करण्याचा उद्देश दिसून येतो व मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल तर विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ७(६) मध्ये आहे. त्याप्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत याबाबतच्या अहवालाची प्रत किंवा नकाशे उपलब्ध करुन द्यावेत असे त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना सांगितले. उत्तरवादी गैरहजर असल्यामुळे व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्दल काहीही कागदपत्र सादर केलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरुन असा निर्णय देण्यात येतो की, सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलकर्ता यांच्या दि.३.५.२०१० च्या अर्जात मागितलेल्या ३ मुद्यांच्या संदर्भात मुद्देनिहाय संपूर्ण प्रस्तावाची तसेच रस्ते नियमित रेषेत आहेत किंवा नाहीत त्या अहवालाची प्रत तसेच नकाशाची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१५७/अपील क्रमांक ६३२०/२०१०

श्री. अण्णाजी शामराव अडबोल,
१६/२५२, कन्नमवार नगर नं.१,
विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. **.....** **अपिलकर्ता**

<u>विरुध्द</u>

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
दर्यापूर, जि.अमरावती.

जन माहिती अधिकारी,
दर्यापूर, जि.अमरावती. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.६.२०१० रोजी मौजे लोहिजखेडा येथे गट क्र.१४ व १५च्या दुरुस्ती करण्यासाठी दि.१८.१२.०९ रोजी दिलल्या अर्जाच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२९.७.२०१० रोजी त्यांच्या दुरुस्ती तक्रार अर्जाच्या संदर्भात गुणवत्तेच्याबाबत नायबतहसिलदार यांनी कळविलेले दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीनुसार मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२३.११.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना एकूण ३४ पानांची माहिती पुरविण्यात आलेली दिसून येते तसेच अपिलार्थी यांनी अपिलामध्ये मागीतलेली माहिती, माहिती या संज्ञेत बसत नसल्यामुळे अपिल फेटाळण्यात आले आहे असा निर्णय दिल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यांनी गट नं.१४ व १५करीता दुरुस्ती अर्ज केलेला आहे परंतु सदरच्या दुरुस्ती अर्जाच्या संदर्भात त्यांना मागीतलेली माहिती देण्यास दुर्लक्ष करण्यात आले आहे. परंतु नायब तहसिलदार, दर्यापूर यांनी असे सांगितले की, त्यांच्या अर्जाची सुनावणी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता-६६च्या तरतुदीप्रमाणे सुरु आहे व तेथे प्रत्येक तारखेस हजर रहाण्याकरीता त्यांना २९.७.२०१० रोजी कळविण्यात आले होते. तसेच त्याबाबतची सर्व माहिती अपिलकर्ता यांना १ ते ३४ कागदपत्रांमध्ये देण्यात आलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यातील फक्त ३ कागदपत्र नवीन असून ३० कागदपत्र त्यांनीच दाखल केलेली आहेत. परंतु त्यावर नायबतहसिलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की जी सुनावणी आहे ती महसूल कायद्याप्रमाणे असल्यामुळे व ती आरटीएस अपिलाची सुनावणी असल्यामुळे माहितीच्या अधिकारात त्याबद्दल कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही किंवा त्या अपील अर्जाच्या सुनावणीसंदर्भात कार्यवाही का करण्यात येत नाही याबाबतही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांनी मूळ माहिती अर्ज व प्रथम अपील या दोन्ही कारवाया या त्या कार्यालयाच्या क्षेत्रातील नसल्याने प्रतिवादी म्हणून सदर अपिल अर्जाविरुध्द दोन्ही पक्षांना नोटीस पाठवून सुनावणीसाठी हजर रहाण्यास कळविण्यात आले आहे. सुनावणीच्यावेळी असे आढळून आले की, सदर अपील तहसिलदार, दर्यापूर यांच्या अधिकारक्षेत्रातील आहे. म्हणून

उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांचे नाव प्रकरणातून वगळण्यात यावे असे त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले. थोडक्यात अपिलकर्ता यांच्या दुरुस्ती अर्जाच्या संदर्भात तातडीने निर्णय होणे अपेक्षित आहे परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्र उपलब्ध होत नाहीत व कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्याबाबत निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात राज्य माहिती आयोगास आदेश देता येत नाहीत व त्यामुळे त्यांना पृष्ठ १ ते ३४ उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१५८/अपील क्रमांक ६३१९/२०१०

श्री. शिवप्रसाद यादव,
श्रीपत यादव चाळ, गावदेवी रोड,
पोयसर, कांदिवली, मुंबई-१०१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
पी-नॉर्थ, बृहन्मुबई महानगरपालिका,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.),
मुंबई.

जन माहिती अधिकारी,
इमारत विभाग, पी-नॉर्थ, बृहन्मुबई महानगरपालिका,
लिबर्टी गार्डन, मालाड(प.),
मुंबई. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामुळे अपिलकर्ता यांचे समाधान झाले व मी संतुष्ट आहे असे अपिलकर्ता यांनी लेखी लिहून दिले आहे असे जावक नोंद वहीवरील नोंद दाखवून प्रतिपादन केले. सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचे अपील **निकाली** काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०१५६/अपील क्रमांक ६३२१/२०१०

श्री. राजेश कृष्णाजी घडशी,
विजय कर्पे चाळ नं.३बी, रुम नं.१०,
ज्यु जिम्मी बाग, कल्याण तिसगाव रोड, कल्याण(पूर्व),
ठाणे. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता(स्थापत्य),
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
घाटकोपर. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १८.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ८.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्यातर्फे श्री.महेश गावडे यांनी दि.२०.१.२०१० रोजी माहिती अधिकारी(म्हाडा) यांच्याकडून मला सर्व माहिती मिळाली असल्याने माझी काहीही तक्रार नाही असे लेखी सादर केलेले निवेदन आयोगासमोर सादर केले. यास्तव सदरचे अपील **निकाली** काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/४२२०६/अपील क्रमांक ५८४०/२०१०

श्री. डॉ.शहा बाहुबली हिरालाल,
हिरानगर, होमिओपॅथी क्लिनीक, रणवरे टॉवर्स,
सिनेमा टॉवर्स, बारामती-४३३१०२. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
अनेकांत एज्यूकेशन सोसायटी,
तुळजाराम चतंररंग कॉलेज कँपस,
बारामती-४३३१०२, जि.पुणे.

जन माहिती अधिकारी,
अनेकांत एज्यूकेशन सोसायटी,
तुळजाराम चतंररंग कॉलेज कँपस,
बारामती-४३३१०२, जि.पुणे. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ३.७.२००९
सुनावणीचा दिनांक : ९.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२५.५.०९ व २६.५.०९ रोजी जन माहिती अधिकारी अनेकांत एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे संस्थेच्या कार्यालयातील कर्मचा-यांची नावे, त्यांनी धारण केलेले पद व शैक्षणिक अर्हता, नियुक्तीचा दिनांक व त्यांचे वय इत्यादी माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५प्रमाणे नियुक्त केलेले माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे व हुद्दा, माहितीच्या वेबसाईटचे नाव व अधिनियमाप्रमाणे आवश्यक असलेली सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे काय तसेच संस्थेचे कामकाज व घटनात्मक रचनेच्या संदर्भात सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दि.६.४.२०६२ रोजी नोंदणीकरीता दाखल केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत व इतर ६ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते.

२. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२२.६.२००९ रोजी सचिव, अनेकांत एज्युकेशन सोसायटी,बारामती ही अल्पसंख्यांक संस्था माहिती अधिकाराच्या कायद्यात येत नाही अशी आमची धारणा आहे. तथापि, आपण पूर्व सूचना देऊन संस्था कार्यालयात यावे म्हणजे त्यावेळी मा.अध्यक्ष व मा.सचिव उपस्थित राहून आपणास आवश्यक ती माहिती देतील याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२५.६.०९ रोजी आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा त्या पत्राप्रमाणे दि.२९.६.०९ रोजी अध्यक्ष,अनेकांत एज्युकेशन सोसायटी,बारामती यांनी त्याचप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते. अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील दाखल केल्यानंतरसुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे दि.१४.१२.०९ रोजी ३ पत्रे व्हीडीओ कॉनफरन्सींगच्या सुनावणीसंदर्भत दिलेली दिसून येतात. तसेच सदर अपिलाची सुनावणी राज्य माहिती आयोगाच्या पूर्ण खंडपीठाकडे करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. परंतु अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती, संस्थेने दिलेल्या त्या संदर्भातील उत्तराच्या संदर्भात सदर अपिलाची सुनावणी ही पूर्ण खंडपीठाने घेण्याची आवश्यकता नसल्यामुळे मुख्य माहिती आयुक्त यांनी ही सुनावणी दि.९.२.११ रोजी

घेतलेली आहे. सुनावणीस अपिलकर्ता तसेच तु.च.महाविद्यालयाचे प्राचार्य व तु.च. महाविद्यालयाचे रजिस्ट्रार हजर होते.

३. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांना सदर संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. तसेच व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे सुनावणी घेणा-या माहिती आयुक्तांनी मुंबई उच्च न्यायालयाने(नागपूर खंडपीठ) याचिका क्र.५२९४/२००८ संदर्भात दिलेल्या निकालाचा गोषवारा देऊन सुनावणी स्थगित केली. तसेच दि.१४.१२.२००९ रोजी मा.मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे अर्जकरुन या अपिलाची सुनावणी पूर्ण पीठाकडे घेऊन युक्तीवाद करण्याची विनंती केली. तसेच या सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाचा अभ्यास केला असता त्या निर्णयामध्ये पब्लीक ट्रस्टना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होण्याकरीता अधिनियमात नमुद केलेल्या अटींपैकी एक अट(किमान) पूर्णकेल्याचे दाखवून दिल्यास सदर संस्थेस अधिनियम लागू होऊ शकतो असे प्रतिपादन केले. त्याप्रमाणे संस्थेस राज्य शासनाचे, विद्यापीठ अनुदान आयोग,विद्यापीठ यांचेकडून प्रत्यक्ष अनुदान किंवा भरघोस अर्थसहाय्य मिळत असल्याबाबत युक्तीवादाच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिल्यावरुन प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्याप्रमाणे संस्थेच्या नोंदणीकृत घटनेप्रमाणे अनेकांत एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे उद्दिष्ट राष्ट्र उभारणीकरीता विविध प्रकारचे शिक्षण देण्याकरीता शाळा,महाविद्यालय, वसतीगृह, पाठशाळा,वृत्तपत्र,ग्रंथालये व संशोधन संस्था स्थापन करणे आणि त्या चालविणे हे आहे(Appendix-I) म्हणजेच संस्थेने स्थापन केलेल्या आणि शासनाकडून दरवर्षी वेतन व वेतनेतर खर्चाकरीता भरघोस अनुदान प्राप्त करणा-या महाविद्यालयांचे संचालन व व्यवस्थापन हा संस्थेच्या नियमित कामकाजाचा एक भाग असल्याने सदर महाविद्यालयांना मिळणारे भरघोस अर्थसहाय्य हे एक प्रकारे संस्थेला मिळणारे अर्थसहाय्यच आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीतर्फे बारामती व जयसिंगपूर येथे प्रत्येकी एक अनुदानित वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय चालविले जाते. ही महाविद्यालये व त्यांचे कामकाज संस्थेच्या कारभाराचा एकात्मिक व अविभाज्य घटक असल्यानेच ही दोनही महाविद्यालये वेगवेगळया विद्यापीठांशी संलग्न असली तरी एका महाविद्यालयात नियुक्त केलेल्या कर्मचा-याची संस्था दुस-या महाविद्यालयात बदली करु शकते(Appendix-V) याचाच अर्थ संस्थेच्या महाविद्यालयातील नियुक्त कर्मचारी हे केवळ त्या महाविद्यालयाच्या नव्हे तर संस्थेच्या सेवेतील कर्मचारी असून त्यांच्या वेतनापोटी शासनाकडून मिळणारे अनुदान हे संस्थेला मिळणारे अप्रत्यक्ष अर्थसहाय्य आहे. संस्थेची उपरोक्त दोन्ही अनुदानीत महाविद्यालये सुरु करतांना शासन व विद्यापीठ यांचेकडे परवानगी व संलग्नता याकरीता केलेले अर्ज हे संस्थेतर्फे केले गेले आहेत व नियमानुसार परवानगी संस्थेच्या नावाने आहे

त्यामुळे संस्था व सदर महाविद्यालये यांना स्वतंत्र मानणे अतार्किक आहे. राज्य शासनातर्फे चेअरमन, अनेकांत एज्युकेशन सोसायटी या नावाने महाविद्यालय चालविण्याकरीता जयसिंगपूर येथे अंदाजे एक लाख चौ.मि.भुखंड रीवार्डने दिला असून त्या भुखंडावर महाविद्यालयाकरीता विविध इमारती संस्थेने उभारल्या आहेत. सदर भुखंड महावीर को.ऑप.बँक या वित्त संस्थेकडे संस्थेने महाविद्यालयाकरीता रु.२५,००,०००/- इतके कर्ज घेण्याकरीता संस्थेच्या नियामक मंडळाच्या ठरावानुसार घेतले होते. सदर कर्जाची परतफेड महाविद्यालयाकडून नियत वेळेत न झाल्याने न्यायालयीन प्रक्रिया होऊन उपरोक्त भुखंडाचा काही भाग व त्यावरील इमारत वित्त संस्थेच्या ताब्यात दिली गेली होती. यावरुन महाविद्यालय व संस्था निरनिराळे नसुन एकच आहेत(Appendix-XIII). संस्थेच्या बारामती येथील महाविद्यालयाकरीता राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ यांचे अनुदानातून बांधलेल्या सर्व इमारती संस्थेच्या नावावर असलेल्या भुखंडावर असून त्या इमारतींची मालकी संस्थेकडे आहे व या इमारतींमधून संस्थेस भाडयाचे उत्पन्न मिळते तसेच वसतीगृह विद्यार्थ्यांचे भाडेसुध्दा संस्थेकडे जमा हाते व ते संस्थेच्या उत्पनाचे साधन आहे हे भुखंडाचा सातबारा(Appendix-VI) संस्थेच्या बारामती स्थानिक समितीचे (संस्थेच्या घटनेप्रमाणे स्थापन झालेली उपसमिती) अंदाजपत्रक(Appendix-II) महाविद्यालयाचे ऑडीटेड स्टेटमेंट(Appendix-VII)यावरुन सिध्द होते. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ८६ पमाणे संलग्न महाविद्यालयाचा कारभार पाहण्याकरीता स्थापन करावयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद संस्थेच्या अध्यक्षांकडेच असते. तसेच या समितीमध्ये संस्थेच्या सचिवांचा समावेश असतो. या समितीच्या कार्यकक्षेतील तरतुदी पाहिल्या असता महाविद्यालयाकरीता आवश्यक असणा-या अध्यापक व अध्यापकेतर पदांची निर्मिती करणे, महाविद्यालयाचा दर्जा वाढविणे याकरीता केवळ शिफारसी करणे समितीच्या अखत्यारीत असून अंतिम निर्णय करण्याचे अधिकार संस्थेच्या व्यवस्थापनाकडे असल्याचे दिसून येते. हीच बाब महाविद्यालयाच्या अंदाजपत्रकासही लागू आहे(Appendix-XIV) वरील सर्व बाबींचा विचार करता संस्थेतर्फे चालविली जाणारी अनुदानित महाविद्यालये ही संस्थेच्या कारभाराचा एकात्मिक व अविभाज्य भाग असून या महाविद्यालयाचा कारभार हा संस्थेच्या प्रशासनाचाच एक भाग आहे हे स्पष्ट होते.तसेच निरनिराळया शासकीय अनुदान व अर्थसहाय्यातुन उभारण्यात आलल्या इमारती व वसतीगृहांची मालकी संस्थेकडे असून ती या संस्थेच्या उत्पन्नाचा एक प्रमुख स्त्रोत आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(ii) मधील तरतुदी तसेच उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.५२९४/२००८ संदर्भातील निर्णयातील मुद्दा क्र.७ व ८ चे विश्लेषण यांचा विचार केला असता अनेकांत एज्युकेशन

सोसायटी या ट्रस्टला माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होतो असे त्यांनी ठाम प्रतिपादन केले आहे.

४. त्यावर प्राचार्य तु.च.महाविद्यालय, बारामती यांनी युक्तीवाद केला. वास्तविक अपिलकर्ता यांनी महाविद्यालयाचे माहिती अधिकारी यांना माहिती मागीतली नव्हती. महाविद्यालयाचे माहिती अधिकारी हे प्राचार्य असतात परंतु अपिलकर्ता यांनी संस्थेकडे माहिती मागीतलेली होती व त्यामुळे संस्थेचे पदाधिकारी यांनी आयोगापुढे हजर रहाणे आवश्यक होते. तसे प्राचार्य यांना आयोगाने विचारले असता संस्थेने प्राचार्यांना पाठविले असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. प्राचार्यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांना शासनाचे अनुदान मिळते हे खरे आहे परंतु शासनाचे अनुदान हे प्राचार्य, महाविद्यालय यांच्याकडे वर्ग केले जाते. संस्थेला कोणत्याही प्रकारचे शासनाचे अनुदान मिळत नाही. संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०च्या अंतर्गत तसेच सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत झालेली आहे व त्यामुळे ती सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे. सार्वजनिक विश्वस्त संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान उपलब्ध होत नाही व त्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक विश्वस्त संस्थेला शासनाचे अनुदान नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अनेकांत एज्युकेशन सोसायटी ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे असल्यामुळे व संस्थेला कोणतेही प्रत्यक्षअनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी त्यांना लागू होत नाहीत. तसेच संस्थेस अल्पसंख्यांक संस्थेचा दर्जा असल्यामुळेसुध्दा अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. परंतु अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना लेखी प्रतिज्ञापत्रात सादर केल्याप्रमाणे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान मिळते व ते पर्यायाने संस्थेलाच मिळत असते. सदर निर्णयाच्या संदर्भात प्राचार्य यांनी पुढे युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, शिक्षण संस्था असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचे शासनाकडून अनुदान मिळत नाही. मात्र पुढे अपिलकर्ता यांनी पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की. संस्थेस विद्यापीठ अनुदान आयोगाकडून इमारतीच्याकरीता अनुदान मिळाले आहे तसेच इतर अनुदान जे मिळते ते सुध्दा संस्थेलाच मिळते याबद्दल मात्र प्राचार्यांनी तशा प्रकारची व्यवस्था आहे हे मान्य केले.

६. कोणतीही शाळा किंवा महाविद्यालय शासनाकडून मंजूर होताना माध्यमिक शाळासंहिता तसेच विद्यापीठ अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे शाळा किंवा महाविद्यालय हे संस्थांना मंजूर होते. कोणत्याही व्यक्तीला वैयक्तीकरित्या शाळा किंवा महाविद्यालय शासनाकडून मंजूर होत नाही. माध्यमिक शाळासंहिता यामध्ये शाळा मंजूर करण्याच्या

संदर्भात ज्या तरतुदी आहेत त्यामध्ये मान्यतेच्या शर्ती दिलेल्या आहेत व त्यामध्ये नवीन शाळा सुरु करणे याबाबतच्या तरतुदी केलेल्या आहेत.

७. शाळा सुरु करण्यासाठी मान्यतेच्या शर्ती, मान्यता नाकारणे, काढून घेणे या संदर्भात प्रकरण २ मध्ये तरतूद केलेली आहे त्यामध्ये २.१ मध्ये शाळा सुरु करण्यासाठी व्यवस्थापनाने अर्ज केला पाहिजे अशी तरतूद आहे.मान्यतेच्या शर्तीमध्ये मुद्दा क्र.३.२ मध्ये एकूण १६ शर्तींची व्यवस्थापनाने पूर्तता केली असली पाहिजे अशी तरतूद दिलेली आहे. त्याचप्रमाणे तात्पुरती व कायम मान्यता या बद्दलसुध्दा तरतूद करण्यात आली आहे. मान्यता नाकारणे, मान्यता काढून घेणे याबद्दलचीसुध्दा तरतूद आहे. जेव्हा शाळेच्या व्यवस्थापनात बदल करण्याचे योजले असेल तेव्हा असा बदल करण्यासाठी उपसंचालकांची पूर्व परवानगी मिळवली पाहिजे तसेच मान्यताप्राप्त शाळेचे एका व्यवस्थापनाकाडून दुस-या व्यवस्थापनाकडे हस्तांतर पोटनियमांच्या अधीन राहील. वेतन व वेतनेतर अनुदान या संदर्भात शासन व सहाय्यक अनुदानासाठी पात्रता या संदर्भात मुद्दा क्र.८६.२ मध्ये खाजगी मालकीच्या शाळा(म्हणजे १९६० चा संस्था नोंदणी अधिनियम क्र.२१ किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था १९५० किंवा शासनाने याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी न केलेल्या शाळा जातीय शाळा आणि शासनाने बिगर सहाय्यक अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा या लोकनिधीतून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असणार नाहीत अशी तरतूद आहे. मान्यताप्राप्त शाळा मंजुरी प्राधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार निधी उपलब्ध असेल तर खालीलप्रकारचे अनुदान मिळण्यास पात्र असतील. मात्र ज्या संस्था अशा शाळा चालवित असतील त्या संस्थांची वेळोवेळी दुरुस्त केलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी केलेली असली पाहिजे.१)वेतन अनुदान,२) वेतनेतर अनुदान,३)इमारत अनुदान,४) शासन वेळोवेळी मंजूर करेल अशी इतर अनुदाने त्याकरीता पात्र असतील. सहाय्यक अनुदानासाठी नोंदणीकरीता करावयाचे अर्ज मुद्दा क्र.९३.१ मध्ये विभागाकडून सहाय्यक अनुदान घेऊ इच्छिणा-या शाळांनी त्यांना ज्या वर्षी अनुदान मिळावयाचे असेल ते शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या किमान ६ महिन्यांपूर्वी समुचीत प्राधिका-यांकडे परिशिष्ट २१ मध्ये दिलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे.प्राप्तानुदानित शाळांच्या यादीमध्ये एकदा शाळा समाविष्ट करण्यात आली म्हणजे त्या शाळेस ती जोपर्यंत मान्यतेच्या अटी पूर्ण करीत राहील आणि इतर नियमांचे व विभागांतर्गत वेळोवेळी दिलेल्या सचनांचे पालन करीत राहील तोपर्यंत वर्षावर्षाला अनुदान मिळत राहील.

यावरुन अनुदानेतर शाळांच्या संदर्भात व्यवस्थापनानेच अर्ज करावयाचा असल्यामुळे अनुदान हे संस्थेलाच मिळते असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच खजगी प्राप्तानुदान शाळांच्या व्यवस्थापनाने व शाळेची इमारत बांधण्याकरीता किंवा शाळेच्या

इमारतीचा विस्तार करण्याकरीता अनुसुचित बॅकांनी देऊ केलेल्या कर्जाकरीता शासनाची हमी देण्याच्या योजनेबाबतचा नियमसुध्दा दिलेला आहे व त्याप्रमाणे शासन त्याकरीता हमी देत असते.महाविद्यालयाच्या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४च्या कलम ८२ च्या पोटकलम(३) प्रमाणे नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता व्यवस्थापनाने अर्ज करावा अशी तरतूद आहे. त्याप्रमाणे कलम ८१ मध्ये मान्यता देण्यासंदर्भात व्यवस्थापनालाच महाविद्यालय मंजुर होते अशी तरतूद आहे आणि विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय व्यवस्थापनास कोणताही बदल करता येत नाही अशीही तरतूद त्यामध्ये आहे. तसेच सदरच्या महाविद्यालयामध्ये किंवा शाळांमध्ये शिक्षक व कर्मचारी यांची नियुक्ती तसेच त्यांना काढून टाकणे किंवा पदोन्नती देणे किंवा बदली करण्याचे अधिकार हे संस्थांनाच आहेत व संस्था हे अधिकार उपभोगतात. थोडक्यात कोणतीही शैक्षणिक संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०च्या तरतुदीप्रमाणे नोंदणीकृत असल्याशिवाय शाळा किंवा महाविद्यालय मंजूर होत नाही व शाळा किंवा महाविद्यालयास शासनाचे अनुदान असले तर ते अप्रत्यक्षपणे संस्थेला शाळा किंवा महाविद्यालय चालविण्यासाठीचे अनुदान असते व त्यामळे कोणत्याही अनुदानित शैक्षणिक संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होत नाही असे म्हणता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ३(ज) मध्ये "सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ" समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे व त्यामध्ये (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्यांच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय (दोन)समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशी अशासकीय संघटना यांचा समावेश होतो.

वरील व्याख्यांप्रमाणे व अपिलकर्ता यांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे तसेच प्राचार्य यांनी मान्य केल्याप्रमाणे अनेकांत शिक्षण संस्थेस शासनाकडून विद्यापीठ अनुदान मिळते याबाबत कोणतेही मतभेद दिसून येत नाही. संस्थेतर्फे याचिका क्र.५२९४/०८ मधील निर्णय हा एका धार्मिक मठाच्या संदर्भात निर्णय आहे व सदरचा धार्मिक मठ हा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०प्रमाणे नोंदणीकृत असून सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे परंतु त्यास शासनाचे अनुदान नही व त्यामळे मा.उच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी त्यास लागू होणार नहीत असा निर्णय दिलेला आहे. परंतु त्याच निर्णयामध्ये परि.८ मध्ये Any person seeking to establish that a particular trust is covered by the provisions of the

Right to Information Act will have to first prove that it is a public trust created by Government or Parliament or is substantively financed by the Government असे नमूद केलेले आहे व त्याप्रमाणे सदरच्या अनेकांत शिक्षण संस्थेस महाविद्यालय व शाळा चालविण्याकरीता शासनाकाडून अनुदान मिळते असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपूर यांच्यापुढील याचिका क्र.५०६७/०९मध्ये न्यायमूर्ती श्री.एस.ए. बोबडे आणि न्यायमूर्ती श्री.ए.बी.चौधरी यांच्या खंडपीठाने दि.१०.८.२०१० रोजी शिक्षण प्रसारक मंडळ कामठी विरुध्द स्टेट इन्फर्मेशन कमिशन नागपूर बेंच, नागपूर, श्री.भुषण केशवराव तिजारे व सहशिक्षण संचालक, नागपूर विभाग,नागपूर या याचिकेमध्ये परि.७ मध्ये खालीलप्रमाणे निरिक्षण केलले आहे.

In the instant case, it is not in dispute that the said College run by the petitioners - Society is receiving grants-in-aid and the grants-in-aid received by the College from the Government are managed by the Society and its College. We, therefore, hold that the Non-Government Schools/Colleges/institutions receiving grants-in-aid either from the State Government or the Central Government are fully covered by the definition of public authority and such Schools/Colleges are covered by the provisions of the Right to Information Act,२००५.

वरील निर्णयाप्रमाणे याचिकाकर्ता यांची याचिका फेटाळण्यात आलेली आहे याचा अर्थ संस्थेस शाळा किंवा महाविद्यालय चालविण्याकरीता अनुदान मिळते त्यामुळे अनेकांत शिक्षण संस्थेचासुध्दा सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत समावेश होतो व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. त्यामुळे संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ५(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी नियुक्त करणे तसेच कलम १९(१)प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहील व त्यानंतर अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.२५.५.०९, २६.५.०९च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यात येत असून अनेकांत शिक्षण संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात व हा निर्णय मिळाल्यापासून पांच दिवसांचे आत अनेकांत शिक्षण संस्था,बारामती मध्ये

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) अन्वये जन माहिती अधिकारी तसेच कलम १९(१) अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करावी.

२) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती केल्यानतर संबंधित जन माती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.२५.५.०९ व २६.५.०९च्या अर्जांच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची पत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ११.२.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७७/अपील क्रमांक ६३०३/२०१०

श्री. रसिकलाल रतीलाल गांधी,
द्वारा वरुन कॉंप्युटर सर्व्हीस, पांजरपोळ कंपाऊंड,
जैन देवळाजवळ, मुंबई-४. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(इ) मुंबई,
गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९, तळ मजला,
बंद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग को.ऑप.हौ.सो.,
एम.एम.आर.डी.ए. बिल्डिंग, रुम नं.३१५/३१६,
वडाळा, मुंबई-४०००३१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(पी वार्ड) यांच्याकाडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ७३(IAB) व ७८, नियम १९६१ प्रमाणे नियम ५८(ए)च्या संदर्भात निवडून आलेल्या समितीने बाँड दिलेले आहेत किंवा नाहीत याची माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.३१.८.२०१० रोजी सदर कारणास्तव प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून अपील अंशत: मान्य करण्यात येत असून उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग यांनी अर्जदारांना बंधपत्राची माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि.१८.१.२०१० रोजी संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार योग्य ती वैधानिक कार्यवाही करण्यात येत आहे असे असे अपिलकर्ता यांना कळविले आहे. असे असले तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दि.११.१०.२०१० रोजी दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संस्थेच्या संचालक मंडळावर कारवाई झालेली असल्यामुळे आता त्यांची काहीही तक्रार राहिलेली नाही व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,

राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५००७५/अपील क्रमांक ६३०१/२०१०

श्री. आय.पी.योगींदरन,
सहा.अभियंता,इमारत विभाग(दक्षिण) विभाग,
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उप्रम(बृहन्मुंबई महानगरपालिका),
मुंबई सेंट्रल बस डेपो, मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा चिफ इंजिनिअर(सिव्हील),
बेस्ट उपक्रम, इलेक्ट्रीक हाऊस,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००८.

जन माहिती अधिकारी,
सिव्हील इंजिनिअर डिपार्टमेंट,
बेस्ट उपक्रम, इलेक्ट्रीक हाऊस,
बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ११.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३.२.२०११
जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.६.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, स्थापत्य यांत्रिकी विभाग, बेस्ट यांच्याकडे राज्याच्या आरक्षण धोरणाच्या संदर्भात नियुक्ती व पदोन्नतीबाबत उप अभियंता, ग्रेड जी/जी-४ च्या संदर्भात एकूण ९ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते.सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.६.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांना रु.१८४/- डॉक्युमेंट चार्ज व रु.२५/- पोस्टाचे चार्ज असे एकूण रु.२०९/-चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी भरणा केल्यानंतर त्यांना दि.१२.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे त्यामुळे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि.८.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व सुनावणीत ठरल्याप्रमाणे दि.२७.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तरीसुध्दा अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता सुनावणीस गैरहजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी अपिलकर्ता यांना उपरोक्त माहिती दिली व त्याचप्रमाणे काही माहिती देतांना काही कालावधी लागेल असे त्यांना पत्राद्वारे कळविले होते. तरीसुध्दा त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतु अपिलकर्ता यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध झालेली माहिती दि.३.१२.२०१० नुसार त्यांना हस्तपोच केलेली आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपिल निकाली काढण्यात येतआहे.
२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९९७/तक्रार क्र. १६१५/का.१

श्री. वसंत आदितीरावितार,
ग्रीन हिल को.ऑप.हौ.सोसायटी, २५-बी/४०२,
नवीन दिंडोशी,गोरेगाव(पूर्व),
मुंबई-४०००६५. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,
अतिक्रमण व निष्कासन,
अतिक्रमण यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, तळमजला,
रुम नं.६८, वांद्रे(पूर्व),
मुंबई-४०००५१. .... **उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १०.१०.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी त्यांच्या अपिल क्र.५४११/०८च्या दि.३.७.२०१० च्या आयोगाच्या निर्णयाप्रमाणे व दि.२२.२.२०१० च्या अपिल क्र.५४११/०२ व तक्रार क्र.७२४/०२ मधील निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माीती आयोगाकडे दि.११.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अपिलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.१०.०९ रोजी तक्रार केली होती. परंतु त्या तक्रारीच्या निर्णयाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी सध्याची तक्रार आयोगाकडे केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना वेळोवेळी पकरणातील सर्व माहिती उपलब्ध

करुन दिलली आहे. दि.७.११.०९ च्या प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशात नमूद केल्यानुसार -

१) उपजिल्हाधिकारी(अति/निष्का)अंधेरी यांच्या दि.१८.४.०६ च्या सुनावणीच्या नोटीसीस अनुसरुन संचिका डी.नं.२५६ आढळून न आल्याने त्याच प्रकरणात श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दि.१६.३.०९ रोजी सादर केलेला अर्ज मा.अप्पर जिल्हाधिकारी(अति./निष्का.)पश्चिम उपनगरे यांजकडून दि.१०.७.०९ रोजी प्राप्त झालेल्या व त्यासोबत असलेल्या पुराव्याच्या आधारे दि.१७.११.०९ रोजी डी.नं.२५६ बाबतीत अपात्रतेचा आदेश पारीत केला व त्याची पोच तक्रारदाराने दि.१८.११.०९ रोजी स्वाक्षरीसह घेतलेली आहे. तद्नंतर सदर आदेश श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अंतर्गत मा.प्रशासन व आयुक्त कोकण विभाग यांजकडे आव्हान करुन स्लम अपिल क्र.९७३/०९ दि.६.१.२०१० रोजी दाखल केले आहे. अपिलाचा निर्णय प्रलंबित आहे.

२) अपिलार्थी यांच्या म्हणण्यानसार उपलोकआयुक्त यांजकडे आवक क्र.४९४८/२००९ दि.२७.१०.०९ व राज्य माहिती आयोग यांजकडे आवक क्र.४४७२/०९ व दि.२७.१०.०९ रोजी केलेला अर्ज व उक्त प्रकरणाबाबत या कार्यालयाकडे कोणताच पत्रव्यवहार प्राप्त झालेला दिसून येत नाही.

३) मा.राज्य माहिती आयोगाच्या दि.२२.२.२०१० च्या आदेशामध्ये अपिलार्थी यांनी केलेल्या कंटेम्ट अर्ज दि.१७.५.१० ची सुनावणी दि.२.७.२०१० रोजी झाली. त्या अनुषंगाने मा.राज्य माहिती आयोग यांनी दिलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थी यांना दि.८.७.२०१० रोजी यथा योग्य माहिती दिली व त्याची प्रत आयोगास सादर करण्यात आली आहे. सदर माहिती दिल्यानंतर पुन्हा अपिलार्थी यांना या कार्यालयातून दि.९.१२.२०१० चे पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणाची संचिका आढळून आल्याचे कळविण्यात आले व अपिलार्थी दि.३०.९.२०१० रोजी समक्ष कार्यालयात आले असता त्यांना त्यांचे माहिती व अवलोकनार्थासाठी डी.नं.२५६ बाबतची संचिका दाखविण्यात आली व त्यांना संचिकेतील कागदपत्रांची आवश्यकता असल्यास ते प्राप्त करुन घ्यावे असे दि.९.१२.२०१० चे पत्राने कळविण्यात आले आहे. माहिती करीता श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी या कार्यालयात दाखल केलेले कागदपत्रे सोबत जोडत आहे(जोडपत्र-अ)

४) या प्रकरणाची वेळोवेळी माहिती अपिलार्थी यांना या कार्यालयातून देण्यात आली आहे. दि.३०.९.२०१० रोजी संचिकेचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास आले की, अपिलार्थी आपल्या अर्जाद्वारे ज्या व्यक्तीसंदर्भात माहिती मागत आहेत त्यांना या योजनेचया परि.२ मध्ये अ.क्र.२५४५अनुषंगाने यापुर्वीच पात्र करण्यात आले आहे व श्रीम.सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी सादर केलेल्या पुराव्यातील शिधापत्रिका,मतदान ओळखपत्र,मतदान यादी, विज बिल यांचा तपशील पाहता असे आढळून आले की, श्रीम.सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांचेतर्फे त्यांचे पती श्री.मनोहर परमार हे यापूवी प्रश्नांकित झोपडीसाठी दि.२८.१२.०४ मध्ये पात्र झाले आहेत. माहिती करीता श्रीमती सौनद्रवली मनोहर अदितीरावीतार यांनी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशिल सोबत जोडत आहे.(जोडपत्र ब)

५) अपिलार्थी यांच्या अपिल अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी या कार्यालयात तसेच इतर अन्य सतरावर केलेल्या अर्जामध्ये सदरहू प्रकरणात श्री.मनोहर परमार

यांना प्रश्नांकित झोपडीची उपरोक्तपणे दाखविण्यात आलेली पात्रतेची बाब(परि.२ मध्ये अ.क्र.२५४५) शासनापासून लपवून ठेऊन यापुर्वी पात्र झालेल्या झोपडीचीच त्याच पुराव्याच्या आधारे स्वतंत्र झोपडी असल्याचे भासवून आणखी एक झोपडी पात्र करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

असे असले तरी तक्रारदार यांना दि.८.७.२०१० रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती चुकीची आहे असे पुन्हा तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामध्ये उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी(अति./निष्का.) अंधेरी यांनी दि.१८.७.२००४रोजी आपणास पाठविलेल्या नोटीसबाबतची नस्ती या कार्यालयात आढळून येत नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणले व दि.१८.७.०४ ही तारीख चुकीची आहे व त्यांनी जी माहिती मागीतली होती ती २००६ या वर्षातील असल्यामुळे त्यांना दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे व त्यामुळे त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे नस्ती आढळून आली नव्हती व त्याप्रमाणे तक्रारदार यांना कळविण्यात आले होते परंतु अनवधानाने त्या ठिकाणी तारीख चुकीची घालण्यात आली आहे. मात्र दौलतनगरच्या संदर्भातील नस्ती आढळून आली व त्याबद्दल तक्रारदार यांना कळविण्यात सुध्दा आले व त्यात जी टिप्पणी आहे ती टिप्पणी मान्य करण्यास कोणत्याही अधिका-याची हरकत नाही व त्यामुळे आदेश काढण्यात आले नसावेत व नस्तीमध्ये सुध्दा ते आदेश नाहीत व याबाबतचे अवलोकन तक्रारदार यांना दिलेले आहे. त्यामुळे त्यांना जे आदेश अपेक्षित आहेत ते अद्यापही नस्ती आढळून आल्यावरसुध्दा त्यामध्ये दिसून येत नाहीत. असे असल्यास तक्रारदार यांना त्याप्रमाणे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१)तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात अपिल क्र.१५११/०२, तक्रार क्र.७२४/०२ मधील निर्णयाप्रमाणे आदेश उपलब्ध असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन द्यावी किंवा उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे त्यांना कळविण्यात यावे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यातयावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०११/८३९/तक्रार क्र. २/का.१

श्री. नवीन शामराव परब,
मुळगांवकर बिल्डिंग, १ला मजला,
७ टोपीवाला लेन,लॅमिंग्टन रोड,
मुंबई-४००००७. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक,
करनिर्धारण व संकलन खाते, डी विभाग,
महापालिका कार्यालय इमारत, ४था मजला,
जोबनपुत्र आवार, ग्रँट रोड, नाना चौक आवार रोड,
मुंबई-४०० ००७. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ९.४.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी दि.९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दि.१५.३.२०१० च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दि.३०.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जी फीची आकारणी केलेली आहे त्या आकारणीच्या संदर्भात ती अवाजवी आहे अशी तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

तकारदार यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, कोणत्याही कागदपत्रांचे निरिक्षण करण्याकरीता रु.२३०/-(रु.१८०/- + रु.५०/-) प्रमाणित करण्याची फी व अशाप्रकारेच प्रति प्रॉपर्टी पर इअर जी फी आकारली जाते ती अवाजवी आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीप्रमाणे निरिक्षणकरण्याकरीता सुरुवातीच्या १ तासाला कोणत्याही प्रकारचे शुल्क नाही व त्यानंतरच्या प्रत्येक १५ मिनिटांना रु.५/- इतके शुल्क आहे असे असतांना उपलब्ध झालेली माहिती प्रमाणित करुन देण्याकरीता कोणत्याही प्रकारचे शुल्क त्या नियमात नाही व त्यामुळे प्रमाणित करण्याकरीता रु.५०/- आकारणी करणे योग्य नाही. त्यावर जन माहिती

अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने जे परिपत्रक तयार केले आहे त्या परिपत्रकाप्रमाणे फी आकारणी करण्यात येते परंतु, सदरच्या परिपत्रकाची प्रत त्यांनी सादर केलेली नाही. तसे जरी असले तरी सक्षम सार्वजनिक प्राधिकरणाशिवाय कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने महाराष्ट्र माहतीचा अधिकार अधिनियम २००५मध्ये नमूद केलेली प्रमाणित फी घेणे संयुक्तिक राहील व तसे आदेश सुध्दा मुख्य माहिती आयुक्त यांनी अपिल क्र.२१५१/०२, २९७७/०२, ३५२/०२, २७७/०२ मध्ये दि.९.७.२०१० रोजी दिले आहेत.

महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जे फी आकारणीचे नियम केले आहेत किंवा परिपत्रक काढले आहे त्या संदर्भात सर्वच अर्जदारांकडून आयोगाकडे तक्रार केली जाते. त्याकरीता पुन्हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त/उप आयुक्त यांना तक्रारीच्या संदर्भात सुनावणीस आयोगापुढे उपस्थित रहाण्याकरीता दि.२.२.२०११ रोजी आयोगाच्या कार्यालयातून नोटीस काढण्यात आली होती.परंतु त्या दिवशीसुध्दा संबंधित उपआयुक्त व अतिरिक्त आयुक्त सुनावणीस हजर न राहता त्यांनी कनिष्ठ अधिका-यांना आयोगाच्या कार्यालयात सुनावणीस उपस्थित रहाण्याकरीता पाठविले. असे असल्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये निर्णय होइपर्यंत या संबंधित तक्रारदारास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.१५.३.२०१०च्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ३०.३.२०१० रोजी जी खर्चाची आकारणी कळविली आहे ती रद्द करण्यात येऊन त्यांना त्यांच्या दि.१५.३.२०१० च्या अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी..

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३००८/तक्रार क्र. १५८४/का.१

श्री. एरॉल सिक्वेरा,
३ए, पृथ्वी निवास, पभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबइ-४०००५५. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महापालिका आयुक्त कार्यालय,
पाणी विभाग, एच/पूर्व वार्ड, प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २५.११.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२४.८.०९ च्या अर्जासोबत दिलेल्या परिशिष्टाच्या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही या करीता राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, ते वारंवार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित होतात परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना दि.१५.२.२००९ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु पुन्हा तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या माहितीच्या अर्जासोबत दि.२८.१२.०७ रोजी जी तक्रार केली होती त्या तक्रारीची प्रत जोडण्यात आली आहे व त्याप्रमाणे मुद्दा क्र.५ च्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. प्रत्यक्षात तक्रारदार यांना माहिती उपलब्ध होण्यापेक्षा त्यांच्या इमारतीमधील नळ जोडणीच्या संदर्भात व त्यांच्या घराच्या गच्चीवर जो पाईप दिलेला आहे तो बंद न करता तो अजूनही सुरु आहे व त्या संदर्भात काय कारवाई केली याबद्दलची त्यांना माहिती हवी आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, अवैध नळ जोडणी घेतलेली आहे व त्या संदर्भात जन माहिती

अधिकारी तथा सहाय्यक अभियंता हे कोणतीही कारवाई करीत नाहीत व हीच त्यांची मूळ तक्रार आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदींप्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असलली माहिती मिळवता येते परंतु कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन ती दिली जात नाही. त्यामुळे अवैध नळ जोडणीच्या संदर्भात आयोगाकडून कारवाई करुन मिळावी असे त्यांचे म्हणणे असल्यास आयोग हे तक्रार निवारण केंद्र नाही. असे असले तरी तक्रारदार यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दि.२४.८.०९ रोजीच्या अर्जासोबत २८.१.२००७ रोजीच्या दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात मुद्दा क्र.५ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३२६६७/तक्रार क्र. १२४४/का.१

श्री. बालचंद्र पिल्लाई जी.,
सन अँड सँड अपार्टमेंट,
२रा मजला, फ्लॅट नं.१,
जिल हिल बार जवळ, वाड चौकी,
नानी दमन, दमण-३९६ २१५. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा जनरल मॅनेजर,
महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन,
वाहन व्यवहार भवन, जेबीबी मार्ग, मुंबई. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २७.५.२००८
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१९.६.०७च्या अर्जान्वये माहिती उपलब्ध झाली नाही तसेच दि.२५.३.०८ च्या अपिल व तक्रारीच्या संदर्भातसुध्दा चुकीची माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकड दि.१३.६.०८ रोजी तक्रार केलेली आहे. तक्रारदार आज गैरहजर आहेत. गैरतक्रारदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये तक्रारदार यांना दि.१३.३.०८ रोजी जनरल मॅनेजर(एस अँड पी) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर पुन्हा दि.२०.६.०८ रोजी मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती त्या संदर्भातच उपस्थित केले आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा दि.२०.६.०८ रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.ज्या अर्थी तक्रारदार गैरहजर आहेत त्याअर्थी त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९९४९/तक्रार क्र. १०९८/का.१

श्री. जयेश रतिलाल गंगर,
सी-१०१, प्रभात को.ऑप हौ.सो.लि.,
एस.पी.मुखर्जी रोड, ब्राम्हण सभेसमोर,
डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त,
ठाणे शहर, ठाणे. .... उत्तरवादी

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १२.११.२००७
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार गैरहजर आहेत,गैरतक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार यांनी दि.१२.११.०७ रोजी त्यांच्या दि.८.१२.०७च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते. सदचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पोलीस उप अधिक्षक,गृह यांनी पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्याकडे हस्तांतरीत केलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली दिसून येते.

गैरतक्रारदार यांनी अर्जदार यांनी केलेल्या अपील अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी/पोलीस उप अधिक्षक(गृह), ठाणे (ग्रामिण) यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी दि.८.१२.०७ रोजी माहिती अधिकारान्वये केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही पोलीस आयुक्त ठाणे यांच्या कार्यक्षेत्राशी निगडीत असल्याने सदरचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पुढील कार्यवाहीसाठी त्यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याबाबत अर्जदारास कळवून अर्ज मा.पोलीस आयुक्त कार्यालय ठाणे(शहर) यांच्याकडे पाठविला असल्याचे दि.८.१२.२०१०च्या पत्रान्वये कळविले. कार्यालयाने उपलब्ध अभिलेख पडताळून पाहिले असता अर्जदार यांचा दि.८.१२.०७ रोजीचा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही, मात्र दि.२०.१.०९ रोाजी या कार्यालयात पोस्टाने पाठविलेला अर्ज दि.१२.२.०९ रोजी प्राप्त झाला, सदरची माहिती संकलीत करुन दि.३.३.०९ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा दि.१७.९.०९ रोजी रजिस्टर पोस्ट द्वारा केलेला अर्ज दि.१९.१०.०९ रोजी कार्यालयात प्राप्त झाला. तसेच अर्जदार यांनी शासकीय माहिती अधिकारी ठाणे(ग्रामिण) यांच्या कार्यालयात दि.२०.८.०९ रोजी केलेला अर्ज दि.२०.१०.०९ रोजी त्यांच्याकडे प्राप्त होऊन तो दि.२४.१०.०९ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झ ाला. सदरच्या दोन्ही अर्जाची माहिती सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक डोंबिवली

पोलीस स्टेशन यांच्याकडून संकलीत करुन सदर माहिती अर्जदार यांनी रजिस्टर पोस्टाने मागणी केलेली असल्याने पोस्टाचे शुल्क रु.२५/- इकडील कार्यालयास भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कार्यालयाने जावक क्र.सपोआ/डों./केमाअ/२२३/२२५/०९ दि.१८.११.०९ रोजी तक्रारदारास कळविले होते. परंतु तक्रारदार अद्यापपर्यंत इकडील कार्यालयात हजर झाले नाहीत अथवा माहिती टपालाने पाठविण्यासाठी येणारा खर्च त्यांनी भरलेला नाही. त्यामुळे माहिती इकडील कार्यालयात देण्यास प्रलंबित आहे असा खुलासा आयोगाकडे त्यांनी सादर केलेला आहे. तोंडी युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारदार हे दिलेल्या पत्त्यावर रहात नाहीत त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३०२५६/तक्रार क्र. १०९७/का.१

श्री. जयेश रतिलाल गंगर,
सी-१०१, प्रभात को.ऑप हौ.सो.लि.,
एस.पी.मुखर्जी रोड, ब्राम्हण सभेसमोर,
डोंबिवली(पूर्व), पिन-४२१२०१. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहापूर विभाग, शहापूर,
जिल्हा ठाणे ग्रामिण. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २५.११.२००७
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार अनुपस्थित.

तक्रारदार जयप्लास्ट यांनी दि.८.१२.०७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन दि.३.२.०५ रोजी पोलीसआयुक्त यांना दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली याबाबत माहिती मागीतलेली दिसून येते.सदरचा अर्ज दि.२७.१२.०७ रोजी पोलीस उप अधिक्षक(गृह) यांनी उप विभागीय पोलीस अधिकारी शहापूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवलला दिसून यतो. अर्जाच्या अनुषंगाने दि.७.२.०८ रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मुरबाड यांनी अर्जदार यांना माहितीच्या संदर्भात रु.५५/-चा खर्च भरावा अस कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.९.२.०८ रोजी माहितीच्या संदर्भात पुन्हा रु.५५/- चा खर्च भरावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि.१५.१२.०८ रोजी खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्या संदर्भातच तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.०७ रोजी तक्रार केली हाती. तक्रारीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे सादर केले असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार
क्रमांक-मुमाआ/२०१०/३१२९/तक्रार क्र. ७१६/का.१

श्री. प्रद्योत गोविंद नवाथे,
राजबाग, ब्लॉक नं.२०५, दालूचंद को.ऑप.हौ.सो.,
भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एफ एन विभाग,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, मुंबई-४००००१. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २६.१०.२००९
जन माहिती अधिकारी, तक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२६.१०.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये दि.२३.६.०९ रोजी अपिल क्र.३७०५/०२ मध्ये अपील अर्जात केलेल्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी तक्रार केलेली दिसून येते. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांना कलम ७८ अन्वये नोटीस दिलेली आहे त्या नोटीसच्या प्रती व प्रशासक नियुक्तीची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्दा क्र.३ च्या संदर्भात माहिती अर्जाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांकडे पाठवून अपिलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. मुद्दा क्र.४च्या संदर्भात विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग यांच्याकडे अपिलार्थी यांनी सहकार कायद्यानुसार दाद मागावी असे जे म्हटलेले आहे त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही करणे अपेक्षित नाही.त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० प्रमाणे त्यांनी आयुक्त, सहकार यांच्याकडे तक्रार केलेली आहे परंतु सदरची तक्रार त्यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, मल्होत्रा हाऊस एफ/ईन वार्ड यांच्याकडे पाठवून दिलेली आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन झालेले नाही. परंतु तक्रारदार यांनी जी कार्यवाही करावयाची आहे ती स्वतंत्रपणे सहकार अधिनियमाप्रमाणे करावयाची आहे असे नमूद केले आहे व त्याप्रमाणे सहकार अधिनियमाप्रमाणे केलेली तक्रार ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीपमाणे होत नसल्यामुळे त्याबाबत केलेल्या कारवाईबाबत कोणतेही अधिकार राज्य माहिती आयोगास नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/३७०४७/तक्रार क्र.१२७१व १२७२/का.१

श्री. इंद्र बहादूर शर्मा,
१०, शर्मा चाळ, अंधेरी कुर्ला रोड,
कृष्णा नगर, मरोळ नाका, अंधेरी(पूर्व),
मुंबई-४०००५९. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
श्रीनिवास बगडका ज्युनियर कॉलेज ऑफ आट्‌र्स अँड कॉमर्स,
श्रीनिवास बगडका माग, जे.बी. नगर,
अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ७.१२.२००८
जन माहिती अधिकारी, तक्रारदार अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी व तक्रारदार दोघेही अनुपस्थित आहेत. तक्रारदार यांनी दि.१०.१०.२००८,३.१२.०८ आणि १८.१२.०८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत परंतु तक्रारीसोबत त्यांनी माहितीच्या अर्जाची प्रत दाखल केलेली नाही किंवा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणत्या प्रकारचे उत्तर दिलेले आहे त्याबाबतही काहीही दाखल केलेले नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक ३.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/ /अपील क्रमांक ६९९३/२०१०

श्री.चंदु तुलसीदास पहुजा,
सी/२०३, ॲटलांटा को.ऑप.हौ.सो.,
एव्हर शाईन नगर, मालाड मार्वे लिंक रोड,

वलनाई व्हिलेज, मालाड(प.), मुंबई-४०००६४. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,
कक्ष क्र.६९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),
मुंबई-५.

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक पी विभाग,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) मुंबई यांचे कार्यालय,
कक्ष क्र.६९, तळ मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),
मुंबई-५ **.** **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ३.४.२०१०
सुनावणीचा दिनांक : १६.१२.२०१०
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी दि.२१.८.०९ व दि.१६.११.०९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात आदेश देण्याची विनंती केली आहे. राज्य माहिती आयोगाकडे अपिल क्र.२०१०/४७०३/०२ या अपिलाची सुनावणी होऊन दि.३०.४.२०१० रोजी निर्णय झाला असून उप निबंधक यांनी प्रशासकास आदेश देऊन अपिलकर्ता यांना निरिक्षणासाठी नस्ती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे दि.१९.५.२०१० रोजी उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९(२)(अ) अन्वये आदेश काढून संस्थेने श्री.सी.टी.पहुजा यांना तत्कालीन निविदांची तपासणी घेण्याकरीता दफ्तर उपलब्ध करुन द्यावे व तसे केल्याचे अर्जदार व या कार्यालयास कळविण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर पुन्हा दि.१३.७.२०१० रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३) यांनी उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग यांना, राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२०१० रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन आपल्या कार्यालयाने अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही

केली नसल्याची तक्रार राज्य माहिती आयोगाकडे केली आहे, तरी मा.राज्य माहिती आयुक्त यांच्याकडील दि.३०.४.२०१०च्या आदेशांच्या अनुषंगाने कार्यवाही करावी असे कळविलेले दिसून येते.

अपिलकर्ता यांनी ॲटलांटा कोऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटीच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या संदर्भात या पूर्वीसुध्दा बंधपत्राच्या प्रति संचालक मंडळाने दाखल केलेल्या आहेत किंवा नाहीत याबद्दलची माहिती मागीतली होती व ती माहिती त्यांना दि.५.१.०९ रोजी उपनिबंधक,सहकारी संस्था यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर सस्थेने इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जे टेंडर्स मागविलेले होते त्या टेंडर्सच्या संदर्भात निरिक्षण करुन माहिती मिळावी याबद्दलसुध्दा माहिती मागीतलेली होती व त्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाचा वर नमूद केल्याप्रमाणे निर्णय आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांनी उपनिबंधक यांच्या आदेशांचे पालन झाले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकाडे तक्रारसुध्दा केलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुन्हा उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई यांनी त्यांच्या दि.१९.५.२०१०च्या आदेशांचे पालन संस्थेच्या संचालक मंडळाने केलेले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम ७९(१) प्रमाणे त्यांना जे अधिकार आहेत त्या अधिकाराचा वापर करुन कारवाई करणे संयुक्तिक होईल. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम २(च)व (त्र)प्रमाणे माहिती व माहितीचा अधिकार या दोन्ही संज्ञांच्या व्याख्येप्रमाणे कार्यालयात किंवा माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध होते. कोणत्याही अन्य अधिनियमाच्या अन्वये कारवाई करावयाची असल्यास त्याबाबत राज्य माहिती आयोगास आदेश देण्याची तरतूद नाही. असे असले तरी सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत उपनिबंधक सहकारी संस्था,पी विभाग,मुंबई यांनी त्यांच्या दि.१९.५.२०१० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ७९(२)(अ) प्रमाणे आदेशांचे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करुन अपिलकर्ता तक्रारदार यांना संस्थेची कागदपत्र विशेषत: टेंडर संदर्भातील कागदरत्र निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावीत.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई (विलास पाटील)
दिनांक ११.२.२०११ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५५१/अपील क्रमांक ६४४२/२०१०

श्री. अजय माळतकर,
नेताजी सुभाषचंद्र नगर, रुम नं.२,
जेरबाई वाडिया रोड, परेल,भोईवाडा,
मुंबई-४०००१२. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल,
मुंबई-४०००१२.

जन माहिती अधिकारी(वसाहत),
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल,
मुंबई-४०००१२. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी(मिळकत)यांच्याकडे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते:-

i)Information require of Mr.Nagraj N.Malatkar name in Sub-Tenant occupant of shop N०.२A in Vacant Land Tenancies on Municipal Plot bearing C.S.No.७१४,७१८,७२० of Dadar Naigaon Div.Jerbai Wadia Road, Bhoiwada, Mumbai-४०००१२.

ii) The period of which the information is related from the years १९७२ to २०१०.

iii) Written and Copy of detail require of the information.

iv) Information is required by in person.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलबध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१२.११.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.७.१२.२०१० रोजी देण्यात आला असून वसाहत अधिकारी श्री.आर.बी.कवटे यांना मागीतलेल्या प्रकरणाच्या संदर्भात दुरुस्ती करुन अहवाल सादर करावा व माहिती आठवडयाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांची मंजुरी घेऊन उपलब्ध करुन द्यावी अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यानी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्यामध्ये निवासी व व्यापारी या तत्वावर जी दोन टेनामेंट्स आहेत त्यामध्ये त्यांची आजी श्रीमती सिताबाई नारायण मालतकर यांचे नाव होते परंतु एफ(द.)/८९१ च्या संदर्भात जे आदेश काढण्यात आले आहेत त्यामध्ये व्यापारी टेनामेंट्सच्या संदर्भात त्यांचे काका श्री.नागराज एन.मालतकर यांचे नाव आलेले आहे व ते कशाच्या आधारावर घेण्यात आले आहे त्याबद्दलची कागदपत्र त्यांनी मागीतलेली आहेत. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये वसाहत अधिकारी श्री.आर.बी.कवटे यांना योग्य त्या चुकांची दुरुस्ती करुन मंजुरी घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्येसुध्दा मिळकत विभागाने चुकीचे ॲनेक्स्चर निर्गमित केलेले आहे व त्यावरुनच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला असूनसुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा

कोणतीही कारवाई करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी ज्या मिळकतीच्या संदर्भात ही माहिती मागीतलेली आहे ती मिळकत ही एसआरए म्हणजेच झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये दि.२८.फेब्रुवारी,२०११ रोजी नष्ट करण्यात येणार आहे व त्यामुळे त्यांना ही माहिती तातडीने उपलब्ध झाल्यास योग्य ती पुढील कारवाई करता येइल असे त्यांनी पुढे सांगितले. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आज सुनावणीस गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कागदपत्र दाखल केलेली नाहीत. त्यामुळे आयोगाच्या नोटीसचा त्यांनी अवमान केलेला आहे. तत्कालीन किंवा विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे ते दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु आज जन माहिती अधिकार गैरहजर असल्यामुळे व त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.१०.२०१०च्या अर्जात मागीतलेली माहिती, प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे दुरुस्त करुन, व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) माहिती व्यक्तीश: उपलब्ध करुन घेण्याकरीता अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्याच्या दिवशी संबंधित विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपिलकर्ता यांच्या दि.११.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व आयोगापुढे ते सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये त्यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचे त्यांचे म्हणणे त्यांनी आयोगापुढे उपस्थित राहून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत समक्ष मांडावे अन्यथा त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

४) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १७.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२७/अपील क्रमांक ६३४१/२०११/०२

श्री. विलास आसाराम साळवे,
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स नं.११८८२,
भांडुप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोर(पूर्व),
मुंबई-४०००७७.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोर(पूर्व),
मुंबई-४०००७७. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११

अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.३०.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),एन वार्ड, घाटकोपर(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन जानेवारी-२००७ ते मार्च-२०१० पर्यंतच्या कालावधीत एकूण किती अर्थसंकल्प निधी मिळाला व त्या निधीतून कोणकोणती कामे करण्यात आली त्या कामांची नावे व पत्ते द्यावेत अशी एकूण १३ मुद्यांमधील माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.४.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी अर्थसंकल्पनिधीतून मागीतलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने व ती वार्ड क्र.१२३,१२४,१२५ मधील असल्याने या कार्यालयाशी संपर्क साधावा व त्यानंतर आपणास हवी असलेली माहिती रु.२/- प्रति प्रत याप्रमाणे पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१३.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११.६.२०१० रोजी देण्यात आला असून अपिलकर्त्यांस १५ दिवसात माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.२०.६.२०१० काही मुद्यांच्या संदर्भात माहिती व इतर माहितीच्या संदर्भातील कागदपत्रांच्या संदर्भात अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु तरीही अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही व कोणताही पत्रव्यवहार मिळालेला नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.४.२०१० रोजी खर्चाचा भरणा करावा असे कळविले व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरसुध्दा खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ही दोन्ही पत्रे त्यांना मिळालेली नाहीत. त्यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली,द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटीस मिळाली परंतु उपरोक्त खर्चाचा भरणा करावा याबद्दलची पत्रे मात्र मिळालेली नाहीत. या चारही पत्रांवरील पत्त्याचा विचार केल्यास अपिलकर्ता यांनी दिलेल्या पत्त्यावरच खर्चाचा भरणा करावा ही पत्रेसुध्दा पाठविलेली आहेत व त्यामुळे सदरची पत्रे अपिलकर्ता यांना मिळाली नाहीत असे जरी त्यांचे म्हणणे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी जावक क्रमांक देऊन ती पत्रे दिलेली आहेत. त्यामळे त्यांनी ती पत्रे पाठविलेली आहेत असे गृहित धरावे लागते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागीतलेली असल्यामुळे व त्यास छायांकित प्रतिचा खर्च व उपरोक्त खर्च रु.३१०+ रु.२४८० इतका कळविलेला असल्यामुळे त्यांनी त्या खर्चाचा भरणा करुनच माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती कळविली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १७.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१२८/अपील क्रमांक ६३४२/२०११/०२

श्री. विलास आसाराम साळवे,
शिवनेरी टुडे, पोस्ट बॉक्स नं.११८८२,
भांडुप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,
भांडुप(प.), मुंबई-४०००७८.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(परिरक्षण),
बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,
मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादूर शास्त्री मार्ग,
भांडुप(प.), मुंबई-४०००७८. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११

अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२४.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण) यांच्याकडे अर्ज करुन वार्ड क्र.१०४,१०६,१०७ व १११ बाबत वर्ष २००७ ते मे-२०१० या कालावधीतील काँक्रिटीकरण तसेच पेव्हरच्या संदर्भात एकूण १३ मुद्यांवर माहिती पत्रव्यवहार सर्वसाधारण टपालाने करावा असे नमूद करुन मागीतलेली दिसून येते.अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.६.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी मागीतलेली माहिती अतिशय विस्तृत व वेळखाऊ स्वरुपाची असून ती संकलीत करुन आपणास देण्यासाठी उपलब्ध कर्मचा-यांचा कामाचा वेळ खर्च पडणार आहे. त्यामुळे एखाद्या विशिष्ट कामाविषयी माहिती हवी असल्यास माहितीचे निरिक्षण करण्यासाठी कार्यालयीन वेळेत आपण सूचना देऊन प्रत्यक्ष भेटावे व आवश्यक असल्यास माहिती सुचित करुन शुल्क भरल्यानंतर सदर माहिती आपणास उपलब्ध करुन देण्यात येइल व इतर दोन मुद्यांच्या संदर्भात प्रति पृष्ठ रु.२/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी दि.२२.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०.७.२०१० रोजी देण्यात आला असून तो पुढीलप्रमाणे आहे - जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिलेले असल्यामळे सदरचे अपील अमान्य करण्यात आले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना दि.२५.६.२०१० चे पत्र मिळालेले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना टपाल दाखला घेऊनच सदरचे पत्र दिलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना इतर पत्रे मिळतात परंतु खर्चाचा भरणा करावा असे नमूद केलेले पत्र मात्र मिळत नाही. ते आयोगात त्यांच्या सर्वच अपीलांच्याबाबत याप्रकारे सांगत आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्या उत्तराप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. यास्तव अपिलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १७.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

Gawas/feb 2011

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१३१/अपील क्रमांक ६३४५/२०११/०२

श्री. संजय अर्जून पटेल,
बस्ताव मिस्किटा चाळ, एम.आय.डी.सी. रोड नं.११,
आर.सी.मारुती शाळेसमोर, अंधेरी(पूर्व),
मंबई-४०००९३. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका,के-पूर्व विभाग कार्यालय,
गुंदवली, आझाद रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,के-पूर्व विभाग कार्यालय,
गुंदवली, आझाद रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १३.१०.२०११
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११

अपिलकर्ता उपस्थित, जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.११.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी के/ई वार्ड, अंधेरी(पूर्व) यांच्याकडे अर्ज करुन श्री.काळे हे बुधवार दि.९.६.२०१० रोजी १२ ते १.३० वा. के/पूर्व विभाग कायालयातून मुळगांव, अंधेरी प्लॉट नं.७५ या जागेवरील घर तोडण्यास आले होते त्यावेळी म.न.पा.ने कोणती नोटीस दिली व तक्रार केल्याची प्रत देण्यात यावी अशी माहिती मागीतलेली दिसून येते. परंतु सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७.८.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी ३ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणेही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीस गैरहजर आहेत. मात्र त्यांचे प्रतिनिधी सुनावणीसाठी हजर आहेत. प्रतिनिधींना सदर प्रकरणाबाबत काहीही माहिती नाही व ते प्राधिकृत नाहीत व त्यांना कागदपत्रांचीसुध्दा माहिती नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. जन माहिती अधिकारी का गैरहजर आहेत याबद्दल त्यांनी आयोगापुढे काहीही कागदपत्र दिलेली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. असे असले तरी अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती व प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाप्रमाणे व प्रथम अपील क्र.एसीकेई/१४९३७/बीएफ दि.१७.८.२०१० च्या आदेशाप्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत व प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगापुढे समक्ष करावा व तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात येईल व ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १७.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०१०६/अपील क्रमांक ६२६०/२०१०/०२

श्रीमती धवनी देसाई द्वारा तारिनीबेन देसाई,
नानिक निवास III, तळ मजला, फ्लॅट नं.२,
वार्डन रोड, मुंबई-४०००२६. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)शहर,
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर-१,
बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग कार्यालय,
१०, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १५.१०.२०१०
सुनावणीचा दिनांक : १७.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.२९.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत व प्रस्ताव) शहरे-१ ई-वार्ड यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलली दिसून येते -

16. Kindly provide each and every correspondence (to and from) between Shyam CHS Ltd (at 51, Bhulabhai Desai Rd, Mumbai 400 026) and your ward office regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's, canopy and proposed Overhead Water Tank.
17. Kindly provide each and every correspondence (to and from) between your ward office and Shri Sachin Wairker (Licensed Surveyor / Architect) regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's. canopy and proposed Overhead Water Tank.
18. Kindly provide each and every correspondence (to and from) between Your ward office and any other Licensed Surveyor / Architect regarding the above mentioned proposal for regularization of repairs, for chhajja's, canopy and proposed Overhead Water Tank to be carried at side Nanik Niwas III (Shyam CHS Ltd) situated at Bhulabhai Desai Rd, Mumbai – 400 026.
19. Kindly Provide each and every correspondence (to and fro) between your ward office and any other person / persons regarding the above mentioned proposal for regularization of repairs at site Nanik Niwas III (Shyam CHS Ltd) situated at Bhulabhai Desai Rd, Mumbai – 400 026.
20. Any other information available on the above "subject matter of information"

सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरिक्षण करण्याकरीता कळविण्यात आले असून निरिक्षणाकरीता कागदपत्रांच्या संदर्भात खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यानी दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१४.७.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांना "S.P.I.O. and Executive Engineer&B.P.)City-१ is directed to get the papers sent to L.O., checked" अशाप्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही काही कार्यवाही झालेली नसल्यामुळे व अपिलकर्ता यांना दिलेले उत्तर हे विधी

विभागाकडे पाठविण्यासाठी समाविष्ट केले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दि.२९.४.२०१० च्या अर्जामध्ये जी माहिती मागीतलेली आहे त्यापैकी मुद्दा क्र.४ मध्ये वार्ड ऑफीसने विभागाबरोबर किंवा अधिका-याबरोबर झालेली दुरुस्ती नियमित करण्यासंदर्भात झालेला पत्रव्यवहार तसेच सज्जा कनापी व पाण्याची टाकी या संदर्भातील कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत अशी मागणी केली आहे व ती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांनी पुढे युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की. त्यांना ज्यावेळेस निरिक्षणाकरीता नस्ती उपलब्ध करुन दिली त्यावेळेस त्या नस्तीमध्ये त्यांनी स्वत: दि.३१.१.२०१० रोजी दिलेली तक्रार समाविष्ट केलेली नव्हती. विधी विभागाकडे सदरची तक्रार अभिमत घेण्याकरीता पाठविणे आवश्यक होते ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात आली होती व त्यामुळे प्रथम अपीलीयअधिकारी यांनी सदरची कागदपत्र समाविष्ट करुन विधी विभागाकडे पाठविण्याचे आदेश दिलेले होते. त्यानंतरही सदरची कागदपत्र त्यात समाविष्ट केलेली नाहीत हे निदर्शनास आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जी तक्रार करण्यात आली होती त्या तक्रारीमध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्या मुद्यांच्या संदर्भात विधी विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक होते. परंतु सदरच्या तक्रारीची प्रत ही त्या दुरुस्तीच्या संदर्भात आक्षेप घेणारी असल्यामुळे सदरची प्रत विधी विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आली नाही व हे मुद्दाम करण्यात आले आहे असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुनच अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात त्यांनी जी माहिती मागीतलेली होती त्यामध्ये सदरच्या तक्रारीचा समावेश नसल्यामुळे त्या तक्रारीची प्रत अद्यापपर्यंत त्यांना उपलब्ध झालेली नाही. आजही त्या नस्तीमध्ये ती नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात निरिक्षणाकरीता ज्यावेळेस त्यांना नस्ती उपलब्ध करुन दिली त्यावेळेस सदरच्या तक्रारीची प्रत आढळून आली नाही असे त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले होते. वास्तविक कोणत्याही इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात जी नस्ती तयार होते त्या नस्तीमध्ये त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे् ही समाविष्ट केली जातात. सदरच्या दुरुस्तीच्या संदर्भातील नस्ती ही पूर्वी तयार केलेली आहे व अपिलकर्ता यांनी दि.३१.१.२०१० रोजी जी तक्रार केलेली आहे ती तक्रार ही स्वतंत्रपणे दिलेली आहे. त्यामुळे ती त्या नस्तीमध्ये समाविष्ट झाली नसावी. परंतु त्यावर पुन्हा अपिलकर्ता यांनी सदरची तक्रार ही नस्तीमध्ये समाविष्ट झालेली आहे या संदर्भात त्यांनी महानगरपालिकंच्या कार्यालयाकडूनच पोच मिळाली आहे व त्यावरुनच

सदरच्या तक्रारीची प्रत ही जाणीवपूर्वक त्या नस्तीमध्ये समाविष्ट केली गेली नाही असा त्यांचा आरोप आहे व त्याप्रमाणे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये - Missing papers to be put back - reasons/notings why they were out असा उल्लेख केलेला आहे. परंतु त्यामध्ये त्यांनी ३१.१.२०१० रोजी दिलेल्या तक्रारीचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही व तरीही त्यांनी जाणीवपूर्वक सदरची तक्रारीची प्रत नस्तीमध्ये ठेवण्यात आलेली नाही या कारणाकरीता जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी आयोगाकडे विनंती केलेली आहे. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कोणत्याही इमारतीच्या दुरुस्तीच्या संबंधीची जी नस्ती असते ती सबइंजिनिअर हाताळत असतात. माहिती अधिकारी हे असलेली माहिती उपलब्ध करुन देऊ शकतात त्यामुळे सदरची तक्रारीची प्रत ही नस्तीत का समाविष्ट करण्यात आली नाही याबद्दल त्यांना काहीही सांगता येणार नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यावरसुध्दा दि.३१.१.२०१० च्या तक्रारीची प्रत ही विधी विभागाकडे पाठविण्यापूर्वी का समाविष्ट करण्यात आली नाही हा मुद्दा मात्र अनिर्णितच राहतो व त्याबद्दल त्यांना तसे सांगता येणार नाही. मात्र एक बाब स्पष्ट दिसून येते की, माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपील मेमोमध्ये किंवा प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये ३१.१.२०१० च्या तक्रारीचा स्पष्टपणे उल्लेख दिसून येत नाही तर फक्त कागदपत्र समाविष्ट केलेली नाहीत अशाप्रकारचा उल्लेख आहे. परंतु कोणती कागदपत्र याबाबतचे स्पष्टीकरण नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागीतल्यावर जी माहिती कागदपत्रांमध्ये,अभिलेख्यांमध्ये उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती माहिती उपलब्ध होते. जी माहिती उपलब्ध नाही ती का उपलब्ध नाही या संदर्भात प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलामध्ये मुद्दा जरी उपस्थित केलेला असला तरी त्याबद्दलचे निश्चीत कारण जर जन माहिती अधिकारी यांना देता येत नसेल तर त्याकरीता जबाबदारी निश्चित करुनच त्याबद्दलची माहिती उपलब्ध करुन देता येईल. कोणत्याही कार्यालयात कोणत्याही नस्तीबाबत एकच अधिकारी ती नस्ती हाताळत नसतात व त्यामुळे नस्तीमध्ये कागदपत्र नाहीत या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाविरुध्द राहील व त्यामुळे सदरच्या प्रकरणात जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व संबंधित विभागामध्ये ज्या ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचा नस्ती हाताळण्यामध्ये सहभाग असतो त्या सर्वांच्या संदर्भात जबाबदारी निश्चित करण्याकरीता चौकशी करुन जबाबदारी निश्चित झाल्यावरच आयोगाने निर्णय देणे योग्य होईल.त्यामुळे आयुक्त महानगरपालिका यांनी चौकशी अधिकारी नेमून चौकशी करुन आयोगास अहवाल सादर करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपीलावर अंतरिम आदेश पारित करणे संयुक्तिक राहील.

अंतरिम आदेश

१) मा.आयुक्त महानगरपालिका यांनी सदरच्या प्रकरणामध्ये चौकशी अधिकारी नियुक्त करुन अर्जदार अपिलकर्ता यांनी तक्रार केल्याप्रमाणे फाईल क्र.ईबी/४८६०/डी/ए Regarding proposed Regularization of additions/alterations and Major repairs at Nanik Niwas ३, Bhulabhai Desai Road, Mumbai-२६ C.S.No.६८५,Malabar Hill Division, Shyam Co. Hsg. Society Ltd. च्या संदर्भात नस्तीमध्ये जाणीवपूर्वक विधी विभागाच्या अभिप्रायासाठी पाठविलेल्या नस्तीमध्ये अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारीची प्रत किंवा इतर कागदपत्र समाविष्ट न करण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करावी व आयोगाकडे अहवाल १५ दिवसाच्या आत सादर करण्यात यावा.

२) सदरच्या निर्णयाची १ प्रत आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपिलकर्ता व उत्तरवादी यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३२१/अपील क्रमांक ६४१५/२०१०/०२

श्री.शेख मुरादजी शाहजहाँ,
मितला धाम,जरी वर्गीस टर्मट कंपनीच्या समोर,
वॉटर टँक रोड, प्लॉट नं.२५६, मालाड(पूर्व),
मुंबई-४०००९७. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड(प.), मुंबई-४०००६४.

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग कार्यालय,
मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणाची सुनावणी दि.२८.२.२०११ रोजी सकाळी १०.३० वाजता ठेवण्यात आली होती परंतु त्यावेळेस कोणीही हजर नव्हते म्हणून सदर सुनावणी पुन्हा दुपारी २.०० वाजता ठेवण्यात आली. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर होते. सदर प्रकरणाची चौकशी केली असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय दि.२०.१०.२०१० रोजी दिलला दिसून येतो. त्या निर्णयाचे अवलोकन केले असता व जन माती अधिकारी यांच्याशी चर्चा करतांना अर्जदाराचे उत्तर तयार असून अपिलार्थिनी ते

व्यक्तीशः मागीतले होते त्यामुळे ते पोस्टाने पाठविले नाही असे त्यांनी सांगितले. अपिलार्थिना १० दिवसाच्या आत माहिती व्यक्तीशः देण्यात यावी असे आदेश देऊन सदर अपील निकाली काढण्यात आलेले आहे असे दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने अर्जदाराने या आयोगासमोर द्वितीय अपील सादर केले. वास्तविक पहाता अर्जदाराने मागीतलेली माहिती ही जर तयार होती तर अर्जदार अपिलार्थी हे सुनावणी दरम्यान उपस्थित होते तेव्हा त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्यासमोर समक्ष माहिती का पुरविली नाही व पुन्हा १० दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असे आदेश देण्याचे कोणतेही कारण दिसत नाही.

तसेच अर्जदाराने मागीतलेली माहिती ही १७ मुद्यांमध्ये असून त्याबद्दल प्रथमअपीलीय अधिकारी यांनी सदर मुद्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण घेऊन प्रत्येक मुद्यावर मुद्देसुद माहिती देणे अपेक्षित होते. परंतु या आयोगासमोर दाखविलेल्या उत्तरावरुन निश्चितच समाधानकारक उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले नाही व ब-याच मुद्यांची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे म्हटलेले आहे. वास्तविक ही माहिती महानगरपालिकेशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्येक मुद्याबाबत स्पष्टीकरण किंवा माहितीबाबत स्पष्ट उल्लेख असावयास पाहिजे होता. म्हणून सदर पकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२०.१०.२०१० रोजी दिलेला निर्णय हा रद्दबातल ठरविण्यात येत आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, दि.१६.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सुनावणी घेण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याबाबत उपलब्ध असलेली माहिती किंवा त्याबाबतचे स्पष्टीकरण लेखी स्वरुपात प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दाखल करावे.प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रत्येक मुद्याचे अवलोकन करुन दिलेली माहिती बरोबर आहे किंवा नाही ते तपासून योग्य ते आदेश पारीत करुन त्याची प्रत अर्जदाराला उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर द्वितीय अपील ९० दिवसाच्या आत करु शकतात. यास्तव खालील आदेश पारित करुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) दि.२०.१०.२०१० रोजी पारित केलेले अपील क्रमांक २८२५४ चे आदेश रद्दबातल करण्यात येत आहेत.

२) प्रथम अपीलीय अध्किारी यांनी दि.१६.३.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता अर्जदाराच्या दि.२७.९.२०१० च्यामूळ अपील अर्जाच्या संदर्भात सुनावणी ठेवावी व माती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान मुद्देसुद लेखी निवेदन दाखल करावे. त्याची प्रत अपीलीय अधिका-यांसमोर अर्जदारास देण्यात यावी व अर्जदाराचे

संपूर्ण म्हणणे ऐकून योग्य ते आदेश त्यानंतर ८ दिवसांच्या आत पारीत करावे व त्याची १ प्रत अर्जदाराला अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी.

३) त्यानंतरही अर्जदाराचे समाधान झाले नाही तर अर्जदार ९० दिवसाच्या आत या आयोगासमोर द्वितीय अपील दाखल करुन शकतो.

मुंबई
दिनांक २८.२.२०११

(भास्कर पाटील)
प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

श्री.महम्मद हमीद शेख(समाजसेवक सतर्क नागरीक),
नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,एमएमआरडीए,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, वांद्रे,मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,एमएमआरडीए,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, वांद्रे,मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ८.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अपिलकर्ता यांनी दि.२७.७.२०१० रोजी प्रपत्र-अ मध्ये अर्ज करुन माहिती मागीतलेली दिसून येते. त्यात सदर प्रकरणी ठेकेदार किती आहेत, त्यांची नावे, त्यांच्या लायसेन्सच्या संबंधात माहिती इत्यादीबाबत अर्जदाराला कळविण्यात आले आहे व त्यानुसार अर्जदाराला पैशाचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अर्जदाराला दिलेल्या उत्तरास लागलेला अवधी विचारात घेता अर्जदाराला माहिती विनाशुल्क पुरविण्याचे आदेश या आयोगाने दिले. अर्जदाराला या आधी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अर्जदारास आणखी माहितीची आवश्यकता होती व त्याबाबत अर्जदाराला माहिती अधिकारी यांनी १० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले व सदरची माहिती विनामुल्य,अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पुरविण्यात येईल असे मान्य केले आहे. यास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

यानंतरही अर्जदारास काही अडचण असल्यास ते या आयोगासमोर या अधिनियमाच्या कलम १८ खाली तकारवजा अर्ज सादर करु शकतात.

मुंबई
दिनांक २८.२.२०११

(भास्कर पाटील)
प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक-मुमाआ/५०३१७/अपील क्रमांक ६४१२/२०१०/०२

श्री.महम्मद हमीद शेख(समाजसेवक सतर्क नागरीक),

नेहरु नगर, चाळ क्र.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व), मुंबई-५१. ..... अपिलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी,
३रा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
३रा मजला, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १०.८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी प्रपत्र अ मध्ये दि.१०.८.२०१० रोजी अर्ज करुन माहिती मागीतलेली आहे. मागीतलेली माहिती मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ म्हाडा द्वारा होनेवाले विकास कार्यक्रम के बारेमे तसेच राज नंदिनी लेबर सहकारी संस्था,मर्यादित या संस्थेचे मुख्यप्रवर्तक वगैरे बाबतची माहिती मागीतलेली दिसून येते. अर्जदारास कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी दि.१८.९.२०१० रोजी पत्र पाठविले व राज नंदिनी लेबर सहकारी संस्था यांनी कोणकोणती विकास कामे पूर्ण केली आहेत व कोणत्या फंडातून ती पूर्ण केली आहेत व कामे सुरु होण्याचा व संपल्याचा कालावधी याबाबतची माहिती कळविलेली दिसून येते. परंतु सदर लेबर सहकारी संस्थेचे पंजीकरण करतांना मुख्य प्रवर्तक कोण होते तसेच त्यांचे सदस्य कोण होते याबाबतची माहिती (डीडीआर) तसेच अध्यक्ष,काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पूर्व उपनगरे-२, कोकण भवन,सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधीत असून माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे तरी याबाबत संबंधित कार्यालयाकडे संपर्क साधावा असे अर्जदारास कळविलेले दिसून येते व त्याकरीता सदर पत्राची प्रत डीडीआर,काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पूर्व उपनगरे-२ कोकण भवन,सीबीडी बेलापूर,नवी मुंबई यांना पाठविण्यात आलेली आहे. अर्जदारास उर्वरित माहिती मिळाली असून फक्त सदर

संस्थेच्या पंजीकरणाबाबत माहिती मिळालेली नाही म्हणून डीडीआर-अध्यक्ष, काम वाटप समिती यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी संबंधित संस्थेबद्दलची माहिती अर्जदारास अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर व कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी दि.१८.९.२०१० च्या पत्राच्या अनुषंगाने निर्देशित केलेली माहिती अर्जदारास हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामुल्य नोंदणीकृत डाकेने पाठवावी. माहिती उपलब्ध नसल्यास तसे अर्जदारास कळवावे. तसेच सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी कोण असतील याबाबतची माहितीही कळवावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार या आयोगासमोर अधिनियमाच्या कलम १८ खाली तक्रारवजा अर्ज करु शकतात. वरील आदेश देऊन सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २८.२.२०११

(भास्कर पाटील)
प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३२७/अपील क्रमांक ६४१७/२०१०/०२

श्री. अशोक कुंचीकोरवे,
एम.पी.नगर,घोरवाडा,
रुम नं.बी.८०, धारावी क्रॉस रोड,
मुंबई-४०००१७ ..... **अपिलकर्ता**

Gawas/feb 2011

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परि.६, ४था माळा,
प्रशासकीय इमारत, आरसी मार्ग,
चेंबूर, मुंबइ-४०००७१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पूर्व प्रादेशिक विभाग,
चेंबूर, मुंबई-७१. ..... **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : ९.११.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदार अपिलकर्ता यांनी प्रपत्र-अ नुसार दि.१२.७.२०१० रोजी प्रशासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, अप्पर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,चेंबूर, मुंबई यांच्याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन एकूण ८ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून येते. त्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार अर्जदाराचे समाधान न झाल्याने अर्जदाराने दि.९.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,परिमंडळ-६, ४था मजला, प्रशासकीय इमारत,आरसी मार्ग, चेंबुर, मुंबई-७१ यांच्याकाडे प्रथम अपील दाखल केले. अर्जदाराचे मिळालेल्या माहितीने समाधान झालेले नाही. अर्जदारास द्यावयाची माहिती नष्ट करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.७.९.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली व दि.९.९.२०१० रोजी आदेश पारित करण्यात आले. सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी पोलीस निरिक्षक श्री.जाधव सुनावणीस उपस्थित होते. अपीलार्थी यांना पत्रान्वये कळवूनही ते सुनावणीस गैरहजर होते. अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे शासकीय माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली आहे परंतु कागदपत्रांचा दस्तऐवज नियमाप्रमाणे नष्ट केल्यामुळे पोलीस ठाणेस मागणी केलेली कागदपत्र उपलब्ध नसल्याचे त्यांना कळविण्यात आले आहे. अर्जदार सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांना माहिती कोणत्या नस्तीच्या आधारे दिलेली आहे ते स्पष्ट झाले नाही. अर्जदाराला उत्तर दिले असल्याच्या कारणास्तव अर्जदाराचे अपील निकाली काढण्यात आले आहे.

त्यानंतर अर्जदाराने या आयोगासमोर दि.९.११.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्या अपिलात प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांचे अपील क्र.४३०५ /१०, दि.९.९.२०१० चे आदेश सुनावणी न घेता व चुकीचे आदेश दिले असे नमूद केले आहे व वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी दिलेली माहिती खोटी/अपुरी आहे म्हणून संबंधीतांविरुध्द कार्यवाही करुन अर्जदाराला दस्तऐवज देण्याबाबतचे आदेश द्यावेत असे म्हटले आहे.

सदर सुनावणीस अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत,जन माहिती अधिकारी हजर आहेत. त्यांनी त्यांच्यातर्फे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. दिलेल्या लेखी खुलाशानुसार अर्जदाराने विक्रोळी पार्कसाईट पोलीस ठाणे येथे दि.१३.४.०७ व दि.२५.९.०७ रोजी ज्या तक्रारी दाखल केलेल्या आहेत त्या संबंधीचा चौकशी अहवाल तसेच हस्तगत केलेली क्वालीस मोटरकार एमएच-०४ बीडी १७२१ चे दस्तऐवज व अपीलकार यांना विकलेल्या सदर गाडीच्या करारनाम्याची सत्यप्रत मिळणेबाबत नमूद केले आहे. तसेच मानवी हक्क आयोग केस क्र.बीजीएक/०४/२००८-०९ मध्ये सादर केलेला अहवाल व दस्तऐवजांची नक्कल प्रत मिळणेबाबत नमूद केले आहे. सदर निवेदनात असे सुध्दा नमूद केले आहे की, तक्रार अर्ज व चौकशीची कागदपत्र मुदत संपल्याने नष्ट करण्यात आली असल्याने व मानवी हक्क आयोगास अहवाल सादर करण्यात आल्याने व पोलीस ठाणे अभिलेखावर अहवाल उपलब्ध नसल्याने अर्जदार अपिलकर्ता यांनी मागीतलेली कागदपत्र देण्यात आलेली नाहीत.

सदर प्रकरणी अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे जर सदर कागदपत्र नियमानुसार नष्ट करण्यात आली असतील तर या संबंधीचे कागदपत्र किंवा रजिस्टर मधील नोंदी याबाबतची माहिती अर्जदाराला हवी आहे व ती देण्याची जबाबदारी संबंधीत वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस स्टेशन यांची आहे. तरी वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस स्टेशन यांना असे आदेश देण्यात येतात की, त्यांनी अर्जदार स्वत: निरिक्षणासाठी आल्यास या नष्ट केलेल्या अभिलेखासंबंधीची माहिती त्यांना प्राप्त करुन द्यावी. जर अशाप्रकारची मूळ अभिलेखातील रजिस्टर मधे नोंदी घेतलेल्या नसतील तर अर्जदाराला तसे लेखी कळवावे. अर्जदाराला अशाप्रकारची लेखी माहिती न मिळाल्यास अर्जदार या आयोगासमोर त्याप्रमाणे लेखी तक्रार माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १८ खाली करु शकतात.

त्याचप्रमाणे सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, अर्जदाराची तक्रार दि.१३.४.०७ व २५.९.०७ च्या अनुषंगाने चौकशी अहवाल हा मानवी हक्क आयोगाच्या प्रकरणात दाखल करण्यात आलेला आहे. तरी या संबंधी अर्जदाराने अर्जदाराचे प्रकरण चालू असल्यास तशाप्रकारे अर्ज करुन सदर मूळ अभिलेखाचे निरिक्षण मागवावे किंवा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार माहिती मिळण्यासाठी अर्ज

करावा व माहिती मिळवावी. यास्तव खालील आदेश पारित करुन सदाचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी अर्जदाराच्या दि.१३.४.०७ व २५.९.०७ च्या तक्रारीच्या संबंधाने सदरची कागदपत्र नष्ट केल्याबाबत त्यांच्याकडे नियमानुसार नोंद असल्यास, त्याबाबतची माहिती अर्जदाराने मागीतल्यास ती त्यांना पुरवावी. जर कागदपत्र नष्ट केल्याची नोंद नसेल तर तशाप्रकारे लेखी उत्तर अर्जदाराला देण्यात यावे.

वरील आदेश देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

प्रत - वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पार्कसाईट विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील
क्रमांक-मुमाआ/५०३१८/अपील क्रमांक ६४१३/२०१०/०२

श्री. महम्मद हमीद शेख(समाजसेवक-सतर्क नागरिक),
नेहरु नगर, चाळ क.५, शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा(पूर्व),
मुंबई-४०००५१. **.....** **अपिलकर्ता**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,

जी/उत्तर विभाग विभाग कायालय, पहिला मजला,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),
मुंबई-४०००२८.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),
दादर, जी/उत्तर विभाग कायालय,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),
मुंबई-४०००२८. **.....** **उत्तरवादी**

निर्णय

द्वितीय अपीलाचा दिनांक : १६.८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २८.२.२०११
अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित.

सदर प्रकरणी अर्जदाराने दि.१६.८.२०१० रोजी केलेल्या अर्जानुसार मागीतलेली माहिती अर्जदाराला मिळाली परंतु खाली नमूद केलेली माहिती मिळालेली नाही-

एक) ज्या कंपन्यांची माहिती मागीतलेली आहे त्या कंपन्यांनी ए.एस.बी.भरलेली डिपॉझीट सह चलान क्रमांक

दोन) एफ.एम.डी. डिपॉझीट चलान क्रमांक व रिटर्न मनीसह चलान क्रमांक देण्यात यावे

उत्तरवादी यांच्या म्हणण्यानुसार सदरची माहिती उपमुख्य अभियंता(नियोजन),बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयामार्फत जन माहिती अधिकारी हे ८-१० दिवसात विनामुल्य, अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन दतील. त्यानंतरही अर्जदाराला माहिती घेण्यासाठी काही अडचण असल्यास अर्जदाराला या आयोगासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ खाली लेखी तक्रार करता येईल. वरील आदेश देऊन सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई **(भास्कर पाटील)**
दिनांक २८.२.२०११ **प्रभारी राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२४३८/तक्रार क्र. १६४१/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. **.... तक्रारदार**

<u>विरुध्द</u>

कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
नगर विकास विभाग, नवि-२०,

मंत्रालय, मुंबई-४०००३२. **.... उत्तरवादी**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ६.९.२०१०
जन माहिती अधिकारी उपस्थित, तक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.६.९.२०१० रोजी त्यांच्या दि.२६.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी/नगर विकास विभाग, मंत्रालय यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी शासन निर्णय निमसरकारी कार्यालये म्हणजे नगरपालिका आणि नगरपरिषदा व इतर मंडळे/महामंडळे याविषयी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली होती-

१) राज्य शासनाने प्रसुतीच्या संदर्भात जे नियम केलेल आहेत तेच नियम महानगरपालिका कर्मचा-यांना लागू का करण्यात आले नाहीत याबद्दलची माहिती द्यावी.

२) तसेच महानगरपालिका व नगरपालिका यांच्यामध्ये प्रतिनियुक्ती पदासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य अधिकारी तथा आयुक्त अथवा प्रशासक म्हणून आपल्या विभागातील कर्मचारी यांना पाठविण्यात येते अशा स्थितीत आयुक्त,प्रशासक,मुख्याधिकारी हे शासनाच्या निर्णयानुसार प्रशासकीय ठराव त्या त्या नगरपालिका,महानगरपालिका,नगरपरिषदेमध्ये मांडत नसल्यामुळे ते कोणत्या नियमामुळे राज्य शासनाच्या निर्णयाचा अवमान केला म्हणून शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतात त्याची माहिती द्यावी.

ही माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, सदर प्रकरण माझे पूर्व अधिकारी तथा राज्य माहिती अधिकारी श्री. आर.एस.घाडगे यांच्या काळातील असून सदर प्रकरणी तक्रारदार श्री.डोळस यांच्या ६.९.२०१०च्या अर्जास अनुसरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याचे सांगितले.

श्री.डोळस यांच्या अर्जातील सर्व मुद्यांच्या संदर्भात दि.१०.८.२०१० रोजी माहिती कळविण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी मागीतलेली माहिती ही राज्यातील २२६ नगरपरिषदा व २३ महानगरपालिका यांच्याशी संबंधीत आहे. या सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा या सार्वजनिक प्राधिकरण असल्यामळे त्यांच्याकडून ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. मंत्रालयात अशाप्रकारची कोणतीही माहिती उपलब्ध नसते. महानगरपालिकेचे कामकाज मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार चालते. या अधिनियमातील प्रकरण ४, कलम ४५ येथे नमूद केल्यापमाणे

महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक व सेवेच्या शर्तीबाबत तरतूद आहे तर नगरपरिषदांचे कामकाज महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम,१९६५ नुसार चालते. या अधिनियमातील प्रकरण पाच, कलम ७५ येथे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नेमणुकीसंबंधी तरतूद आहे. सदर अधिनियमांच्या प्रती शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई येथे उपलब्ध आहेत. मुद्दा क्र.४ च्या संदभात कोणतीही बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही. मुद्दा क्र.५ रजेच्या संदर्भातील धोरण हा वित्त विभागाशी संबंधीत आहे त्यामुळे वित्त विभागाकडे तो हस्तांतरीत करण्यात आला आहे. तक्रारदार यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता तक्रारदार यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती राज्यातील महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या कायद्याप्रमाणे ज्या स्थापन झालेल्या महानगरपालिका व नगरपरिषदा आहेत त्यांच्या स्तरावरील माहिती आहे. महानगरपालिका व नगरपरिषदा या स्वायत्त संस्था आहेत. शासनाने जरी कोणतेही नियम केले असले तरी जोपर्यंत महानगरपारिला व नगरपरिषदा त्यांच्या बैठकीत सदरच्या नियमाच्या संदर्भात निर्णय घेत नाहीत तोपर्यंत कोणतेही अधिकारी यांना तो निर्णय लागू करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी शासनाच्या प्रस्तुत नियमाच्या संदर्भात जी माहिती मागीतलेली आहे त्या संदर्भत प्रत्येक महानगरपालिका व नगरपरिषदांना ते नियम अंमलात आणण्याचा निर्णय घेतला असल्यासच अधिकारी किंवा कर्मचारी त्याबाबत अंमलबजावणी करु शकतात. त्यामुळे सदरची माहिती प्रत्येक महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्याकडे स्वतंत्रपणे मागणे संयुक्तिक राहील. यास्तव तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/१७९९/तक्रार क्र. १६५०/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रिअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... तक्रारदार

विरुध्द

कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,
सहकार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... गैरतक्रारदार

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ५.७.२०१०
तक्रारदार उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.९.२.२०१० च्या सहकार विभागात केलेल्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली आहे.

तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या दि.९.२.२०१०च्या अर्जात सहकार विभागाने बंधपत्रासंबंधी बनविलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. परंतु त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. आज सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार विभाग,मंत्रालय,मुबई हे हजर नाहीत. यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते व त्यामुळे संबंधित जन माहितीअधिकारी तथा कक्ष अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांच्याविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु शास्ती लादण्यापूी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरची तक्रार मंजूर करण्यास पात्रआहे.

आदेश

१) तक्रारदार यांच्या दि.९.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तसेच तक्रारीच्या सुनावणीससुध्दा जन माहिती अधिकारी उपस्थित राहिले नाही म्हणून अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द रु.५०००/- ची शास्ती का लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत आयोगाकडे समक्ष करावा. तसे न केल्यास रु.५०००/-ची शास्ती कायम करण्यात येऊन ती त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येतील.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/तक्रार क्र. १६४९/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त प्रशासन,
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
ठाणे. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १५.७.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे यांच्याकडे अर्ज करुन, स्वसंरक्षणासाठी रिव्हॉल्वर/पिस्तोल परवाना नाकारतांना जी कलमे,कारणे

नमूद असतात त्याची व सशुल्क पोलीस संरक्षण पुरवलेल्या व्यक्तींबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.६.२०१० रोजी मुद्दा क्र.१च्या संदर्भात नियमावली बाजारात उपलब्ध असल्यामुळे ती पुरविण्याची आवश्यकता नाही तसेच मुद्दा क्र.२ बाबत दि.२४.१०.२००५ भाग ४(अ) अन्वये माहिती गोपनीय असल्याने ती आपणास पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच इतर मुद्यांच्या संदर्भातही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.निरंक अन्वये देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आले आहे. मात्र तक्रारदार यांनी द्वितीय अपील दाखल न करता आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्या संदर्भात शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,ठाणे यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की, अर्जदार यांनी मागणी केलेले त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ व २(ब) ची माहिती पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखेशी संबंधीत असल्याने ती संकलीत करुन देण्याबाबत इकडील कार्यालयातून दि.१२.६.२०१० रोजी पत्र देण्यात आले. त्यात मुद्दा क्र.२,३,४ व ५ बाबतची माहिती विशेष शाखेशी संबंधीत असल्याने ती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले आहे. परवाना शाखा यांच्याकडील दि.१९.६.२०१० व विशेष शाखा यांच्याकडील दि.२९.६.२०१० अन्वये माहिती प्राप्त झाल्याने तक्रारदार यांना दि.३०.६.२०१० अन्वये विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आलेली होती. मात्र विशेष शाखा ही अधिनियमाच्या कलम २४(४) नुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होण्यापासून वगळण्यात आली असल्यामुळे विशेष शाखेची माहिती मात्र त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांनी कळविले होते.परंतु तरीसुध्दा अपिलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार कलेली आहे. त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, पोलीस आयुक्तालय सोलापूर यांनी मात्र विशेष शाखेच्या संदर्भात दि.२१.१.२०११ रोजी संपूर्ण माहिती त्यांना दिलेली आहे व त्यामुळेच तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, इतर सर्व पोलीस आयुक्तालये जर माहिती देत आहेत तर ठाणे पोलीस आयुक्तालय किंवा ठाणे(ग्रामिण) यांनी मात्र ती विशेष माहिती आहे म्हणून देता येत नाही हे कळविलेले आहे ते योग्य नाही. त्याकरीता तक्रारदार यांनी पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर यांच्याकडून मिळालेली माहिती आयोगाच्या निदर्शनास आणली व त्यामुळे तक्रारदार यांनी ठाणे शहरातील किती व्यक्तींना ठाणे पोलीस आयुक्त यांनी सशुल्क पोलीस संरक्षण दिले याबद्दलची माहिती व इतर अनुषंगिक माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता त्यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन ठाणे यांनी हा निर्णय

मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत तक्रारदार यांना त्यांच्या दि.११.६.२०१०च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना पोलीस आयुक्त, सोलापूर यांनी ज्याप्रमाणे विशेष शाखेकडून विशिष्ट व्यक्तींना संरक्षण दिल्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्याचप्रमाणे ठाणे आयुक्त कार्यालय यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र रहातील याची त्यांनी नोंद घ्यावी.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/१७६८/तक्रार क्र. १६४८/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : २९.६.२०१०
तक्रारदार, गैरतक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.२९.६.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) अन्वये त्यांच्या दि.७.५.२०१० च्या आरोग्य विभागातील माहिती अधिका-यांकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील मनोरुग्णालयाच्या संदर्भात महाराष्ट्रामध्ये एकूण किती मनोरुग्णालये आहेत, ती कोठे आहेत त्या रुग्णालयातील साफसफाईचा ठेका देणे व तो ठेका मंजूर करणे यासाठी कोण अधिकारी नियुक्त आहेत, ठेका देण्यामध्ये नियमबाह्यता असल्यास कोणत्या सक्षम अधिका-याकडे दाद मागावी याबद्दलची माहिती तसेच त्या संदर्भात एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागीतलेली दिसून

येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१७.६.२०१० रोजी मुद्दा क्र.१ बाबत राज्यात एकूण ४ शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालये आहेत. सदर मनोरुग्णालये ठाणे,पुणे, रत्नागिरी आणि नागपूर येथे आहेत. तसेच मुद्दा क्र.२ ते ७ बाबतची माहिती आपण संबंधित प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांचेकडून घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याचप्रमाणे अपिलकर्ता यांना दि.३.७.२०१० रोजी त्यांच्या एकूण ८ मुद्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,प्रादेशिक मनोरुग्णालय,ठाणे यांच्याकडून माहिती उपलब्ध झाली. परंतु पुणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयातील माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तक्रारदार यांनी मंत्रालयातील सार्वजनिक आरोग्य विभागात माहिती मागीतली होती. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२,३ ते ८ पर्यंतची माहिती ही त्या त्या मनोरुग्णालयाच्या स्तरावरची आहे आणि प्रत्येक मनोरुग्णालय हे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. तक्रारदार यांनी त्यांच्याकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरची तक्रार अंशत: मान्य करण्यास पात्र आहे.

आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यानी मनोरुग्णालये- पुणे,रत्नागिरी,नागपूर येथून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ ते ८च्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी सदरचा माहितीचा अर्ज ३ मनोरुग्णालयांना(पुणे,रत्नागिरी,नागपूर)हस्तांतरीत करावा.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना सदर आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२९६४/तक्रार क्र. १६३७/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्ट्रीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : ४.११.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.४.११.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या माहितीचा अर्ज दि.९.७.२०१० प्रमाणे माहिती प्राप्त झाली नाही म्हणून तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयातून तक्रारीच्या चौकशीकरीता नोटीस काढण्यात आली होती. माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री.वानखेडे यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये तक्रारदार यांनी के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरीग,ठाणे(पूर्व) या संस्थेच्या अनुषंगाने माहिती मागीतली होती. सदर माहिती ही एका खाजगी शैक्षणिक संस्थेची असल्याने या माहितीशी निगडीत कागदपत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडे उपलब्ध नाही. परंतु या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या तंत्रशिक्षण संचालनालयाशी सदर माहिती निगडीत असल्यामुळे याबाबतची माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना

दि.३.९.२०१० रोजी कळविण्यात आले होते. अर्जदाराने केलेल्या अपीलावर दि.२५.११.२०१० रोजी मंत्रालयात सुनावणी झाली. सदर सुनावणीस सहाय्यक जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय श्री.मोहिते उपस्थित होते. सुनावणीनंतर अर्जदार कार्यालयात आले परंतु त्यावेळी माहिती तयार नव्हती. अर्जदाराने माहिती व्यक्तीश: घेऊन जातो असे सांगितले. त्यानंतर दि.२५.११.२०१० रोजी माहिती तयार ठेवण्यात आली होती. परंतु अर्जदारास दि.१४.२.२०११ रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे असा खुलासा त्यांनी आयोगापुढे दिलेला आहे. तंत्र शिक्षण संचालनालयाचे माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग हे विनाअनुदानित महाविद्यालय आहे व विनाअनुदानित महाविद्यालयांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे त्या संस्थेच्या संदर्भातील माहिती ही उपलब्ध होऊ शकत नाही. मात्र तंत्र शिक्षण संचालनालयाकडे जी माहिती आहे ती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

७) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

८) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**
दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२८१३/तक्रार क्र. १६३८/का.१

श्री. नैनेश सुरेश डोळस,
जी-२, अंजली को.ऑप.हौसिंग सोसायटी,
रवी इंडस्टीअल कंपाऊंड,पांचपाखाडी, ठाणे(प.),
पिन-४००६०२ जि.ठाणे. .... **तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. .... **गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १६.१०.२०१०
तक्रारदार, गैरतक्रारदार उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१६.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,गृह विभाग यांनी त्यांच्या दि.८.७.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे कम १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, पोलीस विभागामार्फत ठाणे शहर भागात रहाणा-या व्यक्तीस पोलीस संरक्षण जे सशुल्क पुरविले गेले आहे त्यापोटी आजमितीपर्यंत एकूण किती थकबाकी सशुल्क पोलीस संरक्षण वापरणारे/घेणा-या व्यक्तींनी दिलेली नाही याची माहिती त्या सर्व रकमेच्यासह व इतर अनुषंगिक माहिती ८ मुद्यांमध्ये मागीतलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदर अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी मागणी केलेली माहिती ही पोलीस आयुक्त बृहन्मुंबई,पोलीस आयुक्त-ठाणे व पोलीस अधिक्षक-ठाणे(ग्रामिण) यांच्याशी संबंधीत असल्याचे आढळून आल्यामुळे अधिनियमाच्या कलम ६(३) अनुसार त्यांच्या अर्जाच्या प्रती १३.७.२०१० रोजीच्या पत्राद्वारे उपरोक्त ३ कार्यालयांकडे पाठविण्यात आल्या. परंतु दि.२.८.२०१० रोजीच्या अर्जाद्वारे अर्जदार यांनी पोलीस आयुक्त-ठाणे यांनी आवश्यक ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे कळविले. सदर माहिती गोपनीय असल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४.१०.०५,भाग-४(अ) अन्वये ती पुरविता येत नाही असे पोलीस आयुक्त,ठाणे यांनी त्यांचे पत्र दि.३०.७.२०१० रोजी त्यांना कळविले आहे. त्यानंतर अर्जदार यांनी दि.६.९.२०१० रोजी एक स्वतंत्र अर्ज केला होता. त्यात पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई कार्यालय यांनी त्यांना आवश्यक

असलेली माहिती पुरविलेली आहे. तथापी पोलीस आयुक्त ठाणे तसेच पोलीस अधीक्षक ठाणे(ग्रामिण) यांच्याकडील माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्याबाबत पुन्हा अर्जदार यांनी असे सांगितले की, पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांच्याकडुन जी माहिती प्राप्त होते ती पोलीस आयुक्त,ठाणे किंवा पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामिण यांच्याकडून प्राप्त होत नाही व ती गोपनीय आहे असे कळविले जाते हे विसंगत आहे व ती माहिती गृह विभागाकडून पुरविण्यात यावी असे त्यांनी नंतरच्या अर्जात कळविले होते. कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी पुढे युक्ती वाद करतांना सांगितले की, अर्जदाराचा अर्ज ३ कार्यालयांकडे पाठविण्यात आला होता. त्यानंतर मात्र अर्जदाराने प्रथम अपील दाखल केलेले नाही व कक्ष अधिकारी यांच्याकडे ते अर्जातील माहिती मिळावी अशी मागणी करीत आहेत. तक्रारदार यांना जी माहिती उपलब्ध झाली नाही त्या संदर्भात ठाणे अधीक्षक व पोलीस अधीक्षक-ठाणे ग्रामिण यांच्या पत्राचे अवलोकन केले असता मागीतलेली माहिती पोलीस संरक्षणाबाबतची आहे व ती इकडील जिल्हा विशेष शाखा ठाणे(ग्रामिण) यांच्याशी संबंधीत असून सदरची शाखा परिपत्रक क्र.एचडीओ-१००५/२४२४/प्रक्र/२९२/आ.१ गृह विभाग मंत्रालय, मुंबई-३२ दि.२९ ऑक्टोबर,२००५ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २४(४) अन्वये वगळण्यात आला असून तो State Intelligence Department and its subsidiaries, Special /Branch of all Police Commissionerates, District Special Branch of all District Superintendents of Police in all the Districts असा असल्यामुळे सदरच्या शाखांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नसल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई **(विलास पाटील)**

दिनांक १८.२.२०११ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल
झालेली तक्रार

क्रमांक-मुमाआ/२०१०/२४९५/तक्रार क्र. १६१०/का.१

श्री. भुषण पांडुरंग माळगांवकर,
१२२, फ्लॅट नं.३०२, मुकेश अपार्टमेंट्स,
नाडकर्णी मार्ग, वडाळा(पूर्व),
मुंबई-४०००३७. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. **.... गैरतक्रारदार**

निर्णय

तक्रारीचा दिनांक : १६.९.२०१०
तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदार यांनी दि.१६.९.२०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम १८(१) प्रमाणे त्यांच्या दि.५.२.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दि.१८.२.२०११ रोजी म्हणजे आज घेण्यात आली. सदरच्या माहिती अर्जात अपिलकर्ता यांना ९.२.२०१० रोजी उत्तर पाठविण्यात आले आहे असे माहिती अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. सुनावणीस तक्रारदार हजर आहेत व त्यांनीही माहिती मिळाली असे सांगितल्यावरुन सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१) सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आदेशाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

मुंबई
दिनांक १८.२.२०११

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,